– श्रीवासुदेवानंदकिंकर –

श्री. ब्र. यो. सीताराम महाराज टेंब्ये

यां चे

ओवीबद्ध चरित्र

किंमत रू. १५

दिनांक १२ । ३ । १९७३

फाल्गुन शु० ८, शके १८९४

– श्रीवासुदेवानंदकिकर –

श्री. ब्र. यो. सीताराम महाराज टेंब्ये

यां चे

ओवीबद्ध चरित

फाल्गुन शु. ८, शके १८९४

...राच...

...नूं लागले असता सेवकधर्म...

...खां गन्तुं पराक्रमः । यत्पुनर्ली...

उच्च भावना व्यक्त केली आहे. अशा

...ल सर्व साधकवर्ग लेखिकेचा ऋण

...विचार लेखिकेचा बहुश्रुतपणा व्यक्त

...र यथार्थज्ञानपर्यवसायी होतो याचे

...ज टेंब्ये

...षी साधकाना शांतिदायक ठरो अ...

...नीं म...न्तर्यामी जगदीश्वराजवळ प्र...

...वामृत जल

...ा देवाधिदेव आदि

वा. द. गुर्ज...

विनम्र समर्पण

अवधूत दत्त भगवन्
स्वामिन् श्रीवासुदेव गुरुराज ।
वन्दे नृसिंह यतिवर
मां सीताराम पाहि योगपते ॥
श्रीसीतारामचरितं मया भक्त्या निवेदितम् ।
श्रीपादं प्रार्थये भूत्यै भूतानां तद् भवत्विति ॥

– जानकी,

जानकीबाई विद्वांस

— ऋणनिर्देश —

'श्री' च्या आशीर्वादाने व प्रेरणेने श्रीमती जानकीबाई विद्वांस यांच्या हातीं हा चरित्रग्रंथ सांगतेला गेला. अनेक सद्भक्तांची इच्छा साकार झाली. भाविक वाचकांच्या पुढे तो आज आनंदाने सादर करीत आहे. त्याची अनुभूति व प्रतीति त्यांनी अवश्य घेऊन पाहावी, अशी विनंती करावीशी वाटते.

श्रीमद्भिनव श्री विद्याशंकर भारती स्वामी जगद्गुरु महाराज, संस्थान मठ संकेश्वर, करवीर (जेरे स्वामी वाडीकर), श्री. प. पू. गुळवणी महाराज, पुणें. श्री. प. पू. नांदोडकर स्वामी, विलेपार्ले. संतशिरोमणी श्री. सीतारामदास बाबा, अमरावती; म. म. पं. पांडुरंग शास्त्री गोस्वामी. पुणे, श्री. श्री. पु. उपाख्य पंडीतराव हिर्लेकर. अमरावती., विश्वस्त, श्री. गुरुमंदिर, कारंजा, श्री. अविनाश ओक, डेप्युटी कलेक्टर, अमरावती, डॉ. [illegible] सागरचे [illegible]मचंद्र जनार्दन गणपत्ये, माणगांव, श्री. निवसरकर बंधू, श्री. सोमण नागपूर, श्री. चिंतामणी का[illegible]नूं लागले असता सेवकधर्म[illegible]ोक आठवले व त्यांचे मित्र कानपूर; श्री. दत्तोपंत रानडे, मालक, आशा मुद्रण व मॅनेजर [illegible]खां गन्तुं पराक्रमः । यत्पुनर्लो[illegible] श्री. बाबा साहेब सबनीस व श्री. बाबूराव थुगांवकर. श्री. भागवत पेंटर, श्री. [illegible] उच्च भावना व्यक्त केली आहे. अशा [illegible]नायकराव रिसबुड. झान्सी, श्री. डी. डी. नेरॉय. मुंबई. या शिवाय अनामिक राहण[illegible]बद्दल सर्व साधकवर्ग लेखिकेचा ऋण[illegible] वविचार लेखिकेचा बहुश्रुतपणा व्यक्त

— या सर्वांचे नानाविध व अनमोल साहाय्य प्राप्त झालें तेव्हाच[illegible] यथार्थज्ञानपर्यवसायी होतो याचे[illegible]होऊं शकला. श्रीमती जानकीबाई विद्वांस यांनी आरंभिलेल्या या वाग्यज्ञाची सांगता व[illegible] होणे प्रायः अशक्यच होते. त्या सर्वांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे. त्या सर्वांची सेवा 'श्र[illegible]षी साधकाना शांतिदायक ठरो आ[illegible]साब[illegible]नीं म[illegible]र्तयामी जगदीश्वराजवळ प्रा[illegible]

शके १८९४ फा० शु० ८
दि० १२-३-७३

[illegible]मृत जल[illegible] वा. द. गुळ[illegible]ती.
[illegible]। देवाधिदेव आदि[illegible]

* लेखिकेचे आत्मनिव...

॥ श्रीगुरुदेवदत्त ॥

काय प्यां पामरें बोलावीं उत्तरें । परि त्या विश्वंभरें बो...

खरोखरच परमेश्वराची कृपा असली तर काय होणार नाही ? ... करील आणि पांगळा पर्वत चढून जाईल. या अज्ञ जीवाकडून अशी कां... नाही. कारण माहेरचे वळण अगदी जुने, मुलींना शिकवावयाचे नाही ... वर्गापर्यंत देखील शिक्षण नाही. वडिलांच्याकडून ज्या कांही देवाधर्माच्या ... घोळत असत. वडिलांनी डोळ्यात घातलेले हे एकप्रकारचे कृपा-अंजन ... वडिलांच्या उडचा फार मोठ्या होत्या. पण ईश्वरी संकेत वेगळा होता. व... यजमान निवर्तले. मोठा बिकट प्रसंग येऊन पडला. चि. परशुराम व चि. शांता ... आज ही दोन्ही मुले आपल्या उद्योगधंद्यात असून आनंदात आहेत. पेचात सांपडलेल्या ... परमेश्वर कोणाच्या तरी हृदयांत प्रेरणा करीत असतोच. त्याप्रमाणें पुढें कांही सुहृदांच्या प्रेरणेने व मदतीने माझे प्राथमिक चौथीपर्यन्तचे शिक्षण व नॉर्मल स्कूल ट्रेनिंग होऊन मला सरकारी नोकरीही मिळाली. वणी, वर्धा व देवळी या ठिकाणीं एकंदर सत्तावीस वर्षें नोकरी केली. शेवटची बारा वर्षें देवळी येथे गेली. या गावी अनेक संत होऊन गेले. त्यापैकी श्री. गणपतराव महाराज. श्री पांडचाजी महाराज, श्री. मनोहरबुवा, श्री. मिरणनाथ महाराज व श्री सतीमाई यांच्या तर तेथे देह समाध्या आहेत. देवळे तर अनेक आहेत. या गावाला देवळी हे नांव म्हणूनच पडले. अशा या पवित्र आणि पुण्यवान गावात माझी शेवटी बदली झाली हें खरोखरी भाग्यच. देवळीला राममंदीरातच वास्तव्य असल्याने श्री. रामचंद्रप्रभूचे दर्शन त्रिकाळ घडत असे. त्याच्याच कृपेनें या ठिकाणी माझ्या हातून संतचारित्राच्या लेखन कार्यांचा आरंभ झाला.

दिवसभर शाळेचें काम करावे आणि इतर वेळी काव्य वगैरे करावे, देवाची भजने आरत्या वगैरे रचून आपली करमणूक करावी, असा परिपाठ कांही दिवस चालला. आपण खूप कांही तरी देवाचे लिहावे अशी मनाला एकसारखी तळमळ लाग-

लेली. पण काय लिहावे हे कांही कळेना, बुद्धीचा वाटाच पदरात नाही तर कळणार कसे व सुचणार कसे ? याच देवळात श्रीरामचंद्रप्रभूच्या समोर श्री. गणपतराव महाराजांची समाधी आहे. तेथे राहणारे महाराजांचे एक नव्वद वर्षे वयाचे शिष्य श्री. रामभरोसे यांचे तोंडून 'श्री'चे विषयी पुष्कळ गोष्टी ऐकल्या. पण त्याचा मनावर कांहीच परिणाम झाला नाही. शेवटीं श्री. गणपतराव महाराजांनी दृष्टांत दिला को, लेखणी हातात घे व लिहिण्यास सुरुवात कर. मीं म्हटले, "केवढे कठिण कार्य ? माझे हातून ते कसे होईल ? " परंतु पुनः तेच वाक्य. आणि खरोखरीच आरंभीच्या संतोक्तीप्रमाणें त्या विश्वंभरें मला बोलविलें ! आपण स्वतः माहिती देऊन ग्रंथ पूर्ण करुन घेतला. हीच संतकृपा. यापेक्षा आणिक काय हवें? दृष्टांत गुप्त ठेवावेत. असे म्हणतात. पण माझ्या सारखी सर्व बाजूंनी अज्ञान बाई काय लिहून दाखविणार? म्हणून हा खरा प्रकार सांगावा लागत आहे. पुढे दोन वर्षांनी सोनेगांवचे श्री. संत आबाजी महाराज यांचे चरित्र लिहिण्याची प्रेरणा झाली व 'श्रीं' च्या आशीर्वादाने हाहि ग्रंथ पूर्ण झाला. हे दोनहि ग्रंथ पुष्कळ भाविकांकडून वाचले जात आहेत.

आता हा तिसरा ग्रंथ म्हणजे श्री ब्र. यो. सीतारामम[illegible]ज टेंब्ये यांचे चरित्र [illegible] हा ग्रंथ लिहिण्याचा सुयोग कसा आला याचेही थोडेसे निवेदन केले पाहिजे. माझे वरील दोनही प्रकाशि[illegible]सागराचे [illegible] मानूं लागले असता सेवकधर्म बाबूराव विद्वांस अमरावती यांच्या वाचण्यात आले व त्यांच्याच तोंडून श्री. ब्र. यो. सीतार[illegible] शाखां गन्तुं पराक्रमः । यत्पुनलहनेरा येथील झिरीच्या दत्तमंदिराविषयी बरेंचसे ऐकण्यास मिळाले. एकदा झिरी[illegible]ी उच्च भावना व्यक्त केली आहे. अशा[illegible]ले हातून श्रीगुरुदत्तात्रेयाच्या कृपेने या संताची कांही तरी सेवा घडावी, 'श्री' चे [illegible] प्राबद्दल सर्व साधकवर्ग लेखिकेचा ऋणी[illegible] आले. माझा हेतू मी तेथे प्रकट केला. तेव्हा 'श्री' चे संक्षिप्त चरित्र एक गद्य [illegible]त्वविचार लेखिकेचा बहुश्रुतपणा व्यक्त [illegible]हे असे समजले. तथापि परमेश्वराच्या नामस्मरणाला कोणाचाच अडथळा नस[illegible]चार यथार्थज्ञानपर्यवसायी होतो याचे [illegible]शब्दांनी तो. याचे गुणानुवाद करूं शकतो. श्रीरामकृष्णांच्या चरित्रावरून हे लक्षात [illegible] करून घेतो. माझ्या प्रमाणेंच झिरी येथील देवस्थानच्या चालकांची पण इच्छा [illegible]न्वेषी साधकाना शांतिदायक ठरो आणि [illegible]चे एक ओवीबद्ध चरित्र पोथीरुपात असावे. म्हणून त्यांनीही मला प्रोत्साहन दिले. [illegible]असाव[illegible]र्तयामी जगदीश्वराजवळ प्रार्थ[illegible]चांगला दिवस पाहून मी चरित्र लेखनास सुरुवात केली. पहिले तेरा चौदा अध्याय [illegible]ध्यानीं म[illegible] व पुढील तीन पादुका हाच भाग डोळ्यासमोर येई आणि एकदा तर तीन तपस्वी [illegible]ानंदामृत जल[illegible] वा. द. गुळवणी [illegible]पण अर्धे

[illegible]३ ॥ देवाधिदेव आदि[illegible]

चरित्रलेखन झाले आणि काम मागे पडले प्रकृती अवस्थ व घरातील अ
झाले नाही. इतकेच नव्हे तर हातात काम घ्यावेसे सुद्धा वाटेना. परिण
धनी वेगळाची. श्रीगुरुमहाराजांनी लेखन का मागे टाकले ? माझे हातू
भीती वाटूं लागली. मी स्त्रीजात असल्यामुळे हे कार्य करण्यास अनधिका
दिवशी गुरुवारी देवापुढे उदबत्ती लावून प्रार्थना केली की, प्रभो दत्तात्रे
कर. तू सांगितले नाहीस तर घेतलेले काम माझे हातून झाले नाही म्
म्हणून हात जोडले आणि झोपले. बऱ्याच वेळानंतर झोप लागली व स
अष्टवर्षीय बालमूर्ती एका हातात कमंडलू उजव्या हातीं काठी डोईवर
समोर येऊन उभी राहिली व हातातील काठी तिने जोराने खाली
असता, तू त्यास बोलविलेस तोच मी, असे म्हणून व एकांगी चरित्र न लि
मूर्ती अदृश्य झाली. ही मूर्ती कोण हे आता सांगावयास नकोच. प्रभूने मार्गदर्शन
प्रभूच्याच आज्ञेनुसार श्रीसद्गुरुमहिमा मी लिहून काढला. आज प. पू. श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंब्ये स्वामी महाराज यांचे
नांव ठाऊक नाही असा मनुष्य विरळाच. अशा प्रत्यक्ष श्रीगुरुमूर्तींचा गुणानुवाद ऐकतांना, वाचतांना त्या व्यक्तीच्या
ठिकाणीं सद्गुरुप्रेम उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाही. श्री. ब्र. यो. सीताराम महाराज एक क्षणभर सुद्धा ज्या
श्रीसद्गुरुवाचून राहू शकत नव्हते त्या सद्गुरुस्वरुप प. पू. वासुदेवानंद सरस्वतींची माहिती या चरित्रग्रंथात हवीच, हा
सर्वभाव मनात प्रकट झाल्यामुळे या चरित्रात मध्ये तीन चार अध्यायात श्रीसद्गुरुंची माहिती गोवली आहे. पुढील
लेखनकार्य होत असतांना मधून मधून कोणी तरी संन्यासी घरांत फेऱ्या घालतांना तर केव्हा देवापुढे पाटावर बसलेले दिसत.
एक वेळ अर्धवट स्वप्नात दोन यती व एक ब्राम्हण जेवावयास बसलेले पाहिले. पुष्कळ मंडळी असल्यामुळे कोण कोण वाढत
होते ते समजले नाही. चरित्रलेखनकालातील या घटनाचा मुद्दामच येथे उल्लेख केला आहे. त्यांना दृष्टांत वा अनुभव
कांहीही नांव दिलें तरी माझ्यासारख्या सामान्य अन्य स्त्रीकडून श्रींनी चरित्रलेखन पूर्ण करून घेतले हे मात्र खरे.

संपूर्ण ग्रंथाची हस्तलिखित प्रत वाचून श्रीमदभिनव श्रीविद्याशंकर भारती स्वामी जगद्गुरु महाराज, संस्थान मठ संकेश्वर, करवीर (जेरेस्वामी वाडीकर) हल्ली मुक्काम सातारा यांनी प्रशंसोद्गारपूर्वक शुभाशीर्वाद दिले. त्याचप्रमाणें संपूर्ण ग्रंथाचे स्वत: वाचन करून प. पू. श्री. वामनरावजी गुळवणी महाराज, पुणे यांनी माझी ही वाङ्मयीन गुरुसेवा आशीर्वादपूर्वक पुरस्कृत केली व मला प्रोत्साहित केले. या उभय सत्पुरुषांची मी अत्यंत ऋणी आहे.

ग्रंथलेखनाचे कामी प. पू. श्री. वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज यांचे चरित्र तसेच प. पू. श्रीशंकरस्वामी लिखित श्री ब्र. यो. सीतारामम्हाराज टेंब्ये यांचे चरित्र या ग्रंथांचा माहितीच्या दृष्टीने फार उपयोग झाला. त्यांचेही मी मन:पूर्वक आभार मानते. तसेच या ओवीबद्ध चरित्राचे हस्तलिखित पूर्णपणे तपासून शुद्ध करून दिल्याबद्दल अमरावतीचे श्री. श्री. पु. उपाख्य पंडितराव हिर्लेकर वैद्य यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच.

श्री. ब्र. यो. सीतारामम्हाराज टेंब्ये संस्थान, बडनेरा येथील विश्वस्तांनी मनावर घेऊन या चरित्रग्रंथांचे प्रकाशन केले आहे. त्यांची ही सेवा 'श्रीचरणीं' रुजू होईलच.

श्री. ब्र. यो. सीताराम महाराज टेंब्ये यांचे सत्तावीस अध्यायांचे हें ओवीब मानूं लागले असता सेवकधर्मी अर्पण असो.

शके १८९४ फाल्गुन शु. ८
सोमवार दि. १२-३-१९७३

र. आ. नर्सीकर, अध्यक्ष
प्रकाशन समिती-
ब्र. यो. सीताराम महाराज टेंब्ये, संस्थान,
बडनेरा सें. रेल्वे विदर्भ महाराष्ट्र
प्रकाशक

- सर्व हक्क प्रकाशकाचे

मुद्रण,
मुद्रक

९. महासागराचे
शाखां गन्तुं पराक्रम: । यत्पुनर्ला
वी उच्च भावना व्यक्त केली आहे. अशा
ग्राबद्दल सर्व साधकवर्ग लेखिकेचा ऋणी
त्त्वविचार लेखिकेचा बहुश्रुतपणा व्यक्त
चार यथार्थज्ञानपर्यवसायी होतो याचे उ
रानडे,
गायटर
न्वेषी साधकाना शांतिदायक ठरो आणि
पसाद
ध्यानीं मनीं अंतर्यामी जगदीश्वराजवळ प्रार्थ
रावती.
मानंदामृत जले
३ ॥ देवाधिदेव आदि
वा. द. गुळव

आदरणीय प. पू. वामनरावजी गुळवणी

शु भा शी वा

श्रीगणेशदत्तगुरुभ्यो न

यन्नामस्मरणात् दैन्यं पापं तापश्च नश्यति। भीतिग्रहार्तिदुः

परमपूज्य सद्गुरु श्रीवासुदेवानन्द सरस्वती टेंब्ये स्वामी महार

विरक्त राजयोगी होऊन गेले. त्यांचे ओवीबद्ध असलेले चरित्र पाहण्यास

यांचे अंतःकरण सद्गुरुप्रेमाने भरलेले असल्याने हे चरित्र प्रेमरसपूर्ण झा

महाराजांच्या पुण्यतिथिउत्सवसमयी हे चरित्र छापून प्रसिद्ध करण्याचा त्यांचे

एकंदर सत्तावीस अध्यायांचे हे चरित्र असून श्रीसीतारामचरित्रालंकार असे याचे समर्पक नांव ठेवलें आहे. प्रथम श्रीदत्तात्रेय, श्रीपादवल्लभ व श्रीनृसिंहसरस्वती या अवतारांचे चरित्र सांगून नंतर सद्गुरु श्रीवासुदेवानन्दसरस्वती स्वामीमहाराजांचे चरित्र दिले आहे आणि नंतर शेवटपर्यंत श्रीसीताराममहाराजांचे चरित्र वर्णिलेले आहे. श्रीसीताराममहाराजांचे एक गद्यात्मक चरित्र श्रीशंकरस्वामींनी लिहिलेले प्रसिद्ध झाले आहे तथापि प्रस्तुत चरित्र ओवीबद्ध असल्याने नित्य पारायण करण्यास उपयुक्त असे झाले आहे.

आचार्योपासन एक हे मोठे तत्त्वज्ञानसाधन श्रीभगवंतांनी गीतेत सांगितले आहे. स्वामींची सेवा कशी करावी हे दाखविण्याकरिताच महारुद्र मारुतिरूपाने अवतार घेऊन आले. त्यामुळे सेवाधर्म कसा असतो हे लोकांच्या निदर्शनास आले. थोरल्या महाराजांना गुरुस्थानी मानून त्यांची सेवा श्रीसीताराममहाराजांनी अविरत केली. हा दिव्य आदर्श या चरित्राचे रूपाने भाविक जनतेपुढे आला ही ईशकृपाच आहे यात संशय नाही. ' निर्मानमोहा जितसंगदोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः। द्वन्दैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञैर्गच्छन्त्यमूढाः पदमव्ययं तत् ॥ ", या श्लोकात ब्रह्मपदाची

प्राप्ति होण्याकरिता किती योग्यता संपादन करावी लागते, ते भगवान सांगत आहेत. हे सर्व दिव्य गुण श्रीसीताराम-महाराजांनी केवळ विशुद्ध गुरुसेवाबलाने प्राप्त करून घेतले होते, हे या चरित्रावरून दिसून येईल. ' अघवीयाचि दैवा । जन्मभूमि हे सेवा । जे ब्रम्ह करी जीवा । शोच्यातेही ॥ " असे आचार्योपासनाचे महत्त्व श्रीज्ञानदेवांनीहि दाखविले आहे. लहानपणापासूनच सद्गुरूंचे सान्निध्य लाभलेले, त्यांतहि 'शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते । अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ॥ ', या उक्तिप्रमाणें भगवद्भक्तकुलात जन्म झालेला, अनेक जन्माची सात्त्विक प्रकृति, या सर्व गुणसमुच्चयामुळे श्रीसीताराममहाराजांचा जीवनविकास कसा लोकोत्तर झाला हे परमार्थसाधकाला स्पष्टपणें या चरित्रावरून कळून येणारे आहे- थोरल्या महाराजांचेहि बरेच चरित्र यात आरंभी आलेलेच आहे, आणि श्रीसीताराममहाराजांचें चरित्रहि थोरल्या महाराजांचेच चरित्र आहे असे म्हणण्यास काय हरकत आहे ? सच्च्या सेवकास लाभलेली कृतार्थता म्हणजे ' आपणासारिखे करिती तात्काळ ', अशा महात्म्यांचेच कर्तृत्व होय, हीच दैवी संपत्तीने संपन्न असलेल्या सेवकाची धारणा असते. ती खरी आहे. महासागराचे उल्लंघन मारुतिरायांनी करून सीतेचा शोध लावला याबद्दल प्रभु रामराय त्यांचे उपकार मानूं लागले असता सेवकधर्मास अनुसरून आंजनेय प्रभुला उत्तर देतात ते असे – ' शाखामृगस्य शाखायाः शाखां गन्तुं पराक्रमः । यत्पुनर्लंघितोऽम्भोधिः प्रभावोऽयं प्रभो तव ॥ " यांत सर्व कर्तृत्व स्वामिचेच आहे. ही सेवकाची उच्च भावना व्यक्त केली आहे. अशा लोकोत्तर गुरुशिष्यांचे कृतार्थ जीवन या चरित्राच्या रूपाने जनतेसमोर आणल्याबद्दल सर्व साधकवर्ग लेखिकेचा ऋणी राहील यांत शंका नाही. या चरित्रात प्रसंगाने उपदेशरूपाने आलेला तत्त्वविचार लेखिकेचा बहुश्रुतपणा व्यक्त करणारा आहे. महात्म्याच्या संगतीत प्रसंगान ऐकण्यास मिळालेला तत्त्वविचार यथार्थज्ञानपर्यवसायी होतो याचे उदाहरण म्हणून ही चरित्रलेखनशैली दाखवितां येण्यासारखी आहे.

ईशप्रेरणेने तयार झालेले एका महापुरुषाचे हे चरित्र [illegible] सत्यान्वेषी साधकाना शांतिदायक ठरो आणि भारत-वर्षातील आसुरीसंपत्तिरूपी अंधकार [illegible] प्रभावी [illegible] ॥ सदा असो ध्यानीं मनीं अंतर्यामी जगदीश्वराजवळ प्रार्थना आहे.

श्रीवासुदेवनिवास, ४२/१७ [illegible] चरणीं । राहीन सदा स्वानंदें ॥ ३५ ॥ जें स्वानंदामृत जलें
कर्वे पथ, पुणें ४ [illegible] कथा प्रेमळ । करील निर्मळ श्रोतयां ॥ ३३ ॥ देवाधिदेव आदि

वा. द. गुळवणी

आदरणीय प. पू. वामनरावजी गुळवणी

श्रीगुरुदेव दत्त ५

दि गं ब रा दि गं ब रा

भा शी वा

स जयति सिंधुरवदनो देवो यत्पाद[illegible]रणम् ।
वासरमणिरिव तमसां राशिं नशियात विघ्ननाम् ॥ १ ॥

या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता ।
या वीणावरदंडमंडितकरा या श्वेतपद्मासना ।
या ब्रह्माच्युतशंकरप्रभृतिभिर्देवैः सदा वन्दिता ।
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा ॥ २ ॥

मूकं करोति वाचालं । पंगुं लंघयते गिरिम् । यत्कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम् ॥ ३ ॥

नारायणं नमस्कृत्यं नरं चैव नरोत्तमम् ।
देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ॥ ४ ॥

वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् । देवकीपरमानन्दं कृष्णं वन्दे जगत्गुरुम् ॥ ५ ॥

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः । गुरुः साक्षात् परं ब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥ ६ ॥

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम् । द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम् ।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतम् । भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥ ७ ॥

काषायवस्त्रं करदण्डधारिणं कमंडलु पदम्करेण शंखम् ।
चक्रं गदाभूषितभूषणाढ्यं श्रीपादराजं शरणं प्रपद्ये ॥ ८ ॥

मंत्राधिराजं यतिराजपूज्यं त्रैलोक्यनाथं जनसौख्यकारम् ।
सानंदचित्तं निखिलात्मतत्त्वं श्रीपादराजं शरणं प्रपद्ये ॥ ९ ॥

दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥ १० ॥

श्री पा द व ल्ल भ दि गं ब रा





...य देवा ...यसाव
...। सदा असो ध्यानीं म...
...च्चरणीं । राहीन सदा स्वानंदें ॥ ३५ ॥ जें स्वानंदामृत जल

अेकमुखी दत्तमूर्ती–श्री ब्र. यो. सीताराम महाराज टेंब्ये,
...कथा प्रेमळ । करील निर्मळ श्रोतयां ॥ ३३ ॥ देवाधिदेव आदि ...स्थान, बडनेरा.

॥ श्री दत्तात्रेय प्रसन्न ॥

असे उभे ... ठेवूनी कटावरी । झाले

॥

ॐ हें अक्षर । ...ं भरलेलें ॥ १ ॥ असती
दैवतें तेहतीस कोटी । ...तात ज्ञानी तयांची ...ा कोटी । असोत त्या चरणीं
सर्वदा ॥ २ ॥ या ॐकाराचें स्वरूप । न कळे को...ा जप तप । पाहिजे पुढे ज्ञानदीप । तेजोमय
कृपेचा ॥ ३ ॥ अग्रासनीं जयाचा मान । तो ॐकार वदनेंदु गजवदन । करीन आधी चिंतन । त्या
विघ्नहर्त्या मोरयाचें । ४ ॥ पसरलें अविद्याकानन । तें छेदावया कारण । बैसला करीं धरून ।
अंकुश परशु अखंड ॥ ५ ॥ गूळ खोबरें मोदक । नको तयाला आणिक । असे भक्तांचा पालक ।
विनायक सुपुत्र पार्वतीचा ॥ ६ ॥ हरपेल क्षणीं सकल चिंता । निरसूनी जाईल सकल व्यथा ।
शंभुतनय हा बुद्धिदाता । शरण मी आधी तया असे ॥ ७ ॥ हृदयीं दयासागर । भरती तयाला
निरंतर । घडतील कृपेचे तुषार । शरणागतावरी तयाचे ॥ ८ ॥ ऐसी मानसीं जपुनी गणेशमूर्ति ।
मग मी वंदिते सरस्वती । आदिमाया श्रीभगवती । अगाध शक्ति जियेची ॥ ९ ॥ बैसली असे
सिंहासनीं । अनंत-लोचन-मयूर-वाहनी । हातीं विद्या-पुस्तक घेऊनी । वरदायिनी भक्तांसी ॥ १० ॥
तिचिया स्वरूपतेजांत । चंद्र सूर्य अवगाहन करीत । ऐसे स्वरूप प्रकाशवंत । कुंठित मती
वर्णावया ॥ ११ ॥ तुझ्या कृपेची काय थोरी । पांगळा चढेल गिरिशिखरीं । मुका वदेल वैखरी ।
वेदान्तींचा गुह्यार्थ ॥ १२ ॥ अपंगाशी तुझा संग । माते लागता सवेग । संपला तयाचा भोग ।
आला सुयोग त्याजला । १३ ॥ तीच आस धरोनी चित्तीं । शरणागत मी तुझ्या पुढती । तुझ्या
कृपेच्या पदराखालती । माते घे उचलोनी मला ॥ १४ ॥ माझें अज्ञान आहे किती । हें तूंच जाणसी
चित्तीं । परी पदर धरिला हातीं । पुरविसी हट्ट तूं माझा ॥ १५ ॥ बोल बोलतां बोबडी । चुकतें
बाळ घडोघडीं । परी माता आवडी । सर्वदा शिकवी त्याजला ॥ १६ ॥ तैसी तूं कृपा माउली ।
सदैव करी मजवरी सावली । लागेल ओलावा हृदयकमलीं । क्षण एक न लागतां ॥ १७ ॥
लाविशी सद्बुद्धीचें बीज । मनी अक्षरें अंकुरतील सहज । मग गुरुचरित्रकवनकुंज । साकार

होवो माय गे ॥ १८ ॥ टाकिला तुझ्या पदीं भार । माते जिव्हाग्रीं ये समोर । निमित्त मात्र माझा कर । तुझ्या लेखणीं लावि गे ॥ १९ ॥ श्रीदत्तात्रेयभक्तकथा । वदावी इच्छा उदेली चित्ता, माझ्या धरूनिया हाला । माते पुरवी हा लळा ॥ २० ॥ ज्यांच्या कृपेवाचून । न हाले वृक्षाचें पान । ती सरस्वती गजानन । आशीर्वाद मज देवोत ॥ २१ ॥ ऐसे स्वानंदरसाचें पेय । साठवूनी भरलें हृदय । होऊनी पूर्ण निर्भय । टाकिले पाऊल म्या पुढतीं ॥ २२ ॥ जी कुलस्वामिनी माझे घरीं । श्रीलक्ष्मीकेशवराज जोगेश्वरी । देवो साह्य ती झडकरी । शरण मी माते पदीं असे ॥ २३ । मानवजन्म घेऊन । फेडिल्या जाय न कदा ऋण । त्या माता पित्यांचे चरण । अनन्य भावें आठवितसे ॥ २४ ॥ जी गोत्रज विभूति थोर । जे शांडिल्य ऋषीश्वर । त्यांना साष्टांग नमस्कार । अनन्य भावे माझा असो । २५ । भृगुऋषींनी मारिली लाथ । तो क्षीरसागरीं लक्ष्मीकांत । श्रीवत्सलांछन मिरवित । हृदयावरी सर्वदा । २६ ॥ तैसा त्याचा अगाध महिमा । भक्त-अपराध करितो क्षमा । शरण मी त्या पुरुषोत्तमा । त्रिकाळ ध्यानीं जातसे ॥ २७ ॥ जाहले दशावतार । भक्तांस्तव हे साचार । स्वयं निर्गुण निराकार । सगुण रूपा धरितसे ॥ २८ ॥ एक ब्रीद करीं कंकण । करावें भक्तांचें संरक्षण । दुष्टद नवनिर्दाळण । स्थिरावे शेवटीं पंढरीशी । २९ ॥ ऐसे हें परब्रह्म पंढरीं । असे उभे विटेवरी । कर ठेवुनी कटीवरी । झालीं अठ्ठावीस युगें ॥ ३० ॥ हें कशास्तव खडतर व्रत । जाहला भक्तांचा अंकित । हांक ऐकतां धावत । क्षण एक न लावतां ॥ ३१ ॥ तयासी प्रेमभावें पुकारा । करीन रुक्मिणीच्या वरा । पांडुरंगा परम उदारा । लेकरु अज्ञ करीं धरा ॥ ३२ ॥ नामयाच्या अभंगा । स्वयें लिहिलेसी पांडुरंगा । तैसीच ही सुरंगा । श्रीदत्तभक्तकथा पूर्ण करी ॥ ३३ ॥ माझें आराध्य दैवत । शिवसांब प्रभू कैलासनाथ । भोलानाथ मज रक्षित । उभा सदा पाठीशी ॥ ३४ ॥ सदा असो ध्यानीं मनीं । अखंड राहो चिंतनीं भ्रमर होवोनीं तच्चरणीं । राहीन सदा स्वानंदें ॥ ३५ ॥ जें स्वानंदामृत जल । चाखीन सदा सर्वकाळ । होईल कथा प्रेमळ । करील निर्मळ श्रोतयां ॥ ३३ ॥ देवाधिदेव आदिनाथ । मग वंदीन

नवनाथ । निवृत्ति ज्ञानेश्वर एकनाथ । आणिक संत महात्मे ॥ ३७ ॥ झाले तपोनायक । व्यास आणि वाल्मीक । ज्यांचे चरण धरी रघुनायक । ते विश्वामित्र वसिष्ठ ऋषी ॥ ३८ ॥ ग्रंथारंभीं आठवूनी । ठेवीन माथा तयांचे चरणीं । पाचारण त्यां करोनी । आशीर्वाद मागेन ३९ ॥ आतां श्रोते हो सभाजन । आपणां आधी वंदीन । बहु ग्रंथ केलेत श्रवण । संस्कृत आणि प्राकृत ॥ ४० ॥ सुवर्णशब्दांचिये कोंदणीं । दृष्टांत-रत्नांची खेवणी । अवलोकिल्या तुमचे लोचनीं । माझा ग्रंथ ना रुचेल ॥ ४१ ॥ भरजरी शालीस लाविलें ठिगळ । तें न दिसे जैसें सोज्वळ । सुवर्णा पुढती पितळ । भासेल ग्रंथ हा पाहतां ॥ ४२ ॥ भूप बैसोनी रौप्य-पाटीं । पक्वान्नें जेवितो सुवर्ण ताटीं । तत्समान भाकर–आमटी । ज्ञानिया गोड वाटतसे ॥ ४३ ॥ राम राम म्हणोन । भाविक जपतो रात्रंदिन । परि रसाळ गायन । रामनामाचें करितसे ॥ ४४ ॥ परि राम काय पाहती । अंतरीची भावभक्ति । जेथे प्रेम तेथे रघुपति । आनंदाने स्थिरावे ॥ ४५ ॥ तैसेंच माझें लेखन । दिसेल त्यामाजीं अज्ञान । परि भगवंताचें नामस्मरण । वाटेल गोड आपणा ॥ ४६ ॥ तेवीं होवोनीया सादर । बैसले ठेवोनियां आदर । होईल निश्चयें सत्कार । या सिताराम-चरित्राचा ॥ ४७ ॥ आतां वक्त्यांसी प्रार्थना । आवरी आवरी आपुल्या मना । किंचित नसावा मीपणा । अहंपणा तो मानसी ॥ ४८ ॥ प्रभु कर्ता आणि करविता । हे ओळखूनी झणीं आतां । शरण जाई त्या भगवंता । श्री गुरुपदां आठवोनी ॥ ४९ ॥ आता ज्याचे चरणीं गुंतला हेत । त्याचें चरित्र करावें श्रुत । परि अवतार मालिका प्रथमार्थ । कथावया पाहिजे ॥ ५० ॥ त्या सीताराम चरणीं । घालीन आधी लोटांगणीं । ठेविल शिरीं कृपापाणी । परम कृपाळू होवोनियां ॥ ५१ ॥ ही भारतभूमि पवित्र । तिजवरी पापहारी तीर्थक्षेत्र । ब्रह्मा विष्णु त्रिनेत्र । अवतार घेती अनेक ॥ ५२ ॥ या देवत्रयीचे अवतार । करिती सृष्टीचा कारभार । रचना–सांभाळ–संहार । फिरे चक्र हें सारखें ॥ ५३ ॥ संकट पडतां भक्तां प्रत । तातडीने तेथे जात । अनंत रूपें घेऊनी नटत । क्षण एक न लागतां ॥ ५४ ॥ जई असुर मातती अनिवार । करिती गो-ब्राह्मण-संहार । यज्ञयाग पुण्यमार्ग समग्र । अणुमात्र होऊं ना देती ॥ ५५ ॥

ऐसा अनन्वित होई छळ । रात्रंदिन भू करी तळमळ । अवकळा पसरली सर्वकाळ । तै भूमाता काय करी ॥ ५६ ॥ गोरूप धरूनी धरणी माता । जो परमेष्ठी जगन्नियता । त्याच्या चरणीं ठेवूनि माथा । प्रार्थना तया करितसे ॥ ५७ ॥ आता अवतार घेतल्याविना । जग सुखी हें होईना । शेषशायी नारायणा । सांगा भूवरी यावया ॥ ५८ ॥ करुणाकर तो दीनानाथ । ऐकतो भक्तांची हाक त्वरीत । दशावतार असती श्रुत । आपणांसी प्रभूचे ॥ ५९ ॥ शंकराचे रुद्रावतार । अकरावा रुद्र हा अंजनीकुमर । शक्ति तयाची अपरंपार । जन्मतांच धरूं पाहे सूर्यासी ॥ ६० ॥ रामनाम शीतळ । किती आहे तें निर्मळ । जपतां शमलें हालाहल । जाणे शिव हा एकला ॥ ६१ ॥ तैपासूनी इच्छित मन । श्रीराम दास्यत्व मी करीन । म्हणोनी रामावतारीं कर जोडून । दास उभा हा पायासी ॥ ६२ ॥ तें परिसतां रामायण । पराक्रम तो केला गहन । दाविलें हृदय फाडून । रामरूप तें सकळिकां ॥ ६३ ॥ ऐशी कथा अद्भुत । रामायण आणि भागवत । ज्ञानेश्वरी दासबोध श्रुत । अगाध संतचरित्रें ॥ ६४ ॥ त्याचपरि तपस्विनी । भक्तांमाजी शिरोमणी । मीरा, कान्होपात्रा, जनी । खेळल्या अंकी या मातेच्या ॥ ६५ ॥ आणिक झाल्या श्रेष्ठ माता । त्यांच्या पावित्र्याच्या वाहती सरिता । पुण्यगिरी उंचावले पाहतां । दिसती नभासी भेटले ॥ ६६ ॥ धन्य धन्य भारतजननी । अनंत रत्नांचिया साठवी उदरीं खाणी । झाल्या परमेश्वराच्या जननी । कोणत्या नयनीं पाहाव्या ॥ ६७ ॥ परशुरामाचो माय रेणुका । माहूरगडवासिनी जगदंबिका । त्रिकाळपूजा होतसे देखा । उदो उदो करोनिया ॥ ६८ ॥ तैसा कौसल्येचा रघुनंदन । देवकीचा श्रीकृष्ण भगवान । माय यशोदाई पावन । भगवंत खेळती अंगणीं ॥ ६९ ॥ सामर्थ्यवान पतिव्रता विश्वास पूर्ण मानसी होता । रघुनाथ आज्ञा करितां । शिर हांसवी सुलोचना ॥ ७० ॥ कुश्चळ रूप धरून । सत्त्व हराया जाती त्रिनयन । चांगुणा कसाशी लावून । केलें पावन तिजलागी ॥ ७१ ॥ घेऊनो चालला यम पतीचे प्राण । सावित्री चालली मागून । चतुर भाषणीं यमा गुंतवून । आणिले प्राण पतीचे ॥ ७२ ॥ वटसावित्री हे पूजाव्रत । पूर्णिमा जेष्ठ मासांत । सुवासिनी भावें

आचरित । आपुल्या सौभाग्या कारणें ॥ ७३ ॥ अहिल्या, द्रौपदी, सीता । तारा, मंदोदरी स्मरतां । प्रातःकाळीं हीं नामें घेतां । हरती सकल पातकें ॥ ७४ ॥ ऐशीच पवित्र सौभाग्यसरिता । तपस्विनी पतिव्रता । अत्रीऋषींची ती कान्ता । अनसूया नाम तियेचें ॥ ७५ ॥ गिरिनार पर्वतीं अत्री ऋषी । जणों तपःसामर्थ्याची राशी । येईल इंद्रपद हाताशीं । ऐसे खचित वाटतें ॥ ७६ ॥ पतिव्रतांमाजी अग्रगामिनी । अनसूया त्यांची कामिनी । एका पतिसेवेवाचुनी । दूजा भाव चित्तीं नसे ॥७७॥ नित्य पतीचें पूजन । चरणोदकामृताचें सेवन । समग्र तीर्थे त्यांत जाण । हीच भावना तियेची ॥ ७८ ॥ पंचमहाभूतें समस्त । असती तिच्या आज्ञेंत । काय वानावें पातिव्रत्य । महती अद्भुत तिची असे ॥ ७९ ॥ पुण्यधनाची होतसे संचिती । कदापि ना होतसे रिती । भाग्योदयें आश्रया येती । त्रय देव हे सतीच्या ॥ ८० ॥ देखिला कलियुगांत । वाढला अधर्म अतोनात । नव अवतार व्हावा त्वरीत । ऐसें नारदा वाटलें ॥ ८१ ॥ ऐसा अधर्म वाढल्या । धर्म जाईल अवघा विलया । आतां अवतार घेतल्या वाचूनियां । भूमाता न होय सुखी ॥ ८२ ॥ करीं चिपळ्या आणि वीणा । मुखी नाम नारायणा । चालला मुनी तीर्थाटणा । त्रय देवांसी भेटावया ॥ ८३ ॥ नारद ऋषींचें सर्वत्र गमन । त्रिभुवनीं त्यांचा सन्मान । तेंवी त्रय देवांनी पूजन । केलें आपुल्या स्वहस्तें ॥ ८४ ॥ नारदांनी केली स्तुती । अहो ब्रह्मन्, विष्णो, उमापती । भूमीवरी अधोगति । माजली असे अनिवार ॥ ८५ ॥ तरी तीनहि देव मिळुनी साचार । एकचि व्हावा अवतार । कमी करावा भूभार । प्रार्थना माझी एक असे ॥ ८६ ॥ नारदाची ऐकिली स्तुति । त्रय देव विचारीं पडती । काय सांकडें आम्हा पुढती । नारदाने घातलें ॥ ८७ ॥ प्रगट बोलती तयासी । कुणाच्या एवढ्या पुण्यराशी । पोहोचल्या आहेती गगनासी । कवण स्थलीं नारदा ॥ ८८ ॥ जेथे पावित्र्याचा कळस । दिपवितो सर्व जगतास । ऐसें स्थळ या कर्मभूमिस । सांग कोठे नारदा ॥ ८९ ॥ सौभाग्याची निर्मळ गंगा । तापत्रयहारिणी चंद्रभागा । त्रय देव घेतील ओसंगा । ऐसा उदर गाभा कवण असे ॥ ९० ॥ देव जाहले प्रसन्न । नारद घालती लोटांगण । होवोनिया मुदित मन । कीर्ति वर्णिती

सतीची ॥ ९१ ॥ म्हणती भ्रमण करितां तीर्थाटणीं । पातलों गिरिनार पर्वतो एके दिनीं । तेथे देखिली नयनीं । पतिव्रता साध्वी सती ॥ ९२ ॥ ती कवणाची असे स्वामिनी । कोणत्या नामीं वसते अवनीं । नाम पडतां एकदा श्रवणीं । महापातकें दग्ध होती ॥ ९३ ॥ ती अत्रि ऋषींची जाया । नाम तिचें अनसूया । ती त्रय देवांची होय माया । अवतार घ्यावा त्या स्थलीं ॥ ९४ ॥ ज्याचे त्रय देवांसवे सख्यत्व जाण । त्यासी काय नाही आत्मज्ञान । भूत भविष्य वर्तमान । ठाउकें सर्व नारदा ॥ ९५ ॥ घेतो अवतार म्हणून । नारदासी देती देव वचन । मग त्या आनंदाचें वर्णन । एक मुखे मी काय करूं ॥ ९६ ॥ ती स्वानंदाची भरारी । नारायण नारायण वैखरी । निरोप घेउनी झडकरी । चालली स्वारी मुनींची ॥ ९७ ॥ आता कळ लाविल्याविना । कार्यसिद्धी होइना । म्हणूनी त्रय-देवांगनांना । जाऊनिया भेटती ॥ ९८ ॥ कळीचे म्हणती नारद । किंचित-काळ वाटतो खेद । परी पुढती ब्रह्मानंद । मिळे सकल जीवांसी ॥ ९९ ॥ याचीं कित्येक उदाहरणें । वाचितां कळतील अठरा पुराणें । नको सांगाया तुम्हा कारणें । अगम्य महिमा नारदांचा ॥ १०० ॥ तेंवि गाइली सतीची महती । कोप वाढविला त्यांचिये चित्तीं । मत्सराची प्रदीप्त ज्योती । भडकूं लागली तेधवा ॥ १ ॥ पती जवळी कागाळी । सांगती फोडूनी आरोळी । म्हणती सत्त्व घ्या या वेळी । जाऊनिया त्या सतीचें ॥ २ ॥ आदिमाया तिघीजणी । सकल ब्रह्मांडाच्या जननी । परी आज अहंकारांनीं । वेढियेले त्याजला ॥ ३ ॥ तिघी देवता या थोर । परी स्त्रीजाती-स्वभावानुसार । आणिले अज्ञान समोर । विकल्पाने झडकरी ॥ ४ ॥ स्त्रियांच्या लागतां पाठी । अनर्थ झाले कोटी कोटी । परी ती माया शेवटीं । गोवुनी मानवा घेतसे ॥ ५ ॥ तैसे त्रय देव गुंतले वचनीं । निघाले आज्ञा घेउनी । निमिषार्धे त्रय देवांनी । यतिरूप घेतलें ॥ ६ ॥ काषाय-वस्त्र परिधान । अगीं विभूती चर्चून । दंड कमंडलू घेऊन । पायीं खडावा शोभती ॥ ७ ॥ गळा रुद्राक्षांच्या माळा । जटा पिंगट शिरीं वळविल्या । एकरूपें देखिल्या । भेद न दिसे तो दुजां ॥८ ॥ यती चालले पवनगती । आश्रमी गिरीनार पर्वतीं । एक्या मुखें पुकारती । अल्लख म्हणूनी

द्वारासा ॥ ९ ॥ कवण ऋतु कबण मास । कवण तिथि कवण समयास । पावले देव आश्रमास । सत्त्व पहावया सतीचें ॥ १० ॥ हेमंत ऋतु मार्गशीर्ष । शुक्ल पक्ष चतुर्दशीस । संध्यासमयीं द्वारास । येउनी यती हे उभे ॥ ११ ॥ ऋषी गंगास्नाना जाती । आश्रमीं एकली असे सती । द्वारीं उभी ही त्रय-मूर्ती । ओळखे चित्तीं कोण ते ॥ १२ ॥ आला क्रोधाग्नी उसळून । म्हणती भिक्षा दे नग्न होऊन । सती होय म्हणून । गेली गृहामाजीं झडकरी ॥ १३ ॥ सामान्य नव्हे ही पतिव्रता । अनुपम तिची तेजस्विता । तेथ पावित्र्याचा सविता । तळपत होता तियेचा ॥ १४ ॥ आठवले पतीचे चरण । सद्भावें केलें वंदन । निघाली वाणी मुखांतून । काय ती परिसावी ॥ १५ ॥ रात्रंदिन पतीचें चरण । हेंच माझे असेल चिंतन । तरी त्रय देव हे माझे नंदन । खेळतां दिसतील ओसरीं ॥ १६ ॥ रामायणीं इंद्रजितासी वधितां । लक्ष्मण चिंतिता झाला आपुल्या व्रता । तेंवि ही सत्यपतिव्रता । पतिनिष्ठ देवता एक असे ॥ १७ ॥ त्या तपाचें लाभलें फळ । झाली त्रयमूर्ती ही बाळं । स्वर्ग मृत्य पाताळ । झाला आनंद त्रिलोका ॥ १८ ॥ तोच हा प्रथमावतार तीन देवांचा साचार । त्रिगुणात्मक त्रिगुणाकार । अनसूये उदरीं जाहला ॥ १९ ॥ तीन शिरें सहा कर । हा जयाचा त्रिगुणी अवतार । सगुण रूपें साचार । जाहला भक्ताकारणें ॥ १२० ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वर । दत्तरूप हा एकचि अवतार । तयासी माझा नमस्कार । वारंवार चरणीं असो ॥ २१ ॥ हें दत्तावतार चरित्र थोर । वर्णिती किती कींवश्वर । तेथ मी मंदमती किंकर । भक्तिभावें कथितसे ॥ २२ ॥ करा एकची जयजयकार । दत्त दत्त अनेकवार । दत्त नाम हें निरंतर । हृदयीं राहो आपुल्या ॥ २३ ॥ या दत्तनामाचा महिमा । अगम्य असे आगमां निगमां । परी माझा एक प्रेमा । दत्त या नामीं सदा वसो ॥ २४ ॥ दत्त आहे गुरुमाउली । दत्त कल्पतरूची सावली । भक्त स्मरतां नामावली । तारक ती सदा पाठीशी ॥ २५ ॥ पितर उद्धाराया प्रती । प्रयत्न केले भगीरथीं । आणिली भूतलीं भागीरथी । ती तारक जाहली सकलांसी ॥ २६ ॥ तेंवि नारदाचे उपकार बहुत । भक्तजन रक्षणार्थ । अवतरले हे श्री गुरुदत्त । जडमूढ तारावयासी ॥ २७ ॥ पुढे पिठापूर पांचा-

दि गं रा दि गं व रा

ळेश्वरीं । आमलराज सुमती सुंदरी । हें दांपत्य आपुले घरीं । आराधना करी श्रीदत्ताची ॥ २८ ॥ पितृतिथी लक्षून । गेले मागावया भिक्षान्न । पदां सुमतीने भक्तिभावें स्मरून । भिक्षा वाढिली यतीशी ॥ २९ ॥ जाहले दत्तात्रेय प्रसन्न । माग म्हणती वरदान । ती वदे आपुल्या सारिखा नंदन । व्हावा ऐसा द्यावा वर ॥ १३० ॥ तथास्तु ऐसें वदोन । चालले भिक्षा घेऊन । पुढती तेराशे वीस इसवी सन । भाद्रपद शुद्ध चतुर्थी ॥ ३१ ॥ या मंगलमय दिनीं । माध्यान्न समयीं श्रीदत्तांनी । घेतला अवतार प्रकटले जनीं । श्रीपाद श्री वल्लभ या नांवें ॥ ३२ ॥ पुढती जपजाप्यासाठी । श्रीपाद बैसती सरिते काठीं । तों जीव द्यावयासाठीं । एक विधवा सती पातली ॥ ३३ ॥ होता सवें नंदन । त्या समवेत द्यावा प्राण । परि दिसले श्रीपाद-दत्त-चरण । शरण ती पदीं गेली असे ॥ ३४ ॥ श्रीपाद तियेसी पुसत । जीवावरी कां जाहलीस त्रस्त । आणिक पुत्रासमवेत । जीव कां देसी आपुला ॥ ३५ ॥ प्रभो माझी करुण कहाणी । जरी घ्याल ऐकोनी । दया उपजेल अन्तःकरणीं । ऐसे मज वाटतें ॥ ३६ ॥ हा एक माझा पुत्र मूर्ख । कांही न त्याला विवेक । निंदिती हासती सकल लोक । कंटाळला जीव तेणें माझा ॥ ३७ ॥ म्हणोनी पुत्रासमवेत । वाटे करावा प्राणघात । तरी पुढील जन्मी मजप्रत । पुत्र व्हावा तुजसारिखा ॥ ३८ ॥ तेजस्वी आणि ज्ञानी । पुत्र व्हावा उत्तम गुणी । ऐसा उपाय मज स्वामींनी । कांही तरी सांगावा ॥ ३९ ॥ ऐकलें बाईचें वचन । सदिच्छा पुढील देखून । काय बोलती दयाघन । श्रीपाद दत्त तेधवां ॥ १४० ॥ बाई आत्म-हत्त्या न करी । शनिप्रदोष व्रत आचरी । हात फिरविला पाठीवरी । पुत्र ज्ञानी तो केला ॥ ४१ ॥ पुढती शनिप्रदोष हें व्रत । भक्तिभावें आचरित । अंतःकरणी ठेविला हेत । दत्तस्वरूपी पुत्राचा ॥ ४२ ॥ पश्चात्तापें जाहली पुनीत । भेटले श्रीपाद श्रीगुरुदत्त । अखंड ध्यास हृदयांत । तेणेंचि अंतकाळीं आश्रय दिला ॥ ४३ ॥ तीच ही अंबाभवानी । माधवविप्राची कामिनी । पवित्र क्षेत्र करंजभुवनीं । नांदती हीं उभयतां ॥ ४४ ॥ पूर्वजन्माचें सुकृत । तिसरा अवतार घेती दत्त । कोणत्या नामें विख्यात । जगामाजीं जाहले ॥ ४५ ॥ इसवी सन तेराशे ऐंशी । अंबा-माधवाचे

कुशीं । आले जगत्कल्याणासी । हे नृसिंहसरस्वती ॥ ४६ ॥ हे नृसिंहसरस्वती । तिजा अवतार झाला जगतीं । माझा प्रणिपात चरणांप्रती । अनन्यभावें सदा असो ॥ ४७ ॥ ऐसे अवतार श्रीगुरुदत्त । किती घेतो अगणित । त्यांचें चरित्र समस्त । न ये वर्णितां मजलागीं ॥ ४८ ॥ तेथे भाव सात्विक । प्रेमाने दत्ता मारिती हाक । तेथे हा त्रिगुणात्मक । अवतार घेतो आवडीं ॥ ४९ ॥ तैसें गुंतलें अंतर । चरित्र वर्णावें सविस्तर । टेंब्ये ब्राह्मण गृहीं हा त्रिभुवनेश्वर । कैसा रमला आनंदें ॥ १५० ॥ त्या चरित्राची संगति । देतील श्रीगुरु माझिये हातीं । सरस्वती रसनेवरती । बैसेल ठाण मांडूनी ॥ ५१ ॥ तेणें पुढती होईल शुभ । मार्ग लाभेल पुढती सुलभ । भक्ति-वेलीचा विस्तार लांब । दृष्टांत-पल्लव अंकुरती ॥ ५२ ॥ आतां पुनरपि प्रार्थना । सकल श्रोतेयां सज्जनां । या प्रथमाध्यायीं एकाग्र मना । श्रवणार्थ आपण करावें ॥ ५३ ॥ नाही भाषा गिर्वाण । नाही पाहिलें व्याकरण । नाही दृष्टान्त शब्दरत्न । अल्पज्ञान हें माझें असे ॥ ५४ ॥ परी अंतरी आहे आवडी । भक्ति रसाच्या भरोनी कावडी । श्रोतेयां द्याव्यात घडी घडी । गोडी आपणा म्हणोनिया ॥ ५५ ॥ तरी आपणा समवेत । मज याचका घ्यावें पंक्तींत । हा पुरवावा माझा हेत । श्री दत्त गुरुमाउली ॥ ५६ ॥ आतां याचना करी पुरती । लेखणी दिली आहेस हातीं । ती कार्यें करील पुरतीं । ऐशी बळकट धरावी ॥ ५७ ॥ कांही न मला फिकीर । भार टाकला तुझ्यावर । हा प्रथमाध्याय साचार । तुझा तूंची करविला ॥ ५८ ॥ या प्रथमाध्यायांत । दत्तपरंपरा जाहली श्रुत । तें दत्त नाम कृपावंत । हृदयकोंदणीं माझ्या वसो ॥ ५९ ॥ श्री दत्तकृपें करून । जाहला प्रथम अध्याय कथन । त्या चरणामृतीं जानकी मीन । अखंड करो मज्जन ॥ १६० ॥ इति श्री-सीतारामचरित्रालंकारमणि । गुंफिला असे दृष्टांतकोंदणीं । प्रकाश दाविता अंतःकरणीं । प्रथम अध्याय गोड हा ॥ १६१ ॥ श्री दत्तात्रेयार्पणमस्तु ॥

प्रथमोऽध्यायः समाप्तः

अध्याय दुसरा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ ॐ नमो जी साक्षात्कारा । ब्रह्मा विष्णू महेश्वरा । त्रय देवांच्या अवतारा । दत्तात्रेया नमोऽस्तु ते ॥ १ ॥ धन्य धन्य उदेला सुदिन । मना आठवले दत्तचरण । ही पूर्वसुकृताची खूण । आज दिसोन येतसे ॥ २ ॥ एकदा हातीं कृपापदर । लागता मग नाही फिकीर । रक्षिते माउली निरंतर । आपुलिया भक्तासी ॥ ३ ॥ बालकाचा अवघड छंद । माता न मानी तयाचा खेद । पुरवितसे त्याचा नाद । आनंद मनीं पावोनिया ॥ ४ ॥ तेंवि अधिकारा वाचून । म्हणे मी करीन ग्रंथलेखन । ती सद्गुरु माउली इच्छा पूर्ण । करील माझी निजांगें ॥ ५ ॥ आतां पाऊल माझें पुढती । पडेल तें ना घे मागुती । अवघड मार्गांतुनी निगुती । काढील श्री दत्तगुरु माउली ॥ ६ ॥ रात्रंदिन लागला ध्यास । लिहावी दत्तभक्तकथा सुरस । तो आपल्याच चरित्रास । लिहवुनी आता घेतसे ॥ ७ ॥ जहालें मागील अध्यायीं कथन । प्रथम दत्तावतार जाहला जाण । दुजा श्रीपाद श्रीवल्लभ होऊन । तिजा । श्री नृसिंह सरस्वती झाला असे ॥ ८ ॥ या भारतांत कलियुगांत । कित्येक झाले साधू संत । कित्येक झाले प्रेमळ भक्त । न गमे परमेश्वरा त्यांवाचुनी ॥ ९ ॥ तेंवि श्रीदत्तात्रेयाची उपासना । चालते कित्येक भक्तसदनां । कोणी धरूनी कामना । स्मरती दत्तमाउलीसी ॥ १० ॥ जैसा भाव वसे चित्तीं । तैसा देव ठाके पुढती । ज्याचे हृदयीं नाही नामवस्ती । तेथे तो श्रीपती दुरावे ॥ ११ ॥ जेथे शुद्ध भावना । सात्विक नांदे सद्वासना । प्रेमाची हाक जातां नारायणा । येई त्या क्षणा लागवेगें ॥ १२ ॥ आतां मूळ चरित्राकारण । अवधान द्यावें आपण । श्रीदत्तात्रेयाची कृपा जाण । कैशी जाहली कवण स्थलीं ॥ १३ ॥ सावंतवाडी कोकणांत । पाहतां सान संस्थानांत । तेथोनी सहा मैलांवरी असत । माणगांव ग्राम नामें असे ॥ १४ ॥ माणगांव हें पाहतां । भोवतीं निसर्गसुंदरता । निर्मळा नामें वाहे सरिता । ग्रामास भूषण जियेचें ॥ १५ ॥ या गंगा नदीचें जळ । धुवोनी

ढाकी सगळा मळ । नामासम ही निर्मळ । सकळांच्या मना करितसे ॥ १६ ॥ पुष्पें वाटिकेमाजी फुलोनी । सुगंध पसरविती मेदिनीं । आपुलें सार्थक घेती करोनी । कोणी ईशचरणीं जाऊनियां ॥ १७ ॥ थोर कवीचे असती बोल । तें न कदा होती फोल । वस्तुमात्रा चढे मोल । योग्य स्थलीं ती जातां ॥ १८ ॥ पाहतां काळा फत्तर । त्याची मूर्ति बनविली सुंदर । हात जोडिती वारंवार । सद्भावना तेथे प्रकटली ॥ १९ ॥ तैशीच मानवाची गत । कोटी जनसंख्या जगांत । त्यांतूनि एखादा भाग्यवंत । शरण जाई प्रभला ॥ २० ॥ तैसा प्रातःकाळीं उठोन । वृक्षावरती द्विजगण । मंजुळ रवें करी स्तवन । आपुलिये स्वभाषें ॥ २१ ॥ ऐशी भूमि निसर्गसुंदरा । लेउनी हरित वर्णी अंबरा । तेथे सुप्रसन्न वारा । वाहे हृदयमंदिरीं ॥ २२ ॥ ऐशा या माणगावांत । एक वसे दांपत्य । नाम पुरुषाचें गणेशपंत । टेंब्ये उपनाम असे ॥ २३ ॥ होता अत्यंत कर्मनिष्ठ । तैसाच मनाचा धर्मिष्ठ । श्री दत्तात्रेयाचा एकनिष्ठ । भक्त होता तो एक ॥ २४ होता वैदिक ब्राह्मण । म्हणोनी करी उपाध्येपण । हेंच उदरंभरणाचें साधन । असे ह्यांचें गृहींचें ॥ २५ ॥ गोत्र तयाचें असे अत्रि । सकल ग्रामासी त्याची मैत्री । हांक देतां दिनरातीं । साह्य जन करिती त्याजला ॥ । २६ । पुढील भविष्य जाणून । पंत हे अत्रि कुलोत्पन्न । गृहीं येणार कैवल्यनिधान । आज नाही या ठाउकें ॥ २७ ॥ तेंवि सदाचारसंपन्न गृहस्थ । ईश्वरी पूर्वसंकेत । अखंड असती चिंतनांत । श्रीदत्तात्रेयनामस्वरूपीं ॥ २८ ॥ वांछा उदेली चित्तांत । कवणासही न कळे मात । गाणगापुरा जाती गणेशपंत । श्रीदत्तात्रेयदर्शना ॥ २९ ॥ कांही दिवस राहून । करावें गुरुचरित्राचें पारायण । माधुकरी मागून । नैवेद्य सेवन करावा ॥ ३० ॥ त्यांसम त्यांची कामिनी । असे अत्यंत सुलक्षणी । नामें रमा म्हणोनी । सहचारिणी तयांची ॥ ३१ ॥ नामासम असे करणी । सदा शुचिर्भूत राहणी । सद्गुणांच्या भूषणांनी । शोभा असे सदनासी ॥ ३२ ॥ यापरि गणेश आणि आणि रमा । ह्यावी लक्ष्मीनारायणाची उपमा । नामासम असे महिमा । कळोनी येईल ग्रंथी पुढें ॥ ३३ ॥ जसा पती तशी पत्नी । दोघांचें लक्ष एकाच चरणी । तेथे संसार एको-

॥ श्री ॥

भगवान् श्रीनृसिंहसरस्वती

। औदुंबरातळवटी नरसिंहयोगी ॥
। कृष्णातटी परम शांत सुखासि भोगी ।
। ध्यानस्थ होऊनि समस्त चरित्र पाहे ।
। अनन्य जो शरण इच्छित देत आहे ।

प्यांनी । निगुतीने होतसे ॥ ३४ ॥ मार्ग चालतां अवघड । वरी गाडा चालावा धडधड । म्हणोनी, दोन्ही चाकें धड । पाहिजेत गाडयाची ॥ ३५ ॥ तेंवी संसाराची वाट । पाहतां असे बिकट । पावलोपावलीं पाहतां कष्ट । दुष्कर चालणें तयावरी ॥ ३६ ॥ पती समान ही रमाबाई । वचनाबाहेर कदा न जाई । पतीसम चिंतनीं राही । सदा श्रीगुरुदत्ताच्या ॥ ३७ ॥ पातिव्रत्याची काय महती । बाणली होती तियेच्या चित्तीं । गृहकृत्यें करी निगुती । कैशापरी पाहतां । ॥ ३८ ॥ प्रातःकाळीं पतीचे आधीं उठोन । करावें सडासंमार्जन । सारवावें तुळशी–वृन्दावन । गोमयें सभोवतें ॥ ३९ ॥ स्वस्तिक आणि गोपद्म । शंखचक्रादिक उत्तम । मध्यभागीं दत्तनाम । रंगवल्ली भवती असे ॥ ४० ॥ फुलें बेल दूर्वा तोडोनी । हार ठेवीतसे गुंफूनी । करोनिया वेणी फणी । मग स्नान उरकीतसे ॥ ४१ ॥ निगा ठेवोनी वृंदावना । तुळशीस घालो जीवना । दाखवील हरिचरणा । ऐशी भावना तियेची ॥ ४२ ॥ तुलसीदल श्रीहरीसी । अर्पितां क्लेश दुरितें नाशी । सेवा करील देई त्यासी । मोक्षपद खचितची ॥ ४३ ॥ तुलसी माते तुला करितां नमन । सकल रोगांचें करिसी निरसन । होतसे तनु पावन । तुझ्या दर्शनमात्रेंची ॥ ४४ ॥ ऐसी तुलसी–पूजा निरंतर । करी, न पडे विसर । आज सात्विक ज्यांचें अंतर । तुळशीस नारी त्या पूजिती ॥ ४५ ॥ तैसी निष्ठा ग्रंथावरी । श्रीगुरुचरित्र ठेवुनी पाटावरी । तुलसीसह प्रदक्षिणा करी । नित्य एक सहस्र ॥ ४६ ॥ पति मनाचा संतोष । भूषणच मानी ती तयास । सदा पाळी कर्तव्यास दक्ष पतिकार्यासी ॥ ४७ ॥ ऐशी असे ही रमा । लाभली गणेशा नरोत्तमा । आर्य संस्कृतीचा महिमा । जागृत होता हृदयस्थलीं ॥ ४८ ॥ प्रातःकाळ माध्यान्ह काळ । धुपारती करी सायंकाळ । ऐशी पूजिते त्रिकाळ । श्रीदत्तचरणांसी ॥ ४९ ॥ असे समर्थांचा श्लोक । जगामाजी कोठे सुख । कोटींतूनहि पाहतां एक । सुखी कोणी दिसेना ॥ ५० ॥ कोठे आहे विपुल धन । परी रोगें ग्रासला पूर्ण । कोणी दरिद्री कर्महीन । क्षुधार्थ हिंडे घरोघरी ॥ ५१ ॥ जेथें संपत्ति विपुल । तेथे नाही एकहि बाळ । जेथे रात्रंदिन चिंता प्रबळ । तेथे कल्लोळ बालकांचा ॥ ५२ ॥ या संसाराची जाळी । अवघी

चिंतेन व्यापिली । ती कवणासी कैसी जाळी । हृदयासी जाउनिया ॥ ५३ ॥ याचा अनुभव जगतासी । नको तो मज सांगावयासी । जो ज्ञानी पोहोचला ब्रह्मपदासी । तोच एक सुखी असे ॥ ५४ ॥ तैशीं गृहस्थाश्रमीं हीं उभयतां । गणेशपंत रमा कान्ता । परि त्या माउलीच्या चित्ता । व्यथा दारुण होतसे ॥ ५५ ॥ दत्तमहिमा गाऊन । करावें लालन पालन । घरीं नाही बाळ सान । म्हणे देवा कर्महीन कां मी ॥ ५६ ॥ ही चित्ताची तळमळ । नेत्रीं वाहते दुःखाश्रुजळ । भिजविते सदा चरणकमळ । श्रीदत्तात्रेय प्रभूचे ॥ ५७ ॥ तुळशीवृन्दावन अंगणीं । पाहिजे वासरू गोठणीं । तैसा बाळ पाळणीं । गृहामाजी पाहिजे ॥ ५८ ॥ आपुल्या गृहींचा वंशदिवा । आपल्या नयनीं पहावा । ऐसें रमामाउलीच्या जिवा । कां न वाटावें ॥ ५९ ॥ नाही केलें दुजें व्रत । नाही पूजिलें दुजें दैवत । नवस सायास मनांत । करावे ऐसेंहि न वाटलें ॥ ६० ॥ मनीची कामना करील पूर्ण । एकची जो दत्त दयाघन । प्रार्थूनियां त्याचे चरण । मागणें मागे तया जवळी ॥ ६१ ॥ बुद्धीचा दाता भगवंत । प्रेरणा करी हृदयांत । गाणगापुरीं गणेशपंत । एकदा जावया निघाले ॥ ६२ ॥ किती एक वेळा गाणगापुरीं । झाली पतीची असे वारी । परी नव्हती अंतरीं । इच्छा वैखरीं वदावी ॥ ६३ ॥ रमा मानसीं करीं तळमळ । परी गणेशपंत मनीं निर्मल । अंगीं विरक्तता बळ । असे अती वाढलेलें ॥ ६४ ॥ स्वाभाविक दत्तभक्ति । जडली होती पदीं प्रीति । पोटीं नव्हती संतती । परि कांही न वाटे मानसीं ॥ ६५ ॥ चालले पति गाणगापूर भवनीं । इच्छा उदेली तिचिये मनीं । दाखवावी वदोनी । मनीची कामना ये समयी ॥ ६६ ॥ म्हणे माझ्या चित्ताची तळमळ । जाणतसा आपण सकळ । तरी माझ्यास्तव एक वेळ । ही वारी करावी दत्ताची ॥ ६७ ॥ पुत्र इच्छा धरून । प्रार्थावा तो त्रिवदन । वर्षेल तो कृपाघन । आपणावरी खचितची ॥ ६८ ॥ आसवें आणूनी नयनीं । नमन करी पतिचिये चरणी । म्हणे खेळावा बाळ सदनी । प्रार्थना करावी दत्तात्रेया ॥ ६९ ॥ दत्तासमान नंदन । मज व्हावा ज्ञानसंपन्न । भरेल कीर्तीने त्रिभुवन । जगदोद्धार करील जो ॥ ७० ॥ पत्नीचे बोल ऐकोनी । पंत संतोषले मनीं । चालले निरोप घेउनी । गाणगापुरासी तेधवां ॥ ७१ ॥

मुक्काम मुक्काम साधून । गाणगापुरीं पोहोचले जाऊन । आधीं वंदिला दयाघन । श्रीदत्तात्रेय प्रेम-भावें ॥ ७२ ॥ नित्य नियम गाणगापुरी । चालला असे कैशा परी । खरे प्रेम अंतरीं । दिसेल आपणांसी पाहतां ॥ ७३ ॥ ब्राह्मी मुहूर्ती उठोनी । आधीं भूवंदन करोनी । श्रीदत्त स्मरण करोनी मनी । प्रातर्विधी सारावा ॥ ७४ ॥ भीमा-अमरजा-संगमीं स्नान । मंत्रोक्तीनें करून । मग संध्या-वंदन । गायत्री जप करावा ॥ ७५ ॥ अर्घ्य देऊनी भास्करा । घालावें सूर्य नमस्कारा । मग यावें मंदिरा । श्रीच्या दर्शना कारणें ॥ ७६ ॥ श्रीदत्तात्रेय नृसिंह सरस्वती । ह्याच नामाची मंत्रोक्ति । अखंड रसनेवरी खेळती । नामामृत हे चाखिता ॥ ७७ ॥ निर्गुण पादुकांचे दर्शन । घेउनी करावें पूजन । गुरुचरणांचे तीर्थ प्राशन । करावें अत्यादराने ॥ ७८ ॥ मग आपुला मनोदय निवेदन । करावा श्रीगुरुचरण आठवून । पुत्रकामना तत्सिध्यर्थ म्हणून । गुरुचरित्रपारायणें करावीं ॥ ७९ ॥ नित्य पाहतां माध्यान्ह काळा । श्रीनैवेद्याच्या वेळा । शंख वाजवुनिया सकळां । पुजारी जाणीव करितसे ॥ ८० ॥ तो निनाद ऐकोनी कानीं । उठती नमस्कार करुनी । हातीं झोळी घेऊनी । जाती माधुकरी मागावया ॥ ८१ ॥ माधुकरीचें पवित्र अन्न । नैवेद्य करावा समर्पण । गुरुप्रसाद सेवन । असेल तेवढाची करावा ॥ ८२ ॥ एका जलावाचून । दुजें कांही न करावें सेवन । सायंकाळपर्यंत जाण । मंदिरांतची असावें ॥ ८३ ॥ पाळावें सदा मौन । परि नव्हे तें व्रत जाण । समयोचित भाषण । सत्य मधुर करावें ॥ ८४ ॥ प्रदक्षिणेसहित आरती । प्रार्थना करूनी शेजारती । तीर्थ अंगारा घेउनी जाती । पंत आपुल्या स्थानाप्रती ॥ ८५ ॥ अन्य विचारा नाही स्थान । एक श्रीगुरूचें चिंतन । हृदयामाजी साठवून । सुखें निद्रा करावी ॥ ८६ ॥ ऐसा परमेश्वरा कारण । सत्कर्मीं जाय सकल दिन । इकडे माणगावीं जाण । रमाबाई काय करी ॥ ८७ ॥ पतीने मांडिली आराधना । करिती गुरुचरित्र पारायणा । तेणें पूर्ण होईल कामना । पूर्ण भरवसा मानसीं ॥ ८८ ॥ नित्य नियमांत ना चुकूर । नाही कधी सोडिलें घर । नाही पाहिल शेजार । नाही गेली माहेरीं ॥ ८९ ॥ निद्रा आणि आलस्य । ह्यांचा न केला सहवास ।

रात्रंदिन एक ध्यास । होता श्रीगुरुचरणांचा ॥ ९० ॥ करूनी देवदेवतार्चन । नैवेद्य करी समर्पण । एकेचि समयीं भोजन । रमाबाईहि करीतसे ॥ ९१ ॥ गुरुकृपा झाल्यावर । वांझेस पान्हा येणार । वृद्धा साठी उलटल्यावर । पुत्रवती होतसे ॥ ९२ ॥ कोरड्या काष्ठा पालवी येऊन । रसाळ फळें चाखिती जन । कोरड्या काळया खडकांतून । निर्मळ पाणी वाहतसे ॥ ९३ ॥ गुरुचरित्र-पारायण । केले एकचित्तें श्रवण । गुरुकृपेचा महिमा पूर्ण । साठविला होता हृदयस्थलीं ॥ ९४ ॥ ऐसा तो दयाघन । वर्षेल कृपा जीवन । हाच निश्चय मानसीं पूर्ण । ठेविला होता तियेने ॥ ९५ ॥ तेंवि सद्गुरूचा प्रसाद घेऊनी । पती येतील आपुले सदनीं । हीच आशा ठेवोनी । रमा वाट पाहतसे ॥ ९६ ॥ इकडे गाणगापुरीं गणेशपंत । वाचितां श्रीगुरुचरित्र ग्रंथ । तन्मयता बाणली हृदयांत । खिळली दृष्टि त्यावरी ॥ ९७ ॥ भक्तवत्सल भक्ताभिमानी । करी आपुल्या ब्रीदाची राखणी । दुःखद गर्भवास सोसुनी । आले अनसूयेचे उदरासी ॥ ९८ ॥ जेथे एकनिष्ठा एकभक्ति । तेथेच भुलतो श्रीपती । करितो कामना पुरती । आपुलिये भक्ताची ॥ ९९ ॥ निरुपम औदार्य भक्ति-प्रेमा । याची न ये वर्णितां सीमा । राजा सुमति अंबा माधवोत्तमा । दाविला महिमा निजांगें । ॥ १०० ॥ तरी कळोन आलें मननांतीं । श्रीगुरूची अनन्य भक्ति । करितां होय निश्चिती । देतील भेटी आपणां ॥ १ ॥ नवविधा भक्तींतून । दुजी भक्ति कीर्तन । आपोआप होय श्रवण । दुजी भक्ति आचरितां ॥ २ ॥ करितां कीर्तन आणि श्रवण । वश होतील भगवान । म्हणोनी दीर्घ प्रयत्न । गणेशाने मांडिला ॥ ३ ॥ पुढती श्रवण आणि पादसेवन । अर्चन आणि वंदन । दास्य सख्य आत्मनिवेदन । या भक्तीने करितसे ॥ ४ ॥ मिळे माधुकरीचें अन्न । अर्धेहि पोट न भरे जाण । नित्य घडतें उपोषण । कष्ट होतातीं जीवासी ॥ ५ ॥ जो दोन समयीं सुग्रास अन्न । तृप्तीवरी करी भोजन । तो नित्य करी उपोषण । श्रीगुरु-भक्तीस्तव ॥ ६ ॥ पिटिला साधुसंतांनी । कित्येक पुराणिकांनी । डांगोरा तो त्रिभुवनीं । भक्तिमार्ग हा सोपा असे ॥ ७ ॥ हे बोल बोलतां सोपे जाण । परि आचरिता अत्यंत कठिण । ती सुळावरील

पोळी सेवून । पचवितां भाली पाहिजे ॥ ८ ॥ एका विप्राची कहाणी । अत्यंत क्रोधी होता मनीं । घडीघडी क्रुद्ध वचनीं । पत्नीप्रती बोलतसे ॥ ९ ॥ म्हणे मी जाईन विपिनीं । वसेन संन्यास घेउनी । तेणें चिंता जाळी मनीं । पत्नी कृश जाहला ॥११०॥ तों एके दिनीं अवचित । द्वारी पातले एक संत । मनींची व्यथा भार्या कथित । पाय धरूनी तयांचे ॥ ११ ॥ संत वदती तियेसी । बाई भिऊं नको तूं मानसीं । पुनरपि पति वदतां तुजसी । उत्तर त्यासी देइजे ॥ १२ ॥ ती खूणगाठ बांधिली मनीं । पती क्रोधावला दुजे दिनीं । म्हणे जातो निघोनी । संन्यास घ्यावया कारणें ॥ १३ ॥ पत्नी निर्भय मानसीं । वदे काय तयासी । म्हणे अवश्य जावें अरण्यासी । संन्यास घ्यावा स्वेच्छेने ॥ १४ ॥ अग्नीवरी पडतां घृत । त्याचा भडका होय त्वरित । तेंवि क्रोधाग्नि उसळत । वचन कांतेचें ऐकोनियां ॥ १५ ॥ शब्दलाखोली वाहोनी । तडक निघाला गृहांतुनी ग्रामाबाहेर जाऊनी । मारुतीच्या मंदिरीं बैसला ॥ १६ ॥ भूवरी रात्रीं पहुडला । परि निद्रा न ये तयाला । पोटामध्ये गलबला । चालला असे अन्नाविण ॥ १७ ॥ नाही केलें संध्यास्नान । नाही घेतलें मारुतीचें दर्शन । एक लागलें असे ध्यान । अन्न पाहिजे पोटाला ॥ १८ ॥ एका दिवसाचें उपोषण । करितां वाटे जातो प्राण । पूर्ण होवोनी निरभिमान । गृहासी गेला विप्र तो ॥ १९ ॥ तैसा नव्हे हा गणेशभक्त । कोरडे बोल ना मुखांत । भक्तीचा झरा वाहत । हृदया-मध्ये दयाच्या ॥१२०॥ जेथे गुंतला असे जीव । तेथे कशाची ना जाणीव । एक इच्छा देवाधि-देव । श्रीगुरु मज भेटावे ॥ २१ ॥ दुष्ट बुद्धीचा विस्तार । माजला असे दुराचार । जो पतित दारुण साचार । तो कलि भूवरी पातला ॥ २२ ॥ त्याची भीष्मप्रतिज्ञा थोर । पुण्यात्म्याचेंहि अंतर । विकल्पें शिरूनी खरोखर । बुद्धिभ्रम तया करावा ॥ २३ ॥ परमेष्ठीचे मानससुत । निर्मिले प्रजापालनार्थ । तैसे इंद्रादि देव समस्त । आज्ञेनुसार वागती ॥ २४ ॥ दुर्बुद्धीचा विस्तार । कलिमाजी वाढला थोर । पतिव्रता न दिसे समोर । होती अत्याचार तिजवरी ॥ २५ ॥ दुर्वासनेने गाठला ठाव । हृदयीचा हरविला भगवद्भाव । भूतदयेचा अभाव । सर्वाभूतीं

जाहला ॥ २६ ॥ ऐशिया कलीच्या दोषाने समस्त । जन जाहले भवरोगग्रस्त । ना होती ते दुःखमुक्त । देवादिकांकडूनहि ॥ २७ ॥ असे गीतेची उक्ती । धर्म जातां अधोगतीं । घेतो अवतार जगजेठी । आपुल्या भक्तां कारणें ॥२८॥ सत्य-संकल्प-ब्रीदावळी । दुरावेना ती कदाकाळीं । दया-सागर हृदयस्थलीं । अखंड असे भरलेला ॥ २९ ॥ दीन जनांचे पालन । करीं बांधिलें कंकण । म्हणूनी हा दत्त दयाघन । कलीमाजी अवतरला ॥ १३० ॥ असे अत्यंत दुराचारी । कसाहि असो अनधिकारी । अनन्यभावें अंतरी । करील जरी स्मरण प्रभूचें ॥ ३१ ॥ तरी सकल संकटांपासून । करील तयाचें निवारण । ऐसा तो दयाघन उदार एकची जाहला ॥ ३२ ॥ तेथे स्वाभाविक जडली प्रीती । अहोरात्र करी भक्ति । दत्तनामाविण उक्ति । दुजी नसे मुखांत ॥ ३३ ॥ पुत्र नाही आपणासी । हें स्मरण नाही तयासी । त्याची तळमळ मानसीं । भार्येच्या असे लागलेली ॥ ३४ ॥ पत्नीचा निरोप घेऊन । जरी मांडिलें अनुष्ठान । निर्हेतुक जाहलें मन । भक्त गणेशपंताचें ॥ ३५ ॥ श्रवण आणि कीर्तन । झाले कष्ट उपोषण । एक माधुकरी प्रसाद ग्रहण । भक्त निष्ठें हा करितसे ॥ ३६ ॥ चित्ताची जाहली शुद्धता । मावळली प्रपंच-अशुद्धता । पुत्रदारा धनेषणा चित्ता । कांहीच नाही राहिली ॥ ३७ ॥ निष्काम चालली उपासना । तीव्र वैराग्य आलें मना । प्रपंच सुखाची वासना । गेली मावळूनी तयाची ॥ ३८ ॥ गृहसौख्याची आस अंतरी । धरोनो स्मरती श्रीहरी । तेथे अशुद्ध चित्ताची भरारी । दूरवरी जात असे ॥ ३९ ॥ सर्व-आशा-विरहित । जाहलें गणेशपंताचें चित्त । संन्यासबीज जें वैराग्य येथ । हृदयीं उत्पन्न जाहलें ॥ १४० ॥ उडाली सकल आसक्ति । निमाली सकल भ्रांती । निष्काम जाहली अवघी वृत्ति । वैराग्य प्रबळ वाढलें ॥ ४१ ॥ नाही उरली मना आस । आतां न करणें सायास । घ्यावा आपण संन्यास । ऐसा निश्चय झालासे ॥ ४२ ॥ आलों कवण काजास्तव । ह्याची न उरली जाणीव । चिदानंदमय जाहला जीव । ह्या गणेशपंत भक्ताचा ॥ ४३ ॥ आतां पुढील अध्यायीं कथन । कृपा करील दत्त दयाघन । रमा गणेश भक्ता कारण । अत्यानंदें

करोनिया ॥ ४४ ॥ तरी प्रभो दत्तात्रेया । दयासागरा करुणालया । तुझें नाम माझ्या हृदया । अखंडित असावें ॥ ४५ ॥ श्री दत्तात्रेय कृपे करून । वैखरीस ये भाग्य पूर्ण । त्या चरणामृतीं जानकी-मीन । सदा राहो पोहती ॥ ४६ ॥ इति श्रीसीतारामचरित्रालंकारमणि । गुंफिला असे दृष्टांतकोंदणीं । प्रकाश दाविता अंतःकरणीं । द्वितीय अध्याय गोड हा ॥ १४७ ॥

॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

द्वितीयोऽध्यायः समाप्तः



अध्याय तिसरा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ ॐ नमो रुक्मिणीरमणा ॥ अनंत भक्तांच्या भूषणा । झालासी होणार दयाघना । अनंतकाळ पर्यंत ॥ १ ॥ अनंत भक्तांच्या यातना । दूर करिसी तूं नारायणा । अनंत भक्तांच्या कामना । क्षणामाजीं पुरविसी ॥ २ ॥ अनंत भक्तांच्या कार्याकारणीं । सदा जागा तूं चक्रपाणी । अनंत पाहसी लोचनांनी । अनंत कानीं ऐकसी ॥ ३ ॥ हाक येईल आसनीं । हाक येईल भोजनीं । सुखें निद्रा करितां शयनीं । हाक तुज ये भक्ताची ॥ ४ ॥ निद्रा ना तुझ्या नेत्रांसी । ताटावरूनी उठसी उपवासी । दयासागरा त्वरें जासी । रक्षिसी भक्तांतें निश्चित ॥ ५ ॥ तुज काय पाहिजे पांडुरंगा । हृदयामाजी रसाळ गाभा । भक्तिचा पाहिजे अभंगा । श्रीरंगा तूं तेथे उभा ॥ ६ ॥ शरण जो आला तुझ्या द्वारीं । त्यासी न लोटीसी दुरी । घेसी आपुलिये मंदिरीं । कृपाकर देऊनिया ॥ ७ ॥ तरी मी याचक द्वारांत । पुरविसी सदया माझा हेत । दिधलें कार्य जें हातांत । पूर्ण कराया ये झडकरी ॥ ८ ॥ तूंची ब्रह्मा तूंची हर । तूंचि देवा मुरलीधर । तूंचि त्रयमूर्तीचा अवतार । श्री दत्तात्रेया नमोऽस्तु ते ॥ ९ ॥ मागील कथानुसंधान । गणेशभक्त गाणगापुरीं जाऊन । पुत्र कामना धरून । करी पारायणें गुरुचरित्राची ॥ १० ॥ कामना धरूनी चित्तीं । बैसला अनुष्ठाना प्रती । परी निष्काम जाहली वृत्ती । वैराग्य उत्पन्न जाहलें ॥ ११ ॥ कशासी ना उरली आस । दृढ निश्चयार्थ बांधिली कास । तयार जाहले घेण्यास । चतुर्थाश्रम संन्यास तो ॥ १२ ॥ दऊत आणि लेखणी । घेतली गणेशपंतांनी आपुला हेत प्रकट करोनी । कागदावरी मांडिला । १३ ॥ कवण विचार न ये सामोरी । निर्विकल्प होती अंतरीं । मानस कळविला पत्रद्वारीं । आपुलिये कांतेसी ॥ १४ ॥ पूर्व कर्माची जोड अंगीं । घेऊनी मानव येतो जगीं । तत्समान सुख-दुःख-भोगी । परी हे तयासी न कळे ॥ १५ ॥ अंतकाळीं नसतां सावधान । वदनीं नाम ये नारायण । जन्माचा पापी जाय

उद्धरून । अजामिळ पाहतां ॥ १६ ॥ अंतकाळीं ठेविला हेत । सुपुत्र मजसी व्हावे दत्त । तेच श्री नृसिंहसरस्वती येत ॥ करंजपुरीं अंबाकुशीं ॥ १७ ॥ दुष्कर्म अथवा सत्कर्म करितां । तेथे आसक्ती ठेवितां । त्याची करावी लागे पूर्तता । पुढिलिये जन्मासी ॥१८॥ चौर्यकर्माची आवडी । त्याची तृतीय वर्षींच दृष्टी वाकडी । शेवटीं हातींपायीं बेडी । जखडुनी प्राणी पडतसे ॥ १९ ॥ ऐसे पाहतां दुराचारी । अनेक या कलिमाझारीं । गणितां लक्ष लक्षांतरी । सद्भक्त निघे एखादा ॥ २० ॥ कोणा जगताचे नाही भान । असती स्वात्मरूपीं तल्लीन । श्रीपदाचो ओळखण । घेती करोनी निजांगें ॥ २१ ॥ जे आपणासी तारून । इतरांसी तारिती जाण । ते ईश्वरी अवतार पूर्ण । जाहले या जगामाजीं ॥ २२ ॥ तेंवि हे गणेशभक्त । मनीं असती विरक्त । तरी ईश्वरी संकेत । वेगळाची असे ॥ २३ ॥ पत्रद्वारें मानस । कळविला असे कांतेस । सुखें निद्रा आली त्यास । श्रीदत्तस्मरण करूनिया ॥ २४ ॥ इकडे माणगावीं रमाबाई । नित्य नियमां न चुके काही। द्विगुणित निष्ठा पायीं । श्रीगुरुदत्ताच्या जडली असे ॥ २५ ॥ बहुत दिवस झाले जाउनी । पती येतील केव्हा सदनीं । वाट पाहे दिवस रजनी । रमाबाई गृहासी ॥ २६ ॥ करी सांज सकाळ प्रार्थना । म्हणे दत्ता दयाघना । झडकरी धाडी पती सदना । आशीर्वाद देऊनिया ॥ २७ ॥ परी पाहता आजचे दिनीं । निद्रा न आली तिला शयनीं । उजवा नयन क्षणोक्षणीं । फडफड सारिखा करितसे ॥ २८ ॥ नित्यनियमें प्रातःकाळीं । उठोनी गेली प्रभूजवळी । म्हणें देवा सांभाळी । दूर असती माझे पती ॥ २९ ॥ मना लागली हुरहुर । गृहांत घाली येरझार । परी बैखरी निरंतर । दत्त नाम घे सारखें ॥ ३० ॥ घाली तुळसी वृन्दावना । गुरुचरित्रासहित प्रदक्षिणा । तरी स्वस्थता न ये मना । क्षण एकही तियेला । ३१ ॥ गोग्रास ठेविला वाढून । नैवेद्य केला समर्पण । दोन घास घेऊन । तुलसीदल भक्षिले ॥ ३२ ॥ अवचित आली ओसरी-वरी । तों टपालवाला सामोरीं । पत्र टाकियलें द्वारीं । उचलोनी झडकरी घेतसे ॥ ३३ ॥ पाहिलें पतीचें हस्ताक्षर । परी भयें व्यापिलें अंतर । हातपाय थरथर । कापूं लागले सतीचे

॥ ३४ ॥ दत्तात्रेया करोनी वंदन । पत्र वाचितां आलें कळोन । आमुचा निश्चय जाहला पूर्ण । चतुर्थाश्रमीं रमावें ॥ ३५ ॥ आम्हां न उरली आस । आतां करावा योगाभ्यास । घेऊनिया संन्यास । उपाधीरहित असावें ॥ ३६ ॥ ऐसे पत्र वाचताक्षणीं । तत्काळ पडली असे धरणीं । काय अवस्था जाहली मनीं । सतीची पतिवियोगें ॥ ३७ ॥ पडली धरणीवरी विकल । कोणी नसे तिचे जवळ । परी अंतरीं श्रीदत्तकृपेचें बळ । उठोनिया बसली असे ॥ ३८ ॥ आता दत्तात्रेया जगजेठी । कां करिसी मजला कष्टी । तुझ्या ब्रीदावळीची गाठी । काय सुटली दया ॥ ३९ ॥ वाटे कामधेनु घेऊनी । पती येतील आता सदनीं । तरी माझ्या दुर्दैवेंकरूनी । वेळ कैसी साधली ॥ ४० ॥ हातीं तुझा दृष्टांतकलश । घेऊन येतील गृहास । ते कैसे घ्यावया संन्यास । पती तयार जाहले ॥ ४१ ॥ पुत्रकामना धरून मनीं । गेले दत्तात्रेया तुझ्या भवनीं । हें ठाउकें तुज लागुनी । नाही का भक्तवत्सला ॥ ४२ ॥ मी पुत्रार्थी होऊन । पाठविलें पतीसी येथून । काय बाह्यात्कारी होकार देऊन । गेले मशीं कळेना ॥ ४३ ॥ कां पारायणाआधी संकल्प । सोडण्यासी करीं घेती आप । काय माझें आडवें पाप । येउनी पुढे पडलें असे ॥ करींचे उदक पडतां धरणीं । काय निघाली वदनांतुनी । संन्यास घ्यावा हीच वाणी । काय इच्छा प्रकटली ॥ ४५ ॥ हा पुरविण्यावयाचा हेत । काय तूं दिलासी दृष्टान्त । परी मजकडे किंचित । कृपेची दृष्टी कां न ये ॥ ४६ ॥ का दृष्टान्तावाचून विराग । घेती करोनी माझा त्याग । तरी ऐसा अपराध सांग । घडला असे कोणता ॥ ४७ ॥ विचार करतां न ये मनीं । न ये विकल्प कधीं स्वप्नीं । कधी उग्रता पतीनी । दाविली नाही मजलागी ॥ ४८ ॥ नाही अपराध घडला मजकडूनी । नाही दुरुत्तरें आलीं वदनीं । एक लक्ष पतीचे चरणीं । होतें, न गेले कुणीकडे ॥ ४९ ॥ बहुत वर्षाचा सहवास । कधी न देखिला असंतोष । होते दोघांचे मानस । तुझ्या चितनीं सारखें ॥ ५० ॥ ऐसा असतां एक जोड । प्रभो कां केलासी बिघाड । पुत्र देता घबाड । तुझे काय जात होतें ॥ ५१ ॥

धरोनी पुत्रकामना। घातल्या चरित्रा प्रदक्षणा । त्या कां न आल्या तुझ्या मना । सांग जनार्दना । मजलागी ॥ ५२ ॥ अश्रुधारा नेत्रीं स्रवती । पार्थिव लिंगासी स्नान घालिती । दुःखित जाहली रमा सती । चिंता जाळी ते मानसी ॥ ५३ ॥ परी समय येतां कठिण । आठवावा नारायण । हें तुकारामाचें वचन । आठविले तियेनें ॥ ५४ ॥ हे भक्तकामकल्पतरु । सांग प्रभो मी काय करूं । तुजविण मजला कोण तारूं । ह्या कठिण समयासी ॥ ५५ ॥ भक्तवत्सला भक्तसखा । पहिल्या परिस अधिक देखा । करुणस्वरें भक्तपालका । साध्वी हाका मारितसे ॥ ५६ ॥ तूं सर्वज्ञ सर्वसाक्षी । सकळ चित्ता परीक्षी । ऐसे कासया उपेक्षी । न कळे मजसी दयाळा ॥ ५७ ॥ जेथें तुझें नामस्मरण । जेथें तुझे गुणगायन । जेथें गुरुचरित्राचें पारायण । तेथे तूं भक्तवत्सला नांदसी ॥ ५८ ॥ तूं शरणागतांचा तारिता । हरिसी सकल संकट व्यथा । मग आज काय विसरता । होसी आपुल्या ब्रीदावळीसी ॥ ५९ ॥ आता भार टाकला तुझ्या वरुता । त्याची सकल तुला चिंता । गृहासी आणी प्राणनाथा । अशक्य कांही तुज नसे ॥ ६० ॥ प्रवृत्त झाले संन्यास घ्यावया । परि तूं दाखवी आपुली माया । आपल्या गृहासी यावया । बोधी दयाळा त्यांजला ॥ ६१ ॥ याचें एक उदाहरण । ठाउके ना तुज कारण । करी मानसीं आठवण । तुझी ती लीला असे ॥ ६२ ॥ जहाले त्रय देवासमान । निवृत्ति ज्ञानदेव सोपान । मुक्ता ही चतुर्थ रत्न । जयाचे उदरीं जन्मली ॥ ६३ ॥ ते विठ्ठलपंत कुळकर्णी । बैसले संन्यास घेउनी निरंजनी । त्यांसी बोधामृत पाजोनी । आणिले परत गृहस्थाश्रमासी ॥ ६४ ॥ तरी प्रभो जगज्जीवना । पतीने आणिले असे मना । परी न केले संन्यास ग्रहणा । तरी झडकरी बोधावें ॥ ६५ ॥ आता माझें कल्याण । अथवा करणें अकल्याण । हें तुझ्याची स्वाधीन । दयानिधे दत्तात्रेया ॥ ६६ ॥ धन्य धन्य रमा साध्वी । किती शांतता जिवा ठेवी । कवणासही ना मात कळवी । पती संन्यास घेताती ॥ ६७ ॥ नित्य सांज सकाळ । नामस्मरणीं घालवी काळ । तो काय दीनदयाळ । जवळी नव्हता सतीच्या ॥ ६८ ॥ पाहतां परीक्षेविना ।

सोनें कसासी उतरेना । तैंवी भक्ताच्या अंतःकरणा । कसाला परमात्मा लावीतसे ॥ ६९ ॥ दिसतां
क्किल्पाचा डाग । तेथुनी दुरावे श्रीरंग । ते बहुरुप्याचें सोंग । पाहाता ना देव भुलतसे ॥ ७० ॥
गोमुखीं माळ हातांत । लक्ष दाही दिशा फिरत । क्रोधें डोळे फिरवीत । आल्या गेल्यावरी पै ॥७१॥
डोई वाढविल्या जटा । अंगी लाविला भस्मपट्टा । करी वैराग्याची थट्टा । काम चित्तीं ठेवूनी ॥७२॥
त्याहुनी स्त्रीजाती सोज्वळ । पाहिजे हृदयी निर्मळ । तेथे पातिव्रत्याचें बळ । शुद्ध नांदते पाहिजे
॥ ७३ ॥ अनसुयेची जैसी भक्ती । तैशीच अंबाभवानी सुमती । तत्समान रमा असे ती । भार्या
गणेशपंताची ॥ ७४ ॥ ऐसी ती कुलतारिणी । पतिव्रता विवेकाची खनी । तिच्या शोकावेगा
पाहुनी । दया उपजली दत्तात्रेया ॥ ७५ ॥ पतिपत्नींची आराधना । पावली सकल नारायणा ।
चालले द्यावया दर्शना । यतिरूपें सतीला ॥ ७६ ॥ नामस्मरण करोनी । पहुडली असे रमा शयनीं ।
दत्त दत्त मुखीं वाणी । डोळा किंचित लागला असे ॥ ७७ ॥ पायीं खडावा वाजती । दंड कमंडलु
घेतला हातीं । शिरीं जटाभार घेती । आवळोनी नेटका ॥ ७८ ॥ विभूती चर्चिली सर्वांगाला ।
गळा रुद्राक्षांच्या माळा । काषाय वस्त्र नेसला । यती उभा तो सामोरी ॥ ७९ ॥ तेजस्वी कांती
लखलखीत । प्रकाश पडला सदनांत । उचंबळला हृदयांत । आनंद तिच्या मावेना ॥ ८० ॥
देखिली दत्तात्रेयमूर्ति । अष्ट सात्त्विकभाव हृदयीं उमटती । नम्रभावें चरणावरती । सती मस्तक
ठेवीतसे ॥ ८१ ॥ हृदय आले गहिवरून । शब्द नये मुखातून । झाले देव प्रसन्न । सतीलागी सांगतीं
॥ ८२ ॥ तदा वदती दयाघन । गणेशभार्ये तुझे व्रतधारण । पावलें तें मजकारण । तेणे संतुष्ट
मी जाहलों ॥ ८३ ॥ असो तुझें कल्याण । मनःकामना होईल पूर्ण । तुज द्यावयासी वरदान । आज
प्रगट जाहलों ॥ ८४ ॥ जो हृदयींच्या अविद्या वासना । ज्ञानखड्गें करील छेदना । तो मी प्रसन्न
जाहलों वरदाना । द्यावया तुजला ये समयीं ॥ ८५ ॥ जैसा कौसल्येचा राम । भक्तकामकल्पद्रुम ।
होईल पुत्र तैसा उत्तम । रमा माउलिये तुजलागी ॥ ८६ ॥ भावार्थ होता मानसीं । मीच येतों
तुझ्या कुशीं । हे चतुर रमा निश्चयेसी । समजली असे तेधवा ॥ ८७ ॥ प्रकटेल कीर्ति जगांत ।

पुरवील जनांचे मनोरथ । मज प्रिय जो का दत्तभक्त । ऐसेच आपणा म्हणवील ॥ ८८ ॥ आज भाग्योदयें करोन । उदेला प्रभो सुदिन । दाविलेस तुझे चरण । तेणें कृतार्थ मी जाहलें ॥ ८९ ॥ अश्रु वाहती लोचनीं । वदे हस्तद्वय जोडोनी । म्हणे प्रभो तूं अंतर्ज्ञानी । काय म्यां तुजसी बदावें ॥ ९० ॥ दिधलेसी पुत्रवरदाना । इच्छित पुरविलीसी कामना । परि मानसीं विवंचना । ती त्वां दूर करावी ॥ ९१ ॥ पतीने कळविला आपुला हेत । संन्यास घ्यावयाचा जाहला बेत । तरी पालट करावा बुद्धींत । पति गृहासी पाठवावे ॥ ९२ ॥ वर दिधलासी मजप्रती । तो असत्य न होय कल्पांतीं । तरी सदनीं त्वरितगति । पति येवोत तव कृपें ॥ ९३ ॥ तथास्तु ऐसे वदोन । देव पावले अंतर्धान । रमाबाई स्वानंदमग्न । विचार करती जाहली ॥ ९४ ॥ चिंता जाळीतसे मनीं । चिंता पसरली असे सदनीं । तो अकस्मात चिंतामणी । गृहामाजी प्रकटला ॥ ९५ ॥ आवळू पाहे काळपाश । प्राण होती कासावीस । तो अकस्मात कलश । अमृताचा सापडला ॥ ९६ ॥ तेवी रमाबाई चिंताग्रस्त । पतिवियोग न साहवे हृदयांत । तों कामधेनु श्रीगुरुदत्त । आले गृहासी धाऊनिया ॥ ९७ ॥ मिळाला प्रभूचा आशीर्वाद । मावळला त्या क्षणींच खेद । खेळो लागला आनंद । वाट पाहे पतीची ॥ ९८ ॥ इकडे माणगावासीं येऊन । करिती मातेचें समाधान । पुढती न लागता एक क्षण । गाणगापुरासी पातले ॥ ९९ ॥ दुजा भक्त जो गणेश । घेईन म्हणे संन्यास । करूनिया निश्चयास । निद्रिस्त असे जाहला ॥ १०० ॥ सुषुप्तीमाजी स्वप्नांत । उभे पुढती श्रीगुरुदत्त । जैसे पत्नीपुढती मूर्तिमंत । यतिरूपे पातले ॥ १ ॥ दिसे दंडकमंडलुधारी । भस्मभूषित शरीरीं । काषायांबर परिधान करी । श्रीदत्तात्रय देखिले ॥ २ ॥ मंदस्मित शुभवदन । प्रसन्न व्हावया वरदान । कृपादृष्टि उघडून । पाहती वाटे आपणाकडे ॥ ३ ॥ ऐसी ही दिव्य कांती । समोर उभी सद्गुरुमूर्ति । भगवद्दर्शनें सकल वृत्ती । आनंदित जाहली ॥ ४ ॥ बहुजन्मार्जित पूर्वजांची । पुण्याई उदेली

आज साची । ह्मणोनी श्रीगुरुचरणाची । भेट मशी जाहली ॥ ५ ॥ आज जाहलो मी कृतार्थ । डोळे भरून पाहिले श्रीगुरुनाथ । पुरतील माझे मनोरथ । या दत्तमूर्तीच्या दर्शनें ॥ ६ ॥ आनंद दाटला अंतःकरणीं । प्रेमाश्रु वाहती लोचनीं । चरणकमलीं जाउनी । मस्तक असें ठेविलें ॥ ७ ॥ भगवान वदती तयासी । उठ वत्सा वेगेसी । ह्मणोनी स्वकरें तयासीं । उठविती तेधवा ॥ ८ ॥ भक्तवर्या तूं एकनामा । गाऊनिया उत्तमा । हृदयीं ठेवुनी चरित्र–महिमा । श्रवण संपुटीं साठविला ॥ ९ ॥ निष्काम आणि निश्चळ । हृदयीं भाव असे अढळ । ऐसे भक्त दुर्मिळ । शोधितांहि मिळती ना ॥ ११० ॥ कुणी मागती संपत्ती । कुणी मागती संतती । नाना कामना आसक्ती । ठेवूनिया करिती भक्ति ॥ ११ ॥ ऐसे कामिक भक्त । दिसोन येती असंख्यात । तयांचे पुरवितो मनोरथ । क्षण एक न लागतां ॥ १२ ॥ परी जेथे निष्काम शुद्ध प्रेम । एसा भक्त जो अनुपम । तो आमुचे पुरवील काम । ऐसेचि मज वाटतें ॥ १३ ॥ मी शुद्ध भावाचा भुकेला । हीच क्षुधा लागते मला । जेथे शुद्ध भक्तीचा जिव्हाळा । तेथे मी संतुष्ट सदा असे ॥ १४ ॥ तुझी भक्ति निर्हेतुक । केवळ मजप्रीत्यर्थ देख । शुद्ध आणि सात्विक । नसे आणिक भाव दुजा ॥ १५ ॥ पंचपक्वान्नाचें भोजन । वरी तांबुल भक्षण । तेणें जैसी तृप्ती जाण । मानवाची होतसे ॥ १६ ॥ तेवी निजानंदाचें भोजन । करण्या मज परमेश्वरा कारण । शुद्ध भक्ति प्रेम करितां अर्पण । परम तृप्ती होतसे ॥ १७ ॥ हा स्वसंवेद्य आमुचा अनुभव । तैसाचि मानवी स्वभाव । निरपेक्ष प्रेमाची जाणीव । तोही शोधूनी पाहातसे ॥ १८ ॥ आतां गणेशा तुज प्रसन्न । झालों ऐक माझे वचन । स्वहिता घेई करोन । सांगतो ऐक तुजप्रति ॥ १९ ॥ तूं भार्येच्या विनंतीवरून । आलासि पुत्रेच्छा मनी धरून । मांडिलेंसि प्रेमे अनुष्ठान । केलीस तशीं पारायणें ॥१२०॥ जाहलीं उपोषणें, जाहले श्रम । तुझी निःसीम भक्ति प्रेम । परी घेऊं म्हणसी चतुर्थाश्रम । हें न रुचे आम्हांसी ॥ २१ ॥ तुझ्या कांते लागून । आम्हीं दिधले इष्ट वरदान । तें आमुचें वचन ।

कदा न होय माघारें ॥ २२ ॥ तरी स्वसदनीं जाऊन । गृहस्थाश्रम स्वीकारून । भार्येसह सुखी राहून । भक्तिमार्ग स्वीकारावा ॥ २३ ॥ कर्मयोगी करी ईश्वराधना । शुद्ध ठेवुनी आचरणा । ते संन्यासयोगियाचें समान जाणा । फळ भोगितां निश्चयें ॥ २४ ॥ गीता ग्रंथीं वदती भगवान । जे सांख्ययोगी मिळविती स्थान । फलदृष्टया असे समान । संन्यास अथवा कर्मयोग ॥ २५ ॥ बाह्यात्कारी कर्मयोगी । परी अविद्येसह देहबुद्धि त्यागी । कमल पत्रासम शुद्ध अंतरंगीं । तो संन्यासयोगी पूर्ण असे ॥ २६ ॥ तरी प्रपंची असावें सावधान । परमार्थ लाभ घ्यावा करून । आमुचा आशीर्वाद पूर्ण । आहे गणेशा तुजलागीं ॥२७॥ ऐसे वदोनी किंचित । स्तब्ध जाहले श्रीगुरुदत्त । जाहले भक्ताचे अंकित । पाहती मानस तयाचे ॥ २८ ॥ काय दत्ताज्ञा उल्लंघून । जाणार हा का भक्त जाण । वदे हस्त जोडून । संमुख उभा राहूनिया ॥ २९ ॥ प्रभो आपुली अघटित घटना । न कळे मानवा दयाघना । प्रकाशित जाहली नयना । आपुलिये कृपेने ॥ १३० ॥ त्वा वृद्धवंध्या नारीस । कन्यापुत्र दिलेस । तेवी वंध्यामहिषीदोहनास । करोनिया दाविलें ॥ ३१ ॥ त्या वाळल्या किडेल्या झाडासी । पानें फुलें आणिसी । मधुर फळें जनासी । देसी चाखाया कारणें ॥ ३२ ॥ कित्येक निर्जीव शरीरान्तरीं । चेतना भरूनियां स्वकरीं । तयां उठविलेंस तूं झडकरी । भक्तवत्सल तूं खरा ॥ ३३ ॥ ऐसा तूं सद्गुरु । तुझा महिमा अपरंपारु । तूं द्वारींचा कल्पतरु । इच्छिलें फळ देतोसी ॥३४॥ तुझा जाणावया महिमा । असमर्थ मी पुरुषोत्तमा । तुझ्या चरित्राची सीमा । न ये गाठिता मजलागीं ॥ ३५ ॥ उत्पत्ति आपत्ति । विकृति आणि संकृति । कर्मवृक्षावरी येती । हीं चार प्रकारची फळें ॥ ३६ ॥ परी त्याहूनि विलक्षण । बिजातीय बीज तूं आणून । त्याचा ज्ञानवृक्ष होऊन । मोक्षाख्य फळें येतील त्या ॥ ३७ ॥ असे आपुली कृपादृष्टि । आशीर्वाद देता त्या पाठी । मग कांही न कमती सृष्टी । सत्य सत्य ही वाचा ॥ ३८ ॥ तुझ्या कृपाकटाक्षे

करुन । हा दुःखमय प्रपंच असोन । होईल ब्रह्मानंद युक्त जाण । यांत संशय असेना ॥ ३९ ॥ मज नको प्रभो मोक्ष । लागला असे मनीं ध्यास । अंतरतील ह्या दासास । चरण हे या जाता गृहासी ॥ १४० ॥ म्हणोनी घ्यावा चतुर्थाश्रम । तेणें होईल नित्य समागम । तुझ्या सगुण मूर्तीवरी प्रेम । स्थिरावेल येथेचि ॥ ४१ ॥ मज धाडुनी दूर देशी । मनाची इच्छा राहील तैशी । तुझ्या त्रिकाळ दर्शनासी । येऊं कैसा तेथून मी ॥ ४२ ॥ एवढी मला चिंता । ती दूर करावी श्रीगुरुदत्ता । तुझ्या इच्छेविरहित जगन्नाथा । पान न हाले वृक्षाचें ॥ ४३ ॥ अंतःकरणीं उत्कट भक्ति । वैराग्य किंवा ज्ञानोत्पत्ती । सदैव चरणीं जडेल प्रीती । हे तो शक्ति तुझीच असे ॥ ४४ ॥ तरी मज आज्ञा प्रमाण । गृहस्थाश्रम मी स्वीकारीन । परी अंतरूं नयेत तुझे चरण । वियोग मज ना साहवेल ॥४५॥ इतुकें बोलोनी गणेश भक्त । राहिला असे निवांत । परी व्याकुळता हृदयांत । दिसोनी भगवंता येतसे ॥४६॥ जैसा पतिव्रतेला स्वभर्ता । तैसा भगवंत असे भक्ता । त्या चरणासी अंतरतां । व्यथा दारुण होतसे ॥ ४७ ॥ ऐसा देव–भक्तांचा संवाद । चालतां देवासी हो आनंद । न दिसे तेथे भेद । झालीं एक मनें दोघांचीं ॥ ४८ ॥ आतां सर्वस्वी माझा हेत । पुरविणार तूं दयाळ दत्त । तुझें ब्रीद करी सत्य । तया न भुले दयाळा ॥ ४९ ॥ ऐसी देव–भक्तांची बहु गोडी । देव भजनीं घाली उडी । जनाबाईचीं धुवी लुगडीं । घेई गोधडी अंगावरी ॥ १५० ॥ तेवी ह्या दांपत्यअंकावरी । खेळावें प्रभु विचार करी । म्हणोनिया मधुरोत्तरीं । काय वदती गणेशा ॥ ५१ ॥ जैसा रमा साध्वीस वर देऊन । भगवंत झाले वचनाधीन । मज सारखा पुत्र होऊन । हेतू पूर्ण करीत तुझा ॥ ५२ ॥ मज सारखा देव ह्मणती । ह्मणजे देव नाहीत निश्चिती । ऐशी भ्रमिली किंचित मती । जाणिले हे प्रभूंनी ॥ ५३ ॥ मज सारिखा मीच आहे । ह्या जगतीं दुजा नोहे । अवतार घेउनी येत आहे । तुमचे उदरीं भूतला ॥ ५४ ॥ भक्त वदे तूं देवाधिदेव । जैसा भोळा महादेव । एक्या बिल्वपत्रें पूजितां सर्व । भक्ताकारणें देतसे ॥ ५५ ॥ तैशी माझी अल्पभक्ति ।

उदार तुह्मी त्रिभुवनपति । आत्मदान दिलेत मजप्रति । उतराई मी काय होऊं ॥ ५६ ॥ कांही नद्यांचें उथळ पाणी । उष्णकाळ येतां जाय आटुनी । परि गंगा संथ वाहिनी । शिवस्मरणीं सादर ॥ ५७ ॥ तेंवी माझी भक्ती उथळ । झरा लागूं दे हृदयीं निर्मळ । संथ वाहूं दे सर्व काळ । चरण सागरा मिळावया ॥५८॥ हीच माझी प्रार्थना । अत्रि-अनसूयेच्या नंदना । तेवी राजा सुमती नंदना । तया कसोटीस लावियले ॥ ५९ ॥ दिधलेसी वरदान । गृहा येणारे हे त्रिभुवन निधान । रमा-गणेश कसा लाऊन । त्यांची परीक्षा पाहूं नको ॥ १६० ॥ त्यामध्ये न झालों उत्तीर्ण । तरी होईल कठिण जीवन । भावी जनकत्वाचें वरदान । स्वप्नवत् होईल ना ॥ ६१ ॥ मग प्रपंच ना परमार्थ । होईल कैशी आमुची गत । काय मग दिवाभीत । होउनी आह्मी राहावे ॥ ६२ ॥ देव वदती हासोनी । भिऊं नकोस भक्ता मनी । आह्मी प्राचीन काळीं जाउनी । सत्त्वपरीक्षा घेतली असे ॥ ६३ ॥ तरी अंबा-माधवाची । या आमुच्या मातापित्यांची । निःसीम भक्ति पाहोनी त्यांची । अवतार घेतला मी तेथे सुखे ॥ ६४ ॥ परीक्षा घ्यावया कारण । आधीं कठोर करावें लागतें मन । कठोरता दिधली सोडून । मृदुलता हृदयी धरली असे ॥ ६५ ॥ तरी हे भक्ता गणेशा । तुला देऊं सुख सहवासा । पूर्ण करूं मनीषा । उदरीं तुझ्या येऊनी ॥ ६६ ॥ करीन स्वधर्माचें पालन । जगदोद्धार करीन । भक्तांचें संरक्षण । दुष्ट दानवांपासोनी ॥ ६७ ॥ आतां सोडी सकल भय । होई मानसीं निर्भय । आता सुखें गृहा जाय । आज्ञा आमुची मानुनिया ॥ ६८ ॥ झणी भक्ताच्या मस्तकावर । ठेविला आपुला कृपाकर । पाहतां पाहतां समोर । देव अदृश्य जाहले ॥ ६९ ॥ धन्य धन्य गणेश-रमा । त्यांचा अनुपम दत्तप्रेमा । स्वानंदें येतील दत्त धामा । नव अवतार घेऊनी ॥१७०॥ सकल शंकांचें निरसन । झाले देव-भक्तांचें भाषण । हा संवाद ऐकतां मन । तल्लीन होउनी जातसे ॥ ७१ ॥ एकदा दृष्टांत झालियावरी । न राहावें गाणगापुरी । या नियमानुसारी । करिती तयारी पंत ते ॥७२॥ पंत नंतर दुसरे दिनी । यथाशक्ति द्रव्य वेचुनी । करिती सांगता अनुष्ठानीं । उपाध्याया-

करवीं तदा ॥ ७३ ॥ निर्गुण पादुकांची पूजा आरती । नैवेद्य तयां समर्पिती । विप्रसतर्पण करिती । आशीर्वाद घेती तयांचा ॥ ७४ ॥ जाहला दत्तात्रेयाचा दृष्टांत । तो पूज्य जनासी सांगत । लोचनीं प्रेमाश्रू वाहात । सांगतांना तयांचिया ॥ ७५ ॥ तो आनंद न माय हृदयांत । न ये जनांसी करितां व्यक्त । म्हणोनी साष्टांग प्रणीपात । भूमिवरी घातला ॥ ७६ ॥ प्रेमभाव आवरूनी । उठोनी बसती हस्त जोडोनी । कृतज्ञतापूर्वक वदती वाणी । म्हणे दत्त दयाघना ॥ ७७ ॥ नामधारक वदे ग्रंथा । त्याची केलीस सफलता । ऐसा तूं अनुपम उदार दाता । ऋण वंशोवंशीं न फिटे हें ॥ ७८ ॥ नमस्ते नमस्ते म्हणोन । त्रिवार घाली लोटांगण । कंठ सारखा ये भरोन । निरोप घेतां प्रभूचा ॥ ७९ ॥ नित्य पूजनाकारण । रौप्य पादुका घेतल्या करून । निर्गुण पादुकांना स्पर्श करोन । मस्तकासी लाविल्या ॥ १८० ॥ घेतला पुजाऱ्यापासून । शेष प्रसाद मागून । तो प्रथम सेवून । मग भोजन करितसे ॥ ८१ ॥ तांबूल आणि दक्षणा । दिघली असे ब्राह्मणा । आदरें करोनि वंदना । निरोप तयांचा घेतला ॥ ८२ ॥ ऐसे देवब्राह्मणा करोनी संतुष्ट । निघाला हा भक्त श्रेष्ठ । प्रभुविरहाने कंठ । भरोन येई सारखा ॥ ८३ ॥ कन्या चालली सासरीं । मायबाप सोडुनी दुरी । सारखी पाहे माघारी । तीच परी येथे जाहली ॥ ८४ ॥ ग्रामसीमेपर्यंत । जड पाउलें पडतीं मार्गांत । मागुती वळोनिया पाहात । श्रीदत्तात्रेय-मंदिर ॥ ८५ ॥ सावंतवाडीचा मार्ग पुढती । सोलापूर पंढरपुरा जाती । पांडुरंग तो रुक्मिणी-पति । सद्भावेशीं पूजिला ॥ ८६ ॥ पुढे चालले आवडी । देखिली नरसोबाची वाडी । स्नान करून कृष्णेथडी । दर्शन प्रभूचें घेतलें ॥ ८७ ॥ तेथुनी जाती कोल्हापुरा । महालक्ष्मीच्या मंदिरा । घालुनी साष्टांग नमस्कारा । स्तुतिस्तोत्रें गाइलीं ॥ ८८ ॥ मग आजरें ग्रामावरून । सावंतवाडीस येवोन । स्वगृहाचा मार्ग धरून । माणगावीं पोहोचले ॥ ८९ ॥ महासाध्वी सौभाग्यवती । कधी येतील गृहासी पति । वाट पाहे दिनराती । रमाबाई सारखी ॥ १९० ॥

संशयित होतें मन । तो उदेला सुदिन । विकल्प गेला निघोन । पति सदनीं येताचि ॥ ९१ ॥ जाहल्या दृष्टांताची मात । एकमेकांप्रति वदत । आनंद न माय हृदयांत । श्रीदत्तकृपेचा ॥९२॥ आता पुढील अध्यायांत । गर्भवासा येतील श्रीगुरुदत्त । तें ऐकतां कथामृत । श्रवण तृप्त होतील ॥ ९३ ॥ ह्या तिसऱ्या अध्यायीं कथन । गुरुमाउली होऊनि प्रसन्न । पुत्रवरदान देऊन । रमा मातोश्री तोषविली ॥ ९४ ॥ तैसे गणेशभक्ता बोधून । तयाचें मन वळविलें पूर्ण । मनकामना पुरवून । गृहाप्रति धाडिले ॥ ९५ ॥ आता नमो नमो श्रीगुरुमूर्ति । जडो चरणीं माझी मती । तुझें आसन ह्या हृदयावरतीं । चिरकाल प्रभो असो दे ॥ ९६ ॥ अगाध परमेश्वरी सत्ता । त्याचा तोचि होय वदविता । निमित्तमात्र जानकीहाता । धरी श्रीगुरुदत्त माउली ॥ ९७ ॥ इति श्रीसीताराम-चरित्रालंकारमणी । गुंफिला असे दृष्टांत कोंदणी । प्रकाश दाविता अंतःकरणीं । तृतीय अध्याय गोड हा ॥ १९८ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

तृतीयोऽध्यायः समाप्तः



अध्याय चौथा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ ॐ नमोजी श्रीगुरुदत्ता । अत्रि-अनसूयेच्या सुता । त्रिभुवनामाजीं सत्ता । तुमची असे दयाळा ॥ १ ॥ जळीं स्थळी काष्ठीं पाषाणीं । रिता ठाव ना तुज वाचोनी । ऐसें असतां चक्रपाणी । मज नयनीं कां न दिससी तूं ॥ २ ॥ याचें काय कारण । नाही वैराग्य भक्ति ज्ञान । चौफेर पसरलें अज्ञान । किती एक जन्मांतरीचें ॥ ३ ॥ लक्ष चौऱ्याऐंशी योनी हा फिरला जीव । नाही जाहला तया आठव । आता जन्म हा मानव । मिळाला असे तव कृपें ॥ ४ ॥ तरी हा जन्म वाया । नको जाऊं देऊं श्रीगुरुराया । तुझ्या कृपेची सदैव छाया । हृदयावरी या असो दे ॥ ५ ॥ तेणें नाम येईल वदनीं । मूर्ति मनोहर दिसेल नयनीं । ऐकतां कीर्तन श्रवणीं । लागेल वळण इंद्रियां ॥ ६ ॥ आज असे हें चंचळ मन । स्थिरावे कोठें न एकही क्षण । मग तारक जे तुझे चरण । दिसतील कैसे दयाळा ॥ ७ ॥ तरी द्वयक्षरी 'दत्त' हा मंत्र । वैखरीं राहावा अहोरात्र । चरण-कमलींचें पुण्यक्षेत्र । नाम एकची दाखवील ॥ ८ ॥ तरी न व्हावें विस्मरण । श्रीदत्तनामीं रंगूं दे मन । कराया चतुर्थाध्यायाचें कथन । दत्तात्रेया तूं येशी ॥ ९ ॥ तुझें अनुपम चरित्र । तारक समर्थ पवित्र । म्हणोनि मी नसता पात्र । मम करीं धरियलें निश्चित ॥ १० ॥ तुझा कृपेचा वरद कर । लाविल्याविण पूर्ण ना होणार । आता राहूं नको दूर । तुझी लीला वदवी तूं ॥ ११ ॥ जरी माझे बोबडे बोल । वरी कृपाछत्राचें तुझें पाल । जनां वाटतील ते ते अमोल । पावन करतील ते सकळिकां ॥ १२ ॥ पहा मागील अध्यायांत । प्रसन्न झाले श्रीगुरुदत्त । रमा-गणेश-भक्तां प्रत । वरदान देते जाहले ॥ १३ ॥ प्रेमळ निष्ठा सात्विक भक्ति-। उभयतां दोघें एक्या मतीं । श्रीदत्तात्रेया पूजिती । भेद न दिसे तिळभरी ॥ १४ ॥ रमा अर्धांगी गणेशाची । ती एका न जन्माची । अनेक जन्मांच्या पुण्याईची । होती नांदती भूवरी ॥ १५ ॥

षड्रिपु हे तस्कर । न येति कदापि समोर । पाहोनियां शुद्धांतर । भयें जाती माघारें ॥ १६ ॥ उभयतांच्या हृदयीं पुण्यसंचय । तेणें जाहले निर्भय । वरी श्रीगुरुकृपेचें वलय । सदैव असे पसरलेलें ॥ १७ ॥ म्हणोनीच ही त्रय-मूर्ती । प्रसन्न जाहली दोघांप्रती । जो अमोल वर देती । तेणें सुरगण संतुष्ट जाहले ॥ १८ ॥ तो भीमा-अमरजा-संगम-विहारी । ब्रह्मा-विष्णु-त्रिपुरारि । तो दत्तात्रेय भक्तकैवारी । वरदान काय देतसे ॥ १९ ॥ भक्तीने प्रभु आपुला केला । म्हणती मीच येतो पुत्रत्वाला । गणेश-रमा-दंपतीला । सुख द्यावयाकारणें ॥ २० ॥ संतुष्ट जाहलें अंतःकरण । दत्ताज्ञा प्रमाण मानून । गृहस्थाश्रम स्वीकारून । कर्मयोग आरंभिला ॥ २१ ॥ फलाची आशा धरून । श्रुती-स्मृतीतें स्मरून । पुराणोक्तीतें जाणून । कर्मयोगी तो राहतसे ॥ २२ ॥ तीच फलेच्छा सोडून । सकल कर्में ईश्वरार्पण । करी ईश्वराराधन । तो निष्काम योगी जाणावा ॥ २३ ॥ ऐसा आचरे जो भक्तियोग । जयाचे अंतःकरण सुभग । भूतदया आणि विराग । सद्गुण उदित होती तिथे ॥ २४ ॥ ऐसे निःसीम जे प्रेमळ भक्त । तयांचे पुरवी मनोरथ । तयां इच्छेनुसार भगवंत । आपुल्या स्वरूपीं मिळवितसे ॥ २५ ॥ म्हणोनी संत मागती वरदान । प्रभो तुझें नित्य स्मरण । आवडीने गुणगान । सदैव तुझें बदावें ॥ २६ ॥ मज मोक्ष भोग नको देवा । संतसंग मज मिळावा । गर्भवास तोही द्यावा । नारायणा मज सुखें ॥ २७ ॥ सगुण भक्ति करूनी । गाणगापुरासी जाऊनी । केली ही च मागणी । गणेश-भटजींनी प्रभूसी ॥ २८ ॥ आले गाणगापुराहुनी । माणगावासी परतुनी । ती भगवन्मूर्ति नयनीं । सानंदें भरोनी आणिली असे ॥ २९ ॥ श्रीगुरूच्या पादुकांना । घालुनी पंचामृतस्नाना । नित्य करोनी पूजना । आराधना करिताती ॥ ३० ॥ मग कीर्तन-भक्ति जी कां श्रवण । करिती गुरुचरित्रवाचन । अनेकदा करिती पारायण । अति आवडी तयांमाजी ॥ ३१ ॥ जैसा थोर हिरा कोंदणा । जडवितां शोभतो दागिना । तेंवि ठेविला अंतःकरणा । हिरा ग्रंथराज हा ॥ ३२ ॥

ही सद्गुरूचीं वाङ्मयमूर्ति । कामधेनू करी कामना पुरती । हीच भावमा तिये ग्रंथीं । अनन्य भक्ति मनीं वसे ॥ ३३ ॥ ग्रंथार्थीं सिद्ध सांगती । नामधारकासी महती । ही कामधेनू दुभती । ग्रंथराज ग्रहासी ॥ ३४ ॥ सेवील जो नर अनन्य होउनी । सदैव निधि राहील सदनीं । ग्रंथ हा दत्तात्रेय म्हणोनी । मोक्ष उभा द्वारासी ॥ ३५ ॥ त्रयतापांसी निवारिता । चारी पुरुषार्थांचा दाता । कलियुगीं हा एकचि त्राता । श्रीगुरुचरित्र ग्रंथ हा ॥ ३६ ॥ ऐशापरी गाऊनी कबना । करिती सगुण किर्तना । रंजविती आपुल्या मना । आणि जनांना इतरही ॥ ३७ ॥ घडतीं कर्मे दिनरातीं । तीं ईश्वरार्पण सर्व होतीं । नाही राहिली आसक्ति । मानसीं गणेशपंतांच्या ॥ ३८ ॥ हा गणेश भक्तोत्तम । तेंवि रमा वधूत्तम । दांपत्य सद्गुणांचें धाम । पांगुळे वाचा वर्णितां ॥ ३९ ॥ गृहस्थाश्रमीं धर्माचरणा । गुरुचरित्रा घाली प्रदक्षिणा । मानसीं सद्गुरूची आराधना । पतिशुश्रूषा करितसे ॥ ४० ॥ सकल करी जें गृहकृत्य । तें समस्त ईश्वराप्रीत्यर्थ । हीच भावना मनांत । होती सदैव तियेच्या ॥ ४१ ॥ ऐशी चालली कालक्रमणा । करितां दत्त--उपासना । हीं उभयतां दिसती नयनां । जनांचिये ॥ कैशापरी ॥ ४२ ॥ कुलगुरु जे अत्रिमुनी । अनसूया तयांची पत्नी । पुनरपि काय प्रकटली अवनीं । ऐसेंच भासे सकलांसी ॥ ४३ ॥ गणेशपंतांसी तेंवि रमेला । तळमळ लागली जिवाला । देती प्रभु दृष्टांताला । तो कधी सफल होईल ॥ ४४ ॥ ऐशा व्याकुळ पाहतां जिवा । आला पुनः प्राणविसावा । दृष्टांत द्यावयासी बरवा । पुनः रमा-सतीसी ॥ ४५ ॥ जें प्रथम जाहलें दर्शन । तेंच यतिरूप पाहती नयन । देखतां जाहली आनंदघन । नमन करी आदरें ॥ ४६ ॥ त्वां मत्प्राप्तीकारण । केलेंस माते सगुण भजन । तेणें मी प्रसन्न । पुनरपि तुजवरी जाहलों ॥ ४६ अ ॥ आतां न कांही करी चिंता । तुज पुत्र होईल संतोषदाता । मत्प्रिय आणि प्रबोधकर्ता । तारिता हो जनांसी ॥ ४७ ॥ मागल्या भेटीं जे बोलती । तीच वरदानवचनोक्ति । स्वानंदे दत्तमूर्ति । निवेदती सतीला ॥ ४८ ॥ होतां गुरुराजदर्शन

संतुष्ट होई सतीचें मन । क्षणांत होती अंतर्धान । भक्तकैवारी गुरुराज ॥ ४९ ॥ प्रेमाश्रु नयनीं पाझरती । तों जागृत जाहले दिसती पती । स्वानंदें होय सांगती । म्हणे नाथ हो ऐकावें ॥ ५० ॥ लागला असे मनास । ज्याचा रात्रंदिवस ध्यास । तो दर्शन द्यावयास । कनवाळू आज पातला ॥ ५१ ॥ भक्तवत्सल श्रीहरि । कमंडलु घेतला करीं । काषाय वस्त्र परिधान करी । शोभली छाटी प्रभूसी ॥ ५२ ॥ रुद्राक्षमाळा घातल्या कंठीं । जटाजूट शोभे मस्तकप्रांतीं । सर्वांगीं चर्चिली भस्म-उटी । ऐसा जोगी मी पाहिला ॥ ५३ ॥ पायीं शोभती खडावा । ज्या तारक जडजीवा । जेथे देव-भक्तांचा थवा । जातो त्रिकाळ दर्शना ॥ ५४ ॥ तो दीनदयाळ दयाघन । वदतसे मजलागून । शुभांगे होईल तव कल्याण । आशीर्वाद हा माझा ॥ ५५ ॥ तुळशीस घातलें जीवना । गुरुचरित्रासी घातल्या प्रदक्षिणा । केलेंस भक्तिने नामःस्मरणा । तोषविलेंसी तूं आम्हा ॥ ५६ ॥ पुत्र होईल सद्गुणग्राम । भक्तकामकल्पद्रुम । ज्ञानघन मजसम । सत्य जाण गुणसरिते ॥ ५७ ॥ तूझा पुत्र दयाखनि । कीर्ति होईल त्रिभुवनीं । होईल सत्य-भाषणी । धन्य माता तूं तयाची ॥ ५८ ॥ पत्नीचे बोलीं ऐकूनी । पंत आनंदले मनीं । आपुला दृष्टांत तिजलागुनी । स्वानंदें पुनरपि सांगती ॥ ५९ ॥ जेंवि भक्तहृदयीं निर्मळ । प्रभुभेटीची लागे तळमळ । तैसीच परमेश्वरा कळकळ । भक्ताची असे लागली ॥ ६० ॥ माया-लाघवी दयाघन । म्हणोनीच पुनरपि येऊन । दिले असे दर्शन । भावी मातापित्यांसी ॥ ६१ ॥ मजसारखा नंदन । होईल माते तुज जाण । याचा मथितार्थ पूर्ण । आपणां समजला पाहिजे ॥ ६२ ॥ तुलनात्मक वस्तू अनेक । तरी सूर्य न लपवूं शके कोणी एक । आकाशासारखें आकाश देख । उपमा न साहे कवणाची ॥ ६३ ॥ तेंवि सत्यज्ञानानंद आत्मा । सर्व जगाचा परमात्मा । तुलनार्थ त्याची उपमा । कवणासही न साहे ॥ ६४ ॥ म्हणोनी प्रभू बोलती । माझ्या सम मीच म्हणती । स्वांशासह पुत्र होती । साध्वी रमामाउलीचे ॥ ६५ ॥ चंद्र आणि दुर्वास । हे

प्रभूचे असती अंश । त्या समवेत श्रीनिवास । गर्भालयीं संचरला ॥ ६६ ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वर । त्रय देवांचा अवतार । तो दत्तात्रेय परमेश्वर । कलियुगामाजीं अवतरला ॥ ६७ ॥ त्याचे जे असती स्वांश । तेच चंद्र आणि दुर्वास । हे तीन पुत्र रमा माउलीस । यथानुक्रमें जाहले ॥ ६८ ॥ वर्षवर्षान्तराने जनन । बालकांचें जाहलें जाण । परि तयांचें जन्मकथन । एकाच अध्यायीं वर्णीतसे ॥ ६९ ॥ याचें एकच कारण । ज्याची जन्मलीला गहन । ती प्रथमच उकलून । दाविली असे तयाने ॥ ७० ॥ बालकें जीं होतीं तीन । त्यांचीं नामें ठेविलीं कथून । वासुदेव, हरि जाण । तिजा सीताराम असे ॥ ७१ ॥ प्रथम कळवुनी ठेविलीं । नामें जीं कां आपुलीं । तीं जातील समजलीं । कारणांसह श्रोतेयां ॥ ७२ ॥ काय अयोनिसंभव । जन्म हा घेई नव । परि सकळ लाघव । चरित्रकौतुक दावाबया ॥ ७३ ॥ कौसल्या आणि देवकी पुढे । अष्ट वरुषांचें सगुण रुपडें । तयीं तयांचें होतसे मन वेडें । म्हणती बाळ होईं तूं आमुचा ॥ ७४ ॥ पातिव्रत्याचें सामर्थ्य । खेळती बालकें पुढ्यांत । परि तें न आवडे चित्तांत । सती अनसूयेला ॥ ७५ ॥ तियेने करितां विनवणी । प्रभूने उदरीं येऊनी । नव मास सोडूनी । नव दिन गर्भवासा राहिले ॥ ७६ ॥ उदरीं जन्म घेतल्याविना । मातृपितृभाव उमटेना । पुत्रवात्सल्यें संतोष मना । साच तेथेच होतसे ॥ ७७ ॥ एवं तो चिदानंद घन । पूर्ण ब्रह्म निरंजन । चारी वेद शिणले गातां जयाचे गुण । गर्भवासी तो जाहला ॥ ७८ ॥ मातेची असे काय महती । सकल देवादिक जाणती । मात्राज्ञा न उल्लंघिती । त्रिकाळ वंदिती चरणांसी ॥ ७९ ॥ याचें पाहतां उदाहरण । विकल जाऊं पाहती प्राण । तरी तो बाळ श्रावण । मातेसी जीवन द्या म्हणतसे ॥ ८० ॥ तैसा सेवा करी पुंडलीक । त्याचें पाहूनिया कौतुक । वीट फेकल्यावरी देख । वैकुंठनाथ उभा असे ॥ ८१ ॥ म्हणूनी माय हें नातें पवित्र । इतर नात्यांशी ना जुळत । भाऊ बहिणी सकल आप्त । एकीकडेच राहती ॥ ८२ ॥ ह्या माया बाजारांत । सकल मिळेल चीजवस्त । सकळ मिळेल मणगोत । परि कोठे माता मिळे ना ॥ ८३ ॥ मातेचें नातें निर्मळ ।



प. पू. श्री नृसिंहसरस्वती दीक्षित स्वामी



प. पू. श्री वासुदेवानंदसरस्वती टेंब्ये स्वामी



श्री ब्र. यो. सीताराम महाराज टेंब्ये

परि मिळणें तें दुर्मिळ । ऐशी वत्सल माता प्रेमळ । पाहिली असे भगवंतें ॥ ८४ ॥ भगवंत आला गर्भवासा । सदनीं प्रकाशल्या दाही दिशा । रमा–गणेशाची मनीषा । पूर्ण असे जाहली ॥ ८५ ॥ आधीच सौंदर्यशालिनी जाया । वरी पडली गर्भच्छाया । शेजारच्या आया बाया । उमजल्या असती मानसीं ॥ ८६ ॥ कौतुकें तियेला वदती । सखे फळा आली तुझी दत्तभक्ति । प्रसन्न झाली श्रीगुरुमूर्ति । आस तुझी पुरविली ॥ ८७ ॥ झळके अंगीं दिव्य कांती । क्षणेंक मुखाकडे पाहती । तों प्रत्यक्ष श्रीदत्तमूर्ति । सती देखती सर्वांगें ॥ ८८ ॥ आपोआप जोडिती हात । वारंवार करिती प्रणिपात । म्हणती उदरीं येतो भगवंत । श्रीदत्तात्रेय तुझ्या गे ॥ ८९ ॥ लिंबलोण उतरूनी । दृष्ट काढिती ओवाळुनी । तैसेंच दर्शन प्रतिदिनीं । येउनी घेती सतीचें ॥९०॥ सतीला लागती डोहाळे । पुरवील कोण सोहळे । उदरीं ब्रह्मांड सावळें । साठविलें जियेच्या ॥ ९१ ॥ हें काय गणेशपंता ना ठाऊक । तथापि भुलला सकळिक । माया दावी कौतुक । अज्ञान पडदा समोरी ॥ ९२ ॥ ज्याने स्वानंदरसाचा पेला । सदैव असे वदनीं लाविला । तो काय क्षुद्र कामनेला । मनीं वागवेल कदापि ॥ ९३ ॥ जें परब्रह्म केवळ । होणार रमा माऊलीचें बाळ । तैं डोहाळे सोज्वळ । कैशा रीतीं पाहावे ॥ ९४ ॥ सप्रेम गणेशपंत भार्येप्रती । डोहाळे पुसावया जाती । तों तिची उक्ती । काय निघे मुखांतुनी ॥ ९५ कोण रमा ही गर्भवती । मी परब्रह्म श्रेष्ठगति । सच्चिदानंदमय मूर्ति । विश्वंभर मी एक असे ॥ ९६ ॥ करीन साधुसंतांचें रक्षण । दुष्टांचें करीन दंडन । अनाथांचें करीन तेंवि पालन । त्राता त्रिभुवनाचा मी असे ॥ ९७ ॥ स्वधर्मातें वाढवीन । निज भजनीं मी लावीन । ऐसें ऐकतांची भाषण । गणेशपंत दचकले ॥ ९८ ॥ सामान्य स्त्रीजातीहून । आवडी ये वेगळी दिसोन । दृष्टांताची आठवण । कांही न राही त्यांजला ॥ ९९ ॥ असंभवना, विपरीत भावना । विसरी संशयभावना । ह्या ज्ञानप्रतिबंधक भावना । चित्तामाजीं प्रकटती ॥ १०० ॥ मणि, मंत्र आणि औषध । हे अग्नीचा करिती प्रतिरोध । तेंवि ह्या तीन भावना विरोध– । करिती

ज्ञानोत्पत्तीसी ॥ १ ॥ हा अनुभव ज्ञानियांचा । भवितमार्गी अडथळा साचा । होत असे त्रय भावनांचा । वारंवार मानवा ॥ २ ॥ म्हणोनी भ्रांती पडली मना । उमटल्या मनी विपरीत भावना । संशये घेरिलें मना । गणेशपंतांच्या ये समयीं ॥ ३ ॥ म्हणती ही बोलते अद्‌भुत । श्रुती-शास्त्रांतें न कांही जाणित । ना वाचिले कवणहि ग्रंथ । ज्ञान कोठुनी इज आलें ॥ ४ ॥ एका गुरुचरित्राविण । नाही केलें दुजें श्रवण । हें वेदोक्त भाषण । आज कैसें करितसे ॥ ५ ॥ कोणतें दैवत पावलें क्रोधा । ग्रहदोष कां पिशाचबाधा । ना तरी ब्रह्मसमंधाची बाधा । आपुल्या भार्येस जाहली ॥ ६ ॥ नव्हे नव्हे ही तिची उक्ति । हा ब्रह्मसमंध बहु वेदांती । त्याने पछाडलें इजप्रति । हेंच निश्चित वाटतें ॥ ७ ॥ ऐसा अज्ञानपट येतां नयनासमोर । भ्रांतीने भुले तो नर । प्रत्यक्ष दिसतां परमेश्वर । भूत मानिती तयासी ॥ ८ ॥ वृत्ति जाहली बावरी । क्षणैक दिसे ब्रह्मचारी । क्षणैक दिसे संसारीं । गृहस्थाश्रमी केधवां ॥ ९ ॥ काषाय वस्त्र परिधान । अंगी भस्मलेपन । कंठीं रुद्राक्षमाला भूषण । पायीं खडावा चंदनीं ॥ ११० ॥ दंड कमंडलु दो करीं । जटा वळल्या असती शिरीं । यतिरूप दिसे क्षणभरी । उभा संन्यासी समोर ॥ ११ ॥ ऐशीं तीन रूपें दिसतां नयनीं । परि जाणीव ना कांही मनीं । देव ओळख देती त्यालागुनी । आपुल्या सगुण मूर्तीची ॥ १२ ॥ मी येणार अंशांसहित । म्हणजे होतील तीन सुत । सीताराम, हरि, मी वासुदेव भगवंत । ह्या अवतार खुणा दाविती ॥ १३ ॥ सूर्यवंशी राजा दशरथ । कौसल्येप्रती डोहाळे पुसत । रामरूप कौसल्या होत । अंतर्बाह्य सकळिक ॥ १४ ॥ पुढती होणार अवतारकृत्य । स्वयें रामचंद्र सांगत । दशमुख वधोनी त्वरित । यज्ञ याग रक्षीन मीं ॥ १५ ॥ मारोन वनीं ताटिका । विटंबीन शूर्पणखा । मी संत-सज्जना भाविकां । अनाथांते पालक मी ॥ १६ ॥ ऐकतां ऐशी वाणी । दशरथ दचकला मनीं । म्हणे झडपिली ही समंधांनी । पंचाक्षरी कोण आणावा ॥ १७ ॥ तोच राम हा असे दत्त । तोच रघुनाथ त्रयरूपें दावित । दशरथासम संशयातीत । झालें चित्त गणेशाचें ॥ १८ ॥ विचार करिती दत्तात्रेय । म्हणती पावला

असे हा भय । आपुली जाणीव सदय । कांही समय होऊं न देती ॥ १९ ॥ पहिल्यासम दिसे आपुली भार्या । विकल्प गेला क्षणीं विलया । मानसीं पावूनी विस्मया । म्हणती भ्रम कैसा मज जाहला ॥ १२० ॥ कंठीं न दिसे रुद्राक्षश्रेणी । असे सौभाग्य-सूत्र काळे मणी । सुपुष्पें शिरीं घातली वेणी । कुंकुमचिरी भालीं असे ॥ २१ ॥ नसे अंगीं छाटी न विभूति । लुगडें नेसली दिसे सती । बटु पुरुष नव्हे यती । रमा ही भार्या माझी असे ॥ २२ ॥ म्हणावें भ्रांति हो मानसीं । तरी तीन रूपें दिसती नयनांसी । ब्रह्मचारी, गृहस्थ, संन्यासी । परिभाषा केंवि मिथ्या असे ॥ २३ ॥ बोल निघती मुखांतुनी । दुष्ट दानवां निर्दाळुनी । साधूसंतांसी रक्षुनी । हरिभजनीं जना लावावें ॥२४॥ श्रीगुरूचे होवोनियां दास । मेळवावें तत्कृपेस । बोधूनी उद्धरावें जनतेस । ब्रह्मचर्यव्रत पाळोनियां ॥ २५ ॥ ऐसी आपुली मनींची मात । बोलोनी कुशलत्वें दावित । ब्रह्मसमंधें पछाडिली निश्चित । कोण सोडविल इयेसी ॥ २६ ॥ आतां कोण पहावा मांत्रिक । म्हणोनि गणेशपंत करिती शोक । भक्तिमार्गात मारिला डंख । कोण्या भुजंगें येवोनियां ॥ २७ ॥ तूं दत्त दयाघना । येऊनी दिलेंसी वरदाना । तरी धाव पाव गा नारायणा । सोडवी सती ही क्लेशांतुनीं ॥ २८ ॥ तूं मांत्रिक पंचाक्षरी । राहिलास दूर गाणगापुरीं । हांक ऐकतां झडकरी । धाव घेई दत्तात्रेया ॥ २९ ॥ हें भूत तुझ्या वाचून । कदापि न निघे जाण । आतां वेळ लावितां भक्त-प्राण । कासावीस होतील ॥१३०॥ हें जाणोनियां झडकरी । उठला निज-भक्त-कैवारी । ब्रीद कंकण असे करीं । तें सांभाळी परमात्मा ॥ ३१ ॥ जी दृष्टांत, दर्शन देती । तीच उभी पुढे श्रीगुरुमूर्ति । स्मितवदन रविकांति । कारुण्य नयनीं दिसूनी ये ॥ ३२ ॥ ही कामधेनु भक्तासी । कदा न घाली संकटासी । घेई उडी हाकेसरशीं । विलंब तेथे कांही नसे ॥ ३३ ॥ येऊनी उभे श्रीगुरुदत्त । परि न पाहे गणेश भक्त । मन गुंतले काळजींत । भार्येस समंध कोण पछाडे ॥ ३४ ॥ भक्ता जागा हो म्हणून । हाक देती दयाघन । माझ्या सुखद मूर्तीस घे बघून । शांत होशील मानसीं ॥ ३५ ॥ दे सोडोनी विषयचिंतन । करी

मानसीं भगवच्चिंतन । शोकसागर तरशील जाण । ह्या एकेचि उपायें ॥ ३६ ॥ काम, क्रोध, मद, मत्सर । शोक, मोह, सहा विकार । भेटतां एक परमेश्वर । क्षणामाजीं दग्ध होती ॥ ३७ ॥ प्रभुबोल ऐकतां श्रवणी । भक्त जागा होई खडबडोनी । मूर्ति देखिली असे नयनीं । भक्तवत्सल प्रभूची ॥ ३८ ॥ देखिला आनंदाचा कंद । होई दर्शनाचा आनंद । काय तो महिमा अगाध । ठाउका एक भक्तासी ॥ ३९ ॥ परी पुरुष जो का आत्मज्ञानी । तरी बुद्धि प्रारब्धकर्मानुसारिणी । तेंवि गणेशाकारणीं । कर्मभोग पुढे असे ॥ १४० ॥ भो अनाथनाथा म्हणोनी । पंत बोलती करुण वचनीं । काय संकट येऊनी । आज मजवरी पडियेलें ॥ ४१ ॥ महा समंध पिशाचांनी । पछाडिलें कांतेलागूनी । जी बोलते अद्भुत भाषणीं । त्रिविधरूपां दावीतसे ॥ ४२ ॥ तुझ्या आज्ञेकरून । गृहा पातलों असे जाण । हा प्रपंचभुजंग हातीं धरून । बसलो असे दयाळा ॥ ४३ ॥ तरी पंचाक्षरी तूं महा मांत्रिक । फिरवी कृपादृष्टि तात्कालिक । तूं अनाथांचा पालक । त्राता सकल जगताचा ॥ ४४ ॥ जैसा काळ्या अंधारीं । काळाच दिसे भितीवरी महा भुजंग असे दोरी । परी मिथ्या भय दावीतसे ॥ ४५ ॥ तेंवि मज ह्या वेदना । सहन न होती मना । निवारी तूं दयाघना । प्रार्थना तुला करितसे ॥ ४६ ॥ भक्ताचा ऋणी भगवंत । भक्तगेहीं राबत । कोठे शेले विणीत । कोठे घाशितो चंदना ॥ ४७ ॥ भक्तांचें ओझें अखंड शिरीं । घेउनी उभा अष्टौप्रहरीं । तेंवि हा गणेश-भक्ताचिये घरीं । आला धीर द्यावया ॥ ४८ ॥ कृपादृष्टि उघडून । मधुर करिती भाषण । भक्तभय निवारण । करूं लागले भगवंत ॥ ४९ ॥ गणेशभक्ता होई शांत । मिथ्या भ्रम कां धरिसी मनांत । गाणगापूरनिवासी मी दत्त । दर्शन द्यावया पातलों ॥ १५० ॥ सती धरिसे मदीय रूप । श्रीपाद श्रीवल्लभाचें अपरूप । भार्या दिसे तुज यतिरूप । तो मीच एक बोलतसे ॥ ५१ ॥ जो सकलजगद्व्यापक । तो धरी विश्वरूप तारक । वासुदेव तो मीच एक । सर्वांभूतीं भरलों असे ॥ ५२ ॥ स्वानुभूति-सीतेसी । रमतो मी अहर्निशीं । म्हणोनी सीताराम मजसी वदती सकल

लोक ॥ ५३ ॥ भक्तांची पातकें सकल । जाळून टाकी मी समूळ । किल्मिषें नाश पावतील सकळ । हरि या माझ्या नामापुढे ॥ ५४ ॥ तोच मी वासुदेव सीताराम हरि । तोच मी ब्रह्मा विष्णु त्रिपुरारि । आलों रमा माउलीचे उदरीं । सोड भ्रांती तूं मनाची ॥ ५५ ॥ भूतबाधेचें जावें भय । अंतरीं व्हावें निर्भय । म्हणोनि श्रीगुरुदत्तात्रेय । ज्ञानोपदेश करिताती ॥५६॥ भयाचें काय कारण । जें भगवत्स्वरूपाचें अज्ञान । तया आत्मबोध करून । आपली ओळखण देताती ॥ ५७ ॥ प्रत्यक्ष पाहतां परमेश्वरपदा । परी त्या देती आपदा । अज्ञानें दानव महा समंधा । मानव हा मानीतसे ॥ ५८ ॥ श्रीगुरुदत्त दर्शन देतो । दाविती भक्ता ज्ञानज्योति । मानसीं होती जी विकल्प–भ्रांति । ती सकल असे निरसली ॥ ५९ ॥ ऐशा दावितां ज्ञानप्रकाशा । उजळिल्या अंतरींच्या दाही दिशा । पाहूं लागला परमेशा । स्वकांतेच्या गर्भांतरीं ॥ १६० ॥ मम कांतेच्या देह द्वारा । वर्ते जो परात्पर सोयरा । वदतो वेदोक्तीं मधुरोत्तरा । रूपेंहि दावी अनेक ॥ ६१ ॥ मिथ्या मोहें करून । भुललो होतो मी आज पूर्ण । त्या परमेश्वरें येऊन । सावध केलें मज लागी ॥ ६२ ॥ भासविते जी मंद अंधारी । महा भुजंग नेत्रांभीतरी । नावेक पाहतां ती दोरी । सत्यत्व दृष्टीसी देतसे ॥ ६३ ॥ मूळ पाहतां सुवर्ण । त्याचे अलंकार घडती नाना । परी त्यांमाजी असेना । दुजें सुवर्णावाचोनी ॥ ६४ ॥ महासागरा पाणीच पाणी । लाटा किती जाती वरोनी । तरंग बुडबुडे दिसती नयनीं । परि एक सत्य तें जल असे ॥ ६४ ॥ तेंवि हें भगवत्स्वरूप देख । आहे भयनिवर्तक । दिव्य दर्शनें ओळख । दावियेली सद्गुरूने ॥ ६५ ॥ म्हणे मी जाहलों कृतार्थ । साष्टांग घातला प्रणिपात । वरद पाणि ठेवीत । श्रीगुरु भक्तमस्तकीं ॥ ६६ ॥ उठवोनी तयासी । म्हणे भ्रम ना पडो आतां मानसी । देवोनी प्रेमालिंगनासी । अन्तर्धान पावले ॥ ६७ ॥ सद्गुरूची होता कृपा । मग आघवा मार्ग सोपा । क्षणामाजीं त्रिविध तापा । जाळूनियां टाकीतसे ॥ ६९ ॥ तेंवि परमेश्वरदर्शन । होतां भयवारें गेलें निघून । कांतेकडे पाहातांचि जाण । मन आनंदित

जाहलें ॥ १७० ॥ लोणची आणि पापड । अथवा खावे फार गोड । नसें आणखी कोणतें वेड । सामान्य स्त्रीजातीधरूनियां ॥ ७१ ॥ शास्त्रीय कर्म उपासना । वैराग्य भक्ति अगम्य ज्ञाना । दया दाऊनियां जना । परोपकार करावा ॥ ७२ ॥ वाटे गुहेंत बसोनी । समाधि लावावी निरंजनीं । वाटे अन्नछत्र घालोनी । समाराधना करावी ॥ ७३ ॥ अवतार घेती श्रीगुरुदत्त । आनंदले साधूसंत । आनंदले देवभक्त । गर्भस्तुति मांडिली ॥ ७४ ॥ जयजय परात्परा । जयजय भुवनसुंदरा । जय मुरारे जयशंकरा । दत्तात्रेया नमोऽस्तु ते ॥ ७५ ॥ जय जय अगम्य निगमां । जय जय निर्गुण अनामा । जय जय सगुण अनंत-नामा । दत्तात्रेया नमोऽस्तु ते ॥ ७६ ॥ रमाबाईस शास्त्रानुसार । करिती सकल संस्कार । आणि लौकिकानुसार । मंगल भूषणें करिताती ॥ ७७ ॥ गर्भासी नवमास नव दिन । होतांची उगवला शुभ दिन । शके सतराशें शाहत्तर असून । असे श्रावण वद्य पंचमी ॥ ७८ ॥ दिलें जें कां वरदान । पाळिलें असे आपुलें वचन । रमा मातेला आनंदघन । पुत्ररत्न जन्मले ॥ ७९ ॥ लोक करिती जयजयकारा । म्हणती दिगंबरा दिगंबरा । अवतार घेतला भूवरा । आम्हां अनाथां कारणें ॥ १८० ॥ हेच वासुदेवानंद सरस्वती । प्रकटली असे सद्गुरुमूर्ति । सीताराम धरिला हातीं । सान बंधू आपला ॥ ८१ ॥ अंशावतार दुजा हरि । जन्मला रमामाऊलीचे उदरीं । तिजा गुरुसेवेसी झडकरी । चरित्रनायक प्रकटला ॥ ८२ ॥ ज्याच्या चरित्रश्रवणार्थ । बैसले श्रोते समस्त । ते होतील श्रवणीं तृप्त । कथा रसाळ परिसतां ॥ ८३ ॥ प्रथम जो कां चैत्रमास । शुद्ध पंचमी शुभ दिवस । बाळ आले जन्मास । शक सतराशे ऐंशी असे ॥ ८४ ॥ दत्तात्रेय ही त्रय मूर्ति । अंशासहित प्रकटली जगतीं । म्हणोनी एकाच अध्याया प्रती । जन्माख्यान कथियेलें ॥ ८५ ॥ आतां पुढील अध्यायांत । बालकें निजतील पाळण्यांत । सुवासिनी गातील गीत । नामकरण तें झालियावरी ॥ ८६ ॥ पाळण्याची लांब दोरी । माता धरूनिया स्वकरीं । जो जो म्हणोनी मधुरोत्तरीं । बालकासी बोधीतसे ॥ ८७ ॥

तरी दत्त दत्त ही नामावली । सुलभ घेतां वाटचाली । तेच मोक्षतीर्थाच्या पाउलीं । जानकीसी पोहोचवील ॥ ८८ ॥ इति श्रीसीतारामचरित्रालंकारमणि । गुंफिला असे दृष्टांतकोंवणीं । प्रकाश दाविता अंतःकरणीं । चतुर्थ अध्याय गोड हा ॥ १८९ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

चतुर्थोऽध्यायः समाप्तः



अध्याय पांचवा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ ॐ नमो जी ओंकारा । ॐ नमो जी ईश्वरा । ॐ नमो जी परमेश्वरा । नारायणा नमोऽस्तु ते ॥ १ ॥ नमो नमो आत्मया रामा । नमो नमो मेघःश्यामा । नमो नमो पुरुषोत्तमा । नारायणा नमोऽस्तु ते ॥ २ ॥ नमो नमो जी केशवा । नमो नमो जी माधवा । नमो नमो जी वासुदेवा । नारायणा नमोऽस्तु ते ॥ ३ ॥ नमो नमो मुकुंदा । नमो नमो गोविंदा । नमो नमो आनंदकंदा । नारायणा नमोऽस्तु ते ॥ ४ ॥ विश्वंभरा विश्वनाथा । शेषशायी भगवंता । अनंत नामें तुज अनंता । नारायणा नमोऽस्तु ते ॥ ५ ॥ तुझी सहस्रनामावलि । स्मरती त्रिकाळ भक्त-मंडळी । चरणीं वाहती लाखोली । नारायणा तुलसी दलांची ॥ ६ ॥ इतुकें न ठावें मला । न ये गातां नाममाला । नारायण या सुलभ नामाला । हृदयांतरीं असे ठेविलें ॥ ७ ॥ त्याच नामाची लागो गोडी । जिव्हेने तें वदावें आवडीं । वाया न जाऊं द्यावी घडी । हीच प्रार्थना नारायणा ॥ ८ ॥ एक लक्ष अंतरीं । ही तुलसीदलमंजिरी । नारायणनामोच्चारीं । वाहीन चरणीं प्रेमभराने ॥ ९ ॥ हीच माझी सर्व पूजा । तुझ्या चरणीं अधोक्षजा । परि टाकिला असे बोजा । सकल कार्याचा तुजवरी ॥ १० ॥ श्रीसीतारामचरित । तूंच मजलागीं वदवित । तरी विलंब आता अनुचित । झडकरी पुढे वदावें ॥ ११ ॥ चतुर्थ अध्यायाचें कथानक । जन्म घेती कथा-नायक । भाग्योदयें पुत्रमुख । माता पिता पाहती ॥ १२ ॥ अनुक्रमें पुत्रवदन । गणेश पित्रा करी अवलोकन । मधु मुखांसी चाटवून । विप्रां दक्षणा देतसे ॥ १३ ॥ आजोबा हरीभाऊसी अत्यंत सुख । येतां जातां पाहती मुख । बोबडया बोलांचें कौतुक । करिती त्रय बालकांच्या ॥ १४ ॥ जे शांतीचे निधान । भक्त संकटांचे निषूदन । त्या बालकांसाठी दहा दिन । शांतीपाठ गृहीं चाले ॥ १५ ॥ नित्य येती सुवासिनी । हळदी कुंकू मातेसी देउनी । मुदित मनें अंतःकरणीं । बालका पाहुनी जाती गृहीं ॥ १६ ॥ पूजा-सामग्री मांडूनी नीट । पंचमी-

षष्ठीचा केला थाट । सटवी देखता पाहे वाट । शुभ समय रात्रीचा ॥ १७ ॥ या त्रय देवांचा कृपा-वारा । लागतां एकदां मानव-शरीरा । तेथे दुर्बुद्धीला थारा । कदापिहि मिळेना ॥ १८ ॥ सटवीची असे काय शक्ति । विधीलेख पुसोनी टाकिती । तेथे ही आदिमाया भगवती । उत्सुक मनीं झाली असे ॥ १९ ॥ राहे ज्यांच्या आज्ञेंत । ही देवता राबत । परि आज आनंदभरित । निघाली असे शुभ समयीं ॥ २० ॥ स्वानंदें चाललें जागरण । भजनी मंडळी हो तल्लीन । द्वारीं लाविले दीप जाण । मोकळी असती कवाडें ॥ २१ ॥ जगनियंते हे त्रिगुणाकार । भूवरी घेताती अवतार । ब्रह्मा-विष्णु-महेश्वर । देव ते होती तत्वतां ॥२२॥ त्यांचेंच अवतारचरित । घेउनी तें ब्रह्मलिखित । रात्रौमाजी प्रवेश करित । स्वानंदें बालकाजवळी ती ॥ २३ ॥ वासुदेव चरणीं ठेवुनी माथा । म्हणे श्रीदत्तात्रेया भगवंता । तुझींच लिखिताक्षरें मी लिहितां । धन्य आज होतसे ॥ २४ ॥ एकेक कृत्य लिहून । न्याहाळुनी पाहे बालवदन । आपोआप हो वंदन । चरणकमळीं प्रभूच्या ॥ २५ ॥ सकल चरित्र करितां कथन । ग्रंथ वाढेल उगाचि जाण । ती अतर्क्य लीला वर्णन । अनुक्रमें पुढती येईल पैं ॥ २६ ॥ तैसाच दुजा असे हरी । त्याचेहि भालीं सुवर्णाक्षरीं । विधिलेख लिहूनी वंदन करी । तिज्या सीतारामा नमितसे ॥ २७ ॥ सद्गुरुची काय महती । किती बिबली हृदयावरती । धन्य धन्य म्हणोनी चित्तीं । स्वानंदाने लिहीतसे ॥ २८ ॥ ऐशा त्रय मूर्तीच्या भालप्रदेशीं । लेख लिहीतां अति हर्षी । होऊनियां मानसीं । देवता ही जातसे ॥ २९ ॥ मायेस आणि लेकरां । लाविला दहा दिवस अंगारा । प्रत्यक्ष त्रय देव या परमेश्वरां । माय ही कुशींत घेतसे ॥ ३० ॥ अकरावे दिवशीं मंगल स्नान । बालकां मातेसी घालून । वृद्धि जाहली निरसन । बाह्य स्वरूपीं देहाची ॥ ३१ ॥ परि अंतःकरणाची हो प्रेमवृद्धि । ती अखंड हो वाढती । श्रीगुरुचरणीं लाविल प्रीति । ही त्रय मूर्ति निश्चयें ॥ ३२ ॥ जे माया-बाजार-खेळणीं । खेळण्या येती संसारीं प्राणी । ते सुखदुःखाच्या वेष्टनीं । जन्मतांच सापडती निश्चयें ॥ ३३ ॥ क्षणैक वदतो काय वाणी । ती

भुलोनी जाय जन्मता क्षणीं । सोऽहं शद्ध सोडुनी । वंदे कोऽहं काऽह शद्धासी ॥ ३४ ॥ एवं चौऱ्याऐंशी लक्ष योनी । फिरतां फिरतां श्रमे प्राणी । परी सत्यत्वातें सोडूनी । परमेश्वरासी ना ओळखे ॥ ३५ ॥ कोटी कोटी शोधितां । दिसे एखादा तत्वतां । सन्मार्गावरूनी चालता । परतीर गाठण्यासी ॥ २६ ॥ घेतल्या असती सांगातीं । विरक्तता आणि शांती । पुढे विवेक सारथी । असे आवरता मनासी ॥ ३७ ॥ परी षड्विकार घालिती घिरटी । चौफेर ते अति कपटी । भुलवणी घालूनियां गोमटी । ओढिती माया-बाजारीं ॥ ३८ ॥ ऐसे जातां जातां पडले । भवचक्रामाजीं अडकले । पुनरपि फेरे सुरू झाले जन्ममरणाचे ॥ ३९ ॥ त्यांतुनी एखादा भाग्यवंत । घेउनी बरोबरी सुकृत । भवसिंधु हा उल्लंघित । गाठतो पैलतीरासी ॥ ४० ॥ ज्यांनी केला असे वश । तो परात्पर परमेश । जे अंतर्ज्ञानाधीश । तेच आपुले आप्त होती ॥४१॥ तैसेच दिव्य लखलखित । नभांगणामाजी तळपत । तेच आपुले सोयरे आप्त । सत्य पाहतां होताती ॥ ४२ ॥ मग हा त्रिगुणात्मक त्रिगुणाकार । श्रीदत्तगुरु दिगंबर । स्वांशासहित हा भूतलावर । भक्तां कारणें अवतरला ॥ ४३ ॥ परि मायामोहाचें आवरण । सकलांभोवतीं असे पूर्ण । म्हणोनी अंतरीची खूण । कवणासही उमगेना ॥ ४४ ॥ लोकोपचार जनरीती । सकल गृहांसी आणिती । हळदी-कुंकू सुवासिनींप्रती । देउनी वाटिती सुंठवडा ॥ ४५ ॥ तांदूळ मूर्ति करून । माय करी बळीराण्याचें पूजन । जिच्या कुशीं नसे पुत्ररत्न । तिचे ओटींत घालिती ॥ ४६ ॥ या त्रयदेवांचा बळिराणा । घेतला ज्यांनी ओटीं जाणा । त्यांच्या ओसंगीं बाळ साना । खेळला असे स्वानंदे ॥ ४७ ॥ करूनी पंच पक्वान्न । सुवासिनींना आणि ब्राह्मणांना । बोलाविती भोजना । बारवे दिनीं बारशासी ॥ ४८ ॥ तबकामाजीं झाकोनी । येती शेजारच्या शेजारिणी । बाळंतविडे घेउनी । मायबहिणी सकळिक ॥ ४९ ॥ सकलांचें उत्सुक मन । वाटे अंकावरी घेऊन । खेळवावे नंदन । म्हणोनी येती लगबगा ॥ ५० ॥ घातली जोड-पाटावरी । हरित शाल भरजरी ।

बसली माय त्यावरी । ओसंगीं बाळें घेऊनीयां ॥ ५१ ॥ जे जन्मास आले स्वानंद-पीठ । त्यासी लागूं नये दीठ । म्हणोनी लाविती गालबोट । नेत्रीं अंजन घालोनिया ॥ ५२ ॥ जो पाहणार अनंत लोचनीं । जगत्त्रयाचीं अनंत राहणी । त्याच्या घालितसे नयनीं । माता अंजन सांक्षेपे ॥ ५३ ॥ ज्याकडे कृपादृष्टीने अवलोकित । त्याचे अज्ञान जाय त्वरित । ज्ञान-दृष्टीने पाहत । आपुल्या आत्मस्वरूपाकडे ॥ ५४ ॥ ऐसे जे ज्ञानघन । जगत्प्रकाश असती नयन । तयामाझारीं अंजन । माता प्रेमें घालीतसे ॥ ५५ ॥ ज्याचें नाव येतां ओठीं । होते अमृत-संजीवनी घुटी । पातके पळती । उठाउठी । भयभीत होवोनियां ॥ ५६ ॥ नाना औषधें करूनी गोळा । उगाळिती जायफळा, मायफळा । शिपल्यामाजी घेऊनी वाळा । कडू घुटी पाजिती ॥ ५७ ॥ रौप्य सुवर्णाची बाळलेणी । आंगडीं टोपडीं घालूनी । उंची कुंचीने झाकूनी । मांडीवरी घे बाळासीं ॥ ५८ ॥ निर्गुणाते पाळणा-। घालुनी आणिला सगुणपणा । पाळण्यावरी खेळणीं नाना । लाविली मोदें कुशलत्वें ॥ ५९ ॥ बांधिली असे पाळण्यावरी । रेशमाची लाल दोरी । गुंफुनी पक्षी तीवरी । राघू मोर चिमण्या बैसविल्या ॥ ६० ॥ देवकापूस आंत भरूनी । रेशमी गादी पाळणी । बरी रंगीत आच्छादनीं । झाकूनी असे घेतली ॥ ६१ ॥ वरी मायेचें पांघरूण । पायगतीं असे जाण । अनेक रंगे रंगवून । दुलई असे ठेविली ॥ ६२ ॥ आधी गृहांतील भरती ओटी । मग जांहली साजणींची दाटी । कुणी देती रौप्यवाटी । बालका हातीं आवडीने ॥ ६३ ॥ जमल्या पाळण्याचे भवतीं । बाळ घेती हातोहातीं । गोविंद माधव घ्या हो म्हणती । कुणी म्हणती घ्या नारायणा ॥ ६४ ॥ कुणी म्हणती घ्या नरसिंह सरस्वती । श्रीपाद घ्या हो कुणी म्हणती । दिगंबरा घ्या हो हातीं । घ्या हो म्हणती श्रीदत्ता ॥ ६५ ॥ ऐशी या त्रय मूर्तीची देवघेव । म्हणतां माते जो तुझा भाव । पाळणीं घालूनी नांव ठेव । बालकांचें तूं आतां ॥ ६६ ॥ रमा माउलीचे करी । बालक देताती मुदित नारी । नांव योजिले अंतरी । पाळणीं जवळी माय ये ॥ ६७ ॥ म्हणे माझ्या ज्येष्ठ सुता । पाळणीं क्षणभरी झोप आतां । कीर्तिवंत

दि गं ब रा दि गं ब रा

होई जगता । वासुदेव या नामाने ॥ ६८ ॥ ठेविले असे त्याच परी । दुज्या पुत्राचें नाम हरी । सकल चिंता हरण करीं । ऐसा तो हरी पाळणीं घातला ॥ ६९ ॥ कनिष्ठ पुत्र जो कां तिजा । जो या ग्रंथाचा असे कलिजा । करावया जगदुद्धार-काजा । अवतारलासे भूवरी ॥ ७० ॥ निवृत्ति आणि ज्ञानेश्वर । तैसे वासुदेव आणि हा कुमार । असे जोडी ही सहोदर । परि कवण्या नामें मिरविती ॥ ७१ ॥ होते जनार्दन-स्वामी-एकनाथ । गुरु-शिष्य वंद्य जगांत । तेवि ज्येष्ठ बंधु हृदयांत । राहती सद्गुरु म्हणूनियां ॥ ७२ ॥ तें चरित्र अति रसाळ । वर्णावया देवो बुद्धिबळ । तो वासुदेव कृपाळ । श्रीसद्गुरु स्वामी माझा ॥ ७३ ॥ रमा माउली सती कल्याणी । बालक ठेवूनी पाळणीं । कानीं सांगे अमृतवचनीं । सीताराम-नामातें ॥ ७४ ॥ जो त्रिभुवनाचा धनी । आला त्रय अवतार घेऊनी । पहुडलासे पाळणी । विश्रांति घ्यावया कारणें ॥ ७५ ॥ त्या पाळण्याची दोरी । रमा माउली करीं धरी । ती जगातें उद्धारी । अणुमात्र संशय असेना ॥ ७६ ॥ आधीच मातेची काय महती । देव ऋषी सदा गाती । जिच्या कुशीं ही त्रय मूर्ती । धन्य ती माता या जगीं ॥ ७७ ॥ ऐशी ती मांगल्याची मंगल दोरी । घरूनी झोका दे लांबवरी । जो जो म्हणूनी मधुर स्वरीं । गीत गाऊं लागली ॥ ७८ ॥ गाऊं लागली पाळणा । उपदेशामृत पाजी त्यांना । म्हणे त्रय मूर्ती माझ्या नंदना । ऐका गाणें हें माझें ॥ ७९ ॥ जन्मास आलात भूवरी । भार भूमातेसी ना करी । व्हा कीर्तिवंत जगा-माझारी । जो जो म्हणोनी हालवीतसे ॥ ८० ॥ तापत्रयाने दुःखित । निरंतर जनता ही समस्त । तिजला तुम्ही कराल शांत । हीच आशा मज असे ॥ ८१ ॥ साधू संत थोर पुरुष । ह्यांचा करावा सहवास । स्मरोनी त्यांच्या वचनांस । जगती तुम्ही वर्तावें ॥ ८२ ॥ स्वकुलासी उद्धरावें । जनहिता कारणें जागावें । अनाथ दुबळयांसी करावें । साह्य यथामतीने ॥ ८३ ॥ शरणागतासी तारक । कदा न व्हावें मारक । स्वार्थासाठी अविवेक । कदापिहि करूं नये ॥ ८४ ॥ परदुःखें व्हावें दुःखित । वैभव पातलें जरी द्वारांत । तरी उडी गगनांत । कदापिहि मारूं नये ॥ ८५ ॥ भोजन समयीं द्वारासी ।

श्री पा द व ल्ल भ दि गं ब रा

कोणी अतिथी आलियासी । विन्मुख दवडूं नये त्यासी । कांही तरी दिल्याविणें ॥ ८६ ॥ एका स्वपत्नीविण । सकल स्त्रिया मातेसमान । मानाव्यात आपण । दुजीकडे पाहूं नये ॥ ८७ ॥ वर्तावें सत्य भाषणीं । नित्य असावें एकवचनी । सदा सावध ईर्शचितनीं । ऐसें माता सांगतसे ॥ ८८ ॥ वर्म कोणाचें न काढावें । आशीर्वाद थोरांचे सदा घ्यावे । सद्भक्त पाहुनी नमावें । पंथ वाकुडा तो नसावा ॥ ८९ ॥ ब्रह्मकर्म वेदोक्त आचरण । कदा सोडूं नये जाण । असावें सदा प्रसन्न । मना मलिन ना करावें ॥ ९० ॥ येवो ना तुम्हांवरी आपदा । नित्य असावी सुखसंपदा । देते माउली आशीर्वादा । जो जो बाळा तुम्हांसी ॥ ९१ ॥ मातेने गाइला पाळणा । आपुल्या त्रयनंदनां । बोधामृत पाजुनी कवना । कर्णामाजीं साठवीले ॥ ९२ ॥ आत्या दया, क्षमा, शांती । झाली पाठीशी विरक्ति । बालका आशीर्वाद देती । राहती सन्निध सर्वदा ॥ ९३ ॥ जमल्या सकल सुवासिनी । त्याही मंगल गीत गाउनी । जाती हळद-कुंकू घेओनी । ताटीं साखर घेओनियां ॥ ९४ ॥ ऐसा अपूर्व सोहळा । जाहला असे प्रत्येक वेळा । घेती विश्रांति लागे डोळा । पाळणीं क्षणभरी बाळांचा ॥ ९५ ॥ आतां पूर्वानुसंधान । जाहलें असे जन्मकथन । तैसेंच बालकांचें नामकरण । एकत्र असें जाहलें ॥ ९६ ॥ ज्यांचिये चरणकमलांचा ध्यास । लागली जयांच्या दर्शनाची आस । त्या सीतारामांचे चरित्र गावयास । स्फूर्ति देवो तो प्रभू ॥ ९७ ॥ वासुदेबानंद सरस्वती । ही सद्गुरु बालमूर्ति । तीन वरुषांची हो खेळती । सान बंधू हरी सवें ॥ ९८ ॥ तिजा सीताराम पाळणीं । पाहे बरती राधू चिमणी । चोखी अंगुष्ठ घालुनी वदनीं । गोड गोड म्हणोनियां ॥ ९९ ॥ सान बंधूवरी प्रीति । माय गृहांत हो कार्य करिती । रुदन ऐकतां धाव घेती । पाळण्या-जवळी वासुदेव ॥ १०० ॥ जो जो म्हणोनी हालविती । बोबडचा बोली गीत गाती । त्यांतील गुह्यार्थ जाणावया मती । आमुची तों कुंठित असे ॥ १ ॥ क्षणामाजी हासे रडे । क्षणामाजी हात जोडे । काय बोधामृताचे धडे । कर्णामाजी साठवीती ॥ २ ॥ हात पाय

झाडून । उडवी अंगावरील पांघरूण । उघडें दिसतांचि अंग येउन । वासुदेव घाली पांघरूण ॥ ३ ॥ मायेपरिस अमर माया । जन्मतांच आले घेओनिया । श्रीवासुदेव कृपावलया– । खालती असती राहिले ॥ ४ ॥ मासानुमास प्रतिदिन । बाळ वाढूं लागलें जाण । सात मासांचें होतांचि पूर्ण । रांगत जाई अंगणीं ॥ ५ ॥ माय करी गृहींचें काम । मागे रांगत फिरे हा राम । काय घेतसे आराम । क्षण भरी निद्रा लागतां ॥ ६ ॥ देवगृहामाजीं जाऊन । न्याहाळी देवदेवतार्चन । रमे तेथे हा रमानंदन । खेळणीं नकोतची त्याजला ॥ ७ ॥ सुप्रसन्न प्रशांत वेळीं । रमाबाई प्रभात काळीं । मधुर स्वरें भूपाळी । गाई श्रीगुरुदत्तासी ॥ ८ ॥ तैसें सडासंमार्जनीं । कार्य सारिते हातांनी । देवादिकांचीं गोड गाणीं । मधुर स्वरें गातसे ॥ ९ ॥ नामस्मरणीं गोड गळा । त्यांत भावभक्तीचा उमाळा । पुलकित करी हृदयकमळा । बालकाच्या ती माय ॥ ११० ॥ त्या नादब्रह्मरसांत । वासुदेव तल्लीन होउनी जात । भक्तीचें बीज अंकुरित । ह्या पवित्र दंहिवराने ॥ ११ ॥ तैसा नित्य नियम सायंकाळीं । दिवा लावी तुळशीजवळी । हात जोडूनी सावळी– । तुळशीमाता वंदीतसे ॥ १२ ॥ स्तोत्रें पदें आरत्या । अनेक रसनाग्रीं असती खेळत्या । प्रत्यहीं तयांचा पाठ करतां । ना चुके कधीहि रमा माय ॥ १३ ॥ आजोबांची पूजा, संध्या स्नान । मातेचें मिळे हें शिक्षण । तेणें वासुदेवाचें मन । विकसित असे जाहलें ॥ १४ ॥ जो स्वयं अवतारी श्रीगुरुदत्त । आपुल्या स्वरूपा ना विसंबीत । त्यांत सीताराम बंधूचा हात । आपुल्या करी घेतला ॥ १५ ॥ परिसावें पुढती रसाळ कथन । होईल आपणा समाधान । प्रेमाश्रूंनी वाहतील नयन । घेतां दर्शन दत्ताचें ॥ १६ ॥ एके कार्तिक मास गुरुवार दिनीं । खेळती बाळे अंगणीं । माता पाहोनियां नयनीं । संतोषित जाहली असे ॥ १७ ॥ राम घेतला कडेवरी । गेली देवगृहांतरीं । बसविला राम पाटावरी । दिवा लाविला देवापाशी ॥ १८ ॥ करीं घेऊनी नीरांजना । आली असे अंगणा । जाउनी तुळसी वृंदावना । प्रदक्षणा करीतसे ॥ १९ ॥ हस्त जोडोनी सामोरी । उभी राहूनी प्रार्थना करी । तेथुनी वासुदेवाची

भरारी मेली देवगृहामाजी ॥ १२० ॥ देव्हाऱ्यांत असती देव । शेजारीं उभे हे वासुदेव । काषाय वस्त्र अभिनव । आंगावरी झळकतसे ॥ २१ ॥ मस्तकीं आवळिला जटाभार । जैसे कां वेष्टिले फणिवर । कुरळ केश मनोहर । शिरीं शोभतीं प्रभूच्या ॥ २२ ॥ रुद्राक्षमाळा घातली कंठी । अंगी लेइली भस्मउटी । कमंडलू दंडकाठी । करीं शंख चक्र आयुधें ॥ २३ ॥ भालप्रदेशीं केशरी गंध । देवगृहीं पसरला सुगंध । गगनीं जमला देववृंद । दर्शन घ्यावयाकारणें ॥ २४ ॥ ज्यांची अखंड घडावी सेवा । वाटे साधू-संत-देवां । ऐशा चंदनी खडावा । चरणीं प्रभूच्या शोभल्या ॥ २५ ॥ ही सद्गुरु बालमूर्ति सगुण । पाहतां क्षणभरी हरपलें मन । वृत्ती जाहली तल्लीन । खिळली चरणीं जाऊनियां ॥ २६ ॥ हे प्रभो करुणार्णवा । दत्तात्रेया वासुदेवा । ह्या सगुण स्वरूपाचा ठेवा । हृदयांतरीं वसो दे ॥ २७ ॥ तेथे ही पूर्व सुकृताची जोडी । अंतःकरणीं भरली आवडी । रांगत जाती तातडी । सीताराम हे बालक ॥ २८ ॥ वनामाजी अभिनव । भ्रमर करी गुंजारव । गुंगें होऊनी विसरे सर्व । कमल रस हा चाखितां ॥ २९ ॥ तेवी हा सीताराम मिलिंद । चाखितो चरणकमलींचा मकरंद । मधुर मधुर तो किती स्वाद । म्हणोनी नाचे स्वच्छंदे ॥ १३० ॥ धन्य उदेला हा सुदिन । भाग्योदयें जाहलें दर्शन । त्रैलोकीचें निधान । डोळे भरोनी पाहिलें ॥ ३१ ॥ नमो नमो वासुदेवा । त्रिगुणात्मक देवाधिदेवा । या करें कांही घडो सेवा । आस पुरवा ही माझी ॥ ३२ ॥ वासुदेवा जगज्जीवना । तुला एक माझी प्रार्थना । जो वाचेल या अध्याय-कवना । त्यासी दर्शन देइजे ॥ ३३ ॥ इकडे तुळशी-वृंदावनीं । निघाली माय हरीला घेउनी । म्हणे वासुदेवा येई झणीं । हात पाय धुवोनियां ॥ ३४ ॥ मुखोद्गत दत्तस्तुती । ती सकाळ सायंकाळ करिती । म्हणोनी माय पुकारती । वासुदेवाकारणें ॥ ३५ ॥ परि वासुदेव न दिसे नयनीं । हाक मारितां न ये शब्द कानीं । किंचित् बाबरली असे मनीं । पाहे बाहेरीं जाऊनियां ॥ ३६ ॥ बाळ आहे बहुगुणी । कदा न जाय अन्य ठिकाणीं । म्हणोनी देवगृहा जावोनी । वासुदेवा पाहतसे ॥ ३७ ॥ द्वारापाशीं येऊनी ।

पाहूं लागली काय नयनी । गेली देहभान विसरूनी । तटस्थ उभी राहिली ॥ ३८ ॥ म्हणे मी कां असे मंदिरांत । कीं असे देवगृहांत । जोडिले जाती दोन्ही हस्त । दत्तस्तुति ये वदनीं ॥ ३९ ॥ "ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम् । द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्वमस्यादिलक्ष्यम् ॥ एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतम् । भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥ १ ॥" प्रेमाश्रूंनी पाझरती नयन । जाहली ब्रह्मानंदीं तल्लीन । हृदयीं साठविलें ध्यान । मी-तूं-पणा विसरली ॥ १४० ॥ वासुदेवें हें पाहतां जाण । टाकिलें माया-पांघरूण । उघडती जाहली नयन । म्हणे त्रय देव हे सुत माझे ॥ ४१ ॥माते घेई वो झडकरी । हा सिताराम हट्ट करी । श्रमला असे आज भारी । घेई ओसंगीं त्याजला ॥ ४२ ॥ काय वानूं त्या पुत्रप्रेमा । घेतलें उचलोनी सीतारामा । कोणती देऊं येथे उपमा । महिमा अपार तो असे ॥ ४३ ॥ तितुक्यामाजी गणेशपंत । बाहेरूनी येती गृहांत । पत्नीमुखें वृत्तान्त । ऐकतां पूर्ण सुखावले ॥ ४४ ॥ मज अभाग्यास परमेश्वर । भेटेल कैसा साचार । म्हणती तुझें भाग्य थोर । दर्शन जाहलें दत्ताचें ॥ ४५ ॥ येती आसवें नयनां । प्रभो दत्ता दयाघना । कधी देशील दर्शना । अज्ञान या जीवासी ॥ ४६ ॥ काय वदावें हें पुत्रप्रेम । कां ईश्वरावरील अनुपम । हृदयीं धरिला मंगलधाम । झणीं वासुदेव-पित्याने ॥ ४७ ॥ आवरली जई प्रेमवृत्ति । पुत्रत्रय घेऊनी पुढती । केलो प्रभूची मंगल आरती । तीर्थप्रसाद घेतला ॥ ४८ ॥ सीताराम बाळ तान्हा । करवोनियां दुग्ध-पाना । घालोनियां पाळणा । जो जो म्हणोनी झोपवीला ॥ ४९ ॥ मग संगें सुत घेऊन । सारिलें असे भोजन । सकल नित्य नियमां स्मरून । सुखें निद्रा केली असे ॥ १५० ॥ परी ध्यास लागला मना । कधी देईल प्रभु मज दर्शना । स्वप्नामध्ये ही प्रार्थना । गणेशपंताची चालली ॥ ५१ ॥ अंतःकरणापासून । आठवितां तो दयाघन । येईल झणी धावून । भक्ताभिमानी तो असे ॥ ५२ ॥ करुणारसें भरोनी । हाक गेली श्रीदत्तात्रेयकानीं । तत्काळ द्रवले अंतःकरणीं । विप्ररूपें समोर उभे राहती ॥ ५३ ॥ अंगीं नम्रता सौजन्य । विप्र

दिसती देदीप्यमान । करोनी तयांसी वंदन । नम्रभावें पुसतसे ॥ ५४ ॥ म्हणती आपण कोठील कोण । काय आपुलें नामाभिधान । कवण इच्छा धरून । येणें आपुलें झालें असे ॥ ५५ ॥ विलंब ना स्वप्नसृष्टींत । क्षणीं देवगृहामाजीं जात । आसन घालूनी विनवित । आसनीं बसावया कारणें ॥ ५६ ॥ परि न बैसे ब्राह्मण । काय वदे पंतालागून । म्हणे मी गाणगापुराहून । निरोप घेउनी आलों असे ॥ ५७ ॥ करूं नको अहर्निशीं । वृथा चिंता तूं मानसीं । मी संन्निध आहे तुझे पाशीं । द्वारीं औदुंबरीं वास माझा ॥ ५८ ॥ तुझा माझा सहवास । असतां गृहीं रात्रंदिवस । तरी अजूनी भुललास । सावध होवोनी पाहे पां ॥ ५९ ॥ लागली तळमळ तुझिये मना । इच्छितोसी माझिये दर्शना । होईल पूर्ण कामना । विप्र त्यासी कथितसे ॥ १६० ॥ जो गाणगापूरविहारी विश्वेश्वर । त्रैलोक्यनाथ विश्वंभर । त्याचा निरोप साचार । हा विश्वनाथ कथितसे ॥ ६१ ॥ इतुकें बोलूनी तो ब्राह्मण । गुप्त जाहला न लागतां क्षण । पंत जागृत होऊन । सभोवार विलोकिती ॥ ६२ ॥ ब्राह्म मुहूर्तीं पडलें स्वप्न । तें विफल न होय जाण । दैतील प्रभु दर्शन । भरवसा पूर्ण ठेविला ॥ ६३ ॥ ह्या पाचव्या अध्यायीं कथन । बालकें पाळणीं घालून । करविलें बोधामृत पान । गाउन रमा माउलीने ॥ ६४ ॥ मूळ स्वरूपाची ओळखण । बाळ सीतारामासी देऊन । मातेसी दिधलें दर्शन । बाल वासुदेव दत्तांनी ॥ ६५ ॥ आता पुढील अध्यायाचें कथन । करावीं बाललीला श्रवण । टेंब्ये वंश धन्य धन्य । ह्या जगतीं जाहला ॥ ६६ ॥ ह्या अध्यायाची ठेव । हृदयीं वसावा वासुदेव । चरणीं जडावा अखंड भाव । जानकीची ही प्रार्थना ॥ ६७ ॥ इति श्रीसीतारामचरित्रालंकारमणी । गुंफिला असे दृष्टांत-कोंदणीं । प्रकाश दाविता अंतःकरणीं । पंचम अध्याय गोड हा ॥ १६८ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

पंचमोऽध्यायः समाप्तः ।

अध्याय सहावा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ ॐ नमोजी भास्करा । अविद्यानाशक परमेश्वरा । तुझ्या तेजें ही अवघी धरा । तेजोमय होतसे ॥ १ ॥ तूं आनंदाचा सागर । परब्रह्म तूं परात्पर । तूंच अन्नदाता साचार । या अखिल जगतासी ॥ २ ॥ तूं कोणाचा दावा साधिला । ऐसा न कोठे बोलबाला । येतां नभांगणीं, अंधाराला । कोणासही ना ठेविलें ॥३॥ भूपति वा असो रंक । तूं सर्वांठायीं सारखा व्यापक । परि हृदयस्थलीं प्रकाशक । न ये दिसूनी सकलांच्या ॥ ४ ॥ ह्याचें एकची कारण । नाही भावभक्ति ज्ञान । नाही स्वरूपाची ओळखण । ह्या अज्ञान जीवासी ॥ ५ ॥ मित्रा तुझें येणें जाणें । रोज उगवणें मावळणें । म्हणोनी त्याचें न महत्व पटणें । ह्या अज्ञान जीवासी ॥ ६ ॥ दिससी ना तूं पर्जन्यकाळीं । दोन दिवस जैं नभोमंडळी । तें पहाती तुज नेत्रकमळीं । स्वार्थासाठी हे मानव ॥ ७ ॥ म्हणोनीच हृदयीं अंधार । हें तों प्रभो साचार । वरी विकल्पाचे थर । प्रकाश तेथवरी नच जाय ॥ ८ ॥ ह्या अज्ञानाचें निरसन । करण्या समर्थ तूं एकचि जाण । देशील दिव्य रसायन । ज्ञानमय प्रकाशकिरणांचें ॥ ९ ॥ तेणें जळून जाईल किल्मिष । हृदयीं पडेल ज्ञान प्रकाश । त्यावेळीं तूं जगन्निवास । दिसशील मजला क्षणार्धें ॥ १० ॥ तरी माझी याचना । पुरविसी तूं नारायणा । आता सहाव्या अध्यायाची रचना । सांगे मज येऊनियां ॥ ११ ॥ मागील अध्यायीं जाहलें कथन । सांगूनि गेला ब्राह्मण । दर्शन देईल तुज लागून । चिंता न करी गणेशा ॥ १२ ॥ औदुंबर तुझे द्वारीं । माझा सहवास असे घरीं । हेच शद्ध अंतरों । घोळताती रात्रंदिन ॥ १३ ॥ नियमित कार्य प्रतिदिनीं । परि ध्यास असे मनीं । जिव्हेवरी अमृतवाणी । बसली गोविंद-नामाची ॥ १४ ॥ औदुंबराची करिती सेवा । पूजोनियां अनन्य भावा । मनीं स्मरती करिती धावा । श्रीदत्तात्रेय प्रभूचा ॥ १५ ॥ भक्ति प्रेमळ आणि सात्विक । स्वार्थ ना तीमाजीं कांही एक । ऐसें असोनी तो त्रिभुवन पालक । जवळी असोनी ना

दिसे ॥ १६ ॥ ऐसे गेले कित्येक दिन । तरी न होय दर्शन । तों उगविलासे सुदिन । गणेशाच्या भाग्याचा ॥ १७ ॥ पंताचें असे उपाध्येपण । गेले यजमानगृहालागून । तेथेचि करोनियां भोजन । येती दोन प्रहरीं गृहासी ॥ १८ ॥ हात-पाय-मुख-प्रक्षाळण । केलें प्रभूसी वंदन । वामकुक्षी कराबया कारण । किंचित असती पहुडले ॥ १९ ॥ अंगण असे निर्मळ । वरी औदुंबरछाया शीतळ । म्हणोनी खेळावया खेळ । माता बाळें लावीतसे ॥२०॥ दोघांमध्ये न कदा गमे । हरी जाऊनी एकटा रमे । परि वासुदेवासी सीतारामें । कदापि ना सोडिलें ॥ २१ ॥ झाली असे तोच परी । एकीकडे खेळे हरी । घेऊनी चेंडू खालो वरी । झेलीतसे करांनी ॥ २२ ॥ पुढील आयुष्याची राहणी । कवणें परीं होईल करणी । हें बाळपणींच्या खेळणीं । बघतां पाळणीं दिसोनी ये ॥ २३ ॥ जीवनीं सुखदुःखाचे घडे । कधी भरले कधी उपडे । तरी प्राणी घेऊनी उडे । आशालहरी बरोबरी ॥ २४ ॥ कधी दांडूने विटीला । हाणुनी उडवी लांब टोला । जाउनी काटचागोटचांतुनी तिला । पुनरपि स्वस्थला आणीतसे ॥ २५ ॥ पतंगीची सैल दोरी । सोडुनी उडवी गगनांतरीं । परि सूत्रटोक असे करीं । बळकट असे धरलेलें ॥ २६ ॥ ऐसा हरि खेळत । त्या खेळण्यांतहि अर्थ । चतुर श्रोते जाणतात । नको कथाया मजलागीं ॥ २७ ॥ इकडे शीतळ छायेंत । द्वय बंधू काय करित । पाहतां मन आश्चर्यचकित । मानवाचे होतसे ॥ २८ ॥ कांही खेळणीं देतां हातासी । सीताराम-पायापाशी । खेळतां रमे घटकोनिशीं । कवणेही स्थळीं ठेवितां ॥ २९ ॥ तयीं वासुदेव काय करी । दृष्टि ठेवुनी औदुंबरीं । पद्मासनीं भूवरी । निश्चल होऊनी बसला असे ॥ ३० ॥ बाळ दोघे खेळीं मेळीं । उभे असती वृक्षातळीं । क्षणामाजी प्रभावळी । तेजोमय पसरली ॥ ३१ ॥ तितुक्यामाजी काय झालें । आजोबा हरिभट्ट बाहेरी आले । गणेशपंतही उठले । डोळा न लागे म्हणोनी ॥ ३२ ॥ तीर्थरूप अंगणांत । बालकेंहि खेळत । म्हणोनी पंतहि बाहेरी येत । तों काय अपूर्व देखिलें ॥ ३३ ॥ गाणगापुरीं जें दर्शन । दिधलें गणेशपंतालागून । ती यतिमूर्ति दत्त दयाघन । औदुंबरतळीं देखिली

॥ ३४ ॥ धाव घेतली त्वरित । नामोच्चार गर्जला मुखांत । श्रीगुरुदेवदत्त गुरुदेवदत्त । ऐकतां सकल देखती ॥ ३५ ॥ ज्याचा वास औदुंबरीं । तो प्रकटला नरहरी । काषायांबर परिधान करी । करीं आयुधें शोभलीं ॥ ३६ ॥ सुप्रसन्न मुखचंद्रमा । काय देऊं त्यासी उपमा । वरद हस्त उत्तमा । भक्तशिरीं उभारिला ॥ ३६ ॥ गणेशपंत भाग्यवंत । मूर्ति साठविती हृदयांत । नेत्र झाकुनी स्तुती करित । हस्त जोडुनी तेधवां ॥ ३८ ॥ पुनरपि पाहती उघडुनी नयन । गुप्त जाहले भगवान । यतिरूप न दिसे जाण । वासुदेव देखे त्या स्थलीं ॥ ३९ ॥ वासुदेवा धन्य धन्य । आमुचें तूं कुलभूषण । प्रेमाश्रूंनी पाझरती नयन । धरिती पोटाशी त्याजला ॥ ४० ॥ ब्राह्मण बोलला जें स्वप्नी । तें दाविलें सत्य करोनी । औदुंबरीं येऊनी । दर्शन देती दत्तात्रेय ॥ ४१ ॥ किती एक होती दृष्टांत । प्रत्यक्ष भेटती भगवंत । परि मायेच्या बाजारांत । मानव भुले सारखा ॥ ४२ ॥ तीन्ही बालकें गृहांत । मातेपाशी गेलीं त्वरित । कालवोनी दूधभात । देई माता प्रेमभरें ॥ ४३ ॥ वासुदेवाचें शिक्षण । चाललें तिसऱ्या वर्षापासून । पंतोजी हरिभट्ट असोन । शाळा असे ती खाजगीं ॥ ४४ ॥ अवतारी पुरुषाप्रत । काय नसतें अवगत । सकल विद्या कला हस्तगत । होती एका क्षणामाजीं ॥ ४५ ॥ जो अखिल ब्रह्मांडनायक । सकल कला निपुण यदुकुलतिलक । म्हणवितो नंद-यशोदेचा बालक । तो सांदीपनी-गुरुगृहीं शिकतसे ॥ ४६ ॥ विद्याभ्यास आश्रमासी । करोनी सादर गुरुसेवेशी । मोळी आणुनी दे गुरुपत्नीसी । पाकसिद्धीकारणें ॥ ४७ ॥ गुरुची काय पदवी । ती जनांलागी दावी । प्रभु म्हणोनी सेवी । फुटाणे मूठभरी गुरुगृहीं ॥ ४८ ॥ नाना पक्वानें भोजना । जयासी झोपाया मऊ बिछाना । तो श्रीकृष्ण करी शयना । घोंगडीवरी गुरुगृहीं ॥ ४९ ॥ जो सर्वात्मा रविकुलभूषण । तो कौसल्यात्मज रघुनंदन । तो श्रीगुरु वसिष्ठाचे नमुनी चरण । विद्याभ्यास शिकतसे ॥ ५० ॥ हे ज्ञानविज्ञानाचे मेरू । स्मरतां नाम ते कल्पतरू । त्यांसी कासया पाहिजे गुरु । परि सद्गुरु महिमा अगम्य असे ॥ ५१ ॥ तो वाढवावया कारण । देवही वंदिती

गुरुचरण । मानवदेहाचे सार्थक जाण । गुरुपदीं विश्वास ठेवितां ॥ ५२ ॥ ब्रह्मा, विष्णु, महेश्वर । त्रय देवांचा जो दत्तावतार । तो जगद्गुरु जगदीश्वर । असे त्रय भुवनींचा ॥ ५३ ॥ तोहि घेतो उपदेश । करोनी गुरु चौवीस । सजीव आणि निर्जीवास । मान देऊनी कैशापरी ॥ ५४ ॥ दत्तात्रेय-ग्रंथावलोकन । श्रोतेयां न करितां श्रवण । काय घेतली शिकवण । येईल सकल कळोनियां ॥ ५५ ॥ गुरुवाचोनी नलगे सोय । गुरु एकचि तरणोपाय । गुरु माउली एकचि होय । भवतारक ही नौका ॥ ५६ ॥ गुरुपदाची काय महती । वेदही वर्णितां थकती । तेथे माझी वाचाशक्ति । पासंगींहि ना पुरे ॥ ५७ ॥ शाळेंतील शिक्षकास । न पडती शिकविण्या सायास । कथितां एकचि समयास । सकल ध्यानीं येतसे ॥ ५८ ॥ रूपावळी अमरकोश । समासचक्र तें विशेष । आणिक कितीएक अभ्यास । गृहासी होत अति त्वरें ॥ ५९ ॥ त्यांतुनी मिळतां अवसर । एकांत स्थलीं भूवरी घालुनी पद्मासन । करूनी वृत्ति स्थिर । बाल-तपस्वी बैसती ॥ ६० ॥ काय करिती आराधना । कोणतें ध्यान मिटोनी नयनां । पाहतां वाटे जनां । समाधि काय लागली ॥ ६१ ॥ ऐसा दिनभरीचा काळ । अभ्यासीं जाय अमोल । इकडे सीताराम बाळ । काय करीत गृहांत ॥ ६२ ॥ भक्तांचिये सहवासांत । देव राहती स्वानंदांत । ऐसे बोलताती संत । अनुभवासी तें येतसे ॥ ६३ ॥ आपुलो जननी आणि जनक । यांसी बालस्वभावें वागणूक । करोनी दाखविती कौतुक । सुखविती सकलांसी ॥ ६४ ॥ कोणत्याहि कार्यांसी तत्पर । माता गृहींचा काढो केर । आपुला लावुनियां कर । केर कांढूं लागतसे ॥ ६५ ॥ दळूं लागतां दळूं लागे । कांडूं लागतां कांडूं लागे । दही घुसळतां रवि मागे । मीच घुसळतों म्हणोनियां ॥ ६६ ॥ देवपूजेची तयारी । करी माता देवघरीं । चंदनी खोड घेऊनी करीं । गंध उगाळूं लागतसे ॥ ६७ ॥ वडील फुलें तोडिती । परडी धरी हा राम हाती । जई पूजेलागीं बैसती । तें देव ताम्हनी ठेवितसे ॥ ६८ ॥ वडिलांसम पोथीचे पान । आपुल्या हातीं घेऊन । बोबडच्या बोलें करी गुणगुण । पोथी वाचितो बाळ हा ॥ ६९ ॥ प्रत्येक कामीं अडथळा । खोळंबा

करावा वेळोवेळां । म्हणतां तुज काम न ये बाळा । रुसुनी बसावें कोपऱ्यामाजी ॥ ७० ॥ समजूत न होय लवकरी । क्रोध दावी माय वरी । परि प्रेम ठेवून अंतरीं । रागे त्यावरी भरितसे ॥ ७१ ॥ ऐशा दावुनी रम्य लीला । लावावें तयांसी हसावयाला । कधी भासवावें त्यांजला । आपण भ्यालों म्हणोनियां ॥ ७२ ॥ असे आवडता प्रकार । प्रीति दूधभातावर । घेई काळजी निरंतर । माता गृहीं दुधाची ॥ ७३ ॥ दूध नसतां कवणे दिवशीं । रहावें तयाने उपाशी । दूध-भात कालवोनी देशी । तैं जेवीन म्हणतसे ॥ ७४ ॥ कौसल्यात्मज श्रीरामा । खेळाया पाहिजे होता चंद्रमा । अमोल वस्तु मंगलधामा । देतां न रुचती तयाला ॥ ७५ ॥ दशरथें नृपें काय केले । दर्पणीं प्रतिबिंब दाखविले । तेणें समाधान जाहले । प्रभु रामचंद्राचे ॥७६॥ बालहट्ट असे कठिण । परि तो पुरविला पाहिजे प्रयत्नेंकरून । तैशी ही जनक-जननी जाण । सीतारामा समजावितो ॥ ७७ ॥ बालस्वभावें करून । जमवी सवंगडी आपुल्या समान । नजीकच्या वनीं जाऊन । खेळ खेळतीं स्वच्छंदें ॥ ७८ ॥ दिवस जाय मावळून । अंधार पडे चहूंबाजूनं । शेवटीं नाईलाज समजून । गृहांसी येती आपुल्या ॥ ७९ ॥ पुत्रवात्सल्य अपार । त्यासम बंधुप्रेम साचार । असें न घडो वारंवार । म्हणोनी काय त्याजला सांगती ॥ ८० ॥ वदती सीतारामा ऐक कानीं । गोष्ट कथितो तुजलागोनी । या वनामाजीं एके दिनीं । काय असे जाहलें ॥ ८१ ॥ अंधार पडलियावरी । राहूं नये वनांतरीं । गृहासी यावें झडकरी । तुम्ही सकलांनी आपुल्या ॥ ८२ ॥ एक बागुलबुवा काळा काळा । आकाशांतुनी येतो सायंकाळा । पाहुनियां लहान बाळां । काय तोही करीतसे ॥ ८३ ॥ सान मुलें पकडूनी । नेई आपुलिये सदनीं । ठेवीतसे कोंडूनी । रूप विक्राळ दावीतसे ॥ ८४ ॥ मग एकेक मुलासी घरून । कोवळ्या काकडी-समान । जबड्यामाजीं घालून । चाऊनी गट्ट करितसे ॥ ८५ ॥ आपण आलो आहोंत जगतीं । खेळ खेळुनी दिनराती । काय बागुलाचे हातीं । सापडावें सीतारामा ॥ ८६ ॥ आतां हा बागुल कोण । कैशी दाविली आन्तर खूण । उमजती हे ज्ञानी जन । नको मज सांगाया

॥ ८७ ॥ ऐशी बागुलाची ऐकतां गोष्टी । भय पावला असे पोटीं । सांगे सवंड्यांसी मात मोठी । भीति उत्पन्न करोनियां ॥ ८८ ॥ तयीं पासूनी हो खेळ पुरा । दिवस असे तोंच येती घरा । बागुलबुवाचा दरारा । भरला सकलांच्या मानसीं ॥ ८९ ॥ माता-बंधूस द्यावया मान । धरिलें सितारामें अज्ञान । भय काय असे त्यासी जाण । त्या विक्राळ बागुलाचें ॥ ९० ॥ झणीं झोपेना पाळण्यांत । यशोदेचा श्रीकृष्णनाथ । तयासी भय दावावया वदत । येईल बागुलबुवा द्वारासी ॥ ९१ ॥ पाही बागुलापरिस हा बागुल थोर । काळाचाहि काळ भयंकर । आले कैलासपती शिवशंकर । श्रीहरिदर्शना द्वारासी ॥ ९२ ॥ बोला फुला पडली गाठ । तेंवि द्वारीं उभा नीळकंठ । जाहली हरिहरांची भेट । पावन यशोदा जाहली ॥ ९३ ॥ तेंवि व्यघ्रसिंहासी जो दटावीत । गिरिकंदरे ओलांडित । भूतसमंधां हाणित । त्यासी भय काय असे ॥ ९४ ॥ येईल पुढती ग्रासावया । मानव देह हा जाईल वाया । तो संसार-बागुला ग्रासूनियां । पुढे चालला हा धाडसी ॥ ९५ ॥ वाचितां हा ग्रंथ पूर्ण । येईल आपणां कळोन । पुढे पहावे एक दिन । काय असे जाहलें ॥ ९६ ॥ रामदूत जो रुद्रावतार । तयासी पूजिती नारी नर । शनिप्रदोष शनिवार । संध्यासमय तो असे ॥ ९७ ॥ अंगणीं तुळशीवृंदावनीं । माय गेली नीरांजना लावुनी । वासुदेव-सीतारामांनी । नियमित प्रार्थना केली असे ॥ ९८ ॥ त्वरें पातले अंगणांत । वासुदेव तटस्थ उभे राहत । वाटे मार्गप्रतीक्षा करित । कवणाची न कळे पाहतां ॥ ९९ ॥ तितुक्यांत एक जटाधारी । भस्म चर्चिले शरीरीं । शुभ्र वस्त्र परिधान करी । गौर कांती सतेज ॥ १०० ॥ बगलेमाजी व्याघ्रांबर । गळा रुद्राक्षमाळा सुंदर । मागूनी डोकावे फणिवर । ऐसा जोगी एक पातला ॥ १ ॥ देव ओळखे देवासी । ज्ञानी ओळखे ज्ञानियासी । पतिव्रता ओळखे पतिव्रतेसी । परि अज्ञान कोणी ना ओळखे ॥ २ ॥ तेंवि म्हणे आला आला । बागुल मला धरावयाला । आतां नेऊनियां मला । खाऊनियां टाकिल ॥ ३ ॥ ऐसे म्हणोनियां पळे । पळतां पळतां अडखळे । वासुदेव मनीं कळवळे । सीतारामा जवळी घेतसे ॥ ४ ॥

सान बंधूवरी अति प्रीति । लाडक्या नामें संबोधिती । भल्या भल्या नको भिऊं म्हणती । नसे तो जोगी बागुल ॥ ५ ॥ जोगी हा निरखोनी पाहे नयना । तात करिती लिंगपूजना । तो शिव सांब कैलासराणा । आला दर्शन द्यावया कारणें ॥६॥ ॐ नमः शिवाय शंकरा । पार्वतीनाथा परमेश्वरा । विश्वनाथा विश्वंभरा । भाललोचना नमोऽस्तु ते ॥ ७ ॥ गंगाधरा भोगिभूषणा । गिरिजापते त्रिनयना । विश्वव्यापका विश्वंभरणा । भोलानाथ नमोऽस्तु ते ॥ ८ ॥ ऐशी स्तुती करून । घाली वासुदेव लोटांगण । वंदिले प्रेमभावें चरण । शिव शंकर प्रभूचे ॥ ९ ॥ तैसेच करी अनुकरण । सीताराम हा बाळ सान । भोलानाथ हो प्रसन्न । मस्तकीं हस्त ठेवीतसे ॥ ११० ॥ वासुदेवकर्णांत । काय सांगती गुह्यार्थ । कोण जाणे तो मथितार्थ । त्याचा तोचि ओळखतसे ॥ ११ ॥ भयवारें गेलें निघोन । सीताराम हो तल्लीन । तितुक्यामाजी गृहातून । तात येती बाहेरी ॥ १२ ॥ पाहती तों आपुले सुत । जोडोनियां उभे हात । उभारिला असे वरद हस्त । शिवशंकर प्रभूचा ॥ १३ ॥ त्वरें धावूनियां जाती । चरणीं मिठी मारिती । प्रेमाश्रूंनी न्हाणिती । पदकमल प्रभूचें ॥ १४ ॥ गिरिजावर असे प्रसन्न । स्वकरें उठवी भक्तालागून । उद्‌गार निघती मुखांतून । उमापतीच्या तेधवां ॥ १५ ॥ वदती धन्य तुझी गणेशभक्ता । एक तपाची सार्थकता । गाणगापुरीं पावली दत्ता । तो स्वयें आला तुझ्या घरीं ॥ १६ ॥ गत कालाचें भविष्य कथन । तैसेंच पुढती होणार जाण । अचूक सांगती पित्यालागून । ऐकतां मानसीं सुखावती ॥ १७ ॥ आज प्रदोषकाळीं देऊनी दर्शन । प्रभो मज केलेत पावन । पुनरपि साष्टांग वंदन । प्रेमभावें करितसे ॥ १८ । क्षणीं लवते जों न नेत्रपाती । तो अदृश्य झाले कैलासपती । गणेशपंत विस्मय करिती । म्हणती म्यां काय देखिले ॥ १९ ॥ आनंद न समाये मना । करीं धरिले द्वय नंदनां । जाहला संवाद सांगती सदना । तातास आणि कांतेसी ॥ १२० ॥ करोनी पुत्रां लिंबलोण । दृष्ट टाकिली रमेने काढून । स्वहस्तें भरवुनी भोजन । सुत दोघे झोपवीले ॥ २१ । ह्या सहाव्या अध्यायामाजीं जाण । जाहलें श्रीदत्तात्रेयाचें दर्शन ।



श्री रंगअवधूत महाराज, नारेश्वर (गुजरात).



प. पू. श्री योगीराज वामनरावजी गुळवणी महाराज, पुणे.

आतां पुढे चरित्रकथन । करावें सीतारामाचें ॥ २२ ॥ श्रीदत्तात्रेय आणि शिवशंकर । दोन्ही एकचि साचार । छंद लागो निरंतर । जानकीस नामाचा ॥ २३ ॥ इति श्रीसीतारामचरित्रालंकारमणि । गुंफिला असे दृष्टांत-कोंदणीं । प्रकाश दाविता अंतःकरणीं । षष्ठ अध्याय गोड हा ॥ १२४ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

षष्ठोऽध्यायः समाप्तः ।

अध्याय सातवा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाया नमः ॥ ॐ नमो जी गोविंदा । गोवर्धनोद्धारका मुकुंदा । मुरलीधारका । आनंदकंदा । लाविसी तव छंदीं गोपगोपी ॥ १ ॥ ऐकतां नाद मुरलीचा । तटस्थ राहिल्या चारी वाचा । गोकुळवासी सकल जनांचा । धंदा हातींचा राहतसे ॥ २ ॥ कुणी करिती आंघोळी । कुणी घालिती अंगीं चोळी । कुणाच्या हातीं लाटणे पोळी । तशीच धावते गोपबाला ॥ ३ ॥ ओसंगीं घेउनी बाळ तान्हा । कुणी करविती स्तनपाना । तशाचि उठतीं घेउनी बालकांना । धावती सकल तुझ्याकडे ॥ ४ ॥ सकलांचें हरपे भान । होती नादब्रह्मीं तल्लीन । एक लक्ष त्यांचें जाण । लागे श्रीकृष्ण चरणासी ॥ ५ ॥ त्याचपरी गाई गोठणीं । ऐकती कान टवकारोनी । वाचाहीन तरी अंतःकरणीं । श्रीकृष्णचिंतना करिताती ॥ ६ ॥ तेंवि वृक्षाबरी विहंगम । गुंजारव करिती उत्तम । मधुवनीं मुरली मेघःश्याम । वाजवितां होती तल्लीन ॥ ७ ॥ धन्य ते गोकुलवासी जन । गाती अखंड श्रीहरीगुण । पशु, पक्षी, वृक्ष, पाषण । तेही पावन जाहले ॥ ८ ॥ परी प्रभो श्रीकृष्णा । चरणीं एक याचना । नामामृतीं माझी रसना । राहो सदा खेळती ॥ ९ ॥ तेणेंचि माझी कामना । पूर्ण दयाघना । हीच मनींची भावना । नामीं असे जडलेली ॥ १० ॥ तरी वासुदेवा भगवंता । अत्रि अनसूयेच्या सुता । दिगंबरा श्रीगुरुदत्ता । सहा अध्याय त्वां पूर्ण केले ॥ ११ ॥ आतां सातव्याची संगति । लावून देशील माझ्या हातीं । मागील अध्यायी तूं कैलासपती–। रूपें येउनी दर्शन दिलेंसी ॥ १२ ॥ वासुदेव, रामा हरि । त्रैमूर्ति ही टेंभ्यें-घरीं । संतोष देतसे अंतरीं । मातापित्यांस सकलांसी ॥ १३ ॥ तुम्ही भाग्यवंत श्रोते सकळ । चला जाऊं एक वेळ । पाहूं बालकांचा खेळ । त्यांच्या संगतीं राहूनियां ॥ १४ ॥ मार्गशीर्ष महिना हिवाळा । त्यामाजी एक्या पर्वकाळा । गावाची नदी निर्मळा । जाती स्नानासी सकळिक ॥ १५ ॥ त्या गावच्या सरितेला ।

दि गं ब रा दि गं ब रा

पवित्र नाम निर्मला । कैसें पडलें हें आपणाला । कळलें पाहिजे ॥ १६ ॥ कांही कार्यानिमित्त । महाराज बाहेर गावीं जात । परतोनी पुनरपि जें येत । ग्रामसीमेवरी तें ॥ १७ ॥ जिचें असे निर्मळ पाणी । ती झुळझुळ वाहत होती तटिनी । येतां वासुदेवमहाराजां पाहुनी । एक स्त्री तेथे प्रकटली ॥ १८ ॥ तेजस्वी अंगकांती । कुरळ केश पाठीवरती । सुवर्णकांतीसम वसन नेसती । वंदिती जाहली महाराजां ॥ १९ ॥ गंगा, यमुना, मंदाकिनी । गोदा, भीमा, इंद्रायणी । नर्मदा, कावेरी नामें वाहिनी । असती परी मज नाम नाही ॥ २० ॥ म्हणोनी प्रभो वासुदेवा । तुमचें वास्तव्य ह्या माणगावा । तरी माझें नाम ठेवा । परिसा विनंति ही माझी ॥ २१ ॥ श्रीवासुदेव महाराजांनी । पाहिलें तिजकडे निरखोनी । म्हणती बाई आज पासोनी । तुझें नांव निर्मळा ॥ २२ ॥ स्वामीस न्यावया कारणीं । भजनमेळा गावांतूनी । त्याच समयीं येउनी । सरितेकाठीं पातला ॥ २३ ॥ सांगती सकलांकारण । आम्ही आजपासून । ह्या सरितेचें नाम जाण । निर्मला असें ठेविलें ॥ २४ ॥ ही मना देतसे आल्हाद । तीरीं कर्म करितां हो फलप्रद । स्नाम करितां खेद । मानवाचा हरपतो ॥ २५ ॥ जैशो हरिद्वारची गंगा । पंढरीची चंद्रभागा । तैशी भवतापत्रयभंगा । निर्मला असे माणगांवीं ॥ २६ ॥ ऐशी ही पवित्र निर्मला । धुते अंतरींच्या मळा । श्रीवासुदेवें पावन हिला । केलें असे ह्या गांवी ॥ २७ ॥ म्हणोनी आया बाया सर्वजणी । वृद्ध, बालकें, तरुण, तरुणी । तैशीच वासुदेव-हरि-राम घेऊनी । निर्मलातीरीं रमा गेली असे ॥ २८ ॥ जनसमुदाय दुथडी । कुणीं गंगेमाजीं मारिती उडी । गर्जती हर हर गंगे आवडीं । भरे हुडहुडी वृद्धांसी ॥ २९ ॥ कुणी करिती संध्यास्नाना । कुणी देती गोप्रदाना । कुणी श्रीसवितृसूर्यनारायणा । अर्घ्यप्रदाना देताती ॥ ३० ॥ कुणी ओढिती फरफरा । स्नान घालिती लेकरा । म्हणती जाणें असे घरा । त्वरित मज कार्यासी ॥ ३१ ॥ थंडगार असें जळ । निर्मळा नदीचें निर्मळ । झोंबतां अंगासी बाळ । रुदन करितां समजाविती ॥ ३२ ॥ वातुदेव परब्रह्म सोज्वळ । करोनी स्वयें आंघोळ । भरोनी हाताची ओंजळ ।

श्री पा द ब ल्ल भ दि गं ब रा

अर्घ्य देती नारायणा ॥ ३३ ॥ उभे राहूनी जलांत । जोडोनियां दोन्ही हात । मुखें सूर्यस्तुती गात । संस्कृतवाणीं स्पष्टत्वें ॥ ३४ ॥ राम-हरीसी घालुनी स्नान । अंग घेतले पुसोन । धुवट अंगीं घालून । तीरीं बैसविलें वाळवंटीं ॥ ३५ ॥ तापत्रय तापवी अंगा । परि भाव मनीं धरितां अभंगा । स्नानमात्रें ही निर्मल गंगा । अंतरंगाही शांतवी ॥ ३६ ॥ काठीं समान सवंगडी । जवळी आले तातडी । खेळावयाची आवडी । सकलांनी दाविलीं असे ॥ ३७ ॥ राम, हरि, वासुदेव । गोविंद, श्रीधर, माधव । नारायण, केशव, महादेव । अच्युत, वामन. नरहरी ॥ ३८ ॥ नजिक एक वृक्ष थोर । फांद्या पसरल्या सभोवार । तळीं बांधिला असे पार । भव्य आणि मजबूत ॥ ३९ ॥ बालकें सकळ तेथे जमती । कोणता खेळ खेळावा वदती । कोणी हूतूतू सांगतीं । कोणी म्हणती आटयापाटया ॥ ४० ॥ कोणी म्हणती लपंडाव । कोणी म्हणती शिवाशीव । कोणी म्हणती देवदेव । खेळ खेळूं हा चांगला ॥ ४१ ॥ जो सकलां आधीं पूजिती । तो होईन म्हणें एक मी गणपती । दुजे तुज सोंड नाही म्हणती । कैसा गणपती होशील तूं ॥ ४२ ॥ तुझें नाही ढेबर पोट । एकचि दिसे पोट पाठ । गजानन होण्यास पाहिजे शेठ । फार मोठया पोटाचा ॥ ४३ ॥ तें न रुचे कवणाप्रती । दुजा म्हणे मी होईन मारुती । हांसोनी सकल मुलें वदती । अरे शेपटी तुज कोठे असे ॥ ४४ ॥ एक म्हणे मी अंबाबाई । होउनी बसेन एक्या ठाई । पूजा मज तुम्ही येऊनी सर्वही । उदो उदो करोनियां ॥४५॥ गदगदा मुलें हासती त्यासी । म्हणती तूं अंबाबाई कैसा होशी । साडी चोळी नेसावयासी । कोण देईल तुजलागीं ॥ ४६ ॥ पाहिजेत कृष्णवर्ण केश माथ्यावर । लांबसडक वेणी पाठीवर । भासे जैसे फणीवर । पाहतां कोणी त्रिजला ॥ ४७ ॥ ऐशिया परी मुलें रमती । नाचती हासती विनोद करिती । परि जवळी असोनी ना ओळखती । देवा श्रीगुरुदत्तात्रेया ॥४८॥ हरी सकल मुलांसमवेत । सिताराम वासुदेवा ना सोडित । आलीं मुलें समस्त । होते वासुदेव तेथे ॥ ४९ ॥ इकडे वासुदेव बालमूर्ति । पारावरी हो बैसती । अर्धोन्मीलित नेत्रपातीं । नासाग्रीं दृष्टी खिळली असे ॥ ५० ॥

घातलें असे पद्मासन । असे मी सदा प्रसन्न । ऐसे द्वय हात ठेवून । हास्यवदन करोनिगां ॥ ५१ ॥ अद्वैत असे बंधुप्रेमा । त्याहूनियां सद्गुरुमहिमा । जागृत असे सिताराम। हृदयीं असे ठेविला ॥५२॥ बैसला असे तत्समान । सीताराम बंधु सान । दोन्ही हात जोडून । पाया जवळी बसला असे ॥५३॥ नामस्मरण मुखांत । दत्त दत्त श्रीगुरुदत्त । मुलें उमगलीं समस्त । आपुलिये मानसीं ॥ ५४ ॥ म्हणती वासुदेव भगवंत । येथेचि असती श्रीगुरुदत्त । आतां एकमुखाने समस्त । करा भजन दत्ताचें ॥ ५५ ॥ सान बाळें वेल्हाळ । मन तयांचें असे निर्मळ । निर्मळा-तीरीं प्रेमळ । भजन करिती आनंदें ॥ ५६ ॥ नादब्रह्मीं एक टाळी । गर्जत जाय निराळी । रंगली बालमंडळी । भजनीं जाहली तल्लीन ॥ ५७ ॥ दत्त गुरु दत्त गुरु । तूंचि आमुचा कल्पतरु । तुझेंचि नाम आम्ही स्मरूं । दत्तात्रेया वासुदेवा ॥ ५८ ॥ एक-टाळीचा नाद । त्यांत घुमले अमोल शब्द । तटिनीकांठीं जन स्तब्ध । सभोवती नारीनर ठाकिती ॥ ५९ ॥ वाटे दिंडी ये कोठून । चालली काय गाणगापुरा लागून । करी ती अवधूत-श्रीगुरुचिंतन । गजतसे ही स्वानंदें ॥ ६० ॥ चहू दिशा विलोकुनी । जन पाहती तटस्थ नयनीं । भाविकांच्या शब्द वदनीं । येऊं लागले दत्त दत्त ॥ ६१ ॥ रात्रंदिन सहवास । असे ज्यांच्या गृहास । खूण पटेल त्यां मनास । ज्याची त्याला लवकरी ॥ ६२ ॥ तेंवि गणेशपंत रमाबाई । वृद्ध आजोबा हरिभट्ट तेही । धाव घेतली लवलाही । बालकें खेळती त्या स्थलीं ॥६३॥ पदरीं पूर्व-सुकृताची जोडी । नामस्मरणीं त्यांनाच गोडी । चालले असती तातडी । आवडीने त्यांच्या सवें ॥ ६४ ॥ जयांचीं बालकें खेळांत । रमलीं होतीं स्वानंदांत । त्यातूनहि कांही जात । कांही राहती तीरीं उभी ॥ ६५ ॥ आळशीयासी गंगा दूर । पाप्यासी न आठवे पंढरपूर । तैसा जवळी असोनी परमेश्वर। अभक्त जाती न त्या स्थळीं॥ ६६ ॥ कर्म तैसें फळ पदरीं । बुद्धि तत्समान कार्य करी । तरी आपण पहावा पारावरी । भक्तिभाव तो बालकांचा ॥ ६७ ॥ रूप साठविलें हृदयकमळीं । नेत्र झाकुनी घेती सकळी । तात माता येती जवळी । कोणी न पाहती त्याकडे

॥ ६८ ॥ अजाण म्हणती हीं बालकें । आतां देतां यांसी भातुकें । कोठला दत्तात्रेय हा देखे । संपेल खेळ आताची ॥६९॥ जो अंतरीं चाले भक्तिपंथीं । तयासी श्रीगुरुदत्त दर्शन देती । होई बालकासम वृत्ति । क्षणामाजी तयांची ॥ ७० ॥ झणीं पसरला मायापडळ । संपला बालकांचा खेळ । करीं धरोनी आपापले बाळ गोपाळ । जाती सदनीं आपुल्या ॥ ७१ ॥ धन्य धन्य तीं बालकें सर्व । ज्यांनी वंदिला असे वासुदेव । पदीं जडला असे भाव । त्यांचे त्यांचे मातापिता ॥७२॥ दिवसांमाजी एकवेळ । आठवावा हा बाळ खेळ । हीच इच्छा दत्त दयाळ । पुरवील आमुची निश्चयें ॥ ७३ ॥ आश्चर्यचकित नानापरी । खेळ होती किती एक घरीं । परी पुत्रवात्सल्य अंतरीं । ओळखी ना होतसे ॥ ७४ ॥ जें वासुदेवास शिकविती । तेंच राम-हरी शिक्षण घेती । बुद्धिसामर्थ्यासी भरती । नसे ओहोटी त्या कधीं ॥ ७५ ॥ नवव्याच वर्षीं आजोबांनी । योजिलें वासुदेवा व्रतबंधनीं । ब्रह्मचर्य-व्रतीं तेंपासूनी । वासुदेव राहती ॥७६॥ संध्या करिती त्रिकाळ । गायत्री मंत्राची जपमाळ । ब्रह्मचारी हा वासुदेव बाळ । न आळस करी कदापि ॥ ७७ ॥ जो स्वयं दत्त दयाघन । तो नित्य करी गुरुचरित्रवाचन । आणि अनेकदां पारायण । गणती न त्याची होतसे ॥ ७८ ॥ त्या कालाला अनुसरून । गृहीं होतसे वेदाध्यायन । शुचिर्भूत सदा राहून । कैशापरी राहणी असे ॥ ७९ ॥ परि पूर्ण न होतां अभ्यास । इहलेकींचा प्रवास । संपला आजोबांचा सहवास । गेले विश्रांति घ्यावया ॥ ८० ॥ आजोबांचे कृपाछत्र । असे बालकावरी अहोरात्र । मार्ग दाविती पवित्र । प्रेमवर्षाव करोनियां ॥ ८१ ॥ या समयीं गृहांत । नसती वडील गणेशपंत । असती गाणगापुरांत । चिंतनीं श्रीगुरुदत्ताच्या ॥ ८२ ॥ म्हणोनी बालकृष्णांनी । गणेशपंताच्या कनिष्ठ बंधूंनी । कर्मविधी सारूनी । पुढती काय केलें असे ॥ ८३ ॥ वडिलांचा आधार कांही । गृहामाजीं राहिला नाही । बालकृष्णांचा स्वभाव तोही । होता अति वेगळाच ॥ ८४ ॥ गृहांतील चीजवस्त । सकल घेतली पदरांत । बोचकें बांधोनियां जात । एके रात्रीं निघोनियां ॥ ८५ ॥ पडले न कधी कवण्या काजा । शिरीं ठेविला

असे बोजा । पंचशत रुपयांचिया कर्जा । जाते समयीं तयांनी ॥ ८६ ॥ गृहामाजी मातेविना । आधार कवणाचा मुलांना । अति मानसिक यातना । होती त्या माउलीसी ॥ ८७ ॥ कांही सांभाळावें जतनीं । ऐसें कांहीहि न राहिलें सदनीं । परि कर्जबोजा नयनीं । दिसत होता सारखा ॥ ८८ ॥ ऐसें कुटुंबावरी बिकट । पडलें असे संकट । कृष्णमेघांचें घनदाट । सावट असे पडलेलें ॥ ८९ ॥ काय परमेश्वराची आखणी । न ये ओळखितां कवणीं । येई झडकरी धावोनी । आश्रय द्यावया कारणें ॥ ९० ॥ तैसा बुद्धिदाता परमेश्वर । आले नानाजी कोनकर । त्यांनी उचलिला सकल भार । काळजी दूर केली असे ॥ ९१ ॥ प्रापंचिक परिस्थिति । काय असे गृहाप्रती । एक पंचा नेसती । एक दांडीवरी असे ॥ ९२ ॥ आणिक ग्रंथी वदावें सर्व । तरी व्याकुळ होई जीव । आज प्रत्येका जाणीव । अनुभवासी येतसे ॥ ९३ ॥ ऐसे जरी येती प्रसंग । तरी व्रता न होई कधीं भंग । सुप्रसन्न वृत्ति दंग । असे लय परमेश्वरीं ॥ ९४ ॥ राहिलें जरी या कारण । वासुदेवाचें वेदाध्ययन । आणि इतरहि शास्त्रश्रवण । सकलहि मागासलें ॥ ९५ ॥ परि चैन न पडे मानसीं । ध्यास लागला असे तयासी । करावें पूर्ण अध्ययनासी । कवणे स्थळीं जाऊनियां ॥ ९६ ॥ तारक मंत्र ना गुरुविना । ही हृदयाची पूर्ण भावना । ना तरी अशक्य त्यांना । काय होतें या जगीं ॥ ९७ ॥ खरी कळकळ असतां मनीं । साह्य होतो चक्रपाणी । यश येतें प्रयत्नीं । थोर उक्ति ही सत्य असे ॥ ९८ ॥ तेंवि वेदशास्त्रसंपन्न । तात्याभट असोन । उपनाम उकिडवे जाण । आणि दुजे ओळकर ॥ ९९ ॥ या शिक्षकद्वयापासून । सदा सोवळ्यांत राहून । वासुदेवाचें वेदाध्ययन पूर्ण असे जाहलें ॥ १०० ॥ शास्त्रशुद्ध पवित्र आचरण । त्रिकाळ शीतजलें स्नान । नित्य नैवेद्य वैश्वदेव करोन । मग भोजन करावें ॥ १ ॥ वेदविद्या जिवंत । अमूप सामर्थ्य तदन्तर्गत । समस्त सिद्धी जाहल्या प्राप्त । बालवयांत वासुदेवा ॥ २ ॥ पार्थिव मूर्तीस देतां आवाहन । मांडल्या पाटीं देतां आसन । प्राणप्रतिष्ठा मंत्रोच्चारण–। करितां सजीवता ये मूर्तीसी ॥ ३ ॥ ऐसें किती एक वेळा अनुभवा ।

प्रत्यया येई वासुदेवा । शुद्ध आणि निर्मळ सेवा । म्हणोनी हा ठेवा जवळी अमे ॥ ४ ॥ तैसेंच संस्कृत आणि ज्योतिष । यांचाहि चालला अभ्यास । जिज्ञासु वासुदेवास । शंभू शास्त्री साधले शिकविती ॥ ५ ॥ कडकडित उपवास । करावा नित्य एकादशीस । घेऊं नये परान्नास । कवणाचिये दुजे घरीं ॥ ६ ॥ वाद कवणासी ना घालणें । असत्य कदापि ना बोलणें । योजिल्या नियमा ना मोडणें । जीवावरी बेतलें तरी ॥ ७ ॥ पर्जन्य जरी कोसळे । आतपीं चरण पोळती कोवळे । तरी कदापि ना अंगीकारलें । छत्र, पादत्राण वासुदेवाने ॥ ८ ॥ मातेविषयीं अत्यंत । नम्रता बाळगावी हृदयांत । पूज्य जें मातृदैवत । त्रिकाल चरण ते वंदावे ॥ ९ ॥ ही पावित्र्याची सरिता । अखंड सदाचरणीं वाहतां । मिळे ज्या मानवा सन्निधता । तो पावन होय निःसंशयें ॥ ११० ॥ महातपस्व्यासमान । हें बाल तपस्व्याचें आचरण । ठेविलें असे आदर्श जाण । जनांपुढे वासुदेवें ॥ ११ ॥ माणगाव-भवतालीचे जन । पाहून आचार हा विलक्षण । आदर वाढला असे जाण । सद्भावना त्याहुनी ॥ १२ ॥ आचार विचार सारासार । शुद्धत्वें जबळी साचार । संचित असेल बलवत्तर । तरीच जवळी नांदतसे ॥ १३ ॥ तेंवि हा काय असे मानव । सगुणरूप हा देवाधिदेव । श्रीदत्तदयाघन वासुदेव । टेंब्ये-गृहीं अवतरलासे ॥ १४ ॥ ज्याचे पवाडे वर्णितां । वेदहि धरिती मूकता । सहस्र मुखांनी वर्णन करितां । शेषहि थकुनी जातसे ॥ १५ ॥ तेथे माझी काय शक्ति । वाचा, बुद्धि अल्पशक्ति । ज्यांच्याच कृपेने ही स्फूर्ति । उदेली असे ये ग्रंथार्थी ॥ १६ ॥ वडील असती गाणगापुरीं । आजोबा गेले स्वर्गांतरीं । सांभाळिती वासुदेव घरीं । माय आणि बंधूंसी ॥ १७ ॥ चरित्रावरूनी या पितृसुख । सीतारामा न मिळाले देख । परि पाठीराखा वैकुंठनाथ । रक्षिती वासुदेव सर्वदा ॥ १८ ॥ जन्मापासूनी आवडी । चरणकमलांची लागली गोडी । स्कंधीं घेतली कावडी । भावभक्तीने सेवेची ॥ १९ ॥ वासुदेव सद्गुरु ही भावना मनीं । त्यांत सुयोग येतसे घडोनी । केला व्रतबंध वासुदेवांनी । सीताराम बंधूचा ॥ १२० ॥ आतां मनीची दृढ भावना ।

वाढती झाली असे जाणा । धाव घेई तीर्थ-चरणा । भेटावया कारणें ॥ २१ ॥ ब्रह्मचारी सीतारामांची राहणी । कैसी व्रतस्थ असोनी । हें येईल कळोनी । पुढीलिये अध्यायीं ॥ २२ ॥ ही वासुदेवसीतारामकथा सुरस । अनुसंधाने ये श्रवणास । सीतारामचरित्रास । साह्य असे या माउलीचें ॥ २३ ॥ बासुदेव नामाचा ध्यास । लागला ज्याच्या हृदयास । प्राणी मोक्षपदास । पावेल पावेल पावेल गा ॥ २४ ॥ तोच आधारस्तंभ या ग्रंथाचा । सीताराम चरित्राचा । जानकीचा भाव साचा । चरणीं जडो निरंतर ॥ २५ ॥ इति श्रीसीतारामचरित्रालंकारमणी । गुंफिला असे दृष्टांत-कोंदणी । प्रकाश दाविता अंतःकरणीं । सप्तम अध्याय गोड हा ॥ १२६ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

सप्तमोऽध्यायः समाप्तः ।

अध्याय आठवा

श्रीगणेशाय नमः ।। श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ।। श्रीवासुदेवाय नमः ।। ॐ नमो जी सदाशिवा । आत्मलिंगा देवाधिदेवा । पार्वतीरमणा महादेवा । जय जय शंकरा नमोऽस्तु ते ।। १ ।। तूंच माझें आराध्य दैवत । शिव सांब प्रभु कैलासनाथ । शिवशंकरा तूं भोलानाथ । गाजे डंका हा त्रिभुवनीं ।। २ ।। तुझें करितांची नामस्मरण । भक्तांवरी तूं प्रसन्न । गोवत्स कापिले शिव शिव म्हणोन । ऐसी पापीण त्वां उद्धरिली ।। ३ ।। महातपस्वी करिती तप । करिती तुझिया नामाचा जप । सहस्त्र जन्मीचे जळे पाप । दर्शन होतांची तुझें ।।४।। मातेचा क्रोध जैसा वरीवरी । चुकतां बालका ताडन करी । परि तें रुदन करितां झडकरी । धरी पोटाशी त्याजला ।। ५ ।। त्याच रितीं तूं त्रिपुरारि । कठोरता दाविसी वरी वरी । परि तुझिया हृदयसागरीं । दयेच्या लाटा उसळती ।। ६ ।। भक्ति पारखण्या अढळ । रूप धरिलें त्वां ओंगळ । मागसी पुत्रमांसकवळ । सत्त्व हराया कारणें ।। ७ ।। धन्य धन्य चांगुणाश्रीयाळ । धन्य धन्य तो चिलया बाळ । धन्य त्या भक्तांचें मनोबळ । पावन होतो तुझ्या कृपें ।। ८ ।। ही कथा अद्‌भुत । असे शिवलीलामृत ग्रंथात । श्रोतेयांनी सावचित्त । श्रवण करावी आदरें ।। ९ ।। ऐशीं उदाहरणें अमित । त्रिनयना तुझ्या चारित्र्यांत । प्रसन्न होवोनियां किती भक्त । अक्षय पदीं स्थापिले त्वां ।। १० ।। ते निःसीम भक्त थोर । त्यापुढे मी असे पामर । परि शरणागत मी किंकर । दूर लोटूं नको ईश्वरा ।। ११ ।। तूं मायबाप मी लेकरू । नको माया पातळ करूं । तूच माझा कल्पतरु । धरी आता करासी ।। १२ ।। तुझी आशा अज्ञानासी । अवघड कार्य करावयासी । त्याने जावें कवणापाशी । तुझ्यावाचूनी शंकरा ।। १३ ।। तूंच माझा समर्थ । पाठीराखा भगवंत । तुझ्या कृपेने अध्याय सात । पूर्ण असती जाहले ।। १४ ।। आता आठव्या अध्यायाची आठवण । दे हरिहरा येवोन । तेंच लेखणी करील कथन । माझें सामर्थ्य

कांही नसे ॥ १५ ॥ मागील दोन अध्यायांत । बाललीला केली श्रुत । स्वयें वासुदेव भगवंत । खेळती आपुल्या बंधूसवें ॥ १६ ॥ श्रीवासुदेवांचा विद्याभ्यास । पाळिती ब्रह्मचर्यव्रतास । आजोबा गेले स्वर्गास । भार त्यांवरी गृहींचा ॥ १७॥ पिता गाणगापूर भुवनीं । वय वाढतें होईल म्हणोनी । व्रतबंध करिती या कारणीं । सीताराम बंधूचा ॥ १८ ॥ जैसी वासुदेव सद्गुरुची शिकवण । तैसेंच ब्रह्मचर्यव्रताचें पालन । त्रिकाळ संध्या वेदाध्ययन । न चुके रामाचें कदापि ॥ १९ ॥ गायत्री-मंत्र अष्टोत्तरशत । सूर्य-उपासना नित्य करित । स्वधर्माचें पालन करित । बाल बटू हे सीताराम ॥ २० ॥ जयाने द्विजत्व दिधलें । गायत्री-मंत्राचें अमृत पाजिलें । तेच मोक्षगुरु आपुले । झाली भावना ही दृढतर ॥ २१ ॥ पित्यासमान वडील भ्राता । सद्गुरुसमान भावना चित्ता । ऐसा मानव आज पाहतां । एकहि ना दिसतसे ॥२२॥ होवोनी गेले निवृत्ति-ज्ञानेश्वर । अवतार विष्णू-महेश्वर । तेंवि भासती हे हरिहरेश्वर । वासुदेव आणि सीताराम ॥ २३ ॥ श्रीकृष्ण आणि बलराम । दाशरथी लक्ष्मण आणि श्रीराम । तेंवि वासुदेव आणि सीताराम । द्वय बंधू हे भासती ॥ २४ ॥ गायत्री-मंत्राची काय महती । पटवूनी सीतारामा देती । पिशाच्चें भूतें जवळी न येती । गायत्री-मंत्राच्या सामर्थ्यें ॥ २५ ॥ सकल देवांत महारुद्र । वृक्षांत अश्वत्थ पवित्र । तैसा ब्रह्मकर्मांत मंत्र । गायत्री हा एक असे ॥ २६ ॥ द्विजें शुचिर्भूत होऊन । गायत्री-मंत्र जपतां जाण । मंत्रा सजीवता येईल पूर्ण । शुद्ध वैखरीच्या गुणें ॥ २७ ॥ परि पाहिजे विश्वास मना । मग प्रकटेल सद्भावना । होतील पूर्ण कामना । अमोल बोल हे ज्ञानियांचे ॥ २८ ॥ मग येथे तों पाहिली हृदयावरती । विकल्परहित शुद्ध मती । वासुदेव सद्गुरुमूर्ति । बोधिती सीताराम शिष्याला ॥ २९ ॥ व्यावहारिक प्राथमिक शिक्षण । श्रीसीतारामाचें संपवून । गृहीं स्वशाखा-ऋग्वेदाचे अध्ययन । स्वयें वासुदेव करविती ॥ ३० ॥ रुद्र, पुरुषसूक्त, पंचायतन । श्रीदत्तात्रेयस्तोत्रें जाण । वैश्वदेव देवपूजन । सकल कर्में शिकविलीं ॥ ३१ ॥ श्रीवासुदेवमहाराजांनी । आपुल्या स्वहस्तें करूनी । श्रीदत्तात्रेयमूर्ति

बनवूनी । मंदिरांत स्थापिली ॥ ३२ ॥ जैसे वाडींत गाणगापुरांत । उत्सव होती समस्त । तेंवि माणगावांत । होऊं लागले सकलही ॥ ३३ ॥ त्रिकाल पूजा होय आरती । गुरुद्वादशी दत्तजयंती । इत्यादि महोत्सव होती । नित्य भजन होतसे ॥ ३४ ॥ ऐसे उत्सव मोठ्या प्रमाणीं । होऊं लागले माणगांवभुवनीं । यात्रेकरू राहती येबोनी । कित्येक बाहेरगांवींचे ॥ ३५ ॥ सीताराम अल्प वयांत । सकल व्यवस्था राखीत । कांही अनास्था न होऊं देत । अन्न-पाणी-निवासाची ॥ ३६ ॥ बुद्धिचातुर्य, तेजस्विता । थोरासम कार्यकुशलता । पाहोनियां समस्तां । आश्चर्य मनीं वाटतसे ॥ ३७ ॥ गुणी पुरुषाची कोणी न पाहती । कुळ-रूप-वय-जाती । सद्गुणेंच ते पूजास्थान होती । वानिती रामा सकळिक ॥ ३८ ॥ देवत्व अथवा राक्षसत्व । पिशाचत्व अथवा पशुत्व । किंवा जाणावें मनुष्यत्व । गुणकर्मा-वरूनी मानवाच्या ॥ ३९ ॥ कर्तृत्वें सामान्यहि थोर जाण । होय नराचा नारायण । मग सीताराम हे देव पूर्ण । अंश श्रीगुरुदत्ताचे ॥ ४० ॥ जाणताच जाणे जाणत्यासी । ज्ञानी जाणे ज्ञानियासी । तेंवि सीताराम गुणज्ञासी । वासुदेवें जाणिलें असे ॥ ४१ ॥ कौतुकाने भल्या म्हणून । सांगावें सकल कार्य जाण । उत्सवारंभाचें कंकण । बांधावें सीतारामा-करीं ॥ ४२ ॥ तेंवि न झेपणारा वजनदार । भार घेणें हा शिरावर । वय सान जरी इच्छा थोर । म्हणोनिच कार्यें होताती ॥ ४३ ॥ हा ईशप्रेमा जागृत । या कारणें ना त्याचा शीण येत । असती वासुदेव कृपावंत । तैसें सामर्थ्य अंगीं येतसे ॥ ४४ ॥ तैसा गायनाचा असे नाद । कीर्तन-रंगीं अती आवड । नामस्मरणाचाहि छंद । सीतारामास तोषवी ॥ ४५ ॥ हें वासुदेवें करितां अवलोकन । आनंद वाटला मनीं जाण । पाहिला कलाकार त्यालागून । गायनकला शिकविता ॥ ४६ ॥ देती शिक्षकालागून । तीस रुपये वेतन । आज्ञा केली त्यालागून । सीतारामा शिकविण्याची ॥ ४७ ॥ झडकरी होवो कंठगत । गायनकला ही समस्त । ऐसा आशीर्वाद देत । प्रेमभावें सहोदरा ॥ ४८ ॥ मना आवड असल्याविना । कार्यसिद्धी होईना । येथे छंद असे मना । वरी कृपाहस्त मोलाचा ॥ ४९ ॥ जैसे निमित्तमात्रें गुरु

करून । ज्योतिष्य वेदशास्त्रें घेती करून । सत्वर या विद्या कठिण । समस्त अधिगत जाहल्या ॥५०॥ तेंवि स-राग-उपराग-ताल संगीत । सकल जाहलें मुखोद्गत । गुरुजन आश्चर्य करित । कौतुक करिती आनंदें ॥ ५१ ॥ मिळविलें गायन-वादनांत । सीतारामें प्राविण्य त्वरित । एका उत्सव प्रसंगांत । स्वामी परीक्षा पाहती ॥५२॥ जाहली अंतरीची विद्या प्रकट । ऐकतां सकल जन संतुष्ट । वासुदेवें थोपटली पाठ । म्हणती भल्या निपुण असे जाहला ॥ ५३ ॥ वडील बंधूचे भाषण । वाटे धन्य जाहलों ऐकून । सीतारामाचें अंतःकरण । किती म्हणूनी सुखावे ॥ ५४ ॥ किती एक चमत्कार अद्भुत । दाविले रामायणांत । वातात्मजासी वाखाणित । वानरगण समस्तहि ॥ ५५ ॥ घरि त्याचें न वाटे भूषण । गौरवी जेव्हा रघुनंदन । तेव्हाच मारुतीचे अंतःकरण । सुखावे न ये तें वर्णितां ॥ ५६ ॥ थोर लोकांच्या आवडे मना । तसेंच आपुल्या गुरुजनां । स्वानंद होतां त्यांचिया मना । तो सोहळा वेगळाची ॥ ५७ ॥ न चढावें अल्प भाषणीं । पिवळें न व्हावें अर्ध्या हळकुंडानी । हाच धडा आपणा लागोनी । बाल-महाराज हे शिकविती ॥५८॥ रात्रीमाजी नियमित । श्रीदत्तमंदिरांत । द्वय बंधू हे भजन करित । अति आवडी करोनियां ॥ ५९ ॥ सीतारामावरी प्रीति बहुत । क्षणभरी याजला ना विसंबत । कधी तबल्याची करावी साथ । कधी पेटीवादन करावें ॥ ६० ॥ चाली आवडीसमान- । लावुनी काव्यरचना करून । त्यांमाजी नवरस भरून । गाउनी प्रभू आळवावा ॥ ६१ ॥ आधीच माणगांव हें सुंदर । त्यामाजीं हा भजन गजर । जणूं वाटे पंढरपूर । भजन गजरीं दुमदुमतसे ॥ ६२ ॥ पंढरीची चंद्रभागा । तापत्रयहारिणी पापभंगा । येथे वाहे निर्मळा गंगा । माणगावास येवोनी ॥ ६३ ॥ सोडोनी आपुल्या वैकुंठभुवना । पातला येथे कां पंढरीराणा । ऐसें या ग्रामींच्या सकल जनां । वाटू लागलें मानसी ॥ ६४ ॥ तैसें माणगांव सावंतवाडीं । जनांप्रती लागली गोडी । छंद लागला आवडी । दत्तात्रेय–गुरुमाउलीचा ॥ ६५ ॥ कवण्याहि महत्वाच्या कार्यांत । स्वामी भल्याची सल्ला घेत । जैसा श्रीकृष्ण उद्धवाप्रति पुसत । तैसेंच हें मजसी गमतसे ॥ ६६ ॥

जेवि माता आपुल्या कन्येप्रति । गोंडून घेई हनुवटीवरती । तैशीच चंद्रकोर अति निगुती । भालप्रदेशीं घेतसे ॥ ६७ ॥ तेंवि तुळशीपत्रांचा रस काढूनी । आपुल्या स्वहस्ते करूनी । भ्रूमध्यभागीं गोंदूनी । एक टिकली रेखिली असे ॥ ६८ ॥ गौरवर्ण भालप्रदेशीं । पहा शोभून दिसे कैशी । पाहती मुखकमलासी । सान बंधूंच्या महाराज ॥६९॥ असे द्वय सहोदर माणगांवनिवासी । पूजनीय जाहले सकलांसी । जनांचिये मानसीं । भक्ति उपजे तयांप्रती ॥ ७० ॥ शंभूशास्त्री यांजपाशी । ज्योतिष्यविद्या शिकावयासी । जाती याच समयासी । वासुदेव महाराज ॥ ७१ ॥ बापसे बेटा सवाई । तैसीच गत येथे होई । ज्योतिष्यविद्या लवलाही । हस्तगत असे जाहली ॥७२॥ याच शास्त्र्यांचें एक गणित । वासुदेव महाराज सोडवीत । तों एके दिनीं एक गृहस्थ । पातला असे शास्त्रींकडे ॥७३॥ त्याचे घरीं वास्तुशांती । त्या कारणें मुहूर्त पाहती । पंचाग काढूनी त्वरितगतीं । सांगता शंभूशास्त्री त्याजला ॥ ७४ ॥ तेंचि गणित वासुदवांनी । पाहिलें असे करोनी । तों मुहूर्त नसे त्या दिनीं । असे कुयोग अपवित्र ॥७५॥ आल्या गृहस्थासमक्ष जाण । चूक दाविली उकलून । शंभूशास्त्रींस अपमान । झाला वाटलें या कारणें ॥ ७६ ॥ कांही न वदती त्या समयासीं । परि क्रोधावले मानसीं । दुजे दिनीं येतां वासुदेवांसी । कडक शब्दें ताडिती ॥ ७७ ॥ म्हणती तुम्ही आजपासोनी । न यावें आमुचे सदनीं । महाराज वदती नम्र भाषणीं । काय अपराध घडला असे ॥ ७८ ॥ तें न ये सांगतां आम्हासी । वासुदेव उमगले मानसीं । महाराज पोचले ज्या उच्चेतसी । न पावती शंभूशास्त्री तेथे ॥ ७९ ॥ गेले न तेंपासूनी । महाराज शंभूशास्त्रींचे सदनीं । परि अनादर मनातूनी । कधी न तयांचा केला असे ॥ ८० ॥ सवंगड्यासमवेत रमण्याचें वय । परि असे विशाल हृदय । सदय आणि निर्भय । वासुदेवमहाराजांचें ॥ ८१ ॥ स्नानसंध्या नित्यक्रम । यांत ना चुकूर होय नेम । दुर्लभ आयुष्य हें उत्तम । क्षण एक न वाया जाऊं दिलें ॥ ८२ ॥ कांही कारणानिमित्त । दुजे ग्रामीं जाणें पडत । तों सायंकाळ वाटेंत– । होतां तेथेच थांबती ॥ ८३ ॥ नजिकच्या

ओढ्यावरी जाऊन । झडकरी ते करिती स्नान । संध्या करूनी अर्घ्यदान । देती मावळत्या नारायणा ॥ ८४ ॥ एकदा गोमांतक प्रांतांत । पेडणें ह्या ग्रामीं जात । ज्योतिष्यज्ञानाची कीर्त । पसरली असे चोहीकडे ॥ ८५ ॥ तेथील एक श्रीमंत । विचार करूनी मनांत । नाणें घेवोनी हातांत । परीक्षा पाहती तयांची ॥ ८६ ॥ आपण ज्योतिष्यशास्त्रांत । प्रविण ऐसीं आपुली कीर्त । तरी आमुच्या मुठींत । काय असे तें सांगावें ॥ ८७ ॥ त्वरें कुंडली मांडिती । अवलोकिती ग्रहस्थिति । मग निश्चयें उत्तर करिती । नाणें मुठींत धरिलें असे ॥ ८८ ॥ नाणें दावितां उकलोनी । संतोषले श्रीमंत मनीं । केला असे आदरोनी । समयोचित सत्कार ॥८९॥ आणिक सद्भावना उदेली चित्तीं । म्हणोनी वासुदेवाप्रती वदती । यामाजीं करावी प्रगति । आपण येथे राहोनियां ॥ ९० ॥ ज्योतिष्यशास्त्रीं विद्वान । नीलकंठराव पद्ये जाण । रहावें त्यांजवळी आपण । विद्या शिकावया कारणें ॥ ९१ ॥ ऐकतां तयांचें भाषण । ठरविती त्यांतें द्यावया मान । कांही दिवस शास्त्रीघरीं राहून । अभ्यास त्यांनी केला असे ॥ ९२ ॥ याच कालखंडांत यम-नियम-आसनें साधीत । प्राणायाम अनुष्ठानें अत्यंत । योगाभ्यासाचीं जाहलीं ॥ ९३ ॥ गृहांतील परिस्थिति । कधी न झोंबली चित्तीं । समाधानी सदा वृत्ति । मनोविकासाकारणें ॥ ९४ ॥ दीर्घ काल निरंतर । तपश्चर्या ही साचार । ठेउनी तियेवरी आदर । पालन तियेचें झालें असे ॥ ९५ ॥ सकल नाडया शुद्ध होती । इंद्रियांची सुप्त शक्ति । झाली असे जागृति । विवेकप्रभाव वाढूं लागला ॥ ९६ ॥ कल्याण मार्ग लक्षून । चित्तगंगा ही वाहते जाण । बिकट काळीं मातेसमान । श्रद्धा धीर देतसे ॥९७॥ त्रिकाळ स्नानें बाह्य शुद्धि । संध्योपासनेने अन्तःशुद्धि । नाश पावली अशुद्धि । येणें मार्गें अशेष ॥ ९८ ॥ हृदयमंदिरीं ज्ञानदीप्ति । विवेकप्रभेने उजळली मती । तेजोमय वलय भोंवती । झळकूं लागलें स्वामींच्या ॥ ९९ ॥ निघाला आवडीने ज्ञानझरा । पोहोचला सीताराम-अंतरा । शिक्षण देती सहोदरा । आपणासम करिताती ॥ १०० ॥ पूर्व संचित बलवत्तर । म्हणूनीच झाले ते

सहोदर । मानसीं होवोनियां भ्रमर । पदकमलसेवा इच्छिती ॥ १ ॥ अंतरासी मिळे अंतर । त्यांत न दिसे आप-पर । म्हणोनी विद्या हृदयावर । सांगता क्षणीं बिबतसे ॥ २ ॥ पसरलें ब्रह्मतेज मुखावर । देखतां वाटे विष्णु का हा महेश्वर । कां नभींचा भास्कर । अवतार होऊनी आला असे ॥ ३ ॥ ऐसा पुरुष तेजोधारी । पाहतांच वाटे अंतरीं । कन्या असती जयाचे पदरीं । जामात आपुला करावा ॥ ४ ॥ प्रापंचिक जीवन । व्हावें न इच्छितें कधी मन । तत्संबंधी विचार जाण । कदापि मानसीं शिवला नसे ॥ ५ ॥ परि माताप्रभृति गुरुजनांनी । पाहिली वधू त्यालागूनी । महाराजास अनुरूप नसूनी । असे कुरूप ती बहु ॥६॥ माता-पित्यांसी विचार । कैसा होईल संसार । स्वरूपें ती ना सुंदर । आणि व्यंगहि पायांत ॥ ७ ॥ उपनाम गोडे बाबाजीपंत । रांगणा ग्रामीं राहत । त्यांची कन्या वधू नेमस्त । बायो नाम तिचें असे ॥ ८ ॥ माता आणि गुरुजन । मानिती परमेश्वरासमान । तयांची आज्ञा उल्लंघन । कदापिहि झाली नसे ॥ ९ ॥ म्हणोनिच ह्या कारणास्तव । अनुमती देती वासुदेव । सुमहूर्त पाहूनी अभिनव । विवाहबद्ध जाहले ॥ ११० ॥ आजपर्यंत अवलोकिलें । ब्रह्मचर्य दृढ पाळिलें । आता पाऊल टाकिलें । गृहस्थाश्रमीं वासुदेवें ॥११॥ या आश्रमाचे संस्कार । पाळिनी सकळ साचार । परी अंतरींचे निर्मळ विचार । अणुमात्र ना ढळती ॥ १२ ॥ तें सकलहि करितां वर्णन । तरी उगाच ग्रंथ वाढेल जाण । आज प्रपंचीं अनुभवाविण । कोणी न एक राहिला ॥ १३ ॥ परि सकल त्यामाजीं दिसती गुंतले । मायामोहें सकल भुलले । वाटे फेरे वाढते केले । लोकीं जननमरणाचे ॥ १४ ॥ परि जैसें कमलपत्र जलांत । सदा कोरडेंचि राहत । तैसे वासुदेव प्रपंचांत । अलिप्त सर्वदा मानसीं ॥ १५ ॥ जैसे आश्रमीं राहती ऋषी-मुनी । तैशीच पवित्रता निवासस्थानीं । भस्मभूषित ही तनु पाहूनी । नास्तिक मानहि वाकविती ॥ १६ ॥ तयां जन आजपर्यंत । वासुदेव-नामें संबोधित । पूज्य भावना हृदयांत । आता उद्भवली असे सकलांच्या ॥ १७ ॥ आता सानथोरांपासून । वासुदेव–महाराज म्हणती जाण ।

म्हणोन आपुल्याहि वाचेला वळण । लागो या पवित्र नामाचें ॥ १८ ॥ श्रीवासुदेवमहाराज । शरणागताची राखिती बूज । सकल करितील भक्तांचे काज । हाच भरवसा जानकीसी ॥ १९ ॥ इति श्रीसीतारामचरित्रालंकारमणि । गुंफिला असे दृष्टांत-कोंदणीं । प्रकाश दावितां अंतःकरणीं । अष्टम अध्याय गोड हा ॥ १२० ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

अष्टमोऽध्यायः समाप्तः ।

अध्याय नववा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ ॐ नमो जी रघुवीरा। दशरथे रणरंगधीरा । म्हणविसी कौसल्येच्या कुमरा । रामराया नमोऽस्तु ते ॥ १ ॥ धन्य धन्य हा भरत । तुझे चरण या स्थलीं लागत । चरणांचा महिमा अद्‌भुत । काय आम्ही वर्णावा ॥ २ ॥ तुझ्या चरणरजेंकरून । उद्धरिले तरुलतापाषाण । जाहलें अयोध्याधारण । जानकीजीवना रघुपते ॥ ३ ॥ ऐसें हें भारत क्षेत्र । सरिता वाहती किती पवित्र । रामराया तुझें हें चरित्र । भाविक गाती आवडीने ॥ ४ ॥ तैसेच या भारतांत । उदेले किती अमोल संत । समर्थांचे बोल खडखडित । जागृत करिती सकळिकां ॥ ५ ॥ झाला प्रसिद्ध तुकया वाणी । कसें म्हणावें तयासी वाणी । जयाची अभंग वाणी । अमृतासमान मधुर ॥ ६ ॥ त्याची काव्यरचना अभंग । ऐकता श्रोते होतात दंग । जेथे स्वयं पांडुरंग । अती संतोषला मानसी ॥ ७ ॥ काय भक्तीचा असे जिव्हाळा । गातां प्रेमें ये उमाळा । तोच लाविला असे लळा । आज भाविकांकारणें ॥ ८ ॥ जैसी कामधेनू पान्हावली । तैसी ज्ञानेश्वरमाउली । बोधामृत पाजिती झाली । जनहिताकारणें ॥ ९ ॥ किडेमुंगीसमान । सामान्य मानवाची रास जाण । त्यांतही संतरत्नें देदीप्यमान । तेजोमय झळकती ॥ १० ॥ हाच संतांचा तेजःसविता । आपणांसी प्रकाश दाविता । आता श्रीसीतारामचरित्रग्रंथा । रसाळ पुढे परिसावें ॥ ११ ॥ मागील अध्यायीं जाहलें श्रुत । बंधुप्रेम किती हृदयांत । वडिलांची आज्ञा न उल्लंघित । गृहस्थाश्रमीं वासुदेव ॥ १२ ॥ दुजियाचें दुःख पाहून । कैसें कळवळे सीताराममन । जाहली जी कथा श्रवण । तोच या अध्यायीं गोवीतसे ॥ १३ ॥ असे जरी सान वय । तरी अति विशाल हृदय । सदय आणि निर्भय । बाल सीताराममहाराजांचें ॥ १४ ॥ दिव्य कान्ति लखलखित । ब्रह्मतेज मुखावरी तळपत । सोबत्यांसवें अंगणांत । प्रभातसमयीं खेळती ॥ १५ ॥ तों वडील बंधू त्याच

समयीं । ग्रामांत असती दुजे ठायीं । चिंताग्रस्त एक येई । विप्र कोणी सामोरी ॥ १६ ॥ विप्रें देखिले अवचित । वासुदेवस्वामी समर्थ । नम्रभावें जोडूनी हस्त । सन्मुख उभा राहिला ॥ १७ ॥ स्वामी वदती तयासी । कोणतें दुःख मानसीं । आपुली कहाणी सांगूनी त्यांसी । पुसे नाम स्वामीतें ॥ १८ ॥ या देहासी नाम जाण । वासुदेव हें असोन । एक निश्चित नसे वसतिस्थान । माणग्राम ही जन्मभूमी ॥ १९ ॥ आपुली वार्ता ऐकुनी कानी । क्लेश होती अंतःकरणीं । परि यतिस्वरूप आमुचें जनीं । म्हणोनी दान ना घेऊं आपुलें ॥ २० ॥ तरी जावें दूर देशीं । अथवा फिरावें या ग्रामासी । पुसावें एखाद्या विप्रासी । दान घ्यावया कारणें ॥ २१ ॥ ब्राह्मण वदे ते समयीं । आमुचें दान कोणी ना घेई । शिणलो असे फार देहीं । करोनी विनंति विप्रदेवां ॥ २२ ॥ स्वामी वदती तयासी । पुनरपि करा प्रयत्नासी । भोग संपतां रोग्यासी । वैद्य नेटका मिळतसे ॥ २३ ॥ तरी मिळेल कोणी एखादा । दूर करणारा आपदा । हताश होऊं नका कदा । सौख्य लाभेल तुम्हांसी ॥ २४ ॥ विश्वास धरूनी ब्राह्मण । निघाला असे तेथून । तो पातला असे अंगणीं जाण । तों सीताराम बघती तयासी ॥ २५ ॥ दुःखी कष्टी पाहुनी नयनीं । महाराज कळवळले मनीं । सप्रेम पुसती त्यालागूनी । कोठूनी येणें जाहलें असे ॥ २६ ॥ ब्राह्मण सांगे सकल वृत्तांत । ऐकतां महाराजांचें द्रवलें चित्त । आश्वासन विप्रा देत । संशय मनीं न आणतां ॥ २७ ॥ मित्रमंडळी जी संगतीं । ती महाराजास काय वदती । दान घेऊं नका म्हणती । दुःखासी कारण तेंचि असे ॥२८॥ महाराज वदती तयांसी । भीति न वाटे आम्हांसी । परांचें दुःख निवारावयासी । आमुचा जन्मचि असे ॥ २९ ॥ जरी आपणा जाहले कष्ट । अथवा देह जाहला नष्ट । परि परसौख्यें संतुष्ट । मन रहावें सर्वदा ॥ ३० ॥ ऐसी बोलोनी स्पष्टोक्ति । दावियेली मित्रांप्रती । दानसंकल्प आपुले हातीं । विप्राकडून घेतलासे ॥ ३१ ॥ वणवण फिरला मेदिनी । परि दान घेता न भेटला कोणी । हातावरी सोडितां पाणी । विप्र मनीं संतोषला ॥ ३२ ॥ सुखाचे सोबती । संकटकाळीं दूर पळती । असे सत्य

ही उक्ति । वर्णिली असे जी कवीने ॥ ३३ ॥ जोडूनी संबंध बादरायण । येई पाहुणा म्हणून । वदे मी तव मातेचा बंधू जाण । मामा असे आपुला ॥ ३४ ॥ सर्व सुखाचे वाटेकरी । पाप कोण घेईल पदरीं । गणगोत असोनी शेजारीं । दूर होतील क्षणार्धीं ॥ ३५ ॥ जे थोर साधूसंत । परोपकारा देह वेचित । दुजे सुखी करोनी घेत । संकट आपणाकडे ओढोनी ॥ ३६ ॥ ते नव्हेत सामान्य मानव । प्रत्यक्ष असती देवाधिदेव । घेती विष शोषुनी सर्व । भोलानाथ शिव प्रभू ॥३७॥ देव आणि दानव । जाहले तेणें सुखी सर्व । परि इकडे महादेव । दाहें पेटला सर्वांगीं ॥ ३८ ॥ शीतल उपचार नानापरी । केले असती शरीरीं । स्वर्गीय गंगा घेतली शिरीं । सर्वांगी फणिवर वेष्टिले ॥ ३९ ॥ हिमनगावरी आसन । बैसले त्यावरी त्रिनयन । परि दाह न शमला जाण । शांतता न लाभली ॥ ४० ॥ जयीं शतकोटी होय रामायण । त्रिलोकीं घेतलें वाटून । त्यांतील पहिलीं द्वय अक्षरें जाण । घेतलीं रामनामाची ॥ ४१ ॥ सापडला अमृतघट । रामनामस्मरणीं घेती घोट । शांत जाहला नीलकंठ । श्रीरामसद्गुरुकृपेने ॥ ४२ ॥ सदाशिव ध्यातो रामचंद्रा । रामचंद्र ध्याती भालचंद्रा । दिसती जरी द्वय मुद्रा । तरी आंतर असे एकचि ॥ ४३ ॥ तेंवि हे सीताराम महाराज । राखावया भक्ताची बूज । शिरीं घेती भक्ताचें काज । तया सुखी करोनियां ॥ ४४ ॥ तैसा विप्र येतां अंगणांत । सौख्यदाता भेटला अवचित । कष्टी दान हातीं घेत । करी मुक्त ब्राह्मणा ॥ ४५ ॥ लालसा कशाची ना मनीं । निष्काम असती अंत:करणीं । परि सकल हे जाणोनी । मौन धरोनी राहिले ॥ ४६ ॥ नमूनी महाराजपदांसी । विप्र जाता हो गृहासी । कांही काळ लोटतां यासी । काय घडूनी आलें असें ॥ ४७ ॥ जैसें कां घेतलें हालाहाल । सर्व अंग झाले लालीलाल । ज्वर भरला असे तत्काळ । जैसा दावाग्नि भडकला ॥ ४८ ॥ खाज खांडकें नानापरी । पुरळ उठले शरीरीं । जागा न उरे तिळभरी । अंगावरी पाहतां । ॥ ४९ ॥ आली तनूसी अवकळा । सर्वांगीं लागल्या असती कळा । क्षणभरी न लागे डोळा । शांती न लाभे जीवासी ॥ ५० ॥ ऐशी

व्यथा होतां दारुण । सीताराम तळमळती रात्रंदिन । परि स्वामी बघती दुरून । कांही एक न बोलती ॥ ५१ ॥ माउलीचिये मनीं करुणा । उपाय पाहिले करूनी नाना । चिंतेने व्यापिलें मना । व्यथा अणुमात्र न होय कमी ॥ ५२ ॥ म्हणे गृहीं असतां भगवंत । कासया उपाय करावे बहुत । अवतारी जो श्रीगुरुदत्त । त्या वासुदेवासी माय वदे ॥ ५३ ॥ म्हणे तूं गृहीं कल्पतरु । अनाथ भक्तांचा दातारु । बांधवांकारणें कठोरु । मन कां बा केलें असे ॥ ५४ ॥ काय नव्हता प्रेमझरा । क्लेश पाहूनी हृदयांतरा । अति प्रिय त्या सहोदरा । सीतारामाकारणें ॥ ५५ ॥ म्हणती भोग घेतला असे ओढून । तो न सुटे आतां भोगल्याविण । करितां दुःखिताचें दुःखनिवारण । आला चालोनी भोग हा ॥ ५६ ॥ मानवा कर्मानुसार । भोग कदापि ना चुकणार । बुद्धि समयानुसार । त्याची सारखी फिरतसे ॥ ५७ ॥ बारा वर्षं वनवास । एक वर्ष अज्ञातवास । सोशिले असती किती क्लेश । सखा श्रीकृष्ण असता पांडवांनी ॥५८॥ नल आणि दमयन्ती । हरिश्चन्द्र आणि तारामती । डोंबाघरीं पाणी भरती । बाळ विकूनी आपुलें ॥ ५९ ॥ जी जनकाची नंदिनी । श्रीरामचंद्राची असे कामिनी । ती जानकी चोरोनी । रावण लंकेस नेतसे ॥ ६० ॥ तेंवि देवादिकांपासून । भोग न सुटे भोगल्याविण । मग याने तें घेतलें दान । विष फुटलें अंगावरी ॥ ६१ ॥ तरी यासी उपाये । आम्हा जवळी नसे माये । भोग संपताची लवलाहे । होईल तनु चोखट ॥ ६२ ॥ ऐसें ऐकतांची वचन । स्रवूं लागले मातेचे नयन । म्हणे वासुदेवा तूं दयाघन । असशी सकल जीवांसी ॥ ६३ ॥ हृदयीं अमृतसागर । भोवतीं दयेचा आगर । त्याचे सन्निध जो पामर । राहतां अमर होतसे ॥ ६४ ॥ जो उभा राहिला सागरांत । त्यासी दावाग्नि ना कदा पोळत । तैसा सीतारामकृपाछत्रांत । त्यासी दुःख कासया ॥ ६५ ॥ तुझ्या कृपेचा लागतां वारा । चुकेल चौऱ्यांशीचा फेरा । तरी वर्षवी कृपेची धारा । सदय हृदय करोनियां ॥ ६६ ॥ मातेची ऐकतां करुण वाणी । वासुदेव द्रवले अंतःकरणीं । म्हणती माते कष्टी मनीं । होऊं नको त्या अभय असे ॥ ६७ ॥ क्षौरकर्म प्रायश्चित्त । घेतां व्यथा

हरेल त्वरित । ऐकतां माता संतोषित । जाहली असे मानसीं ॥ ६८ ॥ ज्येष्ठ बंधूच्या वचनाधीन । कदा न आज्ञाउल्लंघन । माता सांगे मानेल वचन । साष्टांग करी प्रणिप्रात्र ॥ ६९ ॥ आज्ञेसम प्रभातीं । क्षौरकर्म करूनी घेती । स्नान करूनी गंगेवरती । निर्मळ काया जाहली ॥ ७० ॥ पूर्व दिशे उगवत्या नारायणा । संध्या करूनी दे अर्घ्यदाना । तैशीच होतां प्रार्थना । निघती तेथूनी महाराज ॥ ७१ ॥ गंगेवरी घेऊनी प्रायश्चित्ता । मंदिरीं गोप्रदान देती दत्ता । वासुदेवचरणीं ठेविला माथा । प्रेमाश्रूंनी न्हाणिती चरणांसी ॥ ७२ ॥ शिरीं ठेविला वरद हस्त । बोधिती गुरु-श्रेष्ठींचें मत । कवण्या संकल्पें कैसा घडत । दोष मानवाकारणें ॥ ७३ ॥ त्या संकल्पाचीं घेतां दानें । दोष घडती तयांकारणें । सांगती वेद पुराणें । श्रुती शास्त्रें हीं पाहतां ॥ ७४ ॥ मानवाची वासना । नाना विध असे जाणा । तत्समान संकल्प जाणा । योजोनियां करिताती ॥ ७५ ॥ जो संकल्प करोनी । कर्म करीतसे प्राणी । तो बद्ध या जीवनीं । पूर्णपणें जाहला असे ॥ ७६ ॥ म्हणोनी संकल्पा विरहित । देणें घेणें करी जगांत । नको राहूस लिपित । कवण्याहि कार्यासी ॥ ७७ ॥ नाना दृष्टांत देऊन । उदाहरणें समोर ठेवून । झाडूनी काढिलें अज्ञान । अंतरीचें झडकरी ॥ ७८ ॥ ऐसें पाजिलें बोधामृत । म्हणती शोध घे अंतरांत । सांभाळी ब्रह्मचर्यव्रत । परमार्थीं दृष्टि ठेवावी ॥ ७९ ॥ ऐशापरीं कांही दिन । माणगांवी जाती जाण । मातेलागीं समाधान । द्वय बंधू हे देताती ॥ ८० ॥ जेवी लक्ष्मण करी रामसेवा । तेंवी सीताराम धरी अनन्य भावा । चरणकमळीं विसावा । श्रीवासुदेवासन्निध होतसे ॥ ८१ ॥ टाकिलें पाऊल प्रपंचात । परि अंतरीं वैराग्य धरित । लालसा ना किंचित । मानसासी शिवलेली ॥ ८२ ॥ बहूत उपचार या जगतीं । प्रत्यहीं मनुष्यातें लोभावती । परि ना नयनीं देखिती । वासुदेवस्वामी तयांतें ॥ ८३ ॥ या जगतींच्या वासना । जैशा ना स्पर्शिती त्यांचिया मना । तैशाच स्वर्गसुखाच्या कल्पना । न येती ध्याना कदापि ॥ ८४ ॥ जैसें वळवावें बालमन । तैसे वळे तें न लागता क्षण । वैराग्यभूषित शिक्षण । बंधू सीतारामास मिळालें ॥ ८५ ॥

ओली मृत्तिका चाकावर । घालोनी आकार दे कुंभार । भट्टी लागतां साचार । होय क्षणीं मनासारिखें ॥ ८६ ॥ या उदाहरणासमान । स्वामींनी करीं घेतलें सीतारामरत्न । दिव्यबोधास्त्रें परोपरी घासून । रुचिर आकार तया दिला असे ॥ ८७ ॥ म्हणून आमुच्या हृदयकोदणीं । हा हिरा बसविला महाराजांनी । आजहि हा चमकतो मेदिनीं । त्या सद्गुरुच्या कृपेने ॥ ८८ ॥ कधीं पंचपक्वांनीं भोजन । कधी कोरडे मिळालें अन्न । वा कधीं घडो उपोषण । परि समान असे त्यांजला ॥ ८९ ॥ कधी मऊ बिछाना । कधी घोंगडीवरी जाणा । जरी करिती भूमिशयना । तरी सुखें निद्रा येतसे ॥ ९० ॥ पुढील आयुष्याची सम आराधना । साधण्या हा राखिला बाणा । ऐसी सात्त्विक कालक्रमणा । चालली असे गृहासी ॥ ९१ ॥ कांही प्रसंगांकारणें । गोमांतकांत पेडणें । या ग्रामीं जाहलें जाणें । श्रीवासुदेवमहाराजांचें ॥ ९२ ॥ सीताराम असे घरीं । मातापित्यांची सेवा करी । वासुदेव नाम वैखरीं । नित्य नियमें स्मरीतसे ॥ ९३ ॥ कर्णोपकर्णीं जाहला । स्वामींचा लौकिक पसरला । सूर्याचिये प्रकाशाला । कोण अडवूं शकेल ॥ ९४ ॥ हिरा ठेविला अंधारांत । तरी तो प्रकाश दावित । तैसेच वासुदेवस्वामी पेंडणेंग्रामांत । येतीं बहुत जन दर्शना ॥ ९५ ॥ वय जरीं असे सान । तरी बुद्धिमत्तेचें उच्च मान । प्रत्यया येतां दिपती नयन । तदा सकल लोकांचे ॥ ९६ ॥ ऐसा लोटला कांही काळ । तों एक उजाडली सकाळ । चित्ता लागली तळमळ । हुरहूर वाटे अकारण ॥ ९७ ॥ पुढील भविष्य जाणून । चिन्हें होती तत्समान । शकून अथवा अपशकून । प्रत्येक मानवाकारणें ॥ ९८ ॥ परि त्याकडे न जाय लक्ष । प्राणी गुंतला शोधण्या भक्ष्य । एखादाच असे दक्ष । वर्म त्याचें जाणतसे ॥ ९९ ॥ मायामोहापासूनी । जरी अलिप्त असोनी । तरी पुढील भविष्य समजोनी । स्थिरता मनाची हरपली ॥ १०० ॥ बसती एका जागेवर । वृत्ति जाहली अस्थिर । ऐसा कांही काळ गेल्यावर । सावध होऊनी पाहती ॥ १ ॥ तितुक्यामाजीं वृत्त कानीं । तात अस्वस्थ असती सदनीं । तत्काळ निघाले तेथूनी । माणगावीं जावया ॥ २ ॥ नित्य नियमा

अनुसरून । करूनी मातेसी वंदन । मग पित्याच्या दर्शनाकारण । जाती अती लगबगीने ॥ ३ ॥ दत्तसेवेलागून । झिजविला चंदनासमान । गणेशपंतांनी देह जाण । आजपर्यंत आपुला ॥ ४ ॥ तो देह रुग्णशय्येवर । पडला आज साचार । परि सकल अंतर । दत्तस्मरणीं तें असे ॥ ५ ॥ जरी शांत मनोवृत्ति । प्रसन्न मुद्राहि दाविती । तरी न चुके प्रारब्धगति । कष्ट होती शरीराला ॥ ६ ॥ हें महाराजांच्या नजरेंतून । न सुटलें कदापि जाण । परि पित्याजवळी बोलून । न दाविती कदापि ॥ ७ ॥ तरि दिवसेंदिवस गंभीर । होती मानसी साचार । परि वृत्ति अस्थिर । अंतरीं असे जाहली ॥ ८ ॥ जो लौकिकीं व्यवहार । कृत्रिमस्वरूपी साचार । या स्थितप्रज्ञ मनावर । कांही एक न राहिला असे ॥ ९ ॥ वर्णिलें ज्ञानेश्वरींत । सकल बंधनें सुटली त्वरित । परि अडकला एक्या बंधनांत । धडपडे जीव त्यांत हा ॥ ११० ॥ तैसेच हे गणेशपंत । जाहले सकलांपासूनी मुक्त । परि जन्मापासूनी ज्या देहांत । राहिले असती आजवरी ॥ ११ ॥ आतां शरीराचें त्याकारण । नांव उपनाम ना उरलें जाण । कवणे काळीं पडून । भूवरी जाईल हें न कळे ॥ १२ ॥ ज्ञानेश्वरांनी केलें वर्णन । पोहोचले तत्समान । अत्युच्च शिखरीं जाऊन । बैसले जाणती हें एकच महाराज ॥ १३ ॥ निःसीम भक्ति मुद्रेवरती । आल्हादकारक प्रभा हो फाकती । तैशीच दिसून ये कांती । म्हणोनी वाटे इतर जनां ॥ १४ ॥ आतां आराम पडेल म्हणूनी । उठतील पंत या दुखण्यांतूनी । ऐसें माता–बंधूचिये मनीं । वाटूं तईं लागलें ॥ १५ ॥ ऐसेच कांही गेले दिन । परि अंतरीं उदासीन । नियमित होई कर्माचरण । परि अस्वस्थता मानसीं ॥ १६ ॥ काळाचा महिमा असे थोर । तो घिरट्या घालतो सभोंवार । उजाडला तों अखेर । दिवस गणेशपंतांचा ॥ १७ ॥ शके सतराशें नव्याण्णवासी । वद्य भाद्रपद मासीं । द्वितीया असे त्या दिवशीं । काय करिती पंत हे ॥ १८ ॥ बहु दिनांचे एक स्नेही । असती सद्गृहस्थ तेही । त्यांस पाचारणा लवलाहीं । करूनी जवळी बैसवीलें ॥ १९ ॥ वृत्ति ठेविली असे शांत । मित्राप्रति काय कथित । आमुचा प्रवास संपला येथ । जाणार आहोंत

दि गं ब रा दि गं ब रा

आज आम्ही ॥ १२० ॥ तरि करावें एक कार्यासी । आम्ही जातां दत्तनिवासीं । कवणासही गृहासी । रुदन करूं न द्यावें ॥ २१ ॥ महाप्रयाण पाततां निकटी । केवढी ही शांत वृत्ति । बोल ऐकतां हृदयावरती । धक्काच असे बैसला ॥ २२ ॥ परि तो समय पाहून । मन केलें असे वज्राहूनी कठिण । म्हणोनी ते शब्द मान्य । केले असती तिये वेळीं ॥ २३ ॥ रमाबाई देवापुढती । सौभाग्य हो मागती । परि तिची कर्मगति । वेगळीच दिसतसे ॥ २४ ॥ स्नेही जवळी हो बैसवून । आपण करिती श्रीगुरुचिंतन । नेत्र घेतले झाकून । लक्ष्य एक वेधलेसें ॥ २५ ॥ तितुक्यामाजीं अवचित । स्नेही उठोनियां जात । मंगलमय क्षणहि येत । अखेरीचा या भक्ताचा ॥२६॥ नाशिवन्त देह-पिंजऱ्यांतून । जीव गेला असे निघून । अक्षय दत्तधाम लक्षून । निवासस्थानीं जावया ॥ २७ ॥ ऐसें पाहतां क्षणीं । टाहो फोडिला सकलांनी । अनिवार शोकाच्या आवर्तनीं । कोण कोणासी ना सावरीता ॥ २८ ॥ रुदनाचा भीषण ध्वनि । गेला गृहस्थाच्या कानीं । पाही तो जों येऊनी सदनीं । तों काय असें जाहले ॥ २९ ॥ केवढा पहा अधिकार । केवढा हा साक्षात्कार । गेला जीव बाहेर । परि पुनरपि देहीं प्रवेशला ॥ १३० ॥ काय वदती त्या गृहस्थासी । अरे काय कथिलें मी तुजपाशी । आतां तरी कवणासी । रुदन करूं न द्यावें ॥ ३१ ॥ ऐसें तयासी वदतां क्षणीं । गेले तात्काळ निघूनी । दक्षता घेतली गृहस्थांनी । समजूत सकलांची घालूनिया ॥ ३२ ॥ अंतिम इच्छेचें पालन । करिती कोणी ना रुदन । तरी शोकावेगें अंतःकरण । उठो पाहे सकलांचें ॥ ३३ ॥ रमाबाईने किती एक नवस । केले परि न पावला ईश । दाही दिशा जाहल्या ओस । पतिविणें तियेला ॥ ३४ ॥ पति-निधनाचें दुःख मनीं । कैशी साहते मागे पत्नी । माझी असंस्कृत वाणी । वर्णू न शके या स्थळीं ॥ ३५ ॥ दाविती ना जरी वरून । तरीं हृदयीं आघात पूर्ण । माय-लेकरांवरी जाण । पडले दुःखाचे पहाड ॥ ३६ ॥ न ये लिहितां तें वर्णन । कंठ येतसे दाटून । करीं लेखणी न राहे जाण । गळों पाहे भूवरी ॥ ३७ ॥ परि येवढेंचि समाधान । पूर्व पुण्याईची ठेव घेऊन । मिळविलें अक्षय स्थान ।

श्री पा द व ल्ल भ दि गं ब रा

गणेशपंतांनी श्रीदत्तचरणीं ॥ ३८ ॥ हीच प्रार्थना चरणकमळीं । आठव तुझा दे अंतकाळीं । जानकीस ठेवी जवळी । प्रभो दूर कोठे लोटूं नको ॥ ३९ ॥ इति श्रीसीतारामचरित्रालंकारमणी । गुंफिला असे दृष्टांतकोंदणी । प्रकाश दाविता अंतःकरणीं । नवम अध्याय गोड हा ॥ १४० ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

नवमोऽध्यायः समाप्तः ।

अध्याय दहावा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ ॐ नमोजी त्रिगुणाकारा । ब्रह्मा विष्णो महेश्वरा । घेतलें भूवरी अवतारा । एक दत्त या नामाने ॥ १ ॥ तुम्ही असा त्रिगुणी । तैशीच तुमची असे राहणी । भोजन. स्नान, निद्रा धरणीं । एक्या स्थळीं ना होतसे ॥ २ ॥ काशी क्षेत्रीं करितां स्नान । करवीर क्षेत्रीं भोजन । माहूर गडीं जाऊन । सुखें निद्रा करितसां ॥ ३ ॥ तैंवि गाणगापुरीं औदुंबरीं । वाडीक्षेत्रीं करंजपुरीं । ऐशीं किती एक क्षेत्रीं या भूवरी । वास निरंतर तेथे असे ॥ ४ ॥ स्वर्गलोकींचे देव सकळ । तैसे भूलोकीचें ऋषिमंडळ । दर्शनासी येती त्रिकाळ । दत्तात्रेया तव चरणीं ॥ ५ ॥ प्रभो दत्त दयाघना । ज्या गृहीं तुझी उपासना । भक्त करिती नामस्मरणा । तेथेच तूं रमसी सदा ॥ ६ ॥ कोठेंहि भक्त संकटीं पडतां । हांक त्याची तूं ऐकतां । एक क्षणहि न लावितां । तारिसी जाउनी त्याजला ॥७ ॥ तूंच कृपासागरा समर्था । या अज्ञान मुखाने वैखरी वदविता । करीं लिहविसी ग्रंथार्था । नव अध्यायपर्यंत ॥ ८ ॥ आता अध्याय हा दहावा । प्रभो दत्तात्रेया सांगावा । मथितार्थ अवघा काढुनी द्यावा । मजलागी वदावया ॥ ९ ॥ मागील अध्यायामाजी कथन । ऐकलें असें आपण । सीतारामें घेतले दान । यातना भोगिल्या देहाने ॥ १० ॥ इहलोकीचा प्रवास संपवोनी । तीर्थरूप गेले सोडोनी । मिळविलें अक्षय्य पद तयांनी । श्रीदत्तचरणासन्निध ॥ ११ ॥ आधीच वैराग्यपूर्ण वृत्ति । त्यांत हो आता वाढती । मनीं धरिली असे शांती । विवेक पाठी रक्षीतसे ॥ १२ ॥ जैसें सुपुष्प सुगंधित । पाकळी पाकळीने हो विकसित । तो परिमळ दरवळूनी जात । आपोआप दशदिशा ॥ १३ ॥ थोर महाराजांचें थोर आचरण । घडोघडीं ये दिसोन । यमनियमांचें पालन । कटाक्षपूर्वक करिताती ते ॥ १४ ॥ अंतर्बाह्य शुचिता राखून । केलें असे वेदाध्ययन । सकल सिद्धी होउनी प्रसन्न । जवळी येउनी बैसल्या ॥१५॥

तैसेच सकल वेदमंत्र । शुद्धत्वें होती पवित्र । त्यांतील शक्तींचा सर्वत्र । प्रत्यय येऊं लागला ॥१६॥
मंत्र हे शद्ध-स्वरूप पूर्ण । शद्ध हे आकाशतत्वांतून । जाहले असती निर्माण । हें मानसीं होतें ठसविलें
॥ १७ ॥ आकाशतत्वापासून निर्माण । जाहलीं हीं भूतें जाण । त्यांचिये शक्तीचें निधान ।
बीजरूपें मंत्री वसे ॥१८॥ म्हणोनी भलतेया स्थितींत । वेदमंत्र ना जपावेत । जो वैदिक शुचिभूत ।
तयांसी बंधन कांही नसे ॥ १९ ॥ जैशा का दोन शक्ती । तारक आणि मारक असती । तैशीच
वेदमंत्रांची स्थिति । पाहतां बहु अतर्क्य असे ॥ २० ॥ म्हणोनी वेदमंत्र ज्याच्या मुखांत । त्या
द्विजासी मान बहुत । भूदेव ही संज्ञा देत । पूर्व काळीं विप्रासी ॥ २१ ॥ रहाव्या देवता संतुष्ट ।
म्हणोनी वेदवेत्त्या विप्रांप्रत । सद्भावें करिती प्रणिपात । कोणतेंही कार्य योजितां ॥ २२ ॥ आतां
कलीचा प्रसार । वाढता हो तैसाची अत्याचार । लोपला स्वसंस्कृतीचा आदर । तेणें सामर्थ्यही
लोपलेसें ॥ २३ ॥ तेंवि घोकिती शुकासमान । वेदमंत्र जे ब्राह्मण । परी त्यांतील नेणती खूण ।
ते वेदवादी जाणावे ॥ २४ ॥ परि जे असती वेदवेत्ते । गुह्यार्थाचे जाणते । विद्या राहते जागृत
तेथे । सामर्थ्य दावी आपुलें ॥ २५ ॥ तेंवि महाराज वेदज्ञ असती । म्हणोनी वेदगुह्यार्थ जाणिती ।
ग्रामस्थ वेदवादी विप्रांप्रती । कांहीच नेणें सर्वथा ॥ २६ ॥ नानाविध मासे सागरांत । रात्रंदिवस
पोहत । परि अमोळ रत्नें असती यांत । हें कवणासही कळेना ॥ २७ ॥ तेंवि वेदवादी ब्राह्मण ।
रात्रंदिवस करिती पठण । म्हणती आम्हीहि तत्समान । मग मान कासया तयासी ॥ २८ ॥ पाहतां
अनेक वृक्ष मेदिनीं । अनेक धेनू गोठणीं । परि त्यांतील कल्पतरु कामधेनु ओळखूनी । कवणासी
न ये काढितां ॥ २९ ॥ भूवरी अगणित पाषाण । परि काढील जो तयांतून । परिस शोधून जाणून
खूण । तो सामान्य मानव नव्हे ॥ ३० ॥ त्याची करूं पाहती बरोबरी । ना ओळखती कोण हा
नरहरी । विकल्पशल्य अंतरीं । टोचूं लागलें तयांच्या ॥ ३१ ॥ असे परमेश्वरी योजना । पुढती
घडूनी ये एक घटना । विप्रभ्रम निरसला जाणा । कैशापरी पहावा ॥ ३२ ॥ एकदां आलें घडूनी ।

माणगावीं एका श्रीमंतांनी । मंत्रजागर आपुले सदनीं । करावयाचें ठरविलें ॥ ३३ ॥ मंत्रजागर मंत्रोच्चार । रात्रीमाजीं करोनी गजर । जागरण करावें साचार । अति स्वानंदें करोनियां ॥ ३४ ॥ या मंत्रजागरासाठी । अत्यंत आदरा देती । श्रीवासुदेवमहाराजां प्रती । आमंत्रण आणिक ब्राह्मणांतें ॥ ३५ ॥ महाराजांनी निमंत्रण । स्वीकारिलें असून । सकल विप्रांसमवेत जाण । निघाले असती जावया ॥ ३६ ॥ चालती जों मार्गावर । तों महाविषारी भुजंग थोर । आडवा ये समोर । देखतांची विप्र दचकले ॥ ३७ ॥ भुजंगव्याघ्रादि शब्द ऐकतां कानीं । भयभीत होताती कांही मनीं । प्रत्यक्ष नाग समोर पाहूनी । भयें कापरें भरलें असे ॥ ३८ ॥ स्वयें महाराज असती शांत । अहिंसा हें त्यांचें व्रत । मानसीं सुप्रतिष्ठित । निर्वैर ते सकलांसी ॥ ३९ ॥ तेंवि महाराज वदती । न भ्यावें चला पुढती । परि विप्र विव्हल चित्तीं । मागुती खेचती पाउला ॥ ४० ॥ तयीं एक विप्र त्यांतून । वदला समर्थां लागून । मंत्रप्रयोग पहावा करून । बसवावा भुजंग एक्या स्थलीं ॥ ४१ ॥ मंत्राची अमोघ शक्ति । काय महाराजांच्या जवळी नव्हती । विप्रमनीं शंका होती । म्हणोनी कथिती तयांना ॥ ४२ ॥ विप्राचें ऐकतां वचन । हातीच्या काठीने तत्क्षण । भूवरी नागाभोवतीं वर्तुळ काढून । मंत्रोच्चार मुखीं केला असे ॥ ४३ ॥ एवढा प्रचंड फणीवर । चवताळूनी करी फूत्कार । परि मंत्रबद्ध होउनी लाचार । वर्तुळसीमा लंघूं न शके ॥ ४४ ॥ पुढती महाराजासमवेत । विप्र चालले निर्धास्त । सामर्थ्य होतसे विदित । स्वामींचें सकलांस तैं ॥ ४५ ॥ पुढती यजमानगृहासी जाऊन । स्वानंदें मंत्रघोष करून । जाहलें मंत्रजागरण । सदनीं आपुल्या परतले ॥ ४६ ॥ महाराज दुसरे दिनीं । आपुल्या कार्यक्रमीं गेले विसरूनी । परि मंत्रप्रयोग करावा म्हणूनी । कथिलें त्या विप्रा हो आठव ॥ ४७ ॥ अजूनी संशयांकित मनीं । तैसाच पातला महाराजसदनीं । तों काकबली घेऊनी । अंगणीं महाराज देखिले ॥ ४८ ॥ वदे आपण नागावरी । मंत्रप्रयोग करूनी वर्तुळांतरीं । ठेविलासे तो मार्गावरी । गेला कां असेल तो तेथूनी ॥ ४९ ॥ विप्रबोल ऐकून । स्वामींसी हो आठवण ।

तैसेच न करितां भोजन । ब्राह्मणा समवेत चालले ॥ ५० ॥ होते सोवळें नेसून । सीतारामही चालले मागुतेन । गृहामाजीं पानें मांडून । ठेविली तीं तैशींच राहती ॥ ५१ ॥ मार्गीं जों जाउनी पाहत । तों नाग दिसला वर्तुळांत । जाहला असे मृतवत । निचेष्टित पडला असे ॥ ५२ ॥ ऐशी स्थिति पाहून । द्रवलें महाराजांचें मन । म्हणती माझ्याचि मंत्रप्रयोगाकारण । पडावें लागलें असे याजला ॥ ५३ ॥ तत्काळ विमोचन-मंत्रोच्चार । करतांच पाहती चमत्कार । त्या वलयांतून सत्वर । फणीवर वेगें पळाला ॥ ५४ ॥ विप्रें पाहूनियां घटना । आश्चर्य वाटलें तयाच्या मना । म्हणे हा दत्तराणा । खरोखरीच माणगावीं ॥ ५५ ॥ केला न कधीं आयुष्यभर । मंत्रप्रयोग नागावर । द्रवलें असे अंतर । वासुदेवमहाराजांचें ॥ ५६ ॥ मागुती वळूनी जो पाहिलें । तों सीतारामा येतां देखिलें । गृहीं ताट मातेने वाढिलें । तें टाकूनी आलात म्हणोनियां ॥ ५७ ॥ कांहीं न दिधलें उत्तर । क्रोध देखिला चेहऱ्यावर । महाराज उमगले अंतर । जाती सदनासी घेउनियां ॥ ५८ ॥ पुढती झालिया भोजन । सीतारामा जवळी बैसवून । म्हणती विप्रदेवा कठिण वचन । कदापिहि बोलूं नये ॥ ५९ ॥ सुवर्णा कस लाविल्याविना । परीक्षा त्याची होईना । तेंवि हे विप्र आपणां । कसा लावूं पाहती ॥ ६० ॥ क्रोध आलिया मनास । दूरावतो परमेश । साधनांचा होय नाश । दृष्टांत देउनी उपदेशिलें ॥ ६१ ॥ जो मातृभक्त आणि सद्गुरुनाथ । यांची आज्ञा न उल्लंघीत । ऐसा सीताराम आज्ञांकित । वचनाबाहेर न जाय ॥ ६२ ॥ बहुत दिवसांपासून । महाराजांचें इच्छितें मन । नृसिंहवाडीस जाऊन । दर्शन घ्यावें श्रीदत्ताचें ॥ ६३ ॥ परि योग न ये जुळून । मातेची न मिळे संमति जाण । म्हणोनी असती उदासिन । मातृभक्त हे सर्वदा ॥ ६४ ॥ ऐसे कांहीएक दिवसांनी । झोपले असतां प्रार्थना करूनी । दृष्टांत देती येऊनी । स्वप्नें श्रीगुरुदत्तात्रेय ॥ ६५ ॥ वदती दत्तदयाघन । येथे यावया कारण । इच्छा करीतसे तुझें मन । मग कां न येणें होतसे ॥ ६६ ॥ प्रेमाश्रूंनी दाटले नयन । घातलें चरणीं लोटांगण । म्हणती मातेच्या आज्ञेविण । येतां न ये मजलागीं

॥ ६७ ॥ आपुला निश्चय करी मनीं । येईल सकल घडूनी । ऐसें आश्वासन देऊनी । प्रभु अदृश्य जाहले ॥ ६८ ॥ जाहला दत्तदृष्टांत । महाराज जाहले हर्षित । तेंच ध्यान हृदयांत । खेळू लागलें सारखें ॥ ६९ ॥ होईल केव्हा प्रभात । कथीन मातेप्रती मात । जाहला जो का दृष्टांत । श्रीगुरुदत्तात्रेयाचा ॥७०॥ सुमंगल प्रभातकाळीं । माय बैसोनी देवाजवळी । गाऊं लागली भूपाळी । तो मधुर ध्वनी ऐकला ॥ ७१ ॥ नित्यासम उठोन । केलें असे मुखमार्जन । मातेसी करोनी वंदन । सांगती ते आनंदें ॥ ७२ ॥ म्हणती आज मजलागूनी । दृष्टांत दिधला श्रीदत्तात्रेयांनी । यावें वाडीस म्हणोनी । तरी आज्ञा माते देइजे ॥ ७३ ॥ दत्तप्रभूची आज्ञा होत । तेथे माय कैसी उल्लंघित । म्हणे माझी न कांही हरकत । अवश्य जावें दर्शना ॥ ७४ ॥ मातेची आज्ञा होता क्षणीं । काय आनंद झाला मनीं । म्हणती आज माझ्या जीवनीं । भाग्यें अरुणोदय झाला असे ॥ ७५ ॥ महाराज आजपर्यंत । गेले सावंत वाडीत । परि नव्हता मार्ग विदित । त्यांसी नृसिंहवाडीचा ॥७६॥ साह्य असतां श्रीहरी । घडून येतसे सकळ घरीं । तेंवि मात ऐकून । एक शेजारी आला असे भेटावया ॥ ७७ ॥ वदे वाडीस जावया कारण । आपण निघाला हें ऐकून । जाहलें आनंदित माझें मन । मीही येतों सांगातीं ॥ ७८ ॥ मज वाट आहे ठाऊक । मिळाला असे मार्गदर्शक । म्हणती लेकराचें कौतुक । सद्गुरुमाय करीतसे ॥ ७९ ॥ येई नम्रता धरूनी । तितक्यामाजी एक कोणी । म्हणे बहु दिवस गेले होवोनी । रक्कम घ्यावी ही आपुली ॥ ८० ॥ मिळाला मार्गदर्शक । सोय जमली आर्थिक । ऐकतां जमले सकल लोक । महाराजांच्या दर्शना ॥८१॥ सकलांचा निरोप घेती । दुजे दिनीं ब्राह्म मुहूर्तीं । नित्य नियमांसी सारिती । लगबगीने महाराज ॥ ८२ ॥ घालूनी साष्टांग दंडवत । सद्भावें मातेसी वंदित । सांगातीं आशीर्वाद घेत । चालले महाराज वाडीसी ॥ ८३ ॥ ग्रामसीमेपर्यन्त । जनसमुदाय संगें येत । पुढती चालले हे समर्थ । सोबतीयाच्या संगतीं ॥ ८४ ॥ स्वानंदसागराच्या लहरी । उचंबळोनी येती वरिवरी । प्रेमाश्रूंच्या पवित्र सरी । नेत्रांतूनी वाहताती

॥ ८५ ॥ चरणचालीं तातडी । अंतरीं लागली असे गोडी । पहिला मुक्काम सावंतवाडी- । येथे असे जाहला ॥ ८६ ॥ येथेही वहुत गर्दी जाहली । मंडळी दर्शनासी जमली । मागील रक्कम राहिलेली । आणून देती रामभाऊ सबनीस ॥ ८७ ॥ प्रेमें सकळांचा निरोप घेऊन । त्वरें करिती पुढे गमन । जवळी अवश्य तेंच सामान । काय असे तें पहावें ॥ ८८ ॥ पदीं नसे पादत्राण । नसे छत्री वारण्या ऊन । एक देवसंपुष्ट असोन । लोटा दोन वस्त्रें बरोबरी ॥ ८९ ॥ स्नान संध्या नित्यक्रम । साधावया करिती मुक्काम । ऐशा परी बोरग्राम । लागतां तेथे थांबती ॥ ९० ॥ बालकाचे सकल हित । एक माय ती जाणत । सन्मार्गावरी वळवित । करीं पांगुळगाडा धरुनियां ॥ ९१ ॥ तेंवि जगज्जननी । सायुज्यपदाची स्वामिनी । आपुल्या भक्तालागूनी । मार्ग दाखवीतसे सारखा ॥ ९२ ॥ तेंवि या बोरग्रामांत । दृष्टांत देती श्रीगुरुदत्त । येत आहेसी वाडींत । तरी एक तुज सांगतो ॥ ९३ ॥ असती या वाडीग्रामीं । अधिकारी पुरुष गोविंद स्वामी । तरी जाऊनी त्यांचिये धामीं । दर्शन त्यांचें घेईजे ॥ ९४ ॥ पुढील जाणूनी भविष्यार्थ । हा दिधला असे दृष्टांत । हें होईल समयोचित । श्रुत श्रोतेयांकारणें ॥ ९५ ॥ ऐसी येपरी मार्गक्रमणा । करीत चालला हा भक्तराणा । येऊनी पोचलासे जाणा । नरसोबाच्या वाडीसी ॥ ९६ ॥ दत्तक्षेत्रीं आलियावरी । कोठे न थांबती क्षण भरी । धाव घेतली मंदिरीं । श्रीदत्तात्रेयाचे दर्शना ॥ ९७ ॥ ज्या करितां पतितपावन । ज्यांचें त्रिकाळ घेती देव दर्शन । त्या पादुकांसी साष्टांग नमन । महाराजांनी प्रथम घातले ॥ ९८ ॥ भक्तिगंगा हें पवित्र जीवन । वाहूं लागलें द्वय नेत्रांतून । करिती चरणक्षालन । प्रभूचें सद्भावें महाराज ॥ ९९ ॥ स्वानंदें चित्त भरलें । सात्विक भाव उमटले । नेत्र झाकूनियां घेतले । पादुका बैसविल्या हृदयासनीं ॥ १०० ॥ दिधला बोरगावीं दृष्टांत । ते गोविंदस्वामी अकस्मात । आले असती मंदिरात । पाहतां खूण पटली तत्क्षणीं ॥ १ ॥ त्या आनंदसमाधींत । पाहतांच करिती जागृत । घातला साष्टांग प्रणिपात । गोविंदस्वामींच्या चरणावरी ॥ २ ॥



श्री दत्तमूर्ती, माणगांव.



श्री दत्तमूर्ती, खर्राघाट (जि. हुशंगाबाद)

अचूक नामें संबोधून । कुशल क्षेम होय भाषण । यावें कृष्णेंत करोनी स्नान । माडीवरी आम्ही असूं ॥ ६ ॥ गोविंदस्वामी असती श्रेष्ठ । अधिकारी ब्रह्मनिष्ठ । तयांच्या चरणांगुष्ठाचें पवित्र तीर्थ । सेविती सकल आदरे ॥ ४ ॥ कितीहि पुरुष असो ज्ञानी । परमेश्वर सन्निध निशींदिनीं । तरीगुरुकृपे वाचूनी । अधिकारी पूर्ण न होय तो ॥ ५ ॥ याचें असे उदाहरण । नामयासवें नारायण । न विसंबती एकही क्षण । एकमेकांवाचूनी ॥ ६ ॥ नामदेव कीर्तनी दंग । श्रोते ऐकता होती गुंग । स्वानंदे नाचे पांडुरंग । कीर्तनरंगीं येऊनियां ॥ ७ ॥ अमृतासम भोजन । करी गृहीं नारायण । परि हाक ऐकतां जाय धावून । नामयाच्या सदनासी ॥ ८ ॥ आसवें येती नयनांतूनी । तीं आपुल्या शेल्याने पुसूनी । अंतरीचा भाव ओळखूनी । सवें कोरडी भाकर खातसे ॥ ९ ॥ शालू शेले भरजरी । मृदु आस्तरण शय्येवरी । सकल सोडूनी नामयाच्या वाकळीवरी । सुखे निद्रा करीतसे ॥ ११० ॥ आपुलें दिलें देवपण । विटेवरी उभें करून । करावया गेला दिवाळीसण । पांडुरंग नामयाच्या घरासी ॥ ११ ॥ असा भक्तिभावें अंकित । झाला असे पंढरीनाथ । इतुकेहि असोनी अलिप्त । आपुली ओळखी होऊं ने दी ॥ १२ ॥ याचें एकचि कारण । नामदेव असे गुरुविण । कळोनी आलें कच्चेपण । सोटा खातां गोरोबाचा ॥ १३ ॥ तेव्हा विसोबा खेचरमाउली । नामदेवासी लाभली । अज्ञानधुरोळा झाडती जाहली । क्षण एक न लागला ॥ १४ ॥ तेव्हा होय उगवता । हृदयाकाशीं ज्ञानसविता । तेजोमय प्रकाश दाविता । ज्ञानचक्षूतें उघडोनी ॥ १५ ॥ आता हा पुरुषोत्तम । अखिल-ब्रह्मांड-परब्रह्म । जीवन्मात्रा आत्माराम । व्यापूनिया उरलासे ॥ १६ ॥ जरी संगें हासे खेळे नारायण । तरी तो दूर होतां आपणापासून । सद्गुरुकृपेचें अंजन । घालितां ओळखिलें तयासी ॥ १७ ॥ एक होता अहंपणा । नामयाच्या पूर्ण मना । माझेवांचूनी नारायणा । न गमे अन्य कोठेही ॥ १८ ॥ तों गुरुकृपेने चराचर । पाहतां होय गोचर । दिला ठाव न जेथे न परमेश्वर । व्यापुनीही विटे उभा असे ॥ १९ ॥ तरी परमार्थज्ञानगंगा उतरून । परतीर गाठावया कारण ।

बळकट कास कृपेची जाण । करीं सद्गुरुची पाहिजे ॥ १२० ॥ जेंवि पांडुरंग सांभाळिती नामदेवा । तेंवि श्रीदत्तात्रेय वासुदेवा । तरी अवतारधारी या मानवा । सद्गुरुकृपा पाहिजे ॥ २१ ॥ हें महाराजांच्या प्रत्ययास । यावें या समयीं अनायास । असा असे उद्देश । श्रीगुरुदत्तात्रेयांचा ॥ २२ ॥ तेंवि श्रीदत्तात्रेयांनी । श्रीगोविंदस्वामींची गुरुस्थानीं । ठेविलीं योजना करोनी । पुढील मार्ग दावावया ॥ २३ ॥ मग स्वामीच्या आज्ञेकरून । महाराज जाती करावया स्नान । केलें कृष्णाबाईस नमन । जीवन नेत्रांसी लाविलें ॥ २४ ॥ हरहर गंगे कृष्णामाई । पावन केलेसी मजला आई । प्रेमाश्रू-जीवन लोचनीं वाही । एकरूप जल जाहलें ॥ २५ ॥ शुद्ध मंत्रोक्तीनें करूनी स्नान । निघाले ओलेच वस्त्र लेऊन । हातीं कलश घेतला भरोन । चरणीं पाणी घालावया ॥ २६ ॥ मुखीं दत्तनामस्मरण । पायरी पायरी चढोन । पादुकांपाशी येतांचि जाण । मज्जाव केला पुजाऱ्यांनी ॥ २७ ॥ येऊं नका म्हणती जवळी । पाणी न घाला चरणकमळीं । संशयित मनें जाहलीं । पुजाऱ्यांचीं तेधवा ॥ २८ ॥ त्रय लोकींचा देववृन्द । गुंजारव करीत होऊनी षट्पद । चाखितो नित्य मकरंद । चरणकमलींचा स्वानंदें ॥ २९ ॥ ते चरणकमल घेउनी करीं । त्रिकाल पूजिती पूजारी । परि प्रकाश हृदयांतरीं । अजूनी न पडला हें आश्चर्य ॥ १३० ॥ कुणी करिती अनुष्ठाना । कुणी करिती पारायणा । कुणी घालून प्रदक्षणा । दर्शन देवा दे म्हणती ॥ ३१ ॥ अन्नपाणी त्यजूनी । कडकडित उपोषणीं । देह झिजविती दिवस-रजनीं । या चरणदर्शनाकारणें ॥ ३२ ॥ या चरणरजें करून । उद्धरिले जडजीव पाषाण । अहिल्या जाहली पावन । राघवाच्या पदरजस्पर्शें ॥ ३३ ॥ ऐसे हे चरण पावन । पुजाऱ्यांच्या हातीं कैवल्यनिधान । परि काळचा ढगीं व्यापिलें जाण । हृदयाकाश आश्चर्य हे ॥ ३४ ॥ हीच प्रभूची अतर्क्य लीला । न कळे सामान्य मानवाला । असेल जैसा गुंफिला । धागा पूर्व सूकृताचा ॥ ३५ ॥ तेंवि विकल्पें मन । ना ओळखती आहेत कोण । नसावेत हे ब्राह्मण । ऐसेंच तयांतें वाटलें ॥ ३६ ॥ घालूं नका तुम्ही पाणी । ऐसें म्हणतांच पूजाऱ्यांनी । महाराज तैसेच मुकाट्यांनीं ।

मागुती फिरूनी चालले ॥ ३७ ॥ परि लेकरासम निःसीम माया । हे रुचेल काय दत्तात्रेया । क्षणीं संदेश देऊनियां । गोविंदस्वामींस जागविले ॥ ३८ ॥ शब्द येतांच कानावरी । पोथी ठेविली पाटावरी । गोविंदस्वामी झडकरी । मंडपामाजी पातले ॥ ३९ ॥ काय आपणासी पाणी । घालूं न दिले पूजाऱ्यांनी । चला आमुच्यासवें म्हणूनी । पादुकासमीप जाताती ॥ १४० ॥ दंड जो कां आपुला । तो महाराजकरीं दिधला । म्हणती आतां पाणी घाला । पादुकावरी आपण ॥ ४१ ॥ इकडे पूजारी गेले घाबरोनी । म्हणती अन्याय आला घडोनी । नयनांतूनी वाहे पाणी । वंदन करिती नम्रत्वें ॥ ४२ ॥ पुढती स्वामींसमवेत । राहती महाराज तेथ । ती कालक्रमणा होईल श्रुत । पुढीलिये अध्यायीं ॥ ४३ ॥ इकडे माणगाव-सदनीं । राहती माता-बंधू-पत्नी । परि उदास असती मनीं । आपुलिये परीने ॥ ४४ ॥ परि ध्यास रात्रंदिन । वासुदेवस्वरूपीं जडले मन । घडीघडीं आठवण । सीताराम-बंधूसी येतसे ॥ ४५ ॥ आठव होता न सुचे मनीं । आसनीं शयनीं आणि भोजनीं । नयनांतूनी वाहे पाणी । कधी भेटी होईल म्हणोनियां ॥ ४६ ॥ तरि नियमित कार्या चुकूरपणा । न होय कदापि जाणा । बंधूसवें भजनपूजना । श्रीदत्तमंदिरीं करिताती ॥ ४७ ॥ असे अमर आशा पुढती । दर्शन घेउनी येतों मागुती । यावरी दिवस कंठिती । सान महाराज गृहासी ॥ ४८ ॥ याच समयीं माणगावीं जाण । राहते होतें कां सदन । तें मोडकळीस आलिया कारण । नूतन बांधणें सुरू असे ॥ ४९ ॥ जरी जवळी नसे धन । त्याचीचिंता वाहे नारायण । पोतनीस नामें सद्गृहस्थ जाण । त्यांचे साहाय्य झाले असे ॥ १५० ॥ एक मास जाहला जाऊन । गृह बांधूनी होय पूर्ण । परि कां न येती अजून । लक्ष लागले मार्गाकडे ॥ ५१ ॥ एक ध्यास लागला मना । कधी येतील देव सदना । रात्रीं करूनी नामःस्मरणा । एक दिनीं शयनीं विसावले ॥ ५२ ॥ अंतरींचा उमाळा । उसळूनी येई वेळोवेळां । डोळीयासी न लागे डोळा । हा जिव्हाळा वेगळाची ॥ ५३ ॥ स्वस्थता लाभली क्षणांत । तैशीच सुखें निद्रा येत । प्रभात काळीं मंद वात । भूपाळीस्वर

ये मातेचा ॥५४॥ आळस न शिवला मना । क्षणींच उठोनियां जाणा । हस्तपाद क्षालूनी भूवंदना । मंत्रोक्तीने केलें असे ॥ ५५ ॥ नित्य नैमित्तिक कार्यासी । समाधान हो आज मानसी । सवत्स धेनु द्वारासी । येउनी उभी राहिली ॥ ५६ ॥ दक्षिण बाहु आणि लोचन । पावूं लागले असती स्फुरण । भरला घट घेऊनी सुवासीन । देखिली दत्तमंदिरी जातांना ॥५७॥ पाऊल टाकावें देवद्वारीं । तोंच उभी दिसे सामोरीं । सात वरुषांची साजिरी । मूर्ति ब्रह्मचारी तेजस्वी ॥ ५८ ॥ कटीला लेईली लंगोटी । करीं असे कमंडलु काठी । त्रिपुंड केशरी गंध ललाटीं । शिखा माथीं भुरभुर उडे ॥५९॥ गौरकांती हास्यवदन । जाहली वाटे प्रसन्न । सीतारामेंहि वंदन । केलें त्या बालमूर्तीसी ॥ १६० ॥ वीज चमकावी नभांत । तैसा प्रकाश मंदिरांत । नभोवाणी जैसी होत । तैसे शब्द घुमलेती ॥ ६१ ॥ सीतारामा ऐक कानीं । चिंता न करी कांही मनीं । आजपासून सातवे दिनीं । बंधू येतील गृहासी ॥ ६२ ॥ स्थिरावलें पाऊल क्षणभरी । पाहिलें फिरोनी माघारीं । तों दिसेना ब्रह्मचारी । अदृश्य तेथेंचि जाहलासे ॥ ६३ ॥ परि स्वानंदें भरलें हृदय । म्हणती दुजा न हा कोणी होय । आले हे सद्गुरुदत्तात्रेय । मज निरोप द्यावया ॥ ६४॥ ऐकिली जी नभोवाणी । विश्वास बैसला असे मनीं । दर्शन घेऊनी जाय सदनीं । माते प्रती सांगती ॥६५॥ आजपर्यंतचे दृष्टांत । जाहले सत्य तंतोतंत । म्हणे वासुदेव येईल खचित । सातवे दिनीं गृहासीं ॥ ६६॥ आशादीप लागला पुढती । त्या प्रकाशीं कालक्रमणा करिती । अखंड तयांची मनोवृत्ति । गुरुचरणांकडे लागली ॥ ६७ ॥ तोच ध्यास लागो मनीं । जानकीसी रात्रंदिनीं । भाव वसावा श्रीगुरुचरणीं । याविण दुजी आस नसे ॥ ६८ ॥ इति श्रीसीतारामचरित्रालंकारमणी । गुंफिला असे दृष्टांतकोंदणीं । प्रकाश दाविता अंतःकरणीं । दशम अध्याय गोड हा ॥ १६९ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

दशमोऽध्यायः समाप्तः ।

अध्याय अकरावा

श्री गणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ ॐ नमोजी भगवंता। शेषशायी लक्ष्मीकांता । नाना अवतार धेऊनी जगता । कौतुक त्वांची दाविलें ॥ १ ॥ जलचर आणि वनचर । जाहला नृसिंह अवतार । प्रल्हाद भक्त रक्षिला थोर । हिरण्यकश्यपू वधोनियां ॥ २ ॥ तूं जाहलासी बटू वामन । गेलासी पाताळ भुवन लक्षून । त्रिपाद मागितलें दान । बलिराजाप्रती तेधवां ॥ ३ ॥ सर्व व्यापक तूं नारायण । तुझी कुशलता जाणेल कोण । कैसा घेसी गोवून । भक्तासी सत्वपरीक्षेसी ॥ ४ ॥ एक पाऊल स्वर्गांत । दुजें ठेविसी या लोकांत । तिजे पातळलोकांत । दडपसी बलिराजासी ॥ ५ ॥ तरी तो जागला सत्त्वासी । तयाचा तूं अंकित होसी । ऐशा किती एक उदाहरणांसी । प्रभो तुझ्या सांगावें ॥ ६ ॥ तरी तूं दीनदयाळ । लोटून गेलासे किती काळ । होऊनियां द्वारपाळ । उभा तेथे तूं अखंड ॥ ७ ॥ परशुराम श्रीराम कृष्णावतार । यांचें वर्णन करितां साचार । होईल ग्रंथविस्तार । एवढी महती त्यामाजीं ॥ ८ ॥ परि एक बांधलें त्वां कंकण । तें ना सोडसी कदापि जाण । भक्तांचें करावें पालन । दुष्टांचें शासन करोनियां ॥ ९ ॥ येवोनिया तुझ्या द्वारांत । जाहला जो शरणागत । त्याचे पुरविसी मनोरथ । क्षणामाजी तूं श्रीहरी ॥ १० ॥ तेंवि माझी याचना । तुझ्या पदीं नारायणा । आता पुढील अध्यायाचो रचना । सुसंगतीने कथावी ॥ ११ ॥ पाहतां मागील अध्यायांत । ब्रह्मचारी भेटले मंदिरांत । म्हणती येतील श्रीगुरुदत्त । बंधू तुझे माणगावीं ॥ १२ ॥ नरसोबाचे वाडीस । येवोनी जाहला एक मास । म्हणोनी माणगावास । जावया महाराज निघाले ॥ १३ ॥ दत्तपादुकांसी साष्टांग नमन । तैसेच गोविंदस्वामींचे चरण । प्रेमभावें नमून । आशीर्वाद घेतलासे ॥ १४ ॥ माणगावीची घरबांधणी । पूर्ण जाहलीसे समजोनी । गृहप्रवेशाकारणीं । वास्तुशांती ठरली असे ॥ १५ ॥ कोठे न थांबतां जाण । पोहोचले माणगावीं

येऊन । बंधू आणि ग्रामवासी जन । सामोरे जाती प्रेमभरें ॥ १६ ॥ पाहिला असे मुहूर्त । सकल तयारी हो गृहांत । परि सुसमय टळल्यावरी येत । पत्नी वासुदेव महाराजांची ॥ १७ ॥ म्हणोनी तयांचें चित्त देख । निराश जाहलें क्षणांत । ना करिती वास्तुशांत । सान बंधूने ती केली ॥ १८ ॥ परि भडकला क्रोधाग्नि । शब्द येती मुखांतूनी । या गृहांत नांदता कोणी । पुढती एकही ना राहील ॥ १९ ॥ स्वामींचे निघाले जे उद्‌गार । ते असत्य ना होणार । जाहली असे त्या जागेवर । धर्मशाळा या माणगावीं ॥ २० ॥ सान संस्थान जें इंदूर । गुरुभक्त इंदिराबाई होळकर । त्यांचा भाव ह्या चरणांवर । दृढ असे जडलेला ॥ २१ ॥ त्यांजला या जागेची दैना । न पाहवे नयनां । म्हणोनी धर्मशाळा जाणा । बांधिली असे तयांनी ॥ २२ ॥ आजवरी मुखांतून । अपशब्द न काढिला जाण । परि तैशीच घटना ये घडोन । म्हणोनी भाषण झालें तसें ॥ २३ ॥ त्याचेच काय प्रायश्चित्त । घ्यावें हें येउनी मनांत । या कारणें चांद्रायण व्रत । आरंभिले असें तयांनी ॥ २४ ॥ हें कठिण व्रत चांद्रायण । कैसें करावें पालन । याची थोडकी ओळखण । श्रोतेयांसी असावी ॥ २५ ॥ या व्रताच्या आरंभास । पाहुनी दिन अमावास्येस । प्रथम करावा उपवास । कडकडीत व्रतस्थांनी ॥ २६ ॥ मग एक घास प्रतिपदेला । दोन घास द्वितीयेला । ऐसा एकेक वाढवूनी पूर्णिमेला । पंधरा ग्रास भोजन करावें ॥ २७ ॥ पुढती वद्य पक्षास । कमी करावा एकेक घास । आणिक अमावस्येस । पूर्ण उपवास करावा ॥ २८ ॥ या एक्या प्रकारानी । व्रत पालना करिती कोणी । दुसरा प्रकार याहूनी । अवघड असे आचरितां ॥ २९ ॥ शुद्ध प्रतिपदेस पंधरा घास । तों क्रमांकें कमी पूर्णिमेस । घेताती एकेक ग्रास । पुढती कृष्ण प्रतिपदेपासूनी वाढविती ॥ ३० ॥ पिपीलिका चांद्रायण । या व्रता नाम जाण । चंद्राच्या गतीवरून । आहारगति ही योजिली असे ॥ ३१ ॥ उपवासाचे तत्वज्ञान । पाहतासे अर्थपूर्ण । ऋषीजनांनी आखून । ठेविलें असे पूर्णत्वें ॥ ३२ ॥ कांही नियमित तिथींस । योजिला असे उपवास । त्यांतहि असे उद्देश । ठेविला असे घालोनियां ॥ ३३ ॥ ऐसें हें आचारितां चांद्रायण

व्रत । आन्हिक आणि नित्यक्रमांत । त्रिकाळ स्नान महाराजांचें होत । चुकत त्यांमाजी कांही नसे ॥ ३४ ॥ ऐसें हें कठिण व्रत आचरितां । देहासी ये अशक्तता । परि निर्धार पूर्ण होता । महाराजांच्या मनाचा ॥ ३५ ॥ कठोर आचरितां हें व्रत । खुशाल होवो देहपात । परि पाठीशी कृपावंत । श्रीगुरुदत्तात्रेय निश्चित असे ॥ ३६ ॥ व्रतसमाप्ति जाहलियावरि । क्षीणता आली शरीरीं । तरी पुनरपि तयारी । केली वाडीसी जावयाची ॥ ३७ ॥ असे मातेचीहि इच्छा पूर्ण । घ्यावे श्रीगुरुदत्तचरण । ती समवेत जाई म्हणून । निघाले महाराज वाडीसी ॥ ३८ ॥ मुकाम मुकाम साधोन । पोहोचले वाडीस येऊन । आधीं साष्टांग वंदन । पादुकांसी घातले ॥ ३९ ॥ या समयीं सकल जन । स्वामीस ओळखती पूर्ण । पाहूनी त्यांचे आचरण । श्रद्धा बसली तयांवरी ॥४०॥ जरी शरीराचें ओसरे ओज । तरी नेत्रामाजीं अद्वितीय तेज । महाराज बोलती जे सहज । तेणें मुग्ध होती सकलही ॥ ४१ ॥ करी निवास सरस्वती । वासुदेवांच्या रसनेप्रती । सत्य तयांचीं वचने होती । प्रत्यय येई सकळिकां ॥ ४२ ॥ सतेज सात्त्विक हृदयांत । प्रभा पाहती श्रीगुरुदत्त । आतां अनुग्रह कर्णसंपुष्टांत । द्यावा ऐसें योजिती ॥ ४३ ॥ अंशावतार तत्वतां । महाराज प्रत्यक्ष असतां । परि देव-भक्त-भिन्नता । दाविती जनांकारणें ॥ ४४ ॥ नित्यक्रमा अनुसरूनी । रात्रीमाजीं एके दिनीं । मातृगुरुपदाभिवंदन करूनी । तेथोनिया चालले ॥ ४५ ॥ गोविंदस्वामींच्या माडीवर । झोपती महाराज निरंतर । आजही आपुल्या शय्येवर । येवोनियां बैसती ॥ ४६ ॥ परि वेगळ्याची आनंदासी । अनुभवती आज मानसीं । श्रीदत्तनामामृतासी । जिव्हा तल्लीन सेवितां ॥ ४७ ॥ गोविंदस्वामी थोर विभूती । सकळ आंतर खुणा जाणती । निघाली असे मधुरोक्ती । महाराजांप्रती उद्देशुनी ॥ ४८ ॥ आजपासोनी तुम्ही जाणा । करणार ना दत्तोपासना । पुनः करिती विचारणा । बोलोनियां दाविलें ॥ ४९ ॥ म्हणती मुख्य ब्राह्मणांना । अग्नि-गायत्री-सूर्य-उपासना । बाणली असे पूर्ण मना । यथाशक्ति ती होतसे ॥ ५० ॥ ऐसें असतां चिंतन । मग कासया दत्त पादुका पूजन ।

ऐकतां विस्मित जाहलें मन । परि न बोलतां गोविंद स्वामी ॥ ५१ ॥ थोर लोकांचें विशाल मन । कदा न होय उथळ जाण । पुनरपि ऐकतां तेंचि भाषण । हासती परी ना बोलती ॥ ५२ ॥ मग दोघांनीहि धरिलें मौन । करूनी श्रीगुरुचें चिंतन । अंग टाकितांची जाण । सुखें निद्रा लागली ॥ ५३ ॥ पूर्वसंचयें सर्वत्र । अन्तर्बाह्य जाहले पवित्र । म्हणोनी सद्गुरुकृपेला पात्र । मनोभूमिका जाहली ॥ ५४ ॥ म्हणोनी प्रत्यक्ष श्रीगुरुदत्त । ओतिती हृदयसंपुटांत । महावाक्योपदेशामृत । स्वप्नामाजी येवोनियां ॥ ५५ ॥ धन्य धन्य ही विभूती । अवतरली असे या जगतीं । मंत्रोपदेश होतांच होती । क्षणामाजीं जागृत ॥ ५६ ॥ भूत भविष्य वर्तमान । जाणती जयांचें अगाध ज्ञान । ऐसे गोविंदस्वामी ज्ञानघन । शेजारींच असती पहुडले ॥ ५७ ॥ निघाली असे मधुर वाणी । वासुदेव जागृत दिसतां क्षणीं । मंत्रोपदेश काय श्रीदत्तात्रेयांनी । दिधला असे ना आपणा ॥ ५८ ॥ ऐकताच ऐसा अचूक प्रश्न । चकित होय महाराजांचें मन । स्वप्नींचें ओळखितां गुह्य जाण । काय ही असे योग्यता ॥ ५९ ॥ धन्य धन्य जाहलें जीवन । श्रीदत्तात्रेयकृपेंकरून । जाहलें मज दर्शन । ह्या थोर महात्म्याचें ॥ ६० ॥ सकल भावांची तेथ वसती । तैशीच होय सकल ज्ञानप्राप्ति । म्हणोनि ब्रह्मस्वरूप मानिती । लोक गोविंदस्वामींना ॥ ६१ ॥ म्हणोनीच प्रश्न ऐकतां क्षणीं । प्रेमाश्रू पाझरती लोचनीं । मिठी मारिली जाऊनियां चरणीं । उठोनियां झडकरी ॥ ६२ ॥ गुरुमाउली हो प्रसन्न । मंत्राचें सांगोपांग विधान । अध्यात्मविद्या करूनी कथन । अर्थबोध हृदयीं ओपिती ॥ ६३ ॥ मंत्रजप करावा कैशापरी । बैसवावा वैखरीवरी । शिकविती स्वामी परोपरी । वासुदेवातें कृपेनें ॥ ६४ ॥ आतां न राहिला असे मना । किंचितहि मी-तूं-पणा । मानससरोवरामाजीं जाणा । विहार करी अद्वैत हंस ॥ ६५ ॥ तैंपासूनी सकल भ्रांती- । उडाली, ये अंगीं विरक्ति । पालटली मनोवृत्ति । वडिलांसम तयांची ॥ ६६ ॥ सकल असार पसारा । सांडोनियां व्यवहारा । तैसेंच त्यजोनियां संसारा । घ्यावा संन्यास वाटलें ॥ ६७ ॥ मन जाहलें उताविळ । निश्चय

देखतांचि प्रबळ । काय करिती दीनदयाळ । गोविंदस्वामी तेधवां ॥ ६८ ॥ परि अतर्क्य ईश्वरी लीला । त्याचा संकेत असे वेगळा । तो करोनी घेईल कार्याला । आपुल्या इच्छेप्रमाणें ॥ ६९ ॥ असती याच समयास । तीर्थक्षेत्रीं या नरसिंहवाडीस । मौनीबुवा अधिकारी पुरुष । त्यांच्या दर्शना पाठविलें ॥ ७० ॥ सकल ज्ञानभूमिका ओलांडून । तुरीयावस्थेंत रमती जाण । जणों सगुण ब्रह्म होवून । जगामाजीं वावरती ॥ ७१ ॥ बालकासम राहणी । श्रीदत्तात्रेयासी आवडे मनीं । निष्पाप विकारशून्य म्हणोनी । मुलांसवें क्रीडती ॥ ७२ ॥ बालकांसवें खेळणें । त्यांच्या संगतीं नाचणें । आवडीसम भातुकें देणें । आवडी ही मनाची ॥ ७३ । या मौनीबुवांनी । गृहत्याग केला बालपणीं । काशीरामेश्वरापासोनी । पदयात्रा केली अनेकदा ॥ ७४ ॥ अन्न आहार त्यजून । करिती निंबपत्रांचें सेवन । मौनव्रत केलें धारण । कितिएक वर्षें तयांनी ॥ ७५ ॥ म्हणोनीच वदती जन । मौनीबाबा म्हणून । तयांचें होतां दर्शन । वृत्ति पालटली वासुदेवांची ॥ ७६ ॥ त्याच समयीं श्रीदत्तात्रेयांनी । दृष्टांत दिधला येउनी स्वप्नीं । सात वरुषें माणगावांत येऊनी । राहूं आम्ही तुम्हांसगें ॥ ७७ ॥ असे जयाचें रात्रंदिन । जें अवधूतचिंतन । ते श्रीगुरुदत्तात्रेय प्रभु जाण । येणार माणगावीं रहावया ॥ ७८ ॥ ऐसा होतांची दृष्टांत । मावळलासे विचार त्वरित । प्रभूच्या स्वागताप्रीत्यर्थ । त्वरें चालले माणगावीं ॥ ७९ ॥ परि एक इच्छा उदेली चित्तीं । संगें न्यावी दत्तमूर्ति । जातां माणगावाप्रती । संकल्प मनीं जाहलासे ॥ ८० ॥ प्रवासीं मार्गीं कोल्हापुरीं । पातले महालक्ष्मीमंदिरीं । हेत घातला कानावरी । दर्शन घेउनी चालले ॥ ८१ ॥ जयास एकदा म्हणावें आपुला । कधी न सोडावे दूर त्याला । पुरवी ऐशा कौतुकाला । एक परमेश्वर सर्वदा ॥८२॥ तेंवि हा भगवंत । त्रिगुणात्मक श्रीगुरुदत्त । पुरविता तो सकल हेत । श्रीवासुदेवमहाराजांचे ॥ ८३ ॥ प्रत्यक्ष मी तुझ्या गावीं येत । ऐसें जरी सांगती दत्त । तरी मानसीं असे हेत । श्रीदत्तमूर्ती घेण्याचा ॥ ८४ ॥ तेंवि कोल्हापूर संस्थानांत । कागल गांव अन्तर्गत । असे त्यावेळीं प्रख्यात ।

जहागिरीवजा एक सान ॥ ८५ ॥ तेथील एक प्रसिद्ध सोनार। असे भाविक मनाचा थोर । तयासही जाहला साक्षात्कार । दत्तमूर्ती बनविण्याचा ॥ ८६ ॥ तो भेटलासे येवोन । म्हणे मी मूर्ति करितों सगुण । ही आश्चर्यजनक घटना पाहून । पूर स्वानंदाचा लोटला ॥ ८७ ॥ महाराज वदती तयाला । मूर्ति पाहिजे आम्हाला । परि तियेचें द्यावयाला । मोल कांही जवळी नसे ॥ ८८ ॥ त्याची चिंता न करा मानसीं । मोल मिळालें असे आम्हासी । परि मूर्तीची बैठक कैशी । ती सांगावी आपण ॥ ८९ ॥ पुढती अभयमुद्रा सिद्धासनावर । विराजमान मूर्ति मनोहर । सात बोटें उंची द्वय कर । आठ दिवसांत दिधली असे ॥ ९० ॥ मूर्ति करविता सोनार । तया साष्टांग घालिती नमस्कार । हर्षोदयें हृदयसागर । उचंबळोनी येतसे ॥ ९१ ॥ इकडे माणग्रामवासी । सान महाराज राहती गृहासी । मान देती भावजयीसी । मातेसमान सर्वदा ॥९२॥ नित्यकर्माचें अंगीं वळण । स्नानसंध्या पूजन । परि अंतरीं एक ध्यान । सद्गुरु वासुदेवरायाचें ॥ ९३ ॥ आसनीं शयनीं भोजनीं । ग्रासागणीक हो आठवणीं । निद्रा न ये अंथरुणीं । तळमळे जीव सारखा ॥ ९४ ॥ लक्ष सारखें मार्गावरी । कर्ण ऐकती केव्हा तरी । भल्या भल्या ही प्रेमभरी । हाक माझ्या स्वामींची ॥ ९५ ॥ तैसेच ग्रामवासी जन । वाट पाहती रात्रंदिन । म्हणती आमुचें विश्रांतीस्थान । वासुदेवचरण दिसती केधवां ॥ ९६ ॥ दुव्या दुऱ्याने जोडली । प्रभूने ती साखळी । कवणासही ना ती उमगली । म्हणोनी चिंता वाहती ॥ ९७ ॥ असो एकदा उगवला सुदिन । शुभ चिन्हें येती दिसून । प्रेमळ सात्त्विक जयांचें मन । ते सानंद होती अंतरीं ॥ ९८ ॥ ज्यांनी अंगीकारला भक्तीचा साज । ते सीताराममहाराज । आठवूनी श्रीगुरुचरणांबुज । अंथरुणावरी पहुडले ॥ ९९ ॥ तळमळ गेली मावळून । सुखें निद्रा लागली जाण । ब्राह्म मुहूर्त लक्षून । महाराज जागृत जाहले ॥ १०० ॥ बांग ऐकिला कुक्कुटांचा । शेजारीं नाद घिरटीचा । वरी ओवी भूपाळीचा । मंजुळ स्वर चालला असे ॥ १ ॥ जैशी अरुणोदया स्वागतार्थ । उषःप्रभा आनंदांत । आरक्त वस्त्रें विभूषित ।

नटोनियां उभी असे ॥ २ ॥ हातीं घेऊनी पंचारती । करी सहस्र किरणांनी आरती । मंजुळ रवें द्विजगण गाती । वृक्षांवरी बैसोनियां ॥ ३ ॥ दारोदारीं अंगणांत । सडासंमार्जन युवती करित । गोपद्में स्वस्तिकें काढीत । रंगवल्ली भरोनियां ॥ ४ ॥ धेनुवत्स गोठणीं । दंग असती स्तनपानीं । ऐकूं येई सदनांतूनी । ध्वनि दधिमंथनाचा ॥ ५ ॥ करोनियां प्रातःस्मरण । स्नान करावया लागून । निघाले सीतारामम्हाराज जाण । निर्मलामार्ग लक्षूनियां ॥ ६ ॥ कांही सफल कार्य होण्यासी । शुभ चिन्हें होती मानवासी । तेंवि आजचियें दिवशीं । सीताराम मनीं स्वानंदांत ॥ ७ ॥ रविराज येणार नभांगणीं । तयाची प्रभा दशदिशीं फाकूनी । पूर्व दिशा पाहतां विलोकूनी । स्वानंद मानसीं हेलावे ॥ ८ ॥ तेंवि आनंदाच्या लहरी । उचंबळूनी येती वरिवरी । येणार परमात्मा आज घरीं । निश्चित मना वाटतसे ॥ ९ ॥ प्रथम नेत्रांसी लावूनी जीवन । हर हर गंगे भागीरथी म्हणून । करिती महाराज निर्मलास्नान । चिंताविरहित तेधवां ॥ ११० ॥ मंत्रोक्ती चालली वदना । अर्घ्य देती उगवत्या नारायणा । हस्त जोडिती मिटती नयनां । प्रार्थना करिती मानसीं ॥ ११ ॥ आज एकले येती बंधू । सवें अनाथनाथ कृपासिंधू । भक्तवत्सल आत्मबोधू । श्रीदत्तराज माउली–ही येतसे ॥ १२ ॥ श्रीगुरुदेव दत्त हा मंगल ध्वनि । ऐकूं येई दूरवरूनी । कर्ण टवकारले त्या क्षणीं । मार्ग लक्षूनी नामाचा ॥ १३ ॥ ओळखीचा आला स्वर । पुलकित जाहलें अंतर । धाव घेऊनी सत्वर । मारिली मिठी चरणांसी ॥ १४ ॥ ध्यास लागला असे मनीं । चिंता करी रात्रंदिनीं । तो अकस्मात चिंतामणि । समोर येऊनी प्रकटला ॥ १५ ॥ जरेने व्यापिला अत्यंत । काळ उभा ठाके द्वारांत । तो अमृत–कलश हातांत । जैसा अकस्मात सांपडला ॥ १६ ॥ तेंवि मानसीं लागली चिंता । कधी भेटेन सद्गुरुनाथा । तों कामधेनू वत्साकरितां । धावत माणगावीं आली असे ॥ १७ ॥ करावया जगदोद्धार । अतर्क्य लीलेने जो परमेश्वर । तो त्रिगुणात्मक त्रिगुणाकार । अवतरलासे भूवरी ॥ १८ ॥ असें तें वैकुंठीचें निधान । श्रीगुरुदेवदत्त अनसूयानंदन । तें सन्निध देखतांची जाण ।

सीमा न ये त्या स्वानंदा ॥ ११ ॥ उठवोनी धरिलें करासी । वदती चिंता न करीं मानसीं । दत्त प्रभूच्या स्वागतासी । तयारी करावया लागावें ॥ १२० ॥ तों क्षणामाजीं गावांत । आनंदाचीं पसरली मात । आले आले श्रीगुरुदत्त । म्हणती आपुल्या माणगावीं ॥२१॥ धन्य जाहलें माणगांव । संगें आले देवाधिदेव । निर्मलातीरीं जमाव । भाविकांचा जमला असे ॥ २२ ॥ टाळ मृदंग खणखणित । नामस्मरण दत्त दत्त । नाद घुमला आसमंतांत । दिंड्या नाचती आनंदें ॥ २३ ॥ पुढे सनईचा मंजुळ ध्वनि । मागुती नेती मूर्ति मिरवूनी । तों स्वगृहींची दिशा लक्षूनी । नजिक गृहाच्या येताती ॥ २४ ॥ तों चालतां चालतां येत । विचार महाराजांच्या मनांत । प्रतिष्ठापना करावी येथ । मूर्तिची या जागेवरी ॥ २५ ॥ म्हणोनी त्या जागेवर । महाराज उभे राहिले स्थिर । जाणती तयांचें अंतर । सान बंधू जवळी ते ॥ २६ ॥ म्हणती आपुली इच्छा अंतरीं । प्रयत्न करितां होई पुरी । आज आपुल्या ह्या जागेवरी । हक्क नाही सर्वथा ॥ २७ ॥ मानसीं विचार करून । गजरमेळीं निघाले तेथून । स्वगृहीं अंगणीं येऊन । फेरु धरला नामाचा ॥ २८ ॥ मग करोनी लिंबलोण । पंचारती ओवाळून । मूर्तिप्रवेश करवून । गृहामाजीं आले आदरें ॥२९॥ ही प्रासादिक मूर्ति मनोहर । स्वतंत्र जागा करूनी तयार । ठेविली रंगीत पाटावर । काही काळपर्यन्त ॥ १३० ॥ आलें नवचैतन्य ग्रामजनां । सद्भावना प्रकटली मना । पुढीती प्रसाद घेउनी सदना । आनंदें गेले सकळिक ॥ ३१ ॥ आधीच मनींची वाट सरळ । मग गृहासी मूर्ति ये सोज्वळ । भक्तिगंगा निर्मळ । अखंड वाहूं लागली ॥ ३२ ॥ आतां पुढील अध्यायीं सुंदर । बांधून होई मंदिर । कर्ता करविता परमेश्वर । एकचि असो दत्तप्रभु ॥ ३३ ॥ जो देणार अभयदान । तो दत्तराज मूर्त गुणनिधान । वसो हृदयासनीं येवोन । जानकीच्या सर्वदा ॥ ३४ ॥ इति श्रीसीतारामचरित्रालंकारमणी । गुंफिला असे दृष्टांतकोंदणी । प्रकाश दाविता अंतःकरणीं । एकादश अध्याय गोड हा ॥ १३५ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

एकादशोऽध्यायः समाप्तः ।

अध्याय बारावा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ ॐ नमोजी दयावंता । गाणगापुरवासी श्रीगुरुदत्ता । एकदा हृदयासी आठवीतां । सफलता सकल कार्यासी ॥ १ ॥ तुझी कृपा असे बलवंत । मुका होईल पंडित । पांगळ्यासी हात पाय येत । लागेल डोंगरी चढावया ॥२॥ बल देशील निर्बलासी । दिव्य दृष्टि आंधळ्यासी । लाभेल रत्न पारख्यासी । एक क्षणीं तव कृपें ॥ ३ ॥ पाझरेल काळचा खडकांतून । स्फटिकासम शुद्ध जीवन । येतील पानें फुलें फळें जाण । कोरड्याही काष्ठासी ॥ ४ ॥ तूं पुत्र दिधलासी वृद्ध स्त्रीस । वांझ म्हशीचें दूध काढिलेंस । ऐसा तूं पुराण पुरुष । काय महिमा वर्णूं तुझा ॥ ५ ॥ तुझ्या स्मरणें कुष्ट रोग । जाऊनी होय दिव्य अंग । महारोग होती भंग । तुझिया कृपें दयाळा ॥ ६ ॥ पतितांचा तूंच आधार । विश्वनाथ विश्वंभर । भक्तकामना पुरविणार । हेंच ब्रीद तुझें असे ॥ ७ ॥ तेंवि तूं मागील अध्यायांत । आलासी माणग्रामांत । तरी पुढील मथितार्थ । द्वादश अध्यायीं कथावा ॥ ८ ॥ टेंब्ये घराणें भाग्यवंत । देवगृही बसले श्रीगुरुदत्त । तरी दर्शनाची होत । गर्दी गृहामाझारीं तदा ॥ ९ ॥ वाटे रमा मातोश्रीचे मनीं । स्थापना व्हावी याच सदनीं । तेंच इच्छिती वासुदेव महाराज मनीं । परि अशक्य म्हणोनी ना बोलती ॥ १० ॥ पाय स्थिरावले ज्या ठिकाणीं । तेथे स्त्री होती एक कोणी । तियेच्या स्वप्नीं जाऊनी । दत्तराज वदती तियेला ॥ ११ ॥ म्हणती तुझी पडित जागा जाण । पाहूनी योग्य ब्राह्मण । तयासी करी भूदान । सांगणें असे हें आमुचें ॥१२॥ भाविक होतें तिचें मन । बिंबलें प्रभूचें भाषण । उदईक निघाली उठोन । महाराजांचे गृहासी ॥ १३ ॥ पडलें जें कां आपणा स्वप्न । तें मातोश्रीप्रती करी कथन । म्हणे कोणता पहावा ब्राह्मण । भूदान तया करावया ॥ १४ ॥ यावरी माउली वदत । आमुच्या वासुदेवाप्रत । श्रीदत्तप्रतिष्ठापनार्थ ।

पाहिजे असे जागा ती ॥ १५ ॥ ऐसें ऐकतां क्षणीं । आनंद जाहला असे मनीं । झणी बक्षिसपत्र करोनी । महाराज चरणीं वाहिलें ॥१६॥ द्वय बंधू उकलोनी जों पाहती । प्रेमाश्रू पातले नयनांप्रती । म्हणती भगवंता तुझ्या चित्तीं । काळजी आमुची किती असे ॥ १७ ॥ सत्य संकल्प करितां मनांत । तो पूर्ण करिता असे भगवंत । परि शुद्धता हृदयांत । एकच त्याजला पाहिजे ॥ १८ ॥ उत्साह वाढलासे द्विगुणित । भरती झाली ओतप्रोत । सीताराम करी मेहनत । रात्रंदिन झटूनियां ॥१९॥ जागा योजिली म्हणोनी । वार्ता गेली कर्णोपकर्णी । मंदिरकार्यालागोनी । झणीं सुरवात झाली असे ॥ २० ॥ कुणी लाकडे इमारती । कुणी विटा आणिती । कुणी जागा साफ करिती । कुणी आणिती आणखी कांही ॥ २१ ॥ सुमुहूर्त पाहून । केलें असे भूमीपूजन । दत्तनाम स्मरून । पायवा आखिती मंदिराचा ॥ २२ ॥ पायव्याची सुरवात । प्रथम वासुदेव महाराज करित । पुढती सीताराम बंधूप्रत । करिती महाराज योजना ॥ २३ ॥ कौतुकास्पद मेळावा । मिळालासे वासुदेवा । श्रमदान देती देवा- । मनोभाव वाहूनी ॥ २४ ॥ निर्माण होय शुभ वासना । अनेकांचिया मना प्रेरणा । ही दत्तप्रभूची कृपा जाणा । याविण दुजें काय असे ॥ २५ ॥ मूर्तीसाठी गाभारा । स्वयें बांधिती आपुले करां । भावभक्तीचा जणुं गर्भागारा । मूर्ती तेथे स्थापिली ॥ २६ ॥ ऐसें सान परि मनोहर । श्रीदत्तात्रेयाचें मंदिर । बांधूनी जाहलें सत्वर । अवघ्या सात दिनांमाजी ॥ २७ ॥ मंदिर जाहलें बांधोनी । परि आवारात नसे पाणी । आधी विहीर खोदावी म्हणोनी । विचारांत पडियले ॥ २८ ॥ ज्याने भक्ताचा भार घेतला शिरीं । त्याचें लक्ष सदैव त्यावरी । तो भक्त-काज-कैवारी । हेत पुरविता जवळी असे ॥ २९ ॥ दाखवी येवोनियां स्वप्नीं । विहीर खोदावी या ठिकाणीं । लागेल शीतळ मधुर पाणी । श्रीगुरुदत्तमाउली वदतसे ॥ ३० ॥ प्रभूचा मिळतांच इषारा । काय आनंद द्वय-बंधूंच्या अंतरा । जिवंत लागला असे झरा । देखती निर्मळ पाण्याचा ॥ ३१ ॥ श्रीदत्तचरणकमलाची अमृतधारा । आली गंगा या मंदिरा । पावन करावया अंतरा । या माणगावीं

जनांच्या ॥ ३२ ॥ तीन दिनांमाजीं खणून । विहीर जाहली असे बांधून । आवडीहि मनांतून । दिसूनी जनांच्या येतसे ॥ ३३ ॥ सकलांपरिस करिती श्रम । सान महाराज सीताराम । श्रीवासुदेवनामीं आराम । तयांसी पूर्ण होतसे ॥ ३४ ॥ गाभाऱ्याच्या मागील बाजूस । पाकसिद्धी करावयास । योजना केली असे खास । गृह्याग्निकुंडहि तेथे असे ॥ ३५ ॥ सांगोपांग सकल सिद्धता । जाहली प्रतिष्ठापनेकरितां । पाहती मग शुभ मुहूर्ता । स्वयें वासुदेव महाराज ॥ ३६ ॥ श्रीशके अठराशें पांच असोनी । वैशाख मासीं पंचम दिनीं । विराजमान सिंहासनीं । श्रीदत्तप्रभू जाहले ॥ ३७ ॥ प्रतिष्ठापना जाहली । मूर्तीत देवकळा संचरली । परमात्मशक्ति प्राप्त झाली । क्षण एक न लागतां ॥ ३८ ॥ लीलाविग्रही हा परमेश्वर । काय काय ना करणार । भक्तासाठी घरदार । सोडोनी तो जातसे ॥ ३९ ॥ पांडवांचा पाठीराखा । कधी न होय पारखा । हांकेसरशीं भक्तसखा । उभा राहतो पाठीशी ॥ ४० ॥ याचीं उदाहरणें अनंत । सांगतां वाढेल ग्रंथ । परि भक्तासाठी करी कष्ट । देव देवपणहि सोडीतसे ॥ ४१ ॥ तेंवि प्रभु श्रीगुरुदत्त । स्वयें महाराजांप्रती सांगत । तुझ्या संगें माणगावांत । येतों सात वर्षें राहावया ॥ ४२ ॥ सकल ऋद्धी सिद्धी दासी । ओळंगती या चरणासी । तेथे कार्य सिद्धीसी- । जावया कासया विलंब ॥ ४३ ॥ जो त्रिभुवनाचा अधिकारी । असे भक्तांचा कैवारी । कुबेर त्याचा भंडारी । द्वारें मोकळीं करीतसे ॥ ४४ ॥ वाडीं-गाणगापुरा-समान । सकल कार्यक्रम होती जाण । पूजा अर्चा श्रीगुरुभजन । त्रिकाळ आरती होतसे ॥ ४५ ॥ होत असे समाराधना । किती पात्रें उठती जाणा । याची न ये करितां गणना । तृप्तता सकल जीवांसी ॥ ४६ ॥ काय लागली होती गोडी । भक्तिरसाची दुथडी । गंगा वाहे आवडीं । रात्रंदिन सारखी ॥ ४७ ॥ या सात वरुषांच्या काळांत । कित्येक लोक येती आर्त । तयांच्या पूर्ण होत । मनःकामना सर्वही ॥ ४८ ॥ मंदिराच्या संरक्षणार्थ । ठेविताती श्रीगुरुदत्त । आपुले गण समस्त । रक्षिती मंदिर रात्रंदिनीं ॥ ४९ ॥ जागृत होतें असें हें स्थान । कोणताहि दोष न राहे लपून । सद्भावनेचें

वसतिस्थान । जाहलें असे सकलांचें ॥ ५० ॥ ऐसा प्रभूचा सोहळा । वर्षांतून होतसे किती एक वेळां । जाऊनी भाविकांचा मेळा । डोळां आल्हाद पावतसे ॥ ५१ ॥ हा सात वरुषांचा काळ । अनुपम साधिली वेळ । करिती आपुल्यासम तात्काळ । सान बंधू सीतारामासी ॥ ५२ ॥ ऐसा जैसा गळ्यांतील ताईत । तैसा आवडता असे बहुत । सकल लाड पुरवित । खाण्यापासूनी लेण्याचे ॥५३॥ मंदिर बांधल्यापासोन । गृहासी न राहती वासुदेव जाण । गृहस्थाश्रम स्वीकारिला असोन । तरी राहणें असे मंदिरीं ॥ ५४ ॥ सौभाग्यवती अन्नपूर्णा । गृहासी जाऊनी कार्यकारणा । सकल गृहकृत्यें करूनी जाणा । विसावा मंदिरीं घेत असे ॥ ५५ ॥ परि त्या काळचें वातावरण । कैसें असे गृहामाजीं जाण । हें कळावें आपणांलागून । म्हणोनी कांही कथितसे ॥ ५६ ॥ जी पतिसेवेसी होती तत्पर । निष्ठा श्रीदत्तचरणीं निरंतर । प्रसन्न होवोनी परमेश्वर । वर देता झाला तियेसी ॥ ५७ ॥ स्वांशासहित तुझे कुमर । होणार माते या भूवर । ते ब्रह्मा विष्णु महेश्वर । वासुदेव हरि सीताराम ॥ ५८ ॥ या सुपुत्रांची म्हणविते आई । परि अन्नपूर्णाबाईची होय सासूबाई । जैसा नात्यामाजी फरक होई । तैसीच माया हो वेगळी ॥ ५९ ॥ कधी स्नुषेला न देई सुख । कधी न मारी कौतुकें हाक । स्नुषेच्या लेखीं सदैव दुःख । नयनीं आसू सर्वदा ॥ ६० ॥ तोंडसुखाला येई भरती । ती कधी न होय कमती । जैशा ज्वाळा उकळती । क्रोधाग्नीच्या सर्वदा ॥ ६१ ॥ परि मन शांत ठेवून । दक्ष कार्यामाजी जाण । प्रारब्धभोग समजून । प्रत्युत्तर ना देई स्नुषा ॥ ६२ ॥ तेंवि वासुदेव सुत । नयनीं पाहती समस्त । कवणासही ना कांही वदत । राहती नित्य मंदिरीं ॥ ६३ ॥ आधीच सकल प्रपंचाचा व्याप । मानसीं वाटे संताप । आवरोनियां तो सकल ताप । मानसीं पूर्ण धरियेला ॥६४॥ कर्तव्याची जाणीव । ठेवोनियां वासुदेव । ना दुखविती मातृभाव । स्वपत्नीलाही न बोलती ॥६५॥ तैशीच अन्नपूर्णामाईची मर्यादा । कैशी होती पतिपदां । मानीतसे सुखसंपदा । सकल आपदा विसरोनी ॥ ६६ ॥ हें सांगावयाचें कारण । प्राक्तन-भोग असे दारुण । तो न सुटे भोगिल्याविण ।

प्रत्यक्ष परमेश्वरही भेटतां ॥ ६७ ॥ द्रौपदीचा बंधू श्रीकृष्ण । जानकीचा पती रघुनंदन । परि वनवास न चुकला जाण । हा प्राक्तनभोग त्यांचा असे ॥ ६८ ॥ तारा आणि दमयंती । या राजपत्न्या म्हणविती । परि कष्ट सोशिले किती । ऐकतां हृदय दुभंग होतसे ॥ ६९ ॥ तरी मूळ ग्रंथाशी सादर । लक्ष असावें ठेवोनी आदर । चालला गृहस्थाश्रम साचार । वासुदेवस्वामींचा ॥७०॥ नित्यासम ती भामिनी । गृहकृत्यें सकल सारूनी । शांत आणि निर्विकल्प मनीं । मंदिरामाजीं चालली ॥ ७१ ॥ महाराज मंदिरांत । वास्तव्य करिती ज्या खोलीत । अन्नपूर्णाबाई येवोनी पाहत । तों द्वार असे लोटलेलें ॥७२॥ द्वार उघडोनी तंव पाहती । परि आंत पाऊल न टाकिती । मातेविण इतरांप्रती । मज्जाव असे आंत जाण्याचा ॥ ७३ ॥ धन्य धन्य अन्नपूर्णाबाई । काय मर्यादा धरोनी राही । पतिदेव एकले असतांनाही । आज्ञेविण पुढती नच जाय ॥ ७४ ॥ खडा पहारा देऊन । द्वारीं उभ्या राहती जाण । ऐसा किती वेळ गेला असे होऊन । शेवटीं बैसल्या खालती ॥ ७५ ॥ पतिदेव खोलीत । गाभारी बैसले श्रीगुरुदत्त । अन्नपूर्णाबाई निश्चित । द्वय देवांच्या द्वारीं बैसल्या ॥ ७६ ॥ सत्संगाचा महिमा थोर । वामदेवासंगें तरला असुर । नारददर्शनें उद्धार । जाहला असे वाल्मिकीचा ॥ ७७ ॥ तेंवि प्रत्यक्ष हे वासुदेव । दत्तावतारी पतिदेव । मग अंगीं सात्विक भाव । कां न सतीच्या येतील ॥ ७८ ॥ गृहांतील सासुरवास । पति सकल विषयांतरीं उदास । नाना परी सोशिले क्लेश । तरी मानस विवेकी सर्वदा ॥ ७९ ॥ तेंवि अन्नपूर्णाबाई द्वारांत । बैसल्या पतिचरण लक्षित । नामस्मरण दत्त दत्त । मुखाने असे चाललें ॥ ८० ॥ पूर्व सुकृताची ज्ञानमय ज्योत । जाहली असे प्रकाशित । स्वात्मस्वरूपाची ओळखी होत । प्रभुकृपेने त्या क्षणीं ॥ ८१ ॥ लागली समाधि खुंटली मात । बाह्य सृष्टीस विसरल्या समस्त । आत्मबोधसागरांत । स्वानंदाने पोहती ॥ ८२ ॥ हृदयीं प्रकटलें रामरूप । सकल इंद्रियें होती ब्रह्मस्वरूप । हरपला सकल त्रिविध ताप । कंठीं प्रेम दाटलें ॥ ८३ ॥ निरसली सकल उपाधि । हरपली सकल आधिव्याधि । लागली असे समाधि ।

अंत:सुखशांती लाभली ॥ ८४ ॥ स्वरूपा देऊं काय उपमा । जैशी नभांगणीची पूर्णिमा । ऐसा तेजस्वी मुखचंद्रमा । पाहतां आल्हाद जाहला ॥ ८५ ॥ नित्य पति येतां क्षणीं । उठोनी उभी ही राहे कामिनी । परि आज निश्चल बसोनी । राहिली कैशी नवल हें ॥८६॥ ऐशा स्वानंदसागरांत । बैसली असतां निवांत । महाराज जवळ येवोनी पाहात । म्हणती योगनिद्रा ही अभिनव ॥ ८७ ॥ आयुष्यांतील हा पहिला दिन । पत्नी देखतां हो समाधान । प्रेम येतसे उचंबळोन । थोर भाग्य स्या सतीचें ॥ ८८ ॥ ऐसा कांही समय गेलासे निघोनी । आपुल्या आध्यात्मिक सामर्थ्यांनी । अन्नपूर्णाबाईस जागृत करूनी । सावध पूर्ण केलें असे ॥ ८९ ॥ सती बोले पतीसी । कां जागृत केलें मशीं । रमले होते स्वानंददेशीं । मानसीं चिंता कांही नसे ॥९०॥ महाराज कांही वदती त्यावर । मिळाले द्वय शुद्धान्तर । उभयतां मोकळें शद्धभांडार । न कळे तुम्हां आम्हांसी ॥ ९१ ॥ प्रभुकृपेची अपार छाया । तैशीच जडली पतीची माया । परि सौजन्य किंचितही हृदया । सासूबाईंच्या न राहिलें ॥ ९२ ॥ पुढे कांही दोहदलक्षणें । दिसों लागलीं प्रकटपणें ; हळुवार मन तेणें । जाहलें असे तियेचें ॥ ९३ ॥ सासूचें जिव्हास्त्र जाहले अति तीक्ष्ण । फेकिले जाती सळसळून । कोमल हृदय भेदून । वाग्बाण ते कितीएक वेळा ॥ ९४ ॥ वाढला द्वेष दुर्वासना । अन्नपूर्णा देखवेना नयनां । ऐशा देखोनी वातावरणा । महाराज उद्विग्न हो मानसी ॥ ९५ ॥ कधी मवाळता पुत्रापाशी । ठेवोनी वागली तयापाशी । परि आता उग्र स्वरूपासी । चंडिकेच्या धरियेलें ॥ ९६ ॥ ही सकल परमेश्वराची लीला । भक्ता न ठेवावें या स्थला । म्हणोनी खेळ काय हा मांडिला । वाटतें मज श्रीदत्तांनी ॥ ९७ ॥ श्रीरामचंद्र कधी वना । येतील इच्छिती देव वना । म्हणोनी विकल्पासी करिती प्रार्थना । जा जा विकल्पा अयोध्ये ॥ ९८ ॥ ऐकतां विकल्प भयभीत । म्हणे मी कैसा जाऊं अयोध्येंत । विवेक शांतता नांदते जेथ । तेथे मज जावया भय वाटे ॥ ९९ ॥ विकल्पाने केलें संशोधन । पाहिले मंथरेचें अंत:करण । अपवित्र भाजन देखोन । प्रवेश तेथे केला असे ॥ १०० ॥ कैकेयीची ती

आवडती दासी । हितगुज कथी सकल तिजसी । मंथरा आलिंगन देतां हृदयासी । साधिली संधी विकल्पाने ॥ १ ॥ जो आपला दुजा प्राण । वाटे कैकेयीस रघुनंदन । परि विकल्पाने घेरले मन । धाडिलें वना त्या रामराया । २ ॥ तैशी पुढील भविष्ययोजना । घडूनी येई तशी गृहीं घटना । श्रीदत्तात्रयें दिधले ज्या वचना । ती संपली असे मुदत तेधवां ॥ ३ ॥ तेंवि सावंतवाडींत । राहती उकिडवे नारोपंत । स्वप्न पडलें तयांप्रत । महाराज सोडती माणगांव ॥ ४ ॥ उदईक माणगावीं येवोनी । पुसती महाराजांलागोनी । सांगती विचार ना अजुनी । आमुचा कांही झाला असे ॥ ५ ॥ हा पूर्वसंकेत । पाठवूनी देती श्रीगुरुदत्त । स्वप्न सांगोनी नारोपंत । निरोप घेऊनी जाताती ॥६॥ प्रभातकाळीं दुसरे दिनीं । बैसती जैं पूजा करोनी । कानीं येतसे तैं मधूर ध्वनि । श्रीगुरुदत्तात्रेयाचा ॥ ७ ॥ आतां न येथे राहणें । झडकरी ग्राम हे सोडणें । महाराज पुसती नम्र वचनें । अजूनी सात वरुषें न जाहलीं ॥ ८ ॥ श्रीदत्तात्रेय वदती त्यांसी । आजचि सात वरुषें या समयासी । जाहली असती निश्चयेंसी- । चंद्रगतिमानाप्रमाणें ॥ ९ ॥ ऐसे बोल ऐकतां क्षणीं । महाराज उमगले असती मनीं । म्हणती सात वरुषें आजचे दिनी । निश्चयें पूर्ण होताती ॥ ११० ॥ पुढती न केला उशीर । मातृदैवत हें असे थोर । जाऊनी साष्टांग नमस्कार । महाराजांनी घातला ॥ ११ ॥ म्हणती आलों मागावयासी । माते आज्ञा दे आम्हासी । हें ग्राम सोडोनी जावयासी । दत्ताज्ञा आजी जाहली असे । ॥ १२ ॥ मातुःश्रीची मनःस्थिति । नित्यासम स्थिर नव्हती । विकारें घेरिली होती । सद्विवेका थारा न राहिलासे ॥१३॥ विकल्प भरलासे पोटीं । क्रोधावले शद्ब ओठीं । ही अखेरची होय भेटी । माता मनीं ती नेणे ॥१४। मद आणि मत्सर । तैसाची क्रोध अनिवार । ठेविती आपुला अधिकार । या चंचल मनावरी ॥ १५ श्रीदत्तात्रेयाचा अवतार । प्रत्यक्ष वासुदेव पुत्र साचार । जाणीत होतें हें अंतर । परि आज कठोर कैसें जाहलें ॥ १६ ॥ क्रोधें जाणीव नाही उरली । पुत्रमाया दुरावली । म्हणोनी रसनाहि कठोर वदली । जातोस जा तूं येथोनी ॥ १७ ॥ परि तीच आज्ञा समजून ।

वासुदेव निघाले तेथून । लागले तयारीकारण । पुढील मार्गा जावयासी ॥ १८ ॥ एक्या स्वस्त्री वाचून । दुजे न घ्यावें संगती जाण । म्हणूनी अन्नपूर्णाबाईस येऊन । महाराज पुसताती ॥ १९ ॥ म्हणती श्रीदत्ताज्ञेकरून । चाललों हें माणगांव सोडून । तरी आमुचे संगतीकरून । येणार तुम्ही कां सांगावें ॥१२०॥ ऐसी ऐकतां प्रेमळ वाणी । प्रेमाश्रू पातले दोन्ही नयनीं । वाटे मिळाली संजीवनी । हृदयींच्या वाग्बाणजखमेवरी ॥ २१ ॥ अस्थिर मना लागली व्यथा । रात्रंदिवस जाळी चिंता । तों चिंतामणी येऊनी चित्ता । समाधान करीतसे ॥२२॥ मरतियाच्या मुखांत । पडावें जैसें अकस्मात । पूर्व सुकृतें अमृत । तैसेंच अन्नपूर्णाबाईस जाहलें ॥ २३ ॥ मनाची सोडविणार साकडीं । काय शद्धांत होती त्या गोडी । म्हणोनी वदली तावडी । आवडीं सांगातीं मी येतें ॥ २४ ॥ प्रभुइच्छा उल्लंघन । कदापि ना होय जाण । ऐकतां कांतेचे भाषण । समाधान मानसीं जाहले ॥ २५ ॥ वदती येणार बरोबर तरी असती जे कां अंगावर । सुवर्णाचे अलंकार । ते सकल काढूनी ठेवाबे ॥ २६ ॥ पतिवचन ऐकतां क्षणीं । एक्या मंगलसूत्रावाचूनी । सकल अलंकार काढूनी । अन्नपूर्णाबाईनी ठेविले ॥ २७ ॥ एक लुगडें चोळी अंगावर । दुसरे घेतले बरोबर । याविण दुजें साचार । संगतीं वस्त्र कांही नसे ॥ २८ ॥ तैसेंच महाराजांनी एक लोटा । पंचायतन–संपुष्टा । दोन्हीं मुर्ती संपुष्टा । सवें धोतर एक घेतलें असे ॥ २९ ॥ उदईक ब्राह्म मुहूर्त साधून । निघावें माणगांव सोडून । तो ग्रामीं हे वर्तमान । क्षणामाजीं पसरलें ॥ १३० ॥ जाती महाराज ग्राम सोडून । ऐकती वाटे काय कर्ण । जाहली अवस्था कठिण । त्या माणगावीं जनांचीं ॥ ३१ ॥ तैसाची सीताराम गृहासी । ऐकता दुःखित हो मनासीं । स्वयें महाराज तयासी । बोधमाला देताती ॥ ३२ ॥ ती पुढील अध्यायी कथा सुरस । ऐंकतां संतोषेल मानस । विनंति माझी श्रोतेयांस । सावकाश परिसावी ॥ ३३ ॥ येथे श्रोते घेतील शंका । हा ग्रंथ कवणाचा असे नेटका । येथे दिसे समस्त भूमिका । वासुदेव महाराजांची ॥ ३४ ॥ सद्गुरुमहिमा अपरंपार । पुरे न होय लिहितां धरणीवर । तेथे मी क्षुद्र

पामर । अल्पमतीने कैसें कथावें ॥ ३५ ॥ नभांगणीं नारायण । तळपतो हें पाहतों आपण । परि किरणा समान । त्याचेनी गुण येतसे ॥ ३६ ॥ एका गृहांत हे कृपार्णव । निवृत्ति आणि ज्ञानदेव । तैसे सीताराम आणि वासुदेव । बंधू बंधू हे राहती ॥ ३७ ॥ लहानपणापासून । ज्यांनी केलें संगोपन । आपुल्या पदरांत घेऊन । भार संपूर्ण वाहिलासे ॥ ३८ ॥ ती समर्थ वासुदेव गुरुमाऊली । केवळ एकास न तारिती झाली । जे जे बैसले तिच्या सावलीं । ते ते तरूनी गेले भव पार ॥ ३९ ॥ संताची गावी काय महती । परि मूळरूप तो रुक्मिणीपति । त्याचेंचि भूषण संताप्रती । येथे तों गति तैशीच ॥ १४० ॥ पांडुरंग पांडुरंग । भक्त गातां होती दंग । अंतरंगीं भरला रंग । पांडुरंग–नामाचा ॥ ४१ ॥ जेथे पांडुरंग तेथे भक्त । भक्त तेथे हा भगवंत । तैसा शिष्य तेथे सद्गुरुनाथ । दूर कोठोनी राहणार ॥ ४२ ॥ प्रकाश न सोडी दीपास । गोडी न सोडी शर्करेस । तेंवि शिष्य गुरुपदास । कदापि ना सोडिता ॥ ४३ ॥ जळावरील तरंग । खेळतां होती किती दंग । तैशी लाट उसळे सवेग । परि संग न सोडी जलाचा ॥ ४४ ॥ म्हणोनी तो सद्गुरुमहिमा । गावया उपजला प्रेमा । करीं धरोनी सीतारामा । चालले पुढती महाराज ॥ ४५ ॥ समयोचित वर्णन । करविता असे तोचि जाण । तेणें सन्मार्गावरूनी वळण । लागेल सीताराम चरित्रासी ॥ ४६ ॥ तरि शंकानिरसन । व्हावें न द्यावें मज दूषण । येथे न माझे मीपण । कांही एक नसेची ॥ ४७ ॥ खरोखरी माझी मूढ मती । अंगीं नाही तर्क–शक्ति । मग रसाळ शब्दोक्ती । ग्रंथार्थी कैशी येईल ॥ ४८ ॥ परि ज्यांनी सद्भावना । प्रकटविली या हृदयभवना । काळजी दत्ता दयाघना । संपूर्ण त्याजला माझी असे ॥ ४९ ॥ हांच ठेवूनी दृढभाव । चालेल पुढती माझी ग्रंथनाव । परतीरा पोहोचवील वासुदेव । हा पूर्ण विश्वास मज असे ॥ १५० ॥ इति श्रीसीतारामचरित्रालंकारमणी । गुंफिला असे दृष्टांतकोंदणीं । प्रकाश दाविता अंतःकरणीं । द्वादश अध्याय गोड हा ॥ १५१ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

द्वादशोऽध्यायः समाप्तः ।

अध्याय तेरावा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ ॐ ब्रह्मस्वरूपा चिंतामणी । अनन्य मीं तुझिये चरणीं । निवास तुझिये हृदयभुवनीं । अखंडित माझा असो ॥ १ ॥ तूं अभयवरद अनाथनाथा । विघ्नहर्त्या एकदंता । निर्विकल्पा समर्था । सदय दाता तूं एक ॥ २ ॥ जय जय सुमंगला । ज्ञानप्रकाशक निर्मला । कृपावंता तूं प्रेमळा । बुद्धि गावया तूं देशी ॥ ३ ॥ तुझिये कृपाकटाक्षें करून । करीन कथानिरूपण । यास्तव चरण-कमलीं लीन । देई वरदान कृपेचें ॥ ४ ॥ हेंचि मागणें प्रभो तुजसी । अखंडित देई मशी । तेणे भक्तिरस अहर्निशीं । सेवितील श्रोते प्रेमभरें ॥ ५ ॥ तुझी लीला अत्यंत गोड । मज उपजली आवड । ती पुरविणार माझें कोड । तुजवाचूनी कोण बा ॥ ६ ॥ ऐसी तुझी कथा करितां श्रवण । विघ्नांचें होय निर्मूलन । त्रिविध ताप जातील पळोन । शांतता लाभेल मानसीं ॥ ७ ॥ तूंचि वक्ता तूंचि श्रोता । तूं एकचि प्रेमळ श्रीगुरुदत्ता । निमित्तमात्र लेखणी हाता । स्वयें भगवंता तूं देशीं ॥ ८ ॥ तुझिये कृपेवाचूनी । न चाले माझी लेखणी । कैशी वदेल मूढ वाणी । या शिथिल गात्रांतूनी ॥ ९ ॥ तरी श्रोते सावधान । बैसले करावया श्रवण । त्यांचें करावया समाधान । भरावा रस ग्रंथार्थीं ॥ १० ॥ तुझ्या कृपापात्रीं भरली शाई । आश्वासन करीं लेखणी देई । आतां पुढती लिहून घेई । दत्तात्रेय गुरो माउलीए ॥ ११ ॥ पहावें मागील अध्यायांत । दृष्टांत देती श्रीगुरुदत्त । हें माणगांव सोडोनी त्वरित । निघावें तुम्ही येथोनियां ॥ १२ ॥ मातेची आज्ञा घेऊन । पुशिले अन्नपूर्णाबाईलागून । ऐकतांची होती आनंदघन । पतिसवें जावया निघाल्या ॥ १३ ॥ घेतलें न दुजे कांही जाण । हे जणों लक्ष्मीनारायण । गरजेपुरतेचि सामान । घेऊनियां निघाले ॥ १४ ॥ ग्रामीं पसरली असे मात । ऐकतां सकल जाहले दुःखित । आबालवृद्ध समस्त । दर्शनासी पातले ॥१५॥ जैसे निघती अयोध्येतून ।

चौदा वर्षे पर्यंत जाण । जानकी आणि रघुनंदन । वनवासा जावया कारणें ॥ १६ ॥ तईं अयोध्यावासीजन । दुःखित रामरायाकारण । तेंवि हा कृपाघन । वाटे चालला सोडोनी ॥ १७ ॥ कंठ येती भरून । पाणी न खंडे नयनातून । शब्द न ये मुखांतून । दुभंग हृदय वाटे होतसे ॥ १८ ॥ म्हणती या माणगावीं राहून । पावन केलें आम्हांलागून । आतां कां प्रभो टाकून । जाता आम्हाकारणें ॥ १९ । नानापरी करिती विलाप । म्हणती महाराज तुम्ही आमुचे मायबाप । दुरी केलेत त्रिविध ताप । आज सोडून कैसे जातासे ॥ २० ॥ ही उत्साहाची मूर्ति । नव चैतन्याची ज्योति । नित्य प्रकाश दावित होती । आज कां अंधारीं लोटीतसे ॥ २१ ॥ येथे राहूनी आम्हासी । पाजिलें नित्य बोधामृतासी । आता सकल जगतासी । वाटण्यासी कां चाललां ॥ २२ ॥ आमुचे अन्याय घालुनी पोटीं । कृपा करावी जगजेठी । नका करूं देवा पाठी । ठेवा दृष्टि कृपेची ॥ २३ ॥ गेले कितीएक वेळां वाडीस । तरी आशा होती मनास । येणार पुनरपि माणगावास । होईल दर्शन आम्हासी ॥ २४ ॥ परि आतां हे गभस्ती । कधी दिसतील आम्हाप्रती । हें माणगावक्षितिज ओलांडुनी जाती । प्रकाशित करण्या दुज्या स्थळीं ॥ २५ ॥ कुणी घट्ट धरिती चरण । कुणी करितो वंदन । स्त्रिया घेती दुरूनी दर्शन । वासुदेवमहाराजांचे ॥ २६ ॥ महाराजांचें हळुवार मन । निरोप देती सकलां लागून । करिती सकलांचे सांत्वन । उपदेश करोनियां ॥ २७ ॥ सांगती अनन्य भावेंकरून । करा भगवन्नामस्मरण । तो दत्त दयाघन । रक्षण करील सर्वदा ॥ २८ ॥ श्रीदत्तआज्ञा मज प्रमाण । तिचें करावया पालन । चाललों असे मी येथोन । हें माणगांव सोडोनियां ॥ २९ ॥ तरि करीतसे मी विनंति । ग्रामवासी जन हो आपणांप्रती । एक भाव ठेवा चित्तीं । श्रीदत्तपदीं सर्वदा ॥ ३० ॥ जरी जातसे हें ग्राम सोडूनी । तरी दूर न व्हावें आम्हापासूनी । प्रेम सदैव अंतःकरणीं । आम्हावरी असावें ॥ ३१ ॥ आपुली न व्हावी वियोगव्यथा । ऐसा करोनियां बोध तत्वतां । तदनंतर नमिली माता । आशीर्वाद घ्यावया कारणें ॥ ३२ ॥ क्रोधाचिये भरांत । जातोस जा म्हणे आवेशांत । परि

ते न आतां आवरत । दुःखाश्रू तिच्या नयनींचे ॥ ३३ ॥ पुत्राच्या सहस्त्रावधि होती चुका । ताडन करी माय कोपें देखा । परि अंतरींच्या प्रेमकौतुका । भरती असे निरंतर ॥ ३४ ॥ म्हणे मी निष्ठुर पूर्ण । कठोर बोललें तुजलागून । म्हणोन मजवरी काय रुसोन । वासुदेव बाळा जातोसी ॥ ३५ ॥ सकल गृहाचा भार । सांभाळिलासी आजवर । मग आजचि मन तुझें कठोर । कां बा बालका जाहलें ॥ ३६ ॥ सीताराम तो असे सान । हरीचें नसे गृहीं लक्ष जाण । कैसे काढूं मी दिवस कठिण । तूं जातांची मज सोडूनी ॥ ३७ ॥ पूर्व सुकृत होतें चोख । म्हणोनीच जाहले तिचे हे बालक । म्हणती माते नको करूं शोक । मी जवळीच असे सर्वदा ॥ ३८ ॥ श्रीगुरुदत्तात्रेयांनी । श्रीपाद श्रीनृसिंहसरस्वतींनी । आपुल्या मातेलागूनी । बोधिलें उपदेश करोनिया ॥ ३९ ॥ आपुल्या विरहाकारण । यथोचित समाधान । मातेचें करोनियां जाण । सोडिलें सदन तीर्थावळीकारणें ॥ ४० ॥ तैसेच श्रेष्ठ कपिल महामुनी । आपुल्या देवहुतीमातेलागूनी । ज्ञानबोध निरोपुनी । गृह सोडिते जाहले ॥ ४१ ॥ तेच हे दत्त दयाघन । अवताररूपें जाहले सगुण । मातेचें करोनी समाधान । निघाले असती जावया ॥ ४२ ॥ तैसेच ग्रामवासी जन । आले शेजारच्या गावांहून । अति कष्टी वृत्त जाणून । चालले निरोप द्यावया ॥ ४३ ॥ सकलांचें करोनि समाधान । पाऊल अंगणीं टाकिलें जाण । परि न पाहिला बंधू सान । निस्सीम भक्त सीताराम ॥ ४४ ॥ गुरुमाय चालली सोडूनी । हें जईं ऐकलें कानीं । धार लागली दोन्ही नयनीं । धरणी भिजवी सारखी ॥ ४५ ॥ वियोग साहवेना मनांत । मुखीं शब्द ना एक येत । कंठ दाटोनी हृदयांत । शोकसागर उचंबळे ॥ ४६ ॥ महाराज आले मार्गावरी । चरित्रनायक हे बाल ब्रह्मचारी । धाव घेतली झडकरी । काय करी तेधवां ॥ ४७ ॥ थोर वहिनी मातेसमान । तिज करोनियां वंदन । करींचें गाठोडें घेऊन । चालले हे मागुती ॥ ४८ ॥ सेवा करावया कारण । निघाला रामासवें लक्ष्मण । तैसाच सीताराम बंधू जाण । मागोमाग हा चालला ॥ ४९ ॥ महाराज पुसती तयासी । भल्या तूं

कोठे चाललासी । म्हणती आपण जातां वाडीसी । मीहि सांगातीं येतसे ॥ ५० ॥ तुम्ही येथूनी गेलियावर । गमणार नाही मज क्षणभर । जिकडे जाल तिकडे मज बरोबर । घेउनी जावें दयाळा ॥ ५१ ॥ जळांतील मासोळी । जलापासून होतां निराळी । तिचा आत्मा मारूनी उसळी । पाहे देह सोडावया ॥ ५२ ॥ तेंवि या चरणगंगेचें नीर । सोडून मासा हा बाहेर । क्षण एक ना राहणार । तरी सोडूं नको प्रभो याजला ॥ ५३ ॥ जेंवी लक्ष्मण म्हणे राघवा । वनीं करीन मी चरणसेवा । तेंवि मज वासुदेवा । न्यावें संगतीं आपुल्या ॥ ५४ ॥ या दुःखमय प्रपंचाची आस । राहिली न आपुल्या मनास । तेंवि मीहि उदास । नको नको मज त्यांत गोवणें ॥ ५५ ॥ या संसार-सागरांतून । नौका न जाय परतीरा लागून । गटंगळ्या खाऊन । बुडवील शेवटीं बुडासी ॥ ५६ ॥ एका माउलीचेंच स्तनपान । करिती हे द्वय बंधू जाण । मग त्यांचें विभक्त मन । कैशापरी राहील ॥ ५७ ॥ अंशात्मक हे परमेश्वर । ब्रम्हा विष्णू महेश्वर । लिंपित ते ना होणार । कदापि ते ना संसारीं ॥ ५८ ॥ तेंवि सान बंधूचें हें भाषण । ऐकतां सुखावलें मन । परि काय वदती त्यालागून । वासुदेव महाराज ५९ ॥ वृत्ति गंभीर करून । करिती उपरोधिक भाषण । केलें असे हास्यवदन । म्हणती सीताराम–बालका ॥ ६० ॥ अजूनी तूं अससी सान । कोण जाणेल तुझी भूक तहान । दूधभात कोठून । मिळवावा आम्ही वनांतरीं ॥ ६१ ॥ तुज आवड मनांतून । सदा असावें नेट-केपण । उंची वस्त्रें परिधान । करावीं असें वाटतें ॥ ६२ ॥ ऐशी तुझी आवडी । पुरवावी कैशी घडोघडी । गृह सोडतां सांकडीं । कितीएक सोसावीं लागतील ॥ ६३ ॥ आम्हां न राहिली कांही हौस । सोडूनी चाललों गृहास । चतुर्थाश्रम जो सन्यास । स्वीकारूं आम्ही झडकरी ॥ ६४ ॥ मग निर्जन अरण्यांत । कोठे राहणें एखाद्या मठांत । कधी वृक्षछायेंत । स्थिरता लाभेल या देहासी ॥ ६५ ॥ वस्त्र न एक्या लंगोटीविण । कधी करूं वल्कलें परिधान । अंगीं भस्मोद्धूलन । भूषण असे हें आमुचें ॥ ६६ ॥ क्षुधेलागीं भिक्षान्न । ना मिळे कदा सुग्रास अन्न । कधी झाडपाला भक्षण ।

कधी गंगोदक सेवावें ॥ ६७ ॥ अजूनी पाहिलें न त्वां परदेशाला । वैराग्यगंध ना मनाला । मग हें कैसें साहवेल तुला । म्हणोनी न येणें हें उचित असे ॥ ६८ ॥ देह-गेहाची अजूनी ममता । वाटे जोवरी तुझ्या चित्ता । तरी बाह्य तयारी पाहातां । सफलता न वाटे आम्हासी ॥ ६९ ॥ मग हें ऐश्वर्य सोडूनी । कासया येशील गृह सोडूनी । ऐसें महाराज बोलूनी । स्तब्ध असती राहिले ॥ ७० ॥ आधीच बुध्दि तीक्ष्ण । वैराग्यभरित पूर्ण । त्यावरी हें मार्मिक भाषण । बोचलें सात्विक हृदयासी ॥ ७१ ॥ परि मर्यादाउल्लंघन ; जाहलें न कांही शब्दांतून । विरहदुःख दाटून । पुनरपि आलें तयांचें ॥ ७२ ॥ येवढें झालें जें कां भाषण । तूं संगें न यावें म्हणून । येवढाच मथितार्थ धरून । पुनरपि काय वदताती ॥ ७३ ॥ काय करूं मी येथे राहून । त गमे मज एकहि क्षण । एक मागतसे वरदान । न्यावें सवें मजलागीं ॥ ७४ ॥ जैसी धेनू आपल्या वत्सालागूनी । वना जातसे सोडूनी । वत्स हंबरे टाहो फोडूनी । तीच गति येथे जाहली ॥ ७५ ॥ आपुल्या वत्साचें समाधान करी ती त्याचें अंग चाटून । तेंवि ही गुरुमाउली दयाघन । जवळी बालका घेतसे ॥ ७६ ॥ मातेच्या सांत्वनार्थ । निरोपिला जो तत्त्वार्थ । तोच सांगती हितार्थ । सीताराम बंधूसी ॥ ॥ ७७ ॥ वासुदेव वदती सीतारामासी । आमुचा वियोग साहवेना तुजसी । वृथा काय शोक करिसी । शोधूनो काढी बा कारण ॥ ७८ ॥ याचें मूळ अज्ञान । हें मुख्य असे कारण । ना तरी सत्यज्ञानलक्षणी आत्मानंद । एकचि असे सर्वांचा ॥ ७९ ॥ मग तयासी गमनागमन । सुख दुःख कासया लागून । याचे समोर अज्ञानपटल असोन । झाकिलें असे तयाने ॥ ८० ॥ कल्पित नामरूप देहासी । सत्य समजुनी मानसीं । या संयोगवियोगें कष्टी होसी । ज्ञान कां यासी म्हणावें ॥ ८१ ॥ शुक्तिका रौप्य भासविते सुंदर । मृगजळ दिसे समोर । त्यामाजी असे ना सार । असत्य असे सर्वथा ॥ ८२ ॥ ना तरीं स्वप्नसृष्टीत साचार । कधी बसावें राज्यावर । नाना पदार्थ मनोहर । नयना गोचर होताती ॥ ८३ ॥ मग हे मिथ्या कासयासी । समजावें आपुल्या मानसीं । मग हेंहि अज्ञान

समजावयासी । मानसींचें नव्हे का ॥ ८४ ॥ हें जैसें सर्वथा असत्य । मूळ अधिष्ठान असे सत्य । भ्रांतींत वृथा गोवूनी चित्त । भुलूं नको तूं सर्वथा ॥ ८५ ॥ मानव गुंतला जो या भ्रांती । तो मनाची हरवील शांती । षड्विकार येऊनी पुढती । जाळें लावूनी बसतील ॥ ८६ ॥ त्यांत एखादा गुंतला प्राणी । वेढती विकार ते चहूंबाजूंनी । जवळी सुमार्ग असूनी । परि लोचनीं तो ना दिसे ॥ ८७ ॥ म्हणोनी ही भ्रांतीच मुख्य जाण । शोक मोहादिकांसी कारण । दुःखपरंपरा तियेपासून । सौख्य ना दिसोनी येतसे ॥ ८८ ॥ तरी जोंवरी ही भ्रांती । चिकटून राहील चित्तीं । तोवरी कैशी दुःखनिवृत्ति । होईल सांग तूं रामा ॥ ८९ ॥ म्हणोनी आत्मस्वरूपाच्या ज्ञानावाचून । भ्रांतीचें न होय निरसन । अन्य उपाय जे विद्यमान । तेही विरोधी नसती बा ॥ ९० ॥ मग विरोधी साक्षात । कोणता हें कळावें यथार्थ । आत्मसाक्षात्कार हाच तत्त्वार्थ । सिद्धान्त वेदशास्त्रांचा ॥ ९१ ॥ उकलील मनाचें गूढ परम । वेदांतशास्त्र अनुपम । हा अद्वितीय सत्यानंद आत्मा ब्रह्म । अबाधित बोधकर्ता असे ॥ ९२ ॥ म्हणती रामा सांगतो तुजसी । जोंवरी स्वस्वरुपा ना ओळखसी । तोंवरी दुःखाच्या पुढे राशी । सुखवार्ता अती दुर्लभ असे ॥ ९३ ॥ अज्ञाननिरसनार्थ मानवांनी । विचार करावा अखंड मनीं । तें स्वस्वरूप तुजलागूनी । कोणतें असे तें कळावें ॥ ९४ ॥ मूळ अहंकारापासून । देहापर्यंत अविद्या-कार्य जाण । संघात असे पूर्ण गोवून । तो दृश्य रूपांनी आधी पाहिजे ॥ ९५ ॥ हा विकारी अनात्मा जरी जड । त्यास ओळखणें असे अवघड । तरी ठेवूनी आवड । सर्वसाक्षी निर्विकार आत्मा ओळखीजे ॥ ९६ ॥ वाचें वदतों आपण । परि आपण म्हणजे कोण । ती वस्तू सच्चिदानंदघन । आधी ओळखली पाहिजे ॥ ९७ ॥ तोच पूर्णानंदघन व्यापक । तेंच परब्रह्मसुख । तेंच स्वस्वरूप नित्य देख । या वेदान्तशास्त्राने ॥ ९८ ॥ हें विवेकाभ्यासाने । नित्यानित्य अनुभविणें । येणेंचि प्रत्येकाने । हित साधावें आपुलें ॥ ९९ ॥ म्हणोनी सीताराम या करितां । या देहाविषयींची अहंता । त्वां न धरावी ममता । लिंपित देहीं नसावें ॥ १०० ॥ तेंवि जी जी वस्तु होय दृश्य ।

ती ती होणार असे अदृश्य । म्हणोनी तिजविषयीं आस । मनीं कदापि नसावी ॥ १ ॥ संयोग-वियोग दृश्य पदार्थांचा । तयावरी न ताबा मानवाचा । असे कर्माधीन होय साचा । म्हणोनी दृढ निश्चय ठेविजे ॥ २ ॥ तेणें हर्षशोक विकार समस्त । सुखदुःखाचे आघात–। जातील मावळोनी क्षणांत । विवेकांकुश करीं धरिताची ॥ ३ ॥ ऐसे विकार गेलिया सत्य । अहं–ब्रम्हास्मि या बोधीं लागेल चित्त । मग मानसीं सदोदित । सत्यानंद नांदेल ॥ ४ ॥ हा ज्ञानयोग अति कठिण । साधणें कठिण अधिकारी पुरुषाविण । तरी निर्धारें करितां प्रयत्न । अशक्य कांही एक नसे ॥ ५ ॥ या परमार्थप्राप्तीसाठी । नको दुजी आटाआटी । एक लक्ष्य एक दृष्टि । श्रीदत्तचरणीं असावी ॥ ६ ॥ हेंचि एक सुलभ साधन । श्रीदत्तात्रेयचरणपूजन । तत्स्वरूपीं जडूं द्यावें मन । भक्तियोग स्वीकारूनी ॥ ७ ॥ ती प्रभुकृपा होतां सबळ । मनोरथ पूर्ण होतील सकल । सांगितला असे तुज इतुका वेळ । तो बोध ध्यानीं घेईजे ॥ ८ ॥ रमामाउलीची करी सेवा । तेंचि आवडे या वासुदेवा । होईल संतोष आमुच्या जीवा । जातां बाहेरीं लाभेल ॥ ९ ॥ तुझिये इच्छे करून । पुढती कांही वर्षें गेलिया जाण । होईल तुज समाधान । आमुचींये सहवासें ॥ ११० ॥ कैसीं मनाची असे तळमळ । ती जाणतो आहे दीनदयाळ । इच्छा तैसें मिळे फळ । प्रत्येक मानवा कारणें ॥ ११ ॥ म्हणोनी उमज बाळा अंतरीं । बोलूनी वरद हस्त ठेविला शिरीं । आतां काळजी कांही न करी । वदती वासुदेव महाराज । १२ ॥ रणांगणीं उभा पार्थ । सभोवार देखिले आप्त । बसला धरणीवरी संचित । धनुष्य करीचें टाकूनियां ॥ १३ ॥ मोहें व्यापिला दारुण । कैसे मारूं म्हणे स्वजन । अज्ञान अंधःकार पूर्ण । नेत्रासमोर पसरला ॥ १४ ॥ जो सर्व जगताचा चालक । कर्ता करविता पालक । तारिता मारिता तोचि एक । तो ज्ञानप्रकाशक जवळी असे ॥ १५ ॥ त्या श्रीकृष्णभगवंतानी । गीता–कामधेनूची धार काढूनी । पाजिली बोध–संजीवनी । मूढ पार्थासी तेधवां ॥ १६ ॥ समोर उभा अज्ञानपर्वत । तो खचूनी पडला क्षणांत । सावध जाहला असे पार्थ । क्षणात

माजी तेधवां ॥ १७ ॥ अठरा दिवसपर्यन्त । घनघोर युद्ध होत । पार्थ तेथे भगवंत । सत्य जय तेथे जाहला ॥ १८ ॥ या गीतामाउलीजवळी बसोनी । अर्थबोध घेतला कितीएकानी । परी ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी ग्रंथ जो केला ॥ १९ ॥ आबाल वृद्ध तरुण–तरुणी । ज्यांचिये इच्छा उदेली मनीं । त्यांनीं बोधामृत सेवावें आवडी करोनी । स्वहिताकारणें ॥ १२० ॥ ही गीतामृताची घागर । कदापि ना कमती होणार । जोंवरी नभांगणीं शशिभास्कर । घ्या घ्या लुटोनी कोणीहि ॥ २१ ॥ तैसाची लक्ष्मण पडला मोहजाळीं । श्रीराम कनवाळू होते जवळी । दिधली आत्मबोधाची नव्हाळी । राम–गीता म्हणती तियेला ॥ २२ ॥ ऐशीयेपरी वासुदेवमहाराजांनी । बोधिलें सीतारामबंधूकारणीं । शोक गेला मावळोनी । सावध असे जाहला ॥ २३ ॥ पुढती या भक्तवर्यांनी । आपुल्या प्रेमाश्रू–जलांनीं । चरण–कमल क्षालन करोनी । षोडशोपचारें पूजियेलें ॥ २४ ॥ उभा बद्धांजली करून । नेत्रीं साठविलें एक ध्यान । म्हणे वासुदेवा दयाघन । नमो नमो नमोऽस्तु ते ॥ २५ ॥ आपुली आज्ञा मज प्रमाण । न करीन तिचें उल्लंघन । परि या दासाची आठवण । हृदयीं प्रभो असूं द्यावी ॥ २६ ॥ ऐसें बंधूचें करूनी समाधान । मातेसी करूनियां नमन । ग्रामवासी जनतेचें सांत्वन । करूनी मागे परतविलें ॥ २७ ॥ मग त्वरा करून । पाऊल उचलिलें असे जाण । अन्नपूर्णेसह माणगांव सोडून । चालले पुढे महाराज ॥ २८ ॥ आता महाराज एकले न जाती । संगें असे सौभाग्यवती । जड पावलीं हो चालती । तरी वाहनीं ना बैसले ॥ २९ ॥ पुढतीं मुक्काम मुक्काम साधून । पोहोचले वाडीक्षेत्रीं जाऊन । इकडे माणग्रामींचें वर्तमान । पुढील अध्यायीं परिसावें ॥ १३० ॥ तरी प्रभो वासुदेवा । मागणें एक ध्यानी ठेवा । आपुला बोध ठसावा । या जानकीच्या हृदयांतरी ॥ ३१ ॥ इति श्रीसीतारामचरित्रालंकारमणी । गुंफिला असे दृष्टांतकोंदणीं । प्रकाश दाविता । अंतःकरणीं । त्रयोदश अध्याय गोड हा ॥ १३२ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु

त्रयोदशोऽध्यायः समाप्तः ।

अध्याय चौदावा

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ ॐ सर्वसाक्षी सर्वज्ञा । वेदवंद्या पुराणपुरुषा प्राज्ञा । अद्वया अभेदा गुणज्ञा । प्रणिपात दत्ता तुज असो ॥ १ ॥ तूं निरामय निष्कलंक । षड्गुणसंपन्न सुखदायक । न दिसोनी अससी सर्वात्मक । पालक अससी त्रिलोकींचा ॥ २ ॥ सर्वनियंता तूं सद्गुरुदत्ता । अनंतरूपें नटलासी अनंता । तुझा महिमा विश्वनाथा । अपरिमित विश्वीं विख्यात ॥ ३ ॥ करावया दीनोद्धार । म्हणविसी प्रभू तूं अत्रिकुमर । सदा विचरसी त्रिभुवनावर । भक्ताकारणें सदय तूं ॥ ४ ॥ ऐसा तूं कृपासागर । शरणागतांचें जाणूनी अंतर । त्यांनी द्यावया अभय वर । सदा उभा तूं पाठीसी ॥ ५ ॥ सत्यसंकल्पें जो शरण । आला अनन्य भावें तुज लागून । त्याचे न पाहसी दोष गुण । वारिशी शीण तयाचा ॥ ६ ॥ जयासी तूं कृपें न्याहाळिसी । त्याच्या वरद हस्त शिरीं देशी । तो वंद्य होय सकलांसी । पावेल तव पदासी निश्चयें ॥७॥ तरी नमो नमो दत्ता सर्वोत्तमा । अगाध तुझा कीर्तिमहिमा । वर्णितां त्या आगमा निगमां । तरी अथांग महिमा उरला असे ॥ ८ । जेथ श्रांत होती श्रुती । तेथे इतरांची काय गति । केंवि वर्णावया माझी मति । पुरी तेथे पडेल ॥ ९ ॥ जईं होशील तूं कृपावंत । मग ही वैखरी वदेल किंचित । श्रोतेयांसी रसभरित । होईल तुझ्या अभयदानीं ॥ १० ॥ तरी मी अज्ञान अनाथ । हें तूं जाणतोसी कृपावंत । तुझिया कृपें चालवी ग्रंथ । प्रार्थना माझी चरणीं असे ॥ ११ ॥ कर्ता आणि करविता । लिहिता आणि लिहविता । बोलता आणि बोलविता । अससी दत्ता तूंच एक ॥ १२ ॥ आपुलें ब्रीद सांभाळावें । हेत आमुचे पुरवावे । शरणागतां तारावें । पावन करावें त्यांजला ॥ १३ ॥ तरी मागील अध्यायांत । श्रोतेयांसी जाहलें श्रुत । वासुदेवमहाराज पत्नीसहित । नृसिंहवाडीसी पोचले ॥ १४ ॥ परि इकडे माणग्रामांत । ग्रामवासी जन समस्त । माता सीताराम बंधू भक्त । येती

निरोप द्यावया कारणें ॥ १५ ॥ जोंवरी श्रीरामचंद्राच्या रथाचा कळस । दिसत होता अयोध्यावासी जनांस । तोंवरी त्यांचिये मनांस । किंचित आशा भासली ॥ १६ ॥ तेंवि हे लक्ष्मीनारायण । जाती माणगांव सोडून । दृष्टिमर्यादा ओलांडून । जाती तोंवरी घेती दर्शन ॥ १७ ॥ मग करोनी समाधान । सीताराम बंधू–माते कारण । हातीं धरोनियां जाण । सदनामाजीं पोहोचविती ॥ १८ ॥ मनीं उदास होऊनी । जाती आपुल्या सदनीं । आळविती दिवस–रजनी । गुण वासुदेव महाराजांचे ॥ १९ ॥ परी सीताराम महाराज । आठविती श्रीगुरुचरणांबुज । म्हणती माझे तारक जहाज । आज दूरी गलें असे ॥ २० ॥ वियोगव्यथा दारुण । जाळीतसे रात्रंदिन । जैसा मासा जीवनाविण । तडफडे बाहेर काढितां ॥ २१ ॥ माय दिसेना गृहांतरीं । बाळ बघे अंगणीं ओसरीं । घाबरा अंतरीं । शेवटीं टाहो फोडीतसे ॥ २२ ॥ वंदती तैशीच माझी गुरुमाउली । मज तानया चुकूर जाहली । आता ती मज कृपेची सावली । कवण वेळीं लाभेल ॥ २३ ॥ म्हणती दयानिधे वासुदेवा । माझा विसर न पडावा । जरी गेलात दूर गावा । हेंचि मागणें तुज असे ॥ २४ ॥ ऐसा विलाप करिती । अंग धरणीवरी टाकिती । तों त्वरित डोळे लागतीं । शोक गेला मावळोनी ॥ २५ ॥ सद्गुरुबोध स्मरूनी अंतरीं । चढती कर्तव्याची पायरी । परि एक लक्ष चरणांवरी । स्थिर असे सर्वदा ॥ २६ ॥ सद्गुरुमहिमा अपरंपार । न जाणूं शके सामान्य नर । तेथ माझी मती कोठवर । धाव घेऊ शकेल ॥ २७ ॥ आपण गुरु व्हावें ही जयासी । यत्किंचित अपेक्षा ना मानसीं । सेवा सांगतां शिष्यासी । लाज वाटे सर्वथा ॥ २८ ॥ ज्याची असे उदास वृत्ति । भोळा भाव वसे चित्तीं । आत्मस्वरूपीं जडली प्रीति । ऐशी विभूति दुर्मिळ ॥ २९ ॥ ज्यासी निंदा स्तुतीं समानता । कोणी मर्मभेदक हृदयावरुता । तीक्ष्ण शब्दें प्रहार करितां । तरी शांतता ना ढळे ॥ ३० ॥ सुखदुःखाचे आघात । हृदयावरी ना उमटत । खऱ्या खोट्या वार्ता होतां श्रुत । तरी चंचलता ना मानसीं ॥ ३१ ॥ शिष्य करितां आळस । किंवा पात्र होय एखाद्या चुकीस । तरी क्षमा अपराधास ।

सज्जनता त्याची करीतसे ॥ ३२ ॥ स्वदेहासी कष्ट देणें । पाखंडी ज्ञानाचा त्याग करणें । सत्संगतीचा ध्यास धरणें । समान दृष्टि सर्वांभूतीं ॥ ३३ ॥ जें अंतर्बाह्य भरोन । राहिलें असे उरोन । त्या स्वरूपानंदाच्या योगें अंतःकरण । तृप्तता असे पावलेलें ॥ ३४ ॥ जैसा सुवर्णसाखळीं मढविलेला । ताईत एकरूप जाहला । तेंवि परमात्मस्वरूपी मिसळला । आपपरभाव न राहतसे ॥ ३५ ॥ ऐसे संत गुरु पूजास्थान । सहस्रफणीहि शिणे गातां तयांचे गुण । त्या सद्गुरूशीं रिघतां शरण । मग मी-तूंपण कैसे उरें ॥ ३६ ॥ कल्पकल्पपर्यंत । सद्गुरु महिमावाखाणित । होतीं शास्त्रें कुंठित । शिणली श्रुतीहि तया गातां ॥ ३७ ॥ गुरु खाण अनुभवाची । गुरु ज्ञानदेवता अधिष्ठानाची । गुरु असूनी मूर्ति निर्गुणाची । सगुण होई भक्तास्तव ॥ ३८ ॥ गुरु सिंधू अमृताचा । गुरु बोधू ज्ञानवैराग्याचा । गुरु इंदु प्रेमनभांगणाचा । कोटीरूपें प्रकाशतसे ॥ ३९ ॥ गुरु शिष्यासी माता-पिता । गुरु असे मित्र भ्राता । गुरुविण कोणी त्राता । जगतीं नसे त्याजला ॥ ४० ॥ गुरुकृपेचा घेता शोध । गुरु साक्षात् आत्मबोध । गुरु जीवना दे आनंद । तारक नौका ही भवसागरींची ॥ ४१ ॥ गुरुलाभ जाहला ज्या नरा । त्याचा सुटला भवभयफेरा । लक्ष चौऱ्याशींच्या वा-या । चुकल्या त्याच्या निश्चयें ॥ ४२ ॥ ऐसें गुरुपद लाभलिया जाण । परि शिष्यहि पाहिजे तत्समान । जैसा जनार्दन गुरुपदीं लीन । शिष्य एकनाथ सर्वथा ॥ ४३ । द्वेषबुद्धीचा त्याग करून । सर्वस्वपणें तनमनधन । शुद्ध भावना धरोन । अर्पण करावें गुरुपदीं ॥ ४४ ॥ तर्कवितर्कादिक भावना । कदापि न याव्या मना । करूं नये अन्य साधना । गुरुचरणसेवेवाचुनी ॥ ४५ ॥ शिष्याचा पाहुनी अधिकार । सद्गुरु चालवितील मार्गावर । विकल्पें न भरावें अंतर । हेंचि लक्षण शिष्याचें ॥ ४६ ॥ श्रीगुरूची आज्ञा उल्लंघन । कदापि न करावी जाण । आला प्रसंग जरी कठिण अथवा देह त्यागणें ॥ ४७ ॥ गुरुवचनीं विश्वास असावा । मनीं ठेवूनी शुद्ध भावा । करावी अनन्य भावें सेवा । सदैव श्रीगुरुचरणांची ॥ ४८ ॥ शिष्य जरी जाहला थोर । तरी मिरवूं नये आपुला

बडिवार । चढूं नये माथ्यावर । सद्गुरुच्या शिष्यांनी ॥ ४९ ॥ तेणें हातीं येणारा चोखट । अमृताचा अमोल घट । सकल सांडूनी जाईल फुकट । वृथा खटपट केलियास ॥ ५० ॥ ऐसा केलिया अभिमान । हाती न लागे कांही जाण । म्हणोनी शिष्यें सावधान । असावें नम्रता धरोनी ॥ ५१ ॥ ज्यांचिये अंतःकरणांत । किंचित क्रोध निर्माण । त्याची पदच्युति होय त्वरित । म्हणोनिया समजावें ॥ ५२ ॥ जो दुजा शिष्य सद्गुरुरायाचा । तो आपुला गुरुबंधु साचा । तरी स्वप्नांतहि तयाचा । मत्सर कदा करूं नये ॥ ५३ ॥ राखावें प्रसंगावधान । वागावें त्याजवळी सांभाळून । तयासी क्रोध आलिया उफाळून । तरी आपण समाधान करावें ॥ ५४ ॥ जो सद्गुरुसि वाखाणित । त्याचे चरण वंदावे त्वरित । परि जो कोणी दुर्जन निंदीत । व्हावें पाठमोरें तेथोनी ॥ ५५ ॥ जयासी श्रीगुरुचरण । लागती तें पवित्र आसन । तयासी करावें वंदन । बसूं नये त्यावरी ॥ ५६ ॥ कवण्याहि कार्यासी लागतां । प्रथम वंदावें सद्गुरुनाथा । सद्गुरुसी बहुभाष्यता । शिष्यें कदापि न करावी ॥ ५७ ॥ ज्या दिशेकडे गुरूचें स्थान । त्या दिशेकडे उभे राहून । करावें साष्टांग नमन । गुरुचरण आठवूनी ॥ ५८ ॥ चंद्रभेटीस्तव चकोर । उत्सुक असे निरंतर । तेंवि श्रीगुरुपदीं अंतर । भेटीं आतुर असावें ॥ ५९ ॥ संतजनांचा सहवास । हाच शिष्यातें लागावा ध्यास । गुरुसम अखिल विश्वास । पाहावयास शिकावें ॥ ६० ॥ सकल देवदेवता । मानव आपुले मातापिता । एका सद्गुरूसी पूजितां । ती पूजा मान्य सकलांसी होतसे ॥ ६१ ॥ आपुले जे सद्गुरुराय । ते पूर्णब्रम्हस्वरूप होय । हा ऐसा दृढनिश्चय । शिष्याचा झाला पाहिजे ॥ ६२ ॥ ऐशी जयाची दृढ भावना । पूर्ण व्यापूनी राही मना । त्यानेच श्रीगुरुचरणा । शरण जावें अत्यादरें ॥ ६३ ॥ नातरी परमेश्वरचिंतन । अखंड करावें नामस्मरण । ऐशा उपाया आचरून गुरुलाभ होतो निश्चयें ॥ ६४ ॥ कोणी चढाओढ करूनी । गुरु करिती जाऊनी । बाह्यात्कारी उपचारांनी । करिती पूजन गुरूचें ॥ ६५ ॥ काय तेणें शिष्य जोडे । शेवटीं यमधर्माच्या हातीं पडे । रौरव नरकांत बुडे । किती एक

कल्पपर्यंत ॥ ६६ ॥ एका सद्गुरूचे धरतां पाय । तेथे कंटाळूनी जाय । म्हणे मज दुजा गुरु होय । तो वटवाघुळ अधांतरी ॥ ६७ ॥ त्यांतूनहि गुरुमाउलीचें अंतर । कैसें असतें दयासागर । उदात्त आणि करुणाकर । याचें उदाहरण पहावें ॥ ६८ ॥ श्रीसमर्थ स्वामी रामदास । एक शिष्य असे तयांस । तयासी मंत्रोपदेश । स्वामी समर्थांनी केला असे ॥ ६९ ॥ जो सकल तारक असे पवित्र । समर्थ जपती अहोरात्र । तो श्रीराम जयराम जय जय राम हा त्रयोदशाक्षरी मंत्र । समर्थें त्या दिधला असे ॥ ७० ॥ समर्थ रामस्मरणीं दंग । रामरूपी जाहलें अंतरंग । रामरूपीं पाहती जग । सकल दृश्यादृश्य पदार्थां ॥ ७१ ॥ हा करी तो करी मीहि करी । म्हणूनी सद्गुरूचे पाय धरी । परि पाझर अंतरीं । भक्तिरसाचा न लागला ॥ ७२ ॥ तेंवि हा नामधारी शिष्य । सेवा करी बहुत दिवस । एके दिनीं कीर्तनास । गेला तुकाराम महाराजांच्या ॥ ७३ ॥ श्रोते जाहले तल्लीन । ऐकतां नवरसभरित कीर्तन । तुकाराम नाचती वीणा घेऊन । पांडुरंग पांडुरंग म्हणोनियां ॥७४॥ श्रीतुकारामाचे अभंग । जगतीं जाहले अभंग । त्या कीर्तनाचा रंग । वर्णाया मति हो कुंठित ॥ ७५ ॥ तेथे हा चंचल शिष्य बैसला । कीर्तन ऐकतां दंग जाहला । म्हणे मी रामदासाला । कासया गुरु केला असे ॥ ७६ ॥ ना करिती ते कदा कीर्तन । ना जमती कधी श्रोतेजन । सदा करिती चिंतन । एका रामनामाचे ॥ ७७ ॥ म्हणोनी निश्चय जाहलासे मनीं । शरण जावें तुकारामचरणीं । श्रोतेजन जाती उठोनी । कीर्तन जाहलियावरी सदनासी ॥ ७८ ॥ परि हा शिष्य ना उठोनी गेला । तैसाच बसोनी राहिला । महाराज येवोनी तयाला । पुसती कां बा बैसलासी ॥ ७९ ॥ मिठी मारिली घट्ट चरणीं । वदला असे नम्र वाणीं । म्हणे महाराज कृपा करोनी । अनुग्रह मज द्यावा जी ॥ ८० ॥ पाहिलें त्याकडे निरखोनी । महाराज उमगले मनीं । किंचित हास्यवदन करोनी । पुसताती तयाला ॥ ८१ ॥ अरे बाबा चंचला । येवढा तूं वाढला । अजूनी तुज लाभला । कां ना गुरु एखादा ॥ ८२ ॥ ऐकतां वदे तो शिष्य । माझे गुरु

असती रामदास । परि तयांचा मंत्रोपदेश । ना रुचे आतां आम्हासी ॥ ८३ ॥ एका रामावाचून । न करिती दुज्या देवाचें स्मरण । सदा चालतें लेखन । दासबोध ग्रंथाचें ॥ ८४ ॥ तरी भाग्योदयें करून । जाहले आपुलें दर्शन । तरी या दासावरी कृपा करून । आपुल्या अंकित करावें ॥ ८५ ॥ तुकाराम वदती मानसीं । मूढा कुबुद्धि उदेली तुजसी । हातींचा राम टाकूनी देसी । धोंडा घेसी माथ्यावरी ॥ ८६ ॥ कामधेनु असतां सदनासी । ताक मागे दुजिया गृहासी । तोडूनी कल्पवृक्षासी । हिवर लावूं इच्छीतसे ॥ ८७ ॥ काय असे हा कर्मकरंटा । करीं लाभलेल्या अमृतघटा । टाकूनी फिरे दारवंटा । काय म्हणावें याजला ॥ ८८ ॥ महाराज वदती तयासी । म्हणती विचार करीं मानसीं । समर्थ-रामदास-पदासी । सोडूं नको नको तूं ॥ ८९ ॥ तरी न सोडी तो आपुला हेका । म्हणती गाढवाच्या लेका । एक गुरु असतां मंत्र फुका । जाईल आमुचा निश्चयें ॥ ९० ॥ तरी तुज मंत्र दिला जो सामर्थांनी । तो त्यांचा येई त्यांस देऊनी । मग आम्ही तुजलागूनी । उपदेश करूं म्हणताती ॥ ९१ ॥ तरी जा जा तूं तेथून । थांबूं नको एकहि क्षण । पहा कसें कर्मानुसरण । बुद्धि करी मानवांची ॥ ९२ ॥ समर्थांचा अधिकार । काय जाणे हा पामर । उत्सुक जाहलें अंतर । तुकाराम गुरु करावया ॥ ९३ ॥ जो रामरूपीं सामावला । ज्याने राम आपुला केला । तो भूत भविष्य वर्तमानाला । सदैव सर्वज्ञ जाणीतसे ॥ ९४ ॥ हा शिष्य देखतां क्षणीं । समर्थ हासती मोठ्यांनी । वदनी काय इच्छा धरोनी । आलासी बा तूं येथे ॥ ९५ ॥ नाही उरली जाणीव । नाही उरली नेणीव । विकल्पाने आपुला ठाव । बैसवीला त्यावरी ॥ ९६ ॥ वदे अहंपणा धरोन । आपण मंत्र दिधलासे मजलागून । तो घ्यावा आपुला आपण । मज गुरु करणें दुजा असे ॥ ९७ ॥ म्हणती कर्म तैसें फळ । मिळालें पाहिजे तात्काळ । लाविला ना काही वेळ । ते समयीं समर्थांनी ॥ ९८ ॥ होतें ताम्हनीं पूजाजळ । दिधलें तें भरोनी ओंजळ । म्हणती खळखळोनी टाकी चूळ । त्या समोर शिळेवरी ॥ ९९ ॥ वाढला होता मत्सर । नाही केला विचार । चूळ टाकिली शिळेवर । तो काय

चमत्कार दाखला ॥ २०० ॥ होता पवित्र जिव्हेवर । जो त्रयोदशाक्षरी राममत्रोच्चार । चूळ टाकितां शिळेवर । जसाच्या तसा उमटला ॥ १ ॥ रामनाम गेलें मुखांतूनी । तों शद्ब ये ना एक वदनीं । मुका झाला त्या क्षणीं । म्हणे काय हें ऐसें जाहलें ॥ २ ॥ जेथे नाही राहिला राम । तें अमंगळ होय धाम । तेंवि हा चंचल अधम । सरस्वतीनेहि त्यागिला ॥ ३ ॥ परि अंगीं होती मस्ती । नाही वंदिलें समर्थाप्रती । धाव घेतली त्वरितगतीं । तुकाराममहाराजांकडे ॥ ४ ॥ मिठी दिधली असे चरणां । दु:खाश्रू पाझरती नयनां । वृत्त निवेदी करूनियां खुणा । म्हणे कृपा करावी या दीनावरी ॥ ५ ॥ महाराज वदती तयासी । बाबा समर्थांच्या सामर्थ्यांसी । जाणे सामना करावयासी । मज अनाथा शक्ति नसे ॥ ६ ॥ जो राम जानकीजीवन । तोच पांडुरंग रुक्मिणीरमण । त्याची आज्ञा उल्लंघन । न करवे माझेनी ॥ ७ ॥ पश्चात्ताप पावला मानसीं । हात लावी कर्मासी । म्हणे आतां क्लेशराशी । भोगाव्या मज लागतील ॥ ८ ॥ गेला राम गेला विठ्ठल । मज यमधर्म बांधूनी नेईल । तेथे कोण सोडवील । शरणागत मी आलों असे ॥ ९ ॥ म्हणोनी टाहो फोडिला । परि शद्ब न ये बोलावयाला । तुकाराम वदती तयाला । जाई शरण पुनरपि समर्था ॥ ११० ॥ म्हणे मी केवढा पापराशी । कैसा शरण जाऊं समर्थासी । झणीं कोपूनियां मानसीं । शाप देतील मजलागीं ॥ ११ ॥ मजसारखा पातकी अन्यायी नर । शोधितां न कोठे सापडणार । कैसा जाऊं मी तेथवर । हें काळें मुख दाखवावया ॥ १२ ॥ तरी तुम्ही संत दयाळ चित्तीं । कृपा करा अनाथाप्रती । चला चला माझे संगतीं । करीं मज धरूनियां ॥ १३ ॥ मऊ मेणाहूनी संतांचे हृदय । अनाथांची ती असे माय । ही त्यांचीच उक्ति होय । असत्य कैशी होईल ॥ १४ ॥ तेंवि महाराज द्रवले चित्तीं । चंचल शिष्य धरिला हातीं । घातला समर्थांच्या पायावरती । म्हणती घ्या करीं बालक ॥ १५ ॥ दोघेहि अधिकारी पूर्ण । ओळखतो एकमेकांचें अंत:करण । ज्यांनी वश केला नारायण । द्रवले समर्थहि अंतरी ॥ १६ ॥ तेथे काय उशीर । फिरविली आपुली कृपानजर । जिव्हाग्रीं मंत्रोच्चार । श्रीराम



श्री गुरुशिष्य पंचायतन



समाधि–प. पू. श्री वासुदेवानंदसरस्वती टेंब्ये स्वामी,
गरुडेश्वर (गुजरात).

जयराम जयजयराम हा बैसवीला ॥ १७ ॥ ऐशी ही गुरुमाउली परम उदार । वरी होय क्षणभरी कठोर । किंचित शासन जरी करणार । परि अंतरीं दयासागर भरलेला ॥ १८ ॥ पुत्राकरी हो अन्याय : येतां जवळी दुरी लोटते माय । परि तिचें सदैव हृदय । वात्सल्यें असे भरलेलें ॥ १९ ॥ मातेची द्यावी जरी उपमा । तरी तीहि अपुरी होय गुरूत्तमा । पोहोचविणार धामोत्तमा । एकचि हे सद्गुरु ॥१२०॥ माता होय जन्म देती । स्तनपान करवूनी पोषवी ती । परि न होय निरसती । अंतरीचें अज्ञान ॥ २१ ॥ म्हणोनी सद्गुरुसेवा म्हणजे मोक्षपद । गुरुसेवा म्हणजे आनंदपद । कैवल्यप्राप्तीचा ब्रम्हबोध । करितां होय गुरुसेवा ॥ २२ ॥ ऐसे सद्गुरु मोक्षतारु । तेथे शिष्य आज्ञाधारु । मग तेथे आपपर विचारु । कांही एक उरेना ॥ २३ ॥ ऐशीच ही गुरु-शिष्यांची जोडी । म्हणोनी सीताराम-शिष्या लागली गोडी । पोहोचविणार गुरू पैलथडी । या भवसागरांतूनी ॥ २४ ॥ ऐसे हे वासुदेवमहाराज । सीताराम शिष्याचे गुरुराज । तारिते लाभलें जहाज । तें आज दूरी गेले असें ॥ २५ ॥ न कळतां चमत्कार । घडूनी आले साचार । कितीएक तारीले पामर । महासमंधां काढोनियां ॥ २६ ॥ याची उदाहरणें दावीन । पुढील अध्यायीं गोवून । ऐकतां श्रोतेयांसी समाधान । खचित होईल अंतरीं ॥ २७ ॥ जैसी माता श्रीगणेशा काढूनी । गिरवी शिशूचा कर धरोनी । तैशी गुरुमाउली करीं लेखणी । देउनी लिहवीतसे मजकडूनी ॥ २८ ॥ वाटे मानसीं करावी सेवा । परिपूर्ण न होय वासुदेवा । तरि कृपाकर असावा । या जानकीच्या शिरीं सदैव ॥ २९ ॥ इति श्रीसीतारामचरित्रालंकारमणी । गुंफिला असे दृष्टांतकोंदणीं । प्रकाश दाविता अंतःकरणीं । चतुर्दश अध्याय गोड हा ॥ १३० ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

चतुर्दशोऽध्यायः समाप्तः ।

अध्याय पंधरावा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ ॐ नमो जी वासुदेवा । अनंता अच्युता केशवा । नारायणा श्रीधरा माधवा । देवाधिदेवा नमोऽस्तु ते ॥ १ ॥ तुज अनंत नामांनी आळवीतां । तरी तूं एकचि भगवंता । माझी हांक ऐकतां । जाग तुजप्रति कां न ये ॥ २ ॥ तरि जागा होई तूं श्रीपति । माझी ऐकावी विनंति । या चंचल मनाप्रती । आवरोनी धरी बा ॥ ३ ॥ या मायामय मोहांत । षड्विकारांच्या जाळयांत । गुंतलें असे सदोदित । मन बाहेरी निघेच ना ॥ ४ ॥ विवेकाची खुंटली मात । सहाही विकार जाहले मस्त । तरी प्रभो पाहिजे साथ । तुझिये कृपेची दयाळा ॥ ५ ॥ जरी बसावें एकांतांत । कोंडूनी घ्यावें कोठडींत । परि दाही दिशा फिरूनी येत । क्षणामाजी हें जाओनियां ॥ ६ ॥ तेणें दुःखाचिया राशी । होती अनंत क्लेश देहासी । सुखाचा वाराहि न अंगासी । एक क्षणभरी लागेना ॥ ७ ॥ या मायामय प्रपंचाची बेडी । हातापायांतें नित्य जखडी । खुंटवी मनाची आवडी । घडी बिघडवी क्षणोक्षणीं ॥ ८ ॥ तरी श्रीसद्गुरुनाथा । अत्रि-अनसूयेच्या सुता । दीनदयाळा श्रीगुरुदत्ता । प्रार्थना तुज पाहि माम् ॥ ९ ॥ एक मनीं असे आस । सदा लागावा तुझा ध्यास । धरोनी रहावें कृपाकांस । पदांबुजीं सर्वदा ॥ १० ॥ तुझें करावें कीर्तन । तुझें करावें गुणगान । तुझें करावें नामस्मरण । लाभावी सदा सत्संगती ॥ ११ ॥ तुज कृपा करणें असे सहज । कठिण नाही तुला काज । उतरवी या मनाचा माज । लीन करी तयासी ॥ १२ ॥ मना स्थिर करी घडीं घडीं । तेणें तव नामीं लागेल गोडी । नामस्मरणें साकडीं । आपोआप सुटतील ॥ १३ ॥ तुझ्या कृपेची पाखर । आहे या अज्ञानशिरावर । तेणें चतुर्दश अध्याय साचार । पूर्ण असती जाहले ॥ १४ ॥ मागील अध्यायामाजीं जाण । जाती सदनीं निरोप देऊन । गुरु-शिष्य-लक्षणें विस्तारून । कथिलीं असती अल्प मतीने ॥ १५ ॥ सकल

दैवतांपरिस जें दैवत । शिष्या थोर असे जगांत । ते सद्गुरु कृपावंत । वासुदेव टेंब्ये-कुल-दीपक ॥ १६ ॥ न कळतां चमत्कार । झाले किती या जगतावर । उद्धरिले किती एक नारीनर । अनेक संकटांपासूनी ॥ १७ ॥ महाराजांची असे भगिनी । जाती एकदा तिचे सदनीं । जाहलिया औपचारिक भाषणीं । काय ती वदे महाराजां ॥ १८ ॥ म्हणती जन हा वासुदेव । अवतरला वाटे जैसा देव । मंत्रसिद्धीवैभव । हातीं तुझ्या आलें असे ॥ १९ ॥ ऐसें ऐकतां भाषण । परि न वदती तिजलागून । केलें किंचित हास्यवदन । पुढे होय ती बोलती ॥ २० ॥ तरी तूं आलासी आहेस येथ । ही माझी गाय जाहली मस्त । कवणासहि ना जवळी येऊं देत । लाथा झाडिते सारखी ॥२१॥ काढूं नेदी कदा धार । कैसा करावा विचार । तरी आणी ताळ्यावर । पाहूं चमत्कार आतांची ॥ २२ ॥ ऐणीं महाराज गेले जवळी । करें पाठीं कुरवाळिली । गाय मान खालती घाली । पाय चाटी तयांचे ॥ २३ ॥ वदती गोमाते उद्देशूनी । काय वदते भगिनी । तूं बहु खोड्या करोनी । लाथा कासया झाडिसी ॥ २४ ॥ तरी आजपासूनी ऐसें वागणें । माते तुवां सोडुनी देणें । कासे हात लावितां पान्हावणें । तुझीं लेकरें हीं सारीं ॥ २५ ॥ पश्चात्ताप होता मनीं । लीन होतो जैसा प्राणी । तैसी ही धेनु त्या दिनापासूनी । गरीब अती झाली असे ॥ २६ ॥ कांही दिसतां चमत्कार । जन घालिती नमस्कार । तेंवि ही भगिनी साचार । नमन करितसे बंधूसी ॥ २७ ॥ म्हणे आपुला बंधुराय । अद्वितीय पुरुष होय । स्वाभिमानें भरलें हृदय । आनंद वाटे मनासी ॥ २८ ॥ पाहतां महाराज या समयासी । असती साधक अवस्थेसी । परि पोहचले असती पैलतीरासी । सकल पाश ओलांडुनी ॥ २९ ॥ चंदनतरूचा परिमल । स्वभावें संतोषवी अवनीतल । तेंवि सिद्धीयुक्त शब्द निर्मळ । निघती वदनांतुनी महाराजांच्या ॥ ३० ॥ एकदा एका ग्रामांत । क्षुल्लक कारणावरूनी होत । वादविवाद वाढला बहुत । खून जाहलासे एकाचा ॥ ३१ ॥ खून करूनी खुनारी । जाहला असे फरारी । केला तपास बहुपरी । थकले अधिकारी

शेवटीं ॥ ३२ ॥ किती उपाय पाहिले करूनी । मग विचार सुचलासे मनीं । जावें माणगांवा लागोनी । महाराजांप्रती पुसावया ॥ ३३ ॥ हात जोडोनी सामोरी । सांगती गुन्हेगार झाला फरारी । तरी तो यावा आमुचे करीं । चरणीं विनंति ही असे ॥ ३४ ॥ महाराज त्या क्षणींच वदती । त्या पोलिस अधिकाऱ्याप्रती । तपास करूं नका यापुढतीं । दूर कोठेहि जाऊं नका ॥ ३५ ॥ शोधावयाचें कारण । आतां कांही न उरलें जाण । तो आरोपी आपण होऊन । तुमचे हातीं येईल ॥ ३६ ॥ समर्थांचें ऐकतां भाषण । संशयीं पडलें अधिकाऱ्याचें मन । लागतील कितीएक दिन । म्हणती नम्रता धरोनियां ॥ ३७ ॥ मोजतां आजपासूनी । सातव्या किंवा आठव्या दिनीं । शोधितां मनुष्य तो येऊनी । समोर उभा राहील ॥ ३८ ॥ भरवसा ठेवूनी या वचनीं । अधिकारी गेले निघूनी । कथिलेल्या आठव्या दिनीं । आरोपी दाखल जाहला ॥ ३९ ॥ तैशीच एकदां तस्करटोळी । ग्रामांत करी बंडाळी । थकली पोलिस अधिकारी मंडळी । ग्रामांत शोध लाविता ॥ ४० ॥ तस्कर कुशल बुद्धिमान । येती करूनी संघटन । लोक जाहले हैराण । चोरभयापासूनी ॥ ४१ ॥ म्हणती पोलीस नियंत्रण । चोख नसे याकारण । चोर ते साव होऊन । घरें फोडिती लोकांचीं ॥ ४२ ॥ शेवटीं पोलीस अधिकारी । आले माणगावामाझारी । शरण जाती चरणांवरी । श्रीवासुदेव महाराजांच्या ॥ ४३ ॥ अधिकारी सांगती तस्करकथन । शोधितां श्रम पावलों जाण । महाराज म्हणती कठीण । कांही नसे त्यामाजीं ॥ ४४ ॥ तैसा टोळींतील नायक । मुख्य जो कां होता एक । शोधूनि काढिला बिनचूक । प्रथम तो समर्थांनी ॥ ४५ ॥ टोळींत किती तस्कर । संख्या कथिली साचार । कवण दिशेस संचार । त्यांचा असे तो दाविला ॥ ४६ ॥ नित्य जरी दिसे नयनां । तरी ओळखूं येईना । देहावरील खाणाखुणा । समर्थांनी कथिल्या सविस्तर ॥ ४७ ॥ पद लाभलें यशोदायक । दिशा बदलितां तात्कालिक । सापडला एकेक अचुक । तस्कर तो अधिकाऱ्यासी ॥ ४८ ॥ भौतिक साधनांपलीकडे स्वतंत्र । ज्ञानकक्षा उंचावली पवित्र । अपरिमित विस्तारक्षेत्र ।

हें काय कळे सामान्य मानवां ॥ ४९ ॥ दृढ तपश्चर्यें करून । अंतर्बाह्य शुचिता निर्माण । म्हणोनी भूत भविष्य वर्तमान । ज्ञान प्राप्त हो त्रिकालाचें ॥ ५० ॥ योगसिद्धीहून थोर । आत्मसिद्धि ही साचार । त्याहून हे पैल पार । पोहोचले असती महाराज ॥ ५१ ॥ एक स्त्री माणगावांत । पिशाच्च-बाधेने जाहली त्रस्त । पंचाक्षऱ्यांसी दाद न देत । करिती विचार मांत्रिक ॥ ५२ ॥ पिशाच्चशक्ति विलक्षण । वाऱ्याबरोबरी जाण । फिरवी त्या स्त्रियेकारण । अधांतरीं खाली वरी ॥ ५३ ॥ कष्ट जाहले अनिवार । किती दिवस सोसणार । भरले दिवस साचार । त्याहि पिशाच्चसबंधाचे ॥५४॥ तो उदेला सुदिन । गेली महाराजपदीं शरण । धरोनीयां घट्ट चरण । व्यथा कथिली मनीची ॥ ५५ ॥ तत्काल दयासागरांनी । वासुदेव महाराजांनी । भूर्जपत्रावरी मंत्र लिहूनी । कंठीं बांधण्यासी दिला असे ॥ ५६ ॥ मंत्र कंठीं बांधतां क्षणीं । पिशाच्च गेलें निघोनी । नाइलाज होवोनी । क्षण एक न लागतां ॥ ५७ ॥ परि आपुले संरक्षणार्थ देख । असे जो एक तांत्रिक । उपाय करणें प्राथमिक । तो महाराज विसरले ॥ ५८ ॥ संधी पिशाच्चाने साधूनी । रात्रीं निद्रा लागली देखोनी । क्षणीं आक्रमण करूनी । कंठ त्यांचा पकडला ॥ ५९ ॥ ध्यानीं येतां प्रकार । दत्तस्मरण-नामोच्चार । ऐकतां पिशाच्च जाहलें दूर । दत्तनामभयाने ॥ ६० ॥ पिशाच्च तें पापिष्ट । करी समर्थासवें झटापट । जागृत माय जी पावली कष्ट । पाहतां ते क्षणीं तेधवा ॥ ६१ ॥ जवळी येती उठोनी । महाराज तांदुळ मामती खुणेनी । करीं घेती मंत्रोनी । दशदिशांसी फेकिती ॥ ६२ ॥ गेलें पिशाच्च निघोनी । पुनः न आलें परतोनी । आसमंतांतहि यावया मनीं । भय त्यांतें भरलें असे ॥ ६३ ॥ जीवात्मा जो अपक्रांत । तोच येई नीच योनींत । तोच पिशाच्च आणखी भूत-। होऊनी त्रासवी लोकांतें ॥ ६४ ॥ पूर्ववासनारूपें संबंधित । जो जन तया कष्ट देत । कधी कोणा आनंदवीत । पिशाच्च लीला करीतसे ॥ ६५ ॥ ऐसे किती एक दुःखीत । येऊनियां चरण धरित । त्यांसी करिती संकटमुक्त । श्रीवासुदेव सरस्वती ॥ ६६ ॥ ऐकावें एक कथानक । पिशाच्च

योनींतील एक । असोनी मनोरंजक । परोपकार करतें जें ॥ ६७ ॥ सावंतवाडीत आळवणी । वैद्य होते एक कोणी । जाती माणगावाहूनी । महाराज सदनासी तयांच्या ॥ ६८ ॥ त्यांचा स्नेहसंबंधित आणवकर एक गृहस्थ । नाम तयाचें विष्णूपंत । भेट झाली तयांची ॥ ६९ ॥ त्यांचिये पूर्वाजित । विद्वान परि अतृप्त । जीवात्मा समंध होत । येत अंगीं पंतांच्या ॥ ७० ॥ वासना न जाहल्या शांत । करी आचरण अपवित्र । पातला हा पिशाच्च योनींत । असोनीहि ब्रह्मवेत्ता ॥ ७१ ॥ तो प्रसंगविशेषीं जाण । विष्णूपंतांच्या शरीरीं येऊन । अडित कार्य करून । कष्ट न देतां जातसे ॥ ७२ ॥ ज्या ज्या समयीं महाराज येत । विष्णूपंतांच्या भेटीप्रत । त्या त्या समयीं प्रकट होत । न चुकतां हा समंध ॥ ७३ ॥ तयाची बुद्धिमत्ता विलक्षण । महाराज उमगले होते पूर्ण । पुसती तयासी जे जे प्रश्न । अचुक उत्तरें तो देतसे ॥ ७४ ॥ म्हणोनीच तयाविषयीं सहानुभूति । वसे महाराजांच्या चित्ती । भेटी घेऊनियां तयाप्रति । करिती प्रश्नोत्तरांसी अनेकदां ॥ ७५ ॥ जिवंतणीं साचार । ज्ञान-अज्ञान-संस्कार । राहती ते देहत्यागानंतर । जीवात्म्यावरी ते कायमची ॥ ७६ ॥ तैसेंचि देहबद्ध आत्म्याहून । देहमुक्त आत्म्याचें जाण । शतपटीने वाढतें पूर्ण । सामर्थ्य लोकीं दिसतसे ॥ ७७ ॥ जरी होई देहनाश । परि आत्मा असे अविनाश । देहबंधनाचा पाश । सोडोनी मोकळा तो फिरतसे ॥ ७८ ॥ शुभाशुभ कर्में जीं जिवंतपणीं । तींच करिती पुढची आखणी । मिळे मानवा ती ती योनी । उच्च नीच सत्यत्वें ॥ ७९ ॥ म्हणूनी इतर कोटी सजीवांहूनी । मानव जीवालागोनी । स्वातंत्र्य कर्मालागूनी । दिधलें असे प्रभूने ॥ ८० ॥ एका मानव जीवालागोनी नीट । कळे बरें आणि वाईट । कळे खोटें आणि चोखट । कर्म करितां तयाला ॥ ८१ ॥ चौर्यकर्माची तळमळ । करी वासना तैसे मिळे फळ । हातीं पायीं तात्काळ । शृंखला पडूनी जखडती ॥ ८२ ॥ म्हणोनी जैसे संस्कार । होती या जीवात्म्यावर । वज्रलेप त्या वासना थोर । जखडुनी राहती निश्चयें ॥ ८३ ॥ तेणेंचि या काळरूप भोवऱ्या-।

माजीं जन्ममृत्यूंच्या फेऱ्या । कधी होती ना त्या पुऱ्या । वाऱ्या पाहतां मानवाच्या ॥ ८४ ॥ म्हणोनी अरे मानवा जीवा । विकास करूनी घेई बरवा । अंतीं आठवी वासुदेवा । वासनाविरहित होवोनियां ॥ ८५ ॥ आत्मा तो असे अमर । देहत्यागाच्या नंतर । वासना धरूनी स्वैर । कैसा फिरे तो पहावा ॥ ८६ ॥ तों महाराज एके दिनीं । जाती विष्णूपंतसदनीं । तो महासमंध त्या क्षणीं । दर्शनालागी प्रकटला असे ॥ ८७ ॥ न पुसतां कांहीं कोणी । आपुले द्वय हस्त जोडूनी । सांगो लागला नम्र वाणीं । आपुली कहाणी तेधवां ॥ ८८ ॥ वदे वेदशास्त्रसंपन्न । आचारविचारयुक्त कुळीं उत्पन्न । सुशील आणि उच्चवर्ण । पूर्व जन्मींचा मी द्विज असे ॥ ८९ ॥ कवणाचे ना देणें घेणें । कवणासी ना भांडणें । वादविवादापासूनी राहणें । अलिप्त माझें सर्वथा ॥ ९० ॥ रात्रंदिन एक ध्यास । वेदाध्ययनाचा अभ्यास । तेणेंचि होय संतोष । मानसीं माझ्या सर्वदा ॥ ९१ ॥ गृहीं दारा आणि कन्या पुत्र । स्वधर्म आचरती सर्वत्र । आप्तेष्ट सकल इष्ट मित्र । असती जवळी पाचारितां ॥ ९२ ॥ ऐशिया परीं एके दिनीं । नित्य कार्यांतें सारूनी । बैसलों असे येऊनी । सहज-गतीं ओसरीं ॥ ९३ ॥ जाय आयुष्याचा काळ । त्यांत लाभेल जो एकेक पळ । जैसें कार्य हातीं होईल । तैसें फळ मानवा पदरीं पडे ॥ ९४ ॥ होईल काय पुढील क्षणा । हें भविष्य नेणवे कवणा । ब्रह्मलिखित त्या खुणा । त्याचा तोची जाणीतसे ॥ ९५ ॥ तेंवि विकल्परहित । बैसलों न क्षणभरी ओसरींत । तों विघ्न आलें धावत । कैशा परी पहावें ॥ ९६ ॥ तों मंद मंद चालत । हळू हळू डोलत । एक धेनू अंगणांत । येऊनी उभी ठाकली ॥ ९७ ॥ काय आशा वाटे तिला । मिळेल कांही आपणाला । तों आणुनी मुखीं घातला । गोग्रास सौभाग्यवतीने ॥ ९८ ॥ असे जरी गरीब फार । जरी मुकें तें जनावर । तरी आपला गुणधर्म साचार । कैशिये परीं सोडील ॥ ९९ ॥ शाक भाजी बहु परीं । लाविली होती परसदारीं । त्या हरितवर्ण मालावरी । धेनू चालली लगबगीने ॥ १०० ॥ वेली धरिती फळांस । गाय जाऊनी करील नासधूस । ऐसें वाटूनी मनास । उठलों मी झडकरीं

॥ १ ॥ मनीं नव्हता राग द्वेष । लावावें इज मार्गास । एवढाच मनीं उद्देश । म्हणोनी गोटा एक उचलिला ॥ २ ॥ गोपृष्ठभाग लक्षून । मारिला असे सहज जाण । परि हाय ओढवलें विघ्न । काळगोटा तो जाहला ॥ ३ ॥ लागला वर्मस्थळ लक्षून । गरगरा फिरवी धेनू नयन । तात्काळ भूवरी कोसळून । गतप्राण ती जाहली ॥ ४ ॥ जरी विकल्प नव्हता मानसीं । तरी गोहत्या घडली मजसी । त्या गोहत्येच्या पातकराशी । किती जाहल्या त्या पहाव्या ॥ ५ ॥ पावलोपावलीं भूवर । सान जीवजंतूंचा संहार । किती होय याचा विचार । अगणित गणितां न ये कुणा ॥ ६ ॥ तेथे ही जगज्जननी । सकल देव हिचे स्थानीं । तिची हत्या या करांनी । झाली पापराशी केवढी पहा ॥ ७ ॥ केवढा हा दोष दारुण । एक रथ भरून जीव वधितां सान । तेव्हा एक बस्त वधिलियाचें जाण । पातक शिरीं घडतसे ॥ ८ ॥ ऐसे शत बस्त वधितां एक । वृषभहत्येचें पातक । शत वृषभ तयीं गोहत्या देख । घडली शास्त्र हें वदत असे ॥ ९ ॥ केवढा तो ढीग जाहला । मेरुसम नग उंचावला । शेवटीं काळफास गळा पडला । ओढूनी दाविला नयनांसी ॥ ११० ॥ हाय हाय त्या यमपुरीस । किती सोशिले अनिवार क्लेश । किती भोगिले नरकवास । न ये सांगतां वाचेने ॥ ११ ॥ तेथे नाही दया माया । तेथे न चाले कांही किमया । एका प्रायश्चित्ता वाचोनियां । उपाय दुजा कांही नसे ॥ १२ ॥ ज्या ज्या दोषालागून । जें जें तेथे असेल शासन । तें तें भोगिल्या-वाचून । मानवसुटका न होय ॥ १३ ॥ यातना होती दारुण । परि कदा न जाय तेथे प्राण । दुष्ट कृत्यांची आठवण । भोगितां पुढे उभी असे ॥ १४ ॥ या देहाची उपाधी असतां । जें जें दुष्कर पाहूं जातां । लाभतां देहशून्य अवस्था । तें तें सुकर वाटतें ॥ १५ ॥ कर्मानुरूप वासना । अती व्याकुळ करिती मना । त्या पूर्ण तृप्त झाल्याविना । स्थिति दयनीय होतसे ॥ १६ ॥ एक देहगृह पडल्यावर । इंद्रियें कोठोनी राहणार । एक आत्मा तोंचि अमर । वासना धरूनी राहतसे ॥ १७ ॥ मग उभें जें असे देवमंदिर । त्यावरी न घडती सुसंस्कार । त्याची गति दुर्धर । कल्पकल्पांतींहि

सुटेना ॥ १८ ॥ जीवात्म्यासी न लागलें वळण । अखंड करी । विषयमदिरापान । मग तेंचि लागे ध्यान । देह सोडितां अखेरीं ॥ १९ ॥ कांही होते सुकृत । होता वेदोच्चार मुखांत । म्हणोनी या पिशाच्च योनींत । पातलों असे महाराजा ॥ १२० ॥ तयासी ज्ञानशून्य जी पाशवी योनी । अखंड टाकीत जखडोनी । तैशी नव्हे ही पिशाच्च योनी । ज्ञानमय असे जीवात्मा ॥ २१ ॥ किती वर्षं या योनींत । झालीं आपुलीं व्यतीत । कधी होणार दुर्दशेचा अंत । पुसती महाराज तयासी ॥ २२ ॥ वदे समंध अडीच शत । जाहली मज या योनींत । पापानुसार करितां गणित । लागतील आणखी दहा सहस्र वर्षं । २३ । ऐसें रहस्यमय अर्थपूर्ण । ऐकतां त्या समंधाचें आत्मनिवेदन । शास्त्रीय प्रमेयें त्यामाजी जाण । गोविली असतीं कुशलत्वें ॥ २४ ॥ पूर्व जन्मांतील सुसंस्कृत । शास्त्राभ्यास हो अमित । विज्ञानगम्य प्रमेयें मांडितां येत । म्हणोनीच तयासी ॥ २५ ॥ अनेक पिशाच्च योनींतील आत्मे परिचित । असती परि हा एक त्यांत । त्रिकाल भविष्य अचुक कथित । ज्ञानी एकचि भेटला ॥ २६ ॥ ऐसे किती एक समंध ज्ञानी । भेटती महाराजांलागोनी । साहायार्थ असती निशिदिनीं । समयानुसार तयांच्या ॥ २७ तैशीच भूतबाधे-पासूनी घेरली । मंडळी जो महाराजांच्या चरणीं शरण आलीं । त्यांची मुक्तता जाहली । तो परिसावी पुढील अध्यायीं ॥ २८ ॥ तरी प्रभो वासुदेवा समर्था । न कळे तुझा महिमा पाहता । तुझा कृपाकर माथा-। सदैव जानकीच्या असो दे ॥ २९ ॥ इति श्रीसीतारामचरित्रालंकारमणी । गुंफिला असे दृष्टांतकोंदणीं । प्रकाश दाविता अंतःकरणीं । पंचदश अध्याय गोड हा ॥ १३० ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु

पंचदशोऽध्यायः समाप्तः ।

अध्याय सोळावा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ ॐकारस्वरूपा गजानना । शिवपार्वतीच्या नंदना । प्रथम तुमच्या नामस्मरणा । करितां मंगल सर्व पुढे ॥ जी इच्छा धरून । आला जो तुझ्या पदीं शरण । त्याची मनःकामना पूर्ण । होणार ती निश्चयें ॥ २ ॥ कितीहि कार्य बिकट । मार्गीं कोसळो संकट । परि सुलभ वाट । पुढे दिसे ॥ ३ ॥ तुझ्या नामाचा लागतां ध्यास । करीं धरितां बळकट कांस । नभ लोपवूनी प्रकाश । दावितोस तूं शरणागता ॥ ४ ॥ तेंवी मी अनन्य । पदीं असे तुझ्या शरण । देऊं नकोस लोटून । अभयदान देईं प्रभो ॥ ५ ॥ तूं भक्तवत्सल कृपानिधी । कोठारें भरली सद्‌बुद्धि । क्षुद्र माझी दुर्बुद्धी । कृपाकटाक्षें जळूं दे ॥ ६ ॥ शब्द वाक्य सुरस रचना । करवी पुढे गजानना । सोळाव्या अध्यायामाजीं जाणा । श्रीसीताराम चरित्रीं ॥ ७ ॥ रवितेजा पुढती । लाविल्या असंख्य दीपज्योती । त्यांचिया पुढे ही मिणमिण पणती काय प्रकाश दाविल ॥ ८ ॥ असे अमोल देदीप्यमान हिरा । तो प्रकाश दावितो अंधारा । येथे दिन रात्रहि अंतरा । अज्ञान-अंधकार असे ॥ ९ ॥ तरी प्रभो वासुदेवा । कृपाप्रकाश दावावा । सुलभ मार्ग सापडावा । तुझे गुणानुवाद गावया ॥ १० ॥ अगाध असे तुझा महिमा । अगम्य जो निगमांगमां । तेथ काय मी पुरुषोत्तमा । गुणवर्णन करू शके ॥ ११ ॥ तरी तुझे कृपें करून । पूर्ण असे अभयदान । हा मनीं भरवसा पूर्ण । ठेविला असे गुरुराया ॥ १२ ॥ गोहत्या दोषाचरण । अवचित घडे हातून । तेणें यातना दारुण । कैशा परीं जाहल्या ॥ १३ ॥ शेवटीं ही समंधयोनी । स्वीकारिली म्यां स्वइच्छे करूनी । हा वृत्तांत स्वमुखेंकरोनी । महाराजांप्रति सांगीतला ॥ १४ ॥ ज्योतिषशास्त्रामाजीं जाण । कैसा असे तो निपुण । याचेंची एक उदाहरण । सांगती स्वयें महाराज ॥ १५ ॥ सावंतवाडीस एके दिनीं । महाराज येती विष्णूपंतसदनीं । तों प्रसूत होवोनियां पत्नी ।

पुत्ररत्न जाहले ॥ १६ ॥ तो वंदन करोनी पदकमलीं । महाराजांते विनंति केली । नवजात बालकाची कुंडली । मांडूनी पहावी या वेळा ॥ १७ ॥ तै पाटी घेउनी हातीं । कुंडली मांडूनी पाहती । पुढील भविष्य जाणूनियां चित्तीं । पाटी उपडी टाकिली ॥ १८ ॥ भविष्य सांगावें जरी सत्य । करील माय तरी आकांत । न वाटे तें प्रशस्त । म्हणोनी स्तब्ध बैसले ॥ १९ ॥ कथितां कथितां आपुल्या भाषणीं । समाधान हो अंतःकरणीं । परि विपरीत दिसतां नयनीं । मौन धरोनी बैसती ॥ २० ॥ या थोरांचे वचना । अनुवोनी महाराज करिती आचरणा । आयुष्य असे एक महिना । त्या पुत्रालागी दिसोनी ये ॥ २१ ॥ तितुक्यामाजी तो समंध । ये विष्णूपंतांच्या अंगांत । प्रकट होऊनियां वदत । अति नम्रता धरूनिया ॥ २२ ॥ वदे महाराज आपणांसी । म्यां सांगावें ना उचित मजसी । परि सांगतो त्या दिनमानासी । कुंडली मांडूनी पहावी ॥ २३ ॥ समंध हा विद्वान । पूर्व जन्मींचा असे ब्राम्हण । ज्योतिषशास्त्र व्याकरण । पूर्ण निपुण त्यांमाजी ॥ २४ ॥ तयाचिया मुखें करून । वृत्तांत सकल होतां श्रवण । तेणें महाराजांचें मन । पूर्ण विश्वास पावलें ॥ २५ ॥ म्हणोनी कथिलें जें कां दिनमान । मांडिली कुंडली त्यासमान । तों मृत्युयोग ना ये दिसोन । पीडा कष्ट हो तयासी ॥ २६ ॥ पहा कैसें त्याचें ज्ञान । पूर्वजन्माचें ये दिसोन । पुढती येतसे घडोन । विश्वास दृढ झाला असे ॥ २७ ॥ आपुल्या पूर्व-कर्म-गतींनी । पातला हा पिशाच्चयोनीं । परि सुसंस्कारांनो । परोपकारी सदा असे ॥ २८ ॥ हे वासुदेवानंद सरस्वती । दया-क्षमेची प्रत्यक्ष मूर्ति । महासमंध शरण येती । कितीएक जाती उद्धरोनी ॥ २९ ॥ कितीएक येती शरण । आज्ञेनुसार जाती पळोन । साहाय्य करती न लागतां क्षण । अल्प सेवेंत तृप्त होती ॥ ३० ॥ तेंवि हे महाराज । किती एकांचें करिती काज । विस्कटला संसाराचा साज । पुनः जुळवोनी लाविती ॥ ३१ ॥ मार्गभ्रष्ट सन्मार्गास । लाविती किती नोकरीस । किती दान देती निर्धनास । मिति नसे अन्नदाना ॥ ३२ ॥ परोपकाराचें भांडार । सदा असे मुक्तद्वार ।

निरभिमानाने जो तत्पर । कार्य त्याचें होतसे ॥ ३३ ॥ तत्वज्ञानाचा आणिती आव । सद्गुरुसी ठेविता नांव । मी कर्ता हा मनीं भाव । वृथा स्पर्धा वाढवीती ॥ ३४ ॥ कार्य कांही न होय हातां । तरी भाषणीं लाविती चिंता । पोपटपंची करी वृथा । परि कवडी न खर्च करीतसे ॥ ३५ ॥ कोण कोठील परमेश्वर । विश्वास नसे पिशाच्चावर । संत काय करणार । असती आपुल्या समान ते ॥ ३६ ॥ यापरी एक गृहस्थ । राहती सावंतवाडींत । डॉक्टर असती नामांकित । उपनाम जावडेकर असे ॥ ३७ ॥ त्याचे गृहामाजीं जाण । पुत्राचें होवोनियां लग्न । पातली असे नूतन । सूनबाई सदनासी ॥ ३८ ॥ दिवस न जाहले चार । जाहला पिशाच्चसंचार । ओळखे ना लहान थोर । अनिवार क्लेश होताती ॥ ३९ ॥ गृहामाजीं डॉक्टर । कळोनी येतांची सत्वर । परोपरीने उपचार । करोनियां पाहिले ॥ ४० ॥ परि ते सकल झाले व्यर्थ । क्लेश होती बहुत । उन्मत्त होऊनी सून बोलत । जाती घाबरोनी सकलही ॥ ४१ ॥ पिशाच्चवारा निघोनी जातां । मग तियेकडे पाहूं जातां । दिसोनी ये नम्रता । कुशलता बहु कार्याची ॥ ४२ ॥ तों एके दिनीं गृहांत । बसली कामकाज करित । तो पिशाच्चवारें अंगांत । संचरलें तियेच्या ॥ ४३ ॥ बोलाविले त्याच क्षणीं । दुजे डॉक्टर सदनीं । ते अवलोकिती निरखुनी । क्षणभर उभे राहोनियां ॥ ४४ ॥ औषध द्यावें तिजप्रती । म्हणोनी पेटी उघडती । तैं उग्ररूपें ती युवती । आली समोर धावोनियां ॥ ४५ ॥ जैशी वीज कडाडली । तैशी पिशाच्चरूपिणी सून बोलली । कासया ही कुपी भरली । औषधाची मज कारणें ॥ ४६ ॥ तुझ्या औषधाची किमया । सकल जाईल येथे वाया । तूं कोण मजला समजोनिया । औषध देण्या आलासी ॥ ४७ ॥ पाहिले तें उग्ररूप । डॉक्टरासही सुटला कंप । शब्द न बोलती कांही एक । जाती निघोनी तेथोनियां ॥ ४८ ॥ जेव्हा येतो समय कठिण । पैसा न करी काम जाण । तेव्हा गलित होय अभिमान । मीपणा तो मानवाचा ॥ ४९ ॥ साधुसंतांचा तिटकारा । कांहीं न मानी चमत्कारा । मग कैसा नमस्कारा । हात जोडोनी करील ॥ ५० ॥ विष्णूपंत आणवकर ।

तयांचे गृहीं जाती हे जावडेकर । तेथील समंध साचार । सांगती जावडेकरांसी ॥ ५१ ॥ वदती तुमच्या सुनेला । घेवोनी जावें माणगावाला । पिशाच्चबाधा जाहली तिला । वासुदेवमहाराजां शरण जावें ॥ ५२ ॥ मानवाचें चालेल काय । जाहला अखेर निरुपाय । माणगांवीं जावोनी पाय । महाराजांचे धरियेले ॥ ५३ ॥ स्नुषा केली उभी समोर । कथिला सकल प्रकार । तीर्थ शिंपिलें अंगावर । विभूति भालीं लाविली ॥ ५४ ॥ आणिक घातली मुखांत । पुडी एक बांधोनी देत । नित्य द्यावें इजसी तीर्थ । जपूनी ठेवावी शुद्ध स्थळीं ॥ ५५ ॥ आणिक पुढे सांगती । येईल जी कां दत्तजयंती । घेओनी यावें इजप्रति । ते दिवशीं या स्थलीं ॥ ५६ ॥ तीर्थ अंगारा घेतां क्षणीं । उमज येतसे तिजलागोनी । नमित असे चरण धरोनीं । सुवासिनी तिये वेळीं ॥ ५७ ॥ तैसेची डॉक्टर जावडेकर । करती महाराजां नमस्कार । निरोप घेऊनी नम्रोत्तर । जाते जाहले गृहासी ॥ ५८ ॥ तेव्हापासूनी तिज कदा । जाहली न पिशाच्चबाधा । धरोनियां मर्यादा । गृहामाजीं नांदत असे ॥ ५९ ॥ कर्मगति असे गहन । पुढे काय घडेल न जाण । वृथा वाहतो अभिमान । मानव आपुल्या मानसीं ॥ ६० ॥ झाले असे त्याच परी । दत्तजयंती ये सामोरी । अंगारा ठेविला जो देवघरीं । तो कोठेहि दिसेना ॥ ६१ ॥ अंगारा-शस्त्र हरपलें । पिशाच्चवारें श्रंगी भरलें । थैमान घालूं लागलें । छळूं लागलें सुनेसी ॥ ६२ ॥ ओळखेना कवणासी । मर्यादा ना राहिली मानसीं । विपरीत करी शब्दोच्चारांसी । धाबरोनी जाती सकळिक ॥ ६३ ॥ पुनरपि सत्वर गती । आणवकर-गृहासी जाती । तो ब्रह्मसमंध येऊनी पुढती । आवेशे काय वदतसे ॥ ६४ ॥ म्हणे जावें वाडीस । पार बांधवावा पिंपळास । एक सहस्त्र ब्राह्मणांस । भोजनासी घालावें ॥ ६५ ॥ ऐसें ऐकतां क्षणीं । अवसान गेलें निघोनी । तैसेच भूवरी बसोनी । भालीं हात लाविती ॥ ६६ ॥ येवढा खर्च करण्याप्रती । नव्हती सांपत्तिक स्थिति । स्नुषेची ही अनिवार गति । तीहि लोचनीं पाहवेना ॥ ६७ ॥ पूर्ण अभिमान गलित । नम्र होती शरणागत । माणगावीं जाऊनी त्वरित । वासुदेव-

चरणांवरी ॥ ६८ ॥ आसवें फुटती लोचनां । शद्ध मुखींचा निघेना । द्वय हस्त जोडोनी वंदना । पुढे उभे राहती ॥ ६९ ॥ भूत भविष्य वर्तमान । या त्रिकालांचें जयां ज्ञान । घेतलें अंतरंग ओळखून । भिऊं नको म्हणती ऐक बा ॥ ७० ॥ ना घालावें सहस्त्र भोजन । एक शत घालावें जाऊन । जाईल बाधा निघोन । सत्य सत्य ही वाचा ॥ ७१ ॥ निंदित्यासी न वाग्बाण । अपकर्त्यावरी उपकार पूर्ण । सर्वां सन्मार्गावरी जाण । आणूनिया ठेविती ॥ ७२ ॥ तैसेच हें अंतःकरण । असें मृदु मेणाहून । सकल अपराध पोटीं घालून । अल्प सेवा कथियेली ॥ ७३ ॥ ब्रह्मसमंध आज्ञांकित । कांही न आज्ञा उल्लंघित । देखतांचि मस्तक ठेवित । सद्गुरूंच्या चरणावरी ॥ ७४ ॥ म्हणोनी हें समर्थवचन । पाळिलें वाडीस जाऊन । घातलें शतब्राह्मणभोजन । जावडेकर डॉक्टरांनी ॥ ७५ ॥ विश्वास आणि दृढ निश्चय । हे मनीं ठैवोनी जाय । मग धरितां सद्गुरुपाय । सकल संकटें संपती ॥ ७६ ॥ संतकृपा झालियावर । विघ्नां भरे कापर । पळोनी जाती दूर दूर । उभी न राहती सावलीला ॥ ७७ ॥ तैसेंच येथे जाहलें । शत ब्राह्मण जेवले । बाईचें भूत गेलें । सौख्य लाभलें तियेसी ॥ ७८ ॥ ऐसे प्रसंग अगणित । ग्रंथाभीतरीं वर्णित । परि आणिक एक प्रचीत । आपण आतां परिसावें ॥ ७९ ॥ नित्य भरे दरबार । सुना न कधी दिसणार । किती एक येती नारीनर । श्रीगुरुदर्शनाकारणें ॥ ८० ॥ परि त्या मेळाव्यांतूनी । किती येती आर्तध्वनी । मोजूनी पाहता बोटांनी । एकहि सुखी दिसेना ॥ ८१ ॥ एक दारिद्ये पीडिला । दुजा संसारतापें तापला । कोणाचा रोग बळावला । कोणासी धरिलें पिशाच्चाने ॥ ८२ ॥ ऐकिलें होतें आजवर । रोग असती बहात्तर । परि वाढले अपार । वाटती शतपटीने ॥ ८३ ॥ ऐशी प्रत्यहीं करुण वाणी । रोज रोज येती नवी गाऱ्हाणीं । न त्रासिती ऐकतां कानीं । संतोष देतो सकळिकां ॥ ८४ ॥ निघाले जे एकदा बोल । ते कदा न होती फोल । एक उदाहरण अमोल । अवश्य ऐकावें ॥ ८५ ॥ राहती माणगावांत । एक सुखवस्तु गृहस्थ । परि संतती ना वाचत । उपाय बहुत करूनियां

॥ ८६ ॥ कितीएक केले नवस । कितीएक केले उपवास । परि नाही आलें यश । उदास असती सर्वदा ॥ ८७ ॥ रोग नाशक उपाय । आठवले सद्गुरूचे पाय । धाव घेवोनिया जाय । मिठी चरणांसी मारिली ॥ ८८ ॥ अति नम्रता धरूनी । सांगितली आपुली करुण कहाणी । ऐकतांच अंतःकरणीं । दया उपजली स्वामीच्या ॥ ८९ ॥ अंगी पिशाच्चबाधा वदती । म्हणोनी न वाचे संतती । त्यावरी उपाय सांगती । त्या गृहस्थासी स्वामी ॥ ९० ॥ मनीं विश्वास ठेवूनी । सांगितले उपाय केले त्यांनी । गेली पिशाच्चबाधा निघूनी । वाचूं लागलीं उपायें ॥ ९१ ॥ त्यांतूनिया एक सुत । जाहला असे रोगग्रस्त । पाहूं जातां या जगांत । पाहुणा थोडयाच दिवसांचा ॥ ९२ ॥ त्राण नसे किंचित । जाहला फार अशक्त । मायबाप चिंताग्रस्त । पुनः जाहले तेधवां ॥ ९३ ॥ वृद्ध आजीबाई गृहांत । तिने घेतलें नातवाप्रत । समर्थपदीं घालित । प्रार्थना ती करितसे ॥ ९४ ॥ महाराज तेधवा वदत । आजीबाई तुम्ही आहांत । जोपर्यंत या जगांत । तोंवरी बालका भय नसे ॥ ९५ ॥ ऐशी ऐकतां अभयवाणी । निर्धास्त होती सकल मनीं । कांही दिवस गेले निघोनी । काय पुढती जाहलें ॥ ९६ ॥ रोगें जाहला जर्जर । अस्थिपंजर जाहलें शरीर । काळाची येरझार । होऊं लागली त्याभोवतीं ॥ ९७ ॥ शेवटीं चलनवलनविरहित । पुत्र पडला निश्चेष्टित । निराश जाहले समस्त । बेसावध बाळ पाहतां ॥ ९८ ॥ महाराजांचें आश्वासन । मिळालें होतें त्याचें स्मरण । आजीबाईस होऊन । जाती झाली ती मंदिरीं ॥ ९९ ॥ म्हणे महाराज अभयदान । दिधलें पूर्वीच जें की आपण । तें आपुलें सत्य वचन । खोटें कैसें होईल ॥ १०० ॥ मागील प्रकार आणितां ध्यानीं । आठव जाहला असे मनीं । किंचित स्मित करोनी आजीबाईस बोलती ॥ १ ॥ आजीबाई चला जाऊं । काय होतें त्या बालका पाहूं । कांही औषध मात्रा देऊं । जाऊनिया गृहासी ॥ २ ॥ त्या रुग्ण मुलाजवळ जाऊन । नजर फिरविली सर्वांगावरून । घेतलें पाणी अभिमंत्रून । बालकावरी शिंपडिलें ॥ ३ ॥ तें अभिमंत्रित जल । संजिवनीच केवळ ।

स्पर्श होतांची तात्काळ । काळ परतला माघारीं ॥ ४ ॥ काढिला मृत्यूच्या मुखांतून । होऊं लागलें चलनवलन । पाहूं लागला डोळे उघडून । चरण कैवारी त्या स्वामींचे ॥ ५ ॥ आजार गेला निघोन । अशक्तता न दिसे त्यालागून । ऐशियापरीं अभयवचन । खरें करूनी दाविलें ॥ ६ ॥ ऐशा कितीएक अद्भुत घटना । घडती जगाच्या कल्याणा । याच्या आणिक उदाहरणां पुढील अध्यायीं पहावें ॥ ७ ॥ तरी आतां वासुदेवा । चरणीं भाव असावा । हाच एक द्यावा ठेवा । जानकीला दयाळा ॥ ८ ॥ इति श्रीसीतारामचरित्रालंकारमणी । गुंफिला असे दृष्टांतकोंदणीं । प्रकाश दाविता अंतःकरणीं । षोडश अध्याय गोड हा ॥ १०९ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

षोडशोऽध्यायः समाप्तः



अध्याय सतरावा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ ॐ नमो'जी श्रीरंगा । पंढरीच्या पांडुरंगा । पदी वाहते चंद्रभागा । नृत्य स्वच्छंदें करीतसे ॥ १ ॥ तुझें प्रांगण भाग्यवंत । नित्य राहटती जेथे संत । विठ्ठल विठ्ठल गर्जत । झाले पावन रजकण ते ॥ २ ॥ वाळवंटीं कीर्तनाचा रंग । राऊळी रंगे पांडुरंग । गुंग होवोनी सवेग । वीट सोडूनी जातसे ॥ ३ ॥ चंद्रभागे तुझें पवित्र जळ । स्नान करितां वाटे निर्मळ । अंतरींचाहि अन्तर्मळ । नाश पावे क्षणांत ॥ ४ ॥ पांतक्यासी नाठवे पंढरपूर । आळशी वदे गंगा दूर । तैसें माझें निरंतर होत आहे देवराया ॥ ५ ॥ पांडुरंगा तूं सदा डोळा । चंद्रभागे तुझ्या निर्मळ जळा । स्नान घालूनी ही अमंगळा । पवित्र करूनी घेईजे ॥ ६ ॥ मज व्हावें तुझें स्मरण । हेंच भाग्याचें लक्षण । करिशील प्रभो पावन । भरवसा पूर्ण मज असे ॥ ७ ॥ आतां पांडुरंगा स्मरूनी । चंद्रभागेच्या जलें पवित्र होऊनी । हातीं घेतली लेखणी । सतरावा अध्याय लिहिण्यासी ॥ ८ ॥ तरी सत्ताधीश देवाधिदेवा । कृपासागर वासुदेवा । तुझा आठव असावा । नित्य माझ्या हृदयांतरीं ॥ ९ ॥ सद्गुरु तूं ज्ञानदीपिका । तेजोमय प्रकाशिका । अज्ञान-काजळी कलका । नाहिशी करशील क्षणार्धे ॥ १० ॥ तुझा महिमा अपरंपार । जेथे वाचस्पतीहि शिणणार । चार्‍ही वेद घेती माघार । तेथ मी काय वदावें ॥ ११ ॥ तरी लेकरू बोलतें बोबड । तें माय मानिते किती गोड । पुरविते तयाचे कोड । अत्यानंदें करोनियां ॥ १२ ॥ तें मायलेकराचें नाते । ठेवावें सदया मनांत । तेणेंचि सधरु मी निश्चित । सदा राहीन अंतरी ॥ १३ ॥ असे विश्वास मनांत । श्रोतेयांसी विनवित । आणखी गुरुलीला अद्भुत । परिसावी या अध्यायीं ॥ १४ ॥ नव्हता पैका गाठीस । नव्हतें धान्य संग्रहास । नव्हता कशाचा हव्यास । अन्न वस्त्र पोटापुरतें ॥ १५ ॥ नित्याप्रमाणें एके दिनीं । निघती भिक्षेकारणीं । एका बाईचे सदनीं । दारापुढे

उभे ठेंले ॥ १६ ॥ भिक्षां देहि नामोच्चार । घुमला असे गृहांतर । उठली असे सत्वर । गृहातील कामिनी ॥ १७ ॥ घेतले अति निर्मळ । सूपभर तांदूळ । लगबगें पातली वेल्हाळ । यतीस भिक्षा वाढावया ॥ १८ ॥ सूपभर तांदूळ पाहून । पुसती त्या बाईलागून । तुम्ही भिक्षेकऱ्यालागून । एवढे तांदूळ देतां कां ॥ १९ ॥ तरी त्यांतील मूठभर घेऊन । द्यावे आम्हालागून । नको आम्हासी याविण । तुम्हाकडून अधिक कांही ॥ २० ॥ दत्तमंदिरासमोर । अकस्मात औदुंबर । वृक्ष निर्माण जाहला थोर । पार त्यावरी बांधिला असे ॥ २१ ॥ दत्त-पादुका तया स्थानीं । ठेविल्या अभिषेकाकारणी । तयावरी एके दिनीं । महाराज पूजना बैसले ॥ २२ ॥ भाविक कितीएक नारीनर । बसले असती चौफेर । दोन्ही जोडोनियां कर । श्री दत्त चरणकमलांसी ॥ २३ ॥ इबुक्यामाजी सवेग । काढोनियां आपुला मार्ग । महाविषारी भव्य नाग । महाराजांकडे धावला ॥ २४ ॥ जणुं लगबग करून । पातला दर्शनाकारण । अंगीचें करूनी आसन । फणा उभारूनी बैसला ॥ २५ ॥ परि इकडे धावपळ । मंडळी घाबरली सकळ । कोणी काढियेला पळ । गेले तडक ते स्वगृहीं ॥ २६ ॥ अंगाचें जाहलें पाणी । परी अंगी हिम्मत धरूनी । दूर दूर उभे राहूनी । समर्थासी विनविती ॥ २७ ॥ महाराज होते पहात । स्थिति दिसली कारुण्ययुक्त । परि वृत्ति निर्भय शांत । किंचित स्मित केलें असे ॥ २८ ॥ भयाचें कारण होय द्वैत । म्हणोनी लोक भय पावत । अद्वैत भावना दृढ मनांत । महाराजांच्या पूर्ण असे ॥ २९ ॥ त्रैलोक्य हें पुरुषोत्तम । हा साच जयाचा मनोधर्म । तेथे उदेला भाव सर्वात्म । वेगळेपण नसेची ॥ ३० ॥ ऐशी जयाची मनोवृत्ति । तेथे काय वसे भीति । प्रत्यक्ष काळ ये जरी पुढती । तरी शांतता पूर्ण नांदतसे ॥ ३१ ॥ भयभीत झालेल्या जनासी । बोलती हे ज्ञानराशी । काय कारण भ्यावयासी । यावें जवळी सकलांनी ॥ ३२ ॥ तुम्हा दिसे हा भुजंग । पातला जरी लागवेग । तरी तुम्हांसारिखाच हा नाग । आला दर्शनाकारणें ॥ ३३ ॥ परि मनींचें भय न ओसरे । कोणी न येती सामोरें । महाराज वदती बाबा रे । नागेन्द्रासी उद्देशूनी ॥ ३४ ॥

तुझें स्वरूप पाहूनी । भयभीत झाले अमती मनीं । तरी तूं दर्शन घेऊनी । आलिया मार्गे सरळ जावें ॥ ३५ ॥ आज्ञा समर्थांची पालन । झाली असे न लागतां क्षण । आपुली वाट धरून । नागेश निघोनियां गेला ॥ ३६ ॥ केवढी निर्वैर भावना । पाहतां आदर वाढला मना । आनंदाश्रू नयनां । सकलांच्याहि वाहती ॥ ३७ ॥ अहिंसा हा असे यम । पाळावा हा मनोधर्म । हें एकदा बिंबलें वर्म । निर्वैरता चौफेर ती असे ॥ ३८ ॥ हा स्वयें अनुभव । दावितांती वासुदेव । ही अमोल असे ठेव । हृदयीं सर्वांनी बाळगावी ॥ ३९ ॥ दैवी सामर्थ्य अपरिमित । सत्यत्व असे वाणींत । जे मुखाबाहेर शब्द येत । ते असत्य न होत कदापि ॥ ४० ॥ लोक कल्याण ही भावना । अखंड असे जागृत मना । म्हणोनी परोपकाराची कामना । अगणित होती स्वभावें ॥ ४१ ॥ त्यांतूनी पाठीराखा भगवंत । अखंड असती श्रीगुरुदत्त । त्यांचिये इच्छें सकल होत । हीच असे भावना ॥ ४२ ॥ कीर्ति वाढवावी हें ना मनांत । परि लोकसंग्रह जाहला अमित । दैवी संपदा संचित । कारण हेंचि एक असे ॥ ४३ ॥ एकदा माणगावांत । गुरुद्वादशीनिमित्त । श्रीदत्तात्रेय-मंदिरांत । उत्सव सुरु झाला असे ॥ ४४ ॥ दत्तस्थान हें जागृत । जाणताती जन समस्त । वास्तव्य करतो श्रीगुरुदत्त । एका महाराजांकारणें ॥ ४५ ॥ म्हणोनी उत्सवाकारणें । लोक जमती बहुसंख्येने । तैसाची या उत्सवानिमित्ताने । विराट जनसमुदाय जमला असे ॥ ४६ ॥ पुराण आणि कीर्तन । अनुष्ठान नामस्मरण । सकल कार्यक्रम संपन्न । जाहले सोल्लासें मंदिरीं ॥ ४७ ॥ आतां दश हजारांवर । प्रसाद मंदिरीं घेणार । पाकसिद्धि हो तयार । पंक्ती मांडिल्या अंगणीं ॥ ४८ ॥ तों पाहतां अकस्मात । नभ जाहलें मेघाच्छादित । सौदामिनीहि कडाडत । अंधार पडला चहूंकडे ॥ ४९ ॥ सकल होती चिंताक्रांत । कैशी होईल आतां गत । उठतील लोक उपोषित । जाईल अन्न तें वाया ॥ ५० ॥ आता उपाययोजना । कारणें कोणासहि सुचेना । जावोनी करिती प्रार्थना । हस्त जोडोनी सद्गुरुतें ॥ ५१ ॥ म्हणती ऐन वेळीं हा पर्जन्य । येईल वाटे कोसळून । तरी आपण स्वयें

दि गं ब रा दि गं ब रा

प्रार्थून । सांगावें हो तयासी ॥ ५२ ॥ आपुल्या त्या विनंतीस । मान देवोनी पाऊस । येणार नाही या वेळेस । भंरवसा पूर्ण आम्हासी ॥ ५३ ॥ स्मित महाराज करिती । सकलां उद्देशूनी बोलती । पर्जन्य प्रसाद घेण्याप्रती । येत आहे या समयीं ॥ ५४ ॥ तरी पाहतों सांगून । तुमची विनंति त्यालागून । एका पात्रावरी पूर्ण । नैवेद्य भव्य वाढावा ॥ ५५ ॥ तया नैवेद्य दाविल्यावर । तो नाही येणार । ऐसें ऐंकतांची उपदेशोत्तर । विलंब त्यासी काय असे ॥ ५६ ॥ अति त्वरेंकरून । नैवेद्य आणिला वाढोन । दाविला पर्जन्या लागून । त्याची प्रार्थना करूनियां ॥ ५७ ॥ नैवेद्य दाविलिया । बरोबर । काय आश्चर्य जाहलें थोर । एका क्षणात सत्वर । निरभ्र आकाश जाहलें ॥ ५८ ॥ मुसळधार पर्जन्याचें ठाण । अभ्रीं कोंदलें आघवें गगन । परि न त्याचें राहिलें निशाण । हें सामर्थ्य समर्थाचें ॥ ५९ ॥ काय वाणीचा अधिकार । ताबा पंचमहाभूतांवर । भोजनें जाहलीं समग्र । आनंदाने सकलांचीं ॥ ६० ॥ देवस्थान हें जागृत । असे आपणांसी श्रुत । कोणतेंहि तेथ अनुचित । होतां तात्काळ कळोन ये ॥ ६१ ॥ अशौच अपवित्रता । मंदिरामाजीं दिसोन येतां । साक्षात्कार होय देता । महाराजांस श्रीदत्तगुरु ॥ ६२ ॥ प्रातःकाळीं श्रीगुरुपूजन । षोडशोपचारांनी सारून । मग पुष्पमाला करीं घेऊन । कंठामाजी घातली ॥ ६३ ॥ तों कानावरी सूत सूत । मूर्तीतूनी शब्द येत । काढूनी टाकिली माला त्वरित । ऐकतां महाराज दचकले ॥ ६४ ॥ विचारांतीं ये कळोनी । चूक काय ती झाली मनीं । हारावरी न घातलें पाणी । तैसाचि गळा घातला असे ॥ ६५ ॥ हार काढोनी जंव पाहत । त्यामाजी असे सूत । तें कोरडें दिसोनी येत । काढून टाकिलें त्या क्षणीं ॥ ६६ ॥ श्रीदत्त-मंदिरासमोर । जो औदुंबर वृक्ष थोर । त्यासी शिवूं नये साचार । हेंचि सांगणें नित्य असे ॥ ६७ ॥ तों एकदा अमंगळ मुलांनी । स्पर्श केला वृक्षालागोनी । तों चमत्कार त्या क्षणीं । काय जाहला असे पहा ॥ ६८ ॥ तितुक्यामाजी येऊनी । चावा घेतला भुजंगांनी । बेसावध होऊनी । मुलगा पडला त्या स्थलीं ॥ ६९ ॥ महाराजांचे आवारांत । होता म्हणूनी ना प्राण जात ।

श्री पा द व ल्ल भ दि गं ब रा

हें महाराज जंव पाहत । तंव प्रार्थिती श्रीगुरूसी ॥ ७० ॥ मुलगा आला शुद्धींत । गेला आपुल्या गृहाप्रत । प्रभूसंगें सख्य खचित । याविण आणखी काय हवें ॥ ७१ ॥ एकदा दूरच्या गावांत । आप्तेष्ट स्त्री जाहली मृत । श्रीसीताराममहाराज तेथ । असती त्या समयासी ॥ ७२ ॥ माणगावीं दत्तपूजन । कार्यक्रम राहतील म्हणोन । नाही कळविले वर्द्धमान । सीताराममहाराजांनी ॥ ७३ ॥ इकडे दत्तजयंतीचे कार्यक्रम । ठरले असती उत्तम । देवळामाजी धामधूम । चालली आदरें भाविकांची ॥७४॥ कवणासीच नव्हती कल्पना । महाराज जातांची स्नाना । नित्यासम दत्तपूजना । मंदिरामाजीं पातले ॥ ७५ ॥ तोंच शिवाशिव म्हणोनी । शद्ध ऐकिले तेव्हा कानीं । अर्थबोध ना होवोनी । पुढती पाऊल टाकिलें ॥ ७६ ॥ पुनः तेच शद्ध कानीं । घुमले स्पष्टत्वें करोनी । महाराजांनी त्याच क्षणीं । मागे पाऊल घेतलें ॥७७॥ तुम्हासी अशौच झालें प्राप्त । स्वयें सांगती श्रीगुरुदत्त । तरी उत्सवादि कार्य मंदिरांत । करूं नये एकहि ॥ ७८ ॥ श्रीगुरुंच्या आज्ञेकरूनी । एकहि कार्य न केलें त्यांनी । विचारांतीं आलें कळूनी । निधन आप्त स्त्रियेचें ॥ ७९ ॥ इकडे अशौच संपवूनी । सीताराम बंधू आले परतूनी । कल्पना वसे त्यांचे मनीं । उत्सव कार्य झालें असेल ॥ ८० ॥ परि आलें कळोन । माणगावींचे वर्तमान । खेद पावलें तयांचें मन । आपण चुकलों म्हणोनियां ॥ ८१ ॥ जयांची दिव्य दृष्टि त्रैलोक्यांत । त्यांचे समोर काय लपोनी राहत । तो प्रत्यक्ष श्रीगुरुदत्त । येथे असे बसलेला ॥ ८२ ॥ कितीहि मानवाचा अधिकार । कितीहि वाढला व्यवहार । परि शास्त्रसंमत मर्यादा समग्र । पाळल्याच पाहिजेत ॥ ८३ ॥ म्हणोनीच ज्येष्ठ श्रेष्ठ जन । तयांवरी जबाबदारी असे पूर्ण । त्यांचेंचि अनुकरण । इतर जन करिताती ॥ ८४ ॥ ईशप्रेरणे कारण । शास्त्रें झालीं जीं निर्माण । तीं पाळावया पूर्ण । परमेश्वरहि दक्ष असे ॥ ८५ ॥ याचीं कितीएक उदाहरणें । श्रीगुरु देती भक्तांकारणें । ग्रंथ वाचितां निश्चयाने । श्रोतेयांसी भावतील ॥ ८६ ॥ एकदा एक विप्रभगिनी । भूतबाधेने जर्जर होवोनी । दत्तसेवा घडावी म्हणोनी । आली

असे माणगावासी ॥ ८७ ॥ करोनी नमन महाराजांना । सांगितली आपुली विवंचना । म्हणती घालाव्या प्रदक्षणा । श्रीदत्तमंदिरासी ॥ ८८ ॥ समर्थांची आज्ञा मानूनी । प्रातःकाळीं स्नान करोनी । प्रदक्षिणा घाली आदरें करोनी । न विसंबे कदापि ॥ ८९ ॥ पिशाच्चवारें अंगीं वसे । आचार-विचार राहिला नसे । प्रदक्षिणा घालितां दुर्भाग्यवशें । रजस्वला ती जाहली ॥ ९० ॥ मूर्ख स्त्री ती मूढमती । तैशीच प्रदक्षिणा होय घालती । तो तत्काळ मंदिराप्रति । चमत्कार दिसून ये ॥ ९१ ॥ मंदिराच्या गाभाऱ्यात । निर्मळ शुद्ध जागेंत । साप विंचू फिरत । द्वारा आडवे होवोनियां ॥ ९२ ॥ महाराज जेव्हा पाहती । कारण तात्काळ ओळखती । विधिपूर्वक शुद्धता करिती । गाभाऱ्यासहित आवाराची ॥ ९३ ॥ तेव्हाच जाती निघोनी । साप विंचू तेथोनी । येईल आपणा कळोनी । पावित्र्य काय त्या मंदिराचें ॥ ९४ ॥ मंदिरामाजी दर्शना जातां । गृहीं देवपूजन करितां । किती राखावी निर्मळता । पवित्रता अंतर्बाह्य ॥ ९५ ॥ आंत घाण ठेविली झाकून । वरी वस्त्र नेसलें नूतन । परि दुर्गंधी ना लपून । परमेश्वरापुढे राहतसे ॥ ९६ ॥ गृहामाजीं देवघर । ग्रामांतील मंदिर । जप-तप-अनुष्ठानादिक कर्में थोर । येथे पवित्रता पाहिजे ॥ ९७ ॥ तेथेचि वसे परमेश्वर । तेथेचि होती साक्षात्कार । तेथे खोटें ना खपणार । ज्ञानी योगी जनांसी ॥ ९८ ॥ एक दिसे मानवजात । तरी विजातीय भिन्नत्व तींत । रक्तवर्ण जरी एक दिसत । तरी गंध वेगवेगळाची ॥ ९९ ॥ एकचि असे रक्तवर्ण । म्हणों जरी अभिन्न । मग तेथे वेगळेपण । कांही एक न राहे ॥ १०० ॥ परि वैद्यकतज्ञासी सुलभता पूर्ण । आली असती दिसोन । परि ती न ये आढळून । शोधणें पडे त्याजला ॥ १ ॥ मानवाच्या शरीरांतून । निघे जो गंध भिन्न भिन्न । याचें सूक्ष्म असे ज्ञान । शिकारी श्वानाची ॥ २ ॥ काढी तस्कराची ओळखून । मृत्तिकेंतील पाऊलें हुंगून । केवढें हें सूक्ष्म ज्ञान । आज प्रत्यया येत असे ॥ ३ ॥ हें सांगावयाचें कारण । श्रीगुरु आणि परमेश्वरापासून । राहूं न शके कांही लपून । तत्त्व चित्तीं धरावें हें ॥ ४ ॥ म्हणोनी या माणग्रामीं ।

दत्तस्थान पुण्यभूमी । तेथे वासुदेवानंदस्वामी । सद्गुरु सदा जागृत ॥ ५ ॥ एकदा एक स्त्री परगावाहून । आली दत्तदर्शनाकारण । प्रातःकाळीं करावया स्नान । गेली तेथील आडावरी ॥ ६ ॥ होते जे कां अंगावर । सुवर्णाचे अलंकार । ते काढोनी ठेविले बाहेर । वस्त्राखालती झाकोनियां ॥ ७ ॥ कवणासी असे हौस । कोणी येती फेडावया नवस । कांही गवसलें पाहावयास । कोणी येती मंदिरीं ॥ ८ ॥ तैशीच दुजी एक स्त्री येऊन । बैसली बकध्यान लावून । तिने देखिले दुरून । दागिने काढून ठेविलेले ॥ ९ ॥ परवस्तू चोरावया देख । अखंड लाविला असे रोख । तो अविवेकी महामूर्ख । पापासी कदापि ना भिये ॥ ११० ॥ मी आहे कवण्या जागीं । हेंहि नेणे तो अभागी । भरली पातकाची शिगी । साखळ्या पडतील करासी ॥ ११ ॥ त्यांतूनी पूर्वार्जित थोर । कवणाचें जरी असणार । तयाशीच भेटणार । मोक्षदाते सद्गुरु ॥ १२ ॥ तेंवि ही स्त्री तस्कर । चुकवोनी बाईची नजर । दागिने घेऊनी सत्वर । गेली आपुल्या गृहासी ॥ १३ ॥ खड्डा करोनी दोन फूट । दागिने ठेविले त्यांत नींट । साळसूद ही असे धीट । कार्य आपुलें करीत असे ॥ १४ ॥ इकडे त्या बाईने करूनी स्नान । मुखाने चालतां नामस्मरण । लुगडे चोळी नेसोन । कुंकुम भाळीं लाविलें ॥ १५ ॥ मग दागिने ठेविले होते जेथ । तें वस्त्र उचलोनी जंव पाहत । तों तेथे न कांही दिसत । भयचकित ती झाली असे ॥ १६ ॥ चोहोकडे सैरावैरा । पाहत फिरे गरगरा । जीव जाहला घाबरा । म्हणे आतां मी काय करूं ॥ १७ ॥ शोध करूनी पाहत । परी थांग न कांही लागत । शेवटी जाऊनी पाय धरित । श्रीवासुदेवमहाराजांचे ॥ १८ ॥ आक्रोशें करी रुदन । वृत्तांत सांगे गहिवरून । म्हणे पै पै करून । अर्थ हा मी जमविला ॥ १९ ॥ गृहींचे बोलतील वर्मीं । म्हणतील मोठी नेमधर्मी । आतां काय करूं स्वामी । दागिने कैसे मिळतील ॥ १२० ॥ महाराज म्हणती तिज लागून । बाई करूं नको तूं रुदन । आज सायंकाळपर्यंत जाण । दागिने तुझे मिळतील ॥ २१ ॥ महाराजांनी काय केलें । देवगणांसी पाचारिलें । शोध करावयासी कथिलें । बाईच्या त्या

दागिन्याचा ॥ २२ ॥ आज्ञांकित ते न लागे वेळ । ठाउकें त्यांना नेमकें स्थळ । प्रवेशले ते तात्काळ । जाऊनी सदनीं बाईच्या ॥ २३ ॥ रूप धरिलें भेसुर । अति विक्राळ भयानक घोर । तस्कर बाईच्या समोर । उभे राहिले जाऊनी ॥ २४ ॥ जाहली असे भयग्रस्त । नेत्र मिटुनीं भूवरी पडत । परि आंतूनी जाणीव होत । आपुल्या चौर्यकर्माची ॥ २५ ॥ शद्ध न ये मुखांतूनी । निघाली पळत तेथोनी । येवोनी महाराजांच्या सदनीं । उभी राहिली द्वारासी ॥ २६ ॥ बाईस पाहिलें महाराजांनी । चोर ती ओळखिलें त्या क्षणीं । म्हणती सत्वर गृहाप्रति जाऊनी । घेउनी येई ते दागिने ॥ २७ ॥ पाठीशी खडा पोलिस । भयानक तो गण पुरुष । परतली आपुल्या सदनास । दागिने घेतले पुरलेले ॥ २८ ॥ ठेविले स्वामीपुढे आणून । आणि घट्ट चरण धरून । म्हणे माझा अपराध पूर्ण । क्षमा करावी महाराज ॥ २९ ॥ दोष भरले अनंत । त्याचें न करितां ये गणित । अनन्य भावें शरणागत । आलें असे मीं स्वामियां ॥ १३० ॥ पश्चात्ताप झालियाविना । सद्गुरु त्यातें मिळेना । हें वाचितां पुराणा । आढळोनी येतसे ॥ ३१ ॥ आबालवृद्ध समस्त जन । सकल मानित प्रमाण । वाल्मिकीचें उदाहरण । दृष्टीसमोर राहतसे ॥ ३२ ॥ शरणागता तारणार । हा गुरूचा अधिकार । दिसे निर्मळ हृदयांतर । अभयदान तिये मिळे ॥ ३३ ॥ भय गेलें निरसोन । निघोनी गेले देवगण । सत्पुरुषांचें होतां दर्शन । किल्मिष सकल पळालें ॥ ३४ ॥ दागिने मिळाले जिचे तिला । विनम्र जाहली श्रीदत्तात्रेयाला । तैशीच महाराजांच्या चरणकमलां । जाती जाहली स्वगृहासी ॥ ३५ ॥ विकल्पधुराळा उडाला । सोडिलें निंद्य कर्माला । प्रभुपदीं भाव स्थिरावला । दुज्या बाईचा अखंड ॥ ३६ ॥ महाराज असतां माणगावांत । दूरदूरोनी लोक येत । कितीएकांचीं कार्यें होत । जाती दर्शन घेऊनियां ॥ ३७ ॥ मुके ते लागती बोलावया । पांगुळ लागे चालावया । मूढ ते वाचस्पती होवोनियां । पावन होती दर्शनें ॥ ३८ ॥ कोणासी नाना उपाधी । कोणासी पिशाच्च बाधी । कोणी गांजिले जाती समंधीं । सकल मुक्त ते होती ॥ ३९ ॥ पहा पंचमहाभूतें । त्यांवरी गुरूंची सत्ता चालते । तैसे व्याघ्रसिंह

आज्ञेतें । भुजंगादिकहि पाळिती ॥ १४० ॥ माझ्या तर्क बुद्धीच्या बाहेर । असती हे ज्ञानसागर । तेथे मी काय लिहिणार । अल्प बुद्धि माझी असे ॥ ४१ ॥ या तीन अध्यायांत । सद्गुरुमहती वर्णिली किंचित । आतां ओघ बाढेल बहुत । सागरासम सद्गुरुलीलेचा ॥ ४२ ॥ आतां श्रीवासुदेवमहाराजचरणां । जानकीची एक प्रार्थना । पुढील अध्यायीं सुरस रचना । होवो आपुल्या कृपेने ॥ ४३ ॥ इति श्रीसीतारामचरित्रालंकारमणी । गुंफिला असे दृष्टांतकोंदणीं । प्रकाश दाविता अंतःकरणीं । सप्तदश अध्याय गोड हा ॥ १४४ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

सप्तदशोऽध्यायः समाप्तः ।

अध्याय अठरावा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ ॐ हें अक्षर । त्यांत व्यापिलें चराचर । अनेक नामरूपांनी परमेश्वर । नटोनी असे राहिलेला ॥ १ ॥ त्याचें कोणतें कारण । जो अनंतसाक्षी अनंतनयन । अनंत जीवात्मांचें आत्मज्ञान । त्यासी असे ठाउकें ॥ २ ॥ जितुक्या जितुक्या मानवी व्यक्ती । तितुक्या तितुक्या प्रकृती । प्रकृतीसमान भावभक्ति । वेगळाली ती असे ॥ ३ ॥ म्हणोनी बा निर्गुणा । आम्हांस्तव जाहलासी सगुणा । प्रभो तूं नारायणा । दयाघना ईश्वरा ॥ ४ ॥ तीं सगुण रूपें नयनीं पाहावीं । तरी दृष्टि नाही बरवी । कैशी गोचर व्हावी । हें दुर्भाग्य पूर्व जन्मींचें ॥ ५ ॥ जरी अनंत नामें आळवावें । तरी नामांसी त्या ना ठावें । तरी प्रभो कैसें काय करावें । हेंहि कळेना मजलागीं ॥ ६ ॥ येतो आठव कधी मनीं । कधी मधीं निशिदिनीं । तेंचि नांव येई वदनीं । श्रीगुरुदत्तात्रेयाचें ॥ ७ ॥ तें नाम असे अति सदय । उच्चार करतां वाटे निर्भय । श्रीसद्गुरुदत्तात्रेय । सदा रक्षण करो माझें ॥ ८ ॥ तीच माझी गुरुमाउली । करील कृपेची सावली । बसवेल मजला निज स्थळीं । हा असे मज भरवसा ॥ ९ ॥ सद्गुरुमहिमा अपरंपार । किती खोल तो ज्ञानसागर । तेथे काय मी पोहून जाणार । काठावरीच उभी असे ॥ १० ॥ तुज एवढीच प्रार्थना । दिव्य दृष्टि दे बा नयना । सीतारामचरित्रा गहना । उकलोनी दावी झडकरी ॥ ११ ॥ स्मरा पूर्वीचें कथानुसंधान । श्रीवासुदेवमहाराज जाती सोडून । परि त्यांचा विरह जाण । परि अज्ञान उल्लंघिलें असे ॥ १२ ॥ सहजगतीं हो चमत्कार । त्याने होत असे जनोद्धार । हें मागील तीन अध्यायीं सविस्तर । अल्प मतीने कथिलें असे ॥ १३ ॥ आतां चरित्रानुसार जाऊं । श्रीसीताराममहाराजांचे सवें राहूं । सद्गुरुमहिमा नित्य गाऊं । स्वैर चाखूं निजानंद ॥ १४ ॥ सद्गुरुविरह सीतारामा । जाहला तैसाची सकल ग्रामा । आतां ज्ञानोपदेश आम्हा । कोण कैसा करील ॥ १५ ॥ निघाले

होते हे दोन्ही साधू । परि त्यांत जाहला आनंदू । राहिले हे आज्ञेनुसार बंधू । सिताराम महाराज ॥ १६ ॥ लेंकरासी वळण लावावया । कोण लागतें सांगावया । ती एक सांगते माया । बरे वाईट सकलहि ॥ १७ ॥ सद्भावना प्रेममूलक । असे इच्छा हार्दिक । करी कर्तव्य आपुलें चोख । नेत्रीं तेल घालोनियां ॥ १८ ॥ कर्ता पुरुष कारभारी । असे जो कां मुख्य घरीं । त्याच्यावरी जबाबदारी । चांगुलपणाची सर्व असे ॥ १९ ॥ प्रजेसी लावावयाचें वळण । हें राजयाचें कर्तव्य जाण । आचार-विचार-संपन्न । जसा राजा तशी प्रजा ॥ २० ॥ असती थोर साधू संत । जोगी-योगी जगविख्यात । त्यांनी जनकल्याणार्थ । आपुला देह झिजविला ॥ २१ ॥ तेंवि या माणग्रामांत । असती अवतारी पुरुष श्रीगुरुदत्त । ग्रामवासी जन भाग्यवंत । सहवास त्यांचा लाभला असे ॥ २२ ॥ तेंवि या माणग्रामात । अंशावतार श्रीगुरुदत्त । जन्मले ह्या पुण्यभूमींत । सहवास किती-कां घडलासे ॥ २३ ॥ मायबापांचे हृदय । स्वपुत्रासाठी असे सदय । तैशीच ही गुरुमाय । बोधामृत लोकां पाजीतसे ॥ २४ ॥ ऐशी माय गेली दूर । मग विरह कां न होणार । तेथे सीताराम सहोदर । त्यासी वियोग न साहवे ॥ २५ ॥ वत्स ठेवूनी गोठणीं । धेनू जात असे रानीं । आठव येतां हंबरोनी । भिरी भिरी पाहतसे ॥ २६ ॥ तेंवि सीताराम बंधू सान । वियोग न होय जेव्हा सहन । तेव्हा स्फुंदस्फुंदोनी करिती रुदन । एकीकडे जाऊनियां । २७ ॥ परि कर्तव्य श्रेष्ठ समजून । मनासी धरती आवरून । नियमित कार्यांतें न चुकती जाण । आखलेल्या महाराजांनी ॥ २८ ॥ श्रीवासुदेवकृत आत्मोपदेशश्रवण । अनन्यभावें केलें मनन । तेणें ज्येष्ठ बंधूसम आत्म-ज्ञान । सीतारामा पूर्ण लाभलें असे ॥ २९ ॥ मी असंग आणि निर्गुण । मी ब्रह्मची आहे पूर्ण । अपरोक्ष ब्रह्मसाक्षात्काराचें बळ पूर्ण । त्यांचें अंगीं आलें असे ॥ ३० ॥ तेणें शोकमोहरूपी जाळ्यांतून । षड्विकार दूर लोटून । संसारबंधनांतून । सदा मुक्त ते असती ॥ ३१ ॥ जैसे हरि आणि हर । यांत भेद ना अणुभर । तैसी ही गुरुशिष्यांची जोडी थोर । अनुभव दोघांचा एकचि

असे ॥ ३२ ॥ ते आत्मानुभवाने निर्गुण । परि गुणमय देह केला धारण । जैसे वासुदेव तपोधन । तैसेच हे सीताराम महाराज ॥ ३३ ॥ गुरुआज्ञा मातृआज्ञा । तशीच वडील-बंधु-आज्ञा । नाही केली अवज्ञा । या सान सीतारामाने ॥ ३४ ॥ शास्त्रामाजी जो जो धर्म । पुत्रधर्म बंधूधर्म । शिष्यधर्म स्वधर्म । कधी न सोडिला तो तयाने ॥ ३५ ॥ बंधूची आज्ञा प्रमाण । जावें न कोठे गृह सोडून । म्हणूनी सदनींच राहून । स्वधर्म सकल पाळिला ॥ ३६ ॥ आपुलें शुद्ध आचरण । ठेवुनी जनतेशी शिकवण । उपदेशामृत पाजून । धर्मनिष्ठ केलें असे ॥ ३७ ॥ देवद्विजांसी देती मान । गुरुभावनेने आले शरण । त्यांचीं दुरितें निवारून । समाधान करिती सकळांचें ॥ ३८ ॥ तैसेच पुढती कितीएक । निवारण करिती भयशोक । सुखी केले किती लोक । अनुक्रमें कळों येईल ॥ ३९ ॥ तबला-पेटी-वादन । सुस्वर गळा गायन । आवडीने प्रभुगुणगान । आळवीती प्रेमभरें ॥ ४० ॥ तिन्ही त्रिकाल करुनी स्नान । संध्या पूजा गुरुचरित्रवाचन । नैवेद्य वैश्वदेव इत्यादि कर्में जाण । नियमितपणें चालती ॥ ४१ ॥ आपुल्या रमामाउलीस । सदा शांतवावें हें मानस । म्हणोनी महाराज रात्रंदिवस । मधुर भाषणें तोषवीती ॥ ४२ ॥ तेणेंचि वासुदेवविरह विसरून । जाईल आई हें समजून । मातृआज्ञा उल्लंघन । कधी न केली असे ॥ ४३ ॥ असे आवडी पहिल्यापासून । नित्य उंची कपडे नवीन । ती आजहि असे पूर्ण । सीतारामम्हाराजांना ॥ ४४ ॥ देहप्रारब्धानुसार सत्पुरुषांना । आवडी बेगळी दिसे मना । चालरीती वेगळी जना । दिसोनियां येत असे ॥ ४५ ॥ बहिरंगी जरी वेगळे दिसती । तरी आत्मरंगीं रंगले एक असती । आत्मबोधीं दिव्य शक्ति । मुक्ति तेथे उभी असे ॥ ४६ ॥ महाराज आपुल्या समान । जमवूनी मित्र तरुण । प्रचलित खेळ खेळती जाण । अनेक देवादिकांचे ॥ ४७ ॥ कधी सान लेकरांमध्ये मिसळून । खेळावें तत्समान । थोर वृद्धांचा ठेवुनी मान । करावें भाषण त्यांच्या सवें ॥ ४८ ॥ केलें प्रेम संपादन । माणगावीं सकलांचें जाण । वडीलबंधूसमान । देती मान सकलही ॥ ४९ ॥ अशा प्रकारें पांच वरुष । ग्रामस्थांस देती संतोष । मंदिरीं आणि गृहीं कार्यास ।

नियमितपणें चालवीती । ५० ॥ कमलपत्र पाण्यांत । परि सदा असे तें अलिप्त । तैसे प्रपंचीं अमासक्त । असती सीताराम सर्वदा ॥ ५१ ॥ आपुली जी जन्मदात्री । निष्कपट प्रेममूर्ति । त्या मातृदैवताची भक्ति । सेवायुक्त केली असे ॥ ५२ ॥ गुरुआज्ञापालन । पांच वर्षें झालीं पूर्ण । मातृसेवा केली जाण । परि अंतरीं यातना वेगळ्याची ॥ ५३ ॥ एवढा काळ भासला जाण । एका युगासमान । आता लक्ष लागलें पूर्ण । एका श्रीगुरुचरणांकडे ॥ ५४ ॥ श्रीदत्तात्रेय सगुण साक्षात । श्रीदत्तात्रेयचि भगवंत । वडील बंधू श्रीगुरुनाथ । भेटतील ते मज कधी ॥ ५५ ॥ आता न धरवे धीर । मना न पडे आवर । झाले असती अधीर । गुरुचरण पाहावया ॥ ५६ ॥ कधी माझे ऐकतील श्रवण । माझी गुरुमाउली दयाळू पूर्ण । भल्या भल्या कौतुकपूर्ण । हांक कधी मारील मशीं ॥ ५७ ॥ त्यांच्या दिव्यवाणी मुखांतून । निघेल बोधवचन । कधी होईल मजला श्रवण । तळमळ मनीं लागली ॥ ५८ ॥ लागली सारखी विवंचना । वासुदेवा नारायणा । दाखविशील कधी नयना । तुझ्या चरणकमलासी ॥ ५९ ॥ माणगावीं शरीर । मन गेलें असे बाहेर । करीतसे शोधांतर । श्रीगुरुचरणकमलाचे ॥ ६० ॥ अंतरीं झाला असे सर्व त्याग । मना लागली तगमग । मन धावूं लागलें सवेग । किती एक योजनें क्षणामजीं ॥ ६१ ॥ म्याच स्वीकारिल्या कर्तव्यपाशांतून । कधी जाईन सुटून । श्रीगुरुपदांबुज पहावया मार्ग धरून । सुदिन कधी उगवेल ॥ ६२ ॥ अति उत्कंठा आणि ध्यास । लागला सीतारामास । कधी वंदीन पदकमलास । श्रीवासुदेवमहाराजांच्या ॥ ६३ ॥ आजपर्यंत लौकिकानुसार । केला असे व्यवहार । घरी आणि बाहेर । मंदिरीं नियम पाळले ॥ ६४ ॥ आता अंतरंगत्यागाबरोबरी । बहिरंगत्याग हो सामोरी । विवेकबुद्धि मात करी । पूर्ण विकास होवोनियां ॥ ६५ ॥ नाही त्यागावाचून । परमामृताचा लाभ जाण । अन्य कोणतेंहि साधन । येणार नाही उपेगा ॥ ६६ ॥ पुत्र दारा आणि कांचन । लौकिकार्थ आणि देहरक्षण । दिधलें होतें झुगारून । आसक्ति नसे कशांतहि ॥ ६७ ॥ हें आघवें परमार्थीं प्रतिकूल । षड्रिपू भवतीं जमतील ।

पुढती म टाकूं देतील । पाऊल एकहि सन्मार्गीं ॥ ६८ ॥ हें सीताराममहाराजांनी । ओळखिलें होतें पूर्ण मनीं । सर्वस्वाचा त्याग म्हणूनी । केला असे पूर्णत्वें ॥६९॥ मित्रप्रेम बंधुप्रेम । ग्रामबांधवावरील प्रेम । रागसंगीतावरील प्रेम । उरलें न कांही अंतरीं ॥ ७० ॥ रमा माउली असे जननी । तिचाहि मोह ना अंतःकरणीं । काय विरक्तता मनीं । स्वदेहासी विसरती ॥ ७१ ॥ जे पुरुष शूर वीर । जाती रणांगणावर । असती उदार जीवावर । पर्वा न देहगेहाची ॥ ७२ ॥ थोरांची वचनोक्ति पाही । देही असोनीं विदेसी । तीच अवस्था आज ही । सीताराममहाराजांची ॥ ७३ ॥ मानवजन्माची सार्थकता । करोनियां घेण्याकरितां । तोडोनी सकल माया ममता । निघाले असती गृहांतूनी ॥ ७४ ॥ भगवें वस्त्र केलें धारण । तापसी वेष घेऊन । मातेसमोर येऊन । प्रवासी हा उभा असे ॥ ७५ ॥ द्वय हस्त जोडून । रमा माउलीस केलें वंदन । म्हणती आई मजलागून । आज्ञा दे प्रवासाकारणें ॥ ७६ ॥ माझे ज्ञानदाते सद्गुरु । वासुदेवमहाराज कल्पतरू । तळमळ लागली काय करूं । त्यांच्या भेटीची मज आतां ॥ ७७ ॥ न धरवे मशीं धीर । उलो पाहे अंतर । माते येथे क्षणभर । चैन मज पडेना ॥ ७८ ॥ माता वदे काय त्याला । अरे वासुदेव जेव्हा गेला । तेव्हा तुज किती बोध केला । तो विसरलास काय तूं ॥ ७९ ॥ केवढें दिव्य तें ब्रह्मज्ञान । त्याची करितां आठवण । मग शांतता पावेल मन । नको जाऊं तूं बाहेरीं ॥ ८० ॥ यावरी सीताराम वदत । माते मजसमान तुजप्रत । किती पाजिलें ज्ञानामृत । श्रीवासुदेवरायांनी ॥ ८१ ॥ तरी विरह तुज साहवेना । किती होताती यातना । अश्रू ढाळिसी नयनां । क्षणोक्षणीं काय बरें ॥ ८२ ॥ अरे आमुच्या स्त्रीजातीस ज्ञान । कोठून असेल संपूर्ण । अपवाद एखादी जाण । असेल ब्रह्मवादिनी ॥ ८३ ॥ जरी ऐशी कथा ऐकिली कानीं । तरी अधिकार नसे सर्वांलांगूनी । तरी ग्रहणशक्ति अंतःकरणीं । सीतारामा नसे बा ॥ ८४ ॥ माते स्त्रीजातीच्या कशास गोष्टी । पुरुष असती कोटी कोटी । त्यांतील किती ज्ञानजेठी । सांग मजसी जाहले ॥ ८५ ॥ जैसी एखादी स्त्री ब्रह्मज्ञानिनी ।

तैसाच ब्रह्मनिष्ठ एखादा ज्ञानी । हें श्रवण करितां पुराणीं । उदाहरणें आढळतील ॥ ८६ ॥ कोणी एखादा लक्षावधींत । ज्ञानमार्गीं जाऊं पाहत । त्यांतूनहि एखादा भाग्यवंत । ब्रह्मपदीं पोहोचत असे ॥ ८७ ॥ शिष्यालागीं ब्रह्मज्ञान । सांगती श्रीगुरुदयाघन । परि तो अधिकारानुसार जाण । अशतः ग्रहण करीतसे ॥ ८८ ॥ सद्गुरु सम ब्रह्मज्ञान । अंगीं बिंबेल परिपुर्ण । यास किती कालमान । लागेल सांगतां येईना ॥ ८९ ॥ पुनरपि मातेची तीच उक्ति । स्त्रियांहूनी पुरुषाप्रति । अधिक असे ग्रहणशक्ति । यांत संशय असेना ॥ ९० ॥ हें म्हणणें असेल किंचित । तुझें माते सत्य । परि त्यामाजीं यथार्थ । विचार केला पाहिजे ॥ ९१ ॥ शक्ति बुद्धि आत्मज्ञान । ब्रम्हविद्या सौजन्य । दृढ निश्चय भगीरथ प्रयत्न । मोलें काय मिळतील ॥ ९२ ॥ असे स्वपुत्रासाठी दया । एक मातेच्याच हृदया । तेथे कांही उपाया । किमया करणें न कांही पडे ॥ ९३ ॥ कढ नाही आगीवाचूनी । रडें न ये मायेवाचूनी । तेंवि आवडीवाचूनी । आत्मज्ञान न होतसे ॥ ९४ ॥ चिऊकाऊच्या काय गोष्टी । या सांगाव्या लेकरांच्यासाठी । येथे अनुताप पोटीं । पूर्ण जाहला पाहिजे ॥ ९५ ॥ माझे श्रीगुरुदयाघन । निरुपम उदार ज्ञानी पूर्ण । केला ज्ञानोपदेश मजलागून । जाते वेळीं गृहांतूनी ॥ ९६ ॥ उपदेश तो अत्यंत सूक्ष्म गंभीर । किती असे अपार । माझे शक्ति-बाहेर । असे सर्वस्वीं तो माते ॥ ९७ ॥ आत्मतत्त्व तें अनंत । सांगती जरी सद्गुरुनाथ । तरी तें ह्या हृदयांत । कठिण असे समजणें ॥ ९८ ॥ ज्ञानमार्ग दुस्तर । चालणें करवतीच्या धारेवर । असे काळाकुट्ट अंधार । चोहोकडे पसरला ॥ ९९ ॥ करिती जप तप अनुष्ठान । राहती अन्नपाण्या-वाचून । करिती पंचाग्निसाधन । परि ज्ञानोदय होईना ॥ १०० ॥ कुणी बैसती गिरिकंदरीं । कुणी उभे एका पायावरी । तरी नेत्रासमोर अंधेरी । ज्ञानचक्षू ना उघडती ॥ १०१ ॥ त्यांतूनी शोधणें प्रकाश । तो दिसेल जेव्हा नयनांस । तेव्हांच बोधामृत हृदयास । मिळालें ऐसें समजावें ॥ २ ॥ हें जरी अत्यंत असे कठीण । तरी सुलभाहूनी सुलभ पूर्ण । हें रामदासांचें वचन । सत्य

हो सद्गुरु लाभतां ॥ ३ ॥ पूर्व सुकृतें भेटली । श्रीसद्गुरुमाउली । आपुल्या कृपाछत्राखाली । घेईल सच्छिष्यासी स्वानंदें ॥ ४ ॥ परि तो शिष्य चोखाळून । घेईल कसाशीं लावून । अनन्य भावें आला असे शरण । पाहोनी जवळीं करितसे ॥ ५ ॥ नातरी पालथी घागर । वरी ओतलें किती नीर । तेथे न थारे थेंबभर । सकल वाहून जाईल ॥ ६ ॥ म्हणूनियां हृदयभवनीं । मलिनता न ये आढळोनी । सकल वासना जिंकिल्या ज्यांनी । त्यांसीच सद्गुरु जवळी घे ॥ ७ ॥ मग आपुली कूर्मदृष्टि उघडून । करिती प्रेमभावें अवलोकन । क्षणींच अविद्या निरसोन । शिष्य ब्रह्मवेत्ता होतसे ॥ ८ ॥ एक कृपापूर्ण अवलोकन । केवढें दिव्य रसायन । षड्विकार-सकल-बंधन । गळून पडेल क्षणार्धें ॥ ९ ॥ एकदा वासुदेव बंधूंस । ज्ञानदात्या सद्गुरुस । मज जाणें भेटावयास । आज्ञा देई आई मला ॥ ११० ॥ जाते वेळीं न निर्मळ मन । मालिन्य असे हें ओळखून । विनोदात्मक केलें जरी भाषण । तरी लागलें असे ह्या हृदयासी ॥ ११ ॥ म्हणती तुज वस्त्रालंकार । दूध-भात साखर । कोठून आम्ही देणार । या खडतर मार्गावरी ॥ १२ ॥ अजूनी बा वैराग्यवृत्ती । बाणली नाही तुझे चित्तीं । शयन करणें भूवरती । सोसवेल ना तुजला तें ॥ १३ ॥ माते हें मालिन्य हृदयावर । सद्गुरूच तें काढणार । त्यांची भेट मी घेणार । आशीर्वाद देई मला ॥ १४ ॥ आईची आज्ञा कशास । काय जातां येत नव्हतें त्यास । परि ते ना सामान्य पुरुष । अलौकिक महात्मा तो होता ॥ १५ ॥ धर्ममर्यादा पाळणें । मर्यादशील वागणें । दुजियासी वळण लावणें । स्वयें नियमातें पाळून ॥ १६ ॥ तेथे हे सीताराम । कैसा सोडतील आपुला धर्म । श्रीगुरुदत्तात्रेय पुरुषोत्तम । अवतार असे तयांचा ॥ १७ ॥ घेतला सर्वस्वाचा संन्यास । परि पूज्य माता असे त्यांस । कोठेंहि भेटो मार्गास । साष्टांग नमन तिला असे ॥ १८ ॥ म्हणोनी शास्त्राज्ञेचें करूनी पालन । नम्रभावें मातेसी वंदून । मागती आज्ञा तिजलागून । सद्गुरुभेटीस जाण्याची ॥ १९ ॥ जिने नवमास ओझें वाहून । केलें स्वपुत्राचें पालन । ती माता

देईल काय जाण । आज्ञा बाहेरी जावया ।। १२० ।। जरी कार्याकारण गेला बाहेर । घटका एक जाहला उशीर । तरी ती आंत बाहेर । घाली खेपा सारखी ।। २१ ।। जो सर्वसद्गुणसंपन्न । प्रिय असे जनां लागून । सकल देती त्याजला मान । अत्यादरें करूनियां ।। २२ ।। मग ती माय स्नेहाळ । केला जिने आजपर्यंत सांभाळ । प्रथम तिने यावेळ । अनुज्ञा न देतां काय कथिले ।। २३ ।। म्हणे सीतारामा ऐक मात । माझे मनीं काय हेत । तुझे व्हावे चार हात । आता त्वरित यापुढे ।। २४ ।। ही असे जबाबदारी । सीतारामा माझेवरी । ती पूर्ण न झाली जोंवरी । समाधान न मन होईल ।। २५ ।। तुझा भाऊ वासुदेव । जगद्वंद्य झाला देव । किंचित घेउनी अनुभव । आपुल्या संसार-सुखाचा ।। २६ ।। तो जाहला अकस्माव । एकाएकीं विरक्त । सर्वस्वाचा त्याग करित । गेला गृह सोडोनियां ।। २७ ।। नको जाऊस म्हणून । किती पाहिले समजावून । सूनबाईहि निघून । गेली पतीबरोबरी ।। २८ ।। किती दुःख देउनी गेला । वासुदेव हा मनाला । याची जाणीव तुला । आहे काय सीतारामा ।। २९ ।। तरी तुझ्याकडे पाहून । घेतले असे समाधान करून । मग तूंहि जातोस म्हणून । हट्ट धरूनी बसलासी ।। १३० ।। थोरला सुत निघोनी गेला । सान तूंहि चालला । मग गृहीं राहील मधला । हे कसें बा म्या मानावें ।। ३१ ।। नवससायासें काया शिणविली । गुरु-चरित्राचीं पारायणें केलीं । तेव्हा तीन बाळें घरी आलीं । पूर्वभाग्यें करूनियां ।। ३२ ।। सर्वस्वाचा करूनी त्याग । वर्जूनियां सकल भोग । तापसी होवोनी धरितां मार्ग । मग म्यां दिवस कैसे कंठावे ।। ३३ ।। अजुनी तूं असशी सान । नको जाऊस येथून । हे न रुचे मना जाण । याचा विचार करि बा ।। ३४ ।। माउलीची करुण वाणी । परि ती मायामोहांत अडकणी । सकल घेती ऐकूनी । विचार किंचित ढळला नसे ।। ३५ ।। येथे तीव्र वैराग्यवृत्ति । पूर्ण बाणली होती । ती बळकट जाहली चित्तीं । अधिक मातेच्या भाषणें ।। ३६ ।। पहा ध्रुवबाळ होता सान । निघाला नारायणशोधाकारण । ही मात सानथोरापासून । ठाउकी असे सर्वांना ।। ३७ ।। नृप म्हणे रे किशोरा । जाऊं नकोस

कांतारा । फिर आंतां माघारा । मागशील ते देईन तुला ॥ ३८ ॥ एक गांव दोन गांव । पांच गांव घे दहा गांव । अर्धे राज्य सकल वैभव । परि चाल घराकडे ॥ ३९ ॥ ध्रुव म्हणे अहो तात । हे वैभव तुच्छ समस्त । देईल माझा जगन्नाथ । सर्वस्वी भार त्याच्यावरी ॥ १४० ॥ तेंवि मार्ग धरूनी चालला । सद्गुरुमाउली शोधावया । सीताराम हा निघाला । काय वदे मातेसी ॥ ४१ ॥ माझें करूं म्हणशी लग्न । परि तें होय मशीं बंधन । माझ्या सन्मार्गावरी विघ्न । आडवें ते येईल ॥ ४२ ॥ संसाररूपी शृंखला । जखडतां एकदा चरणाला । मग बंदिवास मानवाला । लागला असे सदाचा ॥ ४३ ॥ तरी आशा ही व्यर्थ मनीं । देई हा विचार सोडूनी । वार्ता ही न पडो कानीं । कदापिहि ती माझ्या ॥ ४४ ॥ मज योग्य एक नारी । योगलक्ष्मी तीस मी वरी । तीविणें नको दुसरी । ब्रम्हचारी राहीन मी ॥ ४५ ॥ मी जातों म्हणून । वियोग तुज होईल जाण । तरी माझा निश्चय पूर्ण । सरळ मार्गावरी असे ॥ ४६ ॥ कांही गोष्टी मनास । प्रथमतः देती बहु क्लेश । परिणामीं मात्र संतोष । अखंड तो लाभतसे ॥ ४७ ॥ कडू औषध घेतल्यास । जीव होई कासावीस । परि तें हटविते रोगास । आरोग्यता देतसे ॥ ४८ ॥ पति-पुत्र रणांगणां । जाती त्यांच्या वीरांगना । निरोप देताती जातांना । अति उत्साह दाविती ॥ ४९ ॥ तरी ते स्वकुलाचें कल्याण । परोपकारी जगा-कारण । जरी पुत्र राहती दूर जाण । त्याचा खेद करूं नये ॥ १५० ॥ हे आमुचे सहोदर । हरिभाऊ असती थोर । नाही सोडूनी जाणार । देतील सुख तुजलागीं ॥ ५१ ॥ श्रीवासुदेव महाराज सद्गुरु-नाथ । त्यांनी दिधलें जें बोधामृत । तें अखंड सेवुनी स्वानंदांत । आपण सुखी रहावें ॥ ५२ ॥ जी माता असेल विचारवंत । राहूनियां स्वगृहांत । आपुल्या पुत्राचें अभीष्ट चिंतित । आशीर्वाद देतसे ॥ ५३ ॥ वंदनीय स्त्रीपुरुष । त्याहूनी माता विशेष । पूज्य असे पुत्रांस । शास्त्रवचन हें असे ॥ ५४ ॥ तरी तुझ्या आशीर्वादांत । असे माझे सर्वस्वी हित । भेटो श्रीसद्गुरुनाथ त्वरित । आशीर्वाद हा देई मशीं ॥ ५५ ॥ आतां कांही न बोलती । मात्राज्ञेची वाट पाहती । हस्त जोडोनी

उभे राहती । सीताराममहाराज ॥ ५६ ॥ नेत्रासमोरील काजळी । म्हणे आज माझी दूर जाहली । दृष्टीस दिसे नव्हाळी । तेजस्विता चहुंकडे ॥ ५७ ॥ ते सीतारामाचें भाषण । हृदयावरी बिंबले पूर्ण । गेली भ्रांती मावळून । विचार करिती जाहली ॥ ५८ ॥ हृदयामाजीं अज्ञान । नाही ओळखलें हें मी कोण । त्यांचें हे भाषण । जागे मजसी करीतसे ॥ ५९ ॥ वासुदेव हरि सीताराम । यांनी पवित्र केलें धाम । धन्य कूस केली परम । सुपुत्र माझे होवोनियां ॥ १६० ॥ यांना कसें म्हणावें मानव । त्रिमूर्ती हे असती देव । ब्रह्मा विष्णू सदाशिव । जगदुद्धारा अवतरले ॥ ६१ ॥ मुलाचे पाय पाळणीं । खेळ खेळती जे बालपणीं । अवतार-कृत्य-मांडणी । आतां आठवण देताती ॥ ६२ ॥ कोठे ना ठेविली आसक्ति । सकल वैभव तुच्छ लेखती । घेउनी आले वैराग्य-वृत्ति । वासुदेव सीताराम ॥ ६३ ॥ यांचें विशाल असे हृदय । साधूसज्जनांना वंदनीय । तैशीच कृति अनुकरणीय । अलौकिक दिव्य असे ॥ ६४ ॥ यांचीं पावन चरित्रें थोर । करिती स्वकुलाचा उद्धार । करितील विश्वाचा उद्धार । आपुल्या ते सामर्थ्यानें ॥ ६५ ॥ वासुदेव जेव्हा गेला । तैं आत्मोपदेश त्याने केला । तेव्हा पूर्ण मज भासला । प्रत्यक्ष तो श्रीगुरुदत्तात्रेय ॥ ६६ ॥ दृष्टिआड जरी बाहेर । तीर्थाटनें करीत संचार । तरी माझ्या नेत्रासमोर । दिसत आहे तो प्रत्यक्ष ॥ ६७ ॥ गेले मायामोही भुलून । होतें मनी अज्ञान । ते आपुल्या कृपाकटाक्षें करून । त्यांनी निरसन केले असे ॥ ६८ ॥ उरली जी कां मलिनता । चिकटली होती चित्ता । ती धुऊनी टाकिली आतां । सीताराम-भाषणाने ॥ ६९ ॥ मग सीताराम वासुदेव । यांत्र नाही भेदभाव । दोघांचें एकचि वैभव । स्वभावधर्म सारखा ॥ १७० ॥ आपुल्या पुत्राच्या सन्मार्गात । अडथळा घालणें ना उचित । हा विचार करुनी मनांत । माता काय वदतसे ॥ ७१ ॥ मग स्वानंदें करून । जगराहटी अनुसरून । म्हणे वासुदेवभेटी कारण । सीताराम जाइजे ॥ ७२ ॥ कीर्तिवंत व्हा यशवंत । सद्गुरुभेटी होवो त्वरित । माता आशीर्बाद देत । सीताराम-पुत्रासी ॥ ७३ ॥ मातेचे शब्द पडतां कानीं । आनंद न माय गगनीं । साष्टांग नमस्कार घालूनी ।

लगती आपुल्या मार्गासी ॥ ७४ ॥ आतां पुढील अध्यायीं जाण । निघतील सद्गुरुभेटीकारण । ग्रामासी घालुनी भुलवण । सीताराममहाराज ॥ ७५ ॥ तरी श्रोते हो सज्जन । न जाववेल आपणां काननांतून । मनोभावें करुनी श्रवण । जावें त्यांचे बरोबरी ॥ ७६ ॥ श्रीगुरु वासुदेव समर्थ–। पदीं माझे दंडवत । जानकीस करा कृतार्थ । सन्निध आपुल्या ठेवोनियां ॥ ७७ ॥ इति श्रीसीतारामचरित्रालंकारमणी । गुंफिला असे दृष्टांतकोंदणीं । प्रकाश दाविता अंतःकरणीं । अष्टादश अध्याय गोड हा ॥ १७८ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

अष्टादशोऽध्यायः समाप्तः

अध्याय एकोणिसावा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ ॐ नमो जी वासुदेवा । अनंता अच्युता केशवा । श्रीधरा गोविंदा माधवा । नारायणा नमोऽस्तु ते ॥ १ ॥ जाहले तुझे अवतार । श्यामाजी आठवा मनोहर । लीला केल्या अपार । गोकुळीं त्वां राहूनियां ॥ २ ॥ जन्मापासूनी चमत्कार । दर्शविलेस तूं जगा थोर । तुझी कर्तृत्वशक्ति अपार । न कळे देवादिकांसी ॥ ३ ॥ हा आठवा लागला कंसापाठी । आठव्याने व्यापिली सकल सृष्टि । आठवा दिसे पाठीं पोटीं । आसनी शयनी आठवा ॥ ४ ॥ अनंत-ब्रह्माण्डनायक त्रिभुवनेश्वर । त्यासी करी कंस वैर । पाठवी उन्मत्त राक्षस थोर । पूतना राक्षसी ती आली ॥ ५ ॥ केला मायावी वेष धारण । आली मावशी म्हणून । विषें भरवुनी दोन्ही स्तन । स्तनपान करवी कृष्णासी ॥ ६ ॥ विषें भरोनिया स्तनपान । करविलें तरी ती माता जाण । हें परमात्म्याने जाणून । केला उद्धार तियेचा ॥ ७ ॥ जे जे राक्षस तुझ्यावरी । आले धावूनियां हरि । ते अरि सकल उद्धरी । ऐसी थोरवी तुझी असे ॥ ८ ॥ मग जो कां तुज आला शरण । त्याचीं दुरितें करिशी निवारण । होतील त्याचे मनोरथ पूर्ण । नको देवा हें सांगणें ॥ ९ ॥ तरी अनधिकारी मी वासुदेवा । आले शरण मी देवाधिदेवा । आतां अध्याय एकोणविसावा । आठव द्यावा या मानसीं ॥ १० ॥ मागील अध्यायीं जाहलें कथन । श्रीसद्गुरुभेटीकारण । सीतारामास माता जाण । अनुज्ञा देती जाहली ॥ ११ ॥ आपुल्या जननीची संमति । तैशीच वडील बंधू देती । तेणें आनंदित चित्तीं । सीताराम जाहले ॥ १२ ॥ प्रवासी हा लागला तयारीला । परि कितु डोकावला । अरे मार्गीं अडथळा । ग्रामजनांचा येईल ॥ १३ ॥ जी विषयवनांत । अखंड रमते मानवजात । विषवृक्षाची फळें चाखित । वरूनी मोहक दिसणारी ॥ १४ ॥ जे प्रपंचासक्त विषयाधीन । ते हीं फळें भक्षिती जाण । परि परिणामीं घातक पूर्ण । हेंहि कधी

कळे ना त्यां ॥ १५ ॥ ते पाहुनी आमुच्या वेषा । म्हणती चालला हा वेडा पिसा । तेथे वैराग्याचा ठसा । नयनीं कदापि ना दिसे ॥ १६ ॥ यांचा पुरुषार्थ असे कवण । स्त्री पुरुष अन्न धन । मग विरक्त मानवा लागून । संमति केंवि मिळेल ॥ १७ ॥ त्यांतूनी सात्त्विक भाविक जन । म्हणती हा चालला तपोधन । म्हणती बरोबरी जाऊं आपण । आडवे येतील मार्गावरी ॥ १८ ॥ रामप्रभू चालले वनास । अयोध्या पडली सकल ओस ।पेच पडला प्रभूस । रथ मुरडविला तयांनी ॥ १९ ॥ म्हणूनी ग्रामस्थ जनांला । आपुला विचार ना कळविला । संशयास ना थारा दिला । काय योजना केली असे ॥ २० ॥ तापसी वेष उतरविला । नित्याचा अंगीं चढवियला । जणूं चालले बाजाराला । किंवा आप्तेष्टांच्या भेटीसी ॥ २१ ॥ गुप्त सामान थैलींत । काठी घेतली हातांत । भर ग्रामांतूनी जात । सीताराम महाराज हे ॥ २२ ॥ सकल ग्रामस्थ मंडळी पाहती । परि संशय ये ना चित्तीं । बाजारा जाऊनी येती । म्हणती परत गृहासी ॥ २३ ॥ जैसें मातेसी कार्याकारण । जाऊं देईना लेकरूं जाण । सारखें करी रुदन । पदर मातेचा धरूनियां ॥ २४ ॥ मग माता काय करी । खाऊ देई त्या वाटीभरी । रमवूनिया त्यामाझारीं । हळूच तेथोनी जातसे ॥ २५ ॥ तैसी ग्रामजनासी भुलवणी । घातली असे महाराजांनी । ग्रामाबाहेर येऊनी । काय करिते जाहले ॥ २६ । मिळाला असे सरळ मार्ग । चालण्यासी आला वेग । संकेतस्थळीं सवेग । येवोनी महाराज पोहोचले ॥ २७॥ ज्यांनी जनां घातली मोहिनी । ती वस्त्रें अंगावरील काढूनी । क्षणीं दिलीं भिरकावूनी । पाहिलें नसे त्यांकडे ॥ २८ ॥ परिधान केला लंगोटा । दक्षिण करीं घेतला सोटा । वामकरीं घेऊनी लोटा । दिगंबर हा निघाला ॥ २९ ॥ ग्रामदेवता कुलदेवता । वंदिली असे मातृदेवता । अवधूतचिंतन स्मरोनी दत्ता । श्रीवासुदेवगुरुनाथा वंदिले ॥ ३० ॥ मायामय संसार-वृक्षावरून । केलें असे उड्डाण । जैसा विहंगम गगनांतून । उंच भरारी घेतसे ॥ ३१ ॥ धन्य धन्य तो नरशिरोमणि । धन्य माता प्रसवली पुत्र गुणी । जयाचे ऐन तरुणपणीं । तीव्र वैराग्य मनीं बिंबलें ॥ ३२ ॥ सान थोरांपासून ।

युद्धकथा आवडती पूर्ण । परि नुसतें रणांगण । पाहण्यास जातां भय वाटतसे ॥ ३३ ॥ तेंवि विरक्त साधु संत । या कथा ऐकती देऊनी चित्त । परि एक घटका उन्हांत । उभे राहतां ज्वर भरे ॥३४॥ एक दिवस उपोषण । जीवासी न होईल सहन । तेथे सर्वस्वाचा त्याग कोठून । मात कांही सोपी नसे ॥ ३५ ॥ तुकाराम म्हणती वाचे । तेथे पाहिजे जातीचे । येरा गबाळाचें । काम नाही ॥३६॥ तैसें या जगांत । झाले होतील आहेत । योगी जपी तपी संत । त्यांत हे योगेश्वर चालले ॥ ३७ ॥ एक इच्छा अंतःकरणीं । पायासी वेग त्या कारणीं । सद्गुरुभेट व्हावी म्हणूनी । आकांक्षा पुढे ओढीतसे ॥ ३८ ॥ चढूनी गेले केवढा घाट । काटे गोटे कोठे बिकट । कोठे लागे सपाट वाट । अनवाणी हा जातसे ॥ ३९ ॥ हिंस्र पशू वनांत । डरकाळ्या ऐकूं येत । दिवाभीतें बोभावत । आणिक कितीएक वनांतरीं ॥ ४० ॥ परि भय कशाचे तेथ । इंद्रियांसह देह अर्पिला जेथ । ते सद्गुरुनाथ या वनांत । माझी काळजी घेणार ॥ ४१ ॥ स्वमुखें केला असे धावा । सद्गुरुनाथा वासुदेवा । धाव पाव गा देवाधिदेवा । मोहिनी माया ही आवरी ॥ ४२ ॥ इंद्रियांसहित या नरतनूला । अर्पिलें प्रभो मी चरणकमला । या असार संसाराला । अंजुलीकर म्या दिला असे ॥ ४३ ॥ तूं दयेचा सागर । तूं पतित पावन दीनोद्धार । आता राहूं नको दूर । हांक ऐक या सीतारामाची ॥ ४४ ॥ पायीं नसे पायतण । क्षुधाशमनार्थ ना शिधा जाण । हंतरूण ना पांघरूण । कांही एक जवळी नसे ॥ ४५ ॥ टाकिला असे त्यांनी भार । एक्या विश्वंभरावर । माझी त्यालाच फिकिर । मनीं एकची भरवसा ॥ ४६ ॥ मातेच्या उदरीं नवमास देख । सांभाळ करी जो जगन्नायक । तो माझी तहानभूक । काय नाही पाहणार ॥ ४७ ॥ ज्यासी सकल प्राणिमात्रांची चिंता । जो सकल जगासी होय पोशिता । तो निष्ठुर माझ्या करितां । न कदापि होणार ॥ ४८ ॥ ऐसा टाकिला ज्याने सर्व भार । एका परमेश्वरावर । मग तो त्रिभुवनेश्वर । आपुल्या भक्ता ना उपेक्षी ॥ ४९ ॥ ऐसा दीनबंधू तो दीनानाथ । आपुल्या भक्ताची काळजी घेत । दुःखवारा ना

लागूं देत । इबुका दयाघन तो असे ॥ ५० ॥ प्रभु क्षुधानिवारणार्थ । मधूनीच पुढे दाखवित । फळझाडें मधुर रसवंत । सीतारामबालका ॥ ५१ ॥ जागजागीं खडकांतून । निर्मळोदक थंड जाण । करिती तृषा निवारण । श्रीसीतारामममहाराज ॥ ५२ ॥ आपुल्या भक्तासाठी वैकुंठनायक । करी किती कौतुक । पायास न रुतो कंटक । मार्ग तो झाडलेला दिसे ॥ ५३ ॥ भक्ताने जावें एका बाजूने । वन्य पशूंनी जावें दुज्या दिशेने । वर उचलोनियांहि लोचनें । बाळाकडे न पाहावें ॥ ५४ ॥ काय ही भक्ताची थोरवी ; कोणती द्यावी त्यांना पदवी । शद्बभांडारीं न सापडावी । प्रभूजवळी ती गुप्त असे ॥ ५५ ॥ हा मायामय प्रपंच बिकट । त्यांतूनी सुलभ जो काढी वाट । या अफाट सागराची लाट । अंगावरी ना येऊं देई ॥ ५६ ॥ तो एकची सद्गुरु । भक्त-काम-कल्पतरु । सदा सांभाळी लेकरू । चिंता हृदयागारीं ठेवूनियां ॥ ५७ ॥ ऐशा आपुल्या भक्ताप्रत । मार्गोमार्गीं सांभाळित । हळू हळू मार्ग आक्रमित । श्रीनृसिंहवाडी क्षेत्रीं पोहोचले ॥ ५८ ॥ या वाडीक्षेत्रांत । श्रीकृष्णा-पंचगंगा संगमापर्यन्त । आणिलें आपुल्या आश्रमांत । श्रीसीतारामभक्तासी ॥ ५९ ॥ आज पांच वरुषें झालीं । माणगावाहूनी स्वारी निघाली । वाडीक्षेत्रामाजीं आली । माझी गुरुमाऊली वासुदेव ॥ ६० ॥ जैसे सद्गुरुबरोबर । आले दत्त दिगंबर । तैसेचि सीतारामाबरोबर । आले सांगातीं दत्तात्रेय ॥ ६१ ॥ भक्तावीण क्षणभर । दूर राहीना परमेश्वर । आपुल्या बिरुदावळींत भर । अखंड तो टाकीतसे ॥ ६२ ॥ ना तरी एवढें निर्भयपण । विपिनमार्ग भयंकर कठिण । रात्रीं अपरात्रीं पर्यटण । हेंचि साह्य त्या भगवंताचें ॥ ६३ ॥ भक्ताची भूक तहान । वेळोवेळीं केली निवारण । आपण संगतीं राहून । येती या स्थलीं घेऊनियां ॥ ६४ ॥ या द्वय बंधूंनी । स्वयं दत्तावतार असूनी । परि तैसा भाव जनीं । प्रकट होऊं दिला नसे ॥ ६५ ॥ आम्ही असूं दत्तभक्त । हीच भावना हृदयांत । तैसेंच सर्व वाङ्मयांत । जीवनक्रमांत दाविलें ॥ ६६ ॥ पाहतां पूर्वानुसंधान । हे गणेश-रमा-नंदन । असती अवतारी हे पूर्ण । श्रीगुरुदत्तात्रेयाचे ॥ ६७ ॥ तत्समान आपुली भक्ति ।

म्हणूनी मंदिरें उभारिती । तरीं चरित्रनायकाची जैशी मती । तैशीच या ग्रंथीं गोवणें असे ॥ ६८ ॥ देव भावाचा भुकेला । सीतारामहृदयीं ठेला । ह्याच त्यांच्या वचनोक्तीला धरुनी चालणें पुढे असे ॥ ६९ ॥ म्हणती त्यांचें गुणवर्णन । भक्त कोटींत धरून । कोणता देव त्यांनी जाण । हृदयासनीं असे बैसवीला ॥ ७० ॥ ज्यांचें श्रुती स्मृती उल्हासें करून । अखंड करिती गायन । तो देवांचाहि देव जाण । गुरूचाहि होय गुरुवर्य । ७१ ॥ योगीजनपूज्य योगीश्वर । बसे आवडीने सिंहासनावर । जयाचे दोन्ही कर । भक्ता अभय देताती ॥ ७२ ॥ कमलासम विशाल नेत्र सुंदर । मंद हास्य मुखपंकजावर । पाहतां मन रमविणार । तेथोनी दूर ना जाववे ॥ ७३ ॥ तो भजनमात्रें करून । भक्ताचे मनोरथ करी पूर्ण । अनंत जन्मींचें पाप दहन । होईल शरण जातांची ॥ ७४ ॥ तो स्मरतां स्थलीं रमानंदन । तो श्रीवासुदेव दत्त भगवान । ह्या सीतारामभक्ताकारण । स्मरतां क्षणीं भेट देतो ॥ ७५ ॥ जैसी नववधू पतीचें नांव । सांगतां उखाणा रची अभिनव । त्यांत तिचा निष्ठाभाव । दिसोनिया येतसे ॥ ७६ ॥ तेंवि सद्गुरुचें नांव । गाऊनी आधी गुणार्णव । श्रीसद्गुरु वासुदेव । देव तो आपुला सांगितला ॥ ७७ ॥ आणिक भावना हृदयांत । वदती न एक सद्गुरुनाथ । वासुदेव श्रीगुरुदत्त । श्रीदत्तात्रेय जाणती त्या ॥ ७८ ॥ जैसे हरी आणि हर । यांत भेद नाही साचार । तेंवि वासुदेव आणि अनसूयाकुमर । दोन्ही देव एकची ॥ ७९ ॥ ही सोज्वळ भावना धरून । वाडीक्षेत्रीं येतां जाण । श्रीदत्तात्रेयपादुकादर्शन । प्रेमभरें घेतलें असे ॥ ८० ॥ मनीं चाललें चिंतन । घेतलें मनोहर पादुकांचें दर्शन । जाहला होता प्रवासशीण । तो सकल निघोनी गेला असे ॥ ८१ ॥ श्रीवासुदेवमहाराज पत्नीसहित । येथ राहती एक वर्षपर्यन्त । एक पुत्र संतान तेथ । याच समयासी जाहलें ॥ ८२ ॥ परि तें न राहिलें जाण । दश दिनांताचि जाहले विलीन । पुढती भार्याहि गोदातीरीं जाण । सोडोनियां गेली असे ॥ ८३ ॥ कांही न राहिला मायापाश । नव्हता कशाचा हव्यास । म्हणूनी चतुर्थाश्रम संन्यास । घेणें निश्चय केला असे ॥ ८४ ॥ लक्ष्मण दीक्षितांचे

चिरंजीव । त्यांना हे भेटले वासुदेव । त्यांचे पदीं जडलासे भाव । सेवाभक्ति केली असे ॥ ८५ ॥ हेच नारायण दीक्षित । श्रीनृसिंहसरस्वती दीक्षित स्वामी प्रख्यात । त्यांचिये आज्ञे वाडींत । राहिले भक्ति करोनियां ॥ ८६ ॥ तेथे नारायण दीक्षित स्वामींची । आणि सीताराममहाराजांची । भेटी झाली या द्वय गुरुबंधूंची । मग आनंद काय तो वर्णावा ॥ ८७ ॥ घेऊनी गेले आपुल्या सदनीं । केली असे मेजवानी । एकमेकांस परस्परांनी । लीला सद्गुरुच्या सांगीतल्या ॥ ८८ ॥ काय वर्णावी गुरुबंधुत्वाची मात । किती भक्ति असे तींत । प्रेमभरें लीला वर्णित । प्रेमाश्रू नयनीं पाझरती ॥ ८९ ॥ वाटे या भक्तिरसाच्या संगमांत । श्रीवासुदेव भगवान स्नान करित । राहिले हृदयमंदिरांत । अखंड प्रेमालिंगन देऊनिया ॥ ९० ॥ हा पंचगंगा संगम । तेथ देवभक्ताचा हो समागम । भेटले येथेच सीताराम । श्रीनारायण स्वामींसी ॥ ९१ ॥ म्हणूनी भगवंतास फार गोडी । संगमाची असे आवडी । अन्य ठिकाणीं पळघडीं । न राहती हे दत्तप्रभू ॥ ९२ ॥ याचेचि असे उदाहरण । नारद पुसती भगवंता लागून । देवा तुमचें ठिकाण । नेमकें कोणतें सांगावें ॥ ९३ ॥

" नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ ।
मद्भक्ता यत्र गायन्ति तन्त्र तिष्ठामि नारद ॥ "

ना मी सापडे योगियांजवळी । ना मी सापडे जपीतपीयांजवळी । ना मी सापडे नभोमंडळीं । अन्य स्थळीं ना मी सापडे ॥ ९४ ॥ जेथे माझें गायन भजन । जेथे माझें चाललें कीर्तन । ऐशा भक्ति-संगमांत जाण । अखंड रहिवासी मी तेथचा ॥ ९५ ॥ वाटे सापडावा अचूक । सायास नको कांही एक । तो मी जगन्नायक । भजनमेळीं सापडे ॥ ९६ ॥ परि आंतील ओलाव्याविण । न सापडे मी नारायण । जवळी असोनियां जाण । भावाचा भुकेला मी असे ॥ ९७ ॥ जैशी माता प्रेमभरित । आपुल्या पुत्रा कुरवाळीत । मुके घेऊनी चाटीत । जैशी धेनू वत्सातें ॥ ९८ ॥ तैशी माझी ही गुरुमाउली । मांडीवरी घेती झाली । हिरवी टिकली गोंदिली । भ्रूमध्यस्थानीं कौतुकाने ॥ ९९ ॥

जैसा भोळा महादेव । तैशी माझी गुरुमाउली वासुदेव । दुरावली न सापडे ठाव । त्याविणें चैन न पडे मना ॥ १०० ॥ येथे राहिल्याचा आनंद मनांत । झाला जरी अतोनात । परि प्रत्यक्ष भेटींत । चित्त असे गुंतलेलें ॥ १ ॥ म्हणोनी त्यांची माहिती । नारायण दीक्षितांना पुसती । येथोनी पुढे कोठे जाती । ठाउकें काय सांगावें ॥ २ ॥ येथूनी गंगाखेडीं जाऊन । केलें असे संन्यासग्रहण । पुढे उज्जनीस दंड घेऊन । उत्तर दिशेकडे जाताती ॥ ३ ॥ मग सीतारामम्हाराजांनी । गुरुबंधूंच्या अनुमतींनी । श्रीदत्तात्रेयासी प्रार्थूनी । उत्तर दिशा मार्गीं चालले ॥ ४ ॥ जैसे वासुदेवमहाराज पायांत । पायतण खडावा ना घालित । कवण्या वाहनीं ना बैसत । तैसेच जाती हे सीताराम ॥ ५ ॥ राजापुरी पंचा नेसलेला । तैसाच एक पांघरलेला । दोन लंगोटचा संग्रहाला । एक लोटा करीं असे ॥ ६ ॥ श्रीगुरुचरित्र ग्रंथ । तोहि सांभाळिती काखेंत । याविण दुजा अर्थ । कांही एक जवळी नसे ॥ ७ ॥ मध्यान्ह काळीं लागेल ग्राम । तेथे थांबती हे सीताराम । स्नानसंध्यादि नित्य क्रम । पोथी वाचिती गुरुचरित्राची ॥ ८ ॥ गृहें पाहूनी ब्राह्मण । माधुकरी आणावी मागून । मग नैवेद्य दाखवून । आपण भोजन करावें ॥ ९ ॥ पुनरपि दुपारून । पुढील मार्ग धरून । रात्र होईल तेथे जाण । मुक्काम विश्रांतीस्तव करावा ॥ ११० ॥ बहुधा ग्रामाबाहेर । असतें मारुतीचें मंदिर । धर्मशाळा पारावर । जलाश्रय पाहूनी उतरावें ॥ ११ ॥ तेथे करूनियां स्नान । सायंसंध्या करून । थंड जल करावें प्राशन । सद्गुरुचिंतनीं घ्यावी विश्रांति ॥ १२ ॥ मग प्रभातकाळीं उठोन । प्रातर्विधि घ्यावा उरकून । करोनिया संध्या स्नान । अर्घ्य द्यावें सूर्यासी ॥ १३ ॥ ऐशिया परीं सीतारामांनी । आपुली दिनचर्या आखोनी । पुढील मार्ग चालोनी । गंगाखेडीं पोहोचले ॥ १४ ॥ गोदाकाठीं या गंगाखेडीला । महाराजांनी संन्यास घेतला । म्हणूनी या पवित्र स्थला । सीताराम-महाराज उतरले ॥ १५ ॥ तेथील पाहूनी स्थान । प्रेमभावें करूनी वंदन । पुढती तेथून मार्ग धरून । उज्जनीस जाताती ॥ १६ ॥ येथे यावयाचें कारण । सद्गुरूने केला दंड धारण । त्या स्थानाचें

दर्शन । घेणें कर्तव्य तयांचें ॥ १७ ॥ तरी गुरुभेटीची तळमळ मनीं । शांत न जाहली येथे येऊनी । महाराज उज्जनीहूनी । पुढती न कळे कोठे गेले ॥ १८ ॥ येंथे संन्यासदीक्षांतीं । वासुदेवमहाराज ना ओळखती । श्रीवासुदेवानंद सरस्वती । नाम धारण केलें असे ॥ १९ ॥ या भक्तांनी यतिरूप । पाहिलें नसे अद्याप । म्हणूनी जें गृहस्थाश्रमीचें मूळ स्वरूप । त्याचेंचि चिंतन करावें ॥ १२० ॥ उज्जनींत चौकशी करोनी । पाहिलें कितीएकांस पुसोनी । परी उत्तर समाधानी । नाही कोठे मिळालें ॥ २१ ॥ येथे केलें दंडधारण । यतींचीं पाहिली ठिकाणें म्हणून । परि नूतन सगळे यतीश्वर जाण । ओळखी नसे कवणासी ॥ २२ ॥ ऐसा किती करिती शोध । तरी पत्ता न लागे होय खेद । म्हणती काय माझा अपराध । झाला असे कळेना । २३ ॥ काय रोष मनांत । म्हणूनी मज दूर लोटित । एकचि विवंचना मनांत । तळमळे जीव सारखा ॥ २४ ॥ ऐसा विचार चालला मना । तोच आठव जाहला त्यांना । नारायणानंद सरस्वतींना । चतुर्थाश्रमीं गुरु केलें असे ॥ २५ ॥ किंचित आशा उदेली मनीं । पत्ता लागेल म्हणूनी । भेट घेतली जाऊनी । नारायणगुरुस्वामींची ॥ २६ । वंदन करून तयांसी । करिती सद्गुरुनाथांची चौकशी । म्हणती दंड दिला आम्ही त्यांसी । हें जरि सत्य असे ॥ २७ ॥ परि आमुचें असे हें निमित्त । त्यांचे गुरुनाथ श्रीगुरुदत्त । त्यांचे आज्ञेनुसार ते वागत । निमित्तभूत आम्ही असों ॥ २८ ॥ म्हणोनी कवण्याहि प्रकारें उपदेश । केला न आम्ही तयांस । चिठ्ठी पत्र आम्हास । नाही आलें तयांचें ॥ २९ ॥ अल्प दिसती आशा किरण । तों सद्गुरुस्वामीचें उत्तर ऐकून । तेहि जाती मावळून । पुनः खिन्नता प्रकटली ॥ १३० ॥ पत्ता न लागे येथ । मग कासया राहावें उज्जनींत । येथील महांकाळेश्वर विश्वनाथ । त्याचेहि दर्शनास न गेले वाटे ॥ ३१ ॥ जैशी प्रेमांध मनुष्याला । दुजी वस्तु न दिसे त्याला । सांगतांहि न आवडे मनाला । त्याचें लक्ष एकीकडेची ॥ ३२ ॥ तेंवि सिताराममहाराजांलागूनी । एक्या सद्गुरुभेटीवाचूनी । अन्य कांही सुचेना मनीं ।

तोच एक ध्यास राहत ॥ ३३ ॥ सद्गुरुप्रेम खरा ध्यास । खरें मनन खरा अभ्यास । खरा खरा शिष्य सद्गुरूस । खरी सेवा करी जाणें ॥ ३४ ॥ एकचि देव जगांत । सद्गुरुनाथ तो श्रीगुरुदत्त । यावाचूनी ना दुजें दैवत । खऱ्या शिष्यासी दिसेना ॥ ३५ ॥ मग उज्जनी सोडूनी । निघाले क्षिप्रा नदीच्या तीरांनी । ऐसा सीताराममहाराजांनी । कांही प्रवास केला असे । ३६ ॥ असतील एखाद्या मंदिरांत । असतील नदीकिनारीं क्षेत्रांत । किंवा एकांत स्थळीं निवांत । दिसतील काय गुरुनाथ ॥ ३७ ॥ क्षिप्रा नदीच्या दो तीरांस । पाहिला आजूबाजूचा प्रदेश । नाही लागला तपास । सीतारामांस सद्गुरूचा ॥ ३८ ॥ श्रुती शास्त्रें झालीं कुंठित । अहोरात्र शोध करित । परि नाही सांपडत । हा दुर्लभ परमात्मा ॥ ३९ ॥ योगसाधना करून । शोधिती किती एक योगी जन । जो दुर्लभ सच्चिद्घन । मा सापडे कदापि ॥ १४० ॥ जो स्वयंप्रकाशित देवाधिदेव । भगवान श्रीवासुदेव । सगुण रूपें मानव । अवतीर्ण झाले या भुवनीं ॥ ४१ ॥ एकदा ते प्रसन्न झालियावरी । मग विलंब तेथे कासया तरी । क्षणामाजी भक्त करीं । आपल्या प्रेमें घेतील ॥ ४२ ॥ परि सुवर्णासी लाविती कस । मग तें उतरे परीक्षेस । तेंवि देवहि आपुल्या भक्तास । कसोटीस लावीतसे ॥ ४३ ॥ काळा रूपहीन प्रचंड फत्तर । घणाचे घाव सोशी अपार । मग तो पूज्य सुंदर । वंद्य सर्व जनांसी ॥ ४४ ॥ बळकट मनीं आवड । ती प्रयत्नास होतसे जोड । असो कितीहि पुढे वाट अवघड । कदापि त्यासी न वाटे ॥ ४५ ॥ तरी सफळ होणें प्रयत्न । तें ईश्वराचे असे आधीन । तो कृपावंत देईल जंव दर्शन । तंव कृतार्थ झालों म्हणावें ॥ ४६ ॥ व्याकुळ पांडुरंगदर्शना । हेंच म्हणती तुकोबा जाणा । जरी दाविशी तूं आपणा । तेव्हाच नारायणा आम्हा कळे ॥ ४७ ॥ कितीदा घडे अनशन । क्षुधा तृषा अपमान । सहन सर्वस्वीं करून । पायीं प्रवास केला असे ॥ ४८ ॥ परि पत्ता लागेना । चुकूर झाले असती मना । म्हणोनी सीताराममहाराजांना । वरील वचनोक्ति आठवली ॥ ४९ ॥ प्रभो वासुदेव दयाघन । मी तुमच्या असे स्वाधीन । अर्पिलें असे तनुमनधन ।

कृपावंत म्हा झडकरीं ॥ १५० ॥ आता माझे न कांही हातांत । दाविशी मज तूंच पथ । म्हणोनी बैसले स्वस्थ । सीताराममहाराज ॥ ५१ ॥ करीत बैसले चिंतन । सर्वज्ञ तो काय दूर जाण । देई मानसी स्फुरण । ग्वाल्हेरचा मार्ग धरावा ॥ ५२ ॥ ऐशी आज्ञा मिळतां क्षणीं । निघती तो मार्ग धरोनी । आखिला दिनक्रमांनी । ग्वाल्हेर संस्थानीं पोहोचले ॥ ५३ ॥ राजा कालगतीचें कारण । या न्यायातें अनुसरून । जैसें राजयाचें वर्तन । तैसीच प्रजा तेथे असे ॥ ५४ ॥ जेथे विरोध धर्माला । तेथे अधर्म माजला । वाव नसे न्यायाला । अन्यायची चोहीकडे ॥ ५५ ॥ तरी हे राजेसाहेब ग्वाल्हेरकर । धर्मनिष्ठ दाते उदार । करिती गोब्राम्हण-सत्कार । पालक असती तयांचे ॥ ५६ ॥ आवडे विद्वज्जनसंगति । आवडे धर्म न्याय नीति । वेदशास्त्रावरी भक्ति । मग तेथे काय कमी असे ॥ ५७ ॥ येथे वेदपाठशाळा संस्कृत । उत्तम वैदिक शास्त्री पंडित । अध्यापक यशवंत । नेमिले असती या संस्थानीं ॥ ५८ ॥ ब्राम्हणसमुदायीं सदाचरण । सनातन धर्माचें अनुशीलन । आर्य संस्कृतीचें परिपालन । तया ठायीं अवलोकिलें ॥ ५९ ॥ पाहतां मन जाहलें प्रसन्न । मग मानसीं विचार करून । या धर्मक्षेत्रांत राहून । शास्त्राध्ययन करावें ॥ १६० ॥ मी कोण येथे राहणार । बुद्धिदाता तो सद्गुरु थोर । त्यानेच हा विचार । माझिये हृदयीं पाठवीला ॥ ६१ ॥ प्रेरणा होतांची मनांत । सीताराम उठले त्वरित । अध्यापकाची भेट घेत । इच्छा प्रकट केली असे ॥ ६२ ॥ हा विद्यार्थी पाहतां क्षणीं । संतोषले शिक्षक मनी । पाठशाळेंत तयांनी । दिधली सोय करूनिया ॥ ६३ ॥ महाराज तेथे राहून । करिती जप संध्या स्नान । आणि गुरुचरित्र-वाचन । नाही नियम चुकविला ॥ ६४ ॥ आपुला राखूनी पवित्रपणा । आचार्यांना करूनी वंदना-सुरवात करिती शास्त्राध्ययना । सीताराममहाराज ॥ ६५ ॥ रूपावळी समासचक्र अमरकोश । हीं पाठ झाल्यावरी तयांस । गुरुजींनी रघुवंश । आवडीने कथियेला ॥ ६६ ॥ किराताघादि महा-काव्यीं । स्वैर संचार करूनी अनपायीं । मग मीमांसादि शास्त्रांचिये ठायीं । स्थिर करिती मतीला

॥ ६७ ॥ आपुल्या सद्गुरूच्या मुखांनी । वेदांतशास्त्र ऐकावे कानी । हें मनामाजी ठरवूनी । बाकी अध्ययन जाहलें असे ॥ ६८ ॥ बारा वरुषांचा अवसर । अध्ययनाला लागणार । तें समस्त करिती पार । अवघ्या तीन वरुण्यांत ॥ ६९ ॥ पाठांतर जाहलें समस्त । अखिल विद्या मुखोद्गत एक वेळ पठण करितां होत । वज्रलेप हृदयावरी ॥ १७० ॥ नातरी भेदबुद्धि शिष्य नीरस । करा कंठशोष । परि ना बिंबे मनास । पाठांतर कांहीच होईना ॥ ७१ ॥ मग ऐसा मेधावी शिष्य । लाभला असे अध्यापकास । कां न होणार संतोष । उत्साह दुणावे सांगतां ॥ ७२ ॥ तीन वरुषें झालीं पूर्ण । संस्कृतभाषाशास्त्राध्ययन । आतां नको याविण । अधिक कांही आपणासी ॥ ७३ ॥ काव्य नाटक रचूनी जगात । मिरविणें नको होऊनी पंडित । जरी षडंग वेद मुखोद्गत । काय पांडित्य तें कामाचें ॥ ७४ ॥ जो संसारसागरांतून । आपुल्या कृपाजाहजांत बैसवून । परतीरा नेईल तारून । तो एकचि सद्गुरु ॥ ७५ ॥ तयासीच जाऊनी शरण । कृपा करणें संपादन । नरजन्माचें सार्थक पूर्ण । सार असे त्याची ॥ ७६ ॥ ऐसा विचार करूनी । शाळा सोडितों म्हणोनी । सीताराममहाराजांना । अध्यापकांस कळविलें ॥ ७७ ॥ हें ऐकता क्षणीं । वाटलें असें मनीं । म्हणती ब्रम्हचारीबुवा न जावें येथूनी । पुढील अभ्यास करावा ॥ ७८ ॥ बहुत करितां नवस । परि न मिळे ऐसा शिष्य । पाठ देतां तुम्हास । संतोष मना होतसे ॥ ७९ ॥ पाहिला आग्रह करूनी । सीताराम राहावेत म्हणूनी । परि ध्येय न सोडिलें त्यांनी । या लौकिक प्रेमा भुलोनियां ॥ १८० ॥ बहुशास्त्रकथा कंथा । रोमंथ करावा ना वृथा । आपुलिया परम स्वार्था-साठी । परमात्मा शोधावा ॥८१॥ ही अभियुक्तोक्ती आठवून । म्हणती शास्त्राभ्यास हेंच व्यसन । मोक्षमार्गांत हा अडथळा जाण । कासया येथें राहावें ॥ ८२ ॥ अतिनम्रतापूर्वक । चरणीं ठेविलें मस्तक । म्हणती मी एक रंक । किती कष्ट आपण घेतले ॥ ८३ ॥ याचा मोबदला खरोखर । देईल एक परमेश्वर । मी अपुला आभारी पामर । काय एक देऊं शके ॥ ८४ ॥ द्यावी परवानगी आपण । आशीर्वाद असावा पूर्ण । ऐसें गुरूस

विनवून । निघती आशीर्वाद घेऊनियां ॥ ८५ ॥ ग्वाल्हेर सोडतांना मनांत । योजिला असे त्यांनी बेत । कोठे स्थान पाहूनी एकान्त । योगाभ्यास तेथे करावा ॥ ८६ ॥ श्रीवासुदेवमहाराज माणगावांत । जाउनी बैसती गुहेंत । पाहुनी स्थल तें एकान्त । योगाभ्यास करावया ॥ ८७ ॥ तैसेंच बैसावें आपण । हे मानसीं ठरवून । ग्वाल्हेरासमीप वनात जाण । योगाभ्यास सुरू केला ॥ ८८ ॥ जनसंसर्ग सुटून । वनांत रमूं लागलें मन । फळमूळ करिती भक्षण । कांही एक दिवस जाहले ॥ ८९ ॥ मग दिसोनी आलें त्यांस । हा हटयोगाचा अभ्यास । सद्गुरुच्या सान्निध्यास । जाऊनियां करावा ॥ १९० ॥ हा एकान्तवासहि योग्य ना । आम्हा अज्ञानी मानवांना । वासनावश होऊनी जाणा । गुंग होणें मनोराज्यीं ॥ ९१ ॥ जें पूर्णत्वास पोहोचती जन । त्यांनाच हें योग्य एकान्तसेवन । हा विचार करोन । सोडिलें त्या वनासी ॥ ९२ ॥ कधी उगवेल सुदिन । सद्गुरु भेटतील आपणालागून । थांबल्या जागीं चवकशी करून । पायीं प्रवास चालू असे ॥ ९३ ॥ ऐसी विचारणा करीत । उत्तर दिशे योजूनी पंथ । पोहोचले हरिद्वारांत । सीतारामम्हाराज ॥ ९४ ॥

" अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका ।
पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायका: ॥ "

या मोक्षदायक पुऱ्या सात । पुराणप्रसिद्ध आहेत । तिजी जी कां माया वदत । हरिद्वार तें जाणावें ॥ ९५ ॥ सकल तीर्थांमाजी तीर्थवर । असती वासुदेव यतिवर । तेच देवांचेहि देव खरोखर । भावना मनीं एकचि असें ॥ ९६ ॥ संन्यासी लोक हरिद्वारांत । राहताती अगणित । त्यांत आपुले सद्गुरुनाथ । काय राहिले असतील ॥ ९७ ॥ हरविली वस्तू जैसी शोधिती । बारकाईने चौफेर बघती । तैसे सद्गुनाथां शोधिती । परि पत्ता न त्यांसी लागला ॥ ९८ ॥ योगाभ्यास जो ग्वाल्हेरा । राहिला होता अपुरा । तो तेथे करावा पुरा । ऐसें मानस जाहलें ॥ ९९ ॥ सद्गुरु असती जरी फार दूर । तरी त्यांची असे कृपानजर । येथे योगीश्रेष्ठ जालवणकर । सीताराम महाराजांस भेटले ॥ २०० ॥

एकदा कार्य घेतलें हातीं । तें पूर्ण करणें प्रयत्नांतीं । कितीहि कष्ट पडोत त्याप्रती । तरी पाहणें नसे त्यांकडे । १ ॥ लोहचणकभक्षण । ऐसे बिकट कष्ट सोसून । हा योगाचलपंथ आक्रमून । समाधी शिखरीं पोहोचले ॥ २ ॥ या प्रयत्नशील सच्छिष्याचें । कौतुक करोनिया वाचें । माता-पिता-बंधूंचें । कुशल योगीराजाने पुशियलें ॥ ३ ॥ श्रीसीताराममहाराजानी । योगीराजालागूनी । आपुली माहिती सांगूनी । ध्येयोद्देशहि कथियेला ॥ ४ ॥ श्रीवासुदेवानंदसरस्वती । हे आमुचे सख्खे बंधू असती । ती आमुची सद्गुरुमूर्ति । त्यांच्या शोधांत आम्ही असो ॥ ५ ॥ सांगितलें साद्यंत वर्तमान । योगीराजास वाटलें समाधान । म्हणती ब्रह्मावर्तास इच्छा पूर्ण । तुमची होईल वाटतें ॥ ६ ॥ जणुं सांगितलें शुभ भविष्यास । ऐकतां संतोष वाटला मनास । उजव्या नेत्रीं आणि बाहूस । स्फुरण होऊं लागले ॥ ७ ॥ उत्तम होऊं लागले शकुन । आतां हरिद्वारीं राहूं देईना मन । कधी ब्रह्मावर्ती जाऊन । पाहींन श्रीगुरुमूर्तीसी ॥ ८ ॥ गगनांतूनी पडे पाणी । पर्वतांतूनी उगम पावे तटिनी । तिचें ध्येय एकचि मनीं । समुद्रासी गाठावें ॥ ९ ॥ धाव घ्यावी दरीतूनी । वळावें मार्ग मिळेल त्या वळणीं । कधी उडी घ्यावी पहाडावरुनी । परि ध्येय आपुले न सोडावें ॥ २१० ॥ मग इच्छित स्थळीं गेलियावर । तेथे होय मग ती स्थिर । एकरुप होई नीर । भेदभाव तेथे नूरे ॥ ११ ॥ तैसी मुमुक्षु जीवांची धाव । परब्रह्माकडे सदैव । तो शोधावया ठाव । उपाव सारखा योजिताती ॥ १२ ॥ आतां भाग्यतरु सुफलित । शुभ काळ जवळी येत । म्हणोनी हरिद्वारांत । न रमे आतां सीताराम ॥ १३ ॥ मग हरिद्वार सोडून निघती । गंगातीर लक्षून । काठाचीं मंदिरें शोधून । मठादि स्थानें पाहती ॥ १४ ॥ मुळीं न होती हताश । जवळी नसे द्रव्यांश । पायीं चालला प्रवास । अनवाणी सारखा ॥ १५ ॥ भाषा नसे आपुलीं । वयोमर्यादा विशी आतली । भीति नाही मना शिवली । धैर्य नाही सोडिलें ॥ १६ ॥ येवढी भूमि आक्रमीत । कष्ट सोंशिले अमित । याची जाणीव कवणा होत । समानशील जो तयासी ॥ १७ ॥ आणिक हा प्रवासी नवखा देख । ब्रह्मावर्त

असतां नजींक । परि नव्हतें ठावूक । सीतारामममहाराजांना ॥ १८ ॥ अखेर त्यांचेहि मानवी शरीर । म्हणुनी देहधर्मानुसार । श्रमित होऊनी उग्दार । निघाले करूण वाणीचे ॥ १९ ॥ येतां संकटकाल समोर । त्यांतून सुटका व्हावी सत्वर । तेव्हा मानव होऊन अधिर । काकुळती देवा हाक मारी ॥ २० ॥ तीच झाली येथे परी । सीतारामभक्तांचे अंतरीं । झाला बहुत प्रवास तरी । पत्ता न लागला सद्गुरुचा ॥ २१ ॥ बरें वाईट कर्म घडलें । तें आज सर्व आठवलें । राईसम जरी तें जाहलें । डोंगरासमान भासत असे ॥ २२ ॥ जन्मजन्मांतरीचा आठव । होऊनी व्याकुळ होय जीव । म्हणती माझा सद्गुरु वासुदेव । या कारणेंच का दूरावला ॥ २३ ॥ आतां उपाय हरले देवा । कुठे शोधूं तुज वासूदेवा । मांडिला असे असा धावा । सीताराम बालकाने ॥ २४ ॥ हे दयासागरा दत्तात्रेया । दीनोद्धारार्थ फिरसी सदया । मग आज तुझी माया । संपली काय मजकरितां ॥ २५ ॥ सूर्य असे प्रकाशमान । तरी न दिसे जन्मांधा लागून । तेंवि तूं स्वयंप्रकाशी पूर्ण । मज पामरा दिसूं नये ॥ २६ ॥ माझ्या पातकांचा काय पडदा । आड आला रे गोविंदा । म्हणोनिया या आपदा । मजसमोर येताती ॥ २७ ॥ काय मी अधिकारी ना दर्शनाला । म्हणोनी दूर लोटिसी मला । जलचरांनो जळाला । सोडूनी देवा कोठे जावें ॥ २८ ॥ मातेने लोटलें बाळ दूर । ऐसें नाही बा होणार । तरी कृपामृत पाजूनी शांत कर । सद्गुरुमाते झडकरी ॥ २९ ॥ तात माता बंधू गुरु । कोणत्या नामें तुज पुकारूं । तरी सदया कृपासागरु । धाव पाव गा झडकरी ॥ २३० ॥ जैसे निवृत्ति ज्ञाननाथ । जनार्दन-स्वामी एकनाथ । श्रीवसिष्ठगुरु रघुनाथ । तैसेच वासुदेव सीताराम ॥ ३१ ॥ प्रत्यक्ष श्रीकृष्णभगवंतांनीं । सांदीपनीच्या गृहीं राहूनी । मोळी आणिली वाहूनी । माथ्यावरी काष्ठांची ॥ ३२ ॥ ते शिष्य काय होते अजाण । असती देवाधिदेव जाण । करावया जगकल्याण । दाविती उदाहरण जगातें ॥ ३३ ॥ सद्गुरुचि सखा सोयरा जिवलग । हे नामदेवांचे बोल चांग । तेच आतां पुढील मार्ग । दावितील आपणा

॥ ३४ ॥ ऐसे भेटीसाठी उत्कंठित । सद्गुरुचा धावा करित । आपुला मार्ग आक्रमित । महात्मे हे चालले ॥ ३५ ॥ आता पुढील प्रवास । चालला असे सावकाश । श्रीक्षेत्रब्रह्मावर्तास । महाराज येऊनी पोहोचले ॥ ३६ ॥ हरिद्वारांत जाहली गाठ । श्रीयोगियांनीवार्ता कथिली चोखट । ब्रह्मावर्ती होईल भेट । तुमच्या श्रीगुरुमाऊलीची ॥ ३७ ॥ हा शुभ शकुन समजून । आले ब्रह्मावर्त लक्षून । आता पुढील अध्यायी सुदिन । येईल सद्गुरुभेटीचा ॥ ३८ ॥ तो आनंद चाखावया । बसावें लक्ष लावूनियां । तो कृपासागर करील दया । श्रोत्यांवक्त्यांवरी सदा ॥ ३९ ॥ या एकोणविसाव्या अध्यायांत । मातेची आज्ञा घेऊनी निघत । आपुल्या श्रीगुरुच्या शोधार्थ । श्रीसीताराममहाराज ॥ २४० ॥ कैसा जाहला प्रवास । तो ठावुका आपणास । आतां आशा किरणें नेत्रांस । दिसों लागलीं तयांच्या ॥ ४१ ॥ तरी त्या प्रकाशांतून । जाऊं समवेत आपण । श्रीसद्गुरुंचे पाहावया चरण । आळस सगळा सोडूनियां ॥ ४२ ॥ असे एकची प्रार्थना । वासुदेवा दयाघना । हा एकोणिसावा अध्याय मना । रुचो श्रोतेयां सर्वदा ॥ ४३ ॥ इति श्रीसीतारामचरित्रालंकारमणी । गुंफिला असे दृष्टांतकोंदणीं । प्रकाश दाविता अंतःकरणीं । एकोणविंस अध्याय गोड हा ॥ २४४ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

एकोणविंशोऽध्यायः समाप्तः ।

अध्याय विसावा

श्रीगणेशाय नमः ।। श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ।। श्रीवासुदेवाय नमः ।। ॐ नमोजी शंकरा । कैलासा चल विहारा । नमो जी पार्वती परमेश्वरा । हेरंबतात । नमोऽस्तु ते ।। १ ।। देवा तुमची वाट अवघड । परि तुम्हासी तेथील आवड । बऱ्या खोरी पहाड । पर्वतावरी वास्तव्य तुमचें ।। २ ।। जरी इच्छा उदेली मना । घेऊनि यावें दर्शना । तरी पायीं चालवेना । लाभे ना संतसंगति ।। ३ ।। अनाथ पंगु हीन दीन । असे सर्वस्वीं अज्ञान । मग कैसें घ्यावें दर्शन । सांग दयाळा तुझें मी ।। ४ ।। नाही भक्ति नाही ज्ञान । नाही रसनेसी लागलें वळण । एक नाम तेंहि जाण । सदा मुखीं वसेना ।। ५ ।। तरी डिंडिम तुझा सत्य । गाजतो आहे त्रिलोकांत । भोळा सांब तूं कैलासनाथ । असशी भक्तासाठी सदा ।। ६ ।। मग ओढ लागली जी कां मनीं । ती तूं पुरविता असशी शूलपाणि । अज्ञान टाक छेदूनी । आपुल्या कृपाकटाक्षें ।। ७ ।। श्रीसद्गुरुचा शोध करित । चित्त धाडूनी गुरु चरणांप्रत । आले ब्रह्मावर्तांत । श्रीसीतारामम्हाराज ।। ८ ।। येथे उत्साहित असे जरी जीव । परि जोवरी न ये अनुभव । भेटती न वासुदेव । तोंवरी वृत्ति स्थिर नसे ।। ९ ।। ब्रह्मावर्त महाक्षेत्र । प्रसिद्ध गंगातीरीं पवित्र । न जाणों येथे त्रिनेत्रा । सद्गुरु माझे भेटतील ।। १० ।। ऐसी आशा धरुनी मनीं । क्षेत्रांत प्रवेश करोनी । दूर वस्तीपासूनी । पाहिलें देवालय मारुतीचें ।। ११ ।। साधुसंत मुशाफर । तैसे सीताराम ब्रह्मचारी थोर । यांसी वस्तीपासूनी दूर । राहणें नित्य आवडे ।। १२ ।। धर्मशाळा देऊळ । मठ पार पिंपळ । जलाश्रय निर्मळ । ऐसें स्थळ पाहती ।। १३ ।। म्हणोनी हें मंदिर । असे गावाबाहेर । श्रीमारुतीराया समोर । आपुलें आसन मांडिलें ।। १४ ।। स्नान संध्या करून । करावें गुरुचरित्र वाचन । ब्रह्मकर्म सारून । कालक्रमणा करावी ।। १५ ।। ब्राह्मणांचीं गृहें पाहून । माधुकरी आणावी मागून । मग नैवेद्य दाखवून । आपण भोजन करावें ।। १६ ।। वेदांतग्रंथ अवलोकन । करावा एखादा दुपारुन । परि न होय समाधान । अंतरीं चित्ता वेगळी ।। १७ ।।

कवण्याहि प्रकारें विरहव्यथा । असे ती तयांच्या जाळी चित्ता । तयासी भासे प्रखरता । रविसम त्या चंद्राची ॥ १८ ॥ येथेंहि होताती शुभ शकुन । दक्षिण नेत्र होई स्फुरण । परि शुभ घटिका मुहूर्त जाण । पाहिजे कोणत्याहि सत्कार्या ॥ १९॥ जितुका भक्ताचा कळवळा । तितुकाच भक्ताचा देवासी लळा । परि देव कौतुकलीला । दाऊनी प्रेमा वाढवितसे ॥ २० ॥ आधीं चालवोनी बिकट वाटीं । भक्ता लावोनी कसोटी । मग देतो तयासी भेटी । ना सोडी कधी मग त्याला ॥ २१ ॥ ज्यासी अनंत कोसावरील हाक । ऐकूं येते क्षणैक । त्यास काय नव्हतें ठावूक । भक्त हा तळमळे म्हणूनिया ॥ २२ ॥ कधी ठेविल कोणी मध्यस्थी । देईल त्यासी उपरति । आपुला ठाव भक्ताप्रति । अचूक जाऊनी सांगेल ॥ २३ ॥ तेंवि त्या मारुतीचे मंदिरांत । एक ब्राह्मण नित्य येत । देवपूजा करूनी जात । आपुल्या आल्या मार्गाने ॥ २४ ॥ मग सद्गुरु इच्छे करूनी । आधी नमन करोनी । विचारपूस केली त्यांनी । श्रीसीताराममहाराजां ॥ २५ ॥ वदती आमुच्यां मंदिरांत । आले तापसी आजपर्यंत । परि आपणासारिखा निष्ठावंत । नाही कोणी पाहिला ॥ २६ ॥ आपण ब्रम्हचारी विद्याविनय संपन्न । स्वधर्मशास्त्राध्ययन । धर्मानुष्ठानांत निमग्न । अहोरात्र दिसतसा ॥ २७ ॥ पाहतां आपुली ही वृत्ति । जडली दिसे परमार्थीं । आदरभाव उपजला चित्तीं । आपल्या ठायीं आमुचा ॥ २८ ॥ तरी ब्रह्मावर्तीं सुंदर । असे एक राममंदिर । त्यांत एक योगी संन्यासी थोर । आपणासम दिसताती ॥ २९ ॥ तेहि सदाचारी विद्वान । मोठे पंडित असून । होतें सायंकाळीं पुराण । आबाल वृद्ध स्त्री पुरुष येती ॥ ३० ॥ त्यांचें ऐकतां प्रवचन । पंडित आणि संतजन । त्यांसहि होतसे समाधान । इतुकें बोधप्रद आणि रसाळ असे ॥ ३१ ॥ तरी त्या पुराण श्रवणाला । जातां आवडेल तुम्हाला । तैसाच लाभ आपणाला । खचित होईल वाटतें ॥ ३२ ॥ ग्रंथ ऐकिले कित्येक । त्यांत जीवनन्मुक्त विवेक । हा ग्रंथ असे कां ठाउक । आपणासी महाराज ॥ ३३ ॥ सीताराममहाराज वदती त्याला । हा

ग्रंथ ना पाहिला । नाही आम्ही ऐकला । कधी आजपर्यंत ॥ ३४ ॥ मग ब्राह्मण वदे तयांसी । मग अवश्य जावें श्रवणासी । इतुकें सांगून तयासी । गृहासी गेला आपुल्या ॥ ३५ ॥ ब्राम्हण गेलासे निघून । मग विचारीं पडलें मन । अष्टावक्रगीता प्रवचन । माणगावीं म्या ऐकिलें ॥ ३६ ॥ तै असे मी अति सान । न कळे कांही मजलागून । मग नवीन हा ग्रंथ कवण । सांगताती मंदिरीं ॥ ३७ ॥ तरी जाऊनी मंदिरात । कोण स्वामी आहेत । न जाणों सद्गुरुनाथ । आले काय असतील ॥ ३८ ॥ ऐसा विचार करुनी । श्रवणाचें निमित्त करुनी । निघाले असती दुसरे दिनीं । योजिलेल्या समयासी ॥ ३९ ॥ पडती मंदिराबाहेर । आज सद्गुरु काय भेटणार । लाभ थोर होणार । विचार मनीं चालती ॥ ४० ॥ इतुक्यामाजी समोरुनी । दिसली येतां सुवासिनी । आपुल्या सान शिशूस घेऊनी । काय वदे तयाला ॥ ४१ ॥ बाळा भूक लागली आहे तुला । बहु वेळ जरी जाहला । गेंल्यावरी गृहाला । जेऊं तुज घालिते ॥ ४२ ॥ ऐसा जाहला शुभ शकून । आणि शुभ वाणी ऐकून । महाराजांचें अंतःकरण । गहिवरुनी आलें असे ॥ ४३ ॥ आता वियोग संपला । संयोगकाळ जवळी आला । आपुल्या उपास्यदेवतेला । वंदन करिते जाहले ॥ ४४ ॥ श्रीराममंदिराची चौकशी करीत । आले मंदिरापर्यंत । परि नाही गेले आंत । उभे राहती बाजूला ॥ ४५ ॥ मंदिरांतल्या स्वामींचा । कानोसा घेतला असे साचा । चाललेल्या पुराणाचा । दूर उभे राहूनियां ॥ ४६ ॥ आपुल्या गुरुवाणीचा भास । जाहला असे तयांस । पुनरपि देऊनी लक्ष ऐकूं लागले महाराज ॥ ४७ ॥ हा प्रत्यक्ष सद्गुरुचाच वाग्विलास । खात्री पटली मनास । मग आनंदाच्या पारावारास । कोण वर्णन करूं शके ॥ ४८ ॥ जळतां कोणी दावाग्नींत । तों मेघवर्षाव हो अकस्मात । तैसा सद्गुरु मेघ वर्षत । अमृतजल अंगावरी ॥ ४९ ॥ या सीतारामा गुरुभक्ताला । परमावधीचा आनंद झाला । संसारतापें तापलेला । शांत जाहला ये समयीं ॥ ५० ॥ धन्य धन्य आजिचा सुदिन । जाहलें मन सद्गुरुदर्शन । धन्य तेचि जाहले नयन । धन्य श्रवण जाहले ॥५१॥

पूर्व सुकृताचें फळ । मिळालें आजि सोज्जळ । गुरुशोधाचे श्रम सकळ । तत्काळ गेले निघोनियां ॥ ५२ ॥ धन्योद्गार हृदयांत । किती वेळ तेचि उमटत । राहिले त्याच अवस्थेंत । प्रार्थना करित सद्गुरुची ॥ ५३ ॥ एकाग्र चित्त ठेवून । ऐकती हे पुराण । हें पाहतां इतर जन । आंत बोलाविती तयांसी ॥ ५४ ॥ आंत पाऊल टाकता क्षणीं । कैसे देखिले सद्गुरु नयनीं । जैसा चंद्र वेष्टित तारांगणीं । तैसे व्यासपीठीं शोभले ॥ ५५ ॥ बैसले हरिगण सभोवती । मध्ये शोभले रघुपती । तैशी व्यासपीठावरी सग्दुरूमूर्ति । सीताराम भासतसे ॥ ५६ ॥ निज वचनामृताचा वर्षाव करित । आनंदमूर्ति ही सग्दुरूनाथ । दृष्टिपुढे विलसत । प्रेमाश्रू वाहती नयनांतुनी ॥ ५७ ॥ गुरूदर्शनानंद अभ्दुत । जाहला असे हृदयात । देहभान विसरूनी जात । पूर्ण तल्लीन जाहले ॥ ५८ ॥ स्वानंद जागच्या जागीं जिरवून । सावध केलें असे मन । सकल श्रोत्यांच्या मागे बसून । गुरूवचनामृत प्राशिती ॥ ५९ ॥ आपुल्या ज्ञानचक्षूंनी । हृदयपंचांग अवलोकुनी । म्हणती शुभ घटिका अजूनी । किंचित् काळ दूर असे ॥ ६० ॥ चालू पुराण कीर्तन । सभोवतीं दृष्टि फिरवून । श्रोतयां आणिती सावधपण । श्रीसग्दुरू वासुदेव ॥ ६१ अन्य श्रोत्यांच्या समान । पाहिलें परि न बोलले जाण । एक तास होतां पूर्ण । पुराण त्यांनी संपविलें ॥ ६२ ॥ सकल श्रोत्यांसमान । आपुल्याच जागेवरून । सग्दुरूसी करूनी नमन । अपुल्या मुक्कामा परतले ॥ ६३ ॥ मारूतीमंदिरीं येऊन । विचार करतें जाहलें मन । काय माझी ओळखण । सग्दुरूनाथा जाहली नसे ॥ ६४ ॥ मनीं धरोनिया धीर । म्हणती ईशइच्छेनेच होणार । मारूतिपूजकाचे आभार । मनःपूर्वक मानिले ॥६५ ॥ जाहलों होतो बहु कष्टी । सहज तुमच्या मुखें निघाली गोष्टी । सग्दुरूची जाहली भेटी । लाभ मोठा होय आम्हां ॥ ६६ ॥ या कलियुगांत । वैदिक धर्म स्थापनार्थ । दुर्मतध्वंसनार्थ । ज्यानी दंड हातीं धरियेला ॥ ६७ ॥ जे वासुदेवानंदसरस्वती । जयांचा महिमा सकल गाती । ती माझी सग्दुरूमूर्ति । शोधितां आज गवसली ॥ ६८ ॥ पुनरपि दुसरे दिनीं । सग्दुरूभक्तशिरोमणी । पुराणसमय होतां

क्षणीं । राममंदिरीं चालले ॥ ६९ ॥ महाराज आपुल्या व्यासपीठावर । तयांसी करूनी नमस्कार । बैसले आपुल्या जागेवर । पूर्व दिनाप्रमाणें ॥ ७० ॥ नित्यासम जाहलें पुराण । सकल श्रोते गेले निघून । तैसेंच यांनी करूनी नमन । आपुल्या मुक्कामीं परतले ॥ ७१ ॥ नाही पाहिलें वळूनी । मारूतीमंदिरीं जाऊनी । म्हणती संन्यास घेतला सग्दुरूंनी । नियम त्यातील कांही असे ॥ ७२ ॥ सकल जनांपासूनी अलिप्त । माझे कोणी नाहीत आप्त । हेंच मानिती मनांत । नित्यमुक्त संन्यासी ॥ ७३ ॥ पूर्वाश्रमांतले सहोदर । परि आतां ते यतीश्वर । म्हणोनीं त्यांचेच मर्जीवर । सर्वस्वीं असे टाकिलें ॥ ७४ ॥ नसे त्यांचा निराळा भाव । नसे तयांना दुजा देव । कर्ता करविता वासुदेव । म्हणती काय करील तें करो दे ॥ ७५ ॥ सकल कार्यें दत्ताज्ञेनुसार । श्रीवासुदेवानंद करणार । तैसाच हा प्रकार । भक्तभेटीचा झाला असे ॥ ७६ ॥ केली मानसीं प्रेरणा । पूर्वाश्रम-बंधू पुराणा । आपुलें सान्निध्य देऊनी तयांना । मातेची चौकशी करावी ॥ ७७ ॥ आले असतीं तिसरे दिनीं । सद्गुरुंते नमूनी । नारायण या शब्दांनी । आशीर्वांदघेतला ॥ ७८ ॥ नित्याप्रमाणें मागुती । जाऊनिया बैसती । पुराण संपलिया बाहेर पडती । सद्गुरुसी नमुनी ॥ ७९ ॥ आपुला एक निकटवर्ती । श्रोता तयासी सांगती । बोट दाखवून बोलवा तयासी ॥ ८० ॥ भक्तासी आज्ञा प्रमाण । करिती तिचें पालन । स्वयं कांही कार्य-जाण । आजपर्यन्त केलें नसे ॥८१॥ लगबगा जाऊन मार्गांत । निरोप तयासी सांगत । म्हणती स्वामी तुम्हाप्रत बोलविती भेटीसी ॥ ८२ ॥ ब्रम्हचारी तयासी वदती । महाराज कासयाबोलाविती । आमुचीं संध्यावेळ झाली म्हणती जान ना पछान आमुची असें ॥ ८३ ॥ आ । तसाच परतोणी हे पाहिलें महाराजानी । म्हणतीं पुनरपि सांगावें जाऊनी । चौकशी करणे मातेची ॥ ८४ ॥ बंधुप्रेम केलें व्यक्त । आश्चर्य महाराज हासत । आमुच्या मातेची हकिकत । ऐकणें कासया तयासी ॥ ८५॥ जैसा मधील पोस्टमन । कथी तैसेंच यऊन । प्रेमळ भक्तांचें ऐकूनी वचन । हास्यवदन केलें

असे ॥ ८६ ॥ मग एक वचनी भाषण । येथपर्यंत ये म्हणावें जाऊन । तैसेंच केलें निवेदन । सिताराम्मांना तयाने ॥ ८७ ॥ तयासी वाटला विस्मय । वाटे दोघांचा असावा पूर्वपरिचय । म्हणूनी हें हृदय सदय । महाराजांचें जाहलें ॥ ८८ ॥ अंतरीची जाणली खूण । आनंदले भक्तांचें मन । येती परत फिरून । मंदिरांत सीताराम ॥ ८९ ॥ श्रीसद्गुरूनाथ चरणीं । साष्टांग नमस्कार घालोनीं । आदरें मर्यादा धरोनी । बैसती जवळी जाऊनियां ॥ १९० ॥ यतिरुप हें असे थोर । प्रत्यक्ष म्हणावें परमेश्वर । तयासी सर्वांनी नमस्कार । करावा ही असे शास्त्राज्ञा ॥ ९१ ॥ परि चतुर्थाश्रमी संन्यासींनी । मानुनी आपुलें नाही जगीं कोणी । एका मातेंवाचूनी । नमस्कार कोणा न करावा ॥ ९२ । इतुकी मातेची योग्यता । तो संन्यास जरी घेता । तरी पुत्र धर्मानुसार पाहतां । कर्तव्य असे तयाचें ॥ ९३ ॥ पुसती सीतारामास । माणगांव केव्हा सोडलेंस । येथे किती जाहले दिवस । मातोश्री क्षेम असे कां ॥ ९४ ॥ म्हणती माणग्राम सोडून । चार पांच वरुषें जाहली पूर्ण । येथेहि मारूतीमंदिरीं येऊन । दहा बारा दिवस जाहले ॥ ९५ ॥ दोन महिन्यापूर्वी हरिद्वारांत । माणगावाहूनी पत्र येत । त्यांत वैकुंठवासी होत । मातोश्री म्हणूनी कळविलें ॥ ९६ ॥ मातोश्रीचें जाहलें निधन । ऐंशी वार्ता ऐकून । सद्गुरू आपुला दंड घेऊन । स्नानास गेले गंगेवरी ॥ ९७ ॥ यतीला शुद्धि नुसती जाण । या शास्त्रा अनुसरुन । आले गंगास्नान करुन वासुदेवमहाराज ॥ ९८ ॥ आत्मां न राहिलें बंधन । मोकळे झाले कर्तव्यापासून । म्हणती सीताराम भक्ता लागून । कैसा येंथवरी आलासी ॥ ९९ ॥ स्ववृत्त सांगतांना । प्रेमाश्रू वाहती नयनां । केलें प्रवासवर्णना । आदरें आपुल्या स्वामींशी ॥ १०० ॥ कांहीं शास्त्राभ्यास ग्वालहेरा । केला असे तेथ पुरा । योगाभ्यास हरिद्वारा जाहला असे आमुचा ॥ १ ॥ भेटता बंधुत्वाच्या नात्यांनी । माहिती दिली असे त्यांनी आतां गुरु शिष्य म्हणोनी । लीला पुढती केली असें ॥ २ ॥ झाला जरी शास्त्राभ्यास । झाला जरी योगाभ्यास । पोहोचती जरी समाधीस । तरी समाधान न जाहलें ॥ ३ ॥ माझें समाधान करिता

एक । जो ब्रह्मांडनायक । श्रीसमर्थसद्गुरु देख । वासुदेवानंद सरस्वती ॥ ४ ॥ आधींच सकल सद्वासना । सद्गुरुदर्शनें पावती समाधाना । आता अष्ट सात्विक भावना । हृदयामाजीं उमटल्या ॥ ५ ॥ दोन्ही हस्त जोडूनी । हे गुरुभक्तशिरोमणी । बोलती गग्दद वाणीं श्रीसद्गुरुपुढे उभे राहूनियां ॥ ६ ॥ भो भगवान आपण । सत्यज्ञानानंदघन । साक्षात् परब्रह्ममूर्ति सगुण । मानवरूपें अवतरलां ॥ ७ ॥ त्रिगुणात्मक त्रैमूर्ति आपण । प्रत्यक्ष दत्त भगवान । भक्तांसी देण्या वरदान । मनुजावतार घेतला ॥ ८ ॥ नमिती सुर असुर आणि वर । नमिती संत मुनीश्वर । निवृत्त मोहांधकार । क्षणामाजीं करितसां ॥ ९ ॥ नमो नमः प्रकाशवंता । नमो नमः सद्गुरुनाथा । नमो नमः समर्था । अनन्य हा दास शरण असे ॥ ११० ॥ ऐसे शद्ब उच्चारून । भूवरी घातलें लोटांगण । गडबडा लोळले पूर्ण । बालक जैसें मातेपुढे ॥ ११ ॥ आपुलें आत्मनिवेदन । सद्गुरुनाथा केलें कथन । जणुं आत्मपुष्पसमर्पण । सद्गुरु चरणीं वाहिलें ॥ १२ ॥ पुनरपि होऊनी लीन । उभे राहती कर जोडून । निघाले उग्दार मुखांतून । त्यांचीच अभंग वाणी पुढे असे ॥ १३ ॥

" गुरु वासुदेवा परिसा विज्ञापना । दासाची करुणा । येऊं द्यावी ॥ १ ॥
तारियेले भक्त न कळे तुझा अंत । काय मी पतित । किती वानूं ॥ २ ॥
जगाच्या कल्याणासाठी अवतार । घेउनीया भार । उतरविशी ॥ ३ ॥
तुमची ब्रीदावळी पतितपावन । हे श्रुतिवचन । सत्य करी ॥ ४ ॥
पतिता करवीं वेद बोलविला । शुष्क काष्ठ केला । सजीव तो ॥ ५ ॥
साध्वी सुभगेचा पतिमृत होता । वाचविशी दत्ता । भिक्षुरुपें ॥ ६ ॥
तो तूं भिक्षुरुप घेऊनियां येशी । सीतारामापाशी । वास तुझा । ७ ॥"

तूं पतितपावन । हें श्रुतीचें सत्य वचन । याची वाटे आठवण । करूनां दिलीं भक्तानें ॥ १४ ॥ गाणगापुरीचें भिक्षुरुप । तेंच हें संन्यासी रुप । दत्त भगवान स्वस्वरुप । भेद नसे त्यांत कांहीं

॥ १५ ॥ मनीं असे एक हेत । धरोनिया आलों येथ । कीं रहावें सान्निध्यांत । अखंड श्रीगुरुरायाच्या ॥ १६ ॥ हीच वांछा सर्वदा । त्यांत अंतर न पडो कदा । बोधामृतसंपदा । अखंड दासा या मिळो ॥ १७ ।

" गुरु देव मानोनि हे एक भक्ति ।
तयांची करी; त्याकरीं येइ मुक्ति ॥
सुयुक्ती अशी हो धरी एक चित्ता ।
त्वरे आदरे तूं स्मरे एक दत्ता ॥ "

स्वये श्रीवासुदेव समर्थ । स्वयें वर्णिती वरील श्लोकांत । मुक्ति लाभाची युक्ति अंतरांत । जाणिली या सीतारामाने ॥ १८ ॥ त्याचीं दिसोनी येते सर्व कृति । कृति म्हणजे ती परब्रह्ममूर्ति । श्रीसद्गुरुनाथ हीच त्रैमूर्ति । एक श्रीगुरुदत्तात्रेय असे ॥ १९ ॥ हें निश्चित जाणून । जाय श्रीगुरुपदीं शरण । तेथ विनम्र होता पूर्ण । मुक्ति सत्य ठेविली असे ॥ १२० ॥

" गुरूहूनी देव मोठा । ऐसें समजे जो शिष्य करंटा । फुटला वैभवाचा फाटा । ऐसे संत वदताती ॥ १ ॥ गुरुदेवा बरोबरी । करी तो शिष्य अनधिकारी । भाग्य पुरुषाचा भिकारी । पुत्र जैसा ॥ २ ॥ "

प्रसिद्ध दासबोध ग्रंथ । त्यांत वदती श्रीरामदासस्वामी समर्थ । तैसा नव्हे हा भक्त । सीताराम महाराज ॥ २१ ॥ गुरुः साक्षात् परब्रह्म । ही एकचि निष्ठा उत्तम । ऐसा शिष्य अनुपम । पाहता दुजा दिसेना ॥ २२ ॥ कोणी शिष्य आला नूतन । त्याची परीक्षा पाहती सद्गुरुजन । परि येथे न कारण । परीक्षेचें उरलें असे ॥ २३ ॥ हा शरण आला वासुदेवा । वदे अखंड सन्निध ठेवा । गुरुकृपेचा बोध व्हावा । हेंच मागणें त्याचें असे ॥ २४ ॥ किती गुरुकृपेची तळमळ । चित्ता न गमे एकहि पळ । निघती मुखांतूनी बोल । करुणवाणीं काय ते ॥ २५ ॥ मी तापत्रयाग्नींत पोळलों ।

संसार सागरीं बुडालों । क्रोधादिविकारें वेष्टिलों । अज्ञानजाळें सभोवती ॥ २६ ॥ प्रभो ज्ञाननौकीं बसवूनी । कृपेचा वायु पालाणोनी । देहा तारक करोनी । तारावें मातें स्वामिया ॥ २७ ॥ इतुका जो पदीं लीन । अनन्य भावें आला शरण । त्यावरी तो दयाघन । खचित कृपावर्षाव करील ॥ २८ ॥ इतुकी निष्ठा भक्ति पाहून । सद्गुरुमनीं समाधान । शाबासकी मनांतून । दिधली असे सीतारामां ॥ २९ ॥ आज माणगांव सोडून । तप जाहलें पाऊण । मनोभूमिका कसून । निर्मळ दिसे केलेली ॥ १३० ॥ समोर केलिया स्तुति । सज्जनांस नावडे ती । आणिक थोर लोकहि ना करिती । सौजन्य असे हें दोघांचें ॥ ३१ ॥ त्यांतहि असे एक अर्थ । तेणें अभिमान होईल प्राप्त । होईल अधिकारच्युत । हा गुणासंगें दोष असे ॥ ३२ ॥ ज्ञानसागर श्रीगुरुमूर्ति । चित्तशुद्धि जाहलीं पाहती । हास्यवदन करोनी वदती । सीताराम सहोदरा ॥ ३३ ॥ कळोनी आलें तव मानस । घडावा आमुचा सहवास । रहावें तुवा सान्निध्यास । आमुचिये या स्थलीं ॥ ३४ ॥ रहावें आमुच्या सान्निध्यांत । हें सद्गुरुमुखीचें वचनामृत । जाऊनी पोहोचलें अंतःकरणात । वाटे जाता जीव परतला ॥ ३५ ॥ तनूसी चिंता होती जाळित । मन सारखें होतें पोळत । तों कृपावर्षाव होत । सद्गुरुवचनामृताचा ॥ ३६ ॥ दारिद्रें पीडिला अत्यंत । सदा असे क्षुधाक्रांत । तों यावी अकस्मात । कामधेनू द्वारासी ॥ ३७ ॥ तैसें अनेक सुकृतांचें फळ । हातीं गवसलें अविकल । पावला माझा श्रीगुरु दयाळ । मज पामरा करीं धरियेलें ॥ ३८ ॥ तों किती आनंद जाहला । हा सांगतां न ये मला । जो सर्व लाभांत श्रेष्ठ मानिला । तो हा गुरुलाभ झाला असे ॥ ३९ ॥ जें त्रिभुवनाचें वैभव । तुच्छ यापुढे असे सर्व । जो देवाधिदेव वासुदेव । त्यांनी जवळी केलें असे ॥ १४० ॥ तुळसीदास रामभक्त । रात्रंदिन रामप्रभूसी आळवीत । म्हणतीं एक बार कहो रघुनाथ । तुलसीदास मेरा है ॥ ४१ ॥ हें वाक्य एकदा तरी उच्चारा । श्रीरामचंद्र रघुवीरा । तुलसी भक्त माझा खरा । करुणा समुद्रा राघवा ॥ ४२ ॥ मग सद्गुरुचें अंगीकारवचन । ऐकतां किती सुखावे

मन । हें निष्ठावंत ज्याचें अंतःकरण । तो एकचि भक्त जाणूं शके ॥ ४३ ॥ महापुरुषांचें उग्दार । असती प्रतिज्ञेसम थोर । जैसा गज दंत बाहेर । काढितो पुनरपि आंत न घे ॥ ४४ ॥ तेंवि आपुल्या ब्रीद्रानुसार । घतला भक्ताचा सकल भार । करूनियां अंगीकार । आपुलिये शिरावरी ॥ ४५ ॥ अधिकारी जाहला पूर्ण भक्त । आतां तयाचें सकल हित । साधणे तें शाश्वत । वासुदेवसद्गुरुमाउलीसी ॥ ४६ ॥ महाराजांनी एके दिवशीं । बैसविलें आपणापाशी । अति प्रेमें वदती त्यासी । सीताराम ऐक बा ॥ ४७ ॥ " न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥ "

नाना कला कुशलता विचित्र । दिसती जगीं सर्वत्र । परि आत्मज्ञानासारखें पवित्र । ज्ञान नसे कोणतेंहि ॥ ४८ ॥ परमेश्वरासी विशेषण । दिलें असे पतितपावन । त्याचा महिमा अगाध जाण । जो ज्ञानदान करितसे ॥ ४९ ॥ प्रत्येक जीव पाहिल्यास । तो परमेश्वराचा असे अंश । परि त्याचेंच अज्ञान पतनास । कारणीभूत सदा असे ॥ १५० ॥ तरी तें स्वतःचें अज्ञान । घालवील आत्मज्ञान । मिळवून मग तो नित्य-शुद्ध-बुद्ध-मुक्त ईश्वरच पूर्ण । होईल जाण निश्चये ॥ ५१ ॥ शोक मोहरूपी हा संसार । विकारें भरला सागर । यांतूनी एकचि तारणार । आत्मज्ञान तें सीताराम ॥ ५२ ॥ आता चित्तवृत्तिनिरोधलक्षण योग । म्हणजेच समजे हा योग । करोनियां सांगोपांग । आपुला पुरे करावा ॥ ५३ ॥ मग चित्तवृतीं साक्षित्वाचा अभ्यास करून । तेणें होई आत्मज्ञान । परि पूर्ण आनंदस्वरुपीं लीन । होऊनी राहशी सीताराम ॥ ५४ ॥ ऐसें सद्गुरुच्या मुखकमलांतून । निघाले जे उपदेशामकरंदकण । ते सेवुनी पावले समाधान । सीताराममहाराज ॥ ५५ ॥ पुनरपि सद्गुरुचरण । नमिले नम्रभावें करून । म्हणती तव आज्ञा प्रमाण । सांगितलें कार्य करितसो ॥ ५६ ॥ तरी त्याचा आरंभ अवघा । कैसा करावा तेंचि सांगा । ना तरि समाराधना मार्गा । नियमितपणा न राहे ॥ ५७ ॥ असे ज्ञानेश्वराची उक्ति । मनोमार्गें जे कां जाती । ते तेथेंचि मुकती । ऐसें न होवो दयाळा ॥ ५८ ॥ म्हणोनी श्रीगणेशा । आखून द्यावा परमेशा । मग माझी

कार्यदिशा । चुकणार नाही तव कृपें ॥ ५९ ॥ शिष्यविनंति परिसूनी । सद्गुरु संतोषले मनीं । म्हणती आम्ही तुजलागूनी । साधनमार्ग तो दाखवूं ॥ १६० ॥ आधी एकाच स्थलीं आसन । मांडून त्यावरी नित्य बसून । चोवीस लक्षांचें गायत्रीपुरश्चरण । आधी करावें लागेल ॥ ६१ ॥ येवढें मोठें पुरश्चरण । कराया लागतील बहुत दिन । करावें कृच्छ्रू चांद्रायण । ऐसें मानस होतसे ॥६२॥ गुरुमूर्ति बोलती तयासी । नको कृच्छ्रू चांद्रायण करावयासी । करावें गायत्रीपुरश्चरणासी । अवश्य तुवां सीतारामा ॥ ६३ ॥ यावरी बोले शिष्योत्तम । आज्ञांकित सीताराम । म्हणती सद्गुरुनाथ पुरुषोत्तम । आज्ञा प्रमाण मज असे ॥ ६४ ॥ परि असे एक अर्जी । काय अट असे माझी । ऐकतां आपुली जैसी मर्जी । तैसें करीन पुरश्चरण ॥ ६५ ॥ सग्दुरू म्हणती मनांत । हा बालपणीं आपुला हेत । हट्ट करूनीं पुरवूनी घेत । नसे पालट जाहला ॥ ६६ ॥ मग वदती तयासी । कोणती अट घालितोसी । जरी योग्य असेल आम्हासी । तरी ती आम्ही मान्य करूं ॥ ६७ ॥ मी करीन पुरश्चरण । तें होईल संपूर्ण । तोंवरीं आपण । हें स्थान सोडूनी जाऊं नये ॥ ६८ ॥ तैसें सत्य अभिवचन । मिळावें आपणाकडून । नातरी अनुष्ठान । गायत्रीचें मज करणें नसें ॥ ६९ जैसें मायलेकरांचें भाषण । चालतसे गृहांतून । तैसेंच हें गुरूशिष्यांचें मन । येथे दिसून येतसे ॥ १७० ॥ म्हणोनी शिष्य होऊं पाहतो जरी । तरी सत्ता दावितो आम्हावरी । परि विचार करितां अंतरीं । त्याचें काय चुकतसे ॥ ७१ ॥ जो अनन्य भावें आला शरण । त्या सद्भक्तास परमेश्वरावाचून । हट्ट करावयाचें स्थान । दुजें कोठे राहील ॥ ७२ ॥ तुकोबा म्हणती दयाघना । कोणावरी सत्ता करूं नारायणा । प्रभो मायेवीण पान्हा । कोण सोडील मजवरी ॥ ७३ ॥ मग जयाचा सप्रेम दृढ भाव । माय बाप सखा बंधू देव । एकचि सग्दुरूनाथ वासुदेव । मज अनन्य स्थान तेंच असे ॥ ७४ ॥ असतो देव सदा भक्ताधीन । घेतो भक्ताचें ऐकून । अनेक रूपें नटून । कामकाज त्याचें करितसे ॥ ७५ ॥ आपुल्या करीं कंकण ।

बांधिलें भगवंताने जाण । भक्तांचें करणें रक्षण । ब्रीदावली सत्य असे ॥ ७६ ॥ मग त्या परमेश्वरांनी । वासुदेवभगवंतांनी । मंद हास्य करोनी । सीतारामासी निवेदिलें ॥ ७७ ॥ तुझी इच्छा प्रमाण । न सोडूं आम्ही हेंचि स्थान । आता चिंता दे सोडून । पुरश्चरण सुरू करी ॥ ७८ ॥ आणिक काय वदती । तूं जे इच्छितोस चित्तीं । सकल कार्यें सिद्धीस जाती । एक्या पुरश्चरणीं तुझिया ॥ ७९ ॥ आमुच्या इच्छित कार्याचा । आणि या पुरश्चरणाचा । कार्यकारणभाव साचा । काय आहे तो न कळे मज ॥ १८० ॥ तरि कृपाळू होऊन । द्यावें मशीं समजावून । म्हणजे मजवरी अनुग्रह पूर्ण । झाला असेंची समजेन ॥ ८१ ॥ भक्तजिज्ञासा पाहून । सद्गुरूमनीं समाधान । म्हणती ऐक चित्त देऊन । सांगतों मी तुज आतां ॥ ८३ ॥ या गायत्रीमंत्राची देवता । त्रिलोकाचा प्रकाशदाता । तो हा सूर्यनारायण सविता । आत्मा सकल जगाचा ॥ ८३ ॥ आत्मा म्हणजेच परमात्मा । तो ओळखणें असे रामा । तें फल प्राप्ति अनुपमा । निश्चयें होईल बा ॥ ८४ ॥ मानसीं सोपे जरा अधिक । धरूनिया सगुण रूप सविवेक । जैसें ध्यान करील उपासका होईल प्राप्ति तशीच त्या ॥ ८५ ॥ तैसेंच श्रेष्ठ निरूपाधिक लक्षित करूनी निर्गुण स्वरूप । तो स्वरुप लाभ उपासक । करूनी घेईल निश्चयें ॥ ८६ ॥ गायत्री मंत्राचा जो कां अर्थ । तो सूर्य परमात्मा साक्षात । म्हणजेच अभेदें आत्मा सत्य । हें जाणिलें पाहिजे ॥ ८७ ॥ अहंग्रहोपासना । म्हणजेच आपुल्या आत्म्याची आराधना । तद्रूप होवोनिया मना । करणें अवश्य ॥ ८८ ॥ आपुल्या बुद्धीवृत्तींचा प्रेरक । म्हणजेच असे तो चालक । तोचि असे भासक । आत्माच असे आपुला ॥ ८९ ॥ मीच जगदुत्पत्तिकर्ता । मीच असे स्थितिकारिता । मीच असे संहर्ती । सर्वोपादनभूत मीच असे ॥ १९० ॥ मीच स्वयंप्रकाशित । मीच एक ब्रह्म सत्य अनंत । ह्या आत्मज्ञानें सूर्यध्यान करित । हा प्रथम मंत्रार्थ असे ॥ ९१ ॥ प्रथम मंत्रार्थी बुद्धिभासकत्व । म्हणजेंच बुद्धीचें साक्षित्व । बुद्धिवृत्तिज्ञेय सर्व । ज्ञाता आत्मा एक असे ॥ ९२ ॥ तोच ज्ञेयशून्य केवळ । चैतन्यघन निर्मळ । तेणें विवेकबोध सकळ ।

सूर्यप्रसादें प्राप्त होय ॥ ९३ ॥ हा दृढ झालिया बोध । मग काय उरेल तेथे खेद भेद । ब्रह्मला तत्काळ होय सिद्ध । या सूर्यप्रसादाने ॥ ९४ ॥ एकदा ब्रह्मता प्रकटली । मग कर्तव्यें सकल संपलीं । प्राप्तव्यें शिल्लक ना राहिली । कृतार्थ होतो उपासक ॥ ९५ ॥ ऐसा गायत्रीपुरश्चरणाचा । आणि इष्टकार्यसिद्धीचा । कार्यकारण संबंध साचा । भक्तवर्या समजावा ॥ ९६ ॥ विश्व तैजस प्राज्ञ असून । हे क्रमाने स्थूल सूक्ष्म कारण । हे जागृतीं स्वप्नीं सुषुप्तीं जाण । हे अभिमानी तिघांचे ॥ ९७ ॥ व्यष्टि समष्टि रूपें धरून । हे गायत्रीचे पाद तीन । चौथा पाद तो विलक्षण । जो असे प्रत्यगात्मा ॥ ९८ ॥ तोच परब्रह्मस्वरूप देख । ह्या चौथ्या पादाचे उपासक । उपासना करितांती एक । ज्ञानी पुरुष जाण तूं ॥ ९९ ॥ जे असतील ज्ञानी जन । तेच ही उपासना करितील पूर्ण । सामान्य मानवाकडून । होणें कठिण असे ती ॥ २०० ॥ करीं ज्ञानी कर्तृतंत्र उपासना । करितां वस्तुतंत्र होय ज्ञाना । तें उदित जाहलिया मिथ्या ज्ञाना । बाध मग आणीतसे ॥ १ ॥ अधिष्ठानभूत आत्म्याचा । साक्षात्कार होय साचा । मग विविधरंगी पदार्थांचा लेश कांहीं राहीना ॥ २ ॥ हा निश्चय होय पूर्ण । म्हणजेच ब्रह्मस्वरूपीं मीलन । तोचि मोक्ष बापा जाण । भक्तवर्या सीताराम ॥ ३ ॥ पूर्वीचे सकळ ज्ञानी ब्राह्मण । करिती गायत्रीचें पुरश्चरण । त्याच अनुष्ठाने करून । सकल सिद्ध जाहले ॥ ४ ॥ तरी या गायत्रीचें ध्यान । स्मरोनीं करी अनुष्ठान । सर्व सिद्धी प्राप्त करून । मुक्तिलाभ करूनी घेई ॥ ५ ॥ तरी श्रीगुरुचरित्र ग्रंथ । स्वयें सांगती श्रीगुरुदत्त । त्यांतील छत्तीसाव्या अध्यायांत । गायत्री महती दिली असे ॥ ६ ॥ या गायत्रीमंत्राचीं महती । येथे न कांहीं माझी उक्ति । जें सद्गुरु स्वामी शिष्यासी कथिती । तेंच मी येथे वर्णिलें गसे ॥ ७ ॥ ऐसा हा गायत्रीमंत्र । सर्व मंत्रांत पवित्र । सकल तीर्थक्षेत्रें विसावत । या गायत्रीसन्निध ॥ ८ ॥ सर्व पापतापदुःखमूळ । नाहीसें करील गागत्री तत्काळ । येऊं पाहे जरी काळ । तरी तोहि माघारीं जातसे ॥ ९ ॥ स्वस्वरूपाचें अज्ञान । करूनियां भर्जन । ज्ञानमार्ग लक्षून । सामान्य मानवाहि वळण

लागे ॥ २१० ॥ ऐसा तो सच्चिदानंदघन । परब्रह्ममूर्ति सगुण । तोच सूर्यनारायण । प्रसन्न ज्ञानियां होतसे ॥ ११ ॥ त्याचाचि अपरोक्ष साक्षात्कार । आत्मत्वाने करुनी देणार । हें महावाक्यस्वरुप साचार । जाणिजे तूं निश्चयें ॥ १२ ॥ आतां निःशंक होऊन । करी गायत्रीपुरश्चरण । होईल तें संपूर्ण । तोंवरी आम्ही राहूं येथे ॥ १३ ॥ ऐशा सद्गुरुउपदेशासी । ऐकतां संतोष हो मानसीं । वाटे अनुग्रह जाहला मशीं । आज सद्गुरु माउलीचा ॥ १४ ॥ आणिक जवळी राहिन । ऐकतां वचन हर्षलें मन । मग निश्चयें गायत्रीअनुष्ठान । करण्याचें ठरविती ते ॥ १५ ॥ श्रीसद्गुरुच्या मुखांतून । सकल विधि घेतला समजावून । सकल नियम पाळून । शुभ दिन पाहिला आरंभा ॥ १६ ॥ सद्गुरुनाथा करुनी नमन । तयांचा अशीर्वाद घेऊन । गायत्रीचें पुरश्चरण । करावया आनंदें आरंभिती ॥ १७ ॥ हा अध्याय विसावा । असे जीवाचा विसावा । भेट जाहली सद्गूरुवासुदेवा । सीताराम भक्तासी ॥ १८ ॥ भक्ताचें करावया कल्याण । तयासी उपदेशामृत पाजून । गायत्रीचें पुरश्चरण । करावया बैसवीलें ॥ १९ ॥ आता जानकीची प्रार्थना । एकचि ध्यास लागो मना । वासुदेवनामस्मरणा । न विसंबो कदापि ॥ २२० ॥ इति श्रीसीतारामचरित्रालंकारमणी । गुंफिला असे दृष्टांतकोंदणीं । प्रकाश दाविता अंतःकरणीं । विश अध्याय गोड हा ॥ २२१ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

विंशोऽध्यायः समाप्तः ।

अध्याय एकविसावा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरूदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ ॐ नमो जी ज्ञानेश्वरा। सग्दुरूनाथा परमेश्वरा । मायबापा सज्जन माहेरा । नमो नमो नमोऽस्तु ते ॥ १ ॥ गगनाहूनी असे वाड । तुझिये ज्ञानाचें अमोल कोड । हरले उकलितां अवघड । थोर थोर महात्मे ॥ २ ॥ तूं ज्ञानामृताचा सागर । ज्ञानार्थ लाटा उठती वर । ज्ञानियांच्याच हृदयावर । जाऊनियां पोहोचती ॥ ३ ॥ मूर्खास केला उपदेश । तो न रूचे कदापि त्यास । जैसा पाहतां गर्दभास । गूळ ना आवडे कदापि ॥ ४ ॥ तैसें हित आहित । न कळे मज यथार्थ । गुंतलें मन प्रपंचांत । स्थिरता तया मुळी नसे ॥ ५ ॥ तूं ज्ञानाचा सागर । तैसाच कृपाळू अससी थोर । करिसी सदा दीनोद्धार । त्रिभुवनीं कीर्ति तुझी असे ॥ ६ ॥ लक्ष लक्ष मुखांनी एक बोली । म्हणती श्रीज्ञानेश्वर माउली । प्रसन्न होऊनी सावली करशील आपुल्या निजांगाची ॥ ७ ॥ तरी ज्ञानामृततुषार । यावा देवा ह्या हृदयावर । तेणेंचि आठव समग्र । होईल पुढील चरित्राचा ॥ ८ ॥ निघेल एकेक अक्षर । होतील त्यांचे शब्द साचार । बनतील वाक्यें थोर । श्रोत्यां बोध करितील जीं ॥ ९ ॥ तरी ज्ञानेश्वरा वासुदेवा । झाला अध्याय विसावा । आता हा एकवीसावा । रसाळ बोलवी दयाळा ॥ १० ॥ गायत्रीमंत्राचें पुरश्चरण । पूर्ण अर्थ विवरून । बैसवीलें करण्यासी अनुष्ठान । श्रीसग्दुरूंनी भक्तासी ॥ ११ ॥ एकदां जाहलिया सदय हृदय । जवळ करी सग्दुरूमाय । मग दुरी राहतील काय । सीताराममहाराज ॥ १२ ॥ मारूतीमंदिर सोडलें । श्रीराममंदिरीं आले । सान्निध्यांत राहिलें । दुज्या खोलींत सग्दुरूच्या ॥ १३ ॥ उपसर्ग न व्हावा एकमेकांस । परि समयानुसार सेवा करावयास । मिळावी वाटे भक्तास । म्हणोनी दूर परि जवळीच राहिले । १४ ॥ त्याच खोलींत राहून । करिती गायत्रीचे पुरश्चरण । शुभ दिन तो पाहून । आरंभिलें सीतारामांनी ॥ १५ ॥ नित्य पहाटे

उठोन । प्रातर्विधि उरकोन । करोनिया गंगास्नान । मग संध्यावंदन करोनी यावें ॥ १६ ॥ आधी गुरूचरित्राचें वाचन । मग सद्गुरूंच्या खोलींत जाऊन । चरणकमल वंदून । आपुल्या स्थानीं परतावें ॥ १७ ॥ एकाग्र चित्त करून । स्तवावा सूर्यनारायण । स्थिर-करूनी आसन । पुरश्चरण करावें ॥ १८ ॥ जे स्वामीमहाराज गुरूमूर्ति । मंदिरीं ज्या खोलींत राहती । त्यांनी नियम कडक रीतीं । लोकांपुढे ठेविले असती ॥ १९ ॥ आमुच्या खोलींत येऊन । स्त्रीवृद्धबालतरूण । येऊन न करावें मार्जन । काय करणें तें आम्ही करूं ॥ २० ॥ आमुच्या खोलींत कोणी जर । येऊनी करील कार-भार । तो न आम्हा रूचणार । सक्त ताकीद दिली असे ॥ २१ ॥ मग आम्ही न येथे राहणार । क्षणांत करूं ग्रामांतर । ऐसें ऐकतांची उत्तर । खोलींत कोणी न जाती ॥ २२ ॥ भाविका-करितां अंतःकरण । असे मृदु मेणाहून । पाहतांची अन्यार्थी जन । वज्रापरी कठोर असे ॥ २३ ॥ ऐसी जगालागी भीति । सद्गुरूची पडली होती । परि अंतरीं भावभक्ति । अखंड वसे ग्रामस्थांच्या ॥ २४ ॥ याचें एकचि कारण । होते भाविक श्रद्धाळू जन । आपणा हितोपदेशश्रवण । सहवासलाभ अंतरेल ॥ २५ ॥ अनेकदा वरपांगीं रोष । माता दाखवी आपुल्या बालकास । तैसाचि ग्रामवासी जनांस । सद्गुरु रोष दाविती ॥ २६ ॥ तपश्चर्या अनुष्ठान । जप तप करितां चिंतन । असावें एकाग्र मन । एकांत स्थलीं आमुचें ॥ २७ ॥ स्वरूपीं समाधि लावून । व्हावें ब्रह्मानंदी तल्लीन । आपुल्या ग्रंथलेखना कारण । उपसर्ग नसावा कवणाचा ॥ २८ ॥ संताची आवड एक मनीं । राहावें निरुपाधिकपणीं । राग-द्वेष त्या ठिकाणीं । किमपिहि वसेना ॥ २९ ॥ ऐसे हे सद्गुरुनाथ । तैसेच श्रेष्ठ सीतारामभक्त । राममंदिरीं राहत । भिन्न खोलींत आपुल्या ॥ ३० ॥ तपश्चर्या अनुष्ठान । चाललें असे पुरश्चरण । ऐसे लोटले कांही दिन । काय वर्तले पुढे असे ॥३१॥ एकदा या गुरुशिष्यांत । जाहला असे कलह बहुत । ती काय असावी मात । कथावी वाटे आपणा ॥ ३२ ॥ परी दाविला असे क्रोध । परी तो तत्वरूपीं होय बोध । म्हणोनीं तो प्रेमकलह संवाद । ऐकतां आनंद होईल ॥ ३३ ॥

॥ खोलींत जाऊं नये कोणी । हें कथिलें होतें स्वामींनी । हे संन्यासी विरक्त मनीं । सदा असती आपुल्या ॥ ३४ ॥ असे त्यांचें एकाग्र चित्त । आपुल्या लेखनकार्यांत । केव्हा तरी सारवीत । केर काढूनी खोलीचा ॥ ३५ ॥ एके दिनीं प्रभातीं । आपुलें कार्य सकल करिती । नमन करण्यास गुरुमूर्ति । खोलीत जाई हा शिष्योत्तम ॥ ३६ ॥ तों केर कचरा खोलींत । जमीन उकरली समस्त । आसनावरी धूळ बहुत । दिसून आली तेधवां ॥ ३७ ॥ गोमय आणून । वाटे अतांच घेऊं काय सारवून । परि स्वामी होते बसून । आपुलिये आसनावरी ॥ ३८ ॥ म्हणोनी सोडिला तो विचार । केला साष्टांग नमस्कार । नारायण नमोच्चार आशीर्वाद घेतला ॥ ३९ ॥ बैसले आसनीं येऊन । सुरू केलें नाम:स्मरण । नित्यासम सूर्यनारायण । ध्यानी न येती सामोरे ॥ ४० ॥ ध्येयरूप श्रीगुरुमूर्ति । दिसे एक नयना पुढती । गायत्रीचा जप चित्तीं । न सुचलासे त्या दिनीं ॥ ४१ ॥ दुसरा जप अंत:करणीं । चालला होता त्या दिनीं । गोमयें खोली सारवोनी । स्वच्छ कधी मी करीन ॥ ४२ ॥ पूर्वाश्रमापासून । सेवा घडावी म्हणून । सहवासाची इच्छा धरून । धाव घेतली येथवरी ॥ ४३ ॥ आणिक एक हृदयांत प्रेमभाव जागृत । आली संधि ही त्वरित । साधूनी घ्यावी ही उत्कंठा ॥ ४४ ॥ नित्य नियम सायंकाळ । गायत्रीजप जाहलिया कांही काळ । खोली कधी निर्मळ । करावी विचार करिताती ॥ ४५ ॥ सद्गुरुस न व्हावी उपाधि । आपुलीं व्हावी कार्यसिद्धि । ऐशीं योजिली असे संधि । स्नानास गेलिया गंगेवरी ॥ ४६ ॥ ऐसा निश्चय करूनी । गोमय ठेविलें आणूनी । पहाटे उठोनीं दुसरे दिनीं । स्नान केलें झडकरी ॥ ४७ ॥ प्रभात काळीं बाहेर । सद्गुरु आधी गेल्यावर । तितुक्यामाजी काढूनी केर । खोली सारवूनी घेतली ॥ ४८ ॥ पुनरपि केर काढून । स्वस्तिक रांगोळी काढून । मांडियेलें आसन । सामान जागीं लाविलें ॥ ४९ । तितुक्यांत देवदर्शनाकारण । आले भाविक ग्रामस्थ जन । घेऊनी श्रीरामदर्शन । स्वामीदर्शना चालले ॥ ५० ॥ त्यांनी पाहिला हा प्रकार । खोली सारवूनी काढिला केर । भयभीत जाहलें हृदयांतर । आज्ञा आठवितां स्वामींची ॥ ५१ ॥ अहो बुवा

ब्रह्मचारी । चूक मोठी केलीत खरी । आतां स्वामीची वैखरी । बोलली तैसेंच ते करतील ॥ ५२ ॥ आज्ञा केली सकलां कारण । ती तुम्हांसी ठाउकी आहे कीं नाही जाण । केरकचरा काढून । सारवण कुणी करूं नये ॥ ५३ ॥ कुणी केलिया न आम्हां रूचणार । करूं आम्ही ग्रामांतर । ते नाहीत ऐकणार । करावें काय तें समजेना ॥ ५४ ॥ तेव्हा भक्तवर्य काय बोलत । आज्ञा केलीसे तुम्हांप्रत । दोन दिवस जाहले येथ । येउनी ठाउकी नसे अम्हा ॥ ५५ ॥ खोली स्वच्छ करण्याचा आणि जाण्याचा । हा कार्यकारणाचा । संबंध असे काय साचा । तो सांगावा आम्हासी ॥ ५६ ॥ हें ना ठाउकें आम्हास । परि निक्षून बजाविलें सकलांस । ते भिणार नाहीत कवणास । जातील ग्राम सोडूनिया ॥ ५७ ॥ येवढा जनसमुदाय येत । परि कोणी ना उतरला परीक्षेंत । म्हणोनी ही तयाप्रत । अट ही घातली वाटते ॥ ५ ॥ आतां तुमचे पायीं अनर्थ । होणार असे खचित । सोडोनी जातील निश्चित । श्रीसद्गुरू आम्हासी ॥ ५९ ॥ करावया गेले स्वामी गंगास्नान । करितां कार्य कोप ना होईल म्हणून । ऐशी वेळ साधून । केलें सारवण खोलीचें ॥ ६० ॥ ही तूमची होय समजूत । परि आमुचासहवास जास्त । स्वभावधर्म ओळखत । आम्ही पूर्ण स्वामींचा ॥ ६१ ॥ यावरी महात्मे वदत । तुम्ही निर्भय असावें मनांत । आम्ही घालूं समजूत । नाना प्रयत्नें शांत करूं ॥ ६२ ॥ तुम्ही समजतां तैसें नसून । आहेत स्वामी दयाळू पूर्ण । केव्हा सिंहाचें पांघरूण घ्यावें लागतें अंगावरी ॥ ६३ ॥ परि ते सिंह नाहीत । कोपिष्ट अंतरीं नाहीत । लेकरांच्या कल्याणार्थ । सदा माउली झटतसे ॥ ६४ ॥ माउली परिस मायाळू । पाण्याहूनी पातळू । चंद्राहूनी शीतळू । ऐसा विश्वास मज असे ॥ ६५ ॥ तरी भिऊं नका म्हणून । दिधलें असे आश्वासन । आम्ही घेऊं पाहून । स्वस्थ असावें मानसी ॥ ६६ ॥ सद्गुरु येण्यापूर्वीच तेथून । आसनासी करूनी वंदन । आपुल्या स्थानासी जाऊन । अनुष्ठानासी बैसले ॥ ६७ ॥ श्री सद्गुरुवासुदेवां । कांही घडावी करें सेवा । समाधान जाहले आज जीवा । धन्य मी जाहलों

वाटलें ॥ ६८ ॥ सदा प्रेमी गुरुभक्तास । एकचि असे मनीं ध्यास । घडावी सेवा आपणास । सदैव इच्छा एक असे ॥ ६९ ॥ ज्ञानेश्वर किंवा एकनाथ । अन्य गुरुभक्तांच्या चरित्रांत । शिष्याचा असे काय हेत । अखंड गुरुसेवेचा लाभ व्हावा ॥ ७० ॥ केवढी असे आवडी । गुरुभक्तिण जाहली वेडी । दरबार गुरूचा झाडी । म्हणे धन्य धन्य मी जाहले ॥ ७१ ॥ मग आपुले सद्गुरुनाथ । बैसती केरकचऱ्यांत । निद्रा घेती धुरोळ्यांत । हें कैसें रुचावें सच्छिष्यासी ॥ ७२ ॥ व्हावेत क्लेश निवारण । हाच भाव मनीं धरून । केलें असे सारवण । या भक्ताग्रणी सीतारामाने ॥ ७३ ॥ आज उदेला सुदिन । जाहलें सद्गुरुस्थानसंमार्जन । त्या स्वानंदें अनुष्ठान । स्वमठिकेंत चाललें ॥ ७४ ॥ इकडे नित्यासम सद्गुरुनाथ । स्नान करुनी मंदिरीं येत । पाऊल टाकतां खोलींत । तों दिसोनी येत सारवलेली ॥ ७५ ॥ तों उसना राग आणूनी पुसत । होते भक्त तेथे उपस्थित । म्हणती आमुचा नियम येथ । आज कोणी असे मोडिला ॥ ७६ ॥ आमुच्या नियमाविरुद्ध कोणी । सारविलें खोलींत जाऊनी । सिंहगर्जना ती ऐकोनी । सकल लोक घाबरले ॥ ७७ ॥ दूर उभे राहून । आम्ही नाही नाही म्हणून । निरपराधी असूं पूर्ण । ऐसें पटविती स्वामींशी ॥ ७८ ॥ तुम्ही न घातलें हें सारवण । परि प्रत्यक्ष येतें दिसून । मग काय सीतारामाने येऊन । असे जागा ही सारवीली ॥ ७९ ॥ ऐसा अपराध करून । परि ना कबूल होऊन । हें सकलांचें वर्तन । आम्हांसी ना रुचतसे ॥ ८० ॥ आमुच्या आज्ञेचें उल्लंघन । जाहलें आपणांकडून । आतां गांव सोडून । येथून आम्ही जाणार ॥ ८१ ॥ कोरडी छाटी नेसून । दंड करीं घेऊन । परशु-मुद्रा बांधावयाकारण । आरंभ त्यांनीं केला असे ॥ ८२ ॥ भक्तगणांस दुःख अमित । सकल जाती शरणागत । अपराध क्षमा मागत । वारंवार प्रार्थूनियां ॥ ८३ ॥ हे भक्त होते आतां वेगळे । यांनी न कांही पाहिलें । हें सीताराम चरित्र आगळें । माहीत नव्हतें कवणासी ॥ ८४ ॥ हे ग्रामस्थची अपराधी समजून । म्हणती हें बुद्धिपुरस्सर कार्य जाण । त्याची क्षमा काय म्हणून । आम्ही आतां करावी ॥ ८५ ॥ आम्ही जो

एकदा दंड घेतला हातीं । नो पुनः न ठेवूं खालतीं । एकदा पाऊल टाकिलें पुढती । तें कदा न घेऊं माघारें ॥ ८६ ॥ स्वामी निघाले पाहून । कांही त्यांतील भक्तजन । झणीं ग्रामामध्ये जाऊन । गवगवा त्यांनी केला असे ॥ ८७ ॥ ग्रामांतील बहुत जन । आले मंदिरामाजी धाऊन । सत्य गोष्ट हीं बघून । हळहळ करिती सकलही ॥ ८८ ॥ आमचो प्रेमभावना जागृत । सद्गुरु सुखी असावेत । हें समजुनी कासया अनुचित । करावें आज्ञा मोडूनी ॥ ८९ ॥ एकाने करावी दृष्कृति । ती भोगणें पडे सकलांप्रती । तैसीच जाहली निश्चिती । कुणी केलें पाप हें ॥ ९० ॥ कुणी घातलें सारवण । म्हणती येथे येऊन । आज्ञेचा भंग करून । कोणतें दिव्य साधलें ॥ ९१ ॥ केली आज्ञा उल्लंघन । झाली अनर्थासी कारण । आतां कितीहि करितां प्रयत्न । यश त्यांतचि दिसेना ॥ ९२ ॥ तरी आधी कर्ता कोण । त्यांचीच नाही ओळखण । पुढती एक सरसावून । सांगतों म्हणे मीं ऐका ॥ ९३ ॥ कोणी एक नूतन ब्रह्मचारी । येथे गायत्रीपुरश्चरण करी । स्वामी स्नानालागीं गंगेवरी–। गेंलिया तेणें संधी साधिली ॥ ९४ ॥ त्याच वेळीं श्रीरामदर्शना । येऊनी आम्ही ती दुर्घटना । प्रत्यक्ष पाहिली नयना । पुढील भविष्य त्या कथियलें ॥ ९५ ॥ परि तयांचे निर्भय मन । सांगती भिऊं नका म्हणून । आम्ही हें संकट निवारण । करूं निश्चित तुम्ही असा ॥ ९६ ॥ अहो त्या ब्रह्मचाऱ्यांनी । जरीं केले सारवण येऊनी । मग त्याच्या पुरश्चरणीं । विघ्न कासया आणावें ॥ ९७ ॥ समर्थासी व्हावेत ना कष्ट । म्हणोनी त्यांनी केले चोखट । त्यांच्या कानावरी ही वोखट । आधी गोष्ट सांगूं नये ॥ ९८ ॥ त्यांतूनी तो शिष्य भाविक । वाटे पूर्वाश्रमींचा कोणीं नातेवाईक । करितां त्याची ही झाली चूक । क्षमा स्वामी करतील ॥ ९९ ॥ अपराधकर्ता परका कोणी । हे मानसीं समजोनी । कोपायमान जाहले मनीं । स्वामी ऐसें वाटतें ॥ १०० ॥ सांगावें नांव जाऊन । राग जाईल मावळून । ऐसें सकलांचे जाहलें मन । पुनरपि समर्थांसम्मुख भक्त येती ॥ १ ॥ संताची अंतरंगवृत्ति । एक संतचि जाणती । तेंवि सीताराम विभूति । संत निस्सीम भक्त ते ॥ २ ॥

सत्पुरुषांना राजा रंक । शत्रु मित्र दोन्ही एक । आपपर भावना देख । तेथे काही राहत नसे ॥ ३ ॥ जैसें गंगेचें उदक निर्मळ । तैसें संतांचें मन सोज्वळ । असतें सदा सर्वकाळ । यांत संशय असेना ॥ ४ ॥ एकदा श्रीकृष्णभगवंतांनी । सांगितलें कौरवालागूनी आणा सज्जन निवडूनी । ग्रामांतूनी एखादा ॥ ५ ॥ सकल शोधिली अवनी । परि सज्जन त्या न दिसे कोणी । ते पांडव वदती आम्हालागूनी । वाईट कोणी दिसेना ॥ ६ ॥ तैसें जयांचें मलिन चित्त । तैसें त्यांना सर्व भासत । तैसेंच अनुमान बांधित । दिसती संत ते पोटार्थी ॥ ७ ॥ तैसेच अप्रबुद्ध जे येथ । त्यांनी दोष लाविला समर्थांप्रत । म्हणती भेदभाव मनांत । असावा संन्यासीबुवाजवळी ॥ ८ ॥ सकलांनी घातलें लोटांगण । निघाला आशीर्वाद मुखांतून । शांतमनें नारायण । बाहती त्या लोकांसी ॥ ९ ॥ आपण योजिलेली युक्ती । ती कार्य करील निगुती । ऐसें जाणूनी वदती । समर्थांप्रती नम्रत्वें ॥ ११० ॥ आपुला आम्हा ग्रामस्थांवर । रोष जाहला असे फार । परि पटवूनी देऊं साधार । आज्ञाभंग न आम्ही केला ॥ ११ ॥ स्वामी बोलती न आम्ही रुष्ट । व्यर्थ देऊं नका मनास कष्ट । परि आमुची प्रतिज्ञा स्पष्ट । ग्रामांतर आम्ही करूं ॥ १२ ॥ म्हणतां देतों सिद्ध करून । परि सिद्ध करावयाचें काय कारण । जेथे प्रत्यक्ष प्रमाण । तेथे सिद्ध काय करावयाचें ॥ १३ ॥ गैरसमज होऊन । एखादे वेळीं भ्रम होय जाण । तदा प्रमाणें सिद्ध करून । दावावें ऐसें वाटतें ॥ १४ ॥ प्रमाण हें भ्रमाचें निवर्तक । नसे तयाचें साधक । भ्रम नाही प्रमाण सिद्ध वस्तु देख । न हो निष्पन्न कांही त्यांतूनी ॥ १५ ॥ भ्रम म्हणजे अविद्या होय । अविद्याकलित कार्य होतु जाय । त्यासी अविद्या हेंचि कारण होय । सयुक्तिक मानणें ॥ १६ ॥ तेंवि आमुच्या भ्रमाची । आपुल्या भ्रममूल कृत्यांची । सिद्धिकरणार म्हणतां साची । शास्त्रविरुद्ध तें असे ॥ १७ ॥ यावरी लोक बोलत । अनेक कार्यांत दिसून येत । जरी अज्ञान एक मानित । तरी कोणाचें मानावें ॥ १८ ॥ देहाचें असे अनेकत्व । तो जडरूप पाहूं न कांही शकत ।

आणि देहादि संघात रूप । जडवर्ग तो सोडूनी ॥ १९ ॥ जे तुम्ही अज्ञान आम्हाला । चिन्मय दृष्टियोगें त्या तुम्हाला । आपुलें नानात्व सिद्ध करण्याला । नाही कदापि येणार ॥ १२० ॥ जो जो तुम्ही भेद कल्पाल । तो तो खोटाच ठरेल । मग अभेद सच्चिदानंद राहील । एक आत्मात्र सिद्ध तो ॥ २१ ॥ अविद्याभ्रम तरी कुठला । राहील तेथे कुणाला । ओळखे आत्मस्वरूपाला । अविद्या भ्रम तेथे नसे ॥ २२ ॥ विद्यमान शरिरांत । एकचि परमात्मा नित्य । तो शुद्धबुद्ध मुक्त विश्वरूपाने नटला असे ॥ २३ ॥ वस्त्रांतल्या तंतूंहून । निराळें काय वस्त्र जाण । दागिने अनेक आणिले घडवून । परि सुवर्ण एकचि ॥ २४ ॥ मूढमति अज्ञान । तयीं रज्जुठायी सर्पभान । एखादा शिपला पाहून । मानितो रौप्य तुकडा तो ॥ २५ ॥ एखादें तरुखोड पाहूनी । दिसतें मानवासमान नयनी । तैसें मृगजल पाहूनी धाव घेतीं तेथवरी ॥ २६ ॥ तेंवि मूढ मानव । न ओळखतां आत्मतत्व । हें जगचि आहे सर्व । सत्य ऐसें समजती ॥ २७ ॥ परि जे तत्वज्ञ जन आहेत । ते आत्मरूपविलास मानितान । सन्मय चिन्मय पाहतात । म्हणती नित्य सत्य आत्मा तो ॥ २८ ॥ म्हणती आम्ही आज्ञा पाळिली समुचित । परि नूतन जो आपुल्या सहवासांत । ब्रह्मचारी येऊनी राहत । त्यांनी ही खोली सारविली ॥ २९ ॥ तयांसी आज्ञा नव्हती माहित । असे सद्भावना मनांत । आपुले मानूनियां सद्गुरुनाथ । शिष्यधर्म हा पाळिला ॥ १३० ॥ लाविलिया कस्तूरिच्या मळचांत । मौक्तिकाचें त्यास घांतलें खत । परि आपुला धर्म ना टाकित । उग्र मादक कंदर्प तो ॥ ३१ ॥ तैसा ब्रह्मनिष्ठ पुरुषांनी । तत्वबोध केला निर्विकल्प मनीं । तेथे पालथ्या घागरीवरी पाणी । उपयोग कांही होत नसे ॥ ३२ ॥ तैसेंच वासुदेवमहाराजांनी । बोधियलें ब्रह्मावर्त्तजनांलागूनीं । परि ते सर्वजण मिळूनी । नांव सांगती दूज्याचें ॥ ३३ ॥ नांव सांगूनी साधेल युक्ति । ऐसी होतीं तयांची मती । आतां काय करितील यति । परीक्षण करिती पुढती ते ॥ ३४ ॥ जेथे श्रुतिशास्त्रांसी न कळें अंत । ऐसा महिमा अतर्क्य समस्त । त्या अनंताचा अंत । लागेल काय

कवणासी ॥ ३५ ॥ खोलीं सारविणार असेल कोणी । आमुचा नियम मोडिता त्यांनी । आमुच्या प्रतिज्ञेनुसार आम्हालागूनी । ग्राम सोडणें आज असे ॥ ३६ ॥ आतां बोलती कवणासी । लागले आपुल्या तयारीसी । श्रीदत्तात्रेय नाम मुखासी । शीघ्र गतीने चाललें ॥ ३७ ॥ नाना युक्तिप्रयुक्ति करून । किती विनंति प्रार्थना करून । परि उपाय हरलें पूर्ण । स्वामींचा निर्धार दृढ असे ॥ ३८ ॥ आपुला कर्तृत्वअभिमान जाय गळोनी । तेव्हाच दिव्यांजन पडे लोचनीं । मग खरा राम दिसे नयनीं । ग्रामस्थांसी या वेळीं ॥ ३९ ॥ मग बोलती आपसात । पहिला म्हणे आधीच मी होतों सांगत । या ब्रह्मचाऱ्यामुळेच अवचित । स्वामी सोडूनी निघालें ॥ १४० ॥ मग दुसरा म्हणे अन्य उपाय करून । वळवावें सद्गुरुंचें मन । पुरश्चरणांत न आणावें विघ्न । परि न कांही साधलें ॥ ४१ ॥ तिसरा वदे ज्ञानियांना । स्वदेहाची ममता त्यांना । दोष लावूं नका स्वामींना । मुळांतच ती शिवली नसे ॥ ४२ ॥ चौथा वदे निर्ममत्व एक गुण । तो करूं आम्हीं मान्य जाण । परि कोप काय सद्गुण । मानितां तो ना येणार ॥ ४३ ॥ पाचवा वदे सकलांना । कोप नसे त्यांच्या अंतःकरणा । तत्वोपदेश केला आपणां । किती शांतता ठेवूनियां ॥ ४४ ॥ आतां ब्रह्मचारीबुवांना । सांगून करूं प्रार्थना । आमुच्या उपाययोजना । हरल्या सहावा वदतसे ॥ ४५ ॥ सातवा म्हणे ऐका समस्त । कासया जावें तेथपर्यन्त । माझा जाऊन सांगेल सुत । त्या ब्रह्मचारीबुवांसी ॥ ४६ ॥ दोघांचें हृदय निर्मळ । जैसें वाहे ज्ञानगंगाजळ । तेथे हा पोरखेळ । नाही शोभणार आठवा म्हणे ॥ ४७ ॥ प्रथम भेटीं जाहला संवादू । त्यावरुनीं होय बोधू । स्वामीजीचें हे सख्खे बंधू । असत पूर्वाश्रमांतले ॥ ४८ ॥ म्हणूनी हे बुवा ब्रह्मचारी । शोध घेत आले येथवरी । नातें असें दुहेरीं । गुरु-शिष्य आणि बंधूंचें ॥ ४९ ॥ एकाच माउलीचे सुपुत्र दोन्ही । भासताती आपणां नयनीं । शुद्ध ओजस्वी दुग्ध प्राशनीं । स्वभावसाम्यहि दोघांचें ॥ १५० ॥ दिनचर्या दोघांची समान । संध्या जप तप ध्यान । दत्तकथामृत वाचन । नियमित भोजना पूर्वी असे ॥ ५१ ॥ दोघे सदा शुचिभूत ।

सोवळे भस्मभूषित । प्रसन्न वदनीं मंद स्मित । मूर्ति तेजोमय मनोहर ॥ ५२ ॥ सदा परहिताकारण । सत्य मधुर भाषण । शास्त्रमर्यादा सांभाळून । जनमर्यादाहि पाळिती ॥ ५३ ॥ इतुकें साम्य बहिरंगी । दिसोनी येंत आपणांलागीं । तैसेंच असेल अंतरंगीं । न दिसे जरी आपणा ॥ ५४ ॥ एक काषायांबरधारी चतुर्थाश्रमी । दुजा शुक्लांबरधारी प्रथमाश्रमी । एक ब्रम्हचारी दुजा संन्यासी स्वामी । फरक काय तो एवढाची ॥ ५५ ॥ ऐंशी मतें कितीएका । विचार करिती अनेक । मग ठरविती त्यांतील मार्ग एक । शरण जावे ब्रम्हचारी बुवांसी ॥ ५६ ॥ झणीं मठद्वारीं जाऊन । सकलांनी केलें साष्टांग नमन । पुसतां येण्याचें कारण । सकल वृत्तांत निवेदिला ॥ ५७ ॥ किती पाहिले सांगून । क्षमा मागितली कर जोडून । परि स्वामींचें नाही द्रवलें मन । जातो म्हणती येथोनियां ॥ ५८ ॥ तरी आतां प्रार्थना । कांही करा उपाययोजना । आतां तारक तुम्हाविणा । आम्हासी दुजा कोणी नसे ॥ ५९ ॥ संत मृदु मेणाहूनी । पाहतां स्थिति ती केविलवाणी । क्षणीं द्रवले अंतःकरणीं । भिऊं नका म्हणूनीं सांगती ॥ १६० ॥ आपुले नांव सांगितलें यांनी । परि न ऐकलें स्वामींनी । तरि अद्यापि सुवर्णी । कस पूर्णत्वें न लागला । ६१ ॥ श्रींसीताराम । महात्म्यांनी सद्गुरुंच्या भाषणावरूनी । तीन भावार्थ ओळखोनी । मनामाजीं काढिले ॥ ६२ ॥ पहिला अर्थ अधिष्ठानरुप आत्मसाम्य । दुजा अर्थ अज्ञानसाम्य । तिजा विश्वकल्याण कर्तृत्वांचें साम्य । आपणांजवळीं पाहिलें ॥ ६३ ॥ आतां तिसरें साम्य जें आपण । इच्छित नसे आमुचें मन । मज पामरा कारण । कासया पाहिजे मोठे पणा ॥ ६४ ॥ सद्गुरुमहिमा अपार । तो काय एक न करणार । इच्छेसम होणार । सर्वस्वीं त्यांच्याच केव्हाहि ॥ ६५ ॥ जैसे क्षेत्रस्थ संकटांत । तैसेंच आपणहि आहोंत । भाक दिधली मजप्रत । श्रीसद्गुरुस्वामींनी ॥ ६६ ॥ आतां एकच उपाय योजूनीं । दोघांची सुटका व्हावी म्हणूनी । नेंत्र घेतले झाकूनी । विचार करिते जाहले ॥ ६७ ॥ राहिला न प्रेमभाव पूर्वीचा । आश्रमहि बदलला साचा । तेवि देहावरील

वस्त्रांचा । रंग तोहि बदलविला ॥ ६८ तैसाच पूर्वी अनुभूत । नव्हता मज किंचित । मग अंगावरील वस्त्राप्रत दुजारंग दिधला असे ॥ ६९ ॥ आतां काय करावी योजना । पडली असे विवंचना । विचारग्रस्त जाहले मना । म्हणती आतां काय करूं ॥ १७० ॥ माझी गुरुमाउली मज सोडून । जावया निघाली येथून । काय मार्गावरी जाऊन । आडवा पडून राहूं मी ॥ ७१ ॥ परि माझ्या मगर पृष्ठावर । चरणकमल काय पडणार । कष्टी होईल साचार माझी स्नेहाळ गुरुमाउली ॥ ७२ ॥ माझ्या अनेक जन्मींचे असह्य कष्ट । करी आपुल्या कृपेने नष्ट । नको ही कल्पना दुष्ट । इष्ट नोहे उपाय हा ॥ ७३ ॥ ऐसा विचार करित । तो बुद्धींत स्फुरण होत । मी भक्त त्यांचा निष्ठावंत । जाईन त्यांच्या बरोबरीं ॥ ७४ ॥ मना केला असे बोध । करुं नकोस आतां खेद । तुज पाहिजे ना ब्रम्हानंद । न करी विलंब कार्यासी ॥ ७५ ॥ भक्ती ज्या कां नवविधा । त्यातील एकीची धर संगत सदा । संपतील सकल आपदा । संपदा लाभेल गुरुचरणाची ॥ ७६ ॥ रामावतार सातवा । वासुदेव हा असे आठवा । तो आपणासी वश व्हावा । ठरला उपाय एक तो ॥ ७७ ॥ म्हणूनी नवविधा भक्तींतील जी कां शक्ति । आठवी असे सख्य भक्ति । तो उपाय निश्चितीं । योजिला असे सीतारामें ॥ ७८ ॥ झणीं नेत्र उघडले । आपुल्या कार्यासी लागले । मृगासन गुंडाळलें । खाकेत धरिलें आवळोनी ॥ ७९ ॥ पंचा गुंडाळला माथ्यावरी । वस्त्रें घेतली खांद्यावरी । जलतुंबा घेतला करीं । पडते बाहेरी खोलीच्या ॥ १८० ॥ हें पाहतां जन समस्त । जाहले मनीं चकित । म्हणती आश्वासन आम्हांप्रत । दिधलें हें काय करितसां ॥ ८१ ॥ जें करणें कर्तव्य । मज वश करणें वासुदेव । निमुटपणें आपण सर्व । काय होतें तें पहावें ॥ ८२ ॥ ऐसें जनासी सांगूनी । तडक निघती तेथूनी । स्वामीं-मठासी जाऊनी । काय करिती तेधवा ॥ ८३ ॥

" गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः । गुरुः साक्षात् परंब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥ "

मुखें श्लोकाचा उच्चार । साष्टांग घालिती नमस्कार । द्वय जोडूनियां कर । सम्मुख उभे राहती

॥ ८४ ॥ हा पाहूनीं प्रवासी वेष । सद्गुरु पुसती तयांस । घेतलासी हा कासयास । सीतराम या वेळे ॥ ८५ ॥ भक्त वदे तयांसी । जातों ग्रामांतर करावयासी । सद्गुरु म्हणती कासयासी । आज जाणें तुज असे ॥ ८६ ॥ शिष्य वदे निघाला आपण । मग काय करूं मी येथे राहून । करितों प्रतिज्ञेचें पालन । सद्गुरु म्हणती तयांसी ॥ ८७ ॥ मीहि प्रतिज्ञापालन । करितसों आपणासमान । जें आमुचें होय वचन । तुझें कैसें होईल तें ॥ ८८ ॥ मी याचना करितां एक । दिधली असे मंजुला भाक । म्हणूनी म्या संकल्प एक । पुरश्चरणाचा केला असे ॥ ८९ ॥ मी राहीन सन्निध । दोघांचेंच सन्निध्य निर्बाध । मग येथे काय वाद । राहिला हा न कळे ॥ १९० ॥ उभयनिष्ठ हा धर्म असे । तैशीच उभयान्वयी ती प्रतिज्ञा असे । आपुल्या प्रतिज्ञेपोटींच वसे । माझी सत्य प्रतिज्ञा ॥ ९१ ॥ आपुल्या सान्निध्यात राहून । करीन मी पुरश्चरण । एकटे कोठेहि राहून । न करणें तें मजलागी ॥ ९२ ॥ जी माय मज लेकरासमान । तीच जाऊं पाहे सोडून । मग लेकराने तिज मागून । जाणें हेंचि उचित असे ॥ ९३ ॥ श्रीगुरु म्हणतीं तयांसी । आमुची प्रतिज्ञा क्षेत्रवासीयांसी । याचा संबंध तुम्हांपाशी । कांही एक नसेची ॥ ९४ ॥ तें न मज कांही ठाऊक । मी जाणत आहे एक । जेथे आपण तेथें हा बालक । सन्निध सदा राहील ॥ ९५ ॥ चोवीस लक्षांचें पुरश्चरण । गायत्री मंत्राचें जपध्यान । मांडिलेंसी अनुष्ठान । त्याची काय वाट असे ॥ ९६ ॥ शिष्य वदे त्याची असे सोय । योजिला असे मी उपाय । जेथे जेथे गुरुमाय । होय तेथें जप करावा ॥ ९७ ॥ आपुल्या सान्निध्यें राहून । तैशीच जपसंख्या करुन । ती करोनी ईश्वरार्पण । करावी चोविस लक्षांची पूर्तता ॥ ९८ ॥ संख्यां झालिया पूर्ण । मग सांगता होईल अविच्छिन्न । हा निर्धार मनीं करून । निघालों असे मी आतां ॥ ९९ ॥ सद्गुरु म्हणतीं ही गौण कल्पना । याने मुख्य खलार्थ मिळेना । संकल्प जाहला जो एक्या आसना । तो न ये मोडतांची । २०० ॥ दिशा देश काल मंत्र । संख्या मानलेली तंत्र । हें सांगतसे शास्त्र । यांचें उल्लंघन करूं नयें ॥ १ ॥ फळइच्छा असे तुला । मग कैसा सोडिसी

शास्त्राला । म्हणती हें कामनिक शास्त्र नको मला । म्हणोनी मज नसे तें मानणें ॥ २ ॥ उत्पत्ति आणि प्राप्ति । विकृति आणि संस्कृति । ही चतुर्विध फळें मानिती । पाहतां शास्त्राधारें ॥ ३ ॥ फळ असो तें इहलोक-परलोकींचें । सार्वभौम परमेष्ठीपदाचें । हें फळ तितुकें अनित्य साचें । मज इच्छा त्याची मुळी नसे ॥ ४ ॥ हीं फळें झालीं अवांतर । गुरु म्हणती परी त्यांतील जें साचार । शिष्य वदे फळ शब्दें ज्याचा उच्चार । किमपिहि तें मज नको ॥ ५ ॥ श्रीगुरु म्हणती शास्त्राधारें जें फळ एक । असे जें कां मोक्षदायक । इच्छिताती मुमुक्षु लोक । आणि तें योग्य असे त्यांचें ॥६॥ शिष्य वदे सलोकता समीपता । सरुपता आणि सायुज्यता । या मोक्षफलांची इच्छा करितां । मुमुक्षू सर्वज्ञ ते पात्र असती ॥ ७ ॥ परि तेंहि नको मजशी । मग श्रीगुरु म्हणती तयांसी । निर्गुण सायुज्य पदासी । मुख्य फळ बोलिलें असे ॥ ८ ॥ हें आत्मस्वरुप असे सत्य । त्याला कैसें म्हणावें अनित्य । मग तयासी फळ म्हणतां न येत । शिष्य तेव्हा वदतसे ॥ ९ ॥ गुरु वदती सत्यज्ञानानंद आत्मा असे । तो स्वतःसिद्धचि सदा असे । त्यालाचि म्हणितलें असे । उपचारें फळ ऐसें । २१० ॥ मोक्ष हें औपचारिक फळ । मिळवूं इच्छिणारा मुमुक्षु केवळ । औपचारिक निष्फळ । ऐसेंच काय समजावें ॥ ११ ॥ मज तैसाहि उपचारकल्पित । फळाची-इच्छा नसे किंचित । तेंवि मुमुक्षु व्हावें न माझा हेत । शिष्य तेव्हा वदतसें ॥ १२ ॥ जो का जाहला कृतार्थ पुरुष । त्याचे उद्‌गार हे प्रत्यक्ष । मज नको भोग मोक्ष । न शोभे तुज हें सीतारामा ॥ १३ ॥ मी न जाहलों कृतार्थ । प्रौढी मिरवावी हा न हेत । आपुल्या प्रश्ना उत्तर देत । निघाले उद्‌गार शिष्य वदे ॥ १४ ॥ पुरश्चरणाचा सकल विधि । कथिला त्यासी न जाहला अवधि । तयीं ही बोलावयाची बुद्धि । कैशी सुचली ही तुला ॥ १५ ॥ हे उद्‌गार ना आतांचे । असती अंतरीं पुर्वीचे । ते आज स्पष्टत्वें वाचें । निघाले असती स्वामियां ॥ १६ ॥ हे उच्चार आपण ऐकवित । हा नसे मुळीं आमुचा हेत । इच्छेवाचूनी निघत । म्हणोनी उद्‌गार हें नाम शोभे ॥ १७ ॥ परि साधनावाचून । तुझी तृप्ति

जाहली जाण । हें आश्चर्य आम्हांलागून । वाटतें स्वामीं वदताती ॥ १८ ॥ आश्चर्याने कोणी पाहत । आश्चर्याने कोणी ऐकतात । आश्चर्याने कोणी बोलतात । ऐकती बोलती जाणती ते ॥ १९ ॥ एका अद्वितीय मूर्तिमंत आश्चर्यानेच हा लाभ होत । केव्हा कैसा श्रीगुरु पुसत । महात्मे म्हणती सांगतो ॥ २२० ॥ ज्यांनी माझा अंगीकार केला । जवळीं आपुल्या घेतला । त्या क्षणींच लाभ जाहला । अद्वितीय आश्चर्याचा ॥ २१ ॥ ती आश्चर्याची मूर्ति । असे माझ्या उभी पुढती । श्रीराममंदिराप्रति । तैसीच हृदयीं नांदतसे ॥ २२ ॥ तो कोदंडपाणि रघुवीर । असे सिंहासनावर । शोकसमुद्रांतूनी तारणार । उभा मंदिरी सर्वदा ॥ २३ ॥ तोच माझा स्वामी दंडपाणि । चालला शोकसमुद्रीं सकलांसी टाकूनी । आपण। उशीर असेल म्हणूनी । पुढती आधी मी जातसे ॥ २४ ॥ हे धर्मसंरक्षणार्थ । अवतार घेती श्रीगुरुदत्त । श्रीवासुदेवानंद सद्गुरुनाथ । टेंब्ये गृहासी येऊनियां ॥ २५ ॥ हा गायत्री पुरश्चरण सोडून । चालला असे येथून । हें सद्गुरुनाथें पाहून । बरें न मानसीं वाटलें ॥ २६ ॥ अज्ञाने होईल धर्महानि । कर्त्याची होईल कल्याणहानि । ही नयनीं पाहुनी । म्हणती न योग्य हें असे ॥ २७ ॥ धर्मकार्य व्हावें समस्त । इच्छा शिष्य-कल्याणार्थ । जाहले स्वामी कृपावंत । आपुला निश्चय घेती माघारा ॥ २८ ॥ मग श्रीगुरु-भगवंतांनी । सीताराम म्हणूनी । प्रेमभरें हाक मारूनी । फीर म्हणती माघारा ॥ २९ ॥ हवें होतें तें मिळणार । क्षणींच घेतली माधार । जाहला वादविवाद थोर । प्रतिज्ञारूपीं हट्टाचा ॥ २३० ॥ आसनबद्ध मज करून । चाललांत स्वामी मज टाकून । याची उपाधि नको म्हणून । मग म्यां रहावें येथे कासया ॥ ३१ ॥ शेवटीं हरले दयाघन । किंचित केलें हास्यवदन । निऽठावंत प्रेम अवलोकन-। करितां म्हणती काय त्यांसी ॥ ३२ ॥ वागूं तुझेंचि ऐकून । काय इच्छित असे मन । तें सांग आम्हालागून । नको काळजी करूं आतां ॥ ३३ ॥ द्वारीं उभे जे भाविक जन । तोषवावें तयांचें मन । हेंच आम्हांसी वरदान । संतोष तेणें होय आम्हां ॥ ३४ ॥ हे परिसतां

सद्गुरु सद्गदित । सांगतीं भक्तांतें तुमच्या संतोषार्थं । येंथूनी आम्ही नाही जात । माघारी घेतली प्रतिज्ञा ॥ ३५ ॥ मग शिष्य वदे तयांसी । सोडली मुद्रा त्वरेंसी । दंड ठेंवावा भूमीसी । दयाळा श्रीगुरुनाथा ॥ ३६ ॥ भक्तप्रेमी हे सद्गुरुनाथ । करीं घेंतल्या दंडासहित । श्रीरामचंद्रास विधियुक्त । वंदन करिते जाहले ॥ ३७ ॥ दंड ठेविला खालती । परशुमुद्रा सोडिती । आनंद न माय चित्तीं । सकलांच्याहि तेधवां ॥ ३८ ॥ भक्तांचें शुद्ध अंतःकरण । पाहतां देव भक्ताधीन । मोडी प्रतिज्ञा आपुली जाण । भारतीय युद्धामाझारीं ॥ ३९ ॥ शस्त्र घेईन मी ना कदा हातीं । बोलला असे यदुपति । गोष्टी सांगेन हितार्थी । प्रतिज्ञा करी भीष्मासी ॥ २४० ॥ शरणागता तारणार । हें ब्रीद जयावें साचार । शेवटी जाहला चक्रधर । प्रतिज्ञा आपुली सोडोनियां ॥ ४१ ॥ तीच येथे जाहली गत । ग्रामांतर करूं पाहत । सख्य भक्तीने आणित । सद्गुरुनाथ माघारी ॥ ४२ ॥ शरण आले ग्रामजन । त्यांसी दिधलें अभयवचन । भक्तजनांचिया भक्तीस जाण । अव्हेरिलें नसे ॥ ४३ ॥ मग सीताराम महात्म्यांनी । सद्गुरुसन्निध राहूनी । इच्छेसम सेवा करूनी । पुरश्चरण संपूर्ण केलें ॥ ४४ ॥ अन्य वेळीं शास्त्राध्ययन । केलें गुरुमुखें श्रवण । अनन्य भावें चिंतन । श्रीगुरूंचें केलें असे ॥ ४५ ॥ मग सद्गुरूंची संमति घेऊनीं । पुरश्चरणाची सांगता करूनी । अन्नवस्त्राधनांनी । संतोषित केले ग्रामजन ॥ ४६ ॥ ऋद्धिसिद्धी जयाच्या दासी । तेथे भगवान वासुदेव हृषीकेशी । तो जयाच्या असें पाठीशी । तयासी उणें काय असे ॥ ४७ ॥ पुरश्चरणाची तपश्चर्या कठिण । घेंतली श्रीगुरुनाथें करून । त्यांचा उद्देश महान । हातीं आला पूर्णत्वें ॥ ४८ ॥ श्रीगुरुमाउली दयाळ । तिने ओसंगी घेतलें बाळ । ती आपुल्यासम तत्काळ । करूनियां सोडीतसे ॥ ४९ ॥ तपोबळ ज्ञानबळ । जगत्कल्याणकर्तृत्वाचें बळ । अंगीं आणविलें सकळ । दयाळू श्रीगुरुनाथांनी ॥ २५० ॥ म्हणूनीच त्यांच्या हातांनी । महत्कार्यें आलीं घडूनी । येईल आपणां कळूनी । अनुसंधानें पुढील अध्यायीं ॥ ५१ ॥ धन्य धन्य ही गुरुभक्ति । आला परमात्मा ज्याचे

हातीं । त्या भक्तश्रेष्ठ सीतारामाप्रति । त्रिवार नमस्कार जानकीचा ॥ ५२ ॥ इति श्रीसीताराम । चरित्रालंकारमणी । गुंफिला असे दृष्टांतकोंदणीं । प्रकाश दाविता अंतःकरणीं । एकविंश अध्याय गोड हा ॥ २५३ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

एकविंशोऽध्यायः समाप्तः

अध्याय बाविसावा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ ॐ नमो जी भगवंता । सर्वव्यापका रुक्मिणीकांता । नंदयशोदेच्या सुता । नमस्कार माझा असो ॥ १ ॥ तूंच उभा अयोध्येंत । तूंच उभा पंढरींत । कटीवरी ठेवूनी हात । भक्तकाजा सज्ज सदा ॥ २ ॥ नाना नाटकीं नटधारी । घेशी वेष बहूपरीं । भक्ताचिया जाऊनी द्वारीं । राबसी तूं दयाघना ॥ ३ ॥ कोठे विणसी शेले जाऊन । कोठे भाजीची जुडी बांधिसी जाण । कोठे करिसी बाळंतपण । जाऊनी भक्ताच्या स्त्रियेचे ॥ ४ ॥ अजुर्नाची धुतली घोडी । जनाबाईची पांघरली गोधडी । तुज काय लागली गोडी । तिच्या अंबिल कण्यांची ॥ ५ ॥ बसला असलासी भोजनीं । विश्रांती घेत असतां शयनीं । भक्त-हांक ऐकतां कानीं । जासी त्वरें उठोनियां ॥ ६ ॥ हे करणें कशास्तव । तुज जवळी भक्तांची भक्तिठेव । म्हणोनी तूं देवराव । कर्जांत त्यांच्या राबतोसी ॥ ७ ॥ परि जेथे नाही भावभक्ति । वदनीं नाम ये ना श्रीपति । मग माझी काय गति । कैशी होईल न कळे ॥ ८ ॥ तरी याचक ही द्वारापाशी । लोटूं नको दूर देशीं । जवळी घेऊनी मजशी । कृपावलोकन करावें ॥ ९ ॥ तरी जवळी येऊन । इच्छा करी परिपूर्ण । आता बाविसाव्या अध्यायाचें कथन । करवी माझ्या मुखें बा दयाळा ॥ १० ॥ येथे माझा मीपणा । कांही नसे नारायणा । वासुदेवा दयाघना । सीतारामम्हाराजा ॥ ११ ॥ तुमच्या कीर्तीचा मंडप । भक्तजनां जयाचें पडप । त्याचें न ये घेतां मोजमाप । या माझ्या अल्प बुद्धीला । १२ ॥ तरी बोबडया बोलें करून । आवडीने महिमा गाईन । तो गोड घ्यावा मानून । श्रोतेयांसी विनंति ॥ १३ ॥ मागील अध्यायीं जाण । उभविलें भक्तीचें निशाण । परतले पाहूनी भगवान । वासुदेवमहाराज ॥ १४ ॥ गायत्रीपुरश्चरणाची सांगता । करवूनी घेतली भक्ता-चिया हाता । संतोषविले ग्रामस्था । अन्न वस्त्र धन देऊनिया ॥ १५ ॥ आणिक गुरुभक्तीचें उदाहरण ।

परिसावें या अध्यायातून । या ब्रह्मावर्तीं बहुत दिन । वास्तव्य गुरुशिष्यांचें जाहलें असे ॥ १६ ॥ या ग्रामांतल्या गंगेकाठीं । अंदाजें दोन मैल पाहतां दृष्टीं । पसरली असे वाळवंटीं । पुळण बारीक वाळू अफाट ॥ १७ ॥ ही जईं ग्रीष्म काळांत । सूर्यकिरणांनी तप्त होत । त्यावरूनी चालण्याची ताकत । सामान्य मानवाची न होय ॥ १८ ॥ जैसा भूप कृपाळू थोर । परि कांहीजणांस मिळे अल्प अधिकार । ते प्रजेंस सदा दुखविणार । तोच प्रकार येथे असे ॥ १९ ॥ प्रत्यक्ष जगाची गंगामाय । हरवी मानवांचें तापत्रय । परि काठचे वाळुकण देती होय । दुःख सदा जनासी ॥ २० ॥ ऐशा तप्त वाळवंटांत । न जाय सायंकाळपर्यंत । चुकून जरी कोणी जात । होरपळूनी तो जातसे ॥ २१ ॥ ऐशा अग्निसम तप्त वाळवंटांतून । नित्य भर उन्हांतून । अनवाणी चालत जाऊन । येती स्नान करूनी यतीश्वर ॥ २२ ॥ ऐशा असह्य यातना साहून । जाती येती हें पाहून । दुःखी होती ग्रामस्थ जन । पण उपाय कांही तेथे नसे ॥ २३ ॥ ऐशा त्या ब्रह्मनिष्ठ जितेंद्रियगणाग्रणीं । यतीश्वर योगिवर्यांनी । नाही दाखविला मनीं । यत्किंचितहि तिटकारा ॥ २४ ॥ बहिर्दिशेस जाऊन । आलियावरी गंगास्नान । करावें हा नियम जाण । नाही चुकला कदापि ॥ २५ ॥ यतिधर्म पाळूनी । राहिलें पाहिजे यतींनी । मृत्युभय न ठेवितां मनीं । धर्मनिष्ठ सदा असावें ॥ २६ ॥ ही धर्मनिष्ठ भावना । पूर्ण नांदती होती मना । म्हणोनी असह्य यातना । सोशिती हे महाराज ॥ २७ ॥ आपुलाच धर्म खरा । परधर्माहूनी बरा । या गीतान्तर्गत उग्दारा । स्मरण नित्य हृदयांत ॥ २८ ॥ मग आपुला धर्म सनातन । पाळावें हें बंधन । हातीं बांधिलें कंकण । सोडूं नये कदापि ॥ २९ ॥ कुमारशिक्षा नामें ग्रंथ । असे पूर्ण संस्कृत । उपदेशिली असे त्यांत । धर्मनीति पहावी ॥ ३० ॥ ऐसे धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वरीच अवतार । तैसा वासुदेवानंदांस जगभर । ईश्वरत्वाचा मान मिळे ॥ ३१ ॥ ऐशी श्रीगुरुमाउली । ज्या शिष्यास गवसली । त्याची सकल गेली पुसली । अज्ञानकाजळी हृदयींची ॥ ३२ ॥ म्हणूनी ही गुरुशिष्यांची जोडी । न भीतसे

अग्नींत घेण्या उडी । धर्मरक्षणार्थ आवडी । तातडीं येथे नित्य असे ॥ ३३ ॥ आतां पूर्वानुसंधान । हें गंगातीर विशाल पूर्ण । वाळवंटीं सूर्यकिरण । अग्नीसम ते तप्त होती ॥ ३४ ॥ मग सुटे जईं तुफान । भयंकर वावटळ होऊन । धुरळयासम वाळू उसळून । दश दिशा व्यापूनी टाकीतसे ॥ ३५ ॥ वालुकाकणांच्या लाटा थोर । फिरती वाऱ्याच्या बरोबर । जिकडे तो वाहणार । आदळती वाळुकाराशी सर्वत्र ॥ ३६ ॥ ऐसा प्रवाह अंतराळांतून । वाहे भराऱ्या मारून । या या प्रसंगास येथे जाण । अंधी ऐसें बोलती ॥ ३७ ॥ असा कोणी या अंधींत । सापडे त्याची काय गत । कोणी गंगाप्रवाहांत । उडून जाय कोणी ॥ ३८ ॥ तेथील असती रहिवासी जन । तयां असे अंधी येण्याची पूर्व जाण । तईं जाती तातडी करून । आपापल्या निवांत स्थलीं ॥ ३९ ॥ ही महाभयंकर अंधी । येईल कवण्या वेळीं कधीं । घटका दोन घटकाहूनी अवधि । कमी अधिक वेळ कधी असे ॥ ४० ॥ नवखा मनुष्य या अंधींत । सांपडे महाप्रसंगांत । त्याची काय अवस्था होत । ती पुढती आतां परिसावी ॥ ४१ ॥ श्रीसीताराममहाराजांचे संगतीं । शिरोळचे शंकरराव कुलकर्णी येती । वेदाध्ययन करण्याप्रति । ब्रह्मावर्ती स्वामीजवळी ॥ ४२ ॥ हे द्वय शिष्य मिळूनी । सायंसंध्येंकारणीं । सायंकाळीं एके दिनीं । जाती स्नानास गंगेवरी ॥ ४३ ॥ दोघांचें जाहलें स्नान । जाहले संध्या-वंदन । निघाले यावया कारण । पुनरपि राममंदिरासी ॥ ४४ ॥ तों महाभयंकर । तुफान वारा चौफेर । उडो लागली गगनांतर । अफाट वाळू-वावटळ ॥ ४५ ॥ ऐसे दोघे या अंधींत । सापडले अकस्मात । बसती फटकारे जबरदस्त । वाळूचे सर्वांगावरी ॥ ४६ ॥ जैशा सुया अंगा बोचती । कण नाकीं कानीं जाती । वस्त्रें अंगावरीं न राहती । उडो पाहती सारखीं ॥ ४७ ॥ वाळूचे लोट आकाशीं । पाहतां न येई एकमेकासी । जैसी जाहली असे निशी । अंधार दाटला चोहोकडे ॥४८॥ नेत्र उघडूनी पाहतां न येई । पुसों कुशल ऐकूं न जाई । श्वासोच्छ्वास करणें कठिण होई । मृत्युजबडयांत सापडले ॥ ४९ ॥ पाहतां प्रत्येक प्राण्यासी । एक अप्रिय असे मानसीं ।

श्रीराम मूर्ती. ब्रह्मावर्त (जि. कानपूर).



श्रीराम मंदिर व अंताजीपंताचा घाट, ब्रह्मावर्त (जि. कानपूर)

सदा सर्वकाळ भय त्यासी । मृत्यूचें पाठीशी उभें असे ॥ ५० ॥ परि अज्ञानरूपी हा मृत्यु जिंकूनी । घेतला होता सीताराममहात्म्यांनी । हें प्रेमकलहावरूनी । कळोनी येईल श्रोतेयां ॥ ५१ ॥ आधिव्याधिदुरित । याची नसे कांही खंत । दुःख मात्र अंतरेल संगत । एका सद्गुरुमाऊलीची ॥ ५२ ॥ म्हणोनी मृत्युभयापरिस थोर । वियोगव्यथा ही अपार । तिचेचि भय फार । वाटत होते सीतारामा ॥ ५३ ॥ ही एक सदिच्छा मनांत । दुसराहि त्याबरोबरी हेत । दुजी असे संगत । शंकरशास्त्री शिरोळकरांची ॥ ५४ ॥ ना तरी या अंधींत जाण । योगसमाधी लावून । बसले असते हे तपोधन । कांही काळपर्यन्त ॥ ५५ ॥ श्रीपांडुरंगाचा परम भक्त । नामदेव थोर संत । श्रीज्ञानेश्वरमहाराजांसवें जात । तीर्थयात्रा करावया ॥ ५६ । चालले वाळवंटांतून । नामदेवासी लागली तहान । होते जीवन्मुक्त पूर्ण । भागविली असती तृषा त्यानी ॥ ५७ ॥ किंवा ज्ञानेश्वरांचा धरूनी हात । उतरूनी एखाद्या खोल विहिरीत । पाणी पिऊनियां येत । कठिण नव्हतें त्यांस कांही ॥ ५८ ॥ परि तृषाक्रांत अवघे तेथील जन । तडफडती लागतां तहान । हें नामदेवें पाहून । न सुचे उपाय कांही त्यांसी ॥ ५९ ॥ त्यांचे दयार्द्र अंतःकरण । तेथें भूतदया नांदते पूर्ण । दुजे तृषार्त पाहून । आपुली तृषा काय निवारावी ॥ ६० ॥ म्हणूनी भक्तरक्षक जो भगवान । तो पांडुरंग दयाघन । त्यासी करुनी प्रसन्न । घेतलें भक्तीबळाने ॥ ६१ ॥ तो प्रदेश निर्जळ । तेथे विहीर भरली तुंबळ । स्फटिकासम निर्मळ । कायमचें जळ केलें असे ॥ ६२ ॥ संताचें अंतःकरण । सर्वांभूतीं दया हेचि धन । तेंच वेंचावें जनहिताकारण । भूषवी तयां ही थोर वृत्ति ॥ ६३ ॥ तैसेच हे दुजे संत । श्रीसीतारामहाराज परम भक्त । सापडले होते अंधींत । गंगाकिनारीं वाळवंटीं ॥ ६४ ॥ आणिक या वालुकायम परिसरांत । सांपडले अंधीत । आणिक कितीएक ग्रामस्थ । सापडले दिसताती ॥ ६५ ॥ जाहले असती हताश । प्राण जाहले कासावीस । शब्द न ये मुखास । उठती पडती भूमीवरी ॥ ६६ ॥ स्वयें कठिण प्रसंगांत । प्राण तेहि जाऊं

पाहत। परि दयासागर हृदयांत। चिंता वाहती इतरांची ॥ ६७ ॥ म्हणूनी सकलांच्या संकटमोचना। मांडिली असे प्रार्थना । हे भक्तवत्सला वासुदेव दयाघना। धाव पाव बा या आकांतीं ॥ ६८ ॥ या अफाट वालुका-सागरांत। सांपडलो प्रभो अंधीत। कोंडिले प्राण मूर्च्छित। सोडवी येऊनी सकलांसी ॥ ६९ ॥ मत्स्य जैसा तोयाविना। वत्स जैसा धेनूविना। तैसें आतां तुजविना। बुडतील जन हे संकटीं ॥ ७० ॥ मेघमार्ग लक्षून । चातक पाहे रात्रंदिन । तैसे लागले माझे नयन। श्रीवासुदेवा तुझ्या मार्गाकडे ॥ ७१ ॥ आमुच्या हातूनी होती अक्षम्य चुका । त्या क्षमा करी जगन्नाययका । देहान्त शासन चुकलिया बालका। माता काय देतसे ॥ ७२ ॥ गजेंद्र सापडला नक्रदाढेंत। करुण स्वरें तुज बाहत। प्रल्हादाची हाक ऐकतां त्वरित। घेशी उडी क्षणार्धें ॥ ७३ ॥ ऐशा प्राणप्रयाणसमयींच्या आर्त भावा । आठवोनी वासुदेवा । मांडिला असे धावा। सीताराममहाराजांनी ॥ ७४ ॥ जो भक्तमानसवासी भगवंत । जवळीच असतो सदोदित। भक्तमनोभाव पाहत। धाव तैशी घेतसे ॥ ७५ ॥ धावा प्राणांत अवस्थेंत । मांडिला सापडूनी अंधीत। त्याचीं जाणीव मंदिरांत। जाहली सद्गुरुमहाराजांना ॥ ७६ ॥ ओढ लागली अपार। मन खेचूं लागलें बाहेर। एक सारखा आर्त स्वर। कानावरी येतसे ॥ ७७ ॥ सांपडला आहे कोणी संकटांत। कोणीतरी हाका मारीत । आपुली सहायता मागत । जाणीव होऊं लागली ॥ ७८ ॥ झणीं उठले योगीश्वर । आले मंदिराच्या बाहेर । दृष्टि फिरविली चौफेर । तों अंधी दिसली वाळवंटीं ॥ ७९ ॥ या अंधीची कल्पना । पूर्ण होती समर्थमना । या संकटीं सापडूनी प्रार्थना। कोणी करिताती जाणिलें ॥ ८० ॥ इतुकें निश्चित कळल्यावर। मग स्वस्थ कसें बसविणार। दुजें कर्तव्य कां सुचणार । दीनोद्धारक या वासुदेवा ॥ ८१ ॥ एके दिनीं दुपारीं । आणिली मागूनी माधुकरी । ती अन्नाची झोळी खुंटीवरी । अडकवुनीयां ठेविली ॥ ८२ ॥ जाहला असे सूर्यास्त। व्यथा जनांची ऐकूनी घेत। दीनांच्या संकट-निवारणार्थ । परिहारोपाय सांगत ॥ ८३ ॥ मग

सूर्यास्त झालियावर । भोजन न करिती यतीश्वर । गंगेंत तें सोडिती अखेर । करिती मत्स्यांस तृप्त ते ॥ ८४ ॥ ऐशी जयाची मनोवृत्ति । दुजियांचीं दुःखें निवारिती । मग या वेळीं स्वस्थ चित्तीं । कैशापरी बसवेल ॥ ८५ ॥ सभोंवार पाहून । तेथील जनांस करिती प्रश्न । कोणी आपुल्या मंडळींतून । गेले काय गंगेवरी ॥ ८६ ॥ ऐसें पुसतां यतीश्वरांनी । सांगती सकल एकमुखांनी । ब्रह्मचारी बुवा कुलकर्णी । गेले असती गंगेवरी । ८७ ॥ होऊनियां कीर्तिवंत । उदो उदो व्हावा जगांत । हा नव्हता मुळी हेत । समर्थांच्या मानसीं ॥ ८८ । परि कस्तूरी आणिली जपून । ठेविली असे झाकून । तरि तिचा परिमळ जाण । चहूं दिशांसी पसरतसे ॥ ८९ ॥ तळपतां सूर्यनारायण । किती ठेवाल झाकून । तो अंधकार जाण । कवणासही देईना ॥ ९० ॥ तैसी ही गुरुमाय । अवतरली गुरु दत्तात्रेय । परोपकारार्थ सदा सदय । हृदयसागर उचंबळे ॥ ९१ ॥ सकल कर्तव्यें टाकून । शोकाकुल जाहलें मन । जाती त्वरित उठून । आपुल्या निवासस्थानासी ॥ ९२ ॥ कवाड घेतले लावून । समाधि लागली असे जाण । अद्‌भुत दिव्य योजना केली जाण । नाही दिसली कवणासी ॥ ९३ ॥ किती हृदयीं कळकळ । सांगताहि लागेल वेळ । किती सद्‌गुरु दयाळ । काय सामर्थ्य पाहावें ॥९४॥ किती शक्ति अंतर्गत । किती अनुभव घेती भक्त । वर्णिल्या कथा पुराणांत । कळूनी येती पाहतां ॥ ९५ ॥ तारायंत्राहूनी चपळ गति । ऐशा मनोवेगाने धावती । इच्छित स्थळी जाऊनी थडकती । दाविती नवल जनांसी ॥ ९६ ॥ एकाच वेळीं घेणें अनेक रूपें । मठासी लावूनी दृढ कुलुपें । अंतर्धान शक्तीने सूक्ष्म रूपें । प्रकट होणें बाहेरी ॥ ९७ ॥ वाहत्या जलावरी छाटी ठेवून । तिजवरी बैसून जावें तरून । बुडल्या मानवाची नौका जाण । करखुणांनी आणावी तीरासी ॥ ९८ ॥ थोडया अन्नांत जेविती सहस्र । पांगळा चाले भरभर । मुका श्लोक म्हणे साचार । भोजन करितां पंगतीं ॥ ९९ । अंगाऱ्याची एक चिमुटी । लाविता एकदां ओठी । ती दिव्य रसायनघुटी । जातां पोटी काय करी ॥ १०० ॥ करी अभ्यासावाचून । कीर्तन आणि पुराण ।

श्रोते होऊनी तल्लीन । श्रवण करिती प्रेमभरें ॥ १ ॥ ऐसें दयादृष्टीनें पाहून । मूढांस उपजविती ब्रह्मज्ञान । निजदर्शनमात्रेंकरून । नास्तिका करिती आस्तिक ॥ २ ॥ कमंडलूतील तीर्थ शिंपून । मृतास सजीव करून । वंध्या नारीस पुत्ररत्न । आशीर्वादें होतसे ॥ ३ ॥ जैसे श्रीगुरुचरित्रांत । श्रीनृसिंह सरस्वती श्रीगुरुदत्त । द्विजकुमार जाहला मृत । केला जिवंत तयांनी ॥ ४ ॥ तैसीच श्रीवासुदेवानंद सरस्वतींनी । सत्ता मृत्यूवरी गाजवूनी । कोनकरांचा मृत पुत्र जिवंत करूनी । बुडोनी मृत झाल्या ब्राह्मणा तारिलें ॥ ५ ॥ तेंवि हे थोर संत । किती काळ राहतील गुप्त । मूळ स्वरूपीं समाधींत । मानवरूपांतूनी जाती ॥ ६ ॥ जो मृत्यूवरी करी मात । पंचमहाभूतें जया अंकित । लोकपालक तो महावात । शांत करी क्षणार्धें ॥ ७ ॥ इकडे वाळवंटांत । सापडले होते दोन भक्त । अंधीरूपी मृत्युमुखांत । मोकळे झाले क्षणार्धे ॥ ८ ॥ सर्वांगीं दुःसह मार देत । बारीक वाळू महावात । तो मंद जाहला त्वरित । श्वासोच्छ्वास होऊं लागला ॥ ९ ॥ निर्भय होऊनियां मनीं । नेत्र उघडिले दोघांनी । अति आनंद मुखांनी । बोलून दाविती एकमेकां ११० ॥ चहूं दिशांस विलोकून । पाहतां आलें दिसून । संतोषित अवघे जन । मार्ग धरिती गृहाचा ॥ ११ ॥ दुःखचिंताभयरूपी अग्नीत । पडलों होतों होरपळत । तों गुरुकरुणामेघ कृपावृष्टि होत । शीतळ शांतिसुखाची ॥ १२ ॥ ऐशा या जीवनदात्याचें । माझ्या त्या सद्गुरुमाउलीचें । किती उपकार वर्णूं वाचें । न कळे वाटे सीतारामा ॥ १३ ॥ प्रेमाश्रूंनी वाहती नयन । भूलिंगास घालिती स्नान । शांत जाहलियावरी मन । उठती सीताराम आणि कुलकर्णी ॥ १४ ॥ कांही नव्हल देखून । लेकरांस घाई होय जाण । मातेपाशी जाऊन । कधीं सांगेन ती गोष्टी ॥ १५ ॥ तैशीच येथे जाहली गत । जाहला तो चमत्कार अद्भुत । तो सांगावा आतां त्वरित । आपुल्या सद्गुरुमाउलीसी ॥ १६ ॥ धुळीचे वाळूचे किती थर । होते सर्वांगावर ते झाडूनी टाकिले समग्र । वस्त्रें नीट सावरलीं ॥ १७ ॥ पुनरपि गंगेवरी जाऊन । केलें हस्तपादप्रक्षाळण । कमंडलु घेतले

भरून । निघाले तेथून दोघेहि ।। १८ ।। श्रीसद्गुरुकृपेंकरून । मार्गीं भेटले कांही जण । त्यांसमवेत अवघेजण । राममंदिरीं पातले ।। १९ ।। तों सद्गुरुमूर्ति खोलींत । बैसली हौती समाधींत । पुसतां कथिलासे वृत्तांत । इतर जनांनी सकलहि ।। १२० ।। काय करिती समाधींत । याचा कवणासी न कळे अर्थ । जेथे वेदहि कुंठित । तेथे मानवाची काय कथा ।। २१ ।। श्रीगुरुदेवदत्त नामोच्चार । करूनियां थोर गजर । घातला साष्टांग नमस्कार । या प्रेमळ सद्भक्ताने ।। २२ ।। तो नामघोष ऐकिला कानीं । खोलीमाजीं सद्गुरुनी । येती बाहेर खोलीतूनी । बैसती आसनीं पूर्वीच्या ।। २३ ।। मग श्रीसीताराममहात्म्यांनी । तैसेंच शंकर कुलकर्णी यांनी । संकटमुक्त भक्तद्वयांनी । दंडवत कितेक घातले ।। २४ ।। प्रेमाश्रू वाहती नयनीं । वरचेवर हास्य वदनीं । श्रीसद्गुरुमुख विलोकूनी पुनरपि घालिती दंडवत ।। २५ ।। तदा आशीर्वाद वचन । निघालें सद्गुरूच्या मुखांतून । नारायण शुद्ध पावन । सुधासिंचन वाटलें तें ।। २६ ।। आपणा सन्निध बसवून । अंधीवृत्त घेतलें ऐकून । त्या आनंदाचें वर्णन । न ये कथितां मजलागो ।। २७ ।। श्रीदत्तकृपा बहुत । सुखरूप आम्हां भेटलांत । होतों अत्यंत काळजींत । आनंदलाभ जाहला ।। २८ ।। ऐसें बोलतां श्रीगुरुमूर्ति । हस्त जोडूनी उभे राहती । आरंभिली असे स्तुति । या सीतारामभक्ताने ।। २९ ।। नमो नमो वासुदेव । नव्हे नव्हे तूं मानव । श्रीपाद श्रीवल्लभ । यतीश्वर तूं श्रीगुरुदत्त ।। १३० ।। दंड कमंडलू हातीं । नयनमनोहर ही यतिमूर्ति । अखंड आमुच्या हृदयावरती । विराजमान होऊं दे । ३१ ।। श्रीवासुदेवानंद सरस्वती नाम थोर । अमृताहूनी असे मधुर । खेळत राहावें जिव्हेवर । स्वानंदानें सर्वदा ।। ३२ ।। त्रैलोक्यपावन चरित्र । श्रवणीं पडावें अहोरात्र । तुझी सगुण मूर्ति पाहोत नेत्र । प्रेमभरें सर्वदा ।। ३३ ।। करें घडावी अखंड सेवा । नित्य दर्शनलाभ व्हावा देह । सद्गुरूकार्या झिजावा । पायीं घडाव्या प्रदक्षिणा ।। ३४ ।। या कलियुगांत । द्विभुज अवतार श्रीगुरुदत्त । वासुदेव नाम हें कृपावंत । धारण केलेंसी दयाळा ।। ३५ ।। आलासी संकटीं धावून । काढिलें

मृत्यूच्या दाढेंतून । हें अवलोकिती सकल जन । मागतों वरदान हें प्रभो ॥ ३६ ॥ अनन्य भावें-करून । हें चरित्र जो करील पठण । त्याचें संकटनिरसन । व्हावें प्रभो तव कृपें ॥ ३७ ॥ सद्गुरूच्या मुखांतून । निघाला शब्द नारायण । आनंदित अवघे जन । मिळाला आशीर्वाद म्हणूनियां ॥ ३८ ॥ श्रीवासुदेवानंद सरस्वती । श्रीवासुदेवानंद सरस्वती । श्रीवासुदेवानंद सरस्वती । त्रिवार झाली गर्जना ॥ ३९ ॥ हीच प्रार्थना वासुदेवचरणा । ध्यास लागो एकचि मना । जागृत ठेवी नामःस्मरणा । जानकीस या सर्वदा ॥ १४० ॥ इति श्रीसीतारामचरित्रालंकारमणी । मुंफिला असे दृष्टांतकोंदणीं । प्रकाश दाविता अंतःकरणीं । द्वाविंश अध्याय गोड हा ॥ १४ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

द्वाविंशोऽध्यायः समाप्तः ।

अध्याय तेविसावा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्री वासुदेवाय नमः ॥ ॐ नमो वासुदेवा । ॐ नमो जी सदाशिवा । ॐ नमो जी महादेवा । श्रीत्रिगुणेश्वरा नमोऽस्तु ते ॥ १ ॥ लीलालाघवी तूं परमेश्वर । त्रिगुणरहित तूं निराकार । परि झालासी साकार । भक्ताकारणें तूं दयार्णवा ॥ २ ॥ जी जी इच्छा भक्तमानसीं । त्या त्या रूपें तूं दर्शन देसी । विलंब न लागे तयासी । नट नाटकी तूं परमेश्वरा ॥ ३ ॥ स्कंधी कावड घेऊनी । एकनाथाघरीं वाहिलें पाणी । चंदन देसी घासोनी । तुझ्याच पूजेसी दयाळा ॥ ४ ॥ चालले काशीविश्वेश्वराहूनी । नाथ गंगाकलश घेऊनी । रामेश्वरा घालण्या पाणी । यात्रेकरू समवेत ॥ ५ ॥ भक्तमहिमा वाढवावा । हे तुज आवडे देवाधिदेवा । आडवा झालासी केशवा । गर्दभरुप तूं घेऊनियां ॥ ६ ॥ भक्तपरीक्षेकारण । लागली असे तुज तहान । गंगा घेतलीस पिऊन । रामेश्वरा तूं दर्शन दिलें ॥ ७ ॥ ऐसा तूं मायालाघवी । न कळे तुझी थोरवी । तरी तुझें एकचि रूप आठवीं । श्रीगुरुदत्ता दयाघना ॥ ८ ॥ तरी नमो नमो जी श्रीगुरुदत्ता । श्रीपाद श्रीवल्लभ अवधूता । आतां यावें साह्यार्था । तेवीसाव्या अध्यायाकारणें ॥९॥ जाहलें मागील अध्यायांत । सद्गुरु असतां ब्रह्मावर्तांत । संगें सीताराम भक्त । करिती तपानुष्ठान आगळें ॥ १० ॥ गंगावाळवंटीं अंधींत । सापडले सीताराम भक्त । प्राण कासावीस होत । मृत्युजबडयांत सापडले ॥ ११ ॥ परि वृत्ति असें सावधान । दुजे न आठवे कांही जाण । एकचि श्रीवासुदेवस्मरण । करूनी धावा मांडिला ॥ १२ ॥ सद्गुरुमाऊली थोर । ती कधी न राही दूर । एकदा सद्भक्ताचा धरिला कर । मग त्या नित्य तीं सांभाळी ॥१३॥ तेंवि धावा ऐकतांचि कानीं । लागली समाधि त्या क्षणीं । वायु शांत होऊनी । अंधी सकल मावळली ॥ १४ ॥ गुरुशिष्यांची जाहली भेटी । तेणें आनंद न माये पोटीं । श्रीसद्गुरुवरी वृष्टि । स्तुतिसुमनांची करिती भक्त प्रेमें

। १५ ॥ पुढती या ब्रह्मावर्तीं । कांही दिवस गुरुशिष्य राहती । जडली ग्रामस्थांची भक्ति । सद्गुरुचरणीं अनन्य भावें ॥ १६ ॥ मग सीताराममहात्म्यांनी । यथाविधि अभ्यास करूनी । श्रीगुरुसन्निध बसूनी । वेदान्तशास्त्र अवलोकिलें ॥१७॥उपनिषदें ब्रह्मसूत्रें भगवद्गीता । प्रस्थानत्रयी संज्ञा या तीन ग्रंथां । तयां तैसें आचार्यभावार्था । श्रीसद्गुरुमुखें श्रवण केलें ॥ १८ ॥ प्रातःकाळीं स्नानादि उरकून । उत्तर पूर्वाभिमुख बसून । गुरुशिष्यांचें अध्ययनाध्यापन । राममंदिरीं नित्य चाले ॥ १९ ॥ गायत्रीचें मंत्रपठन । चोवीस लक्षांचें हो परिपूर्ण । तेणें शुद्धान्तःकरण । सीताराम महाराजांचें जाहलें असे ॥ २० ॥ ऐसा श्रोता श्रद्धाभक्तियुक्त । श्रवण करितांच समजूनी घेत । सकल शास्त्रांचें हृद्गत । चाले आणिक मनन एकान्त स्थलीं ॥ २१ ॥ मननाच्या वेळीं जो काढीत । अर्थ उपपत्तीनुसार निश्चित । तो जीवब्रह्मैक्य-तत्त्वार्थ । म्हणती मी पूर्ण ब्रह्म असे ॥ २२ ॥ ऐसा निदिध्यास मनांत । अखंड वृत्तीने चालत । विजातीय प्रत्ययाचा तिरस्कार करित । एक लक्ष एक्याच ध्यानीं ॥ २३ ॥ ऐशी मनाची एकाग्रता राखून । सच्चिदानंदीं होती तल्लीन । बसती ज्ञानसमाधि लावून । अभ्यास करावया कारणें ॥ २४ ॥ बहुत जन्मींची होती आस । सद्गुरुचें व्हावें दास । ती पूर्ण करूनी ब्रह्मरस । स्वकरें मज त्वां पाजियेला ॥ २५ ॥ ही त्यांची असे वचनोक्ति । त्यासम ते सदा वागती । गुरुमर्यादेचें पालन करिती । किती गोचर होय आपणांसी ॥ २६ ॥ ऐशा ब्रम्हानंदसागरीं । तल्लीन होऊन निजांतरीं । गुरुपदांबुजी भरारी । घेऊनी मधुररस चाखिती ॥ २७ ॥ ऐसा आत्मतुल्य जाहला जो कृतार्थ । सीताराम भक्त श्रेष्ठ त्या ज्ञानी शिष्यासमवेत । निघाले श्रीवासुदेवानंद सरस्वती ॥ २८ ॥ उत्तरपंथ लक्षून । बद्रिकेदार बद्रीनारायण । गंगोत्री-जन्मो त्री दर्शन । घ्यावया यात्रेस निघाले ॥ २९ ॥ या खडतर । बर्फाच्छादित पहाडावरून । दुःसह कडक थंडीतून । दुस्तर असे चालणें ॥ ३० ॥ येथे पाय जाती उलून । पाहिजे कापडी पादत्राण । अंगावरी पांघरूण । घोंगडी पाहिजे सर्वदा ॥ ३१ ॥ ऐसा अनुभव तयांचा ।

ऐकला असे यात्रेकरूंचा । तरी परिणाम हवेचा । तयांप्रति होतसे ॥ ३२ ॥ परि हे यात्रेकरू दोन्ही चालले असतां अनवाणी । नियमित आपुल्या वस्त्रप्रावरणीं । थकवा न आला तयांसी ॥ ३३ ॥ नाही घातली अंगीं बंडी । नाही केली त्यांनी कंडी । नाही बाधली तयांसी थंडी । योगींद्र हे चालले स्वानंदें ॥ ३४ ॥ जळीं स्थळीं चालतां पहाडीं । स्कंधीं वाहिली असें आवडीं । परोपकाराची कावडी । चालविती व्रत ते सर्वदा ॥ ३५ ॥ तैसे या अवघड मार्गात । पडले कोणी संकटांत । स्वयें करूनी अंगमेहनत । मुक्त करिती तयांसी ३६ ॥ ऐसे हे दोन्ही संत । यात्रेस्तव जाती द्वारकेत । तेथील मठाधिपति शंकराचार्य पुसत । श्रीवासुदेवानंद सरस्वतींना ॥ ३७ ॥ म्हणती आमुची इच्छा असे फार । बसावें आपण आमुच्या गादीवर । आपणासारिखा पुरुष थोर । योगीवर दुजा नसे ॥ ३८ ॥ हे शब्द पडतां कानावर । सद्गुरू काय म्हणती त्यावर । आमुची इच्छा तिळभर । या गादीवर बसण्याची नसे ॥ ३९ ॥ यावरीं आचार्य वदती । आपुले बंधू ब्रह्मचारी असती । कडकडित विरागी योगी दिसती । ते तरी बसावेत गादीवरी ॥ ४० ॥ करूं हें द्वारकापीठ त्यांचे स्वाधीन । आमुचे अधिकार संपूर्ण । देऊं तयांसी आपण । आज्ञा तयांसी करावी ॥ ४१ ॥ काय भक्ताचें मनोगत । विरक्त बाणा नव्हता माहीत । परि शंकराचार्यांच्या मानास्तव देत । आज्ञा सीताराममहाराजांना ॥ ४२ ॥ बैसशील जरी व्यासपीठावरती । त्यास आमुचीहि असे अनुमति । ऐसें सद्गुरुमहाराज वदती । सीतारामभक्तांसी ॥ ४३ ॥ सद्गुरूने आपुलें मांडिलें मत । परि भक्ताच्या वेगळेंच मनांत । लौकिक ऐश्वर्या नसे लुंपित । ही आज्ञा कैशी रुचेल त्यां ॥ ४४ ॥ या आचार्यपीठावरी बैसणें । हें तों आपलें स्वातंत्र्य गमावणें । ह्या एक्या दिशेनेच भ्रमणें । आम्हा न आवडे मुळींच ॥ ४५ ॥ हें परतंत्र संकुचित जीवन । होईल पोपटपक्ष्यासमान । वरी सुवर्णाचा पिंजरा जाण । काय असे कामाचा ॥ ४६ ॥ त्रिलोकींचें ऐश्वर्य न ये कामा । तें तृण तुल्य असे आम्हां । गुरुभजनामृताचा महिमा । गातां आम्ही तृप्त असों ॥ ४७ ॥ ऐसें ऐकतांच भाषण ।

संतोषलें सद्गुरूचे मन । आणिक एक उदाहरण । परिसावें सादर ॥ ४८ ॥ एकदा मुक्काम होता गुणा छावणीं । तेथे डॉक्टर विश्वनाथराव ताटके यांनी । श्रीवासुदेव सरस्वतींची अनुज्ञा घेऊनि । काय पाहावें केलें असे ॥ ४९ ॥ गांडाबुवा अप्पा व्यंकटेश । हे महाराजांचे असती शिष्य । त्यांची खेंचरी मुद्रा सिद्ध करण्यास । जिव्हाछेद केला असे ॥ ५० ॥ परि ताटके डॉक्टरांनी । योग्य शीर ना पाहोनी । टाकिली दुसरीच छेदूनी । रक्तस्त्राव सुरु जाहला ॥ ५१ ॥ तुटली असे भलतीच शीर । रक्तप्रवाह हो अनिवार । उपाय करिती डॉक्टर । परि किंचित तो थांबेना ॥ ५२ ॥ सकल घाबरले मनांत । डाक्टरांसह सकल शरण जात । सद्गुरुनाथ विचार करित । आपुलीये मानसीं ॥ ५३ ॥ तेथूनी असे ऐंशी मैल । दूर अंतरावरी जंगल । तेथ दिव्य वनस्पति अमोल । दिसोनी तयांसी येतसे ॥ ५४ ॥ त्या संजीवनी वनस्पतीचा रस । काढोनी लाविता त्या जखमेस । रक्तप्रवाह थांबेल निःशेष । परि दूर बहु असे ती ॥ ५५ ॥ म्हणूनी पडली विवंचना । येवढ्या रात्रीं त्या अफाट राना । जावया सांगावें कवणा । जो सूर्योदयापूर्वी येईल येथे ॥ ५६ ॥ तों सीताराम महाराज जवळी असती । त्या वनस्पतीचें नांव पुसती । ऐकतां तियेसी ओळखिती । सीताराममहाराज ॥ ५७ ॥ त्यामुळे सोपे जाहलें काम । शोधावया नकोत श्रम । काय वदती सीताराम । मी जाऊनी आणतों वनस्पति ॥ ५८ ॥ त्रिवार करूनी गर्जना । श्रीवासुदेवसद्गुरु नामःस्मरणा । पवनगतिसमान जाणा । योगिराज हे निघाले ॥ ५९ ॥ रात्रीं आठाचे समयीं निघती । संकल्पित स्थळीं जाऊनी पोहोचती । वनस्पति घेऊनी येती । सूर्योदयापूर्वी देती सद्गुरूसी ॥ ६० ॥ अति त्वरा करूनी । रस काढिला सद्गुरूंनी । तिघांच्या तोंडांत घालूनी । जिव्हेखालती लाविला ॥ ६१ ॥ सारखा चालू होता जो रक्तस्त्राव । तो बंद जाहला सर्व । जाऊं पाहात होता जीव । तो तिघांचाहि परतला ॥ ६२ ॥ लंकेंत लक्ष्मणाला लागली शक्ति । तों शतकोटी दूर जाय मारुती । द्रोणगिरी

माथ्यावरती । घेउनी पातला क्षणामाजी ॥ ६३ ॥ जैसे मारुतिराय रामभक्त । तैसेच हे सीताराम वासुदेवभक्त । दाविला प्रभाव अद्भुत । आपुल्या योगसामर्थ्याचा ॥ ६४ ॥ अवघ्या दहा तासांत । एकशें साठ मैल चालूनी येत । हें सामान्य मानवाचेनी न होत । दैवी शक्ति ती वेगळीच ॥ ६५ ॥ ऐसा एकमेकांस आनंद देत । असती परमात्मचिंतनांत । जनताजनार्दनाची सेवा करीत । कांही दिवस येथे राहिले ॥ ६६ ॥ पुढती श्रीवासुदेवानंद सरस्वती । ब्रह्मावर्त सोडूनी निघती । उज्जैन क्षेत्राकडे चालती । दत्तात्रेयाच्या आज्ञेने ॥ ६७ ॥ इकडे दीक्षित स्वामी श्रीगुरुशोधार्थ । येती ब्रह्मावर्तांत । येथूनी जाती कळतां त्वरित । क्षिप्रातीरी भेटले ॥ ६८ ॥ नम्र प्रार्थना करून । दंडग्रहणाची इच्छा दाखवून । यति वदती वाडीस येऊन । करूं विचार प्रार्थनेचा ॥ ६९ ॥ श्रीसद्गुरुनाथांच्या आज्ञेवरूनी । श्रीदीक्षित स्वामी वाडीस जाऊनी । एकाग्र लक्ष चिंतनीं । श्रीदत्तप्रभुचरणीं लाविले ॥ ७० ॥ पुढती थोड्याच दिवसांनी । श्रीवासुदेवानंद सरस्वतीनी । वाडीक्षेत्रीं येऊनी । दत्ताज्ञा घेतली ॥ ७१ ॥ मग दीक्षित स्वामींना । यथाविधी दंडधारणा । नृसिंहसरस्वति नामाभिधाना । देऊनी महावाक्योपदेश केला असे ॥ ७२ ॥ मग पालखींत बसविण्याची बालमूर्ति । त्या दत्तात्रेयाची पूजा शेजारती । नियमित करावया सांगती । समस्त पूजाऱ्यांच्या इच्छेनुसार ॥ ७३ ॥ एकविचारें राहून । सकलांचें होईल कल्याण । ऐसा उपदेश करून । व्यवस्था सकल केली असे ॥ ७४ ॥ दीक्षित स्वामींच्या इच्छेंकरून । आपुल्या पादुका देती पूजेकारण । मग करिती देशाटन । दीनोद्धारा कारणें ॥ ७५ ॥ गेले ब्रह्मावर्त सोडून । सद्गुरुनाथ तपोधन । मग आपुलाहि वास पूर्ण । सीताराममहाराजांनी केला असे ॥ ७६ ॥ हा भक्तराज योगीश्वर । निघाला करीत देशसंचार । निःसीम भक्त साचार । आत्माच असे सद्गुरूंचा ॥ ७७ ॥ श्रीवासुदेवांच्या नामःस्मरणीं । श्रीवासुदेवांचाच आत्मा होऊनी । श्रीवासुदेवरूपी हे सीताराम होऊनी । निघाले सिद्धावस्थेंत जरी

॥ ७८ ॥ भगवंत श्रीकृष्णांच्या मुखांनी । संपूर्ण ज्ञानोपदेश श्रवण करूनी । श्रीकृष्णस्वरूप झालेल्या उद्धवांनी । कृष्णभक्ति कैशी केली असे ॥ ७९ ॥ ही कथा श्रीमद्भागवतात । श्रवण करितील जे प्रेमळ भक्त । त्यांसी होईल अवगत । उद्धवाची श्रेष्ठ कृष्णभक्ति ॥ ८० ॥ तैसा हा सीताराम भक्त थोर । जाहला वासुदेवांतर । निघाला करित देशसंचार । ब्रह्मावर्त सोडूनियां ॥ ८१ ॥ जे साधक अवस्थेंत । भक्त लक्षणांनी अलंकृत । मनोनिग्रह वैराग्यभरित । ते सहजस्थिति होय आतां ॥ ८२ ॥ नित्य आवडे विजनत्व । अहिंसा शांति अमानित्व । अदंभित्व समचित्तत्व । अध्यात्मगोडी निरंतर ॥ ८३ ॥ निघाले ब्रह्मावर्ताहून । तयीं होता तापस वेष धारण । मृगचर्माचें आसन । भोपळ्याचा असे कमंडलू ॥ ८४ ॥ वल्कलें असती अगावरी । पंचा एक बरोबरी । हीच आवडी अंतरी । परि देहप्रारब्ध वेगळेंचि ॥ ८५ ॥ येई महात्मा हा महाराष्ट्रांत । दर्शनेंच जनभक्ति जडत । राजैश्वर्य समर्पित । स्वीकाराया लाविती भक्तिबळें ॥ ८६ ॥ धोतरजोडी रेशीमकाठी । गळ्यामाजी सुवर्णकंठी । रत्नजडित अंगठ्या बोटी । मौक्तिकबाळी कर्णांमाजीं ॥ ८७ ॥ भालीं केशरी चंदन । रौप्य उपकरणांचें सेवन । दुपारीं सुग्रास भोजन । ऐसा राजयोगी महाराज ॥ ८८ ॥ असे जो कां आत्मज्ञानी । त्यासीच राजयोगी म्हणती जनीं । तेंवि हे सीताराम आत्मज्ञानी । म्हणोनीच राजयोगी म्हणती तयां ॥ ८९ ॥ राजयोगियां नसे आसक्ति । सकल वैभव तृणतुल्य मानिती । म्हणूनी पुढे येऊनी पडती । अगणित राशी वैभवाच्या ॥ ९० ॥ असे निरिच्छ भगवंत । त्यासी महालक्ष्मी माळ घालित । परि खरी प्रीति अंतरांत । भक्तावरी असे प्रभूची ॥ ९१ ॥ तैसे सीताराममहाराज सतत । भोळ्या भाविकांच्या संतोषार्थ । राजवैभव स्वीकारित । परि विरक्त अंतरीं ॥ ९२ ॥ जईं निघती त्या भाविकांतून । दुज्या ग्रामीं जावया लागून । सकल वैभवाचा त्याग करून । जेथच्या तेथ टाकिती ॥९३॥ ऐसा तापस वेष करून । पुढती चालतां चालतां जाण । कृष्णातीरीं येऊन । श्रीनृसिंहवाडीस पोहोचले ॥ ९४ ॥ या कृष्णातीरीं दत्तवाडींत । कितीएक

होऊनी गेले दत्तभक्त । श्रीगुरुकृपेने जीवन्मुक्त । होऊनी राहिले याच स्थलीं ॥ ९५ ॥ ऐशा सत्पुरुषांचीं समाधिस्थानें बहुत । मंदिरेंच बांधिली शोभिवंत । जैशी श्रीगुरुदत्ताची पूजादि होत । तैशींच चाले या मंदिरीं ॥ ९६ ॥ हे सद्भक्त पुराण प्रसिद्ध । सत्पुरुष होऊनी गेले सिद्ध । मग तयां उपास्यदेवतेच्या सन्निध । कां न राहावेसे वाटेल ॥ ९७ ॥ रामचंद्र योगी नारायण स्वामी । गोपाळ स्वामीं मौनी स्वामी । आणिक कितीएक रंगूनी श्रीदत्त नामीं । समाधिसुखें राहिले ॥९८॥ श्रीसीताराममहाराज येथ । गोपाळस्वामींच्या मंदिरांत । मागल्या बाजूस ओवरींत । येऊनियां उतरले ॥ ९९ ॥ स्वयें आपण जाऊन । ओळखी द्यावी कवणालागून । हें न रुचे तयांसी जाण । म्हणूनी गुप्तचि राहिले ॥ १०० ॥ स्नान दत्तदर्शन माधुकरी । याविणें न येती बाहेरी । एकांतवास अंतरीं । निमग्न आत्मस्वरुपांत ॥ १ ॥ ऐसा एकांतवासांत । किती दिवस राहणार गुप्त । तेथील आपुला गुरुबंधूंप्रत । भेटते जाहले कैशापरी ॥ २ ॥ एक दुर्गाबाई नांवाची । कंटाळली असे प्रपंचीं । होती श्रीसीताराममहाराजांची । सख्खी मावशी ती तेथे ॥ ३ ॥ आपुल्या उतार वयांत । कांही परमार्थलाभ व्हावा इच्छित । म्हणोनी श्रीदत्तसेवा करीत । वाडींत असे या राहिली ॥ ४ ॥ नित्यासम दत्तदर्शन । घेऊनी निघाली तेथून । समाधिमंदिरी येऊन । गोपाळस्वामींस बंदीतसे ॥५॥ मग प्रदक्षणा घालीत । तों देखिलें मागच्या ओवरींत । एक ब्रह्मचारी पोथी वाचीत । निरखोनी त्याकडे पाहिलें ॥ ६ ॥ आपुल्या भगिनीचे दोन्ही सुत । वासुदेव सीताराम विरक्त । होऊनी देशांतरीं जात । हें माहींत असे तियेसी ॥ ७ ॥ नजरेपुढे त्या दिव्य मूर्ती । कधी दिसतील ही उत्कंठा चित्तीं । येतां कोणी नवीन यति । तापशी कोणी मंदिरीं ॥ ८ ॥ त्याकडे संशयित दृष्टिने पाहत । परि नसे ओळखी पटत । तरि आज ब्रह्मचारी ओळखत । सीताराम निश्चित असे ॥ ९ ॥ म्हणोनी जवळी बसून । वदे प्रेमभावें करून । ब्रह्मचारीबुवा आले ती कोठून । नाम ग्राम तुमचें काय असे ॥ ११० ॥ तैसेंच सीताराममहाराजांनी । मावशीस ओळखिले मनीं । परि तैसें न

दाखवूनी । कांही त्रोटक उत्तर दिधलें असे ॥ ११ ॥ सद्गुरुच्या सहवासांत राहून । केली ब्रह्मात्मबुद्धि संपादन । तेणें अंतरंग संन्यासीच जाण । होतें सीताराममहाराजांचें ॥ १२ ॥ म्हणूनी नामरूपरहित । अद्वय आत्मस्वरूपाचें नाम येथ । किंवा उपनाम ठिकाण व्यर्थ । काय सांगावें इजप्रति ॥ १३ ॥ मी ब्रह्म असे पूर्ण । मज नाम रूप ना ठिकाण । हा स्वानुभव सत्य प्रकट भाषण । बोलतां अज्ञाना कैसें रुचे ॥ १४ ॥ तैसेच असत्य नाम ठिकाण । सांगावें जरी इजकारण । तेंहि न रुचे तिये लागून । म्हणूनी स्वस्थ ते बैसले ॥ १५ ॥ जैसे एकाग्र लक्ष ठेवून । ग्रंथ वाचिती दाखवून । मावशीकडे अवलोकन । केलेंचि ना महाराजांनी ॥ १६ ॥ परि दुर्गामावशी । पुनरपि पुसे तयांसी । मग काय सांगती तिशीं । सीताराममहाराज ॥ १७ ॥ आम्ही यात्रेकरू ब्रह्मचारी । ठाव ठिकाण ना एकहि भूवरी । उपनाम टेंगशे जरी । देहासी म्हणती या सीताराम ॥ १८ ॥ उपनामाचें पहिलें अक्षर ठेवूनी दुजें कथिलें साचार । परी चाणाक्ष खरोखर । सख्खी मावशी ती असे ॥ १९ ॥ हा यात्रेकरू नसे दुजा कोणी । सीताराम नाम ऐकिलें कानीं । सकल खुणा पटल्या मनीं । आनंद बहु जाहला असे ॥ १२० ॥ मग ब्रह्मानंदांचे मठांत । माडीवरी जाऊनी त्वरित । श्रीनृसिंहसरस्वती स्वामी दीक्षित । तयां वार्ता कळविली ॥ २१ ॥ श्रीसद्गुरुनाथांच्या शोधास्तव । मुखीं मंत्र एकचि वासुदेव । त्यांचा पुसावया ठाव । गेले भेटूनी आपणासी ॥ २२ ॥ एकमेकावर प्रेम अत्यंत । श्रीवासुदेवमहाराजांचे प्रथम भक्त । ज्ञानसंपन्न होऊनी येत । आपुले गुरुबंधू हें कळलें तयां ॥२३॥ त्या आनंदाचें वर्णन । करणें असे कठिण । परि स्वानंदाने उठून । गेले भेटीस गुरुबंधूंच्या ॥ २४ ॥ मग त्या दिबसापासूनी । सीताराममहाराजांनी । ब्रह्मानंदांच्या मठांत जाऊनी । गुरुबंधूसमीप वास्तव्य केलें ॥ २५ ॥ स्वाश्रमधर्मातें अनुसरुन । चालती नित्य नियम पूर्ण । श्रीसद्गुरुनाथांचें गुणवर्णन । करितां होती दंग ते ॥२६॥ श्रीसीताराममहाराजांच्या मुखांनी । वेदांत श्रवण व्हावें हें मनीं । मग दीक्षित मुनीश्वरांनी । आपुली इच्छा प्रकटविली ॥ २७ ॥ मग ब्रम्हसूत्र शांकर भाष्यावरून ।

रोज चाले वेदांतनिरुपण । श्रोते वक्ते समान । अधिकारी असती पूर्ण ते ॥ २८ ॥ ब्रम्हतत्त्वाची चर्चा करित । त्या ब्रम्हानंदीं रमूनी जात । किती वेळ गेला त्यांत । भान राहीना तयांसी ॥२९॥

" तीर्थे तीर्थे निर्मलं ब्रम्हवृन्दं । वृन्दे वृन्दे तत्त्वचिंतानुवाद : ।
वादे वादे जायते तत्त्वबोधः । बोधे बोधे दृश्यते चंद्रचूड : ॥ "

ऐशा या ब्रह्ममूर्ती । यांचा तत्त्वचिंतानुवाद जे कोणी ऐकिती । ते भाग्यवंत निश्चिती । होऊनी गेले या जगामाजीं ॥ १३० ॥ नित्य सायंकाळ झाल्यावर । तबला पेटी सतार । याची आवडी असे फार । भजन करिती श्रीदत्त प्रभूचें ॥ ३१ ॥ कृष्णावेणाच्या उत्सवांत । तैसेंच नारायण मंदिरांत । केलीं कीर्तनें बोधप्रद बहूत । वाटे दत्तचि प्रकटले ॥ ३२ ॥ ऐसा नृसिंहसरस्वतींच्या सहवासांत । चार महिने मुक्काम होत । त्यांचे वडील बंधू अण्णा दीक्षित । येती शिरोलीकर दर्शना ॥ ३३ ॥ किती एकांस शिकविला प्राणायाम । किती एकांस औषधांनी दिला आराम । असाध्य रोगांतूनी हे सीताराम । मुक्त करिती किती एका ॥ ३४ ॥ अण्णू टंकसाळचांचा सुत । अतिसारें झाला मुर्च्छित । नामाकित वैद्य टेकिती हात । या वाडी गावांत एकदा ॥ ३५ ॥ तयीं सीताराम महाराजांनीं । औषधाच्या तीन मात्रा देऊनी । पूर्ण निरोगी करुनी । सुत त्याचा उठवीला ॥ ३६ ॥ कितीहि रोग असो असाध्य । परि संतांच्या शुभाशीर्वादें साध्य । तेंच रसायन औषध होय । सकल रोगां हटवीतसे ॥ ३७ ॥ भावभक्ति निष्ठा सत्य । श्रीगुरुचरणीं पाहिजे नित्य । मग सकल साहाय्य । श्रीदत्तप्रभु करिती निश्चयें ॥ ३८ ॥ तेंवि हे काय करितील संत । याचा न लागे कवणा अंत । महारोगीहि होतील मुक्त । कृपादृष्टीने तयांच्या ॥ ३९ ॥ तेंवि श्रद्धायुक्त भाविकांनी । गुरुमंत्रोपदेश घेऊनीं । एक निष्ठा ठेवूनी अंतःकरणीं । जन्मसार्थक केलें असे ॥ १४० ॥ पुढतीं भिलवडीनजिक कृष्णातीरीं । औदुम्बरीं पवित्र क्षेत्रीं एक मास हे ब्रम्हचारी राहती येऊनी श्रीदत्तसेवे ॥ ४१ ॥ आपुलें स्नान संध्या जप ध्यान । श्रीदत्तपादुकांचें नित्य पूजन ।

दुपारीं वेदांत निरुपण । करुनी भाविकइच्छा पुरविती ॥ ४२ ॥ श्रीदीक्षित स्वामींची पुतणी । सौभाग्यवती सीताबाई मनी । तिने भिलवडींस नेऊनी । आदर बहु केला असे ॥ ४३ ॥ ऐसें औदुम्बर भिलवडी करून । नजिक आळतें ग्राम जाण । तेथे वनश्रीने शोभायमान । उंच डोंगर एक असे ॥ ४४ ॥ तेथे निर्मळ जलझरे त्यावर । तलावहि असती थोर । मध्यभागीं थोर शिवमंदिर । रामलिंग म्हणती तया ॥ ४५ ॥ मंदिरांत जातां क्षणीं । शब्द निघाले तयांच्या मुखांतूनी ॐ शिव हर हर महादेव म्हणूनी । घातला साष्टांग नमस्कार ॥ ४६ ॥ पाहतां मागे उज्जनीस जाऊन । नाही घेतलें माहांकाळाचें दर्शन । मना नव्हते समाधान । एक सद्गुरु नव्हते गवसले ॥ ४७ ॥ परि आज ही ज्ञान विभूति । वासुदेव हा सर्वाभूतीं । हीच भावना जाहली चित्तीं । पूर्णत्वें असे बिंबलीं ॥ ४८ ॥ म्हणूनी गेले मंदिरांत । हर हर शब्दे गर्जत । एकान्त प्रिय हे सद्भक्त । आवडे स्थान तें मानसीं ॥ ४९ ॥ म्हणूनी कांही काळपर्यन्त । राहिले तेथील गुहेंत । कांही परमार्थ लाभार्थ । येती शिरोळचाहूनीं गुरुप्रेमी ॥ १५० ॥ मग कोल्हापुरा जाऊनी । आदिशक्ति कोल्हापूरवासिनी । वंदीली प्रेमभावे करूनी । सीताराम महाराजांनीं ॥ ५१ ॥ कऱ्हाड ग्रामाजवळ । उम्रज ग्रामीं एक देऊळ । तेथे श्रीराम भक्त सखा प्रेमळ । श्रीमारुतिराय तया वंदिलें ॥ ५२ ॥ येथेहि भक्तजनांच्या कामना । होत्या इच्छित ज्या मना । त्या त्या पुरवूनी समाधाना । करविलें असे सकालांचें ॥ ५३ ॥ ऐसी नरसोबाची वाडी औदुंबर । रामलिंग कोल्हापूर । उम्रज ग्राम पांचवें साचार । कांही दिवस तेथे राहिले ॥ ५४ ॥ परि आतां सीताराममहाराजास । चैन न पडे मनास । वाटे सद्गुरुनाथांचा सहवास । त्वरित आपणा घडावा ॥ ५५ ॥ पहा जिकडे जातील तेथील जन । करिती आदर मान सन्मान । कितीएक मंत्र घेऊन । शिष्य जाहलें तयांचें ॥ ५६ ॥ नित्य नूतन राजोपचार समर्पित । रात्रंदिन सेवा करित । उणीव कशाची ना भासूं देत । परि वेधलें मन सद्गुरुभेटीं ॥ ५७ ॥ तापला उन्हाच्या तापांनी ।

तो धावें सावली शोधावया लागूनी । तैसे सीताराममहाराज मनीं । जनसंसर्गताचें तापलें ॥ ५८ ॥ आपुल्या जीवींचा विसावा । भेटेन कधी त्या वासुदेवा । जवळी राहून कांही सेवा । घडावी वाटे अखंड ॥ ५९ ॥ श्रीनृसिंहस्वामीमहाराज दीक्षित । यास दंडप्रदान जाहलें या वाडींत । मग कोणता धरूनीं पंथ । ते गेले न कळे तयांना ॥ १६० ॥ उम्रज गावी श्रीमारुतिरायाला । महाराजांनी नवस केला । श्रीसद्गुरुभेटो झाल्यावरी मला । करीन सत्यनारायण सव्वा मणाचा ॥ ६१ ॥ सर्वसाक्षी श्रीगुरुराणा । जाणती सर्वांतरींच्या खुणा । तळमळे भक्त जागिले मना । दावावा मार्ग आता त्याजला ॥ ६२ ॥ दक्षिण प्रदेशांत गोदावरी । राजमहेंद्री तिच्या तीरीं । नजिक कोकोनाडा ग्रामा-माझारीं । असती सद्गुरु शोध लागला ॥ ६३ ॥ मग चालले तेथून । दक्षिण पंथ लक्षून । पवनगति समान । सीताराममहाराज ॥ ६४ ॥ क्षुधा तृषा थंडी ऊन । काटे गोटे सुख दुःख जाण । याची जाणीव न घे मन । पुढे पाऊल सारखे ॥ ६५ ॥ मानसिक ठरे जी मुदत । पोहोचणें त्याच अवधींत । हा निश्चय कधी ना ढळत । आजपर्यंत तयांचा ॥ ६६ ॥ ऐशी चाल चालून । कोकोनाडा ग्रामी येऊन । सद्गुरुची भेटी होऊन । आनंदिस जाहले ॥ ६७ ॥ भेटतां सीताराम भक्त मग तेथूनी सद्गुरुनाथ । कोकोनाडा सोडीत । येती नागपूराकडे ॥ ६८ ॥ तेथूनी भंडारा जिल्ह्यांत । पवनी नामक क्षेत्रांत । श्रीवासुदेवानंद सद्गुरुनाथ । येती संगे सीताराम ॥ ६९ ॥ हे दोघेहि विदेही पुरुष । अनवाणी करिती सदा प्रवास । पदीं रुतलेल्या काटयांची संख्या चाळीस । आणिक बरहि गेली असे ॥ १७० ॥ सीताराममहाराजांच्या पावलांतून । रुधिर वाहतसे तें पाहून । भक्त पुसती काकुळती करून । आपण चालत तरी कैसे ॥ ७१ ॥ मी देह नव्हे केवळ । ब्रह्मचि असे सोज्वळ । ही वाच्यता निर्फळ । होईल ऐसें वाटतें ॥ ७२ ॥ ऐसें उत्तर ऐकून । स्तब्ध होती अवघे जन । पायांतील कंटक काढिती भक्तजन । काय म्हणती तयांसी ॥ ७३ ॥ असेनात कां ते पायांत । आपुलें ठिकाण धरूनी बैसत । परि भक्त ना मानित । काढित अती हळुवार ॥ ७४ ॥ कोठे

राजमहेंद्री कोठे नागपुर । तेथूनी हे पवनीक्षेत्र । परि देहावरील मीपणा समग्र । दूर करितां मग कठिण काय ॥ ७५ ॥ ऐशा या द्वय महात्म्यांनी । क्षेत्र गाठलों हेंच इच्छिलें मनीं । मन आनंदित आत्मचिंतनीं । अनवाणी प्रवास चालू असे ॥ ५६ ॥ कांही ग्राम ब्राह्मण विरहित । मुक्काम करावा लागला तेथ । शास्त्रीय व्यवहार तंतोतंत । यतीश्वर हे पाळिती ॥ ७७ ॥ उत्तरेंत प्रवासांती । एकेक मास उपवास घडूनी । राहती झाडपाल्यावरती । अन्नाविण हे द्वय योगी ॥ ७८ ॥ परि आतां न घडती उपवास । होते बरोबरी सीताराम शिष्य । तरी पाळणें संन्यास-नियमांस । भिक्षान्न त्यांस मागणें पडे ॥ ७९ ॥ ना तरी मूग शिजवून । ताकासंगें करावे भक्षण । मूग हे फलाहार समजून । अन्नांत त्याची गणना नसे ॥ १८० ॥ ऐसा प्रवास करित । येती एक्या ग्रामांत । उतरती मारुतीचे मंदिरांत । गुरू-शिष्य दोघेहि ॥ ८१ ॥ मग माध्यान्ह काळपर्यंत । आपुलें नित्यकर्म सारित । चौकशी करितां कळूनी येत । दूर असती ब्राम्हणगृहें ॥ ८२ ॥ ब्राम्हण-गृहें दूर असोत । परि मूग शिजविणें नकोत । सीतारामा ठेवूनी मंदिरांत । निघाले भिक्षेसी यतीश्वर ॥ ८३ ॥ हातीं झोळी घेऊन । एका ब्राम्हणसदनीं जाऊन । द्वारीं उभे राहून । नारायण शब्द उच्चारिती ॥ ८४ ॥ एक वृद्ध स्त्री हातांत । भाजी आणि भाकर घेत । आंबील एक्या गाडग्यांत । घेऊनी आली आनंदें ॥ ८५ ॥ भाजी भाकरी बाढलियावर । आंबीलगाडगें ठेविलें समोर । ही न्यावी म्हणोनी जोडा कर । वृद्धा यतीश्वरांसी ॥ ८६ ॥ महाराज म्हणती तिजसी । ही भाजीभाकर पुरे आम्हांसी । आंबील न्यावी सदनासी । म्हणोनी चालूं लागले ॥ ८७ ॥ हात जोडूनी करी वंदना । नम्र भावें करी प्रार्थना । परिसा विनंति दयाघना । माझी आज या वेळे ॥ ८८ ॥ नको ही आंबील म्हणूं नका । घर संपूर्ण पेटलें देखा । त्याचा एक वासा जगन्नायका । द्या हो ओढूनी या वेळे । ८९ ॥ जळत्या घराचा वासा एक । सुदैवानें निघाला चोख तरि गरिब मनुष्य हरिख । त्यांतचि सुख मानीतसे ॥ १९० ॥ तरि प्रभो दयाघना । संपूर्ण आयुष्य सोशिल्या

यातना । बणवा लागला असे मना । जाळीत आहे सारखा ॥ ९१ ॥ आजपर्यंत पळभर । नाही आठवला परमेश्वर । आज भाग्योदर खरोखर । जाहला ऐसें वाटतें ॥ ९२ ॥ ह्या माध्यान्ह काळीं विष्णुमूर्ति । आली असे द्वारापुढती । कवण्या जन्मातरीचें पुण्य हातीं । पडलें असे तव कृपें ॥ ९३ ॥ त्यांतूनी घालणें भोजन । आज प्रभूसी स्वहस्तें करून । दैववशात घडून । सुयोग हा आला असे ॥ ९४ ॥ येवढ्याचि कृपें करून । मी कृतार्थ होईन । माझी मनोदेवता साक्ष पूर्ण । आत्मारामा देतसे ॥ ९५ ॥ तुमच्या दर्शनमात्रें निर्मळ । माझा जन्म होईल सफळ । तरि आंबील न्यावी ये वेळ । नाही ऐसें म्हणूं नका ॥ ९६ ॥ ही बाईची विनवणी । ऐकतां द्रवले महाराज मनीं । सर्वज्ञ त्या भगवंतांनी । तिची निःसीम भक्ति जाणिली ॥ ९७ ॥ ही बाई असे बहु ज्ञानी । म्हणती महाराज आपुले मनीं । मग म्हणती तिजलागूनी । ही आंबील येथे असूं द्या ॥ ९८ ॥ आमुच्या शिष्यासी पाठवूनी । आंबील जाऊं घेऊनी । कृपा दृष्टीने अवलोकूनी । स्वामी निघाले तेथूनियां ॥ ९९ ॥ भिक्षेसी गेले मुनीश्वर । अन्न मिळेल साचार । तरी ठेविला असे तयार । भात शिजवूनी मंदिरीं ॥ २०० ॥ नैवेद्य वैश्वदेव केलियावाचून । असंस्कृत न सेविती अन्न एक कुषी भरून । धृत जवळी नित्य असे ॥ १ ॥ मंदिरीं येती यतीश्वर । झोळी ठेविती जागेवर । भक्तास सांगती सत्वर । आंबील आणावया कारणें ॥ २ ॥ इतुक्या उन्हांत जाऊन । आंबील आणावयाचें नसे कारण । पुरे इतुके असे अन्न । म्हणती सीताराम महाराज ॥ ३ ॥ मग जो काय प्रकार घडला । तो सकल सांगती शिष्याला । म्हणती कबूल केलें तिजला । तरि ती जाऊन आणणें असे ॥ ४ ॥ पुनरपि नकारार्थी उत्तर । सीताराम देती त्याउत्तर । म्हणती अन्न नाही घेणार । आंबील आणिल्यावाचुनिया ॥ ५ ॥ हा निश्चय पाहूनी सीताराम जाती त्या क्षणी । आंबील आले घेऊनी । बसले गुरुशिष्य भोजना ॥ ६ ॥ अति आवडीनें ती पिऊन तैशींच शिष्यास घ्यावया सांगून । मनीं संतुष्ट होऊन । कृतार्थ केली तिजप्रति ॥ ७ ॥ मग तेथूनी

गुरु शिष्य दोघें जण । पोहोचती भंडारा जिल्ह्यांत येऊन । पवनी क्षेत्राचा मार्ग धरुन । महात्मे हे चालले ॥८॥ जैसे ज्ञानेश्वर निवृत्तिनाथ । मच्छिंदर गोरखनाथ । तैशीच ही जोडी निश्चित । गुरुशिष्य दोघांची ॥९॥ श्रीमच्छींद्रनाथांनी । निघतां स्त्रीराज्यांतूनी । आपुल्या झोळीत ठेवूनी । सुवर्ण इष्टिका आणिली ॥ २१० ॥ तिचे करूनी निमित्त । तस्करभय धरिलें मनात । शिष्य परीक्षणार्थ । मच्छीन्द्रनाथांनी मार्गांत ॥ ११ ॥ तो पोटभऱ्या शिष्य नव्हता । भूगोल करील पालथा । हें नवनाथ भक्तिसार ग्रंथां । अवलोकितां कळून ये ॥ १२ ॥ तैसेंच गुरुशिष्यांच्या प्रवासात । चालतां पुढे मार्गांत । निज शिष्यपरीक्षणार्थ । कौतुक चरित्र गुरु दावितो ॥ १३ ॥ वा द्वय बंधूचे जन्म स्थान । मुळ असे कोंकण । म्हणूनी यांसी रानावनातून । डोंगर चढण्याची संवय असे ॥ १४ ॥ त्या संवयीनुसार । या पवनीमार्गावर । राजमार्ग सोडूनी साचार । पाऊलवाटे चालले ॥ १५ ॥ त्या दिवशीं होती रात्र चांदणी । दिसेल आपुणा चंद्रप्रकाशांतूनी । ऐसा आत्म विश्वास धरुनी । जाऊं म्हणती आपण ॥ १६ ॥ दोघांचीं स्वाभाविक निर्भय वृत्ति । दुपारीं तिसऱ्या प्रहरीं निघती । सूर्यास्तसमयीं थांबती । एक ओढा मार्गी लागतां ॥ १७ ॥ तेथें सायंसंध्यावंदन । करुनी निघाले तेथून । तों चालतां चालतां विपिन । फार मोठें लागलें ॥ १८ ॥ गगनचुम्बी वृक्षथोर । झाडें झुडुपें सभोवर । दाट जाळचा अपार । लता वेलींच्या पसरल्या ॥ १९ ॥ चांदणी रात्र परि अंधार । पसरला न दिसे समोर । विक्राळ आरोळचा कानावर । येती वन्य पशुंच्या ॥ २२० । ऐशा उग्र वनांतून । जातां भयग्रस्त होय मन । तेथे हे बंधू जाण । गुरु शिष्य दोघे चालले ॥ २१ ॥ खाच-खळगे ओलांडीत । वृक्षफांद्या खालींवरी करित । वेलीं हाताने वळवीत । पुढे मार्ग काढिती ॥२२॥ पुढे असे योगमूर्ति । मागूनीं सीताराम चालती । तो मार्ग अडवूनी बैसला बघती । एक व्याघ्र भयंकर ॥ २३ ॥ ऐसा व्याघ्र पाहतां क्षणीं । येत होते सीताराम महाराज मागूनी । त्यांस हाक मारुनी । जागींच उभे राहिले ॥ २४ ॥ पाहा सीतारामासमोर । पसरला असे मार्गावर । केवढा

व्याघ्र हा थोर । वाट अडविली तयाने ॥ २५ ॥ जावें त्याच्या जवळून । हेंहि न धैर्य आपणा लागून । तरी आतां परतून । जाऊं आलिया मार्गाने ॥ २६ ॥ हा आपुल्या मस्तका इतुका थोर । दिसतो बलवान हा खरोखर । नाही आपणास भिणार । चल रे आतां परत जाऊ ॥ २७ ॥ ऐसे बोलत बोलत । शिष्याच्या मुखाकडे पाहत । मागे वळोनी चालत । एक एक पाऊल मागुतीं ॥ २८ ॥ हें सद्गुरुनाथांचें भाषण । ऐकतां आश्चर्यचकित झाले मन । वाटे परीक्षेची वेळ जाण । आज आली माझ्यावरी ॥ २९ ॥ जे अद्वैत ब्रह्मज्ञानसंपन्न । करिती सर्वत्र आत्मनिरीक्षण । तेथे भयाचें कारण । कांही एक असेना ॥ २३० ॥ सद्गुरुनाथ वासुदेव । यांचा योगमहिमा अपूर्व । अलौकिक प्रभाव । जाणत होते शिष्य हे ॥ ३१ ॥ ज्याचें मंगलमय नामःस्मरण । पार करवी निःसंशये करून । संसाररूपी घोर विपिन । तेथे व्याघ्राचें भय कासया ॥ ३२ ॥ या अफाट भवार्णवांत । मनोनौका सारखी बुडो पाहत । षड्रिपूमगरी क्षणांत । ग्रासावया असती बैसलेल्या ॥ ३३ ॥ पवित्र नाम वासुदेव । मुखीं असतां न भयास वाव । पैलथडीं लागेल नाव । चढेल मोक्षगिरीहि भक्त तो ॥ ३४ ॥ ऐसी जयांची अगाध सत्ता । ते काय भितील व्याघ्राकरिता । केवळ मम परिक्षेकरितां । वाटे भय हें ठेविले असे ॥ ३५ ॥ हे वासुदेव भगवंत । सांगती दत्तमाहात्म्य ग्रंथांत । पाहाव्या चौदाव्याअध्यायांत । पुढील दोन ओव्या या ॥ ३६ ॥

" अहिंसा सिद्ध झाली ज्यासी । तत्सन्निध राहता जीवांसी । वैरभाव न उपजे त्यासी ।
जातिवैऱ्यांसी मित्रत्व ये ॥ १ ॥ म्हणूनी ऋषींच्या आश्रमांत । उंदीर मांजराशी खेळत ।
गाई व्याघ्र एकत्र राहत । अहिंसा फळ ऐसें असे ॥ २ ॥ "

या त्यांच्याच कथनानुसार । अहिंसा बुद्धीने साचार । बाणलें आहे काय अंतर । पाहती मज वाटतें ॥ ३७ ॥ मग सीताराममहाराजांनी । हास्यवदन करूनी । अत्यंत नम्रभाषणीं । विज्ञापिलें श्रीगुरु समर्थांते ॥ ३८ ॥ जाऊं व्याघ्रमार्गावर । मी आतां होतो समोर । आपण पाठीराखे सर्वेश्वर ।

मागुती माझ्या असावें ॥ ३९ ॥ मग मी पाहतों त्या व्याघ्रास । काय करील तो आपणांस । ऐसें वदूनी श्रीगुरुस । परत मागे फिरविलें ॥ २४० ॥ ऐसे गुरुशिष्य दोघेजण । चालले पुढे मार्गावरुन । निर्भय धैर्य धरून । व्याघ्रासमीप पातले ॥ ४१ । मग तें क्रूर धिप्पाड जनावर । पसरलें होतें मार्गावर । आळस टाकूनी सत्वर । झडकरी उभें ठाकलें ॥ ४२ ॥ जैसे घारे नेत्र वाघाचे । तैसेच होते सीताराममहाराजांचे । पाणिदार तैसेच साचे । शूर दोघेहि निर्भय ॥ ४३ ॥ दृष्टादृष्ट दोघांची । एकमेकांवर खिळली साची ; आपापली छाप टाकण्याची । चुरस दोघांची लागली ॥ ४४ ॥ ऐसें एक टक लावून । पाहती एकमेकांस दोघेजण । शेवटीं व्याघ्र हरून । नजर खाली बळवीतसे ॥ ४५ ॥ धीट दिसे हा मानव प्राणी । भीत नाही आपणालागूनी । दिव्य शक्ति याचे ठिकाणीं । जाणिलें वाटे व्याघ्राने ॥ ४६ ॥ कीं महापुरुष हे दोघेजण । त्यांची काय पटली तयास खूण । आपुली शरणागति दाखवून । मार्ग सोडून तो दूर गेला ॥ ४७ ॥ एखाद्या कोल्ह्याकुत्र्यासमान । जाय वाघ निघून । मग हे गुरुशिष्य दोघेजण । पुढती सरळ चालले ॥ ४८ ॥ कांही अंतर गेल्यावर । सद्गुरु उभे राहिले क्षणभर । शिष्यास गौरवूनी उद्गार । पुढील असतीं काढीले ॥ ४९ ॥ आज ह्या व्याघ्रभयापासून । सकल गेलें होतें आमुचें अवसान । परि तुवांचि धीर धरून । आम्हां संकटी रक्षिले ॥ २५० ॥ ऐशा गुरुगौरवाने आनंदित । धन्य धन्य तो गुरुभक्त । आपुली विनयमर्यादा सांभाळीत । हात जोडूनी काय वदे ॥ ५१ ॥ हया शिष्याचा गौरव । वृथा वाटे मज तो सर्व । याचें कारण अपूर्व । असे तें वेगळेंचि । ५२ ॥ ज्याची जाणीव नेणीव । ज्याचा वेदांस न कळे ठाव । ऐसा तो देवाधिदेव । श्रीवासुदेव सर्वेश्वर ॥ ५३ ॥ तो जगन्नायक कृपासागर । असतां पाठीं राखणार । तेथे त्या वाघोबाचें डर । कासया असेल शिष्यासी ॥ ५४ ॥ सद्गुरु नसतां पाठीशी । तरी धैर्य नव्हतें मानसीं । पडलों असतो भूमीसी । या महाव्याघ्रा भिवोनियां ॥ ५५ ॥ असे ब्रीद तुझें पुरुषोत्तमा ।

जगीं वाढवावा भक्तमहिमा । ऐसें वाटते या सीताराम । म्हणूनी कौतुक हें दाविलें ॥ ५६ ॥ मग सीताराम महाराजांनी । मस्तक ठेविलें श्रीगुरुचरणीं । मग दोघेहि आनंदें करूनी । मार्ग चालूं लागले ॥ ५७ ॥ हे दोघे देवभक्त । युक्ति दृष्टांतसहित । आत्मज्ञानाचा बोध करित । संवादरूपें प्रकट तो ॥ ५८ ॥ ऐसें मार्गी चालत । आत्मरंगीं रंगून जात । पोहोचले इच्छित स्थळाप्रत । गुरुशिष्य दोघेहि ॥ ५९ ॥ वैनगंगा नदीचिये तीरीं । पवनी क्षेत्रामाझारीं । आनंदपूर्ण अंतरीं । विठ्ठलमंदिरीं पातले ॥ २६० ॥ पांडुरंग हरि वासुदेव हरि । दुमदुमला नाद मंदिरीं । या नामस्मरण गजरीं । घातला साष्टांग नमस्कार ॥ ६१ ॥ तैसा माझा नमस्कार । श्रीसद्गुरु चरणावर । व्हावा जानकीचा उद्धार । प्रभो तुझिये कृपेने । ६२ ॥ आता येथील कथन । पुढील अध्यायीं करावें श्रवण । तरी श्रोते सावधान । बैसोत सदा स्वानंदे ॥ ६३ ॥ श्रीसद्गुरुनाथा दयाघना । तुमच्या मंगलमय नामस्मरणा । या जानकीस द्यावें वरदाना । वाचे नित्य वदावें ॥ ६४ ॥ इति श्रीसीतारामचरित्रालंकारमणी । गुंफिला असे दृष्टांत कोंदणीं । प्रकाश दाविता अंतःकरणीं । त्रयोविंश अध्याय गोड हा ॥ २६५ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

त्रयोविंश अध्यायः समाप्तः ।

अध्याय चोविसावा

श्री गणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ ॐ श्रीत्रिभुवनेश्वरा । त्रिगुणरूपा त्रिगुणेश्वरा । ब्रम्हा विष्णू महेश्वरा । श्री दत्तरूपा नमन माझें ॥ १ ॥ जैसी त्रिगुणाकार तुमची मूर्ति । तैसी त्रिविध स्थलीं तुमची वस्ती । परि निःसीम भक्तापुढती । हाक मारितां पुढे असे ॥ २ ॥ प्रातःकाळी गंगास्नान । काशीविश्वेश्वरा जाऊन । गंगेवरी भाविक जन । दर्शन घेती प्रभो तुझें ॥ ३ ॥ म्हणोनी या कोल्हापुरीं । दत्तात्रेया तेथे तुझी फेरी । भोजन करिसी कोण्या घरीं । कोण्या मंदिरी न कळे मज ॥ ४ ॥ प्रभो मूळ प्रकृति तुझी देखा । कोल्हापूरवासिनी अंबिका । तिच्या दर्शना काय वैकुंठनायका । नित्य जाणें नियम असे ॥ ५ ॥ करितां या माध्यान्ह काळीं । अतिथि पातला द्वाराजवळी । पाठवूं नये कदाकाळीं । विन्मुख तयासी कदापि ॥ ६ ॥ हे अनुभवी भाविक जाणतात । रिता कोणी ना दवडित । तरि कवण्या रूपें श्रीगुरुदत्त । येऊनी जातील सदनासी ॥ ७ ॥ तैशीच माहूरगडीं तुझी निद्रा । नित्य असे योगनिद्रा । पवनगतीं भालचंद्रा । क्षण न लागे जाण्यासी ॥ ८ ॥ इतुके असूनी सर्वसाक्षी । सर्वान्तरात्मा परिरक्षी । भक्तरक्षणार्थ पाठीसी । हाक मारितां सदा तूं । ९ ॥ तैशीच माझी हाक कानीं । ऐकूनी श्रीदत्ता येशील झणी । चोवीसाव्या अध्यायाची पुरवणी । करिशील शब्दरत्नें गोपोनियां ॥ १० ॥ पहावें मागील अध्यायांत । येऊनी पवनी क्षेत्रांत । उतरती विठ्ठलाच्या मंदिरांत । गुरुशिष्य दोघेहि ॥ ११ ॥ या पवनीक्षेत्रांत । एक चातुर्मास घालवीत । त्या सद्गुरूसहवास सौख्यांत । राहती सीताराम आनंदांत ॥ १२ ॥ परि या स्थलीं येण्या अगोदर । निर्जन अरण्य मार्गावर । एकान्त स्थळीं महांकाळेश्वर शिवलिंग एक असे ॥ १३ ॥ तेथे राहावें म्हणूनी । निश्चय केला सद्गुरुनी । परि श्रीदत्तात्रेयाचे मनीं । इच्छा तैसी मुळीं नसे ॥ १४ ॥ म्हणूनी अनसूयानंदन । आले पठाणवेष घेऊन । अति क्रोधें दरडावून । या पवनीक्षेत्रीं धाडिलें ॥ १५ ॥ होते वाडीक्षेत्रांत । कांही शिष्य शिष्यिणी भक्त ।

श्री दत्त मंदिर, हिंगोली



श्री सीताराम आश्रम, खर्राघाट (जि. हुशंगाबाद)

तुळसा गंगू पुजारी श्रीपाद खचित । सुंदरा आणिक किती एक ॥ १६ ॥ त्यांनी या द्वय सद्गुरुंच्या समवेत । सहवास केला असे बहूत । स्वयें पाहिलेल्या कथित । रम्य अगम्य लीला दोघांच्या ॥१७॥ सद्भाग्यें ज्याने केले श्रवण । तैसेंच करुनी ठेविलें कथन । म्हणूनी आज आपणा कळून । येणार आहे तत्क्षणें ॥ १८ ॥ पवनीभाग्य ये उदयाचलीं । म्हणूनी ही सद्गुरुनाथ माउली । आली असे या स्थलीं । जन येती नित्य दर्शना ॥ १९ ॥ तेथे नित्य औदुंबराखालती । श्रीवासुदेवानंद सरस्वती । समाधी लावूनी बैसती । ध्यान करीत निजानंदीं ॥ २० ॥ गंगेवरी करूनीं स्नान । घेती लोटा भरुन शिवलिंगावरी ओतिती जाण । हर हर शब्द करोनियां ॥ २१ ॥ त्यांतूनी किती एक अज्ञान । आणितीं लोटा भरून । गुरुमस्तकावरी ओतून । हर हर ऐसा शब्द करिती ॥ २२ । हा पाहूनी मूढपणा । सीताराम क्षुब्ध होती मना । म्हणती श्रीगुरुंसी यातना । किती होत असतील ॥ ॥ २३ ॥ शेवटीं न राहे मन । सद्गुरु न कांही नेणती जाण । बोलती क्रोधें करुन । सीताराम महाराज ॥ २४ ॥ अहो पाणी किती थंडगार । महाराजांच्या माथ्यावर । ते काय आहेत फत्तर । लोटा लोटा ओतितां ॥ २५ ॥ मग ते उमजते मूढ मनीं । ओतिती ना कुणी पाणी । पुनः प्रदक्षिणा घालूनी । दर्शन घेऊनी जाताती ॥ २६ ॥ ऐशी ही गुरुभक्ति । पाहूनी जन आनंदती । गुरुस्थानींच मानिती । सीताराम महाराज ॥ २७ ॥ या चातुर्मासांत अन्नदान । होत असे अमितप्रमाण । एकसहस्त्र ब्राह्मण भोजन । मंदिरीं होत असे प्रतिदिनीं ॥ २८ ॥ येथे बहुत असती अंत्यज जन । तेहि घेऊनी जाती अन्न । नृसिंहवाडी शिरोळाहून । आल्या भाविक स्त्रिया कांही ॥ २९ ॥ सीताराम महाराजांच्या सांगण्यावरून । पत्रावळीवरून घेऊन अन्न । त्यांच्या पदरीं नेऊन । स्त्रिया टाकिती बहु दिन ॥ ३० ॥ किती असती ते अजाण । कसेंहि मिळो आपणां अन्न । हाव एवढीच मनांतून । भरपूर आपणा मिळावें ॥ ३१ ॥ वाढा पत्रावळीवरील काढून । फेकितां पात्रें घेतील चाटून । विकल्पित नसे मन । पहा नवलगति कैशी असे ॥ ३२ ॥

मिळे पत्रावळीभरून । भाजी भात वरण । त्याहीवरी प्रसाद जाण । मोहनशिरा मिळत असे ॥ ३३ ॥ ओळखिला अन्नदाता कोण । वाटे पातला दत्त भगवान । भावभक्ति जडली पूर्ण । सीताराम चरणावरी ॥ ३४ ॥ सानथोरांपासूनी । भाव उपजला एकच मनीं । पाहा संतदर्शनीं । केवढी ही शक्ति असे ॥ ३५ ॥ मग संतांच्या सहवासांत । अखंड सान्निध्य ज्यांना प्राप्त । ते किती भाग्यवंत । गणना कैशी करावी ॥ ३६ ॥ संतसमागमाची महती । स्वयें देवहि जाणिती । संतमेळीं सदा रमती । अति आनंदे करूनियां ॥ ३७ ॥ तैसा या समर्थांचा सुगंधित पवन । मंद मंद जाऊन । अंत्यजाचें हृदयस्थान । जागृत त्याने केलें असे ॥ ३८ ॥ दोन्ही हस्त जोडूनी । बोलती अतिकरुणवाणी । या बायांच्या हातांनी । अन्न नको आम्हासी ॥ ३९ ॥ दिलें पंचपक्वान्नयुक्त भोजन । पात्रें भरभरून । तरी न पावे समाधान । आमुचिये मानसीं ॥ ४० ॥ तरी सीताराम–महाराजांनी । एकेक घास दिला स्वकरांनी । तो प्रसाद आम्हालागूनी । मिळावा म्हणती एक मुखें ॥ ४१ ॥ पाहा केवढी झाली उपरति । अन्नावरील गेली आसक्ति । सीताराम चरणीं जडली भक्ती । हा प्रभाव संतदर्शनाचा ॥ ४२ ॥ आधीच महाराज दयाळू पूर्ण । त्यांत केविलवाणें ऐकिलें भाषण । त्यांचा तो सद्भाव पाहून । म्हणती वाटतों मी शांत असा ॥ ४३ ॥ दान हेच खरें भूषण । त्यांतूनहि अन्नदान । विचारहि मनीं करून । वाढती आपुल्या हातांनी ॥ ४४ ॥ वाढाव्या पत्रावळी बायकांनी । द्याव्या महाराजांच्या हातीं आणूनी । त्या अंत्यजांच्या पदरीं नेऊनी । सुवर्णमुद्रांकितकरें टाकाव्या ॥ ४५ ॥ नाही तिरस्कार दाखविला । नाही क्रोध मना आला । हृदयीं दयासागराला । दयेची भरती सदा असे ॥ ४६ ॥ अशा नियमें दररोज । वाढताती महाराज । चारपांचशेंवरी सहज । पात्रें होऊनी जाताती ॥ ४७ ॥ संतलक्षणांनी मंडित । पुसतां कोणी उत्तर देत । गरीब भाविकांची इच्छा समस्त । पूर्ण केली पाहिजे ॥ ४८ ॥ जितुक्या आदरें ब्राह्मणांना । तितुक्याच आदरें अंत्यजांना । ठेवूनिया समदर्शीपणा । संतोषित करिताती ॥ ४९ ॥ पाहावें हो एके दिनीं । संपला शेवटीं तो

शिरा करोनी । मग अंत्यजांलागूनी । नित्यासम प्रसाद दिला असे ॥ ५० ॥ याचेंच असे उदाहरण । एकनाथांचें जगीं पूर्ण । पितृश्राद्धतिथीचें सुग्रास अन्न । आधी वाढिलें अंत्यजांना ॥५१॥ काय ही संतांची मनोवृत्ति । रावरंक समान पाहती । हें पाहून पवनीकर आनंदित चित्ती । भाग्य म्हणती आमुचें । ५२ ॥ श्री समर्थ वासुदेवाच्या आज्ञेनुसार । पाहती सीताराम कारभार । ऐंसे हे देवभक्त थोर । वागती एकसल्याने ॥ ५३ ॥ जैसे येथे चातुर्मासांत । अन्नदानसोहळा भव्य होत । तैसाच मुकत्याळ ग्राम क्षेत्रांत । अन्नदान नित्य होई ॥ ५४ ॥ प्रातःकाळीं झालिया स्नान । नित्य गुरूचरित्रवाचन । औदुंबरतळीं बसून । आत्मनंदी निमग्न होती ॥ ५५ ॥ याच समयीं भाविक जन । समजूनी दत्त भगवान । मनोभावे पूजा करून । प्रदक्षिणा त्या घालिती ॥ ५६ ॥ अनुष्ठान झालियावरी । श्रीगुरु राधाकृष्ण मंदिरीं । वेदांतबोधवैखरी । द्विजजनां कथिताती ॥ ५७ ॥ मग भोजनापूर्वी जाण । सकल द्विज विद्वज्जन । भव्य परात ठेवून । त्यांत श्रीगुरुचरण पूजिती ॥ ५८ ॥ पंचामृताने घालूनी स्नान । रुद्राभिषेक करून । सर्वोपचार समर्पुन । महापूजा होतसे ॥ ५९ ॥ केशर मिश्रित चंदन श्रीगुरूंना लावून । सुमनहार घालून । धूपदीप दाविती ॥ ६० ॥ मग मोठ्या पराती भरून । बदाम पिस्ते खडीसाखर भरुन । नैवेद्य करिती समर्पण । मंगल आरती होतसे ॥ ६१ ॥ बेल तुळशी वाहून । साष्टांग नमस्कार घालून । चरणीं मस्तक ठेवून । धन्य जाहलों म्हणताती ॥६२॥ येथें शिवूं नका न म्हणताती कोणासी । सुलभता असे सकलांसी । नारायण दत्तात्रेय मुखासी । नामोच्चार सारखा ॥ ६३ ॥ मधुर भगवन्नाम उच्चारून । ओंजळी ओंजळी भरून । आबालवृद्धा लागून । प्रसाद वाटिती स्वहस्ते ॥ ६४ ॥ येथे जातिभेद ना मानीत । समान जैसे पोटीचे सुत । ऐसें प्रेमादरें वागवीत । श्रीसद्गुरु वासुदेव ॥ ६५ ॥ इकडे सीताराम महाराजांनी । स्वयें कोठींतील सामान पाहूनी । आपुल्या शिष्यवर्गाकडूनी । देवघेव करावी ॥ ६६ ॥ दुपारी दोन वाजती । मग स्त्रीपुरूष सानथोर बैसती । ऐशा भोजनाच्या पंगती । किती उठती ना कळे ॥ ६७ ॥ आपुली भिक्षा

संपवून । स्वयें श्रीवासुदेव भगवान । पंगतीमध्ये फिरून । आग्रहे पक्वान्नें वाढविती ॥ ६८ ॥ ऐसे रोज हजार दोन हजार । सकलांची तृप्ति झालियावर । मग सीताराममहाराज मिताहार । रात्रीं नवाच्या पुढे घेती ॥ ६९ ॥ दुपारीं चौथ्या प्रहरीं गुरुनाथ । श्रीविठ्ठलाच्या मंदिरांत । कीर्तन पुराण ऐकत । सकलांसमवेत बैसोनी ॥ ७० ॥ मग दिगंबरा दिगंबरा । श्रीपाद्वल्लभ दिगंबरा । ऐशा करित मधुर गजरा । जाती भक्तांसह गंगेवरी ॥ ७१ ॥ तेथूनी सायंसंध्या करूनी येती । रात्रीं भजने प्रवचनें होती । केव्हा समाधि सुख अनुभविती । श्रीसद्गुरुनाथ वासुदेव ॥ ७२ ॥ ऐसा नित्य नवा आनंद । सकलांनाहि मिळे मोद । तो सुखसोहळा प्रचंड । देवांनाहि दुर्लभ जो ॥ ७३ ॥ येती नृसिंहवाडींतून । दत्तसेवेंत जे निमग्न । ऐसे पूजारी कांहीजण । येती भक्त स्त्रियाहि समवेत ॥ ७४ ॥ हे सकल गुरुभक्त । पवनी क्षेत्रीं सद्गुरूभेटीस येत । श्रीपादुकावरील छाटी आणित । महाप्रसाद समर्थांना ॥ ७५ ॥ त्यांनी पवनीस येऊन । घेतले श्रीगुरूदर्शन । दीक्षित स्वामींचा निवेदन । प्रणिपात श्रीचरणीं केला असे ॥ ७६ ॥ त्यांची दर्शनइच्छा बहुबस । श्रीगुरूंनी यावें वाडीस । करिती सद्गुरू मंदहास्य । येऊं ऐसें प्रकट करिती ॥ ७७ ॥ राहिले येथे आनंदात । एक मास पर्यंत । मग विचार आला मनांत । वाडींतील भक्तांच्या ॥ ७८ ॥ श्रीगुरूमहाराजांलागून । नित्य नवे श्रीमान । भिक्षा देताती आणून । प्रयोजन थोर होतसे ॥ ७९ ॥ महाराजांस एके दिनीं । पुडी करावी इच्छिती मनीं । म्हणोनी आपसांत वर्गणी । जाहली शंभर रुपयांची ॥ ८० ॥ सीताराम महाराज आणि गुरूनाथ । द्वय समर्थांवंदन करित । शंभर रूपये पुढे ठेवित आपुली इच्छा सांगती ॥ ८१ ॥ आम्हा बालकांची ही सेवा । अंगीकारावी वासुदेवा । महाराज वदती तेधवां । काय जरूर या रूपयांची ॥ ८२ ॥ रोज चाललें हें भिक्षादान । तें आपुलें आहे समजून । यांत मानावें समाधान । विप्रवदती काय तेव्हा ॥ ८३ ॥ समर्थांचें दयाळू मन । येथ गरीब आणि श्रीमान । भेदभाव हा नसे पूर्ण । हेंचि आम्ही जाणतों ॥ ८४ ॥ जैसा गोपाळ कृष्ण

भगवान । विदुरागृहीं जाऊन । कण्या आंबील खाऊन । तृप्त असे जाहला ॥ ८५ ॥ तैसा आमुचा दूधभात । गोड करतील सद्गुरुनाथ । होवूनियां कृपावंत । आम्हा गरीबांकारणें ॥ ८६ ॥ ऐसें विनवितां श्रीगुरूंनी । सीतारामम्हाराजाकडे पाहूनी । म्हणती उदइक दिनीं । याचीच भिक्षा होऊं द्या ॥ ८७ ॥ तरी सांगावें ग्रामस्थांना । स्त्रिया पुरूष सान थोरांना । वाडीच्या गुरूद्वादशी-प्रसादग्रहणा । भोजना यावें सकलांनी ॥ ८८ ॥ कोणीहि आपुल्या गृहांत । स्वयंपाककार्यार्थ । चूल पेटवूं नये सांगत । गुरूआज्ञांकित सीताराम ॥ ८९ ॥ ऐसें दिधलें आमंत्रण । विचार करिती ग्रामस्थ जन । उदईक कोणी भक्त श्रीमान । समर्था पुढी देतसे ॥ ९० ॥ ठरल्यासम दुसरे दिनीं । सकल स्वयंपाक होऊनी । सकल पूजाऱ्यांलागूनी । महाराज काय सांगती ॥ ९१ ॥ अन्नपूर्णेचें वाडीसमान । आधी करूनी पूजन । मग सकलांलागून । प्रसाद तोहि वाढावा ॥ ९२ ॥ पूजाऱ्यांनी महाराजांकडून । छाटी घेतली मागून । ती अन्नावरी आच्छादून । अन्नपूर्णेची पूजा आरती केली असे ॥ ९३ ॥ नित्यासम भावभक्ति । श्रीसद्गुरूंची पूजा आरती । करूनी तीर्थप्रसाद घेती । मग पंगती बैसती कैशापरी ॥ ९४ ॥ कांही पंगती देवळांत । कांही देवळाच्या पटांगणांत । ऐशा चौफेर बैसत । एकाच वेळीं कितीएक ॥ ९५ ॥ लाडू शिरा खीर भात । चटण्या कोशिंबिरी शाखा बहुत । आग्रहाने वाढावया सांगत । स्वयें श्रीगुरूमाउली ॥ ९६ ॥ वदती आज असे हा वाडीचा । श्रीदत्तात्रेयमहाराजाचा । महोत्सव केला साचा । पुजाऱ्यांनी हा साजरा ॥ ९७ ॥ हा दत्तात्रेयाचा प्रसाद म्हणूनी । भावभक्ति ठेवूनी । ग्रहण करावा सर्वांनी । सांगती फिरूनी वासुदेव ॥ ९८ ॥ तैसेंच स्वयें सद्गुरूनाथ । प्रेमभावें प्रसाद घेत । सकल जातींच्या समवेत । अंत्यज तृप्त जाहले ॥ ९९ ॥ श्रमपरिहारार्थ करूनी स्नान । नित्यासम रात्रीं जाण । प्रीतिपूर्वक प्रसादग्रहण । केला सीताराममहाराजांनी ॥ १०० ॥ नित्याहून अधिक जाण । आज झालें अन्नदान । चार हजाराहून । पंगती उठल्या भोजनाच्या ॥ १ ॥ असे श्रीगुरूचरित्रांत । तीन पात्रांच्या अन्नांत । लक्षावधी

जेऊनी तृप्त । हा अभ्दुत प्रभाव श्रीगुरूचा ॥ २ ॥ तैसेंच आज येथे जाहलें । श्रीसद्गुरूदत्त प्रकटले । चार हजार लोक जेवले । वाडीच्या शंभर रुपयात ॥ ३ ॥ उचंबळली भावभक्ति । एकमुखाने गर्जती । श्रीवासुदेवानंद सरस्वती । श्रीगुरूदेव दत्त ॥ ४ ॥ असा प्रचंड जयघोष केला । ज्यांनी वासुदेव भगवंत नयनीं पाहिला । धन्य धन्य तो लोक जाहला । धन्य जाहली ती मेदिनी ॥ ५ ॥ तैसाच श्रीगुरूमुखींचा बोध । प्राशन करिती सकल श्रोतृवृंद । घरोघरीं आनंद । सानथोरांपासूनी ॥ ६ ॥ श्रीवासुदेवानंद सद्गुरूनाथ । सीताराममहाराज थोर भक्त । भक्ति जडली अतोनात । एकचि ध्यान लागलें ॥ ७ ॥ सोडिले सकल व्यवहार । सोडिलें वाटे घरदार । रंगलें वासुदेवनामीं अंतर । विठ्ठलमंदिरीं धाव घेती ॥ ८ ॥ तैसे वाडींतील श्रीदत्तपुजारी । न सोडिती पळभरी । गुरूपदांबुजीं दिनभरीं । मधुर रस चाखिती भ्रमर हे ॥ ९ ॥ प्रेमसंवाद सदोदित । भक्तांसवें ह्या चालत । तईं नृसिंहसरस्वतींची इच्छा व्यक्त । केली असे पूजाऱ्यांनी ॥ ११० ॥ वंदन करूनी केली प्रार्थना । परि सद्गुरूविचार दिसेना । श्रीमहाराजांनी नृसिंहसरस्वतींना । पत्र लिहूनी कळविलें ॥ ११ ॥ श्रीगुरुदत्ताज्ञे करून । तेथील पूजाऱ्यांलागून । जें शिकविणें तें शिकविलें असून । आता कांही राहिलें नसे ॥ १२ ॥ तरी आमुचा बेत । तेथे येण्याचा करूनी रहित । उत्तर दिशा लक्षूनी पंथ । जाणें असे ठरविलें ॥ १३ ॥ हें पत्र आलेलें माहीत । सकल पूजाऱ्यांसहित । म्हणूनी उत्कंठा मनांत । वाडींत यावें महाराजांनी ॥ १४ ॥ मग सकल पुजाऱ्यांनी । युक्ति योजिली असे मनीं । पंगती बैसल्या दुजे दिनीं । भोजनाच्या सकलहि ॥ १५ ॥ केली सकल पूजाऱ्यांनी । प्रार्थना हात जोडूनी । वाडीस यावें म्हणूनी । नम्र विनवणी केली असे ॥ १६ ॥ श्रीवासुदेवमहाराजांनी प्रार्थना ऐकिली कानीं । समाधि लागली त्याक्षणीं । श्रीदत्तात्रेय अंतरीं प्रकटले ॥ १७ ॥ सदा शांतवृत्ति हे वासुदेव भगवान । परि जाहले क्रोधायमान । कंप सुटला शरीराकारण । लाल वदन जाहलें ॥ १८ ॥ क्रोधें बोलती पूजाऱ्यांसी । कासया नेतों म्हणतां मजसी ।

किती वेळां येतां वाडीसी । लाभ काय जाहला असे ॥ १९ ॥ उपदेश केला येऊनी । काय बिबला असे मनीं । पालथ्या घागरीवरी पाणी । साच तैसें जाहलें असे ॥ १२० ॥ हें क्रोधरूपी भाषण । चाललें असे समाधींतून । पूजाऱ्यांसहित अवघेजण । घाबरले असती मानसीं ॥ २१ ॥ मग काही वेळांनी । समाधि गेली उतरूनी । शांत वृत्ति समाधानी । पाहिली सकलांनी महाराजांची ॥ २२ ॥ आता हट्ट धरिल्यावाचून । महाराज न येती जाण । काय करावें म्हणून । विचार करिते जाहले ॥ २३ ॥ तेव्हा सकल पूजाऱ्यांनी । युक्ति योजिली असे मनीं । पंगती बैसल्या दुजे दिनीं । भोजना सकल ब्राम्हणांच्या ॥ २४ ॥ आतां जेवावें आनंदांनी । ऐसी आज्ञा होणार सकलां लागूनी । तों वाडीच्या पुजाऱ्यांनी । युक्ति आपुली साधली ॥ २५ ॥ करीं घेऊनी आपोशन । वदती वासुदेव भगवान । वाडीस येतों म्हणून । अभिवचन द्यावें आम्हांसी ॥ २६ ॥ तरी घेतों हें आपोशन । नातरी उठतों उपाशी येथून । सकल पाहते जाहले जाण । यावरी स्वामी काय वदती ॥ २७ ॥ वाडीस येणें न आमुचे स्वाधीन । तरी हट्ट न करावा आपण । सुखें करावें भोजन । उशीर फार जाहला असे ॥ २८ ॥ तरी पूजारी कबूल होईनात । भोजनासी उशीर होत । इतर ब्राह्मण म्हणती मनांत । कोण हे कोठील आज आले ॥ २९ ॥ सद्गुरुसी कां त्रास देती । एकच गडबड उडाली पंगतीं । स्वामीहि कष्टी होती । बहु वेळ जाहला म्हणूनी ॥ १३० ॥ मग समाधि लाविली महाराजांनी । श्रीदत्तात्रेय श्रीगुरुचिंतनी । उत्कंठा लागली दिसे मनीं । वाडीनिवासी पूजाऱ्यांच्या ॥ ३१ ॥ नयन उघडले त्या क्षणीं । पूजाऱ्यांकडे पाहूनी । आम्ही वाडीस येतों म्हणूनी । सांगती भोजन करावें ॥ ३२ ॥ ऐसें महाराजांचें अभिवचन । ऐकतां आनंदलें मन । मग घेतलें आपोशन । भोजने जाहलीं सकलांचीं ॥ ३३ ॥ आपुल्या मातेचिये जवळ । हट्ट करितें बाळ । तैसी गुरुमाउली प्रेमळ । भक्तहट्ट पुरवीतसे ॥ ३४ ॥ सीताराममहाराज एके दिनीं । निद्रिस्त आपुल्या आंथरुणीं । खाली वरील पांघरुणीं । भर

मुंगळ्यांचा जमला असे ॥ ३५ ॥ जैशी काळी काळी शार । घोंगडी खाली आणि वर । तैसाच थवा चौफेर । मुंगळ्यांचा दिसे पसरलेला ॥ ३६ ॥ जणुं मुंगळ्यांचेच आंथरुण । त्यावरी केलें असे शयन । सुखें निद्रा लागली जाण । सीतारामम्हाराजांना । ३७ ॥ हें पाहिलें लोकांनी । घाबरुनी गेले मनीं । यातना होत असतील जाणूनी । मुंगळे झाडणें सुरु केलें ॥ ३८ ॥ तेव्हा सीताराम काय म्हणती । असूं द्या हो ते कांही न करिती । आपोआप निघूनी जाती । थोडा वेळ येथे राहूनियां ॥ ३९ ॥ ऐसें महाराज बोलून । स्वस्थ राहिले असती जाण । पाहती लोक दुरुन । काय करावें समजेना ॥ १४० ॥ ऐसा जाहला कांहीं वेळ । मुंगळे निघूनी गेले सकळ । हें अहिंसा तत्वाचें बळ । पाठीसी असतां भय नसे ॥ ४१ ॥ आतां या पवनी क्षेत्रांतला । चातुर्मास संपला । श्रीगुरु निघाले सीमोल्लंघनाला । वैनगंगेच्या पैलतिरी ॥ ४२ ॥ झाडूनी दुतर्फा मार्गांत । गोमयें सडा घालीत । त्यावरी रंगवल्ली शोभिवंत । काढिल्या असती भक्तांनी ॥ ४३ ॥ गोड्या तेलाच्या दीपज्योती । एकामागूनी एक दिसती । ऐशा तीन तीन रांगा चालती । मार्गावरुनी त्या ओळीने ॥ ४४ ॥ पुढे वाजंत्री वाजती । सनया मंजुळ गीत गाती । भजनी मेळे नाचती । दिंड्या पताका घेऊनियां ॥४५॥ दिगंबरा दिगंबरा म्हणूनी । हळू हळू चालले मार्गांनी । म्हणती धन्य जाहली पवनीं । सद्गुरुचरणीं आज आमुची ॥ ४६ ॥ कंठीं सुमनहार सुगंधित । दंड कमंडलू हातांत । भगवी छाटी परिधान करित । श्रीगुरुदत्त हे वासुदेव ॥ ४७ ॥ ऐसे सीताराम सद्गुरुनाथ । बसूनिया नौकेंत । गंगा उतरुनी परतीरा येत । भक्तगण समवेत सकलहि ॥ ४८ ॥ आधी विधिपूर्वक करून । सीमादेवीचें पूजन । मग नारळ फोडून । प्रार्थना केली सकलांनी ॥ ४९ ॥ स्तोत्रें गीता विष्णुसहस्त्रनाम । म्हणती महाराज सीताराम । संगें वदती भक्तोत्तम । एक ध्वनि ये ऐकतां ॥ १५० ॥ मग खोबरें चारोळ्या किसमिस । प्रसाद वाटला सकलांस । सर्वांमुखीं जयघोष । मंगल नामाचा करविला ॥ ५१ ॥ त्याच समारंभांत परत । भजनीं नामःस्मरणीं गाजत । पातले सकल पवनीत । अति आनंद



पादुका—श्री प. पू. वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी
श्री ब्र. यो. सीताराम महाराज टेंब्ये स्वामी
श्री प. पू. नृसिंहसरस्वती दीक्षित स्वामी



सभामंडपासमोरील–श्री सीताराम महाराजांच्या पादुका

करुनियां ॥ ५२ ॥ निघती त्याच दिवशीं तेथून । वाडीस जावया लागून । परि भक्तमंडळी तो दिन । जाऊं न देती त्यांजला ॥ ५३ ॥ म्हणूनी दुसरे दिवशीं । भाद्रपद वद्य प्रतिपदेसी । निघाले असती वाडीसी । संगें सकल मंडळी वाडीची ॥ ५४ ॥ कितीएकांस तारणार । कितीएकांचा केला उद्धार । कितीएकांवरी केले उपकार । येथे सीताराममहाराजांनी ॥ ५५ ॥ भोळा भाविक एक पवनीं । गरीब असे जातीचा वाणी । जिरें मिरें विकूनी । घर कसें तरी चालवीतसे ॥ ५६ ॥ जवळी नसे संपदा । भोगी नित्य आपदा । कधी न जाहला फायदा । व्यापारात त्या वाण्यासी ॥ ५७ ॥ ऐसा भोळा भाव ओळखून । द्रवलें महाराजांचें मन । भाग्योदयाचा उगवला दिन । जवळी त्यास पाचारिती ॥ ५८ ॥ म्हणती सोमवार पेठेंतून । आणावें सकल सामान । येथील प्रयोजनाकारण । तुवां सतत पुरवावें ॥ ५९ ॥ जो भाव असेल पेठेंत । तो ठेवूनी हिशेबांत । रुपयामागे एक आणा फक्त । नित्य फायदा त्वां घ्यावा ॥ १६० ॥ ऐसा माल आम्हा पुरवून । मानावें त्यांत समाधान । होईल तुझें कल्याण । असे कां मान्य हें तुज ॥ ६१ ॥ होता सात्विक तो वाणी । असे तैसा सत्याचरणी । मस्तक ठेविलें सीतारामचरणीं । होय म्हणूनी सांगीतलें ॥ ६२ ॥ मग ठरावाप्रमाणें नित्य । सामान आणूनी पुरवीत । एक आणाच नफा घेत । अधिक हाव केली नसे ॥ ६३ ॥ ऐसा सहा महिनेपर्यंत । माल घेतला असे विकत । आतां समारंभ पुरा जाहलियावरी पुसत । महाराज त्या वाण्यासी ॥ ६४ ॥ काय शेटजी तुम्हांप्रत । कांही लाभ या व्यापारांत । जाहला असेल ना आतांपर्यंत । तो सांगावा आम्हासी ॥ ६५ ॥ रामशेट घालून नमस्कार । म्हणे आपण या दीनावर । अनंत केलेत उपकार । जन्माचें कल्याण केलें असे ॥ ६६ ॥ जन्मावें गेलें दारिद्र्य घोर । चिंता हरपली समग्र । जन्मभर पुरून उरणार । इतुका नफा जाहला असे ॥ ६७ ॥ अवघ्या ह्या सहा महिन्यात । आपुल्या कृपेने दीनानाथ । तीस हजार रुपये नफा होत । कैसा हौऊं मी उतराई ॥ ६८ ॥ प्रेमाश्रु दाटले नयनी । हृदय आलें

गहिवरूनी । साष्टांग नमस्कार घालूनी । चरणकमल भिजविलें ॥ ६९ ॥ सीताराम वदती त्यासी । तूं सत्याने वागलासी । त्याचें फळ दिधलें तुजसी । श्रीसद्गुरूमहाराजांनी ॥ १७० ॥ सद्गुरूचें अपार देणें । हें कोणा न कळू जाणें । तरी आनंदात राहणें । आशीर्वाद देती तयासी ॥ ७१ ॥ मग येथींल व्यवस्था लावूनी । उदईक निघावें येथूनी । ऐसी आज्ञा श्रीगुरूंनी । सीतारामा केली असे ॥ ७२ ॥ मग सकल व्यवस्था लावूनी । निघाले झणीं पवनीहूनी । तीन मैल जाऊनी । भेटलें सीताराम सद्गुरूंना ॥ ७३ ॥ आगगाडीने जावयास । कथिलें सकल वाडीकरांस । आपण इंगोली-वरून जावयास । श्रीवासुदेव निघाले ॥ ७४ ॥ सीताराममहाराज गांडाबुवा । किसन बापू विष्णूबूवा । ऐसे पांच भक्त जीवभावा-। संगें होते सद्गुरूंच्या ॥ ७५ ॥ इंगोलीस जाण्याप्रति । येथूनी दोन मार्ग असती । त्यांतील एका मार्गाकडे वळती । तों गांडाबुवा म्हणती तयां ॥ ७६ ॥ जाऊं माहूरगडाकडून । घेऊनियां दत्तदर्शन । सद्गुरूनाथ भक्ताधीन । परतले दुज्या मार्गाकडे ॥७७॥ पण काय जाहला चमत्कार । गड येतांचि समोर । प्रकृति बिघडली साचार । गांडाबुवांची एकाएकीं ॥७८॥ मग सीताराममहाराजांनी बैलगाडींत बसवूनी । गड चढवेना म्हणूनी । तेथेचि त्यांना ठेविलें ॥७९॥ मग सीताराम सद्गुरुनाथ । आणिक जे कां दुजे भक्त । गडावरी जाऊनी येत । दत्त दर्शन घेऊनियां ॥ १८० ॥ पुढती एक मैल चालून-- । जातां प्रकृति गेली सुधारुन । उतरती गांडाबुवा गाडीतून । संगे चालती सकलांच्या ॥ ८१ ॥ असे प्रत्यक्ष दत्तमूर्ति । होती तयांच्या संगतीं । परि भ्रम पडला चित्तीं । नाही दत्तदर्शन जाहलें ॥ ८२ ॥ चालतां चालतां मार्गांनी । पोहोचले इंगोलीस येऊनी । हे गुरुशिष्य महात्मे दोन्ही । मारुतिमंदिरांत उतरले ॥ ८३ ॥ गांडाबुवांसह कृष्णातीरीं । मिरजेनजिक सहा मैलांवरी । अर्जुनवाड ग्रामांतरीं । दत्तमंदिरीं बैसले ॥ ८४ ॥ ही बातमी वाडींत । श्रीदीक्षित स्वामींना कळत । भजनदिंडी घेऊनी जात । येती घेऊनी आनंदें ॥ ८५ ॥ सीताराममहाराजांनी । इंगोलींत गुरुआज्ञा घेऊनी । गोदाकाठीं येंऊनी । वास्तव्य तेथे ठेवलें । ८६ ॥ इकडे वाडींत करिती

विचारू । पाहिजे मातेजवळ लेकरू । धेनूजवळ वासरु । पाहतां मन हो समाधान ॥ ८७ ॥ तैसे सद्गुरु धेनूजवळ । नाही सीतारामवत्स बाळ । याचीं लागली तळमळ । श्रीदीक्षितस्वामीना ॥८८॥ सीताराम भक्त हे गोदातारीं । त्यांना पत्रें पाठवूनी वरच्यावरी । विनवितो वाडीस यावें लवकरीं । आम्ही वाट पाहतसों ॥ ८९ ॥ ऐशीं पत्रें पाहूनी । निघाले गोदाकाठ सोडूनी । मार्गीं एका ठिकाणीं भक्तास्तव थांबले ॥ १९० ॥ एक बाई या ग्रामांत । फार असे श्रीमंत । तिने गुरुमंत्र स्वीकृत –। केला सीतारामांपासूनी ॥ ९१ ॥ गुरुपूजा तिने करूनी । दिधली करवत काठी उपरणी । तैसाचि धोतरजोडा देऊनी । सुवर्णअंगठीहि दिली असे ॥ ९२ ॥ नम्रत्वें करी विनंतीला । मी येणार असे वाडीला । तोंपर्यंत तरी या वस्त्राला । वापरावें महाराजा ॥ ९३ ॥ आपणांसी अनेक भक्त । कितीएक उंची वस्त्रें देत । तरी हे स्वीकार करतील समर्थ । मज आनंद होईल ॥ ९४ ॥ तिची भावभक्ति पाहून । वस्त्रें केलीं धारण । पुढती निघाले तेथून । भेटती श्रीदीक्षितस्वामींस वाडींत ॥ ९५ ॥ ठरविले होतें ध्यावी विश्रांति । परि आग्रहाचीं आपुलीं पत्रें येती । म्हणूनी निघालों शीघ्रगती । वदती सीताराममहाराज ॥ ९६ ॥ गुरुबंधू आनंदित । जाहले असती मनांत । कृष्णेवरी धुवोनी येत । हातपाय झडकरी ॥ ९७ ॥ मग दत्तपादुकांना करूनी नमन । तीर्थ अंगारा घेऊन । मग सद्गुरु नाथांसी नमन । करिती सद्भावें सीताराम ॥ ९८ ॥ हा अल्पावधींत कैसा आला । म्हणती नृसिंहसरस्वतींनीच बोलाविला । अंतरीं करतील कौतुकाला । श्रीवासुदेव सद्गुरु ॥ ९९ ॥ आता पुढील अध्यायांत । श्रीसीताराम गुरुआज्ञांकित । या श्रीक्षेत्र वाडींत । स्वाहाकार करितील ॥ २०० ॥ तरी श्रोते हो सावधान । येथें माझें न कांही मीपण । प्रेमभावें करावें श्रवण । कर्ता करविता श्रीगुरु असे ॥ १ ॥ आता दत्ता दयाघना । हीच जानकीची आराधना । मजलागीं तुझ्या चरणां–। सन्निध ठेवीं सर्वदा ॥२॥ इति श्रीसीतारामचरित्रालंकारमणी । गुंफिला असे दृष्टांतकोंदणीं । प्रकाश दाविता अंतःकरणीं । चतुर्विंश अध्याय गोड हा ॥ २०३ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

अध्याय पंचविसावा

श्रीगणेशाय नमः ।। श्रीगुरूदत्तात्रेयाय नमः ।। श्रीवासुदेवाय नमः ।। ॐ श्रीरघुनंदना श्रीरामा । चराचरांकित श्रीरामा । सर्वांतरात्मा श्रीरामा । आत्मारामा नमोऽस्तु ते ।। १ ।। तुझी ह्या देहावरी सकल सत्ता । तूं ह्या देहासी पालनकर्ता । तूं ह्या देहासी रक्षिता । कर्ता हर्ता तूं आत्मारामा ।। २ ।। येतें पायांनी चालतां । येतें मुखाने बोलतां । येतें कानांनी ऐकतां । तुझ्याच इच्छेच्या कारणें ।। ३ ।। तूं हृदयसिंहासनावरी । घेऊनियां सूत्रदोरी । परि तुझा कारभारी । मन हें चंचल फार असे ।। ४ ।। कवणाची निंदा कवणाची स्तुति । मुखीं हीच सारखी उक्ति । तीच आवड वसे या चित्तीं । कर्ण लोभावती ऐकावया ।। ५ ।। लोभ मद मत्सर । या मना मोठा अहंकार । सारखें चवताळूनी समोर । मागे पुढे पाहतसे ।। ६ ।। सज्जनासी न देई मान । दुर्जनाची सेवा करी जाण । त्याचे घेऊनियां दुर्गुण । समान त्याच्या होऊं पाहे ।। ७ ।। या मायावी बाजारांत । मन अखंड मोहित । साधेल कैसा आपुला स्वार्थ । हाच ध्यास निरंतर ।। ८ ।। तुझ्या हातीं रामा लगाम । परि हें मन उन्मत्त अधम । न सुचे त्यासी सत्कर्म । दिनामाजीं क्षणभरी ।। ९ ।। तरि आत्मारामा विनंति । आवरी आवरी या मनाप्रति । देई संतसंगति । शेवट गोड व्हावया ।। १० ।। हा नरदेह जाईल वाया । पडेल कोणत्या डोहीं जाऊनियां । तरि स्थिर करी रामराया । या मनातें झडकरी ।। ११ ।। रामकृष्ण वासुदेव । घे मना झडकरी तेथे धाव । हा सीतारामग्रंथ गुणार्णव । होईल खचित या मानसीं ।। १२ ।। श्रीवासुदेवानंद सरस्वती । असे प्रत्यक्ष दत्तात्रेयमूर्ति । सीताराममहाराज कीर्ति । सांगती होय ती स्वयें १३ ।। जाहलें मागील अध्यायीं कथन । पवनी क्षेत्रीं श्रीगुरू भक्त दोघेजण । चातुर्मास अन्नदान । अभ्दुत सोहळा झाला असे ।। १४ ।। आणिक कांही चमत्कार । श्रवण जाहले मनोहर । देव-भक्त-महिमा अपार । न सरे तो वर्णितां ।। १५ ।।

श्रीदीक्षितस्वामींचीं पत्रें जाती । सीताराम वाडींत येती । आतां येथील कथार्थी । अवधान द्यावें आदरें ॥ १६ ॥ श्रीसीताराममहाराजांनी । श्रीसद्गुरूनाथांची अनुज्ञा घेऊनी । कृष्णेतीरीं मंडप सजवूनी । संहितास्वाहाकार केला असे ॥ १७ ॥ येथील रहिवासी दामले वेदमूर्ति । वैदिक ब्राह्मण दुरूनी येती । सकलांच्या संतोषार्थ बैसती । यज्ञस्थलीं श्रीगुरूदेव ॥ १८ ॥ नगारखान्या-पासून । कृष्णामाईचें पटांगण । श्रीदत्तमंदिरासभोवतीं पूर्ण । बैसती ब्राह्मणभोजनपंगतीं ॥ १९ ॥ सकलविधिपूर्वक । सीताराममहाराज सोडिती उदक । न्यून न पडे कांहीं एक । श्रीदत्तात्रेयकृपेने ॥ २० ॥ माधुकरी भिक्षा मागू घेती । गुरूराज भोजना बैसती । जवळीच दीक्षितस्वामी सरस्वती । समोर बसतीं गांडाबुवा ॥ २१ ॥ तैसेच सकल पूजारी । इतर लोक सेवेकरी । परगांवचे ब्राह्मण सामोरी । सभोंवार बसती आनदें ॥ २२ ॥ गोविंद गोविंद नाम रसाळ । वदती वदनीं घेतां कवळ । आठविती कौसल्येचा बाळ । सीताकांत स्मरण जय जय राम ॥२३॥ ऐसा थाट वाडींत । आया बाया किती वाढीत । ग्रामातूनी बोलावूनी समस्त । भोजन घालिती तयांना ॥२४॥ मग रात्रीं दहाचेपुढती । अल्पोपंहार स्वयें घेती । तोहि काय सेवन करिती । सीताराम-महाराज ॥२५॥ किती कमी भोजन । दहीभात कालवून । तोहि तिखटमिठावाचून । बत्तीस घासांहूनी कमी खाती ॥२६॥ श्रीवासुदेवानंद सरस्वती । भक्तराज सीतारामर्मूति । त्रिजे नृसिंहसरस्वती । तिघांचे भोजन असें सारखें ॥२७॥ किती जिव्हा ताब्यांत । तिखट मीठ ना कधी खात । नित्य अळणी भोजन करीत । धन्य धन्य संत ते ॥ २८ ॥ ना तरी आमुच्या जिव्हेस । किती चवी बहुवस । खारें गोडें खावयाय । नित्य नूतन पाहिजे ॥ २९ ॥ ऐसा हा पंधरा दिन । समारंभ जाहला पूर्ण । यज्ञदेवता संतुष्ट होऊन । सकल तृप्ति पावले ॥ ३० ॥ सकलवैदिक ब्राह्मणां । दिधली बहु दक्षिणा । वस्त्र पात्रसुवर्णां । देऊनी त्यांसी बोळविलें ॥ ३१ ॥ गावोगावींचा वेगळा प्रघात । तैसाच असे एक या वाडींत । नित्य चैत्रमासांत । कुमारिका येती कृष्णेवरी ॥ ३२ ॥ घाटावरी पाणी शिंपडून । त्यावरी सुबक रांगोळ्या काढून ।

कृष्णामाईचें पूजन । मनोभावें करिताती ॥ ३३ ॥ ऐशा पाऊणशें कुमारिका । निर्मळ आणि भाविका । त्या मानूनी अंबिका । पूजिल्या सीताराममहाराजांनी ॥३४॥ देउनी सकलांसी भोजन । हळदीकुंकुम लावून । प्रत्येकीस दिला नारळ खण । भोजन दक्षिणा दिली असे ॥ ३५ ॥ ऋद्धी सिद्धी सेवेसी । असती सीताराममहाराजांपाशी । जैशा कुमारिका पूजूनी त्यांसी । दिधले खण नारळ दक्षिणा ॥ ३६ ॥ तैसेंच सुवासिनींना लुगडीं खण । ब्राह्मणासी धोतरपान । तरी धोतरें लुगडीं खण । शिल्लक राहती त्यांजपाशी ॥ ३७ ॥ त्यांतील कांही सामान । कमी झालेलें पाहून । गलबला करिती तेथील जन । म्हणती कोणी नेलें असेल ॥ ३८ ॥ सीताराम म्हणती सकलांसी । तुम्ही शांत असा मानसीं । येतील चार दिवसांनी स्थलासी । आपोआप सकल वस्तू ॥ ३९ ॥ महाराजांचें वचन सत्य । पाहावें चार दिवसांचे आंत । येती वस्तू खोलींत । नकळतां कैशा कवणासी ॥ ४० ॥ वस्तू पाहिल्या सकलांनी । आश्चर्य करिते झाले मनीं । म्हणती केवढी ज्ञानशक्ति अंतःकरणी । महाराजांचे जवळी असे ॥ ४१ ॥ दुज्याकरितां देती घेती । परि स्वहित कदापि ना नेणती । जरी त्यांतें पूजिती । राजयोगी म्हणोनियां ॥ ४२ ॥ गुरुशिष्य दोघे यतिश्वर । परी सीताराममहाराजांचे अंगावर । लोकांनी घातले अलंकार । कोणते ते पाहावें ॥ ४३ ॥ सुवर्णकंठी गळ्यांत । आंमठ्या सलकंडी हातांत । रेशीमकाठी शोभत । धोतर आणि उपरणें ॥ ४४ ॥ चांदीची पंचपात्री तांब्या ताट । राजयोगी सकल थाट । परि अंतरी विरक्तीची लाट । उसळ्या मारी वरीवरी ॥४५॥ वाडीकर ग्रामस्थांनी । सीताराम नेऊनी सदनीं । श्रीपाद धुंडीराज कवीश्वरांनी । फलाहार दिधला असे ॥ ४६ ॥ तेंवि अण्णा दीक्षितांनी । पायघड्या घालूनी । सीताराममहाराज आपुले सदनीं । अति थाटाने नेले असती ॥ ४७ ॥ स्वयें महाराज अल्पोपहारीं । भक्त प्रकार करिती नानापरी । तेणें संगतीचें सेवेकरी । तृप्त होती सकलहि ॥ ४८ ॥ सकल पाहूनियां तृप्त । स्वयें महाराज संतोषित । आत्मसुखाचें साधन नित । इतरसंतोष सज्जनांतें

॥ ४९ ॥ आसनें आणि प्राणायाम । आत्मानात्मविवेक उत्तम । इच्छितांसी शिकविती सीताराम । स्त्रियाहि बहु प्रविण होती ॥ ५० ॥ श्रीवासुदेवानंद सरस्वती । पंचदशीचा पाठ देती । समजावूनी सांगती । आनंदानें सकलांसी ॥ ५१ ॥ माते जवळी बालकाचा । गुरु जवळी शिष्याचा । तैसाच गुरुपासी सीतारामाचा । हट्ट माउली पुरवीतसे ॥ ५२ ॥ वाडींत सद्गुरुंच्या मुखाने । स्वानुभवपूत अमृतवाणीने । श्रीभगवद्गीतार्थ ऐकणें । ऐशी इच्छा झाली तयां ॥५३॥ म्हणूनी सीतारामम्हाराजांनी । श्रीसद्गुरुसी नमूनी । गीता सांगावी आपुणा लागूनी । ऐसा स्वहेतु प्रकटविला ॥ ५४ ॥ परि न कांही बोलत । स्तब्ध राहिले सद्गुरुनाथ । तेव्हाच ओळखिलें मनोगत । सीताराम महाराजांनी ॥ ५५ ॥ तेव्हा शास्त्रीमंडळींना । केली असे गुप्त सुचना । सद्गुरु पुसतां तुम्ही म्हणा । गीतार्थ सांगावा आपण हो ॥ ५६ ॥ मग पुसतां श्रीगुरुंनी । तेव्हा अण्णा दीक्षितांनी । गीता आपण सांगावी म्हणूनी । पुनरपि विनवणी केली असे ॥ ५७ ॥ साधले शास्त्री येती त्या समयास । पुसनी सद्गुरु तयांस । आज्ञा मान्य आम्हांस । सांगतो गीतार्थ म्हणती ते ॥ ५८ ॥ मग कृष्णेच्या संगमावर । सद्गुरुस करुनी नमस्कार । बैसले व्यासपीठावर । गीतार्थ सांगावया शास्त्री साधले ॥ ५९ ॥ जाहलें मनाविरुद्ध । म्हणती येथें काय मिळेल बोध । येथे काय मिळेल आनंद । गीता-श्रवणार्थ सीताराम न जाती ॥ ६० ॥ श्रीसद्गुरु पासून । गीताश्रवणार्थ येती ग्रामस्थ जन । परि न दिसती सीताराम जाण । म्हणूनी पुसती दिक्षितस्वामी ॥ ६१ ॥ सीताराम वदती काय त्या वेळे । टाकूनियां सोनकेळें । ही बेचवचि फळें । कोण जाईल खावया ॥ ६२ ॥ टाकूनियां सुधारस । कोण घेईल लवण घास । सूर्यनारायणाचा प्रकाश । मिळतां मेणबत्ती कासया ॥ ६३ ॥ जैसें न रूचले सीताराम महाराजांसी । तैसेंच इतर शास्त्रीजनांसी । तेहि सद्गुरूंच्या अमृतमय उपदेशासी । अंतरले असती सकलहि ॥ ६४ ॥ मग गीताध्याय जाहले पूर्ण । त्याची सांगता करावी म्हणून । कांही दक्षिणा द्यावया कारण । सांगती सद्गुरू सीतारामा ॥ ६५ ॥ कांही तरी दक्षिणा । याचा

अर्थ कां न समजे मना । शेपन्नास रुपये तरी त्यांना । द्यावें ऐसा हेत असे ॥ ६६ ॥ सद्गुरुनाथांचा उपदेश । घ्यावा न वाटला त्यांस । हा अहंपणा पाहून सीताराम भक्तास । कांही न द्यावें वाटलें ॥ ६७ ॥ परि सद्गुरुंसीं उत्तर देतां । चार आणे ठेवूं पुढती । नमस्कार भूमीवरती । साष्टांग घालूं तयांना ॥ ६८ ॥ ऐसे उत्तर ऐकतां क्षणीं । गुरुमाउली समजली मनी । आपण गीता न सांगितली म्हणूनी । रुसला असे निश्चयें ॥ ६९ ॥ पुनरपि त्यासी सांगतां । तें जाईल सकल वृथा । म्हणूनी त्याजवळी कांही न बोलतां । सांगती गांडाबुवासी ॥ ७० ॥ साधले शास्त्रीबुवांसी । कांही दक्षिणा द्यावयासी ; कांही रुपये असतील तुम्हापाशीं । तरी ते त्यांना तुम्ही द्यावें ॥ ७१ । ते दिवशींच त्यांचे जवळी । मनीऑर्डर आली सकाळीं । घेऊनी ते शंभर रुपये ओंजळी । देती शास्त्रीबुवासी ॥ ७२ ॥ ऐसे कितीतरी भक्त श्रेष्ठ । करिती गुरुमाउली जवळी हट्ट । परि असे माय ती संतुष्ट । पुरवी हट्ठ भक्तांचे ॥ ७३ ॥ आणिक पहावें उदाहरण । जशासी तसें आचरण । ना तरी संत मऊ मेणाहून । देतील कांसेची लंगोटी ॥ ७४ ॥ कोणी नाठाळ दिसतां उद्धट । पाहतां होतील अति कोपिष्ट । शिरीं मारतील काष्ठ । शरणागतां नित्य तारतील ॥ ७५ ॥ नारायणस्वामींच्या धर्मशाळेंत । श्रीसद्गुरु समर्थ । सकाळीं दोन तास पर्यन्त । वेदांत भाष्योपदेश करिताती ॥ ७६ ॥ इकडे सीताराममहाराम मठांत । सकल व्यवस्था पाहत । तों कोल्हापुरांहुन कोणी येत । सरकारी अधिकारी मोठा असे ॥ ७७ ॥ श्रीगुरुमहाराजांचें दर्शन । केव्हा होईल मजलागून । पुसता जाहला ऐसा प्रश्न । श्रीसीतारामांना तेधवा ॥ ७८ ॥ सद्गुरु सकाळ पासून । आपल्या कामीं असती तल्लीन तरी दुपारीं तीन वाजतां आपण । दर्शना यावें महाराजांच्या ॥ ७९ ॥ हे बोल न रुचले त्याला । क्रोधे अधिकारी लाल झाला । गर्वी बोले सीताराम महाराजाला । घडचाळ जवळी कां अमुच्या असे ॥ ८० ॥ खटासी व्हावें खट । उद्धटासी व्हावें उद्धट । ऐसें रामदासांचें वचन चोखट । तेंवि बोलतां महाराज ॥ ८१ ॥ तुम्ही कसेंहि करून । यावें दर्शनाकारण । ऐसी चिट्टी पाठवून । बोलाविलें होतें काय कोणी ॥ ८२ ॥

हा हुकुमी करारी जबाब ऐकला । क्रोध अधिक दुणावला । तो राजनोकर चावडीवर गेला । येई पोलीस घेऊन ॥ ८३ ॥ बांधा म्हणे सत्वर । करा यासी गिरफ्दार । सीताराम म्हणती त्यावर । पाहावयाचा काय चमत्कार तुला ॥ ८४ ॥ तो क्रोधयुक्त चेहरा पाहून । तैसेंच ऐकूनियां भाषण । पोलीस न येती पुढती जाण । दुरूनीच नमस्कार करिताती ॥ ८५ ॥ पोलीस न होती समोर । अधिकाऱ्याचा राग भडकला अनिवार । म्हणे मी कोल्हापूराहुनी सत्वर । दुजे शिपाई आणितों ॥ ८६ ॥ ऐसें क्रोधें बोलला । तडक कोल्हापुरासी गेला । तेथे न कळे काय चमत्काराला । दाखविलें सीताराममहाराजांनी ॥ ८७ ॥ त्याचा परिणाम काय झाला । चार दिवसांनी परत आला । शरणांगत पदीं जाहला । श्रीसीताराममहाराजांच्या ॥ ८८ ॥ माझ्या कृत अपराधाची क्षमा । करा मजला सीतारामा । आपुला मज न कळला महिमा । म्हणूनी हा अपराध घडला असे ॥ ८९ ॥ देखिला तो निरभिमान । लीन होऊनी आला शरण । उठविला हातीं धरून । आशीर्वाद देऊनियां ॥ ९० ॥ संतांजवळी नाही थोर सान । राजारंकहि समान । शत्रुमित्रहि समान । समान दया शांती क्षमा ॥ ९१ ॥ जो करणार होता गिरफ्दार । त्यासी उचलिती देऊनी कर । किती दयेचे हे सागर । क्षमाशीलहि तसेची ॥ ९२ ॥ जैसा भाव दयावंत । क्षमाशांतियुक्त विरक्त । तैसेच समय प्रसंगीं विनोद मस्करी करीत । आपुल्या परिचित मनुष्याची ॥ ९३ ॥ त्यांचे गुरूबंधू नृसिंहसरस्वती दीक्षित । राहत असती मठांत । त्यांच्या खोलीसमोरी राहत । श्रीब्रह्मचारी गांडाबुवा ॥ ९४ ॥ सग्दुरू भाष्य सांगती सकाळीं । श्रवण करिती हे भक्तमेळी । इकडे सीताराम-महाराज तेवेळीं । काय करिती गंमत ॥ ९५ ॥ ब्रह्मचारीबुवांच्या खोलीतून । रुपयांची भरलेली वाटी उचलून । ती नृसिंहसरस्वतीच्या खोलींत आणून । ठेविली धावळीखालीं झाकूनी ॥ ९६ ॥ पुढती कांही वेळांनी । भाष्य संपल्यावरी दोघांनी । आपापल्या खोलींत येऊनी । आसनीं आपुल्या बैसती ॥ ९७ ॥ इतक्यांत ब्रह्मचायीबुवांनी । ठेविली वाटी ज्या ठिकाणीं ।

ती न दिसे म्हणूनी पुसते जाहले सीताराभा ॥ ९८ ॥ आम्ही तुमच्या खोलींत । मदापिहि ना येत । मग आम्हांसी काय माहीत । म्हणती सीताराम महाराज ॥ ९९ ॥ मग बुवा इतरासी पुसो जाती । तों हसूं आवरेना सीताराममहाराजांसी । तुमचा संशय आमुचे चित्तीं । तुम्हांसीं सर्व ठाऊक असे ॥ १०० ॥ वदती ब्रह्मचारीबुवा । तुम्हीच याचा शोध लावावा । मग श्रीसीताराम-बुवा । बघती दीक्षित स्वामींकडें ॥ १ ॥ आम्हांस यांचा संशय येत । वाटी असावी त्यांचे खोलीत । कारण समोरील सकल दिसत । कोठें काय आहे यांना ॥ २ ॥ मग गांडाबुवा म्हणती त्यांना । त्यांचा संशय मज मुळींच ये ना । माझा तर्क माझे मना । सत्य तोहि वाटतसे ॥ ३ ॥ तयीं नृसिंहस्वामी सरस्वती । सीतारामांप्रति सांगती । आम्हांस कांही माहिती । या पैशाची कांही नसे ॥ ४ ॥ आमुच्या खोलींत जाऊन । खोली घ्यावी पाहून । आपुला संशय निरसून । घ्यावा सीताराममहाराजा ॥ ५ ॥ ऐसें ऐकतांचि हांसत । पुनरपि तेंच वदत । सत्य आपुलाचि संशय येत । म्हणूनी जाती पाहावया ॥ ६ ॥ इकडचें सामान तिकडे ठेवित । कांही सामान उचलूनी पाहत । घेतली वाटी हातांत । धाबळी खालील उचलूनी ॥ ७ ॥ ही पाहा रुपयांची वाटी । स्वामींनीच ठेविली मठी । माझा संशय संशय शेवटीं । खरा असे जाहला ॥ ८ ॥ तेव्हा नृसिंहसरस्वती दीक्षित । आश्चर्य करिती मनांत । पडले बहु विचारांत । ऐसें कैसें हें जाहलें ॥ ९ ॥ मग ब्रह्मचारीबुवा वदती हासून । कसला विचार करिता द्या सोडून । हा सीतारामबाबांचा खेळ जाण । त्यांचीच असे ही मस्करी ॥ ११० ॥ ऐसे तिघे हे प्रेमळ गुरुबंधू । अंतरींचे दयासिंधू । म्हणती कैसा जाहला हा विनोदू । म्हणूनी हासत राहिले घडीभरी ॥ १११ ॥ तैसाच एकदा विनोद । जाहला प्रेमसंवाद । श्रवण करितां आनंद । आपणांसी होईल ॥ १२ ॥ श्रीनृसिंहसरस्वती स्वामी दीक्षित । बैसले आपुल्या खोलींत । सायंसंध्या वंदनार्थ । नित्यनियमा प्रमाणें ॥ १३ ॥ संध्या जप झालियावरी । दृष्टि त्यांची भितीवरी । सहजपणें ब्रह्मचारी । आले सीताराम खोलींत

॥ १४ ॥ ऐसा जप चालला पाहती । विनोद करावा हें वाटलें चित्तीं । आपुल्या स्वभावानुसार पुसती । स्वामी वर काय पाहतसां ॥ १५ ॥ स्वामी हि थोडा विनोद करिती । त्यांच्या प्रश्ना उत्तर देती । ठेविले दंड वरिती । ते मी आज पाहातसे ॥ १६ ॥ काठचा करावयाच्या यतीश्वरांच्या । भक्तांनी आणून दिधलेल्या दंडांच्या । तेच दंड भितीवरच्या । फळीवरी होते ठेविलेले ॥ १७ ॥ पुनरपि प्रश्न करिती तयांसी । स्वामी ते दंड पाहतां कासयासी । स्वामी वदती यांतील तुम्हांसी । योग्य तो कोणता पाहतें ॥१८॥ आम्हांस दंड काय म्हणून । काय अपराध घडला आमुचे हातून । स्वामी वदती हासून । सीतारामममहाराजांना ॥ १९ ॥ दुसऱ्यांचा माल घेऊन । आमुच्या आसनाखाली ठेविला आणून । हाच अपराध मनीं जाण । याहून कमी काय असे ॥ १२० ॥ ऐसा विनोद करूनी कौतुक । एकमेकांचीं करिती करमणूक । परि सकलांचे अंतर एक । निर्मळ असे सारखें ॥ २१ ॥ ऐसा तयांचा समागम । वाडी क्षेत्रीं जाहला उत्तम । श्रीवासुदेवानंद सरस्वती सीताराम । राहिले चार महिने येथे ॥२२॥ जैसी ज्याची आवडी । तैसी त्याची पुरविली कौडी । रिकामा वेळ पळ घडी । जाऊं न दिला सद्गुरुंनी ॥ २३ ॥ सीतारामममहाराजांनी । सद्गुरुंच्या आज्ञा मानूनी । परोपकारबुद्धि ठेवूनी । परमार्थ बोध शिकविला ॥ २४ ॥ कृष्णालहरी निर्मळ । गाऊनी पूजिलें कृष्णाजवळ । स्वलोचनीचें प्रेमाश्रूजळ । सिंचिलें श्रीदत्तचरण कमळीं ॥ २५ ॥ भवसंतरणाचें सुगम साधन । दिगंबराचें नामःस्मरण । भाविकांच्या हृदयीं जाण । बीजारोपण केलें तयाचें ॥ २६ ॥ किती केले लोकोपकार । मात्यापित्याहूनी जनतेवर । प्रेमे असे अपार । या श्रीसद्गुरुराया चें ॥ २७ ॥ मग या यतीश्वरांनी । वैशाख पूर्णिमेच्या दिनीं । सकलांचा निरोप घेऊनी । निघाले तेथून जावया ॥ २८ ॥ तेथून गुर्लासूर क्षेत्र एक । परमभक्त बोडे स्वामी तेथ एक । त्यांनी नदीमध्येच प्रेमपूर्वक । आलिंगिलें श्रीगुरुंना भेट होतां ॥२९॥ त्या फार आग्रहास्तव । पाहुनी अंतरींचा दृढभाव । राहिले तेथ श्रीवासुदेव । एक आठवड्यापर्यन्त ॥ १३० ॥ पुढती

सद्गुरु निघती । सौदत्ती नजिक यल्लम्माचे दर्शन घेती । मग तूंगभद्रातीरीं । राहती चातुर्मास हावनुरला ॥ ३१ ॥ देव भावाचा भुकेला । हें कसे येईल प्रत्ययाला । श्रीगुरु आणि सीताराम यल्लम्माला । पूर्वी एकदा आलें असती ॥ ३२ ॥ तेथील ब्राह्मण नव्हता पूजारी । त्यानें सकलांस तीर्थप्रसाद वाटला करीं । प्रश्न पडला सकलांतरीं । घ्यावा कीं न घ्यावा प्रसाद ॥ ३३ ॥ खुणेनीच सीताराम-महाराजां पुसती । तैसेच ते सांगती । सद्गुरुनाथ जैसे करती । तैसें आपण करावें ॥ ३४ ॥ तीर्थप्रसाद यतीश्वरांनी ग्रहण केला हें पाहूनी । मग इतर सकल ब्राह्मणांनी । तीर्थप्रसाद घेतला ॥ ३५ ॥ प्रातःकाळीं सद्गुरु बहिर्दिशेला । जातां तयांसी दत्तप्रसादाला । दहीपोह्यांचा घास दिला एक लहान बालकाने ॥ ३६ ॥ यांत काय पाहती । अंतरीची भावभक्ति । निर्मळ मन बालवृत्ति । पारोशनि खाती घास तो ॥ ३७ ॥ सद्गुरु गेले निघूनी । पुढती पंधरा दिवसांनी । श्रीसीताराम-महाराजांनी । वाडीक्षेत्र सोडिलें ॥ ३८ ॥ पुनरपि जावें गोदातीरीं । जावें हा हेत असे अंतरीं । परि शिरोळचांत काळे भक्ताच्या घरीं । आठ दिवस राहिलें ॥ ३९ ॥ तेथे भोजनपात्राचे मंदिर । पाहिली दत्तमूर्ति मनोहर । शिरीं चांदीचा मुकुट करवूनी सुंदर । सुवर्णमुलामा दिधला त्यावरी ॥ १४० ॥ तेथे असती तोपर्यंत । निरूपण करिती वेदान्त । श्रवण करिती प्रेमळ भक्त । तीर्थप्रसाद घेऊनी जाती ॥ ४१ ॥ मग मिरज सांगलीचा गणपति । पाहुनी पंढरपूरा जाती । श्रीपांडुरंग-चरणावरती । मस्तक ठेविती सीताराम ॥ ४२ ॥ हृदय आले गहिवरून । नेत्रांतून बाहते प्रेमाश्रू-जीवन । न्हाणिले पांडुरंगाचे चरण । अनन्य भक्तिभावाने ॥ ४३ ॥ पांच मिनिटांनी येती बाहेर । राहती उभे रंगशिळेवर । परि प्रेमाश्रूंचा पूर । आवरे न वाहे सारखा ॥ ४४ ॥ ऐसे प्रेमरंगांत रंगून । विठ्ठलावर एक करुनी कवन । आपुल्या रसाळ वाणीने गाऊन । प्रेमानंदें तोषले ॥ ४५ ॥ अंबरीषाकरितां द्वादशीला । जेथे पांडुरंग प्रगटला । त्या येऊनी बारशीला । दर्शन घेतलें भगवंताचें ॥ ४६ ॥ वाडीचे लोक येथपर्यंत । होते ते परतले वाडींत । मग माढे गावाहूनी वऱ्हाडांत । गोदातीरीं

राजूर गांवीं पातले ॥ ४७ ॥ तेथे सीताराममहाराज ज्ञानजेठी । बांधिती आपुली पर्णकुटी । नदीतीरी वाळवंटी । विशाल निंबवृक्षातळीं ॥ ४८ ॥ याच पर्णकुटींत । राहती चार महिने पर्यंत । नित्य नेम सारीत । सकल तेंहि आपुले ॥ ४९ ॥ चार महिन्यांनंतर । लोकांसी कळला समाचार । दर्शनास येती नारीनर । गर्दी होऊं लागली ॥ १५० ॥ आपुली ही पर्णकुटी । नाही पुरत सर्वांसाठी । म्हणूनी त्या नदीकाठीं । भव्य मठ बांधिला असे ॥ ५१ ॥ प्रेमळ भक्तांच्या इच्छेकारण । पर्णकुटी सोडून मठांत राहती येऊन । श्रीसीताराममहाराज ॥ ५२ ॥ मठांत नित्य नेम पूजेचा । एक होता देव त्यांचा । श्रीवासुदेवानंदसद्गुरूंचा । फोटो एक स्थापिलेला ॥ ५३ ॥ प्रभातीं सुपुष्पमाळा गळ्यांत । उदबत्त्या लाविती सुगंधित । आणिक कांही न लागत । पूजोपचार तयांना ॥ ५४ ॥ करितां मानस पूजन । एकाग्र चित्त ज्याचें पूर्ण । स्वयं श्रीगुरुदत्तभगवान । ध्यान करितां पुढे उभे ॥ ५५ ॥ नाम-संकीर्तनाची भक्ति । मनामाजी आवडी होती । भक्तमंडळी नित्य येती । सायंकाळीं भजनासी ॥५६॥ पेटी तबला वाजवून । वासुदेव पंचपदी म्हणून । स्वानंदें करिती गायन । प्रभुगुणगान स्वकृत जें ॥ ५७ ॥ आत्मतत्त्वाचा विचार । त्यावरी देऊनियां भर । तैसाच उपदेश साचार । भक्तजनां करिताती ॥ ५८ ॥ श्रीसद्गुरुकृपेंकरून । स्वयें सीताराममहाराज आपण । सकलांचे सद्गुरु होऊन । राहिले त्या राजुरीं ॥ ५९ ॥ सीताराममहाराजांची भक्ति विरक्ति । धर्मनिष्ठा विज्ञान स्थिति । पाहूनी शिष्यत्वाची उपरति । कितीएकांस जाहली असे ॥ ६० ॥ हे सीताराममहाराज ब्रह्मचारी । थोर महात्मे जगदुद्धारीं । समान दृष्टि सकलांवरी । अधिकारानूरूप शिकवितो सकलांना ॥ ६१ ॥ निघती वाडी शिरोवयांतून । ऊंची वस्त्रें दिधलीं भिरकावून । आपुला तापस वेष परिधान । केला सीताराममहाराजांनी ॥ ६२ ॥ आले जैसे राजूरीं । आवड नसताहि अंतरी । आलें ऐश्वर्य अंगावरी । राजयोगीश्वरांच्या ॥ ६३ ॥ राहावयासी झोपडी पर्णकुटी । ती जाहली मठरूपी हवेली मोठी । एकल्याच्या भाताचीं तपेली छोटी । तेथें हंडे येती

स्वयंपाका ॥ ६४ ॥ झोंपडीत एकटे बसून । करीत होते भोजन । आतां शेपन्नासावरी जाण । पंगतीस त्यांच्या बैसती ॥ ६५ ॥ एकल्या सीताराममहाराजांचा अल्पाहार । तरी पाकसिद्धींचे नाना प्रकार । त्या त्या ऋतूतल्या शाखा फळे अपार । तेथे प्रत्यही विपुल येताती ॥ ६६ ॥ उष्णकाळीं मठांत । आंब्याच्या डाल्या किती येत । रस काढिती बहुत । हांडे पातेलीं भरूनियां ॥ ६७ ॥ कधी पोळ्या कधी भाकरी । चळती ठेविती घडवंचीवरी । काय त्या अन्नाची माधुरी । आम्ही पामरांनी वर्णावी ॥ ६८ ॥ जे राहिले महाराजांच्या संगतीत । भोजना बसती पंगतींत । धन्य धन्य ते भाग्यवंत । जाहले या भूवरी ॥ ६९ ॥ जेथे झोपडींत टाळ्या वाजवून । एकल्याने होत होतें भजन । तेथे सकल वाद्यें वाजवून । भजनीं घोष होतसे ॥१७०॥ आतां बाह्य स्वरूपी ठेवितां नजर । झाले दिसती महंत थोर । परि अंतरीचे विचार । सकल असती विरक्तीचे ॥ ७१ ॥ पूर्वी ब्रह्मावर्तीं जाण । सद्गुरुकृपा जाहली पूर्ण । जाहले ज्ञान संपन्न । तपःसंपन्न थोर भक्त-महाराज ॥ ७२ ॥ परोपकारीं सदा मन । तेथे गरीब श्रीमंत थोर सान । विप्रजन किंवा इतर जन । समान पाहती सकलांसी ॥ ७३ ॥ जाहले शिष्य अगणित । जाहल्या शिष्यिणी बहुत । परी त्यांतील जी कां थोर भक्त । जानकीबाई ती एक असे ॥ ७४ ॥ ती सीताराममहाराजांच्या सहवासांत । राहिली असे बहुत । तीर्थयात्राहि समवेत । केल्या जानकीबाईने ॥ ७५ ॥ जैशी महाराजांची चाल वायुगती । तैशीच बरोबरी हो चालती । नाही राहीली मागुती । केवढी ही गुरुकृपा ॥ ७६ ॥ महाराज आपुल्या खोलींत । अधरासनीं जप करित । तैसीच ही थोर भक्त । अधरासनी बैसतसे ॥ ७७ ॥ तिने करूनी घेतली उद्धारगति । चुकविल्या जन्ममरणांच्या पंक्ती । पुढती न कोणी होती । इजसमान थोर भक्त ॥ ७८ ॥ येऊनी त्या राजूरांत । वर्ष दीड वर्षात । भक्तवर्ग वाढला बहुत । आज्ञाधारक सकलहि ॥ ७९ ॥ मग इच्छा उदेली मनात । स्वाहाकार यज्ञ करावा येथ । परि कोठे असती सद्गुरुनाथ । त्यांची आज्ञा

पाहिजे ॥ ८० ॥ तीं माउली येथे असल्याविना । यज्ञ होणार सफल ना । तरी कोठे भेटतील आपणा । म्हणूनी शोध चालविला ॥ ८१ ॥ शोधूनी चातुर्मासांत हावनुरला मुक्काम करित । पुढती शृंगेरी गोकर्णावरूनी येत । कृष्णातीरीं गलगलीला ॥ ८२ ॥ तेथे द्विमास राहून । सद्गुरु निघती गलगलीहून । मग उत्तरवाहिनी कृष्णामाईचें स्नान । कराया जनापुरीं राहिले एक मास ॥ ८३ ॥ मग तेथूनी श्रीसद्गुरुनाथ । बागलकोटवरूनी कुलगुर्डीस जात । तेथे चातुर्मासपर्यंत । मुक्काम केला असे ॥ ८४ ॥ श्रीदत्तात्रेय अत्रिनंदन । दुजा अवतार जो श्रीपाद श्रीवल्लभ असून । त्यांचें हें निवासस्थान । वंदिलें तेथे जावोनियां ॥ ८५ ॥ चार महिने सद्गुरुमूर्ति । तेथ अनेकांच्या कामना पुरविती । दूर करिती आपत्ती । पुत्र दिधले नि पुत्रिकांसी ॥ ८६ ॥ सर्पदंश झालेल्या बाईस वाचविती । बुडती नांव तीरावरी आणिती । ब्रह्मचाऱ्याचा मृत्यु वारिती । धर्मशाळा तेथे बांधिली ॥८७ । पाण्याची वाट पाहे शेतकरी । पिकें सुकून गेलीं सारी । आल्या पावसाच्या सरी । सद्गुरुनाथ कृपेने ॥ ८८ ॥ दृष्टि सारखी परोपकारी । तैसीच कार्यें होती खरी । कधी येईल हा कैवारी । वाट पाहती भाविक ॥ ८९ ॥ चार मास चातुर्मासाचे जाती । मग श्रीपाद श्रीवल्लभाची आज्ञा घेती । परळीवैजनाथ क्षेत्राप्रति । येवोनियां राहिले ॥ १९० ॥ ऐसें सितारामहाराजांस कळतां क्षणीं । येऊनी पोहोचले त्या ठिकाणीं । मस्तक ठेविले श्रीगुरुचरणीं । अत्यादरें करुनियां ॥ ९१ ॥ स्वाहाकार यज्ञारंभ करावया । आज्ञा मागती सद्गुरुराया । तैसेंच राजूर ग्रामीं यावया । विनंति केली सीतारामें ॥ ९२ ॥ देव सदा भक्ताधीन । भक्त महिमा वाढवावा पूर्ण । भक्तिमार्गी लावावे जन । सदा हेत तयांचा ॥ ९३ ॥ म्हणूनी श्रीगुरुदत्तमूर्ति । सीतारामा दे संमति । आम्ही येऊं तेथे म्हणती । ऐकतां आनंद जाहला ॥ ९४ ॥ तैसेच श्रीनृसिंहसरस्वती वाडीहून । आम्ही आणूं पाचारुन । तरी आज्ञा असावी म्हणून । प्रार्थना करिती सीताराम ॥ ९५ ॥ परि न कांही आज्ञा दिली । मौन वृत्ति धारण केली । तीच परवानगी मानिली । श्रीसीतारामहाराजांनी ॥ ९६ ॥

स्वानंदें भरलें मन । पुनरपि वंदिले श्रीगुरुचरण । निघाले सीताराम तेथून । राजूर ग्रामीं परत येती ॥ ९७ ॥ आतां पुढील अध्यायांत । श्रीसीताराम थोर भक्त । यज्ञारंभ करिती राजूरांत । अद्‌भुत सोहळा तो होईल ॥ ९८ ॥ तरी सकल श्रोतेयां आमंत्रण । यावें आळस टाकून । श्रवण करितां समाधान । तृप्ति होईल अंतरीं ॥ ९९ ॥ या रामनाम नौकेंत । बसूनी गावें प्रभुगुणगीत । हा जानकीचा हेत । पुरवील कधी समर्थ हा ॥ २०० ॥ इति श्रीसीतामचरित्रालंकारमणी । गुंफिला असे दृष्टांतकोंदणीं । प्रकाश दाविता अंतःकरणी । पंचविंश अध्याय गोड हा ॥ २०१ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

पंचविंश अध्यायः समाप्तः ।



अध्याय सोविसावा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ ॐ श्रीसंतदेवा । तुमचा महिमा काय गावा । मिळेल मज विसावा । म्हणूनी पातलें या संतचरणीं ॥१॥ तूंच शेषशायी भगवंत । यशोदे पूढे बाळ रांगत । श्रीकृष्ण लीला असंख्यात । बालपणीं त्वां दाविल्या ॥२॥ गाई चारावयाचे करूनी निमित्त । गेलासी तूं यमुनातीरास । गोपांसंगें खेळलास । लगोऱ्या चेंडू विटीदांडू ॥३॥ मायावी घेऊनी वेंष । कंसाने धाडिले राक्षस । देवा तुज बधावयास । त्यां दुष्टांसी मारिलेंस त्वां ॥४॥ यमुनेमाजीं नाग विशाळ । नो मातला असे प्रबळ । नासवी सदा यमुनाजळ । आपुल्या तीव्र विषाने ॥५॥ आठ वरुषांची बालमूर्ति । कालियासवें हो झुंजती । सुखी केलें सकलांप्रति । त्यासी दूर धाडूनियां ॥६॥ तूं भक्तांचा कैवारी । पांडवांचा साह्यकारी । द्रौपदीची कौरवें सोडितां निरी । लज्जा राखिसी भगवंता ॥७॥ किती तुझ्या वर्णूं लीला । श्रीकृष्णा गोविंदा गोपाला । दशमुख हि स्तवितां भागला । श्रुतीहि झाल्या कुंठित ॥ ८ ॥ तूंच पंढरीचा पांडूरंग । उभा तेथे अठ्ठावीस युग । भक्त हांक ऐकतां सवेंग । जावें म्हणूनीं उभा तूं ॥ ९ ॥ तूंच पाताळीचा वामन । तूंच रेणूकाभार्गव नंदन । तूंच रघुकुलाचें भूषण । राघवा रामा सीतापते ॥ १० ॥ एका रावणाकारण । अवतार तुझा होय जाण । केवढें जाहले रामायण । शतकोटी विस्तार जयाचा ॥ ११ ॥ त्या रामायणांत । न्याय नीति धर्म वास्तव्य करीत । अमर तेणे त्रिलोकांत । रामनाम आणि रामायण ॥ १२ ॥ तोच तूं श्रीरामा राघवा । अत्रिनंदना दयार्णवा । तोच तूं वासुदेवा सीतारामा महाराजा ॥ १३ ॥ चाललें आपुलें चरित्रकथन । आपुल्याच कृपेंकरून । झाले पंचवीस अध्याय पूर्ण । आता पुढचा पुरा करावी ॥ १४ ॥ तू सांगितल्याविना । कैसी होईल ग्रंथ रचना । तरी सीतारामा दयाघना । पुढील चरित्र कथावें ॥ १५ ॥ जाहलें मागील अध्यायीं कथन

येती महाराज परळीवैजनाथाहून । श्रीसद्गुरूंची आज्ञा घेऊन । राजूर ग्रामी आपुल्या मठांत ॥ १६ ॥ स्वाहाकार यज्ञ करावा हें मनांत । तो समस्तांसी सांगती हेत । हें ऐकून सकल भक्त । आनंदित जाहले ॥ १७ ॥ आणिक श्रीवासुदेवानंद सरस्वती । जो का प्रत्यक्ष श्रीगुरुदत्तमूर्ति । यज्ञाकारणें येथे येती । ऐकतां द्विगुणित मन संतोषले ॥ १८ ॥ सकलांसी सांगती सीताराम । हें एकल्याचे नोहे काम । सकलांसी होतील बहु श्रम । तरी साह्य करावें सकलांनी ॥ १९ ॥ जेथे सद्गुरुचरणीं जडली भक्ति । तेथे श्रम कोण मानिती । सकलांच्या उत्साह चित्तीं । पुढें होती सकल साह्यार्थ ॥ २० ॥ जलाश्रय गोदामाईचा तट । मठाजवळील वाळवंट । पाहूनिया अफाट । विस्तीर्ण असा चौफेर ॥ २१ ॥ ऐशा त्या भव्य पटांगणीं । सहस्रावधी लोकांकडूनी । अधिक जनसमुदायाकारणीं । थोर मंडप उभारिला ॥ २२ ॥ मंडपासी द्वारें बहुत । ठेवूनी केलीं तीं शोभिवंत । दारोदारीं उभारीत । उंच खांब केळीचे ॥ २३ ॥ आम्रपल्लव आणून । प्रत्येक द्वारीं बांधिले तोरण । तैसेच उभे ऊस करून । कमानी केल्या पानांच्या ॥ २४ ॥ जैसा दर्शनीं पाहतां शोभिवंत । तैसाच आंतहि दिसून येत । मध्यभागीं मंडपात । यज्ञकुंड बांधिलें ॥ २५ ॥ बाहेरुनी मंडळी येती । तैसेच आपुले वासुदेवानंद सरस्वती । त्यांच्या निवासस्थानांप्रति । खोल्या जवळीच बांधिल्या ॥२६॥ बैठका आणून मंडपांत । ठेविल्या असती व्यवस्थित । स्वयंपाकाचीहि समस्त । तयांनी सामग्री जुळविली ॥ २७ ॥ पन्नास आचारी पाकसिद्धीस । पन्नास मीठ वाढावयास । एकूण हजारावरी माणूस । वाढावयास ठेविलें ॥ २८ ॥ एकेक गावचे गावकरी । ठेविले असती त्यांवरी । एकेका कामाची जबाबदारी । सोपविली श्री सीतारामांनी ॥ २९ । बहुत असती सेवकजन । त्यांस आज्ञा करिती पूर्ण । दक्षता ठेवावी चहूंकडून । मंडपाआंत बाहेरी ॥ ३० ॥ एका ओटचावर ठेविती । ओळींनी सांगूं किती । रुपयांची भरुनी पोतीं । सीताराममहाराज ॥ ३१ ॥ गावांतील वैदिक ब्राम्हण । त्यांसी सन्मानें दिधलें आमंत्रण परगावींचे द्विजगण । लेख पाठवूनी बोलाविले ॥ ३२ ॥ ब्राम्हण आणि सुवासिनींना ।

आणि इतर सन्माननीय जनांना । उंची वस्त्रें द्यावया नाना । आणून ठेविली कोठारीं ॥ ३३ ॥ जे जे राहिले साहित्य । तें तें आणूनी ठेवित । सकल सिद्धता कोठीत । करूनी ठेविती सीताराम ॥ ३४ ॥ याच वेळीं निजाम सरकार । यास कळला समाचार । होणार यज्ञ स्वाहाकार । राजूर ग्रामीं फार मोठा ॥ ३५ ॥ राजूर हें ग्राम मोगलाईत । म्हणजे आपल्याच राज्यांत । सत्पुरुषांना करणें मदत । आपुलें कर्तव्य हें असे ॥ ३६ ॥ म्हणून निजाम बादशाहानी । आपुला कारभारी पाठवूनी । पुशिलें काय मदत आम्हांकडूनी । पाहिजे ती कळवावी ॥ ३७ ॥ आदरें करिती विचारणा । श्रीसीताराम महाराजांना । होती निःस्पृहता बिंबली मना । काय निरोप पाठविती ॥ ३८ ॥ ज्याचा पूर्ण विश्वास सद्गुरुंवर । तेच एक परमेश्वर । तेच भक्तास सांभाळणार । उणें कांही पडो न देती ॥ ३९ ॥ हा भरवसा पूर्ण मनीं । परि विनय सांभाळूनी । दिली चिठ्ठी लिहुनी । कोणती त्या माणसाबरोबरी ॥ ४० ॥ सद्गुरुकृपेची सतत वृद्धि । सकल जाहली असे सिद्धि । तरी राजे हो आम्हांस निधि । आपणाजवळील कांही नको । ४१ ॥ यांत सद्गुरुवरील निष्ठा जाण । दिसूनी आली असे पूर्ण । राजयाचीहि कमान । दातृत्वाची दिसूनी ये ॥ ४२ ॥ चिठ्ठी पाहतां मनांत । बादशाहा झाला आश्चर्यचकित । म्हणे ऐसा निःस्पृह संत । नाही पाहिला आजवरी ॥ ४३ ॥ मग सद्गुरुनाथांना । जगद्वंद्य जगद्गुरुंना । गुरुबंधु नृसिंहसरस्वतींना । आणण्या लिखित पाठविले ॥ ४४ ॥ सद्गुरु आणि जगद्गुरु । गुरुबंधू ते यतीश्वरु । यांच्या पत्रांतील आदरु कैसा करुं वर्णन मी ॥ ४५ ॥ पातले हे यतीश्वर । ब्रम्हा विष्णू महेश्वर । मंडपद्वारीं करुणाकर । चरणीं नमस्कार माझा असे ॥ ४६ ॥ मंडपांतील मधल्या खोलींत । आदरें विराजमान सदगुरूनाथ । एकीकडे नृसिंहसरस्वती ठेवीत । एकीकडे जगद्गुरू ॥ ४७ ॥ भरती येता सागर । उंचबळोनी येई वर । तेवी हे तृतीय योगेश्वर । पाततां आनंद हो सीतारामा ॥ ४८ ॥ परि लिलाधारी श्री वासुदेवानंद सरस्वती । येथे थोडें कौतुक करिती । शिष्य श्री नृसिंहसरस्वती । येती सदगरू दर्शना

॥ ४९ ॥ तयाते पाहता क्षणी । म्हणती कैसा आला हा या ठिकाणी । वाडी क्षेत्रा सोडूनी । न जाई तू कोणीकडे ॥ ५० ॥ ऐशी आज्ञा उल्लंघून । हा कैसा आला म्हणोन । हे सीतारामाचे कारस्थान । उमगले मनी महाराज ॥ ५१ ॥ सद्गुरू यती शिष्य यती । शिष्य सद्गुरू दर्शन घेती । तयी आसन पद्धती । वेगळीच असे सद्गुरूची ॥ ५२ ॥ तयी आपुल्या शिष्याकडे न पाहती । उचीत आसनही । न घालिती । दुःखीत हो नृसिंह सरस्वती । काय चुकले म्हणोनी ॥ ५३ ॥ अनन्य भावे करूनी । प्रार्थना करिती । अंतःकरणी । परिकृपा नये मनीं । श्रीसद्गुरू स्वामी महाराजांच्या ॥ ५४ ॥ हा विरोध प्रेमा पाहुनी चित्ती । सीताराम मनी विचार करिती । परि खोचक अंतरी प्रीति । धरोनी वदती काय तेव्हां ॥ ५५ ॥ काय सद्गुरूस्वामी कृपामूर्ति । हें श्री नृसिंह सरस्वती अजूनी पूर्णत्वास ना पोहचती । म्हणुनी दर्शन देणे का नाकारले ॥ ५६ ॥ ऐसे ऐकताची भाषण । हास्य करिती दयाघन । क्षणेच घातले आसन । दिधले दर्शन शिष्याते ॥ ५७ ॥ श्री नृसिंह सरस्वति । आणि सीताराम । यांचा आनंद संगम । जाहला तेव्हा ते कठीण काम । वर्णन करणे मज असे ॥५८॥ पुढती शुभ घटिका शुभ दिन । सर्वांगशुभ मुहूर्त पाहून । आधी षोडशोपचारें पूजन । केलें सद्गुरूरायांचें ॥ ५९ ॥ मग नृसिंहसरस्वतींना जगदगुरूंना । दशग्रंथी वैदिक ऋत्विजांना । इतर थोर सन्माननीयांना । वंदन केलें आदरें ॥ ६० ॥ मग ब्राम्हण यज्ञदीक्षा देती । यज्ञकंकण हातीं बांधिती । स्वाहाकारास बैसती श्रीसीताराममहाराज ॥ ६१ ॥ ऋग्वेदसंहितामंत्राचा उच्चार । स्पष्ट आणि उच्च स्वर । करीत होते विप्र थोर । वाटे देव पाहती स्वर्गांतूनी ॥ ६२ ॥ ऐसे हे जगकल्याणार्थ हवन । कांही नसे तेथे न्यून । दुपारपर्यन्त चाले जाण । सकल सिद्धता पूर्ण असे ॥ ६३ ॥ मग अन्नपूर्णेची पूजा करून । पंचारती ओवाळून । आधी त्रैमूर्ति यतीश्वरांसी भिक्षा वाढून । ब्राम्हण पंगती बैसवीले ॥ ६४ ॥ सकल अन्न षड्रसभरित । पक्वानेहि असती समस्त । परि मुख्य प्रसाद जो असे तेथ । तो मोहनशिरा उत्तम ॥ ६५ ॥ चारोळ्या पिस्ते बदाम । वेलची केशर उत्तम । ऐसा

मसाला भक्कम । मोहनभोग तो होतसे ॥ ६६ ॥ ऐशा दहा दहा हजारांच्या पंक्ती । एकाच वेळीं बैसतो । त्या सूर्यास्तापर्यंत उठती । तृप्त होती भोजनीं ॥ ६७ ॥ त्रैमूर्तिसह वासुदेव महाराज । भोजनास बैसतीं रोज । टाकळीचे थोर दाजी महाराज । आणिक पंधरा यति थोर बैसती ॥ ६८ ॥ अत्यंत प्रेमळपणा धरूनीं । भेदभाव ना ठेवितां मनीं । पक्वान्नें वाढिती आग्रह करूनी । सीताराम महाराज ॥ ६९ ॥ धन्य जाहले ते नारीनर । ज्यांनी घेतला तो प्रसाद मधुर । करूनी घेतला उद्धार । आल्या मानव जन्माचा ॥ ७० ॥ सकलांचे झालियावरी भोजन । विडे दक्षिणा देऊन । मग यतीश्वराना मुखशुद्धी लागून । देती लवंगतुलसीदलें ॥ ७१ ॥ महाराजांचे शिष्य बहुत । आणिक किती थोर भक्त । तैसा भजनी मेळा येत । स्वाहाकारासी हिंगोलीहुनी ॥ ७२ ॥ सायंकाळीं भजन करिती । सुस्वरें पेटी तबल्यावरतीं । संगीताची आवड चित्तीं । बैसती ऐकावया गुरुनाथ ॥ ७३ ॥ आपुल्या आसनीं रूढ होऊन । बैसती हे तिघेजण । मध्ये वासुदेव भगवान । कैशापरी शोभतीं ॥ ७४ ॥ विविध सुमनीं सुगंधित । ऐसा हार गळा शोभत । दंड कमंडलु हातांत । भस्म चर्चिलें सर्वांगीं ॥ ७५ ॥ ऐसे हे सदयहृदय प्रसन्नवदन । श्रीवासुदेवानंद कमल-लोचन । साक्षात दत्तात्रय भगवान । आले दर्शन द्यावया ॥ ७६ ॥ तेलातुपाच्या भव्य समया । उजळल्या होत्या प्रकाश द्यावया । त्या प्रकाशीं या दत्तात्रेया । वंदन करिती सद्भावें ॥ ७७ ॥ एकीकडे नृसिंहसरस्वती । एकीकडे जगद्गुरुमूर्ति । जवळीच गांडाबुवा बैसती । दुजे गोविंदराव शिप्रीकर ॥ ७८ ॥ ऐसें हें देवपंचायतन । वंदिती प्रेमभावें करून । उद्गार निघती मुखांतून । धन्य आम्हीं जाहलों ॥ ७९ ॥ काय वानूं तो सोहळा । प्रेमाश्रु पाझरती डोळां । तरी समाधान चित्ताला । आज एकचि होतसे ॥ ८० ॥ तव चरित्र श्रवणाची दिधली गोडी । ही काय देणगी असे थोडी । दर्शन देती घडीघडी । सीताराम वासुदेव ॥ ८१ ॥ मग तुझ्याच कृपेंकरून । लागेल या मनासी वळण । तरी कृपानजर ठेवून । सावध मनास करावें ॥ ८२ ॥ श्री सद्गुरु-

महाराजापुढती । तैसेंच यज्ञनारायणापुढती । द्रव्याच्या ज्या राशी जमती । त्या राहती तेथेच सात दिन ॥ ८३ ॥ ऐसा जाहला यज्ञ सात दिन । तृप्त जाहला यज्ञनारायण । किती जाहलें अन्नदान । नाही गणित करतां ये ॥८४॥ यज्ञ जाहला संपूर्ण । ऋत्विज आणि इतर जन । काय दक्षिणा मिळेल म्हणून । विचार करिती मानसीं ॥८५॥ त्यांची काय होती कल्पना । परि दाता असे कुबेर जाणा । वस्त्रांसहित दक्षिणा । किती दिधली त्या मोज नाही ॥ ८६ ॥ दिधले सुवासिनींना । सौभाग्यालंकार लुगडी खणा । नारळांनी ओटच्या जाणा । भरल्या असती तयाच्या ॥ ८७ ॥ जगद्वंद्य जगद्गुरूंची । पूजा केली चरणकमलांची । अंगावरती भरजरीची । शाल घातली पांघरूण ॥ ८८ ॥ जगद्गुरूचें बालवय । परि असती सदय । तेसाचि अंगीं पूर्ण विनय । सौजन्य सर्वांगीं भूषण असे ॥ ८९ ॥ श्रीवासुदेव तयांचा अधिकार जाणून । मनोभावें त्यांसी करिती वंदन । परि सद्गुरुनाथाकडून । वंदन घेतां अनमान वाटे ॥ ९० ॥ असे गादीचा जो मान । तो राखिला पाहिजे पूर्ण । अशी समजूत घालून । विधियुक्त वंदन केलें असे ॥ ९१ ॥ होते सद्गुरुंच्या सान्निध्यांत । जगद्गुरु तोपर्यंत । आपुली मशाल ठेवीत । मालवूनी सर्वांसमक्ष ॥ ९२ ॥ असा संतांचा मान । तैसाच पाहुण्यांचा सन्मान । सकलांचें दिधले वेतन । ठरल्यासम महाराजांनी ॥ ९३ ॥ कुणी सेवा म्हणून । कष्टले असती रात्रंदिन । नाही घेतलें वेतन । सद्गुरुनिष्ठा ठेवूनियां ॥ ९४ ॥ कशावरी नसे हेत । लोभ आशा ना मनांत । ओंजळीभरूनी रुपये देत । प्रसाद म्हणूनी किती एकांसी ॥ ९५ ॥ यज्ञाची पुर्णाहुती जाहली । त्याच रात्रीं सद्गुरुमाउली । नृसिंहसरस्वतीसंगें बोलली । कितीएक वेळ गीर्वाण भाषेतूनी ॥ ९६ ॥ काय त्यांचें जाहलें भाषण । न कळलें कवणासी जाण । परि नृसिंहसरस्वतींचें समाधान । जाहलें असे पूर्णत्वें ॥ ९७ ॥ मग ब्राह्मीं मुहूर्तीं उठून । सीताराममहाराजांस सांगून । सद्गुरुनाथ राजूराहून । जावयासी निघाले ॥ ९८ ॥ तेधवां बहू परींनी । केली असे विनवणी । इतक्यांत जाऊं नये म्हणूनी । सीताराममहाराजांनी ॥ ९९ ॥ जरी

आम्ही येथे राहूं । तरि आणिक लोक जमतील बहू । हवामान दूषित होय पांहूं । म्हणूनी जातों येथूनियां ॥ १०० ॥ तुज पुनः भेट देऊन । करूं तुझें समाधान । मग मीहि संगें येतों म्हणून । वदती सीताराम भक्त हे ॥ १ ॥ माझे कांही मनांत । तें पुसावें आपणा येथ । परि आपण जातां हेत । राहील माझा तैसाची ॥ २ ॥ सद्गुरुनाथ वदती त्याला । अरे हा पसारा मांडलेला । तो टाकूनी या वेळा । येणें तुज योग्य नसे ॥ ३ ॥ पुनरपि रामा तुला भेट देऊन । तुझे मनोरथ करू पूर्ण । ऐसें अभिवचन देऊन । गेले निघोनी सद्गुरु ॥ ४ ॥ ऐसें अभिवचन मिळतां क्षणीं । आनंदित जाहले मनीं । मग सद्गुरुचे ठिकाणीं । श्रीनृसिंहसरस्वतींना ठेविलें ॥ ५ ॥ सद्गुरुंचा जो काय मान । तैसाच देती गुरुबंधूकारण । मग त्यांचीच अनुज्ञा घेऊन । सकल कार्यं पाहती ॥ ६ ॥ सकलांची गेली चीजवस्त । जैशी आणिली तैशी व्यवस्थित । परि जें द्रव्य राहत । त्याची सोय करणें असे ॥ ७ ॥ जें जें मागितलें जयांनी । तें तें त्यासी देऊनी । ऋणमुक्त होऊनी । कितिएकांस केले आनंदित ॥ ८ ॥ तरि द्रव्य उरलें बहुत याची चर्चा चालली सकलांत । त्यांतूनी कोणी एक सुचवित । भव्य घाट बांधावा गोदातीरीं ॥ ९ ॥ सकलांस मान्य होय ही सूचना । तैशीच सीतारामम्हाराजांचिये मना । परि तयांच्या दिसती नयनां । दादा पुराणिक सारखे ॥ ११० ॥ त्यांचें राजूरीस असे सदन । यज्ञामध्ये घेती पुढारीपण । मोठे विद्वान ब्राह्मण । धर्मनिष्ठ सदाचारी ॥ ११ ॥ जरी विद्वत्ता होती पदरीं । नाही केली कधी लाचारी । परि दादा पुराणिकांवरी । लक्ष्मी नव्हती प्रसन्न ॥ १२ ॥ लक्ष्मी ही जयासो । पूर्वं भाग्येंच प्राप्त होईल त्याची दासी । एखाद्या अज्ञानाचिये द्वारासी । गजराज झुलतांना दिसतसे ॥ १३ ॥ तैसे दादा पुराणिक । होते विद्वान भाविक । वृत्ति सदा सात्विक । परि लक्ष्मी नसे सदनासी ॥ १४ ॥ ते अत्यंत दरिद्रावस्थेंत । पडले होते खितपत । मना चिंता जाळित । रात्रंदिवस तयांच्या ॥ १५ ॥ त्यांतूनहि भयंकर । कर्जभार होता माथ्यावर । रुपये सतरा हजार । देणें होतें त्या समयीं ॥ १६ ॥ जो सच्छील सदाचरणी ।

त्यावरी इतुकी कर्जाची लादणी । तो किती दुःखित मनीं । असेल सौगतां न ये कवणा ॥ १७ ॥ ही दैन्यावस्था पाहूनी । सीताराममहाराज कळवळले मनीं । म्हणती घाट बंधूनी । होईल सुख जनांसी ॥ १८ ॥ हें जरि असेल सत्य । तरि समोर प्रत्यक्षांत । ऋणरूपी चिखलांत । बुडूनी मरतो हा दिसे ॥ १९ ॥ तरी त्या दीनाचा उद्धार । करावा वाटे साचार । ऐसा आपुला विचार । मांडिला त्यांनी सकलांपुढे ॥ १२० ॥ हा संताचा विचार । सर्वमान्य हो साचार । कोणिहि तयां नकार । नाही दिला ते समयीं ॥ २१ ॥ किती किती दयाळू संत । जेव्हा होती कृपावंत । करतील रंकाचा राव त्वरित । पंडित करिती अजाणा ॥ २२ ॥ पांगूळ चढे पर्वतावर । आंधळा रत्नपारखी हे चतुर । किंकराचा होऊनी शंकर । बंद्य होईल सकलांसी ॥२३॥ मग जयाचे भालीं ब्रह्मलिखित । असेल जरी विपरीत । तरी ते होतील भाग्यवंत । क्षण न लागतां संतकृपें ॥ २४ ॥ पूर्ण जाहलिया स्वाहाकार । दादा पुराणिक तईं नंतर । मस्तक ठेविती चरणकमलांवर । सीताराममहाराजांच्या ॥ २५ ॥ त्याच चरणस्पर्शेंकरून । भालींचा पहिला लेख गेला पुसून । सुचिन्हां रेषेवरुन । सुदैवाक्षरें उमटलीं ॥ २६ । दैन्य गेले मावळून । दारिद्र्य पुरतें टाकिलें जाळून । लागलें आनंदाचें उपवन । दादा पुराणिकांना तेधवां ॥ २७ ॥ सतरा हजार रोख रुपये घेऊनी । त्यावरी उदक सोडूनी । दिधली दक्षिणा म्हणूनी । सीताराममहाराजांनीं ॥ २८ ॥ आणिक घरखर्चास्तव । देती सीताराम देव । नाही ठेविली उणीव । आपुल्या त्या भक्तासी ॥ २९ ॥ किती आनंद जाहला मनीं । आनंदाश्रू वाहती नयनीं । अंतःकरण गदगदूनी । दादा काय बोलती ॥ १३० ॥ गृहासी अग्नि लागत । तों पर्जन्य यावा अकस्मात । मरतियाच्या मुखांत । पडावें अमृत पूर्वभाग्यें ॥ ३१ ॥ जो चिंताग्नीने पोळला । चिंतामणी त्यासी भेटला । दरिद्र्यासी सापडला । द्रव्यघट अकल्पित ॥ ३२ ॥ तरी प्रभो सीतारामा । पावलासी तूं आज आम्हां । तुझ्या दातृत्वासी उपमा । काय द्यावी न कळे ॥ ३३ ॥ होतों दारिद्र्यावस्थेंत । धन नव्हते किंचित । त्यांतूनी ऋणयातनेंत । सुया टोचिती

सर्वांगीं ॥ ३४ ॥ मी अत्यंत प्रावत्तनहीन । दैवावरी स्वस्थ बोल ठेवून । शीण होईल तुजलागून । म्हणूनी न तुला विनविलें ॥ ३५ ॥ तरी ज्ञानसंपन्न । वर्षलासी कृपाघन । सतरा हजार परगृहींचें ऋण । वरती किती त्वां दिलेंसी ॥ ३६ ॥ प्रभो तुवां केल्या उपकारासी । उत्तीर्ण नं मी होय वंशोवंसीं । तरी दयाळा मागतों तुजसी । विसर तुझा न पडो दे ॥ ३७ ॥ नाही करितां येत स्तुति । नाही गातां येत कीर्ति । म्हणूनी चरणकमलावरती । मस्तक प्रेमें ठेवीतसे ॥ ३८ ॥ एक लक्ष एक चिंतन । सीतारामनामःस्मरण । दादा पुराणिक तेव्हापासून । सीतारामरुप जाहले ॥३९॥ पुढती नृसिंहसरस्वती । वाडीस जावया आज्ञा मागती । मज सद्गुरु लाभ झाला म्हणती । आपुले आभार बहु जाहले ॥ १४० ॥ जाते समयीं श्रीनृसिंहसरस्वतींनी । हा अलौकिक यज्ञ झाला म्हणूनी । उद्गार काढिले मुखांतूनी । तेच पुढे मांडिले ॥ ४१ ॥

" लक्षाधिक ब्राह्मणानां धनान्नामिततर्पणम् ।
जातं तथापि द्रव्यान्नाव्ययं गुर्वेक्षणामृतात् ॥
अलौकिकं तत्र जातं मनोवाग्विषयातिगम् ।
कोऽसमर्थो भवेत् तत्र यत्र श्रीदत्तदृग्गुरुः ॥"

मग श्रीसीताराममहाराजांनी । संगें माणूस देऊनी । सकलांचा निरोप घेववुनी । वाडी क्षेत्रीं पोहचविले ॥ ४२ राजूराहूनी सद्गुरुनाथ । जाते जाहले वऱ्हाडांत । भक्तांच्या आग्रहास्तव राहत । हिंगोली आजेगांव नरसीमध्ये ॥ ४३ ॥ पुढती नर्मदातीरीं सद्गुरुनाथ । चिखलदा नामें क्षेत्रांत । चातुर्मास मुक्काम तेथ । करिते झाले महाराज ॥ ४४ ॥ तेथे कांही दिवस गेलियावर । आली तेथे महामारी । देवीचें अनुष्ठान करा झडकरी । सांगती सद्गुरु ग्रामस्थां ॥ ४५ ॥ तेणें जाईल निघून । ऐसें सांगती निक्षून । परि लक्ष न देती ग्रामस्थ जन । रोग वाढूं लागला ॥ ४६ ॥ हें पाहून सद्गुरुंना । काळजी लागली असे मना । मग लोकांच्या हित कारणा । उपाय त्यांनी योजिला

॥ ४७ ॥ आपुला दंड कमंडलू घेऊनी । ग्रामसीमेवर जाऊनी । म्हणती न आमुचें ऐकती कोणी । जातों आम्ही निघोनियां ॥ ४८ ॥ हें पाहूनी ग्रामस्थ जन । गेले सद्गुरुपदीं शरण । म्हणती आज्ञा प्रमाण । परि येथूनी जाऊं नये ॥ ४९ ॥ मग त्यांची आज्ञा मानुन । सप्तशतीचे पाठ करून । शतचंडीचें केलें हवन । भावभक्ति धरूनियां ॥ १५० ॥ सत्पुरुष हिताचेच सांगती । परि अज्ञ जन न ऐकिती । तरि सद्गुरु दयामूर्ति । सुमार्गावरी आणिती उपायें ॥ ५१ ॥ ती अमृतमय सद्गुरुची बोलीं । सकलांच्या प्रत्यया आली । महामारी निघूनी गेली । मृत्युसंख्या वाचली ॥ ५२ ॥ तेथ आठ दहा महिने मुक्काम करूनी । सकलांच्या मनःकामना पुरवूनी । पुढती जाते झाले तेथूनी । कातरखेड ग्रामासी ॥ ५३ ॥ कातरखेड हें ग्राम सान । दही संस्थानांत असून । दही शहरापासून । तीन कोस दूर असे ॥ ५४ ॥ तेथील राजा रजपूत । होता भाविक श्रद्धायुक्त । रोज दर्शनासी येत । श्रीसद्गुरुनाथांच्या ॥ ५५ ॥ वऱ्हाडांतले नामें अंबादास । होते महाराजांचे एक दास । त्यानी वासुदेवसद्गुरुस्वामींस । दोन हजार रुपये अर्पिले ॥ ५६ ॥ तेच त्यांच्या देऊनी हातीं । तथेच स्वाहाकार करविती । कातरखेडीं बहु वस्ती । भिल्ल लोकांची ती असे ॥ ५७ ॥ आपुले तिरकमठे घेऊन । येती दर्शनाकारण । आपुली निशाणबाजी दाखवून । रमविताती सद्गुरुंसी ॥ ५८ ॥ झाडावरी उंच नारळ बांधून । त्याकडे एक लक्ष देऊन । अचूक लक्ष्य वेधून । आपुलें कौशल्य दा विती ॥ ५९ ॥ भिल्लगुणांचें करिती कौतुक । गूळ आणि भर्जित चणक । देती तयांना मुबलक । श्रीसद्गुरुमहाराज ॥ १६० ॥ कोणतीहि असो जात । भेदभाव ना मनांत । सदा तयांचें चिंतित । हित वासुदेवमहाराज ॥ ६१ ॥ झाली शुद्ध भावना । तेथील भिल्लांचिये मना । काळजी घेती रक्षणा । मायबाप समजूनी ॥ ६२ ॥ तेथेच वाळवंटांत । श्रीगुरु राहती झोपडीत । वाडीचे केशव-भटजी कांही स्त्रीया भक्त । टिल्लूशास्त्री इंदूरचे ॥ ६३ ॥ ऐशी भक्त मंडळी बहुत । राहती त्यांच्या सान्निध्यांत । वाघाची वस्ती असे बहुत । घोर अरण्य बाजूसी ॥ ६४ ॥ सद्गुरु समवेत भक्तास ।

वाघांचा न व्हावा कांही त्रास । म्हणूनी रात्रीं विस्तवास । पेटवूनी जागती भिल्ल हे ॥ ६५ ॥ येथे नित्य सकाळी श्रीगुरुनाथ । जवळींच जाऊनी अरण्यांत । बसूनी वाघांच्या रिकाम्या गुहेंत । वेदांत निरूपण सांगती ॥ ६६ ॥ हा देह दिसतो सुन्दर । परि त्यांत मनोगुहा भयंकर । तींत काम क्रोध व्याघ्र । ठाण देऊनी बैसले ॥ ६७ ॥ आणिक यांचे साथीदार । लोभ मोह मद मत्सर । वरी भूल पाडणार । महामाया ती असे ॥ ६८ हेच जीवाचे मृत्यू होत । त्यांतूनी केव्हा कोण करील घात । हें ठेवूनी लक्षांत । सावध असावें ॥ ६९ ॥ हीमाया विलक्षण । टाकील केव्हा मोहून । सकल होतील तियेच्या आधीन । प्रवृत्त होतील दुष्कृत्यांतें ॥ १७० ॥ मन हें असे चंचल फार । उतावीळ आणि अधिर । नको तें करावया तयार । धावूनी पुढे होतसे ॥ ७१ ॥ म्हणूनी मनास विवेकाचा लगाम । लावूनी हाकलावेत हे क्रोधकाम । गुहा ठेवावी उत्तम । निर्मळ निरंतर करुनियां ॥ ७२ ॥ ऐशा निर्मळ अंतरगुहा पाहून । तेथे सच्चिदानंद-रुप घेऊन । प्रकट तत्काळ होऊन । श्रीगुरु ज्ञानामृता पाजिती ॥ ७३ ॥ त्यां व्याघ्रगुहेंत बैसून । ऐशीं नाना उदाहरणें देऊन । अज्ञानजनांतें लागून । बोध स्वामी करिताती ॥ ७४ ॥ वाळवंटीं झोपडीपासूनी । नसे जवळीं निर्मळ पाणी । म्हणूनीं तेथील राजेयांनीं एक बैलांची माकण दिली असे ॥ ७५ ॥ तो बैल एके दिनीं । काही रोग होऊनी । जागच्या जागीं मरूनी । पडला असें देखिलें ॥ ७६ ॥ पाण्याची जाहली खोटी । रिकामी देखिली अवघी कोठी । दुरून पाणी आणणें आटाआटी । हाल दिसती लोकांचे ॥ ७७ ॥ म्हणूनी श्रीगुरु-नाथांनी । हातीं कमंडलू घेऊनी । तें अमृतमय जल शिंपूनी । मृत बैल जिवंत केला असे ॥ ७८ ॥ त्या दिव्य जलाचा स्पर्श होतां जाण । रोग गेला निघून । पूर्वी प्रमाणें बैल होऊन । लागला आपुल्या कार्यांसी ॥ ७९ ॥ हा मृतसंजीवनी चमत्कार । पाहती सकल नारीनर । म्हणती हा परमेश्वर । कातरखेडी प्रकटला ॥ १८० ॥ मग दहीसंस्थानाधिपतींनी । सैन्य घोडे गज आणूनी । इच्छिती त्यावरी सद्गुरुनाथ बैसवूनी । न्यावें राज्य सदनीं आपुल्या ॥ ८१ ॥ म्हणूनी मस्तक ठेविलें चरणा ।

हात जोडूनी केली प्रार्थना । सद्गुरुहि मान्य वचना । राजयांच्या जाहले ॥ ८२ ॥ परि हत्तीवरी ना आपण बैसती । केशवभटजी विभूते यास बैसवीती । स्वयें हळूहळू चालती । सद्गुरुनाथ राजासवें ॥ ८३ ॥ पुढे वाजंत्री वाजती । सैन्य चालले मागुतीं । दिवे लख लख करिती । राजवाड्यांत जाती थाटाने ॥ ८४ ॥ मग सिंहासनीं बसवून । राजोपचारें पूजा करून । परिवारासह राजियाने येऊन । मस्तक ठेविलें श्रीगुरुचरणीं ॥ ८५ ॥ हात जोडूनी नम्रोत्तरी । म्हणे कृपा असावी या दासावरी । सद्गुरु संतुष्ट होऊनी अंतरीं । कृपाहस्त ठेविती मस्तकीं ॥८६॥ सर्वाभीष्टपूरक । आशीर्वाद देती यशोदायक । राजा म्हणे मी आज एक । धन्य जाहलो या जगीं ॥ ८७ ॥ केशव भटजींना राजाकडून । धन वस्त्रें बहु देववून । बहु मोलाची सुवर्ण मुद्रिका जाण । बोटामाजीं घातली ॥ ॥ ८८ ॥ नृसिंहवाडीचे श्रीगुरुदत्त । तयांचे हे पुजारी परम भक्त । वाटे तयांचें सदगुरुनाथ । पूजन करिती सप्रेमें ॥ ८९ ॥ जैसे मानाने राजवाड्यांत गेले । तैसेच परत पातले । आपुल्या भक्तांसह राहिले । पर्ण कुटींत स्वानंदे ॥ ९० ॥ जैसे श्रीदत्तप्रभु दयाघन । यवन बादशहाचे राजवाडी जाऊन । घेताती अमित सन्मान । तैसेंच येथे जाहलें ॥ ९१ ॥ नातरी हे असंग चिन्मय । यांसी राजोपचार कासया होय । परि भक्तप्रेमी तयांचें हृदय । सदा भक्तेच्छा पुरवीतसे ॥ ९२ ॥ पुढतीं रामनवमीचा येतां दिन । साक्षात् श्रीराम मानून । श्रीराममंदिरीं नेऊन । सिंहासनीं तयांते बैसवीलें ॥ ९३ ॥ केलें चरणकमलांचें पूजन । ऐकविलें श्रीरामजन्म-कीर्तन । सकलांसी जाहलें गुरुदर्शन । आनंदित सकल होती ॥ ९४ ॥ स्वामीहि संतोषित होऊन । वाडीकरांस गाडीभाडे देऊन । आपण गरुडक्षेत्रीं गमन । करिते जाहले तेधवा ॥ ९५ ॥ इकडे सीताराम राजूरांत । राहिले आवरावया समस्त । व्यवस्था लावूनी जेथल्या तेथ । मोकळे जाहले त्यांतूनी ॥ ९६ ॥ महाराजांनी तेव्हापासून । आपुलें राहण्याचें ठिकाण । राजूर हेंच समजून । मठामध्ये त्या राहती ॥ ९७ ॥ भक्तांच्या आग्रहास्तव तेथूनी । महाराज जाती अन्य ठिकाणीं । परि येती परतूनी । आपुलिये मठासी पुनरपि ॥ ९८ ॥

यांचा बहुसंख्येने वऱ्हाडांत । शिष्यसमुदाय होत ॥ तैसाचि अन्य भागांत । जागजागीं दिसतसे ॥ ९९ ॥ सकल भक्त गुरुकृपासंपन्न असूनी । भगवद्भक्त आत्मज्ञानी । एक्या श्रीगुरूचरणीं । भाव असे तयांचा निरंतर ॥ २०० ॥ रात्रंदिवस एक ध्यास । लागला असे सकलांस । सीताराम नामास । न विसंबती कोणीहि ॥ १ ॥ जातां येतां सीताराम । कार्य करितां सीताराम । जिव्हेसी चाळा उत्तम । लागला सीताराम नामाचा ॥ २ ॥ सीताराम नामाची आवड । इतर वाटे सकल द्वाड । सीताराम नाम गोड । एकचि सकलांसी वाटतसे ॥ ३ । सीताराम सीताराम । सीताराम स्वरुप सर्व काम । सीताराम हे एक नाम । शांतवितसे मनासी ॥ ४ ॥ धन्य धन्य तेचि जन । ज्यांनी सीताराम कृपा केली संपादन । नरजन्माचें सार्थक करुन । घेतलें त्यांनी आपुलें ॥ ५ ॥ ऐसें हें पवित्र क्षेत्र राजूर । आले येथे हे दत्तावतार । येई शरण त्या जीवावर । अनुग्रह करिताती सर्वदा ॥ ६ ॥ नित्यमठांत राहून । चाले भजन पूजन । रात्री माजीं हरिकीर्तन । हरिभक्तांचें होतसे ॥ ७ ॥ कोठी ठेविली मठांत । नित्य समराधना होत । लांबलांबूनी किती लोक येत । महाराजांच्या दर्शना ॥ ८ ॥ ऐसे दोन वरुषे पर्यन्त । कार्यक्रम होत आनंदात । होते काळजी विरहित । श्रीसीताराम महाराज ॥ ९ ॥ आषाढ शुद्ध प्रतिपदा दिनीं । श्री वासुदेवानंद सरस्वतीनी । आपला अवतार संपवूनी । समाधि घेतली गरुडेश्वरीं ॥ २१० ॥ या मजकुराचें पत्र हातीं । पडतां उकलून पाहती । काय प्रभो केलेंत अंती । म्हणूनी अंग टाकिती भूमीवरी ॥ ११ ॥ पत्रीं मजकूर वाचिला । वाटे वज्राघात माथी जाहला । दुःखाचा डोंगर कोसळला । म्हणती आज कैसा हा माझ्यावरी ॥ १२ ॥ त्याहि दुःखा-बेगांत । गंगेवरी जाऊनी स्नान करित । येऊनी उदासीनचित्त । मठामध्ये बैसले ॥ १३ ॥ तों कांहीं पातले भक्त । दिसती महाराज शोकाकुलित । अनिवार दुःखाश्रू वाहत । नयनांतूनी त्यांचिया ॥ १४ ॥ ऐसे महाराज दुःखमय । पाहतां सकलांसी वाटलें भय । इतुक्या शोकाचें कारण काय । पुसती शिष्य नम्रत्वें ॥ १५ ॥ तेंच पत्र पुढें टाकिती । भक्तलोक वाचिती । धाय

मोकलूनी रडती । म्हणती मायबाप गेले आमुचे ॥ १६ ॥ उपकाराशी आठवून । दीर्घ स्वरें करिती रुदन । म्हणती अंतरले आता चरण । नाही पुनः दिसणार ते ॥ १७ ॥ हें पाहतांचि महाराजांनी । आपुलें दुःख क्षणभरी आवरूनी । तयांवरी ममता धरूनी । तत्वज्ञानोपदेश केला असे ॥ १८ ॥ तो बोध ऐकून । कांहीसें जाहलें समाधान । परि विरहव्यथा दारुण । अंतरलो पाहतसे ॥ १९ ॥ आतां सीताराम महाराजांना । दश दिशा शून्य दिसती नयनां । मागे उपाधी होत्या नाना । कमी केल्या सकलहि ॥ २२० ॥ केले अनेक स्वाहाकार । व्याप वाढविला असे थोर । एका सद्गुरु माऊलीचे जीवावर । फिकीर नव्हती कशाची ॥ २१ ॥ चांदीची होती ताटवाटी । पळी पंचपात्री ताम्हन लोटी । दिधली गुरुसेवेसाठी । वाडीक्षेत्री मठातूनी ॥ २२ ॥ तबला पेटी सतार कोण सी वस्त्रें कोणासी अलंकार । देऊनी टाकिलें समग्र । जवळी कांही न ठेविलें ॥ २३ ॥ राजूर हें आपुलें ठिकाण । असें भावित होतें मन । परि ममत्व गेलें निघून । मठहि सोडिला तयांनी ॥ २४ ॥ येथील स्वाहाकार वर्णन करितां । उचंबळूनी आनंद ये चित्ता । परि ही सद्गुरुविरहव्यथा । कैशी वर्णन करावी ॥ २५ ॥ खाणें न सुचे कवणासी । लेणें नसुचे कवणासी । सद्गुरुदुःख राजूरासी । सकलांच्या मना होतसे ॥ २६ ॥ मग सीतारामम्हारांजानी । पंचप्राण अर्पिले सद्गुरुचरणीं । ते दुःखाग्नीत पोळूनी । किती हो गेले असतील ॥ २७ ॥ आतां ठावठिकाण । एकहि न राहिलें जाण । मग रामटेकीं जाऊन । तेथें राहती महाराज ॥ २८ ॥ कधी राहती राजूरांत । कधी मूलतापी बारालिंग क्षेत्रांत । परि विरहव्यथा चित्तांत । चैन कोठे पडो नेदी ॥ २९ ॥ निजधामा गेले श्रीकृष्ण भगवान । वियोगें दुःखित हो उद्धव अर्जुन । तैसा हा आज वासुदेव भगवान । गेला सोडून सीतारामा ॥ २३० ॥ एकचि राहिलें चिंतन । वासुदेव चरित्र आठवून । आठवून आठवून । शोक सारखा करिताती ॥ ३१ ॥ केला किती मी असे हट्ट । किती दिधलें मी माउलीस कष्ट । परि ने गोड मानून अभिष्ट । सकल माझें पुरविलें ॥ ३२ ॥ उपदेशाचा वर्षाव । करिती सदा सदगुरू

वासुदेव । ती गुरुमाउली सदैव । पाठी माझी राखीतसे ॥ ३३ ॥ श्रीरामप्रभु जाती वनवासाला । किती दुःख जाहलें भरताला । भेटला जाऊनीं श्रीरामाला । अभिवचन घेतलें तयाकडूनी ॥ ३४ ॥ ठराविक दिनीं येईल रघूवीर । याच अभिवचनाच्या आशेवर । नंदीग्रामी हा सहोदर । वाट पाहात राहिला ॥ ३५ ॥ तुम्ही राजुरांतूनी जातां वासुदेवा । दयानिधे कृपार्णवा । भक्त वत्सला देवाधिदेवा । अभिवचन मज काय दिले ॥३६॥ काय बोललासी अमृतवचन । पुनरपि तुज भेटेंन म्हणून सकल मनोरथ करीन पूर्ण । तें काय आज विसरलासी ॥ ३७ ॥ दहा वरुषांची पत्रिकेंत । पाहतां आयुष्यमर्यादा दिसूनी येत । मज इतुक्यांत प्रभो दयानाथ । देह विसर्जन कां केला असे ॥ ३८ ॥ आपण निरामय आनंद स्वरूपांत । राहूनी मन दुःखसमुद्रांत । कांहो देवा ढकलिलेंत । अपराध कोंणता घडला असे ॥ ३९ ॥ आता कोठे कैसा फिरूं । कोणत्या जाऊं वनांतरूं । कोठे कैसा दिसेल कैवारूं । फिरत राहिले तापी तीरीं ॥ २४० ॥ ऐसे तापी नदीचे तीरीं । फिरती रात दिनभरीं । कोठे श्रमती बैसती भूवरी । तेथेंचि ग्लानी येतसे ॥ ४१ ॥ ऐसेंचि फिरत फिरत । येती बैतुल तालुक्यांत । येती बारा लिंग नामें क्षेत्रांत । तापीकाठीं जें वसतसे ॥ ४२ ॥ पाहूं जातां सभोंवताल । दाट पसरलें जंगल । त्यांत महाराज शोकाकुल । पायी चालतां पातले ॥ ४३ ॥ या दाट अरण्यांत । मुकुंदराज थोर संत । बैसले असती समाधींत । वरी देऊळ सान असे ॥ ४४ ॥ एक दोन माणसें मंदिरात । एवढींच जागा असे तेथ । ऐसा पाहूनी एकांत । महाराज तेथें बैसले ॥ ४५ ॥ काय वर्णावा हा गुरुप्रेमा । देंता येईना त्यासी उपमा । उरली नाही आतां सीमा । अगाध महिमा असे ॥४६॥ सद्गुरु विरहाने पोळलें मन । तें शांत होईल परिपूर्ण । कैसा कृपामृत वर्षेल गुरुधन । तें पुढील अध्यायीं परिसावें ॥ ४७ ॥ कृपासागरा वासुदेवा । तुझें मंगल नाम जानकीच्या जीवा । देईल एकचि विसावा । सदा रसनेवरी असो तें ॥ ४८ ॥ इति श्रीसीताराम चरित्रालंकारमणी । गुंफिला असे दृष्टांतकोंदणीं । प्रकाश दाविता अंतःकरणीं । षड्विंश अध्याय गोड हा ॥२४९॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तू ।

अध्याय सत्ताविसावा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ ॐ हें अक्षर । सकल अक्षरसमूहाचें प्रथमाक्षर । सकल सृष्टीचा विस्तार । याच अक्षरांतूनी होतसे ॥ १ ॥ ॐकाररूपी तो गणेशवरदू । अनाथांचा तो करुणासिंधू । मनोभावें तयासी वंदूं । गजानन तो मोरया ॥२॥ आरंभी तया गणनायका । मनोभावें मारितां हाका । सदा असे पाठीराखा । नसे शंका यांत कांही ॥ ३ ॥ तोच बुद्धिदाता समर्थ । सन्निध असे पूर्ण साहचार्य। सद्गुरुमहिमा अद्भुत । सांगे चरित्र रसाळ ॥ ४ ॥ श्रीवासुदेवानंद सरस्वती । श्रीसीताराम महाराजांची सद्गुरु-मूर्ति । त्यांची कैशी श्रद्धा भक्ति । श्रीसद्गुरुचरणीं स्थिरावली ॥ ५ ॥ अनुसंधानें अनुभव । देऊनियां मज आठव । शब्दजुळवणी अभिनव । वाक्यार्थबोध जो ठसवी मना ॥ ६ ॥ जे अनन्यभावें मनाते । जोडिलें असे जयासी नातें । तें ओवाळणीरूपें पदराते । घालीतसे नित्य मज ॥ ७ ॥ तो देईल नित्य घबाड । मी करूं कैशी त्याची फेड । ठेविली आहे आवड । निष्ठा भक्ति एक चरणीं ॥ ८ ॥ ऐसीचि ही राहो निरंतर । प्रार्थना असे वारंवार । नाही मज लोटणार दूर । हा मनीं भरवसा असे ॥ ९ ॥ तुझिये कृपेंकरून । श्रीसीताराम चरित्रवर्णन । जाहलें सव्वीस अध्याय पूर्ण । आता कळसाध्याय हा चालू असे ॥१० ॥ हा सत्ताविसावा अध्याय बरवा । आठव द्यावा वासुदेवा । घडो घडो नित्य सेवा । हयाच हातें निरंतर ॥ ११ । जाहलें वृत्त मागील अध्यायांत । बैसले निजानंदीं समाधींत । परि सीताराम थोर भक्त । वियोगव्यथेंने तळमळती ॥ १२ ॥ टाकूनियां आपुली जाळी । बहु कुशलत्वें अफाट जळीं ओढूनी काढी मासोळी । जळाबाहेर निजलागीं ॥ १३ ॥ एवढा अफाट सागर । तो तिज दिसे समग्र । परि तडफडे जीव बाहेर । हें अनुभवाविण ना कळे ॥ १४ ॥ प्रिय वस्तु न दिसे नयनां । कैशा होतात यातना । तैशाच प्रसववेदना । अनुभवाविण न कळती ॥ १५ ॥ तैशी सद्गुरुमाउली

। आज असे दुरावली । जीवन साउली मावळली । तळमळें जीव सारखा ॥ १६ ॥ ऐशी ही विरहव्यथा । चैन न पडूं देई चित्ता । एकहि स्थलीं स्थिरता । न राहे या भक्तासी ॥ १७ ॥ ऐसा गुरुविरह होतां दारुण । सर्वस्वाचा त्याग करून । मनीं सद्गुरुचिंतन । सारखें असे चाललें ॥ १८ ॥ राहिला न ठावठिकाण । फिरती तापी तीरावरून । मग बाशिंग क्षेत्रीं येऊन । मुकुंदराजमंदिरीं बैसले ॥ १९ ॥ ना सुचे खाणें पिणें । ना सुचे क्षण- भरी झोपणें । सदा सर्वदा गुरुनाम स्मरणें । सद्गुरुशोक मानसीं ॥ २० ॥ येवढें असून ब्रम्हज्ञान । अंतरीं साठविलें परिपूर्ण । तरि अज्ञ जनासमान । प्रेम साकार स्वरुपावरी ॥ २२ ॥ शोकवेदना दारुण । सकल गात्रे पावती शीण । निघाल्या चार ओव्या मुखांतून । त्याच पुढती गोविल्या ॥ २२ ॥

" असो आम्ही प्रारब्धहीन । अंतरले श्रीगुरुचरण । दुज्यावरी कां दोषारोपण । होणार न टळे कल्पांतीं ॥ १ ॥ किती रम्य मनोहारी । मूर्ति शोभे साजिरी । बाप हो स्मरा अंतरी । गुणकर्में अत्यद्भुत ॥ २ ॥ स्मरण होतां चित्तास । प्राण होतो कासावीस । गुरुमायने निराश । केलें सकल भक्तांसी ॥ ३ ॥ होतों आनंदसागरी । भय नव्हतें कवणाचें अंतरी । अवचित वज्रपाताचे परीं । केला घात दुर्दैवें ॥ ४ ॥ "

दिलेस मज अभिवचन । पुनर्रपि भेट देईन म्हणून । याची तुज भुलवण । नाही पडणार निश्चयें ॥ २३ ॥ सत्य वाणी श्रीसमर्थोक्त । देव आहे सान्निध्यांत । अल्पधारिष्ट पाहत । कृपाळूपणें स्वभक्ताचें ॥ २४ ॥ तैसें वासुदेवा सद्गुरुनाथा । जवळीं असूनी कां न दिसता । आतां किती पाहता । धारिष्ट या दासाचें ॥ २५ ॥ तृष्णातुर धावे जलाकडे । कामातुराची मति बिघडे । विषयांधाच्या डोळ्यावरी झापडें । एकचि छंद मानसीं ॥ २६ ॥ तैसें सद्गुरुदर्शनातुर । जाहले सीताराम महाराज साचार । आतां येथे विचार । दुजा नसे राहिला ॥ २७ ॥ किती आळविता सद्गुरुस । परि न दिसती नयनांस । जीव जाहला कासावीस । धीर सुटं लागला । २८ ॥ दीर्घ

स्वरें मारिती हाका । धाव धाव सद्गुरो तारका । आतां त्रिलोकीं या बालका । नाही आधार कोणाचा ॥ २९ ॥ सान लेकरासमान । माउली माउली म्हणून । कंठ मोकळा करून । रुदन करूं लागले ॥ ३० ॥ जाहला शोकाचा शेवट । कोठवरी पाहतील वाट । अखेरीस पडती निश्चेष्ट । मूर्च्छित होऊनी भूवरी ॥ ३१ ॥ भक्तीमार्गांतील धर्म । बिंबलें त्यांतील अंगीं मर्म । तैसेंच निष्ठावंत कर्म । अखंडित चाललें ॥ ३२ ॥ सोडिले सकल अन्य मार्ग । सर्वस्वाचा केला त्याग । सद्गुरुचा होतां वियोग । देह तोहि सोडिला ॥ ३३ ॥ पडला मूर्च्छावस्थेंत । म्हणजे मृत्यूच्या द्वारांत । तेथून जो कोणी येईल परत । आपुल्या पूर्वभाग्यें करूनियां ॥ ३४ ॥ किती धैर्य किती भक्ति । हीच भक्तांची कसोटी पाहती । जवळीच असे तो जगत्पति । विलोकितसे अवघेचि ॥ ३५ ॥ भर सभेंत मांडिला धावा । धाव धाव गा वासुदेवा । गेला धाऊनी तेधवा । लज्जा राखिली भगिनीची ॥३६॥ त्रिभुवनीचें दिसतें नयनी । त्रिभुवनीचे ऐकूं येते श्रवणीं । जैसा भाव असे मनीं । तैसाच जवळी दूर तूं अससी ॥ ३७ ॥ पांडवांची भक्ति निर्मळ । पाहूनी तो घननिळ । करितसे सांभाळ । वेळोवेळीं धावूनियां ॥ ३८ ॥ तेंवि सीताराम भक्तशिरोमणि । गुरुभेटीची तळमळ मनीं । मज वाटे समाधीच लावूनी । श्रीगुरूसी आळवीती ॥ ३९ ॥ श्रीवासुदेवानंद सरस्वती । प्रेमळ ती सद्गुरुमूर्ति । निजानंदी बैसली होती । गरुडेश्वरीं समाधींत ॥ ४० ॥ आपुला सीताराम भक्त । हाका मारूनी श्रमला बहुत । पडला असे मूर्च्छित । निघाले सद्गुरुनाथ तेथूनी ॥ ४१ ॥ पडता मृत्यूच्या जबडयांत । अकस्मात मुखीं पडावें अमृत । तेंवि दयाळ सद्गुरुनाथ । दर्शन द्यावया धावले ॥ ४२ ॥ गृहास लागावा अग्नि । तों जलवर्षाव होय वरुनी । तेंवि सद्गुरुमाउली धावूनी । आली असे ये वेळीं ॥ ४३ ॥ मासोळी तडफडे जलाविण । चातक तृषाक्रांत जाण । वरती चंचू पसरून । वाट पाहे मेघांची ॥ ४४ ॥ तैसे सद्गुरु दयाघन । वर्षंती कृपाजीवन । वत्सासाठी येतील धावून । धेनु जैसी पातली ॥ ४५ ॥ जवळी येऊनी जंव पाहती । तंव अंगीं नसे शक्ति । नेत्र झाकले

मूर्च्छित स्थिति । भक्त सावध असे ना ॥ ४६ ॥ त्याने बाहिलें कशास्तव । मीहि पातलों तयास्तव । ऐसेंच त्यागितां राहील भाव । दोघांचाहि अपुरा ॥ ४७ ॥ याने देवभक्तांचें थोरपण । जाऊनी लागेल दूषण । म्हणूनी सद्गुरुनाथ जाण । काय करिते जाहले ॥ ४८ ॥ पांडुरंगाचा परम आप्त । नामदेव थोर भक्त । त्याच्यासाठी पंढरीनाथ । काय एक न करीं ॥ ४९ ॥ सुवर्णकार कांचनास । कस लाऊनी घेई परीक्षेस । तेंवि पंढरीनाथें नामदेवास । कसोटीस लाविलें ॥ ५० ॥ नामदेवाची भक्ति सगुण । मध्यान्ह कालीं वाढिलें पान । म्हणे देवा करी भोजन । उशीर बहु जाहला असे ॥ ५१ ॥ आळविलें नाना परी । तरि पंढरिनाथ विटेवरी । उठूनी येईना पात्रावरी । आली वेळ निर्वाणीची ॥ ५२ ॥ देवा नाही येत तुजसी दया । जन्मूनी नाम्या हा गेला वाया । आतां राहावें कासया । अर्पावें मस्तक तुझ्याच चरणीं ॥ ५३ ॥ आणिला मोठा फतर । ठेविला पंढरिनाथाचे समोर । एकदा सांग साचार । येशी काय देवा भोजना ॥ ५४ ॥ तरी मूर्ति असे स्थिर । तो मस्तक शिलेवर आपटणार । काय भगवंत होता दूर । घेतलें मस्तक कृपा करीं ॥ ५५ ॥ तैसेंचि श्रीवासुदेवानंद सरस्वतींनी । आपुला कृपाहस्त उभारूनी । फिरविला सर्वांगावरूनी । सीताराम महाराजांच्या ॥ ५६ ॥ ऊठ ऊठ सीताराम । सावध होई भक्तोत्तमा । बोलाविलेंसी तुवां आम्हां । नयन उघडूनी पाहे बा ॥५७॥ सद्गुरुमाउलीचा कृपाकर । फिरला भक्ताचिये सर्वांगावर । शब्द ऐकिले मधुर । सावध जाहले सीताराम महाराज ॥ ५८ ॥ नेत्र उघडूनी जंव पाहती । तंव पुढे देखिली सद्गुरुमूर्ति । परि संशयांकित चित्तीं । झाले क्षणभरी तेधवा ॥ ५९ ॥ मी आहे काय शुद्धींत । कां असे स्वप्नसृष्टींत । समोर दिसती सद्गुरुनाथ । हें सत्य कीं मिथ्या ॥ ६० ॥ हें जाणूनियां सद्गुरुनाथ । समजती हा पडला संशयांत । म्हणती सीतारामा शुद्धींत । आहेस ना तूं ये वेळीं ॥ ६१ ॥ तुज दिधलें होतें अभिवचन । पुनरपि भेटूं म्हणून । मनोरथ करूं पूर्ण । म्हणूनी आज प्रकटलों ॥ ६२ ॥ तरी काय इच्छा मानसीं । ती सांगावी आम्हांसी । ऐसें म्हणूनी माय जैसी

लेकरासी । हृदयीं तैसें कवटाळिलें ॥ ६३ ॥ तईं श्रीगुरुमाउलींनी । सीतारामा भक्ता गोंजारूनी । घेतलें हृदयाशी कवटाळूनी । अत्यानंदें करूनियां ॥ ६४ ॥ तों किती हो भक्तासी आनंद । आनंद आनंद आनंद । अंतर्बाह्य आनंद । दिसे आनंद चोहीकडे ॥ ६५ ॥ जेंवि श्रीकृष्ण भगवंतांनी । आलिंगन देऊनी । गुह्यज्ञान उकलूनी । दाविलें पार्था दिव्यदृष्टीने ॥ ६६ ॥ तैसेंच आपुल्या हृदयीचें आत्मज्ञान । हृदयासी हृदय मिळ वून । दिधलें असे परिपूर्ण । श्रीगुरुमाउलीने भक्तहृदयीं ॥ ६७ ॥ गरुडेश्वरीं समाधींत । जयासी धावा ऐकूं येत । तो काय मनांतील हेत । जाणत नसेल भक्ताच्या ॥ ६८ ॥ म्हणूनियां सद्गुरुंनी । भक्तेच्छा जाणूनी । न मागता तयांनी । आधीच देऊनी टाकिलें ॥ ६९ ॥ रेणुकामाय जाई सती । परशुराम शोक करिती । माहूरगडा जवळी दत्तमूर्ति । शांतवन करीतसे ॥ ७० ॥ पुनरपि व्हावें दर्शन । हीच इच्छा धरून । सारखें करिती रुदन । प्रकटली माय रेणुका ॥ ७१ ॥ रामा विचार करी मानसीं । व्यर्थ शोक काय करिसी । केला उपदेश पुत्रासी । अदृश्य माय जाहली ॥ ७२ ॥ पुनरपि करूं लागले रुदन । म्हणती माते ना जाहलें समाधान । देई देई दर्शन । जीव व्याकुळ होतसे ॥ ७३ ॥ रेणुकामाय जगज्जननी । आली दर्शन द्यावया लागूनी । पूर्ण समाधान करूनी । जाते समयीं काय वदे ॥ ७४ ॥ मी जातां सत्वरीं । आतां तूं पाहूं नकोस माघारीं । परि न रहावें अंतरीं । पाहती मागे वळूनियां ॥ ७५ ॥ तो सकल भाग भूमींत । अदृश्य होऊनिया जात । मागे वळूनिया जव पाहत । तंव मुखकमल वरीं राही ते ॥ ७६ ॥ ती जगज्जननी अंबिका । श्री परशुरामाची माय रेणुका । दर्शन द्यावया भाविकां । राहिली माहूर गडावरी ॥ ७७ ॥ तो आज चिरंजीव परशुराम । हा भक्त श्रेष्ठ सीताराम । दोघांची भक्ति अनुपम । जगा उदाहरण देतसे ॥ ७८ ॥ तैसे हे वासुदेवानंद सरस्वती । प्रत्यक्ष असे दत्तात्रेयमूर्ति । दुजा अवतार घेऊनी पुढती । आली दर्शन द्यावया ॥ ७९ ॥ केली लीला ही अद्भुत । आज प्रभूनें कलियुगांत । अति आनंदें नाचत । सीताराममहाराज ॥ ८० ॥

गुरुकृपेचा वर्षाव जाहला । आनंद सागरी पोहूं लागला । देहभान विसरला । पुनरपि भक्त पडला मूर्च्छित ॥ ८१ ॥ देहाची हरपली शुद्धि । सकल लोपली उपाधि । निर्विकल्प लागली समाधि । सीताराममहाराजांची ॥ ८२ ॥ तईं कल्पतरु सद्गुरुनी । आपुला शिष्य सावध करूनी । म्हणती काय इच्छा असे मनीं । सांग मजसी सीतारामा ॥ ८३ ॥ चरणावरी मस्तक ठेवून । प्रेमाश्रूंनी घालती स्नान । सात्विक भाव येती उचंबळून । मानस पूजन करिताती ॥ ८४ ॥ म्हणती प्रभो दयासागरा । किती आठवू मी उपकारा । त्यांची फेड या पामरा– । कडूनी कैसी होईल ॥ ८५ ॥ आज नवा अवतार घेऊन । प्रभो मज दिलेंत दर्शन । तेणेंच धन्य जाहलों पूर्ण । आतां मागणे काय असे ॥ ८६ ॥ तरी सद्गुरु म्हणती वाचें । जें पूर्वी तुज होतें मागावयाचें । तें बोलूनी दाखवी साचे । हीच इच्छा मज असे ॥ ८७ ॥ तरी कृपा – सागरा वरदान । मज न राहो देहभान । जैसें होतें जलीं एकरूप लवण । तैसें मन तत्वीं लीन होवो ॥ ८८ ॥ दृष्टि होऊनी आत्माकार । सदा रहावी साचार । बाह्य वृत्तीचा व्यवहार । न राहो कदा सामोरीं ॥ ८९ ॥ तैसेच मागणें असें तुज । निर्विकल्प समाधि द्यावी मज । जगापाशीं आमुचें काज । न राहो कदापि ॥ ९० ॥ एकचि निर्धार मनाचा । सदा सहवास या चरणांचा । तेणेंचि या सीतारामाचा । जीव सुखी होईल ॥ ९१ ॥ सद्भक्ताचें मागणें ऐकूनी । संतोषले सद्गुरु मनीं । म्हणती मागशील हें वरदानीं । ऐसें आम्हां न वाटलें ॥ ९२ ॥ जगीं दिगंत व्हावी कीर्ति । यंत्रतंत्रसिद्धि प्राप्ति । आणिक कांही दिव्य शक्ति । मागशील ऐसें वाटलें ॥ ९३ ॥ यावरी सीताराममहाराज वदती । आपुल्या कृपें मोह नष्ट होती । चरणकमलांवरी प्रीति । अखंड गोडी तेथे असे ॥ ९४ ॥ जें आपुल्या प्रसादे एकवार श्रुत । तेथेच मन रमो संतत । तें परम गूह्य ज्ञान सदोदित । श्रवण करावें वाटतें ॥ ९५ ॥ हीच इच्छा असे मनीं । ती पुरवावी श्रीगुरूनीं । हीच प्रार्थना असे चरणीं । याविना दुजें कांहीं नको ॥ ९६ ॥ समाधींतूनी उठूनी । येती गरुडेश्वरापासूनी । दुजा अवतार घेऊनी । सद्गुरु भक्तेच्छा

पुरवितातो ॥ ९७ ॥ अंतरी होऊनी समाधान । पूर्ण जाहले प्रसन्न । भक्तश्रेष्ठ बंधू सान । त्यांच्यावरी करिती कृपा ॥ ९८ ॥ मग जवळी बैसवून । शब्द योजूनी पीयूषपूर्ण । बोधिलें असे आत्मज्ञान । सीताराम भक्तासी ॥ ९९ ॥ ऐसें आत्मज्ञान जीवन । भक्त हृदयी भरून । पूर्ण करिती समाधान । मग अंतर्धान पावले ॥ १०० ॥ हट्ट धरला देवापाशी । तो पूर्ण करावया लावला देवासी । सहन केलें कष्टासी । धन्य धन्य ते भक्त आणि गुरु ॥ १ ॥ जो निर्गुण निराकार । तो या भक्तासाठी जाहला साकार । दर्शन द्यावया समोर । येऊन उभा ठाकला ॥ २ ॥ ही अमोल भक्ति अमोल जीवन । ही अमोल जगासी शिकवण । करावें अमोल नामस्मरण । या सीताराम नामाचें ॥ ३ ॥ निःसीम भक्ति भगीरथ प्रयत्न । ठेविलें उज्वल आचरण । जोंवरी रविचंद्र असती जाण । तोंवरी तारील नाम तयांचे ॥४॥ सीताराम सीताराम । सीताराम हे पवित्र नाम । हरतील पाप ताप श्रम । या सीताराम नामाने ॥ ५ ॥ तरि मनीं ठेवुनियां भाव । नाम घ्यावें घ्यावा अनुभव । नाम घेतां टळेल भव । नाममहिमा हा अपूर्व असे ॥ ६ ॥ ऐसे हे सीताराम भक्त । चार महिने पर्यंत । हद्दा बारालिंग क्षेत्रात । राहती अति स्वानंदें ॥ ७ ॥ मग निघाले तेथूनी । चालले फिरत मेदिनी । पोहोचले रामटेकास येऊनी । सीताराम महाराज ॥ ८ ॥ रामटेकीं मुक्काम बहुत । कळले असे राजूरांत । आली भक्त मंडळी धावत । दर्शनासी महाराजांची ॥ ९ ॥ नम्रत्वें करिलीं प्रार्थना । महाराजांच्य वंदूनी चरणा । म्हणती द्यावे दर्शनां । राजूरी येऊनीया भक्तांते ॥ ११ ॥ वासरांना सोडून । धेनू जाय निघून । वासरे हंबरती जाण । तिजकारणे सर्वदा ॥ ११ ॥ तेंवि तूं आम्हालागूनी । सकलांस जाता सोडूनी । आम्ही पाडसे तुझ्या दशैनो । भुकेली झालो कधीची ॥ १२ ॥ त्यांचा आदरभाव पाहून । तयांसी देती आश्वासन । येतो राजुरी म्हणून । पुढती तुम्ही चलावे ॥ १३ ॥ मग महाराज निघती रामटेकाहूनी । कारंजा अमरावती उमरखेडो राहूनी । तेथे अध्यात्मज्ञान उपदेशूनी । वासुदेवपंचपदीपाठ सुरु केला

॥ १४ ॥ नूतन शिष्य जाहले बहुत । तयावरी ओपिती दयामृत । भक्तिमार्ग चोखट । समस्तासहि उपदेशिती ॥ १५ ॥ ऐसे मुक्काम मुक्काम करित । आले महाराज राजूरात । तो आनंद न सांगता येत । वाटे मायबाप भेटले ॥ १६ ॥ प्रत्येक मुक्कामी वाढती भक्त । महाराजांचे राजूरात । जाहले असती असंख्यात । लक्ष सकलांचे लागले असे ॥१७॥ एका मातेची लेकरे बहुत । त्यांचे परि एकचि मातृदैवत । प्रत्येक जाऊनिया धरत । पदर आपुल्या मातेचा । १८ ॥ असे तिची दृष्टि समान । कोणासी न लोटी दूर जाण । घेई प्रत्येकाचे ऐकून । समजूत घाली तयाची ॥ १९ ॥ सकलांचे व्हावे हित । हीच इच्छा मनात । रात्रंदिन झटती तदर्थ । कष्ट सारखे सोसूनिया ॥ १२० ॥ तैसेच असती असंख्यात । महाराजांचे किती भक्त । परि तयांचे एकचि सद्गुरुनाथ । समर्थ माऊली एक असे ॥ २१ ॥ सकलांसी सन्मार्गात । लावितासी सद्गुरुनाथ । पुरवितील मनोरथ । इच्छेसम तयांचे ॥ २२ ॥ ऐसे चार महिने पर्यंत । राहिले महाराज राजूरात । ज्ञानमृताचा लाभ देत । प्रेमभरे सकलांसी ॥ २३ ॥ मग सकलांचा निरोप घेऊन । महाराज निघाले तेथून । चालता चालता जाण । नर्मदाकाठी पातले ॥ २४ ॥ जैसा अंतरी विरक्त बाणा । तत्समान वरती जाणा । विरागी हा योगीराणा । दत्त दिगंबर शोभतसे ॥ २५ ॥ प्रवास करिता मार्गात । शरण येती आपद्ग्रस्त । तयासी करिती संतुष्ट । संकट त्यांचे निवारुनी ॥ २६ ॥ तैसेंच ताम्रादिभस्मे सांबरशिंगे । आणिक भस्मादिक ठेविती संगें । कोणी रोगग्रस्त भेटती मार्गें । रोगमुक्त करिती तयां ॥ २७ ॥ जेथे भाविकता असे निर्मळ । श्रद्धा भक्ति असे निश्चळ । तेथे महाविषहि केवळ । अमृततुल्य होतसे ॥ २८ ॥ मार्गी एकदा मुक्कामास । भेटला सीतारामम्महाराजांस । रोगग्रस्त माणूस । आपुली व्यथा कथितसे ॥ २९ ॥ तयासी रोगमुक्त करावयास । काढा सांगूनी एक भस्म दिधलें त्यास । चार पांच मासापर्यंत घालूनी प्यावयास । सांगितला असे तयासी ॥ १३० ॥ चार पांच माशांपर्यंत । याचा काय त्याने धरिलासे अर्थ । उडत्या मक्षिका धरूनी काढ्यांत । नित्य

घालूनी प्राशन करी ॥ ३१ ॥ एक माशी भोजनीं जाय उदरीं । तो उलटूनी काढी बाहेरी । परि हा माझ्या पचन करी । हितकारी होती त्या आरोग्या ॥ ३२ ॥ सांगितल्यासम मुदतींत । जाहला असे रोगमुक्त । आनंदें दर्शनास येत । सीतारामम्हाराजांच्या ॥ ३३ ॥ महाराज वदती तयासी । सांगितल्यासम काढा घेतलासी । म्हणूनीं बरा झालासी । इतुक्या लवकर वाटतें ॥ ३४ ॥ तो शेतकरी भोळा खेडूत । काढा कैसा घेतला सांगत । म्हणे दिलेली राख टाकिली काढचांत । माशाबो पांच पांच रोज टाकिल्या ॥ ३५ ॥ महाराज हांसती मनांत । या माशाहि टाकिल्या म्हणत । म्हणूनी त्याप्रत । अरे माशाबी म्हणजे काय असे ॥ ३६ ॥ उडती माशी दाखवून । हचा रोज पांच धरून । काढचांत त्या उकळून । घेतल्या बहु गुण आला असे ॥ ३७ ॥ रोगाने होतो हैराण । आशिर्वाद लाखाचा असे जाण । भेटलेती भगवान । कोणत्या पूर्व पुण्याईने ॥ ३८ ॥ महाराज वदती हांसून । भालीं हात लावून । ईश्वरी गुरुकृपा तुजवरी पूर्ण । म्हणूनी बाबा वाचलासी ॥ ३९ ॥ यांत एकचि असे सार । आशीर्वाद असे थोर । त्यापुढे तो काळहि क्रूर । भिऊनी मागे जातसे ॥ १४० ॥ पुढती येती नर्मदाकाठी । पवित्र गोदावरी घाटीं । तेथ चातुर्मास राहण्यासाठी । राममंदिरी पातले ॥ ४१ ॥ गाभाऱ्यांत जाऊन । श्रीरामरायाचें घेतलें दर्शन । तो दृष्टीस पडल जाण । महाभुजंग बसलेला ॥ ४२ ॥ सामान्य मानवाची गाळण । काय उडाली असती पाहून । नुसतें नाम ऐकतां जाणा । घाम सुटतसे अंगासी ॥ ४३ ॥ परी हे धैर्यवंत तपोनाथ । अहिंसक थोर भक्त । म्हणती आपण राहावें सभामंडपात । यास गाभाऱ्यांत खुशाल राहूं द्यावें ॥ ४४ ॥ ऐसे चार महिनेपर्यंत । महाराज राहती मंदिरांत । दोहोंमधील अंतर फक्त । एक उंबरठा गाभाऱ्याचा ॥ ४५ ॥ मनी वासना असतां क्रूर । जरी लाभे सत्संग थोर । तरी तोहि करील सुविचार । निश्चयेसो जाणावें ॥ ४६ ॥ पाहतां सर्व जन्म हा पापिष्ट । त्याचा स्वभाव असे कोपिष्ट । एवढा संतलाभ जाहला असें निकट । मग तेथे कपट कोठूनी राहे ॥ ४७ ॥ मग नर्मदाराती–वरूनी । महाराज

श्री दत्तमूर्ती, हिंगोली

कै. श्री. हेमराजसेठ मुंदडा

(अध्याय २७ मध्यें ओवी क्रमांक १४७ चे पुढें हे वाचून मग ओवी नं. १५१ पासून वाचावा)

॥ ४७ ॥ मग नर्मदातीरा–वरुनी । महाराज निघाले तेथूनी । तेथील क्षेत्रें अवलोकूनी । ब्रम्हाणी येथे उतरले ॥ ४८ ॥ पडती साखरेचे कण । नको द्यावया आमंत्रण । मुंग्या येतील धांवून । गोडी चाखावया सत्वर ॥ ४९ ॥ तैसेच महाराज येती येथ । जमला जनसमुदाय बहुत । कार्तिकापासून चैत्र पाडव्यापर्यंत । पांच महिने राहीले ॥ १५० ॥ सदाचार वेदांत ग्रंथ । सांगावया केली सुरवात । परि स्त्री समुदाय फक्त । प्रार्थना करिती महाराजांना ॥ ५१ ॥ म्हणोनी श्री वासुदेवानद विरचित .....

वरांचत । स्त्रीशिक्षा हा एक ग्रंथ । सांगते जाहले हृष्टचित्त सीताराम ॥५२॥ या ब्रम्हाणी क्षेत्रांत बहु जाहले महाराजांचे भक्त । त्यांत दत्तूभय्या उपदेश घेत । आत्मसाक्षात्कारी ते जाहले ॥५३॥ तयांची साळूबाई भगिनी । तीहि उपदेश घेऊनी । योगाभ्यास शिकूनी । बहु प्रविण झाली असे ॥५४॥ सकल मंडळी गृहांतली । श्रीसीताराममहाराजांची भक्तमंडळी । रसना सकलांची रंगलेली । सीताराम या नामाने ॥५५॥ जेव्हा ब्रम्हाणी सोडूनी जाती । तेव्हा विरहे व्याकूळ होती । म्हणती निष्ठुर न व्हावें चित्तीं । आठवण असो द्यावी या दीनांचो ॥५६॥ बोधामृतासी पाजून । सकलांचें करावें सांत्वन । पुढती नर्मदा तीरावरील जाण । हुशंगाबाद शहरीं पातले ॥५७॥ येथे पोहोचतां क्षणीं । मुकुंदराव नाफडे भक्तांनी । समर्थांस आपुले सदनीं । अति आदरें नेलें असे ॥५८॥ अक्षयतृतिया तिथीसी । मातृश्राद्ध असें या दिवशीं । पांचशेंवर मंडळींसी । सांगती भोजनासी नाफडे ॥५९॥ भावभक्ति मातृप्रेम । पाहूनी कांही दिवस राहती सीताराम । मग सोडिला असे मुक्काम । आंबराईंत राहती पर्णकुटीं ॥१६०॥ जाहला येथील मुक्कामांत । एक चमत्कार अद्भुत । भोपाळनजिक एका खेड्यांत । यवन एक कोणी राहतसे ॥६१॥ तयाच्या वडील बंधूंस । जाहला असे सर्प दंश । उपाय केले बहुवस । परि गुण नच आला असे ॥६२॥ ज्याची सर्वत्र पसरली कीर्ति । तो लपून काय राहील जगतीं । ती सद्गुरु सीताराम मूर्ति । आठवे तयीं यवनासी ॥६३॥ म्हणूनी लगबगें करून । आला गाडीवरी धावून । आंबराईत येऊन । श्रीसीतारामचरणीं शरण आला ॥६४॥ सकल केलें निवेदन । म्हणे ठेविला आहे बंधू पेटींत घालून । मुलें असती त्याचीं सान । रडे भावजय सारखी ॥६५॥ नाही जाहली घर वाटणी । भांडणें होतील या कारणीं— । तरी महाराजें कृपा करूनी । तेथवरी चलावे ॥६६॥ आपण दयावंत होऊन । द्यावें बंधूसी जीवदान । सीताराम पुसती त्यालागून । किती दिवस त्या जाहले ॥६७॥ यवन म्हणे तीन पूर्ण दिवस । आजचा असे चौथा दिवस । न बोलती महाराज एक तास । विचार करिते जाहले । ६८॥

मग महाराज तयासी पुसत । देऊळ आहे कां गावांत । रात्रीची गाडी केव्हा तेथ । गावासी पोचतें सांग बा ॥६९॥ यवन सांगे तयांसी । मारुती-महादेवाचें मंदिर ग्रामासी । रात्रीची गाडी दुजे दिवशीं । उदईक आठ वाजतां पोहोचतसे ॥१७०॥ महाराज सांगती तयासी । तूं जाय पुढे गाडीने ग्रामासी । उदईक महादेवाचे मंदिरासी । पेटी आणूनी ठेवावी ॥७१॥ रात्रीचे गाडीने मुसलमान । गेला पुढे निघून । परि शंकेने घेरलें मन । महाराज दिसती गाडींत न कोठे ॥७२॥ म्हणूनी उदईक उतरुन । गृहासी न गेला तो यवन । महादेवमंदिरीं जाऊन । आधी तेथे पाहतसे ॥७३॥ तों काय चमत्कार । महाराज बैसलेले देखिले समोर । नमस्कार करूनी सत्वर । शवपेटी आणि मंदिरीं ॥७४॥ महाराज म्हणती तयासी । कासया पेटींत निजविलेसी । हाक मार म्हणती आपुले बंधूसी । कृपावलोकनें पाहती ॥७५॥ विश्वास धरूनियां मनीं । हाक मारी बंधूलागूनी तो। आळेपिळे अंगासी देऊनी । उठला असे तेधवां ॥७६॥ काय यमराजापाशी जाऊन । जीव आणला परतवून । कां नागराजास सांगून । विष ते अमृत केले असे ॥७७॥ किती आनंद झाला त्या यवना । हें सांगतां काय येईल कवणा । महाराज आपुलिया स्थाना । केव्हांच पातले पर्णकुटीं॥७८॥काय अगाध ही योगशक्ति । केवढी असे सत्ता हातीं । प्रत्यक्ष ही दत्तमूर्ति । संशय यांत कांही नसे ॥७९॥ सकल असे अतर्क्य करणी । म्हणूनी मौन धरुनी नमावें चरणीं । श्रीसीताराम कृपापाणि । अखंड भक्तांच्या माथीं असे॥१८०॥महाराज राहती ज्या आंबराईत । तेथेहि भक्तमंडळी जमती बहुत । त्यांत बहुत होतें श्रीमंत । त्यांनी विचार काय केला असे ॥८१॥ काय करावयाची धनदौलत । येवढा महात्मा राहतो जंगलांत । म्हणूनी नर्मदातीरावर घेत । खरेदी करूनी एक जागा ॥८२॥ योगी राहणार हें जाणून । मठ बांधिला भव्य जाण । जवळीच भक्तांतें राहावया कारण । इमारती खोल्या बांधिल्या ॥८३॥ मग सर्वांनी मिळून । नम्रत्वें प्रार्थना करून । म्हणती महाराज । कृपा करून मठांत आपण राहावें ॥८४॥ या संत योगियासी । समानता

नांदे मानसीं । जो आनंद राजवाडयासी । तोच अरण्यांतरीं लाभतसे ॥८५॥ कोणी गरीब वा श्रीमंत कोणी अजाण वा पंडित । स्त्री अथवा पुरुषजात । सकल समान योगियासी ॥८६॥ पंचपक्वांनांचें भोजन । जैसें करी क्षुधा निवारण । तैसेंच आंबिल खावूनियां पूर्ण । समाधान होतसे । ८७ । बाह्य स्वरूपावरून । कधी न त्यांची हो भुलवण । स्वयं असती आनंदघन । अंतर्बाह्य सारखे ॥८८॥ भक्तांचें व्हावें समाधान । इच्छी संतांचें मृदु मन । म्हणूनी आंबराईतील पर्णकुटी सोडून । महाराज मठांत येती राहावया ॥८९॥ नित्य पूजा पुराण आरती । योगाभ्यास कीर्तनें होती । श्रीनृसिंह सरस्वतींच्या पुढतीं । सद्गुरुमाउली ही देव तेथे ॥ १९० ॥ प्राणायाम ध्यान धारणा । मुद्राबंध षट्क्रिया आसनां । शिकविती नाडीचालना । कळकळीने महाराज ॥९१॥ पुस्तकी विद्येंत पारंगत । बहू दिसती जगांत । परि सकल स्वानुभवी योगी संत । विरळ जनीं दिसतील ॥९२ । नानाविधी वृक्ष । साचार वनोवनीं दिसती थोर । परि नाही सहज दिसणार । चंदनवृक्ष त्यांत तो ॥९३॥ तैसेंच या जगांत । पंडित नानाविद्यापारंगत । परि त्यांत स्वानुभवी योगी संत । विरळाच एखादा दिसतसे ॥९४॥ तैसी सीताराम महाराज विभूति । धन्य जाहली या जगतीं । मिळाली जयांना संगति । धन्य तेहि जाहले ॥९५॥ हया योगाभ्यासी विद्यार्थ्यांत । मोघे डॉक्टर नवाथे वर्गात । मुकुंदराव नाफडे रघुनाथ । गुरु इंगोलीकर विद्यार्थी ॥९६॥ ऐसा सकलांसी आनंद देत । सकलांचे पुरवुनी मनोरथ । राहती महाराज मठांत । हुशंगाबादेस भक्तांस्तव ॥९७॥ तेथेच साळूबाई म्हणूनी । होती महाराजांची भगिनी । आली आपुल्या अनंत नामें पुत्रासी घेऊनी । महाराजांच्या दर्शना ॥९८॥ त्यास सन्मार्गाचें लाविलें वळण । आवडीसम दिधलें शिक्षण । मठाचा कारभार संपूर्ण । त्याचे हातीं सोपविला ॥९९॥ ऐशा दीड वर्षाच्या अवधींत सकलांसी आनंद देत । मुख्य सांगावयाचे येथ । तें स्थान अति जागृतअसे ॥२००॥ श्रीवासुदेवानंद सरस्वती । सीताराम महाराज भक्त विभूति । एकरूप दोन्ही असती । प्रतिति दाविती भक्तांसी ॥१॥ पुनरपि येती या मठांत । राजूरचें प्रेमळ भक्त । विनंति करूनी घेऊनी

जात । चार महिनेपर्यंत राजूरीं ॥२॥ येथेंच राहावेत समर्थ । हीच इच्छा सकालांच्या मनांत । जरी दूर वाटे सोडूनी जात । परि ते जवळीच असती ॥३॥ प्रत्येक समयीं स्वानंदपूर्ण । करिती परोपकारी कार्य जाण । भजन आणि ज्ञानदान । करीत असती सकलांसी ॥४॥ तैसेंच या समयासी । उत्तीर्ण जाहलेल्या शिष्यवर्गासी आत्मज्ञान । या बक्षिसासी । दिधलें असें निजकृपें ॥५॥ हया गुरुमाउली वाचून । न गमे भक्तमंडळींना क्षण । जैशीं माय बाहेरीं जातांचि जाण । लेकरे होतीं घरीं बावरीं ॥६॥ तैशीच भक्तमंडळी इंगोलीहूनी । आली आली धावूनी । म्हणती चलावें येथूनी । महाराज आमुच्या सवें आतां ॥७॥ शंकरराव नारायणराव । लक्ष्मणराव विठ्ठलराव । जयवंतराव वकील सर्व । भक्तमंडळी विनविती ॥८॥ श्रीवासुदेवानंदांच्या मंदिरांत । श्रीदत्त जयंती उत्सव सुरु होत । त्याच समयीं हे सद्गुरुनाथ । इंगोलीस येताती ॥९॥ श्रीवासुदेवानंद सरस्वती । जी प्रत्यक्ष असे दत्तमूर्ति । जिचे चरणकमल या मंदिरीं स्थापिती । तेच दुज्या भक्तरूपें प्रगटले ॥२१०॥ तैसेच हे सीताराम महाराज परिपूर्ण । केलें नाम आकार धारण । पाहतां सच्चिदानंदमूर्ति सगुण । आली असे या उत्सवा ॥११॥ ऐशी ही आनंदघन सीताराममूर्ति । जयंती उत्सवास झाली येती । तेणें आनंद न माये चित्तीं । सकल भक्तजनांच्या ॥१२॥ ऐसा उत्सव जाहला पूर्ण । सकलांसी देऊनी समाधान । निघणार होते तेथून । श्रीसीताराम महाराज ॥१३॥ आजपर्यंत केलें दान । परोपकार नित्य जाण । सन्मार्गीं सकलांसी ठेविती आणून । अज्ञान जनां ज्ञान करिती ॥१४॥ कोणाचें संकट निवारण । कोणासी रोगमुक्त करून । कोणाचें दारिद्र्य घालवून । धनवान कोणासी करिताती ॥१५॥ कोणासी योग धारणा । कोणासी सांगती आसना । कोणासी आत्मज्ञाना । बोध करूनी सांगती ॥१६॥ आतां राहिले एक दान । येथील महाभक्तालागून । तें द्यावया कारण । राहिले सीताराम महाराज येथे ॥१७॥ हें शेवटलें असे दान । कवणासी कैसें केलें समर्पण । ही कथा करावी श्रवण । प्रेमळ भक्त भाविक हो ॥१८॥ हें इंगोली

ग्राम वन्हाडांत । येथे एक सावकार श्रीमंत । हेमराज मारवाडी महाभक्त । असे वासुदेवानंद सरस्वतींचा ॥१९॥ हा हेमराज सावकार । अकस्मिक रोगाने भयंकर । जाहला असे बेजार । साहूं न शके वेदना ॥२२०॥ होता बहुत श्रीमंत । उपाय तेथे अनंत होत । वैद्य डॉक्टर नमांकित । किती एक शोधिले तयाने ॥२१॥ परि गुण न आला किंचित । रोग चालला बळावत । शेवटीं मना आठव होत । दयाळू त्या ईश्वराचा ॥२२॥ श्रीवासुदेव सद्गुरु समर्थ । तयांचा असतो हा थोर भक्त परि आठव मनांत । आधी नच ईश्वराचा ॥२३॥ त्या महाभक्ताची ही होय स्थिति । मग सामान्य मानवाची काय गति । तेथे पूर्व सुकृतेंच अखेर उपरति । होतां रघुपति आठवेल ॥२४॥ श्रीवासुदेवानंद सरस्वती । ही सीताराम हाराज दुजी मूर्ति । परी दोन रूपें एक ज्योति । पाहातां ज्ञानिया दिसूनी ये ॥२५॥ ते सीताराम महाराज दयावंत । असती जवळीच या इंगोलींत । शेवटीं चरणी शरण येत । अनन्य भावें समर्थांच्या ॥२६॥ सेवकांनी उचलून । घातलें महाराजांच्या पुढे अंथरूण । त्यावरी निजविलें आणून । हेमराजास तेधवा ॥२७॥ तो प्रेततुल्य दुखणाईत । निजूनीच जोडूनी हात । केविलवाणें बोलत । मज दिनावरी दया करावी ॥२८॥ वांछा मनीं उदित । कीं सद्गुरु वासुदेव समर्थ । काळ घालवावा त्यांच्या सेवेंत । हेत तो अपुरा राहणार कां ॥२९॥ या आजारांतूनी उठविणारा । एकचि तूं अससी खरा । सद्गुरुनाथा दीनोद्धारा । शरण मी पदीं आलों असे ॥२३०॥ मी पातकी बहुत । विसरूनी गेलों तुजप्रत । दाही दिशा फिरलों व्यर्थ । जवळी कामधेनू असूनी । ३१॥ घरीं असतां चिंतामणि । उगाच फिरलों रानोरानीं । अपार कीर्ति ऐकिली कानीं । परि विस्मरण कैसे जाहलें ॥३२॥ तूंच कृपाळू होऊन । तूंच दिलीस आठवण । म्हणून पदीं आलो शरण । तारी तारी रामराया ॥३३॥ ज्यांनी अनन्य उपाय केले । ते ते सकल व्यर्थ गेले । कंटाळूनी मग त्रासले । शेवटीं आले शरण तुला ॥३४॥ तूं दयामृताचा सागर । सदा अससी उदार । नाही केलास कुणाचा अव्हेर । दुःखमुक्त जाहले सकलहि ॥३५॥ तरी अपराध करूनी

क्षमा । त्रिलोकीं तुज नसे उपमा । तरी देवाधिदेवा सीतारामा । जीवदान द्यावें मजलागीं ॥३६॥ हेमराजाने केली स्तुति । अपार गाऊनियां कीर्ति । परि महाराज शांत चित्तीं । नाही भुलले त्या स्तुतीसी ॥३७॥ आपुल्या संतस्वभावानुसार । दुज्यांचें दुःख ना बघवणार । ऐसे कृपाळू हे दीनोद्धार । सीताराममहाराज ॥३८॥ त्या हेमराजाची कष्टमय स्थिति । पाहूनी महाराज द्रवले चित्तीं । मधुर शब्दें धीर देती । समाधान करिती तयाचें ॥३९॥ दोघांचा पाठीराखा असे एक । जो वासुदेव सद्गुरु सुखदायक । तोच दूर करील दुःख । शरण त्यासी जाईजे ॥२४०॥ कळलें असते अगोदर । तरी जाहला असता काही उपचार । परि आम्ही येथूनी जाणार । सवड नसे येथे राहावया ॥४१॥ नाव घेईं हरिहराचें । नाम घेईं बा दत्तात्रेयाचें । ते सकल एकरूप साचे । सदय होतील तुजवरी ॥४२॥ जो काळाचाहि शासनकर्ता । ऐशा सद्गुरुचा तूं भक्त असतां । त्याच वासुदेव भगवंता । शरण जाईं बा हेमराजा ॥४३॥ ऐसा कल्याणमार्ग दाखवून । हेमराजाचें करिती समाधान । परि तोचि प्रयत्न । सावकारासी ना रुचे ॥४४॥ तो मारवाडी सावकार । रोखीचा करी व्यापार । तो जरी उधार देणगीवर । संतुष्ट होणार मुळी नसे ॥४५॥ जो सीताराममहाराजांनी आपणाला । अभय आशीर्वाद दिला । तो सत्य करूनी दाखवीला । पाहिजेच येथे राहूनियां ॥४६॥ त्यांची उधारीची रीत । मानसीं ना पडे पसंत । म्हणूनी अनन्य भाव प्रकट करित । काय वदे मारवाडी ॥४७॥ तुम्हीच माझे श्रीगुरुवासुदेव । हा माझा असे पूर्ण भाव । सीताराम हें तुजें नांव । धारण आपण केलें असे ॥४८॥ काय मी अन्यायी बहुत । म्हणूनी माझी परीक्षा घेत । हा उद्धार आशीर्वाद व्यर्थ । काय निघाला मुखांतूनी ॥४९॥ नदी सागराशी मिळाली । ती कैशी होईल निराळी । गुरुकृपांकित जी मूर्ति जाहली । ती एकरूप साच असे ॥२५०॥ मी पायांतील वहाण । असें मज समजून । सद्गुरो व्हा दयाघन । हेंच मागणें तुम्हा असे ॥५१॥ गातात तुमचे गुणानुवाद । अखंड मोदाने चारी वेद । तरी दुःखरूप हा भवबंध । तोडून पदरांत

घेईजें ॥५२॥ मज प्रत्यक्ष आधी सुखवावें । मग येथूनी आपण जावें । हेंचि मागणें पुरवावें श्री गुरुनाथा महाराजा ॥५३॥ ही श्रद्धापूर्वक विनंति । ऐकता महाराज द्रवले चित्तीं । संरक्षण ब्रीद हें पाळिती । संत नित्य आपुले ॥५४॥ महाराज कळवळून । वदती हेमराजा लागून । लवकरी रोगमुक्त व्हाल जाण । श्रीसद्गुरुनाथाच्या कृपेने ॥५५॥ आतां शांत करावें मन । तुम्ही बरे झालियाविण । आम्ही न सोडू हें स्थान । हेमराज भक्त वर्या ॥५६॥ ऐसें सद्गुरुमुखीचे ऐकतां वचन । हेमराजासी वाटलें समाधान । वाटे अर्धे दुःख गेले पळून । आतांचि काय आपुले ॥५७॥ जैसा एकटा योद्धा रणांगणीं । शत्रूंनी घेतला घेरूनी । परि साहाय्यकर्ता दुरूनी नको भिऊं म्हणतसे ॥५८॥ कर्जदाराचे द्वारांत । हातबेडी घालण्या हो धनको उदित । तों साहाय्यकर्ता येऊनी त्वरित । म्हणे घे कर्ज मम मित्राचे ॥५९॥ तैसेंच येथे जाहले । वाटें प्राण पूर्ण चालले । तों अर्ध्यां वाटेंतून परतले । संतवचन ऐकता ॥२६०॥ हेमराजासी दिधलें वचन । ही जबाबदारी पडली येऊन । म्हणूनी आसनावरूनी उठून । शिघ्र मंदिरीं पातले ॥६१॥ म्हणती सद्गुरु दयाघना । गुंतलो मी हेमराजा देऊनी वचना । तरी त्याची संकट निवारणा । करावी प्रभो यावेळे ॥६२॥ घेतलें चरणकमलावरील तीर्थ । पळीपळीने पाजीत । आयुष्य संपलें हें कळूनी येत । पाहतां क्षणीच महाराजांना ॥६३॥ आपुल्या दिव्य आयुष्याचा अधिकार । घेणार होता तो सावकार । म्हणुनी वाटतें शुद्धान्तर । तीर्थोदके करीत होते ॥६४॥ रोग्याची स्थिती असे जरी कठिण । तरी तज्ञ न सांगत तयालागून । मग झोळींत हात घालून । भस्म चिमटी काढली ॥६५॥ ती एका अनुपानांतून । घ्यावयास त्याजला सांगून । लवकरीच बरे व्हाल म्हणून । आशीर्वाद देताती ॥६६॥ ऐसे औषध देऊनी । घेण्यासी सांगती प्रतिदिनीं । आतां गृहासी जाऊनी । शांत मन ठेवावें सांगती ॥६७॥ तुवां जावें आपुल्या सदनी । हे शब्द ऐकता क्षणीं । हेमराज वदे दीनवाणी । परिसावी विनंति एक माझी ॥६८॥ मज नसे तिळभरी शक्ति । उठूनी बैसविणे दुजियाचे हातीं । मग

दयाळा कृपामूर्ति । मज दर्शन कैसें घडेल ॥६९॥ सर्वस्वी घेतलंस असे भार । माझा आपण शिरावर । दर्शन व्हावें मज निरंतर । गृहासी चरण आपुले लागावे ॥२७०॥ महाराज म्हणती तयातें । देवदर्शन नित्य तुम्हातें । मनीं म्हणती प्रतिज्ञेतें । पूर्ण बांधिला गेलो आतां ॥७१॥ मग हे सीताराम दयाघन । प्रतिदिनी गृहासी जाऊन । औषधासहित निज दर्शन । समाधान करिती देऊनियां ॥२॥ जी दुर्लभ असे जगतीं । एक साधू-सज्जन-संगति । मिळतां समाधान होय चित्तीं । याचा अनुभव ये हेमराजासी ॥७३॥ असती सद्गुरु जोंवरी सदनी । तोंवरी समाधान नांदे मनीं । जातां वियोगव्यथा आठवूनी । अंथरुणावरी तळमळावें ॥७४॥ दिवसें दिवस होतीं क्षीण । औषधाचाहि न वाटे गुण । म्हणूनी पत्रिका आणून । समर्थांसी दाखविली ॥७५॥ म्हणती आयुष्यमर्यादा । सांगावी मज सुखकंदा । किती दिवस या आपदा । जम भोगाव्या लागतील ॥७६॥ पत्रिका पाहतां क्षणीं । महाराज चिंतायुक्त जाहले मनीं । हेमराज उतावीळ होऊनी । म्हणे काय कळूनी आलें हो ॥७७॥ कवणासहि त्याचें मरण । सांगूं नये हें सत्य जाण । परि एखाद्यास लाभप्रदहि श्रवण । कधी मृत्यूचें होतसे ॥७८॥ अडीच घटका जीवित राहिलें । हें खट्वांग नृपाने जाणिलें । स्वजन्मसार्थक करूनी घेतलें । शिवासी आराधिती मार्कंडेय ॥७९॥ एकदा घर जळल्यावर । मग न बांधावी म्हणे विहीर । परि नरदेह स्वाधीन जोंवर । तोंवर हरिस्मरण करावेंचि ॥२८०॥ ऐसा विचार करूनी मानसीं । बोलती हेमराजासी । म्हणती सांगतों आयुष्यासी । परि मानसीं भिऊं नका ॥८१॥ हेमराज तुम्ही सत्त्वधीर । आतां आयुष्य न उरलें फार । एक दिवस साचार । यापुढती वाचाल ॥८२॥ तरी राजरंकापासून । मृत्यु न टळे कवणालागून । मग शोकाचें काय कारण । अपरिहार्य असती या गोष्टी ॥८३॥ कृतयुगालंकार सम्राट थोर । किती जाहले या भूवर । परि आयुष्य संपतां साचार । निघूनी गेले आले तसे ॥४॥ तैशी अनेक राज्यें आजपर्यंत । किती उलथीं पालथीं होत । किती रसातळाला जात । इति-

हास नयनांपुढे असे ॥८५॥ तरी उरला असे जो काय काळ । तो ईश्वरी चिंतनांत घालवावा सकळ । जोडूनी घ्यावें पुण्यबळ । येईल उपयोगासी तें तुमच्या ॥८६॥ सुविचारी असे तुमचें मन । तरी शांतपणें करावें ईश्वरचिंतन । आतां आम्ही जातों म्हणून । महाराज जाऊं लागले ॥८७॥ कच्च्या गुरूचा तो काय होता चेला । सीतारामां तो काय बोलला । दयाळा वंदूं आपणाला । इच्छा अपूरीच राहतसे ॥८८॥ एक इच्छा होती मनीं । श्रीवासुदेवानंदांच्या नांवांनी । एक शेत करावें ठेवूनी । तेथे पूजार्थ फुलबाग लावावी ॥८९॥ एक भव्य दुकान । नांवें ठेवावें करून । आता राहिला एकचि दिन । म्यां कैसें काय करावें ॥२९०॥ ही ऐसी पराधीन अवस्था । राहणार कैसें करावें आता । हा खेद सद्गुरुनाथा । अंतरीं माझ्या होतसे ॥९१॥ मग सीताराम महाराजांनी । खेद-निवारण कारणीं । गीतेंतील श्लोक म्हणूनी । दाविला असे त्याजला ॥९२॥

येषां त्वंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।
ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजंते मां दृढव्रता: " ॥ (७.२८)

ऐक हेमराजा देऊनी चित्त । काय श्लोकाचा असे अर्थ । पुण्य कर्म करी जो नित्य । त्याचीं लयास जाती सकल पापें ॥३॥ दृढ जे भक्ति करिती जाण । त्यांचें शुद्ध होतें अंतःकरण । म्हणजे एक देह सुटला तरी जाण । दुजा मानव देह प्राप्त होय ॥९४॥ मग तो जन्मापासून । नित्य नेमें करी माझेंच भजन । अनन्यभावें करून । हित त्याचें होईल बा ॥५॥ हें ऐकतांचि भाषण । दुखावलें हेमराजाचें मन । माझा अंगीकार करून । निर्भय आश्वासन मज दिलें असे ॥९६॥ आतां मज पुढील जन्म दावतात । याचा उघड दिसे अर्थ । उद्या मृत्यूच्या मुखांत । जाणार ऐसेंचि वाटले ॥९७॥ तो मजसी शत्रुत्व साधणार । त्याचा पराजय मी करणार । असा मजसी दिलात धीर । तो वाया काय गेला असे ॥९८॥ आपण दिधलेंत अभिवचन । तें काय व्हावे समाधान म्हणून । तुमचें व्हावें समाधान । यास्तव अभिवचन तें दिलें असे ॥९९॥ तरी यांत काय दोष । सांगा हेमराज

आम्हांस । यावरी हेमराज वदे समर्थांस । अभिवचन हें सदोष असे ॥३००॥ वरिवरि असे समाधान । तैसें नव्हे अभिवचन । आणि निघालें हया समर्थ मुखांतून । असत्य कैसे होईल ॥१॥ सामान्य माणसें अभिवचन । देती मोडिती न लागतां क्षण । तरी सत्पुरुषाचें लटके भाषण । कदापि ना होतसे ॥२॥ म्हणूनीच मानिती तया संत । प्रसंगी प्राणहि वेचित । जे मुखाबाहेर शब्द येत । ते माघारी कधी घेती ना ॥३॥ तैसें आपुलें अभिवचन । म्हणजेच मजसी पूर्ण आश्वासन । हीच माझी नौका जाण । असे मृत्यूसागर तरून जाण्याची ॥४॥ तुमची असें दृढ श्रद्धा । परि एक मजला सांगा । कां कोणी मृत्यूचिये संगा । टाळूं शकेल या जगीं ॥५॥ मग हेमराज वदती । अश्वत्थामा बली व्यास मारुति । बिभीषण कृपाचार्य परशुराम जगतीं । हे चिरंजीव असती ना ॥६॥ त्यासहि लाभला असे प्रसाद । कवणाचा तरी आशीर्वाद । परि माझा असे अल्पवाद । तो पुरवावा दयाळा ॥७॥ श्रीसद्गुरु भजनांत एक तप । घालवावें हा संकल्प । तरी दहा पंधरा वरुषांचें आयुष्यमाप । पदरात घालावें दयाळा ॥८॥ परशुराम बिभीषणादिकांचें प्रारब्ध निर्मळ । तयांसी ईश्वराने दिधलें चिरंजीवित्वफळ । प्रारब्ध हें असेल अटळ । तें कदा काळीं चुकेना ॥९॥ ब्रम्हदेवाने कपाळीं । आयुष्यमर्यादा जी कां लिहिली । ती असे कां संपली । मग मृत्यु कैसा टळेल तो ॥३१०॥ तरी तेथे औषधादिक मात्रांचा । उपयोग न होय साचा । जैसा अग्नीवाचूनी राखेवरचा । होम व्यर्थ जाणावा ॥११॥ यावरी हेमराज बोलत । अघटित घटना करी जगन्नाथ । सर्वस्वभावें शरण जाता यदुनाथ । तो काय एक न करी ॥१२॥ भगवंत प्रसन्न झालीयावर । काय हवें तें देणार । प्रारब्धवाद हटणार । महाराज त्या ईश्वरापुढे ॥१३॥ महाराज म्हणती हेमराजालागूनी । मृत्यूस जिंकिता अवनीं । एक्या सद्गुरुवाचूनी । दुसरा कोणी नसेचि ॥१४॥ यावरी वदे हैमराज । प्रभो सीताराम महाराज । सद्गुरुमहिमा कथिला मज । तेणें मी धन्य जाहलों ॥१५॥ तरी आज ज्यांचिये कृपेंबरुनी । सुटेन या मृत्युभयांतूनी । ते सद्गुरुनाथचि मशीं तारूनी । नेतील

भाग्यें पैलथडीं ॥१६॥ माझे वासुदेवानंद सरस्वती दयाघन । ते पावले अंतर्धान । जाणतों मी तत्समान । सीताराम महाराज ॥१७॥ आतां मला न दुजा आधार । तुम्हीच माझे सद्गुरु थोर । तुम्हींच माझे परमेश्वर । भार टाकिला म्यां तुम्हांवरी ॥१८॥ हचा अंगी भरल्या ज्वराने । कैसें स्तवावें म्यां मुखाने । आतां आपुलियेचि इच्छेने । धरावे अथवा सोडावे ॥१९॥ ऐसे शब्द उच्चारून । बसती अंथरुणावरी उठून । द्वय हस्तें करूनी नमन । करुण मुद्रने विलोकिती ॥३२०॥ हो करुण मुद्रा पाहूनी । सीताराम महाराजांचे मनीं । प्रेमभाव द्विगुणीं । वाढला असे तेधवां ॥२१॥ वदती हेमराजा आजचें दिवशीं । भय नसे स्वस्थ असावें मानसीं । आम्ही जातों मंदिरासी । जपानुष्ठान करावया ॥२२॥ उदईक कांही अशुभ चिन्ह । दिसल्यास कळवावें आम्हांलागून । मग आम्ही येथे येऊन । गुरुकृपेने करणें तें करूं ॥२३॥ ऐसें करूनी समाधान । महाराज उठती तेथून । श्रीदत्तमंदिरी येऊन । नित्यक्रमा आचरती ॥२४॥ इकडे हेमराज दुसरे दिनीं । कासाविस होऊं लागे क्षणोक्षणीं । सारखी अंधारी ये नयनीं । उचकी सुरु झाली असे ॥२५॥ लयास गेली वाटे स्मृति । विसंगति आली बोलण्याप्रति । वाटे कोणापाशी तरी बोलती । मधूनीच हे हेमराज ॥२६॥ अहो तुम्ही धरू नका मज । येतील सीताराम महाराज । तुमची खोड मोडतील सहज । दूर व्हा माझेपासूनी ॥२७॥ केव्हा करिताती रुदन । केव्हा विव्हळती मधून । क्षणेक शुद्धींवरी येऊन । सकलांतें अवलोकिती ॥२८॥ तों सकल करिती रुदन । पाहतां म्हणे काय हें अज्ञान । अज्ञाने मृत्यु जाण । टळणार आहे का आमुचा ॥ २९॥ होतीं अशुभ चिन्हे मजलागून । कोणी काळपुरुष येऊन । पकडूं पाहताती जाण । पाश टाकूनी आपुला ॥३३०॥ इतुके शब्द निघती जों मुखांतूनी । तों पुनः पडले बेशुद्ध होऊनी । आठव जाहला असे मनीं । महाराजांच्या बोलण्याचा ॥३१॥ बंधुवर्ग परिवारगण । धावत गेले मंदिरालागून । सांगती व्यथा अति कठिण । तरी चलावें गृहासी ॥३२॥ आपण सदनीं येऊन । वाचवावे हेमराजांचे प्राण ।

महाराज म्हणती येतों मी मागून । तुम्ही पुढे चलावें ॥३३॥ अनन्यभावें करिती प्रार्थना । श्रीवासुदेवा दयाघना । या संकट निवारणा । कैसे करूं दयाळा ॥३४॥ सद्गुरु म्हणती तयांसी । काय तुला राहिलें द्यावयासी । कळूनी कां अज्ञान धरिसी । वाटेल तें तुवां करावें ॥३५॥ तूं नाहीस निर्बळ । आम्हासी आतां घालूं नकोस गळ । दिधलें आहेत सकळ । अधिकार आम्ही तुझे हातीं ॥३६॥ तूं जें आणशील मनांत । तें सत्य होईल निश्चित । इतुकें बोलूनी जाहलें गुप्त । श्रीवासुदेव सद्गुरु ॥३७॥ आतां निश्चित उपाय । करावा तरी काय । गेली सद्गुरुमाय । आपणावरी सोपवूनी ॥३८॥ सकल तप खर्ची घालून । वाचविला जरी याचा प्राण । तरी उद्या प्रेतांचे ढींग येऊन । आपणापुढे पडतील ॥३९॥ जरी मरूं द्यावें यासी । तरी अभिवचन भंग दोषी । होईन मी निश्चयेंसी । ऐसा दुहेरी पेच पडला ॥३४०॥ मग पडतीं विचारीं । तों निरोप येती बरचेवरी । जळें भरलेली पळी पंचमात्री घेऊनी करी । हेमराजाच्या सदनीं निघाले ॥४१॥ हाकेसरशी उडी घेऊनी । बैसले सन्निध मृगासनीं । नीट करिती तपासणी । परि शुद्धि ना दिसे तयासी ॥४२॥ सकलाचें करिती समाधान । म्हणती हा बेसावध असे जाण । आम्ही आल्याचें वर्तमान । अंगारा लावूनी कळवावें ॥४३॥ विभूति कपाळी लावून । महाराज आलें कर्णी सांगून । हेमराज शुद्धीवरी येऊन । पाहूं लागला समर्थाकडे ॥४४॥ महाराज पुसती तयासी । कोणती वेळ आली कैसी । श्रम ना होतील मानसीं । लक्षणें सांगावीं तीं सकल ॥४५॥ मज नेण्यासी पातले दिव्य पुरुष चार । त्यांची लक्षणेंसाचार । विभूति कपाळीं जटाभार । शिरीं असे वळलेला ॥४६॥ त्रिशूल करीं सर्पालंकार कंठीं । मृगचर्मांबर कटीं लंगोटी । शिवजयजयकार ओठीं । असे त्यांचा चाललेला ॥४७॥ मज म्हणती ते लोक चार । चला आम्हांसवें सत्वर । मग तुमचा काय विचार । जातां काय शिवलोका ॥४८॥ तुम्ही पुण्यात्मे गुरुभक्त । म्हणूनी आले हे शिवदूत । यमराजाचा दक्षिण पंथ । बंद असे जाहला ॥४९॥ हेमराज बदे यावरी । श्रीसद्गुरुमहिमा नसानसांतरीं । भरला असे पूर्ण अंतरीं । मग शिव-

लोक तोहि कासया ॥३५०॥ जैसें तरूच्या मुळांसी घातलें पाणी । अन्न दिधलें प्राणिमात्रालागूनी । तें जैसें शाखोपशाखा-इंद्रियांलागूनी । तृप्त करितें सकलांसी ॥५१॥ तैसें एक सद्गुरुपूजन । तीच सकल देवांची भक्ति पूर्ण । यावाचूनी माझें मन । दुजीकडे नच जाय । ५२॥ ऐसें अंतर निर्मळ । सद्गुरुसेवेची इच्छा प्रबळ । म्हणूनी सीताराम दयाळ । काय शिवदूतांशी बोलती । ५३॥ जपी तपी आत्मज्ञानी योगीजन । यांस कोठेंहि नसे अडचण । त्रिलोकासी यांची ओळखण । म्हणूनी बोलती शिवदूतांसी ॥५४॥ तुम्ही शिवप्रभूचे दूत । नेण्यास आलात आमुचा भक्त । तरी एक घटिकापर्यंत । सोडाल काय याजला ॥५५॥ आम्ही न यासी सोडणार । शिवदूत देती उत्तर । परि सोडला तरी होणार । फायदा काय हो तुम्हांला ॥५६॥ कांही देणगी सद्गुरूंना । द्यावयाची हें यांच्या मना । त्यांच्या यथाविधि लेखना । कारणें सोडवें याजला ॥५७॥ शिवदूत म्हणती त्यावर । आमुचें नुकसान ना होणार । परि शिवाज्ञेबाहेर । नाही जाणार आम्हीं कधी ॥५८॥ तुम्हांसी कोण अडविणार । न्यावें तरी एक घडी झाल्यावर । येवढेंच म्हणणें साचार । आमुचें असे आपणांसी ॥५९॥ आम्ही एक घटका सोडल्यावर । मृत्यूची घडी चुकणार । मग कैसा करणार । स्पर्श आम्ही त्याजला ॥३६०॥ जैशी फाशीची तारीख चुकल्यावर । फाशी रद्द ठरणार । ऐसा आम्हांसी कायदेशीर । लागतो कारभार करावया ॥६१॥ मग महाराज वदती दूतांसी । एक घटिका सोडाल यासी । म्हणजेच तुम्ही निर्दोषी । कायद्याप्रमाणें ठराल ॥६२॥ कवणाचें आयुष्य असे भरपूर । त्याची घडी आधीच ना ठरणार । तैसें हेमराजाच्या पत्रिकेवर । सोळा वर्षें आयुष्य असे ॥६३॥ दूत म्हणती महाराजांलागून । आम्हांसहि असे पत्रिकाज्ञान । आयुष्यदिन त्यावरून आज असे शेवटला ॥६४॥ तोच असे बरोबर । महाराज म्हणती तें असत्य ठरणार । दावावी आम्हासी सत्वर । मग पाश मुक्त करूं ॥६५॥ महाराज म्हणती तयांसी । जी पत्रिका आहे तुम्हांपाशी । ती खोटी आहे कैसी । प्रत्यक्ष आतां मी दावितों ॥६६॥ आपुली पंचपात्री उदकें पूर्ण भरूनी ।

घेतली हातीं महाराजांनी । हेमराजा सन्मुख बसवूनी । काय वदती तयासी ॥६७॥ तुमची श्रीगुरु-
सेवार्थ। जगण्याची इच्छा असे मनांत । तरी करा उजवा हात । पुढे आता हेमराजा॥६८॥ दानसंकल्प
मनांत । एकदा समर्थ उच्चारीत । मग प्रकटपणें वदत । सर्वांसमक्ष तेधवां॥६९॥ सोळा वर्षे आम्ही
आपुलीं । आयुष्याचीं जीं राहिलेलीं । तीं तुजप्रति असती दिधलीं । हेमराजा हो तूं सुखी ॥३७०॥
ऐसा वदोनी संकल्प । पंचपात्रांतील दिव्य उदक । हेमराजा हातीं विधिपूर्वक । समर्थांनी सोडिलें
॥७१॥ मग समर्थ सांगती शिवदूतांस । आयुष्यलेख पहावयास । तों दिसूनी आलें त्यांस । आणखी
सोळा वर्षें आयुष्य असे ॥७२॥ आतां तरी पाश मुक्त । कराल कीं नाहीं सांगा त्वरित । नम्र
होऊनी शिवदूत । नमस्कार घालिती समर्थांना ॥७३॥ म्हणती सोळा वरुषांनी येऊन । मग जाऊं
तयासी घेऊन । महाराज म्हणती तोंपर्यंत जाण । वासुदेवरूप तो होईल ॥७४॥ धन्य धन्य तो हेम-
राज । धन्य जगीं अवतार महाराज । दिधलें शेवटलें आयुष्य सहज । दानरूपें भक्तासी ॥७५॥
श्रीसद्गुरुसीतारामा । जाहली दातृत्वाची सीमा । किती उदार तुझा आत्मा । कर्णापरिस अधिक
जनां दिसे ॥७६॥ पातला शेवटीं जो याचक । त्याने आयुष्यरूपी मागीतली भीक । ती पुरी करूनी
हा जगन्नायक । आपुला अवतार संपवी ॥७७॥ त्या भक्ताभिमानी सद्गुरुचे । उपकार कशाने
फिटतील साचे । वारंवार स्मरण वाचें । करी हेमराज मारवाडी ॥७८॥ पुढती बोलल्यासम हा
भक्त । राहिला असे सद्गुरुसेवेंत । वचनासम सकल देत । सद्गुरुसेवे कारणें ॥७९॥ दिधली आठ
नंबर जमीन । दिधली पुष्पवाटिका करून । पन्नास हजारांचें कापडाचें दुकान । श्रीसद्गुरुचरणीं
अर्पिलें ॥३८०॥ तेणे महाराज संतुष्ट मनीं । मोकळे जाहले वचनांतूनी । हेमराजास आशीर्वाद
देऊनी । काय म्हणती तयासी ॥८१॥ आतां इंगोली ग्राम सोडण्यास । अनुज्ञा असावी आम्हांस ।
ऐसें ऐकतां हेमराज भक्तास । तळमळ लागली मानसीं ॥८२॥ हेमराज कृतज्ञ होऊन । उपकार-
कर्त्याचें करी स्तवन । म्हणें आपण वचनबंधनांतून । मोकळे असा गुरुराया ॥८३॥ तुम्ही जावें

म्हणून । हे शद्ब न निघती मुखातून । जातां माय तान्हें सोडून । स्थिति तैशी त्याची होतसे ॥८४॥ भक्तांचे करूनी समाधान । महाराज निघाले इंगोले ग्रामांतून । हुशंगाबादेसी आम्ही जातो म्हणून तेथील जनांशी कथियलें ॥८५॥ शंकरराव आजेगावकर । हे सात्विक भक्त थोर । म्हणती येतो मी बरोबर । परि महाराज न यावें म्हणती तयां ॥८६॥ पुढे पायमार्ग धरूनी । पायींच हळू हळू चालूनी । पोहोचले बडनेरीस येऊन । श्रीसीताराम महाराज । ८७॥ चालतांनाच मार्गात । ज्वर भरला अंगात । देहममता सोडिली समस्त । लक्ष नसे त्या ज्वराकडे ॥८८॥ अति थकलेल्या पायांनी । जाताती महाराज एका भक्तसदनीं । एक वाटीभर ताक त्यांनी । दिधलें प्यावयासी समर्थांना ॥८९॥ पाहातां भरलेल्या ज्वरांत । ताक पिणें हें होय कुपथ्य । परि पथ्याचा विचार चित्तांत । आला नसे तयांच्या ॥३९०॥ क्षुधातृषानिवारण । कशानेहि शांत करणें जाण । नित्यस्वरूपीं असणें मग्न । हेंचि वळण नित्य असे ॥९१॥ म्हणूनी ताक केलें प्राशन । त्या भक्तासी आशीर्वाद देऊन । अश्वत्थ वृक्षाखाली येऊन । स्वस्थ बसूनी राहिले ॥९२॥ जिने ताक दिधलें ती सौभाग्यवती । रामभाऊ नामें तिचा पति । याने जाऊनी अमरावती । बाळाभाऊ जोशी यांना बोलाविलें ॥९३॥ कांही औषध घ्यावें म्हणूनी । बाळाभाऊ म्हणती नम्रपणी । आतां औषध हवा देहालागूनी । उपयोगी नाही पडणार ॥९४॥ आतां शरीरी वाचण्याचे त्राण । नाही उरलें मुळीच जाण । आणिक आम्हासी जीवन । अधिक नको वाटतें ॥९५॥ शरिरधर्मानुसार । त्याचें जें काय होणार । त्याचा आम्हां फिकीर । नाही मुळीं राहिली ॥९६॥ ऐसें अखेरचें केलें भाषण । उत्तरेकडे मुख करून । सिद्धासनावरी बसून । वासुदेवचिंतन चाललें ॥९७॥ योगबलानें अवलंबून । अखेरचा समाधि लावून । वासुदेव वासुदेव उच्चार करून । सच्चिदानंद ब्रम्हपदीं स्थिरावले ॥९८॥ शके अठराशें चाळीस । असे जो कां फाल्गुन मास । शुद्ध अष्टमी तिथीस । अवतार संपविला महाराजांनी ॥९९॥ कळतां भक्तांसी वर्तमान । जाहलें सकलांचें व्याकुळ मन । गेली गुरुमाउली सोडून । आज आम्हां कैसी म्हणती ॥४००॥ ज्यांच्या जशा नमः-

कामना । त्या त्या आठवूनियां मना । करिती धावा सद्गुरुदयावना । कैसा गेलासी तूं सोडूनी ॥१॥ एकमेकांचें करिती समाधान । म्हणती महाराज झाले ब्रम्हपदीं लीन । जरी करिता अनन्य-भावें आठवण । आहेत आपणाजवळी ते ॥२॥ ज्या भव्य अश्वत्थ वृक्षाखालतीं । बैसलो सिद्धा-सनावरती । समाधिस्थ श्रीगुरु सीताराममूर्ति । ब्रम्हपदीं लीन झाली ॥३॥ याच समाधिस्थलावर । जाहला अग्निसंस्कार । क्रियाकर्म काशीविश्वेश्वर । करण्यासी बाळाभाऊ जाताती ॥४॥ श्रीमहा-राजांचे गुरुबंधू काशीसी । असती त्याच समयासी । ज्यांनी स्थापना केली कारंजासी । श्रीनृसिंह सरस्वती मंदिराची ॥५॥ ते आज ब्रम्हीभूत ब्रम्हानंद सरस्वती । भेटले बाळाभाऊप्रति । स्वयें क्रियाकर्में करिती । सीताराम महाराजांची ॥६॥ श्रीमहाराजांचे एक शिष्योत्तम । कैलासवासी वामन गंगाराम । जोशी हेंच उपनाम । असती तेव्हा बडनेरी ॥७॥ त्यांनी याच स्थलीं एक ओटा बांधून । त्यावरी पादुका स्थापून । एक त्रिमुखी दत्तमूर्ति स्थापून । सेवा करिती एकचित्तीं ॥८॥ हे अत्यंत होते भाविक । नित्य पूजा अर्चा अभिषेक । केली दोन तपांहूनी अधिक सेवा हया गुरुदत्तात्रेयाची ॥९॥ पुढे ही श्रीगुरुदत्तमूर्ति । कवणे स्थलीं झाली जाती । करितां बहुत शोध अंतीं । पत्ता न लागला तियेचा । ४१०। आज येथे जी एकमुखी दत्तमूर्ति । दर्शन देई आपणांप्रति । ती येथे जाहली येती । कैशापरीं पहावी ॥११। सद्गुरुसेवेसीं ज्याची आवडी । ज्यांनी समर्थांस अर्पिली शेतीवाडी । तो हेमराज मारवाडी । इंगोलीचा भक्त ठाउका सकलांच्या ॥ १२ ॥ यापूर्वी कांही मंडळींनी । दत्तमंदिरें बांधूनी । दत्तस्थापना करावी म्हणूनी । तेथील मूर्ति मोटारींत ठेविली ॥१३॥ परि नये दत्तात्रेयाच्या मना । ती गाडी मुळीच हालेना । सुरळित यंत्रे दिसती नयनां । परि उपाय हरला सकलांचा ॥१४॥ मूर्ति मोटारींतून काढली । क्षणैक मोटार सूरू झाली । पुढती प्रतीति दुसऱ्या स्थलीं । कैशी दाविली प्रभूने ॥ १५ ॥ सानगुंज संस्थान । जिल्हा परभणी असून । तेथे श्रीगांडामहाराज यांचें देवस्थान । बांधकाम सुरू असे ॥१६। येये

करावी स्थापना । इच्छिती महाराजांचे शिष्य मना । अणिली असे या स्थाना । मूर्ति भक्त-वर्गाने तेथवां ॥१७॥ सभामंडपाचें बांधकाम चाललें । तें सकल खचूनी पडलें । अत्यंत वाईट वाटलें । काय अपराध जाहला म्हणूनी ॥१८॥ तेथे जे असती पूजारी । बापू देव स्वधर्माचारी । देती दृष्टान्त हे कैवारी । श्रीगुरुदत्तात्रेय तयांसी ॥१९॥ मज न गमे इथे स्थानीं । मज पोहोचवा बडनेरीं नेऊनी । मज गमे त्याच ठिकाणीं । असती तेथे रुपें माझीं ॥ ४२० ॥ ऐशी ही एकमुखी । श्रीगुरुदत्तमूर्ति । अति स्वानंदे झाली येती । श्रीनृसिंह सरस्वती । असती गुरुबंधू महाराजांचें ।४२१॥ एकमुखी दत्तात्रेयाची । श्रीवासुदेवनंदांच्या पादुकांची । श्रीसीताराम महाराजांच्या समाधीची । स्थापना स्वामींच्या हस्तें झाली असे ॥२२॥ शके अठराशे सेहेचाळीस । ज्येष्ठ शुद्ध दशमीस । इसवी सन एकोणीसशें चोवीस । गुरुवार दिनांक बारा असे ॥२३॥ या शुभ दिनी विधियुक्त । प्रतिष्ठापना आली करण्यांत । तेथील विहिरीस नांव देत । शांतावापी म्हणूनियां ॥२४॥ या शांतावापीचें जीवन । करील तृषा निवारण । एक पवित्र तीर्थचि जाण । आशीर्वाद तिज दिला असे ॥२५॥ जैसें गंगामातेचें जळ । पवित्र आणि निर्मळ । तैशी येथेहि करितां आंघोळ । शुद्ध अंतर होतसे ॥२६॥ पुढे श्रीस्वामी नृसिंहसरस्वती दीक्षित । जाते झाले अयोध्येंत । तेथेचि होती समाधिस्थ । हे सिद्ध पुरुष योगी ॥२७॥ त्यांच्याहि नाम समाधि पादुकांची स्थापना । या मंदिरीं केली जाणा । ऐशा या दत्तात्रेय त्रय मूर्तीस वंदना । वारंवार आमुची असो ॥२८॥ तैसें हें पवित्र स्थान । अनन्यभावें जातां शरण । होतील कामना परिपूर्ण । सत्य सत्य ही वाचा ॥२९॥ त्यांच्यापाशीं ना भेदभाव । गरीब श्रीमंत रंक वा राव । जैशी भक्ति तैसा देव । जवळी दूर बा राहातसे ॥४३०॥ हें दत्तात्रेयाचें देवस्थान । बडनेरा स्टेशनाची दिशा दक्षिण । यवतमाळ मार्गावरी असून । एक मैल दूर असे ॥३१॥ या देवस्थानाचें उत्पन्न । समाधीजवळी आठ गुंठे जमीन । सुरवातीस घेऊन । ठेविली होती तयांनी ॥३२॥ पुढती एकोणीसशे

सत्तेचाळीस । तेरा एकर तीन गुंठे जमिनींस । दिनांक पांच मार्च महिन्यास । खरेदी शेत केलें असे ॥३३॥ वामन गंगाराम जोशी । हे सकल पाहती त्या व्यवस्थेसी । परि वृद्धापकाळ येतां त्यांसी । पंचकमेटी नेमिली ॥३४॥ ऐशी व्यवस्था करून । सद्गुरुचरणीं जाहले । लीन पुढती किती एक भाविक जन । कार्यें येथे करीत असती ॥३५॥ आज जे कार्यकारी विश्वस्त । मंदिराची व्यवस्था पाहत । असती सकल ते श्रद्धायुक्त । झटती तनमनधन लावूनियां ॥ ३६ ॥ तरी या विश्वस्त मंडळींस विनंति । घेतलें जें कां कार्य हातीं । सदा ठेवूनी शुद्ध मति । भाविक-तेने चालवावें ॥३७॥ मी सांगणार अज्ञान । बुद्धिदाता श्रीभगवान । त्यासी अनन्यभावें जातां शरण । सकल कार्यें सुलभ होती ॥३८॥ मंदिरीं जे उत्सव होती । मार्गशीर्ष दत्तजयंती । आषाढ शुद्ध प्रतिपदेस पुण्यतिथि । श्रीवासुदेवानंद सरस्वतींची होतसे ॥ ३९॥ आश्विन कृष्णपक्ष सप्तमी । श्रीनृसिंह सरस्वती दीक्षित स्वामी । तैसी फाल्गुन शुद्ध अष्टमी । श्रीसीताराम महाराजांची पुण्य-तिथी असे ॥ ४४० ॥ सकल उत्सवा परिस । सीताराममहाराजांच्या पुण्यतिथीस । जनसमुदाय जमे बहुवस । अन्नदानहि बहू होतसे ॥ ४१ ॥ जैसे वाडीक्षेत्रीं कारंज्यांत । सकल कार्ये शुचिर्भुत । पूजा अर्चा नियम पाळित । तैशींच कार्ये येथे घडती ॥ ४२ ॥ श्रीवासुदेवा नंदसरस्वती । त्यांनी दिधली लेखणी हातीं । लावूनी लेखनाची संगति । श्रीसीतारा ममहाराज चरित्र पूर्ण केलें असे ॥ ४२ ॥ इति श्रीसीतारामचरित्रालंकारमणी । गुंफिला असे दृष्टांत कोंदणीं । प्रकाश दाविता अंतःकरणीं । सप्तविंश अध्याय गोड हा ॥ ४४३ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

सप्तविंश अध्याय समाप्त

◎ अवतरणिका ◎

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ सकल चरित्राचा मथितार्थ । असे या अवतरणिकेंत । तीं एक वाचितां समस्त । सार आकळेल सकल ग्रंथाचें ॥१॥ प्रथमारंभीं मंगलाचरण । श्रीगणेशसरस्वतीचें करूनी स्तवन । माता-पिता-सद्गुरूंचे चिंतन । श्रीदत्तात्रेयजन्म कथन प्रथमाध्यायीं ॥ २ ॥ पहिला अवतार अनसूयानंदन । दुजा श्रीपादश्रीवल्लभ होऊन । तिजा नृसिंहसरस्वती जाण । कारंजे ग्रामीं जाहला ॥ ३ ॥ द्वितीय अध्यायीं कथानक । मातापित्यांची ओळख । कैसे होते पुण्यश्लोक । नामग्राम कळलें असे ॥ ४ ॥ पुत्र-कामना धरून । गाणगापुरास जाऊन । करिती गुरुचरित्राचें पारायण । गणेशपंत मनोभावें ॥५॥ कामना धरून उदक सोडिती । परि निष्काम जाहली वृत्ती । बैसलेल्या स्थानाप्रति । वैराग्य उत्पन्न जाहलें ॥ ६ ॥ प्रपंचांतलें गेलें मन । श्रीदत्तस्वरूपीं जाहले लीन । घेतो चतुर्थाश्रम म्हणून । मानस कळविलां कांतेसी ॥ ७ ॥ भक्तसखा श्रीगुरुदत्त । आला तृतीय अध्यायांत । पित्यासी वरदान देत । वृत्तिगालट करूनियां ॥ ८ ॥ सवें अवतार घेऊनी । रमा मातेच्या कुशी जन्मूनीं । खेळती गणेशपंतांच्या सदनीं । चवथ्या अध्यायांत हीं बालके ॥ ९ ॥ पांचव्या अध्यायीं पाळणीं । मातेने बालके धालूनी । जो जो म्हणूनी गाऊनी गाणीं । बोधामृत पाजिलें ॥ १० ॥ मूळ स्वरूपाची ओळखण । बाल सीतारामासी देऊन । मातेसी दिधलें दर्शन । श्रीवासुदेवबाल-दत्तांनी ॥ ११ ॥ शिवशंकर होऊनी प्रसन्न । सहाव्या अध्यायीं येऊन । देऊन गेले दर्शन । वासुदेव-सीताराम-पित्यासी ॥ १२ ॥ सातव्या आठव्या अध्यायांत । बाललीला जाहली श्रुत । बंधुप्रेम दिसुनी येत । वासुदेव सीतारामांचे ॥ १३ ॥ श्रीवासुदेवानंदांचा विद्याभ्यास । पाळिती कैसे ब्रह्मचर्यव्रतास । सान सीतारामबंधूस । गायत्रीमंत्राची देती शिकवणी ॥ १४ ॥ इहलोकींचा

प्रवास संपवूनी । तीर्थरूप गेले सोडूनी । मिळविलें अक्षयपद तयांनी । श्री दत्तचरणासन्निध ॥१५॥ सीतारामाने घेतले दान । यातना सोशिल्या दारुण । हे नवमाध्यायांत कथन । जाहलें श्रुत आपणां ॥१६॥ येती दहाव्या अध्यायांत । माणगांवी मदिरांत । बाल ब्रह्मचारी श्रीगुरुदत्त । भेटती सीतारामम्हाराजांना ॥ १७ ॥ वदे ब्रह्मचारी शुभवाणी । म्हणती चिंता न करीं मनीं । भेटतील आठ दिवसांनी । बंधू तुझे येऊनियां ॥ १८ ॥ येती आठ दिवसांनी । श्रीवासुदेवमहाराज सदनी । संगें श्रीदत्तमूर्ति आणूनी । पाटावरी ठेविली गृहामाजीं ॥ १९ ॥ हें अकराव्यांत जाहले कथन । बाराव्यांत मंदिर उभारून । तीन दिनामाजीं खणून । विहीर बांधून जाहली असे ॥ २० ॥ याच अध्यायीं दृष्टांत । श्रीवासुदेवांसी देती श्रीगुरुदत्त । हें माणगांव सोडूनी त्वरीत । निघावे तुम्हीं येथूनियां ॥ २१ ॥ मातेसी करूनी नमन । सान बंधू सीतारामाचें समाधान । ग्रामवासी जनतेचें सांत्वन । करूनी मागे परतविलें ॥ २२ ॥ मग त्वरा करूम । अन्नपूर्णेसह माणगांव सोडून । चालले वासुदेवमहाराज कृपाघन । तेराव्यांत हे वर्णन असे ॥ २३ ॥ गुरुशिष्यांचीं लक्षणे । वर्णिली अल्पमतीने । चौदाव्या अध्यायामाजीं पाहणें । श्रुत आपणां होतील ॥२४॥ सद्गुरुमहिमा अपरंपार । परि सहजगती हो चमत्कार । तेणेंचि होय जगदुद्धार । हे पुढील तीन अध्यायीं गोविलें ॥ २५ ॥ अठराव्या अध्यायांत वर्णन । सद्गुरुभेटीची इच्छा दारुण । माणग्रामीं न गमे मन । मातेची आज्ञा न मागितली ॥ २६ ॥ एकोणिसाव्या अध्यायांत । मातेसी करूनी प्रणिपात । ग्रामजनासी ना ओळखी देत । ग्रामाबाहेर पातले ॥ २७ ॥ तापसी वेष करूनी धारण । निघाले गुरुशोधाकारण दऱ्या जंगले ओलांडून । ब्रह्मावर्तास पोहोचले ॥ २८ ॥ जाहलां अध्याय विसावा । तोच जीवाचा पूर्ण विसावा । भेटले सद्गुरुवासुदेवा । श्रीसीताराममहाराज ॥ २९ ॥ भक्ताचे करावया कल्याण । तयासी उपदेशामृत पाजून । गायत्रीचें पुरश्चरण । करावयासी बैसविलें । ३० ॥ एकविसाव्या अध्यायांत । जाहला प्रेमकलह बहुत । परि तो कलहरूपी होत । बोध ब्रह्मावर्तजनांसी ॥ ३१ ॥

श्री सीताराम भक्त महान । तेणें उभविलें भक्तीचें निशाण । घेती माघार भगवान । श्रीवासुदेव-
महाराज ॥ ३२ ॥ श्रीगायत्रीपुरश्चरणाची सांगता । करवूनी घेतली भक्तहातां । संतोषविलें
ग्रामस्थां । अन्नवस्त्रधनं देऊनियां ॥ ३३ ॥ जाहलें बाविसाव्या अध्यायीं कथित । गुरुशिष्य असतां
ब्रह्मावर्तांत । तपानुष्ठान आगळें होत । सीताराम अंधींत सापडले ॥ ३४ ॥ प्राण जाहले
कासावीस । बंद पडला श्वासोच्छ्वास । परि अंतरीं एक ध्यास । सद्गुरुधावा चालला ॥ ३५ ॥
सद्गुरुमाउली दयाळ । करी सदा भक्तांचा सांभाळ । क्षणहि न लागतां वेळ । शांत केली ती
अंधी ॥ ३६ ॥ तेविसाव्या अध्यायांत । सद्गुरु शिष्याची परीक्षा घेत । एका भाग्यवती स्त्रीचा
उद्धार होत । भाकर-आंबिल खाऊनियां ॥ ३० ॥ पवनी क्षेत्रीं चातुर्मास । हे थोर गुरुशिष्य
करिती वास । अन्नदान जाहलें बहुवस । सोहळा अपूर्व जाहला ॥ ३८ ॥ आणिक जाहले चमत्कार
श्रवण जाहले मनोहर । देवभक्ताचा महिमा थोर । चौविसाव्यांत वर्णिला ॥ ३९ ॥ पंचविसाव्या
अध्यायांत । पोलिस अधिकाऱ्याचा गर्व हरण करित । आला असे शरणागत । कोल्हापूराहूनी
नम्रत्वें ॥ ४० ॥ गोदावरी काठीं मठांत । स्वाहाकार करावा येथ । ऐसें आलें मनांत । सीताराम
महाराजांच्या ॥ ४१ ॥ परि सद्गुरु आज्ञेवाचून । न होय कार्य जाण । म्हणूनी तयांचा शोध
करून । आज्ञा घेऊन परत येती ॥ ४२ ॥ सव्वीसाव्या अध्यायांत । गोदातीरीं राजूर ग्रामीं मठांत ।
अपूर्व स्वाहाकार होत । तृप्त सकल जाहले ॥ ४३ ॥ पुढती निजानंदीं समाधींत । बैसले
सद्गुरुनाथ । त्या वियोगें तळमळत । सीताराम भक्त हे ॥ ४४ ॥ देहममता सोडूनी । मूर्च्छित
पडला भक्त मेदिनीं । आले तत्काल धाऊनी । समाधींतूनी गुरुनाथ ॥ ४५ ॥ जागती आपुल्या
श्रीदासी । सावध करिती भक्तासी । देती तयांसी दर्शनासी । म्हणती सीतारामा जागा हो
॥४६॥ शोक विरह दुरी करून । शिष्यवर्याचें केलें समाधान । सकल इच्छा परि जाणून । आत्म-
ज्ञान पूर्ण दिलें ॥ ४७ ॥ ऐसा दुजा अवतार घेऊन । मायबाप हे दयाघन । भक्तासी दर्शन देऊन ।

अदृश्य जाहले ॥ ४८ ॥ मग सीतारामम्हाराजांनी । शरणागतांतें तारूनी । करूनी उपकार जनीं । कितीएक ठेविले ॥ ४९ ॥ मग इंगोलीस येऊन । हेमराज भक्ति पाहून । त्याच्या सद्गुरुभक्तिकारण । दया उपजली अंतरीं ॥ ५० ॥ म्हणूनी आपुलें सोळा वरुषांचें आयुष्यदान । त्यास संतोषें करून । मग बडनेरीं येऊन । समाधिस्थ जाहले ॥ ५१ ॥ हें सकल वर्तमान । सत्ताविसाव्या अध्यायीं गोविलें पूर्ण । पाहतील श्रोतेजन । अति आदर वाटेल त्यां ॥ ५२ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

पाठ पद्धति व फलश्रुती

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ कोणी भाविक वाचिती ठेवूनी सप्ताह पद्धति । तयां अध्यायांची संगति । पुढती असे दाविली ॥ १ ॥ चार अध्याय प्रथम दिवशीं । पुढील चार दुसरे दिवशीं । मग तृतीय दिनी त्रयोदशीं । अध्यायसंख्या पूर्ण व्हावी ॥ २ ॥ सप्तदश पर्यंत चवथे दिनीं । वीस पर्यंत पांचवे दिनीं । तेवीसपर्यंन्त सहावे दिनीं । सातवे दिनीं वाचावेत उर्वरित ॥ ३ ॥ तीन दिवसांचें पारायण । करतील कोणी भाविक जन । तरी अध्याय संख्या समान । प्रत्येक दिनीं तई घ्यावी ॥ ४ ॥ पाठ करावयाचें स्थान । गोमयें आधी सारवून ।

त्यावरी रंगवल्ली काढून । एक आसन ठेवावें ।। ५ ।। इच्छित कामना स्मरून। तेसें उदक सोडून पूर्वोत्तर मुख करुन । ग्रंथ पठण करावा ।। ६ ।। सदा असावे शुचिभूंत। मानसींहि असावें व्रतस्थ । यावत्शक्य एकभुक्त । भाविकाने असावें ।। ७ ।। जैसे श्रीगुरूचरित्र । निर्मळ असे पवित्र । मोक्ष दायक तीर्थक्षेत्र । वंदनीय त्रिलोकां ।। ८ ।। एकचि ते दत्तात्रेय । भक्तास्तव सगुण होय । सकल जगासी सद्गुरुमाय। तीच या चरित्री आली असे ।। ९ ।। तोच निराळें रूप घेऊन। बसला स्वानंदे या स्थली येऊन । तरी शंकित करूं नका मन । कदापिहि आपुलें । १० ।। जरी नामरूपें अनेक । तरी मूळ स्वरूप असे एक । नाही नाही फरक । ती श्रीगुरूमाऊली एक असे ।। ११ ।। सप्ताह करणें हें असे कठिण । न जसे सकलासी लागून । तरी एकेक अध्याय पूर्ण । प्रतिदिनी वाचावा ।। १२ ।। तेंहि न होय जाण । तरी अवतरणिका वाचून । श्रीगुरूदत्तात्रेयाते करूनी नमन । ग्रंथ आदरें पूजावा ।। १३ ।। जैसी वृत्तीं तैसी भावना । तैशाचि वसती मनी वासना । तत्समान कामना। मानवाच्या असती अनेक ।। १४ ।। जें शुद्ध भाव धरूनी वाचिती । त्यांसीं होईल फलप्राप्ति । हें श्रीगुरु बोलती । माझिया वाचे वाटतें ।। १५ ।। ज्यासी पाहिजे विद्याभ्यास । त्यांनी एकेक अध्याय सावकाश । मुख करुनी पूर्वेस । सूर्यनारायणास नमूनी वाचावा ।। १६ ।। कोणी मागती संतति । कोणी असे कन्यार्थी ते अष्टोत्तरशत पारायणें करितीं । तरी सफल काम होती निश्चये ।। १७ ।। पुत्र व्हावा कुलदीपक वंश वाढावा यशोदायक । तरी हा ग्रंथ होईल फलदायक । एकविंशोत्तरशत पारायणीं ।। १८ ।। कोणासी असे चिंताभय । तें निरसोनी सकल जाय । गृहसौख्य प्राप्त होय । रोज एक अध्याय वाचितां ।। १९ ।। भूतपिशाच्चवारें जया अंगांत । देहा अति कष्ट देत । त्यास तीर्थ अंगारा न चुकतां संतत । शुद्ध भावानें लावावा ।। २० ।। तयासी समोर बैसवून । दुसऱ्याने करावें पठन । तेणे होईल त्यासी श्रवण । सात सप्ताह करावे ।। २१ ।। श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।।

उपसंहार

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीवासुदेवाय नमः ॥ हया पवित्र चरित्रांत । प्रत्यक्ष बैसले श्रीगुरुदत्त । स्वयं वासुदेवानद सद्गुरुनाथ । श्रीसदगुरु सीताराममहाराज ॥ १ ॥ या ग्रंथासी आशीर्वाद पूर्ण । या ग्रंथासी असे वरदान । म्हणूनीच हें लेखन । या अज्ञान करें जाहले ॥ २ ॥ येथे न कांही माझी मति । देणार तो दत्तप्रभू लेखनसंपत्ति । जैसी दिधली असे तेणें मति । तैसेंच हें चरित्र लिहिलें असे ॥३॥ येथे माझे मीपण । कांही एक नसून । कर्ता करविता एकचि जाण । श्रीसीताराम-दत्तप्रभु ॥ ४ ॥ आतां सकळ श्रोतेयां लागून । अनन्यभावें माझें नमन । मज ध्यावें सांभाळून । प्रेमभावें सर्वदा ॥ ५ ॥ श्रीशंकरस्वामीचें उपकार । जाहले असती अपार । या ओवीबद्ध ग्रंथास आधार । त्यांच्या लिखित चरित्राचा ॥ ६ ॥ आणिक ज्यांनी केली मदत । त्यासी असो माझा प्रणिपात । प्रभूदरबारी निश्चित । सेवा त्यांची रुजू असे ॥ ७ ॥ एकेक पाकळी उकलून । दाविले आपुले चरित्र गहन । ऐशा सत्तावीस पाकळ्या जाण । उमललें कमळ कवणें दिनीं ॥ ८ ॥ शके अठराशें ब्याण्णव आश्विन मास । शुक्ल पक्ष विजयादशमीस । या पूर्ण विकसित चरित्ररुपी सुवर्णकमलास । स्वानंदे करी घेतले ॥ ९ ॥ मानसिक करूनी पूजना । अनन्यभावें करूनी प्रार्थना । श्रीसमर्थसीताराम-महाराजांच्या चरणां । शुद्ध पुष्पांजली ही अर्पिली ॥ १० ॥ आतां मागणें शेवटीं एक चरणी । लक्ष राहावें ईश्वर चरणी । अंतकाळीं या जानकीचे वदनी । श्रीगुरुदत्तनाम हे येवो ॥ ११ ॥

श्री दत्तात्रेयार्पणमस्तु ॥

॥ श्री गुरुदेव दत्त ॥

श्री सीताराम महाराजांची

आरती

卐

जय जय सद्गुरुनाथा । श्री सीतारामा । जय सीतारामा ।
आरती ओवाळीतो । तुजला सुखधामा ॥ धृ० ॥
माता पितयें केली अनन्य जी सेवा ।
केले प्रसन्न त्यांनी दत्तात्रय देवा ।
झाले अंकित त्यांच्या पाहुनीया भावा ।
सुपुत्र होऊनी तारिसी भूवर जडजिवा ॥ १ ॥
बंधू ज्ञानेश्वरा सद्गुरु निवृत्ति ।
तेवी वासुदेवा नंद सरस्वती ।
अखंड श्रद्धाभक्ती जडली पदतीर्थी ।
त्याविण दैवत दुसरे नव्हते त्या जगती ॥ २ ॥

विकार त्यजुनी सारे जिकीयले पूर्ण ।
मन ते आनंदीत हो सद्गुरु पदी लीन ।
संगे राहूनी तीर्थी केली तप दानं ।
तोषविले त्वा यज्ञी सकंलही विप्रगण ॥ ३ ॥
प्रसन्न हृदये तुम्ही धरिले ज्या हाती ।
गेल्या निरसुनी त्याच्या साऱ्या भवपंक्ती ।
संतती संपत्तीही मिळेल त्या मुक्ती ।
जडेल श्रीगुरु चरणी दृढ त्याची भक्ती ॥ ४ ॥
उदार कर्णाहूनी हो तुमचें मन ।
उर्वरित आयुष्य दिधलें ती दान ।
आतां सद्गुरु राया एकची मागेन ।
जानकिला होऊं दे अंती तव स्मरण ॥ ५ ॥